म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3543

# व्यक्ती, संस्था, प्रक्रिया

भारतात आज या परस्परपोषक कशा ठरतील

## अरुण शौरी

REFBK-0026548

अनुवाद:
शिरीष सहस्रबुद्धे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ा :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
ा केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे
वर्गणी भरावी लागले.

3 MAY 1992

6 MAY 1992

- JUN 1992

13 JUN 1992

JUL 1992

4 JUL 1992

6 OCT 1996

6 NOV 1996

20 NOV 1996

२५।११।९८

२३।१।९८

२६।६।९८

( क्र. मा. पहा )
१००००–११–८९

निबंध
३५६३
२६५४८
६।३।८२
निबंध ३५६३
२६५४८
६।३।८२

# व्यक्ती, संस्था, प्रक्रिया

## भारतात आज या परस्परपोषक कशा ठरतील

## अरुण शौरी

REFBK-0026548

अनुवाद:
शिरीष सहस्रबुद्धे

Individuals, Institutions, Processes

- Arun Shourie

मराठी अनुवाद
शिरीष सहस्त्रबुद्धे

© अरुण शौरी

प्रकाशक •
सुनील मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६, सदाशिव पेठ
पुणे

मुद्रक •
संगम प्रेस प्रा. लि.
कोथरूड
पुणे

प्रथमावृत्ती •
जानेवारी १९९२

किंमत •
९० रुपये

मुखपृष्ठ सजावट •
बाबू उडूपी

(लेख क्र. ३, ९, ११, १२ व १३ प्रथम इंडियन एक्स्प्रेस दैनिकात प्रसिद्ध झाले. क्र. २, ५, ६ व ८ प्रथम इलस्ट्रेटेड वीकलीमध्ये प्रसिद्ध झाले. या पुस्तकासाठी त्यात काही बदल केले गेले आहेत. लेख क्र. १, ४ व १० पूर्वप्रकाशित नाहीत.)

ISBN 81-7161-170-2

*"...आमच्या मातापित्यांना*
*आणि आमच्या लाडक्या आदितला...*
*त्याच्या धैर्याला, त्याच्या हास्याला*
*आणि तो आम्हांला प्रत्यही*
*देत असलेल्या शिकवणुकीला..."*

## अरुण शौरी यांची इतर पुस्तके

- हिंदुइझम, एसेन्स ॲन्ड इमर्जन्स
- सिम्प्टम्स ऑफ फॅसिझम
- इन्स्टिट्यूशन्स इन द जनता फेज
- मिसेस् गांधीज् सेकन्ड रेन
  (मराठी अनुवाद : अरुण शौरी यांचे निवडक लेख :
  मेहता पब्लिशिंग हाऊस)
- रिलिजन इन् पॉलिटिक्स
  (मराठी अनुवाद : धर्म आणि राजकारण
  मेहता पब्लिशिंग हाऊसचे प्रकाशन)

# प्रा स्ता वि क

आज भारतात शासकीय कारभाराच्या साऱ्या संस्था नि यंत्रणा अस्ताव्यस्त झाल्या आहेत, कमालीच्या दुबळ्या झाल्या आहेत आणि त्यांच्यांतूनच सुधारणेला सुरुवात होईल, अशी शक्यता बिलकुल नाही. राजकारणाच्या रिंगणातून प्रयत्नाला सुरुवात करून या यंत्रणा सुधारणे खरोखरच अशक्य आहे.

- आणि तरीही देशात खूप मोठ्या प्रमाणात विधायक कार्य चालू आहे - क्षुद्र राजकारणाच्या आखाड्याबाहेर राहून, शासकीय कारभाराच्या औपचारिक चौकटीबाहेर राहून.

हे विधायक काम निःस्वार्थी सेवाभावाने भारलेले आहे, नव्या वाटा शोधणारे आहे, मोठ्या संख्येने लोक त्यात सहभागी आहेत; आणि तरीही, आपल्या समाजातल्या विविध संस्थांचे कामकाज सुधारावे, यासाठी अशा विधायक कामाचा उपयोग होऊ शकत नाही. गांधीजींनी केलेला प्रत्येक सत्याग्रह आणि हाती घेतलेला प्रत्येक विधायक कार्यप्रकल्प यांच्यांत स्वातंत्र्यासाठी करायच्या राष्ट्रीय चळवळीची आस होती. त्याउलट आजचे विधायक कार्य मात्र समाजाच्या व्यापक प्रश्नांना जेवढे भिडायला हवे, तेवढे भिडत नाही. शिवाय प्रत्येक गटाचे कार्य स्वतंत्रपणाने उभे असल्यामुळे त्याचा एकत्रित परिणाम दिसून येत नाही. या कार्याला नवी दिशा कशी देता येईल? त्याचा एकत्रित प्रभाव कार्यकारी यंत्रणांवर पडावा आणि त्यातून लोकांचे हित अधिक चांगले साधले जावे, यासाठी काय करता येईल? न्यायव्यवस्था, शासकीय सेवा आणि पत्रकारिता अशा आपल्या संस्थांचा धर्म काय असावा? त्याची जडणघडण कोणत्या प्रक्रियेतून व्हावी? या संस्था चालवणाऱ्या व्यक्तींनी अशा धर्माप्रमाणेच आचरण करावे, यासाठी कोणते मार्ग वापरावे लागतील?

या आणि अशा प्रश्नांच्या उत्तरांचा शोध यापुढील लेख घेणार आहेत. त्यांतले बरेचसे लेख गांधीजी हा केंद्रबिंदू धरून लिहिले गेले आहेत. त्याचीही अनेक कारणे आहेत. गौतम बुद्धानंतर सर्जनशील विचारवंत म्हणून नाव घ्यावे लागेल, ते गांधीजींचेच. त्यामुळे भारतातल्या प्रत्येक सुधारणावाद्याला गांधीजींचे जीवन आणि कार्य यांच्यावर लक्ष केंद्रित करावे लागणे आवश्यकच ठरते. आणखी एक कारण, म्हणजे आपला समाज व राजकारण यांत सुधारणा घडवून आणण्याचे अनेक प्रयत्न, आंदोलने यांचे निरीक्षण करून मगच मी हे लेख लिहिले आहेत.

उदाहरण द्यायचे तर अखिल आसाम विद्यार्थी संघटनेचे नेते १९८२ च्या अखेरपावेतो किती हताश झाले होते, हे मी स्वतःच पाहिले आहे. एका शांततामय चळवळीचे पुढारपण ते करीत होते. त्या चळवळीचा विषयही राष्ट्रीय महत्त्वाचा होता. खुद्द आसामात त्यांच्या चळवळीला उदंड यश लाभत होते, पण उरलेल्या देशाने मात्र त्यांच्याकडे साफ दुर्लक्ष केले होते. राज्यकर्ते उपेक्षेचा अभिनय करीत नव्हते, तर खरोखरीच त्यांची ठार उपेक्षा करीत होते. या विद्यार्थ्यांनी मला व्याख्यानासाठी बोलाविले, त्यातून 'आशेची किरणे' लिहिली गेली. धीराचे शब्द' लिहून झाले, ते राजीव गांधींच्या सरकारविरुद्धच्या आमच्या संघर्षातल्या सहकाऱ्यांना धीर देण्यासाठी, त्यांनी उतावळेपणाने हताश होऊ नये, यासाठी.

गांधीजींचे जीवन आणि लेखन यांतल्या अनेक मौलिक सूचना आजही आपल्या संस्था-यंत्रणा सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या आहेत. त्यांतील नेत्यांना मार्गदर्शक ठरणाऱ्या आहेत. परंतु याखेरीज आणखीही एका कारणासाठी त्यांच्या लेखनसंग्रहातील उतारे नि अवतरणे देण्याचा मोह मला वारंवार झाला. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत अथवा काळात जी नेमकी गोष्ट समाजाला सांगायला हवी, ती ते भाषणातून किंवा लिखाणातून अचूक सांगत असत. कधी ते प्रोत्साहनपर शब्द असत. कधी आपल्या मनोव्यापारांवर आपली कशी नजर हवी, याबद्दलचा सल्ला असे, तर कधी ढालीसारखे संरक्षण करील, असा एखादा वागणुकीचा नियम असे.

अर्थात गांधीजींचे संदर्भ यापुढील लिखाणात पानोपानी असले, तरी त्याची कारणे वर सांगितल्याप्रमाणे मर्यादितच ओहत. गांधीजींच्या कार्याचे सर्वांगीण मूल्यमापन किंवा संपूर्ण निवेदन या लेखात शोधण्याचा प्रयत्न करू नये. भारतात आज काय काय करायला हवे, त्याचा समग्र वृत्तांत या लिखाणातून मिळेल, अशीही अपेक्षा करू नये. त्यांपैकी काही गोष्टींचा मागोवा हे लेख घेतील, इतकेच. उदाहरणार्थ, व्यवसाय हा विभाग. फक्त चारच तऱ्हांच्या व्यावसायिकांबद्दलचे निबंध त्यात समाविष्ट करता आले - बुद्धिजीवी, सनदी अधिकारी, कामगार पुढारी आणि पत्रकार. त्यामध्येही सद्यःस्थितीत महत्त्वाचे वाटणारे मुद्देच तेवढे मांडलेले आहेत. त्यामुळे माझे हे निबंध म्हणजे फक्त वाटाड्ये आहेत. वाचकांनी त्यांच्या आधाराने स्वतःच वाटा शोधायच्या आहेत, प्रसंगी घडवायच्या आहेत. त्यासाठी जरूर तेवढी शिदोरी त्यांना या लिखाणातून मिळेल, अशी आशा वाटते.

# अनुक्रम


**प्रास्ताविक**

**पार्श्वभूमी**

संस्था, व्यक्ती, प्रक्रिया १

**गांधीजींचा मार्ग**

गांधीजींचा मार्ग आणि आपला मार्ग २५

आशेची किरणे ४७

धीराचे शब्द ६४

**कार्यवाही**

सुजनांमध्ये विसंवाद का होतो? ८७

एक राष्ट्रीय सवय आणि तीवरील उपाय १०१

कोलाहलातून सुसंगत विचाराकडे १२४

**व्यवसाय**

सावळ्या गोंधळाचे गोंधळी १४२

सनदी अधिकारी की निव्वळ अभिनम्र नोकर? १५२

कामगार संघटनांतील दलाल १६१

वृत्तपत्रांबाबत काय करायला हवे? १८०

**उभे ठाकल्यानंतर**

निव्वळ लेखक काय करू शकेल?

त्यासाठी त्याने काय करायला हवे? १९८

ताठ उभे राहताना २०६

# व्यक्ती, संस्था, प्रक्रिया

# पार्श्वभूमी

ग्रंथालय ठाणे 37863 विवेक घ 26482 घ3ो12

## १. संस्था, व्यक्ती, प्रक्रिया

आपल्या संस्थांची आपणच दुर्दशा करून टाकली आहे. परिणामी या संस्था ज्या उद्दिष्टांसाठी सुरू केल्या त्यांची पूर्ती होऊ शकत नाही. त्यामुळे संपूर्ण व्यवस्थेत लांब पल्ल्याचा बदल घडवून आणावा असा आग्रह अनेकांनी धरला. जयप्रकाश नारायण ( जे. पी.) यांनी 'अे प्ली फॉर द रीकन्स्ट्रक्शन ऑफ द इंडियन पॉलिटिक्स' या आपल्या निबंधात संपूर्ण फेररचनेचा प्रस्ताव मांडला [१]. अलिकडे समकालीन भारतावरच्या विचारपूर्ण अशा एका पुस्तकात बी. के. नेहरू यांनी तितकाच मूलगामी प्रस्ताव मांडला आहे. आपण अध्यक्षीय राज्यपद्धती स्वीकारावी, राष्ट्राध्यक्षांची निवड लोकांकडून थेट मतदानाने व्हावी आणि त्याला सात वर्षाच्या सलग मुदतीसाठी आयुष्यात एकदाच अध्यक्ष बनता यावे अशा प्रकारच्या सूचना त्यांनी मांडल्या होत्या [२].

जेपींचा युक्तिवाद आणि श्री. नेहरूंचा प्रस्ताव यात आश्चर्य वाटेल इतकी साम्यस्थळे आहेत. दोन्ही लेख बारकाईने वाचावेत आणि त्यावर चर्चा करावी अशा योग्यतेचे आहेत.

मी मात्र वेगळ्या विचारधारेचा मागोवा घेणार आहे.

या विचारधारेचा उगम एका साध्या वस्तुस्थितीत आहे. जगही आवर्जून भर देईल अशा एका वस्तुस्थितीत.

ती अशी : आपली जनता आणि आपले राज्यकर्ते आता ज्या तऱ्हेने वागत आहेत त्याच तऱ्हेने वागत राहिले तर सध्याच्या व्यवस्थेचे जे वाटोळे आपण केले आहे तेच कुठल्याही नव्या व्यवस्थेचे होईल. याउलट आपण वागण्यात सुधारणा केली, किमान आहेत ते कायदे तेवढे पाळायला लागलो तर ही व्यवस्था सुद्धा काही थोड्याशा सुधारणांसह उत्तम चालू शकेल. त्यामुळे माझा आग्रह राहील तो असा की, घटनात्मक संरचना बदलताना जितकी काळजी आपण

---

१) १९५९ मध्ये लिहिलेला हा लेख 'अ रिव्होल्यूशनरीज क्वेस्ट' या उत्तम लेखसंग्रहात समाविष्ट आहे. संपादक बिमल प्रसाद, ऑक्सफर्ड, १९८०.

२) राजाजी स्मारक व्याख्यानमालेत १९८३ मध्ये झालेले व्याख्यान 'घटनात्मक सुधारणेचा प्रस्ताव.' आता 'थॉट्स ऑन अवर प्रेझेंट डिसकन्टेंट्स' या संग्रहात समाविष्ट. बी.के. नेहरू, अलाईड पब्लिशर्स १९८६.

घ्यायला हवी तितकीच निश्चितपणे आपली वागणूक सुधारण्याबाबत दाखवायला हवी.

लेखनाच्या सुरुवातीलाच मी या मुद्यावर भर देऊ इच्छितो. गांधीजींनी स्वातंत्र्याच्या चळवळीत शुद्ध वर्तनाचा आग्रह पक्का मुरवला होता. गौतम बुद्धानंतर शुद्ध आचरणावर इतका भर फक्त गांधीजींनीच दिला. त्यांची शिकवण आणि कार्य या दोन्हींचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे पारंपरिक राजकीय मांडणीपेक्षा व्यक्तिगत शुद्ध वर्तनावर कटाक्ष. पारंपरिक संरचना निश्चित करण्याची वेळ येऊन ठेपली तेव्हाही शुद्ध आचरण हा त्या चर्चेचा गाभा होता व त्यावर जोर दिला गेला होता. घटना समितीच्या पहिल्या अधिवेशनाच्या उद्घाटनाचे भाषण करताना समितीचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांनी जोसेफ स्टोरीच्या एका उताऱ्याची आठवण काढली होती. 'कॉमेंटरीज् ऑन द कॉन्स्टिट्यूशन ऑफ द युनायटेड स्टेटस्' या आपल्या महान ग्रंथाच्या समारोपादाखल लिहिलेला हा उतारा अवश्य आठवावा असा आहे:

'आपल्या राज्यघटनेच्या रूपाने एक उदात्त वारसा आपल्याला मिळालेला आहे हे अमेरिकन तरुणांनी कधीही विसरू नये. हा वारसा त्यांच्या पूर्वजांच्या हाल-अपेष्टा, कष्ट आणि रक्तातून आला आहे. त्याची इमानाने जपणूक केली आणि त्यात शहाणपणाने सुधारणा केली तर पुढच्या सर्व पिढ्यांना आयुष्यातील मोलाचा आशीर्वाद, स्वातंत्र्याचा शांतिपूर्ण उपभोग, धर्म आणि स्वातंत्र्य ही मूल्ये पोचती करत राहील, अशी या वारशाची ताकद आहे. विलक्षण कौशल्य आणि निष्ठा असलेल्या शिल्पकारांनी ही संरचना उभारली आहे. तिचा पाया भक्कम आहे. तिचे विविध भाग अतीव सुंदर तितकेच उपयुक्त आहेत. तिच्यातील व्यवस्थेत सहजपणा आणि शिस्त आहे, आणि तिचे संरक्षक कवच अभेद्य आहे. मानवाची निर्मिती अजरामर ठरू शकत असेल, तर त्या वैभवाला पात्र अशी ही राज्यघटना आहे. मात्र तरी, तिचा एकमेव रक्षक असलेल्या लोकांनीच नादानपणा, भ्रष्टाचार किंवा दुर्लक्ष केले तर ही इमारत एका तासात कोसळून नष्ट होईल. प्रजासत्ताक राज्ये निर्माण होतात ती नागरिकांची बुद्धिमत्ता, लोकाभिमुखता व सद्गुणांच्या जोरावर. आपल्या विचारार्थ मी हे मुद्दाम लिहीत आहे. सार्वजनिक कार्यकारी मंडळातून जेव्हा प्रामाणिक, परखड विद्वानांची हकालपट्टी होते आणि लोकांचा खोटा अनुनय करणाऱ्या दगाबाज लबाडांना पारितोषिके दिली जातात तेव्हा प्रजासत्ताक राज्ये कोसळून पडतात'[३].

तीन वर्षांनंतर घटना समितीतील चर्चा संपली. समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद राज्यघटना स्वीकारण्याचा ठराव मांडण्यासाठी उठले. त्यांनीही भाषणात अपरिहार्य पूर्वअट विशद केली:

'राज्यघटनेमध्ये काही तरतुदी असोत किंवा नसोत, देशाचा कारभार कशा तऱ्हेने चालविला जात आहे यावर लोकांचे कल्याण अवलंबून राहील.

---

३) घटना समितीतील चर्चा, लोकसभा सचिवालय १९८५, खंड एक, पृष्ठ पाच.

कारभार कसा चालेल हे तो चालविणाऱ्यांवर अवलंबून आहे. राष्ट्राची योग्यता असेल त्याप्रमाणे बरे-वाईट शासन त्याला मिळेल, ही म्हण जुनी झाली. आपल्या राज्यघटनेत काहींना एखाद्या कारणाने आक्षेपार्ह वाटतील अशाही तरतुदी आहेत. तथापि असे दोष देशाची सध्याची परिस्थिती आणि जनता यांच्या संदर्भात अपरिहार्य आहेत. ते आपण मान्य करायला हवेत. निवडून आलेले लोक चांगल्या पात्रतेचे असतील, चारित्र्यसंपन्न आणि प्रामाणिक असतील तर सदोष घटनेचाही ते उत्तम उपयोग करू शकतील, परंतु हे सद्गुण त्यांच्यापाशी नसले तर निव्वळ राज्यघटना देशाचे भले करू शकणार नाही. शेवटी घटना ही निर्जीव असते आणि तिचे नियंत्रण व संचालन करणाऱ्या व्यक्तींमुळे तिला चैतन्य प्राप्त होते. आज भारताला सगळ्यात जास्त जरूर असेल तर देशाचे हित प्रधान मानणाऱ्या प्रामाणिक लोकांच्या संचाची. जीवनातल्या अनेक घटकांवर आधारित अशी फुटीरतावादी प्रवृत्ती डोके वर काढताना दिसते. जातिभेद हे तिचे एक उदाहरण. अशा भेदातून दूषित पूर्वग्रह निर्माण होतो. त्यावर मात करायची तर खंबीर चारित्र्याची, दूरदृष्टीची माणसे हवीत. छोट्या छोट्या गटांचे हितसंबंध जतन करण्यासाठी जी राष्ट्राच्या व्यापक हिताचा बळी देणार नाहीत अशी माणसे हवीत. आपला देश अशी माणसे भरपूर प्रमाणात निर्माण करील अशी आशा आपण बाळगू या. स्वातंत्र्यासाठी जो संघर्ष आपण केला त्या काळातील अनुभवाच्या आधाराने मी हे म्हणत आहे. नवनवीन प्रसंग ओढवतात तसतशी त्यांना तोंड देणारी माणसे वर येतात. स्वातंत्र्यलढ्यात अनेक वेळा काँग्रेसचे सारे वरिष्ठ नेते एकाएकी अटकेत पडले. पुढील योजनेच्या दृष्टीने आपल्या अनुयायांना सूचना देऊन ठेवण्याइतकीही फुरसत नेत्यांना मिळाली नाही. अशा प्रत्येक वेळी सामान्य जनतेतून नवे पुढारी उभे राहिले आणि अपेक्षेबाहेर संघटनकौशल्य, बुद्धिमत्ता आणि स्वयंस्फूर्ती दाखवून त्यांनी चळवळ पुढे नेली. त्यावरून मला अशी खात्री वाटते की, ज्या ज्या वेळी चारित्र्यसंपन्न व्यक्तींची गरज भासेल त्या त्या वेळी अशा व्यक्ती जनतेतून पुढे येतील. अर्थात याचा अर्थ स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व ज्यांनी केले त्यांनी आरामाने पहुडावे असा नाही. आम्ही आमचे कर्तव्य बजावले, आता कष्टाची फळे चाखण्याची वेळ आली आहे, असे त्यांनी म्हणू नये. कामाची खरी कळकळ असणाऱ्या कोणाच्याही बाबतीत अशी वेळ कधीच येत नाही. भारतामध्ये आज आपणासमोर उभी ठाकलेली आव्हाने स्वातंत्र्यलढ्याच्या आव्हानांपेक्षाही अधिक अवघड आहेत. पूर्वी परस्परविरोधी दावे आणि मते यांचा समन्वय साधण्याची वेळ आली नव्हती. अन्नधान्य असो की सत्ता– त्यांचे वाटप करायला लागले नव्हते. आता हे सारे काम करायचे आहे आणि प्रलोभने तर खूप मोठी आहेत. या प्रलोभनांवर मात करण्याची शक्ती आणि शहाणपण आपल्याला मिळावे आणि जो देश आपण स्वतंत्र केला त्याची सेवा आपल्याला करता यावी अशी माझी ईश्वरचरणी प्रार्थना आहे. [४]'

४) (घटनासमितीतील चर्चा, खंड १०, पृष्ठे ९९३-९९४.)

डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे हे शब्द किती मोलाचे आहेत! त्यांनी दिलेला इशारा

किती खरा आहे! आणि स्वातंत्र्यलढ्यातील नवनवीन नेत्यांबाबत सांगितले तसे नेते आपल्या या वेदनेतून निर्माण व्हावेत अशी आपली किती तळमळ आहे!

मी विस्ताराने मांडू इच्छितो तो हा विषय; आणि हे कार्य पुढे नेण्यासाठी कोणत्या गोष्टी करता येतील त्याचाही प्रस्ताव मी मांडणार आहे.

## बदलती ध्येये, नागमोडी वाटचाल

समाजातील संस्था, लोकांची जीवनपद्धती आणि नं.तिनियम हे अनुभवातून घडलेले असतात. प्रो. हायेक यांनी म्हटल्याप्रमाणे समाजा..ा या गोष्टींचा हळूहळू शोध लागत असतो.

ही प्रक्रिया ठरीव, ठाशीव अशी नसते. ती गतिशील असली, तरी उद्दिष्ट गाठीलच याची खात्री नसते. कारण समाज आपले नीतिनियम बदलत राहतात. एवढेच नव्हे तर ठरवलेल्या उद्दिष्टांपर्यंत पोचण्यासाठी ज्या संस्था नि यंत्रणा वापरायच्या, त्यातही सुधारणा व बदल घडत राहतात. फार काय उद्दिष्टांचासुद्धा फेरविचार व फेरमांडणी होऊ शकते. नवनवीन शक्यता निर्माण होतात, त्या काही वेळा या प्रक्रियेमधूनच तर काही वेळा स्वायत्तपणे चालणाऱ्या काही बदलातून : उदा. तंत्रज्ञानातील प्रगती, अनुभव परिपक्व होत जातो, तसतशी मूल्ये बदलतात, पाहण्याची दृष्टी बदलते, विविध घटकांतील शक्तींचा समतोल बदलत जातो.

या साऱ्या बदलत्या प्रवाहांच्या काठाने आपण जो प्रवास करतो तोही ठराविक गतीने नि पद्धतीने करीत नाही. आपण पुन्हा पुन्हा प्रयत्न करून, रस्ते बदलत ध्येयाच्या जवळपास जात राहतो.

वाट चालताना काही वेळा दिशाभूल होते. अशांपैकी काही चुका तर खूप महाग ठरतात. स्टॅलिनवादाचेच उदाहरण घ्या. आपल्याकडच्या नि जगभरच्या साम्यवाद्यांनी नि त्यांच्या सहप्रवाशांनी स्टॅलिनशाहीचा केवढा उदोउदो केला; पण सोविएत रशियाला त्याची किंमत चुकती करावी लागली ती दोन कोटी ऐंशी लाख माणसांचा बळी देऊन.

चुकांची दुरुस्तीही केली जाते; आणि काही दुरुस्त्यांचे रूपांतर चुकांमध्येही होऊ शकते.

काही चुकांचे जे परिणाम समाजाला भोगावे लागतात त्यातून नव्या विधायक वाटा चोखाळण्याची पूर्वतयारी होत असते. स्टॅलिनशाही ही ख्रुश्चोव्ह आणि गोर्बाचोव्ह यांच्या आगमनाची पूर्वतयारी असते. भारतातील आणीबाणीची परिस्थिती म्हणजे जनता पार्टीच्या राज्यारोहणाची पूर्वतयारी होती तर जनता राजवट ही श्रीमती गांधींच्या पुनरागमनाची नांदी होती.

अनेकदा यातून अपघातांचा जन्म होतो. जिना गंभीररीत्या आजारी आहेत ही गोष्ट १९४६ मध्ये काँग्रेसच्या नेत्यांनी समजून घेतली असती आणि गांधीजींचा सल्ला मानून त्यांनी ब्रिटिशांच्या जाण्याबाबतचा निर्णय थोडा पुढे ढकलला असता तर परिस्थितीने काही वेगळेच वळण घेतले असते. ब्रिटिशांना निघून जायला त्यांनी भाग पाडले असते, तर या उपखंडातील लोकांना अखंड भारतात रहायचे की द्विखंड भारतात याचा निर्णय आपला आपण करता आला असता. ब्रिटिश

मंत्रिमंडळ आणि संसद यांचे निर्णय स्वतःवर लादून घेण्याची वेळ आली नसती. पण अनेक दशकांच्या संघर्षाने थकलेल्या नेत्यांनी जिनांचे आयुष्य संपत आल्याचे जाणले नाही, आणि फाळणीचा अपघात घडला.

काय निष्पन्न होणार यावर अनेकदा पूर्णपणे परस्परविरोधी शक्तींचा प्रभावही पडत असतो. भारतात ब्रिटिश सत्तेची पत घालविली ती गांधीजींच्या अहिंसेने, तर युरोपात ब्रिटिशांचा दम काढला तो हिटलरच्या हिंसेने.

संस्था, मूल्ये किंवा प्रक्रिया या स्वाभाविकच अमूर्त नसतात. त्या व्यक्तींच्या द्वारा काम करीत असतात. पण त्यांच्यातील नातेसंबंध गुंतागुंतीचे असतात. ताज्या इतिहासातही याची परस्परविरोधी उदाहरणे सापडतात.

एका बाजूला नवा माणूस घडवण्याच्या सिद्धांतावर आधारित अनेक प्रयोग दिसतात. हिटलरचा जर्मनी घ्या, लेनिन व स्टॅलिनचा सोविएत रशिया घ्या किंवा माओचा चीन घ्या. हे प्रयोग होते नवा आर्य, नवा रशियन, नवा कामगार घडवण्याचे. लाल रक्षकांच्या तत्त्वज्ञानाने भारलेला नवा समाज निर्माण करण्याचे. पण प्रयोगावरचे झाकण उचलले गेले मात्र, माणसे आणि त्यांच्या आशा - आकांक्षा पूर्वीप्रमाणेच राहिल्याचे आपल्या लक्षात आले. आज माओने नवा चिनी माणूस कसा घडवला याचे आश्चर्य वाटत नाही, तर चिन्यांना त्याने इतके दीर्घकाळ कसे दडपून ठेवले याचे नवल वाटते. रशियात गोर्बाचोव्ह यांना, पोलंडमध्ये सॉलिडॅरिटीला आणि पूर्व जर्मनीत भिंतीचा अडसर दूर होण्याला लोकांचा काय जबरदस्त प्रतिसाद मिळाला हे लक्षात घ्या, आणि मग स्वतःला प्रश्न विचारा, ‘नवा’ माणूस ?

अशा तऱ्हेच्या ऐतिहासिक अनुभवांच्या आधारे मॅन्डव्हिले ते ह्यूम ते हायेक अशा द्रष्ट्या माणसांनी निष्कर्ष काढला होता की समाजातील संस्था, कायदे, नीतीनियम आणि प्रक्रिया या मानवी कृतीतून निष्पन्न झालेल्या असतात. मानवाच्या पूर्वनियोजनातून नव्हे. मोझेस असो, मनू असो की घटनासमिती असो, त्यांनी निर्माण केलेल्या संस्था नि कायदे एखाद्या पोकळीतून जन्माला येत नाहीत. त्यांच्या काळापर्यंत साठत आलेला लोकजीवनाचा अनुभव ते सूत्रबद्ध करीत असतात. लोकांना आलेल्या अनुभवांचेच रूपांतर संस्थात्मक संरचनेत नि नियमात केले जात असते. ज्या वेळी हे आराखडे नि नीतिनियम सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यात असफल ठरतात, त्या वेळी ही उद्दिष्टे बदलतात व त्या वेळी नव्या संरचना, नव्या वाटा पुन्हा प्रस्थापित होतात. एखादा नवा मोझेस किंवा मनू निर्माण होण्यापूर्वीच किंवा नवी घटनासमिती ठरविली जाण्यापूर्वीच नव्या गोष्टींची व्यवहारात कार्यवाहीसुद्धा झालेली असते. आपल्याकडे १९५० च्या दशकामध्ये आपण औद्योगिक वाढीसंबंधी एक विशिष्ट भूमिका घेतली. राजाजींनी तिचे वर्णन ‘परमिट राज’ असे केले होते. त्या पुढच्या सरकारांना ही भूमिका खुलेपणाने बदलण्याचे धाडस झाले नाही. पण तरीही ही भूमिका व्यवहाराबरोबर विरघळत गेली आणि तिच्या जागी नवी भूमिका आली. ही गोष्ट घडली कशी? हे घडले ते हजारो माणसांनी या व्यवस्थेप्रमाणे वागणे सोडून दिल्यामुळेच. या भूमिकेमुळे

करांचे प्रमाण प्रचंड वाढले आणि सन १९५० च्या दशकामध्ये त्यामुळे खाजगी क्षेत्राची अर्थव्यवस्था धोक्यात आली. काही मोजक्या व्यक्तींनी लोकांचे लक्ष याकडे वेधण्याचा प्रयत्न धैर्याने केला आणि त्याबद्दल बदनामीही सोसली. पुढे मात्र या दराने कर देण्याचे लोकांनी सोडूनच दिले तेव्हा ते कराचे दर पोकळ, विफल ठरले. मग काही काळाने ते हळूहळू कमी करण्यात आले.

तेव्हा बदलामागची प्रेरणा होती ती मानवी कृतीची. पूर्वनियोजनाची नव्हे. आणि त्यातूनच ह्यूमपासून हायेकपर्यंत अनेक विचारवंत असा निष्कर्ष काढतात की, राज्यकर्त्यांनी आपला समाजव्यवहारातील हस्तक्षेप जितका कमी करता येईल, तितका करावा. ज्या समाजात राज्यकर्त्यांचा हस्तक्षेप सर्वाधिक असतो तो कोठल्या अवस्थेला भरकटत जातो याची ठळक उदाहरणे नाझी जर्मनी किंवा सोविएत रशिया यावरून दिसतात, आणि ह्यूम, हायेक यांच्या प्रतिपादनाला बळकटी येते.

दैनंदिन जीवनाच्या पातळीवरही ही प्रक्रिया व्यक्तींच्या माध्यमातून आणि तरीही व्यक्तिनिरपेक्षतेने चालताना दिसते.

पाश्चिमात्य लोकशाहीकडे पाहा. अगदी अलिकडेपर्यंत म्हणजे १९३० व ४० च्या दशकांमध्येही त्यांच्या राजकारणावर कारस्थानी आणि भ्रष्टाचारी 'दादांचा' मोठा पगडा होता. आजसुद्धा सर्वसामान्य अमेरिकन राजकारण्याचे चारित्र्य एकाएकी सुधारले आहे असे नाही. रोज उजेडात येणाऱ्या नवनव्या भानगडी नि रहस्यांवरून ते दिसूनच येते. पण फरक पडला तो हा की, आज अमेरिकेमध्ये किंवा जपानमध्ये केवळ रहस्ये उलगडून प्रकरणे थांबत नाहीत. त्याचे काही परिणाम निष्पन्न होतात. एखाद्या राष्ट्राध्यक्षाला राजीनामा द्यावा लागतो. देशाचे ॲटर्नी जनरल आणि अध्यक्षांचे अत्यंत विश्वासू आणि बलाढ्य सहकारी अटकेत जातात. टनाका, टाकेशिटा आणि ऊनो अशा तीन पंतप्रधानांना पाठोपाठ खुर्च्या सोडाव्या लागतात. व्यक्ती फारशा बदलत नसल्या तरी अखेरीस त्यांना उच्च दर्जाची उद्दिष्टे गाठण्याला प्रक्रिया भाग पाडते. जनता पार्टीच्या राज्यकर्त्यांना काही इच्छा असली अथवा नसली तरी आणि त्यांची बांधिलकी कोठेही असली तरी ज्या पद्धतीने, ज्या प्रक्रियेने ते सत्तेवर आले तीच त्यांना आणीबाणी जारी करण्यापासून रोखू शकते. सत्तेवर टिकायचे तर त्यांना आणीबाणी लागू करता येत नाही. हीच प्रक्रिया आताच्या विरोधी पक्षीयांना, आपण १९७७ ते ७९ या काळातील विरोधकासारखे वागणार नाही हे प्रथम सिद्ध करण्याचे आव्हान देत आहे. तीच गोष्ट विश्वनाथप्रताप सिंग यांची. राजीव गांधींपेक्षा ते जास्त प्रामाणिक असोत किंवा नसोत, ज्या प्रक्रियेने ते सत्तेवर आले तीच त्यांना आणखी एखादे बोफोर्स प्रकरण करण्यापासून परावृत्त करील. सिंग यांना संसदेसारख्या संस्थेबद्दल आस्था असो किंवा नसो, ते सत्तेवर येण्याची प्रक्रिया त्यांना संसद, चौकशी आयोग, गुप्तचर संस्था अशा संस्थांचा अनादर करू देणार नाही. आणि सिंग हे राजीव गांधींपेक्षा अधिक सत्यप्रेमी असले किंवा नसले, तरी ही प्रक्रिया त्यांना दूरदर्शनसारख्या माध्यमाचा गैरवापर करण्यापासून थोपवील. आणि तरीही त्यांनी असला काही प्रयत्न केलाच तर राजीव गांधींपेक्षा खूपच लवकर ते पकडले जातील.

## मानवी पूर्वयोजना. केवळ मानवी कृती नव्हे!

हा एका तऱ्हेचा पुरावा झाला. या पुराव्याच्या अंगाने गेलो तर खूप मोठ्या संख्येने होणाऱ्या व्यक्तिनिरपेक्ष अशा मानवी कृतींवर आपल्याला पूर्णपणे अवलंबून रहावे लागेल. पण याच्या विरुद्ध दिशेचा पुरावाही उपलब्ध होतो. आफ्रिकेत कृष्णवर्णीय नागरिकांना रेल्वेच्या प्रथम वर्गाच्या डब्याबाहेर हाकलून काढणे ही गोष्ट गोऱ्या कंडक्टरांच्या दृष्टीने नित्याचीच. पण एके दिवशी एक गांधी डब्याबाहेर फेकला गेला आणि मग इतिहासाने फार मोठी झेप घेतली. १९७४-७७ या काळात जयप्रकाश नारायण यांच्या नुसत्या अस्तित्वानेसुद्धा वातावरण केवढे बदलले! त्यांचे अस्तित्व, त्यांचे सारे आयुष्य हे निःस्वार्थ लोकसेवेचे आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे प्रतीक बनले. गुजरात आणि बिहारच्या विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला जेपींच्या नुसत्या अस्तित्वाने नि सहयोगाने वेगळेच परिमाण लाभले. एक नैतिक शक्ती मिळाली. आपली आपण अशी ताकद मिळवायला त्यांना कदाचित काही दशके आंदोलन करावे लागले असते. जयप्रकाश नारायण नुसते अस्तित्वात होते एवढेच नव्हे, तर त्यांना तुरुंगवास घडला आणि बदनामी सोसावी लागली, एवढ्यामुळेच श्रीमती गांधींच्या बाजूची सारी नैतिक शक्ती लटकी पडली. इतर नेत्यांबरोबर जयप्रकाश नारायण यांना-'जेपींना' अटकेत टाकल्यानंतर या कृतीचे समर्थन करणे श्रीमती गांधी व त्यांच्या साथीदारांना अशक्य झाले. आणि अटकेत असतानाच जेपींची तब्येत एकाएकी गंभीरपणे खालावल्यानंतर सरकारला 'कैद्यांचा छळ होत नाही' हे म्हणायलाही तोंड उरले नाही. व्यक्ती काही वेळा निव्वळ आपल्या अस्तित्वाने एखाद्या प्रक्रियेला किती गती देऊ शकतात याची उत्तम उदाहरणे म्हणजे गांधीजी आणि जेपी. याच्या उलट्या बाजूचा दाखला मिळाला तो गेल्या तीन वर्षांमध्ये. या काळात आपल्या वृत्तपत्रांनी राज्यकर्त्यांबाबत जी माहिती खणून काढली, ती थक्क करणारी होती. राज्यकर्त्यांना खोटे बोलताना, सार्वजनिक संस्था विकृत करताना वृत्तपत्रांनी जितक्या वेळा पकडले त्यामुळे आश्चर्याची सीमाही ओलांडली गेली. दुसऱ्या कोठल्याही लोकशाही राष्ट्रात, जेथे न्यायालये अजूनही चालू आहेत, स्वाभिमान, लाज-शरम अशा भावना अस्तित्वात आहेत, अशा लोकशाहीत असे सरकार केव्हाच कोसळले असते. आपल्या देशात मात्र या गोष्टी अजूनही उजळमाथ्याने सुरू आहेत. कारण उघड आहे. आज आपल्याकडे चारित्र्यसंपन्न व्यक्तींचा असा एखादा समूहच नाही. ज्यांच्या उक्ती आणि कृतीवरून, 'हे वेगळे आहेत, यांचे सरकार वेगळ्या मूल्यांच्या आधारे चालेल', असा विश्वास वाटावा अशी माणसेच दिसत नाहीत.

## सुसंवादी रचना

तेव्हा इतिहासात आणि अगदी अलीकडच्या इतिहासातही परस्परविरोधी पुरावे सापडतात.

कायदेतज्ज्ञांना ज्या वेळी राज्यघटनेतील दोन कलमे वरकरणी परस्परविरोधी आहेत असे दिसते, त्या वेळी ते सुसंवादी रचनेच्या तत्त्वानुसार काम करतात.

म्हणजे प्रत्येक कलम दुसऱ्या कलमाशी कशा तऱ्हेने सुसंवाद साधेल हा विचार करून ते त्यांचे वाचन करतात, अर्थ लावतात. मानवी कृती विरुद्ध मानवी पूर्वयोजना यांबाबतचे जे परस्परविरोधी पुरावे आपण पाहिले, त्यांच्या सुसंवादी रचनेचे अवलोकन केले तर कोणते व्यवहारिक निष्कर्ष निघतात?

एक: संस्थांची निर्मिती करताना एक गोष्ट गृहीत धरली पाहिजे. माणसांचा बदलण्याचा वेग संथ असतो, आणि एखाद्या छोट्या कालावधीचा अपवाद सोडला तर एकंदरीत माणसे व्यक्तिगत स्वार्थामागे जातात. त्यामुळे संस्था, कायदे, नीतिनियम यांची रचना व निर्मिती करताना अशी उद्दिष्टे ठेवली पाहिजेत, की ज्यामुळे सर्वसामान्य व्यक्तींना काही मर्यादा पडाव्यात, काही ठराविक वैध मार्गांनीच त्यांच्या आकांक्षेचा आविष्कार व्हावा आणि बहुजनांचे हित वर्धिष्णू करण्याची प्रेरणा त्यांच्या कृतीमागे उभी राहावी.

दोन : या संस्था जन्माला घालायच्या असतील, त्यांचा ऱ्हास होईल किंवा परिस्थिती बदलेल तशा त्या सुधारायच्या असतील तर त्यासाठी हाडामांसाची माणसे हवीत. अशी माणसे काय चालले आहे ते न्याहाळून समजावून घेऊ शकतील, काय करायला हवे ते ठरवू शकतील आणि समाजाला नव्या व्यवस्थेकडे नेऊ शकतील.

तिसरा मुद्दा : हा रस्ता चालताना प्रत्येक वळणावर एकापेक्षा अधिक पर्याय उपलब्ध राहतील याची दक्षता घेतली पाहिजे. कारण जगात शाश्वत, अंतिम असे तोडगे नाहीत. कुठलीच उत्तरे चिरंतन उपयोगाची नसतात. अतिशय महत्त्वाचा आणि नाजूक समतोल सांभाळायचा असतो तो इथेच. आपण आपल्या नेत्यांचे म्हणणे जरूर ऐकू; पण सोनेरी भविष्याची भलतीसलती अवास्तव स्वप्ने कोणी दाखवत असतील तर त्यांचा धिक्कार करू. 'माझ्याकडे सर्व प्रश्नांची अंतिम उत्तरे आहेत, मी सांगतो त्या रस्त्याने चाललात तर कायमचे सुखी व्हाल,' अशा घोषणा करणाऱ्या प्रत्येकाकडे आपण अविश्वासाने पाहिले पाहिजे. लेनिन, स्टॅलिन, हिटलर, माओ, पोल पोत यांतील प्रत्येकाने सर्वांना स्वर्गसुखाची हमी दिली होती. यांतील प्रत्येकाने आपल्याकडे सर्व प्रश्नांची अंतिम उत्तरे आहेत असा दावा करून आपल्या अनुयायांना फक्त एकाच मार्गाने जाण्यास भाग पाडले. त्याचे परिणाम आपण आज पाहतच आहोत. गांधीजी आणि जेपींसारखी माणसे समाजाला अधिक उपकारक का ठरतात त्याचे हेही एक कारण आहे. अशी माणसे जो प्रयोग करीत असतात, किंवा ज्या गोष्टी शोधीत असतात, त्यापलिकडे जाऊन भलतेसलते दावे करीत नाहीत. आपल्या चुका ते इतरांच्या नजरेला आवर्जून आणतात. अगदी डोंगराएवढ्या मोठ्या चुकासुद्धा ते लपवीत नाहीत. आपण आणि आपले सहकारी ही इतरांप्रमाणेच हाडामांसाची बनलेली साधी माणसे आहोत, यावर ते आवर्जून भर देतात.

सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या उद्दिष्टांसाठी कोणती साधने वापरावयाची, या बाबतीत ते स्वतःवर अतिशय कठोर बंधने घालून घेतात. साधनांचा हा विवेक गांधींनी आयुष्यभर पाळला तर जेपींच्या बाबतीत त्यांच्या उत्तरायुष्यात

तो प्रकर्षाने जाणवला. गांधींच्या सत्याग्रहाचा गाभा मुळातच आत्मक्लेश हा होता. त्यामुळे ते किंवा त्यांचे सहकारी यांच्याकडून चुका होत त्या वेळी अगदी मर्यादित व्यक्तींनाच त्यांच्या चुकांची फळे भोगावी लागत. याउलट ज्या भयानक दहशतवादाला साम्यवादी 'चुका' असे सौम्य स्वरूप देण्याचा प्रयत्न करतात, त्याची गोष्ट घ्या. स्टॅलिनने प्रचंड शुद्धीकरण मोहिमा राबवल्या. त्याच्या या 'लहानशा चुकी'मुळे किती जणांना आपले जीव गमवावे लागले असतील? पंडित नेहरू आणि इतरांनी जी घटनात्मक व्यवस्था आपल्यासाठी वारसा म्हणून ठेवली, तिच्यात काही दोष जरूर असतील आणि त्यामुळे कधीकधी आपल्या पदरी निराशा येत असेल; परंतु त्यात एक मोठा गुण आहे आणि तो म्हणजे अनेक पर्याय, मार्ग खुले राहतात. या एका सद्गुणासाठी तरी हा वारसा आपण जिवापाड जपायला हवा. आपल्या घटनेचा हा खुलेपणा कोंडून टाकण्याचा प्रयत्न श्रीमती गांधींनी केला तेव्हा जेपींनी त्याच्या रक्षणासाठी आपले प्राण पणाला लावले. ज्या समाजात असे पर्याय खुले राहत नाहीत त्यामध्ये चुकांची दुरुस्ती वेळेवर होत नाही. अशा समाजात चुकांची किंमत मोजावी लागते ती फक्त सामान्य लोकांनाच. राज्यकर्त्यांना नव्हे. त्यामुळे मार्ग बदलावा अशी गरज राज्यकर्त्यांना वाटत नाही. आणि राज्यकर्तेच बदलणे अर्थातच शक्य नसते. आपल्या स्वातंत्र्यावर होणारे हल्ले परतवून लावण्यापुरतेच आपले प्रयत्न मर्यादित नसावेत. या स्वातंत्र्याचा पाया अधिक व्यापक, अधिक विस्तृत करण्यासाठी आपण परिश्रम करायला हवेत. स्वातंत्र्याचा आणि निर्मितिक्षम समाजाचा खरा पाया म्हणजे विविध पर्यायांची उपलब्धता. अनेक संस्था नि यंत्रणा असाव्यात आणि प्रत्येकीचा स्वतःचा असा धर्म असावा. त्यांचे आधार आणि आश्रयदाते नानाविध असले पाहिजेत. अनेक संस्थांमधील सरकारीकरण मर्यादेबाहेर गेले आहे ते कमी केले तर या दृष्टीने काही प्रगती निश्चितपणे होऊ शकेल. आज आपल्या जीवनात शासनाला इतके कमालीचे महत्त्व आले आहे की, सत्ता, प्रभाव, अधिकार या साऱ्यांचेच धोकादायक स्वरूपाचे केंद्रीकरण राज्यकर्त्यांच्या हाती झाले आहे. अशा केंद्रीकरणामुळे सत्तास्थानांचे नैतिक सामर्थ्य झिजत चालले आहे आणि सत्तेबाहेर काम करणाऱ्या बाबा आमटे, चंडीप्रसाद भट, इला भट अशा कार्यकर्त्यांच्या शब्दाला समाजात अधिक महत्त्व येऊ लागले आहे. त्यामुळे स्वातंत्र्यावरचे आघात परतवून लावण्याखेरीज, विविध पर्याय आणि मार्ग सर्व क्षेत्रांत शोधून काढण्यावरही भर दिला पाहिजे , आणि त्यांची ताकद वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## आपली स्थिती :

भारतात विविध संस्था आणि प्रक्रिया कशा काम करत आहेत, कोणत्या अवस्थेला पोहोचल्या आहेत, आणि त्याबाबत काय केले पाहिजे याचा आढावा आपण घेऊ लागतो; तेव्हा एक अतिशय महत्त्वाची गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे. गेल्या पंधरा वर्षांत भारतात जे काही चालले आहे त्याचे यथार्थ चित्रण म्हणजे सारी राज्ययंत्रणा खासगी मालमत्तेसारखी वापरणारे, आणि ही यंत्रणा सार्वजनिक हितासाठी राबविली जावी असे इच्छिणारे, यांच्यात संघर्ष चालला आहे. ही

प्रक्रिया अनेक पातळ्यांवर आणि अनेक क्षेत्रांत चाललेली दिसते. लोकांना एक आत्मविश्वास आलेला आहे - त्यांनी मतपेट्यांद्वारे वारंवार सरकारे उलथून टाकली आहेत; पण एवढी गोष्ट पुरेशी नाही हेही त्यांनी पाहिले आहे. रजनी कोठारी यांनी ही गोष्ट अचूक सांगितली होती : 'निवडणुकीद्वारे लोक सरकारला फेकून देऊ शकतात. पण त्याचा अर्थ त्या जागी चांगले सरकार आणू शकतातच असा नाही.' सरकारच्या विरोधात लोक नुसते आत्मविश्वासाने उभे राहतात एवढेच नव्हे, तर आपल्या हक्कांच्या बाबतीत ते अतिशय जागृत झाले आहेत. आपल्या राज्यकर्त्यांकडून अनेक गोष्टींची अपेक्षा करण्याचा आपल्याला हक्क आहे, हे लोकांनी ओळखले आहे. आश्वासने आणि त्यातून होणाऱ्या फसवणुकीची जाण लोकांच्या दृष्टीस आली आहे. वीस वर्षांपूर्वी संस्थानिकांचे तनखे रद्द करून आणि काही बँकांचे राष्ट्रीयीकरण करून श्रीमती गांधींनी जनतेला भूल दिली. आज अशा गोष्टींनी एखादे पंतप्रधान लोकांना चकवू शकतील का? निरनिराळ्या संस्थांनी कोणकोणते धर्म पाळले पाहिजेत, याची पूर्वीपेक्षा पुष्कळच अधिक सुस्पष्ट कल्पना लोकांना आली आहे. आणीबाणीच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने शासनापुढे माघार घेतली तेव्हा त्यावर झालेली टीका आठवा. निवडून गेलेले लोकप्रतिनिधी आणि सत्ताधारी विधिमंडळात ज्या तऱ्हेने वागतात त्यावर होणाऱ्या टीकेचा भडिमार जरूर पाहावा. आज अनेक सनदी अधिकारी आणि पोलिस यांच्याविषयी ज्या तुच्छतेने आणि तिरस्काराने लोक बोलतात ते जरूर लक्षात घ्यायला हवे.

एखादी संस्था आपले कर्तव्य बजावीत असेल तर तिच्या संरक्षणासाठी लोक उभे राहतात. अनेक न्यायालयातल्या न्यायाधिशांच्या जागा मोकळ्या राहतात किंवा न्यायाधिशांच्या हव्या तशा बदल्या केल्या जातात, अथवा नैतिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तीची न्यायाधीशपदी नेमणूक केली जाते, त्या वेळी न्यायव्यवस्थेच्या बाजूने जनता उभी राहत नाही. कारण अशा वेळी योग्य वेळेत न्याय मिळण्यासाठी न्यायालय ही संस्था उपयुक्त आहे यावरचा लोकांचा विश्वासच उडालेला असतो. त्यामुळे न्यायव्यवस्था अधिकाधिक दुबळी होत चालली आहे. लोक तिच्या उद्धारासाठी खंबीरपणे उभे राहात नाहीत, पण हेच लोक वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करणाऱ्या राजीव गांधींच्या बदनामीविषयक विधेयकापासून वृत्तपत्रांचे संरक्षण करण्यासाठी त्वेषाने उठले. कारण पत्रकार त्यांचे कर्तव्य चोख बजावतात अशी लोकांची भावना झाली. ज्या गोष्टी जाणून घेण्याचा आणि उघड करण्याचा त्यांना हक्क आहे तो ते बजावत आहेत. त्या हक्कापासून वंचित करण्यासाठी राजीव गांधींनी हे विधेयक तयार केले आहे, अशी लोकांची खात्री पटली आणि अखेरीस राजीव गांधींना माघार घ्यावी लागली.

## धर्माची जडणघडण

व्यक्ती, संस्था आणि प्रक्रिया यांच्यातील ज्या परस्परसंबंधाची चर्चा आपण करीत आहोत, त्याचे चांगले उदाहरण या दाखल्यातून मिळते.

संस्था आणि यंत्रणा यांची यादी तर राज्यघटनेने दिलेली आहेच; पण त्यांचे कार्य, प्रक्रिया, येणारा दबाव आणि मिळणारा प्रतिसाद यांची रस्सीखेच

त्या संस्थांना जिवंत करतात आणि त्यांचे कार्यक्षेत्र आणि त्यांचा धर्म यांचे स्वरूप स्पष्ट करतात.

एखादा राजा बळाचा अवाजवी वापर करतो. त्यानेच नेमलेला आणि त्याच्याशी कृतज्ञ असलेला न्यायाधीश जाहीर करतो, "आपण उच्चपदस्थ आहात, पण कायदा आपल्या वरच राहणार."

अधिकारक्षेत्राची व्याख्या स्पष्ट होते ती यातूनच. पण ही व्याख्या कायम टिकतेच असे नाही. त्यामुळे अशा चकमकी घडाव्याच लागतात आणि वागणुकीच्या कसोट्या पुन्हा पुन्हा आत्मसात कराव्या लागतात.

या पद्धतीने भारतात गेली चाळीस वर्षे घटनेतील कलम १९ (१) (अ) अधिकाधिक सजीव, समूर्त होत आहे.

पत्रकाराला बंधनातच जखडण्याचा प्रयत्न शासनांनी वारंवार केला आहे. आणीबाणीच्या काळात श्रीमती गांधींनी जबरदस्त हल्ला चढविला. हेरॉल्ड आणि इंडियन एक्स्प्रेस यांना कर्नाटकच्या गुंडूराव यांनी कोंडीत धरले होते. बिहारमध्ये जगन्नाथ मिश्रा, जम्मूत फारूक अब्दुल्ला यांनी राज्यातील वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध आणणारी विधेयके आणली होती. राजीव गांधी यांनी बदनामीविषयक विधेयक मांडले होते. अशा अनेक उदाहरणांची यादी खूप मोठी होईल.

या सर्व उदाहरणांमध्ये दोन वैशिष्ट्ये समान आहेत. राज्यकर्ते स्वत: कोंडीत सापडले. बहुतांशी त्यांच्या स्वत:च्या कारवायांमुळे आणि काही प्रमाणात पत्रकारांच्या कृतीमुळे. अडचणीत आल्यानंतर त्यांनी आपला हात वृत्तपत्रांवर उगारला आणि दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्येक वेळी या उगारलेल्या हाताला नामुष्की पत्करून आणि घाईघाईने माघार घ्यावी लागली.

पत्रकारितेचा धर्म यातून अधिकाधिक स्पष्ट होत गेला. तिची कर्तव्येही निश्चित होत गेली. वृत्तपत्रांनी जनतेचे व्यासपीठ बनले पाहिजे. लोकांना जबाबदार राहू याची दक्षता घेतली पाहिजे.

पत्रकारितेच्या जबाबदाऱ्याही स्पष्ट झाल्या. समाजाचे विश्वस्त म्हणून वृत्तपत्रांनी काम करावे आणि गटवादी किंवा संकुचित हितसंबंधाऐवजी सत्यावर निष्ठा ठेवावी.

पत्रकारितेचे अधिकारक्षेत्रही सुस्पष्ट होत गेले. ज्या समाजात वृत्तपत्रांखेरीज इतर यंत्रणा कार्यक्षम असतात आणि त्यांच्यावर प्रश्न तडीला लावण्यासाठी अवलंबून राहाता येते अशा समाजापेक्षा आपल्याकडच्या वृत्तपत्रांनी जास्त कामगिरी बजावली पाहिजे.

पत्रकारितेचे हक्कही स्पष्ट होत गेले. सर्वोच्च न्यायालयाच्या काही निर्णयांनी पावती दिली की, या क्षेत्रात मूलभूत हक्कांची अंमलबजावणी करताना अर्थातच किफायतशीरपणाला फाटा देता येणार नाही.

वृत्तपत्रक्षेत्राचे स्वरूपही सुस्पष्ट बनत गेले. आजवरच्या संघर्षातून काही गोष्टी उघड झाल्या होत्या. उदाहरणार्थ वृत्तपत्रक्षेत्र समाजाचे एक अंग आहे आणि समाजसुधारणेचे साधनही आहे. समाजातील इतर संस्थांना जडलेल्या रोगाची बाधा पत्रकारितेलाही काही प्रमाणात झालेली आहे. आणीबाणीत श्रीमती गांधींनी वृत्तपत्रांना

जो तडाखा दिला त्याच्यासमोर ताठपणे कितीशी वृत्तपत्रे उभी राहिली? फारच थोडी. या अवस्थेचे अचूक वर्णन लालकृष्ण अडवानी यांनी केले होते. "त्यांना नुसते वाकायला सांगितले पण त्यांनी तर गुडघ्यावर लोळणच घेतली!" आणि गेल्या तीन वर्षांतही वृत्तपत्र क्षेत्रातील किती मंडळी नव्या राज्यकर्त्यांची खुषमस्करी करीत आहेत हेही आवर्जून बघण्यासारखे आहे.

आपल्याला ही प्रक्रिया स्वच्छ दिसते आणि निष्पन्न काय तेही दिसते. इंडियन एक्स्प्रेसचे उदाहरण घ्या. त्या कसोटीच्या काळात त्यांनी घण आणि ऐरण या दोन्ही भूमिका बजावल्या. मुद्दा हा होता की, राज्यकर्त्यांनी संसदेसारख्या संस्थांना जबाबदार राहिले पाहिजे, त्यांनी सत्य सांगितले पाहिजे आणि अशा यंत्रणेचा खासगी फायद्यासाठी गैरवापर करू नये. सत्याचा शोध घेताना आणि राज्यकर्त्यांचा खोटेपणा ठणठणीतपणे दाखवताना, त्यांनी कोठे मर्यादा ओलांडली हे पुराव्याने सिद्ध करताना या वृत्तपत्राने घण बनून घाव घातले.

निव्वळ राजीव आणि बोफोर्स एवढ्याच क्षेत्रात या वृत्तपत्राने काम केले असे नव्हे. समोर अर्थमंत्रालय असो, वित्तसंस्था असो किंवा अंबानी असो, या वृत्तपत्राच्या कामाची उद्दिष्टे तीच राहिली. या प्रक्रियेत इतर काही वृत्तपत्रांच्या सहकार्याने जबाबदारीचे तत्त्व आणि सार्वजनिक संस्थांचा गैरवापर हे दोन मुद्दे आम्ही लावून धरले. त्या सगळ्याच गोष्टी राज्यकर्त्यांना रुचल्या असे नाही. आमच्याविरुद्ध त्यांनी तब्बल दोनशे पस्तीस फौजदारी खटले दाखल केले होते. आमच्या संचालक मंडळावर सरकारचे हस्तक नेमण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आमची दिल्लीतील प्रमुख आवृत्ती सलग ४५ दिवस प्रसिद्ध होऊ नये असा घाट घालून त्यांनी तडीला नेला. आमच्या कार्यालयावर धाडी घातल्या, आमच्या सहकाऱ्यांना अटक झाली. शक्य तेवढी आमची बदनामी त्यांनी केली. बँकेकडून आम्हाला मिळणारी कर्जे अडकवून ठेवली. फॅक्सिमिली यंत्रणा बंद पाडून आमच्या बंगलोर आवृत्तीच्या प्रकाशनात अडचण आणली. थोडक्यात सांगायचे तर आणीबाणी लागू नसतानाही तितकाच प्रखर आणि पूर्वनियोजित हल्ला सरकारने आमच्यावर चढविला होता. किंबहुना तो अधिक व्यापक स्वरूपाचा होता. त्याला तोंड देताना या वृत्तपत्राची अवस्था ऐरणीसारखी झाली. या हल्ल्यासमोर एक्स्प्रेसने शरणागती पत्करली असती तर इतर अनेकांना माघार घ्यावी लागली असती. यात खरे धैर्य दाखवले ते श्री. रामनाथ गोएंका यांनी. आमच्यासारख्या तरुण सहकाऱ्यांपैकी बहुतेकांकडे गमावण्यासारखे फारसे काही नव्हतेच. तसे खूप असूनही श्री. गोएंका खंबीरपणे उभे राहिले आणि घटनेतील १९(१) (अ) या कलमाला त्यांनी अर्थ, आकार प्राप्त करून दिला.

## दुसरी बाजू

अनेक प्रकारांनी आणि अनेक पातळ्यांवर प्रक्रिया घडत असते हे खरेच; पण एक निष्कर्ष काढायचा तर या संघर्षात विशेषतः गेल्या काही वर्षांत विजयाचे माप झुकले होते ते राज्ययंत्रणेचा खासगी जहागिरीसारखा वापर करणाऱ्यांच्या बाजूनेच. आपल्या आत्ताच्या स्थितीच्या काही वैशिष्ठ्यांचा उल्लेख केला तर

आपली स्वतंत्र आणि बहुपर्यायी व्यवस्था टिकवून ठेवण्याखेरीज आपण काय करणे आवश्यक आहे हे लक्षात येईल. गेल्या तीन वर्षांत सर्व दृष्टींनी काळजीचे असे जे प्रश्न निर्माण झाले त्यांची यादी केली तर आपण कोणत्या अवस्थेला येऊन पोहोचलो आहोत ते स्पष्ट होईल. आज आपल्या सार्वजनिक संस्थांचा वापर व्यक्तिगत कारणासाठी बिनदिक्कतपणे केला जातो. अशा तऱ्हेने एकाच नव्हे तर अनेक संस्थांचा गैरवापर होतो. संसद, संसदीय समित्या, चौकशी आयोग, न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग, नोकरशाही, आकाशवाणी व दूरदर्शन अशा प्रत्येक संस्थेचा विकृत वापर केला गेल्याची अनेक उदाहरणे फार प्रयत्न न करता मिळतील. प्रत्येक वेळी जी जी संस्था उपयुक्त वाटली ती अशा तऱ्हेने वापरण्यात आली. असा गैरवापर केवळ पंतप्रधानांच्या संरक्षणासाठी किंवा स्वार्थासाठी करण्यात आला असे नाही, तर बच्चनसारख्या त्यांच्या मित्रांच्या फायद्यासाठीही असा गैरवापर झाला. एवढेच काय मित्रांच्या मित्रांच्या भल्यासाठीही त्यांचा गैरवापर झाला. पंतप्रधानांचे मित्र सतीश शर्मा यांचे मित्र ललित सुरी हे असे एक उदाहरण. राज्यकर्ते आणि त्यांची मोजकी मित्रमंडळी यांच्यापुरताच हा गैरवापर मर्यादित राहिला असेही नाही. राज्यकर्ते ज्यांच्यावर मदतीसाठी केव्हा ना केव्हा अवलंबून होते अशा मंडळींचे उखळ पांढरे करण्यासाठी आपल्या संस्थांचा गैरवापर झाला. बलराम जाखड, बुटासिंग, भजनलाल, मोहन कात्रे ही याची काही उदाहरणे. सरकार किंवा नोकरशाही अशा सत्तेच्या जिवावर शिरजोर असलेल्या व्यक्तींच्या स्वार्थापुरताच संस्थांचा गैरवापर झाला असेही नाही, अंबानीसारख्या हितसंबंधियांच्या रक्षणासाठी आणि संवर्धनासाठीही त्यांचा मनमुराद वापर झाला. जसजसे दिवस गेले आणि आरंभीचा संकोच दूर होत गेला तसतसा संस्थांचा गैरवापर गुन्हेगारी झाकण्यासाठीही होऊ लागला. पैसे घेण्यावरून मजल खोटे बोलण्यावर गेली. खोटे खपविण्यासाठी बनावट कागदपत्रे करण्यात आली आणि मग खुनाचा प्रयत्नही लांब राहिला नाही. म्हणजे तिसरा मुद्दा स्पष्टपणे लक्षात येतो. संस्थांचा गैरवापर निव्वळ राजीव गांधी, त्यांचे निकटचे सहकारी व मित्रमंडळींनी केला असे नाही. दिल्लीतील मंडळींप्रमाणेच गल्लीतील, राज्याराज्यातील सर्व पातळीच्या राज्यकर्त्यांनी हे पाप केले. केंद्रीय शासकांइतकाच निलाजरेपणा त्यांनी केला. पण वादळ उठले ते राजीव गांधी या केंद्रबिंदूतून. पण अशा गोष्टी करणारे ते एकटे नव्हते. त्यांनी भरपूर सहकाऱ्यांसमवेत सामुदायिक पापे केल्यामुळेच तर त्या पापाच्या शिक्षेतून त्यांना सूट मिळू शकते. या सगळ्यास ते एकटेच जबाबदार नव्हते. त्यांच्याभोवती वादळ घोंघावण्याचे कारण एवढेच की, श्रीमती गांधी किंवा निक्सन यांच्याप्रमाणेच राजीव गांधी हेही त्यांच्या काळातील गैर गोष्टींचे सगळ्यात ठळक प्रतीक बनले. दुसरा मुद्दा असा की, अशा तऱ्हेने संस्थांचा गैरवापर करणाऱ्या राज्यकर्त्यांना फारसा प्रतिकार झाला नाही. संस्थात्मक चौकटीमधून, ज्येष्ठ शासकीय अधिकाऱ्यांकडून किंवा पक्षसंघटनेतील सहकाऱ्यांकडून विरोध असा झालाच नाही. याउलट ही मंडळी, गैरवापरामुळे होणाऱ्या फजितीच्या प्रसंगी राज्यकर्त्यांना उपयोगी पडावे आणि उपकृत करून आपला फायदा करून घ्यावा अशा घाईत होती.

तिसरा मुद्दा म्हणजे या उद्योगात राज्यकर्ते हे खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी ठरले होते. कारण सर्वसामान्य लोकही शासकीय आणि सामाजिक यंत्रणेचा जेवढा भाग आपल्या फायद्यासाठी वापरता येईल तेवढा वापरण्याचा प्रयत्न करीत होते. दोघांपैकी पहिला कोण ते ठरवणे निरर्थक होते. एकाच्या वागणुकीमुळे दुसऱ्याला बळकटी येते आणि राजरोसपणा मिळत असतो. या साऱ्यांचे परिणाम बेसुमार आहेत.

ज्या उद्दिष्टांसाठी यंत्रणेचा गैरवापर केला जातो ती कल्पनेपलिकडे विकृत आहेत. भिंद्रानवाले यांना कसे प्रोत्साहन दिले गेले आणि त्याचे काय परिणाम झाले ते आठवा. आज काश्मीरमधील परिस्थिती आणखी बिघडवण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला जात आहे, हेही लक्षात घ्या. आज बोडो अतिरेक्यांना फूस दिली जात आहे. या सगळ्याच्या भयंकर परिणामांची कल्पना करा.

आज देशासमोर जीवन-मरणाच्या समस्या उभ्या आहेत. बेसुमार जंगलतोड आणि प्रदूषण अशा व्यापक समस्या सोडविण्याचा प्रयत्नसुद्धा सोडून देण्यात आल्याचे दिसते.

राज्ययंत्रणेत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्नही सोडून देण्यात आला आहे. आज प्रशासन सुधारणा आयोगावर कोण विश्वास ठेवील?

ही यंत्रणा किंवा निदान तिचा एखादा तरी भाग आपले कर्तव्य पार पाडेल, न्याय्य आणि परिपूर्ण पद्धतीने काम करील या अपेक्षासुद्धा करणे सर्वांनीच सोडून दिले आहे. १९८९ मध्ये महालेखापरीक्षकांचा (कॅग) बोफोर्सबाबतचा अहवाल प्रसिद्ध झाला त्या वेळी सर्वांनाच आश्चर्य वाटले. बोफोर्सबाबत त्यांनी काय मांडले याचे आश्चर्य नव्हे तर, टी. एन. चतुर्वेदी यांच्यासारखा एखादा माणूस सरकारी यंत्रणेत अजूनही शिल्लक आहे याचे खरे आश्चर्य लोकांना वाटले.

यापेक्षाही वाईट गोष्ट म्हणजे ज्या काही साधनांच्या मदतीने आपण ही स्थिती सुधारू शकू, संस्था नि यंत्रणा योग्य मार्गावर परत आणू शकू, ती साधनेही गैरवर्तनामुळे निकामी करण्यात आली आहेत.

सरकारी यंत्रणेच्या अंतर्गत इतर संस्थांच्या कारभारावर नजर ठेवणाऱ्या ज्या उपयंत्रणा– चौकशी, दक्षता, अंमलबजावणी विभाग त्यांच्याच कारभारावर बारकाईने नजर ठेवावी अशी स्थिती आली आहे.

राजकीय पक्षात ज्या प्रमुख विरोधी पक्षांकडून परिस्थिती सुधारण्याची अपेक्षा ठेवावयाची त्यांनाच परिस्थिती बिघडवणाऱ्या 'काँग्रेस संस्कृतीची' लागण झाली आहे.

राजकीय पक्षांपुरताच अध:पात मर्यादित राहिला आहे असे नाही. दोन जेवणांदरम्यान केली जाणारी प्राणांतिक उपोषणे, मोर्चे, धरण्याची नाटके यांमुळेही गांधीजींनी आपल्या हाती दिलेल्या सत्याग्रहाच्या अमूल्य शस्त्राचा किती खेळखंडोबा झाला आहे तेही पाहा.

## प्रतिक्रियेची प्रतीक्षा ?

आज दिसणाऱ्या दुष्परिणामांची जबरदस्त प्रतिक्रिया उमटेल आणि यातून सुधारणा होईल याची वाट पाहत आपण स्वस्थ बसू शकतो. लाखो लोकांच्या

प्रतिक्रिया एकदम उमटणार आणि त्यातून राज्यकर्त्यांना झटके बसून त्यांचे वागणे सुधारणार याला फार वेळ लागेल आणि अगदी टोकाचे दुष्परिणाम भोगावे लागतील. तोपर्यंत आपल्याला भयंकर यातना नि संकटे भोगावी लागतील.

पंजाबमधील अतिरेक्यांचा वाढता हिंसाचार अखेरीस त्यांच्यात व जनतेत दुरावा निर्माण करील आणि लोकच त्यांच्या दहशतीविरूद्ध लढ्याला उभे ठाकतील अशी आशा करीत आपण स्वस्थ बसू शकू. पण ही फक्त एक शक्यता झाली. आणखीही शक्यता आहेत. सरकार आपले संरक्षण करायला असमर्थ आहे अशीही लोकांची खात्री पटू शकेल आणि त्या स्थितीत ते दहशतवादाच्या आसऱ्याला जातील. अतिशय प्राणघातक शस्त्रे आज ज्या सहजपणाने उपलब्ध होताना दिसतात, त्यामुळे पंजाब किंवा काश्मीर हे लेबानान किंवा श्रीलंकेच्या उत्तर भागासारखे सपशेल हाताबाहेर जातील ही सुद्धा शक्यता आहे.

आणि काही झाले तरी जे दहा-वीस लोक पंजाब नि काश्मीरमध्ये रोजच्या रोज मरत आहेत, त्यातून हिंसाचाराविरुद्ध प्रतिक्रिया उमटवण्याची प्रक्रिया चालू आहे याचा भरवसा आपण कसा देणार?

त्यामुळे पहिला धडा म्हणजे समाजातून प्रतिसाद जरूर उमटला पाहिजे. लेनिनच्या शब्दात सांगायचे तर, "इतिहासाला मदतीचा हात समाजाने अवश्य दिला पाहिजे."

हा प्रतिसाद नागरिकांनी आपल्या आवाक्यातील प्रत्येक प्रश्नाला लगेच द्यायला हवा. अगदी प्रचंड समस्या निर्माण होईपर्यंत थांबण्याची गरज नाही. आणीबाणी लादली जाईपर्यंत थांबायचे असे लोकांनी ठरविले तर ते स्वतःचे संरक्षण करू शकणार नाहीत आणि आपली यंत्रणा नि मूल्ये यांचा रोजच्या रोज होणाऱ्या घातक झिजेपासून बचावही करू शकणार नाहीत. एखादी प्रचंड समस्या जेव्हा उभी राहते तेव्हा बहुधा काही कृती करायला उशीर झालेला असतो. २५ जून १९७५ ला आणीबाणी जाहीर झाली. त्यापूर्वी अनेक वर्षे लोक थांबलेलेच होते– त्या त्या वेळच्या समस्या फारशा गंभीर नाहीत असे मानून त्यांनी वाट पाहिली आणि मग एकदा आणीबाणी जारी झाल्यानंतर वाट पाहत बसण्यापलिकडे पर्याय राहिला नाही. मग वाट पाहावी लागली की राज्यकर्ते एखादी घोडचूक केव्हा करतील किंवा आणीबाणीचा बडगा जिव्हारी लागल्याने प्रचंड लोकसमूह केव्हा एकदा तिचा मुकाबला करण्यासाठी उसळेल याची.

गांधीजींनी शिकवलेली गोष्टच सगळ्यात महत्त्वाची. मोठ्या संकटाशी झुंजण्याची ताकद मिळवायची असेल तर, त्यासाठी निष्ठावान यंत्रणा उभारायची असेल तर आणि जनसमुदायाला जागवून कामाला लागायचे असेल तर छोट्या समस्यांना हात घालणे हा उत्तम उपाय. यासाठीच स्वातंत्र्य मिळविण्याचा रस्ता चरख्याच्या मार्गानेच जातो हे गांधीजींनी कॉंग्रेसजनांना १९२० च्या दशकात पुन्हा पुन्हा सांगितले. प्रत्येक घराघरात जाऊन सूतकताईचा प्रचार करणे, त्यातून लोकांना राष्ट्रीय चळवळीमध्ये समरस करून घेणे, प्रत्येकाने इतर कामे असतानाही दररोज एक तास सूतकताईसाठी देण्यामुळे अंगी बाणणारी शिस्त, या साऱ्या मोहिमेतून उभी राहणारी स्वयंसेवक

पथके, भाषणबाजी करणाऱ्यांतून खरे कार्यकर्ते निवडून काढणे या विविध टप्प्यांच्या प्रक्रियेतून स्वराज्य जिंकून घेणारी ताकद देशात निर्माण होईल असे गांधीजींनी शिकविले.

त्यामुळे प्रक्रिया समजावून घेताना आणि ती चालू आहे याबद्दलचा विश्वास संपादन करताना स्वस्थ बसू नका. प्रतिसाद द्या. कर्तव्याकडे जाण्यासाठी फार दूरचा रस्ता निवडण्याची गरज नसते. तो आपल्या शेजारून जात असतो.

## दररोज दोनदा :

सदैव आपण भारतीय लोक सोडावॉटरच्या बाटलीसारखा फक्त सुरुवातीलाच फसफसणारा उत्साह बाळगतो. विलंबाने का होईना, प्रतिसाद देतो तेव्हाही आपण लगेच निष्क्रिय बनतो. आपली ही सवय लो. टिळक आणि गांधीजींच्या कसोट्यांवर पारखून पाहायला हवी. या थोर व्यक्तींनी एकेका उद्दिष्टाचा पाठपुरावा कित्येक दशके, खरे म्हणजे हयातभर केला. आपला सारा संताप एखाद्या स्फोटासरशी ओसरून जातो. त्यांनी त्यांच्या क्रोधाला शांत परंतु खंबीर निश्चयीपणाचे रूप दिले. आपण प्रक्षोभाच्या उद्रेकापोटी तावातावाने बोलतो आणि तेथेच संपतो. या थोर लोकांनी कैक दशके दररोज ध्येयप्राप्तीकडे जाणाऱ्या हजारो छोट्या-मोठ्या गोष्टी सहिष्णुतेने पेलल्या आणि तडीला नेल्या.

ध्येयपूर्तीसाठी खूप वेळ लागतो म्हणूनच हे घडते असे नाही. मागे पाहिल्याप्रमाणे ध्येय ही वस्तू एकदा जिंकली म्हणजे संपली अशी नाहीच. नवी, प्रागतिक वाटणारी वस्तूही काळाच्या ओघात चिरेबंदी बनते आणि म्हणूनच ती बदलणे आवश्यक ठरते. आपण दिवसभरात सकाळी आणि संध्याकाळी असे दोनदा स्नान करतो. त्याप्रमाणेच व्यवस्था, यंत्रणा आणि नागरिकांची वागणूक यांच्याकडेही दिवसातून दोनदा लक्ष द्यायला हवे आणि हे कायम करत राहायला हवे.

तेव्हा एखादी गोष्ट जेपींसारख्या महापुरुषाच्या हातून घडली म्हणून आपले सारे प्रश्न सुटतील किंवा एखादा तरी प्रश्न कायमसाठी सुटेल अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. भगवान श्रीकृष्णांनी गीतेमध्ये धर्माचा ऱ्हास झाल्यानंतर अवतार घेण्याचे वचन दिले होते खरे. पण अशा अवतारासाठी आपण खरेच ताटकळत बसून राहिलो तर पदरी निराशाच येणार.

## प्रत्यक्ष यंत्रणा

ज्या गोष्टी खरोखर करायला हव्यात अशा विशेष बाबींचा उल्लेख मी यापुढे प्राधान्यक्रमाने करणार आहे.

पहिली गोष्ट म्हणजे या यंत्रणा जे चालवत आहेत त्यांच्या कामगिरीवर घारीसारखी तीक्ष्ण नजर ठेवली पाहिजे. महत्त्वाच्या विषयावरची न्यायालयांची निकालपत्रे बारकाईने अभ्यासली पाहिजेत. संसदेच्या, विधिमंडळाच्या अध्यक्षपदी बसणाऱ्यांनी, दिलेल्या निर्णयांचे नियमन करायला हवे. सदस्यांच्या प्रश्नांना दिशाभूल करणारी उत्तरे मिळाली तर त्यांचे विश्लेषण केले पाहिजे. मंत्रिमंडळाकडून येणाऱ्या विधेयकांची कसून चिरफाड करायला हवी.

या बाबतीत विशेष जबाबदारी आहे ती विद्याक्षेत्रातील मंडळींवर. ज्ञानाच्या आणि विद्येच्या शाखांचा प्रचंड विस्तार झाला आहे आणि इतर अनेक क्षेत्रांपेक्षा त्यांना पैसा आणि इतर साधने अधिक प्रमाणात मिळाली आहेत. अभ्यास, विश्लेषण आणि लोकशिक्षण हे त्यांचे जीवनध्येय असले पाहिजे आणि तरीही सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या प्रश्नांच्या चर्चेमध्ये ज्ञानशाखेचे योगदान जवळजवळ नाही अशी स्थिती आज दिसते. पत्रकारितेचे शिक्षण देणाऱ्या भरपूर संस्था आहेत. गेल्या काही वर्षांत पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर आघात करणारी अनेक विधेयके येऊन गेली. काश्मीर आणि बिहारमधील वृत्तपत्र विधेयके आणि राजीव गांधींचे बदनामीविषयक विधेयक ही काही उदाहरणे. न्यायालयाच्या काही निकालांनी वृत्तपत्रस्वातंत्र्यावर परिणाम घडवला आहे. अशा मुद्यांच्या आणि विधेयकांच्या चर्चा घडत असताना पत्रकारांना शिकविणाऱ्या प्राध्यापकांनी त्यात कितपत मोलाची भर घातली आहे हे कोणाला तरी आठवेल का? हे केवळ एक उदाहरण झाले, आणखी डझनभर सापडतील.

तेव्हा यंत्रणा चालविणाऱ्यांच्या कामगिरीची तपासणी ही पहिली महत्त्वाची गोष्ट झाली. त्याबरोबरच या यंत्रणेचे कामकाज अधिक चांगल्या प्रकारे चालावे यासाठी करावयाच्या उपाययोजना निश्चित करायला हव्यात.

अमेरिकन सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींना कायदा जाणणाऱ्या कारकुनांची मदत उपलब्ध होते. आपल्याकडची उच्च न्यायालये व सर्वोच्च न्यायालये यातील न्यायाधीशांना असे साहाय्य का मिळू नये? त्यांच्यासमोर जे युक्तिवाद केले जातात त्यांना लांबीचे आणि काळाचे बंधन का असू नये.

आजचे सत्ताधारी आणि नोकरशाही यांना इतर अनेक स्वायत्त यंत्रणांचे उच्च अधिकारी नेमण्याचा हक्क मिळाला आहे. न्यायाधीश, निर्वाचन आयुक्त, महालेखापाल, संसदीय समित्यांचे अध्यक्ष यांच्या नेमणुकीचे अधिकार सत्ताधाऱ्यांना का असावेत?

या महत्त्वाच्या पदांवर कर्तबगार परंतु स्वतंत्र प्रज्ञेच्या व्यक्तीचीच नेमणूक होईल ही खबरदारी कशी घ्यावयाची?

महालेखापरीक्षकाच्या हुद्द्यावरच्या अधिकाऱ्याला निवृत्त झाल्यानंतर दुसरे कोणतेही पद स्वीकारता येत नाही हा निर्बंध इतरांनाही का लागू नसावा? निवडणूक आयोगाला स्वातंत्र्याची गरज नाही असे थोडेच आहे?

संसदेच्या सभागृहांची आज तरी कोंडीच झालेली आहे. पण त्यांना निर्णयस्वातंत्र्य आहे असे मानले तरी प्रचंड सदस्यसंख्येमुळे कोणत्याही विषयाची तपशीलवार छाननी संसदेत करणे शक्य होत नाही. अशा स्थितीत संसदीय समित्यांचा अधिक प्रभावी उपयोग कशा तऱ्हेने करता येईल?

साऱ्या यंत्रणेमध्ये मुळापासून बदल घडवावेत, अध्यक्षीय राजवट आणावी किंवा अप्रत्यक्ष निवडणुकांची पद्धत सुरू करावी असले विचार करत बसण्यापेक्षा वर उल्लेख केलेल्या छोट्या छोट्या बारकाव्यात आपण जावे असा माझा आग्रह आहे. याची प्रमुख कारणे मी यापूर्वीच नमूद केलेली आहेत. जी माणसे केंद्रातील

आणि राज्यातील सरकारे चालवतात, विधिमंडळात किंवा न्यायासनावर बसतात त्यातील बहुसंख्य व्यक्तींवर दूरच्या पल्ल्याची आणि मूलभूत स्वरूपाची कामे सोपविणे आज अशक्य आहे.

आज खरी अडचण आहे ती पुरेशा चांगल्या नोकरवर्गाची नव्हे, तर सत्तास्थानावर बसलेल्यांचे चारित्र्य आणि योग्यता यांचा खरा प्रश्न आहे. तरीही वर उल्लेख केलेल्या कृतीचा विचार करायला हवा आणि सत्ताधाऱ्यांकडून अधिक चांगली कामगिरी करून घेण्यासाठी उपाययोजना म्हणून त्यांचा वापर करायला हवा. त्यांच्या कामगिरीची तपासणी न थांबता अखंडपणे करायला हवी. त्याचबरोबर ज्या परिस्थितीत त्यांना काम करावे लागते, तिची तपासणी सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून व्हायला हवी.

यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे या यंत्रणेची कामगिरी सर्व समाजासमोर उघड करायला हवी. विधिमंडळाचे कामकाज दूरदर्शनवर दाखवायला सुरुवात केली तर सदस्य आज जितके अशोभनीय वागतात, तितके वागणार नाहीत. तरीही ते वावगे वागलेच तर देशाचा कारभार पाहण्यासाठी त्यांना निवडून देणारी जनताच त्यांना शिस्त लावेल.

आपल्या यंत्रणेमध्येही चांगले काम करणारी काही माणसे आहेत. त्यांचे काही सहकारी गैर वागतात तरीही अशी काही माणसे प्रामाणिकपणे सत्कार्य करीत असतात. त्यांच्यापर्यंत पोहोचणे आणि त्यांच्या मदतीला उभे ठाकणे हे आपले पुढचे कर्तव्य आहे. आजच्या स्थितीत अशा प्रत्येक प्रामाणिक माणसाला अडचणींनी घेरलेले दिसते. राजकारणी आणि त्यांचे आश्रयदाते अशा प्रामाणिक माणसांचे हाल करतात. त्यांचे सहकारीही त्यात सामील होतात. तरीही अशी माणसे लोकांसाठी, लोकांच्या वतीने काम करीत राहतात. ज्या मूल्यांचे जतन ही माणसे करतात त्यांच्याच आधारे या यंत्रणांची फेरमांडणी करणे शक्य होते. अशी माणसे शोधून त्यांचे कौतुक केले पाहिजे आणि त्यांना पाठिंब्याचे वचन दिले पाहिजे. आपण शासनसंस्थेबाहेर असलो तरी त्यांच्या मदतीसाठी शक्य ते सारे केले पाहिजे. अशा माणसांना आधार देणारे शब्द ऐकले म्हणजे केवढा उत्साह व हुरूप येतो ते मी स्वतः अनुभवले आहे. "तुम्ही जे करता आहात त्याचे मूल्य आम्हाला समजते. तुम्हाला त्यापोटी, काही किंमत चुकती करावी लागेल ते आम्ही जाणतोच. आम्हीही तुमच्यासारखे वागू शकलो असतो तर बरे झाले असते," असे नुसते शब्दही केवढे आश्वासक वाटतात. तेव्हा अशी माणसे शोधा आणि त्यांच्या संरक्षणासाठी त्यांच्याभोवती स्वतःच बुरूज बना.

## संस्था, नियम, माणसे

चर्चेच्या ओघात आपण, जनतेला माहिती देऊन जागृत करण्याच्या विषयापर्यंत आलो आहोत. आपल्या संस्थांमध्ये कोण काय करीत आहे ही माहिती जनतेला मिळणे महत्त्वाचे आहे. पण ही फक्त सुरुवात आहे.

यापूर्वीही विचारात घेतलेली महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, आपल्या संस्थांचा नि यंत्रणांचा वापर करण्याची वेळ येते, तेव्हा सामान्य लोकांचा दृष्टिकोनही

राजकारण्यांच्या दृष्टिकोनापेक्षा फार वेगळा असत नाही. त्यामुळेच मोठ्या प्रमाणात लोकशिक्षण करण्याची गरज आहे.

मुद्दा सोपा आहे; पण तितकाच महत्त्वाचाही आहे. बहुसंख्य, किंबहुना सगळे लोक नियमांचे पालन करीत असताना एखादी व्यक्ती किंवा एखादा गट त्यांना वळसा घालून, नियमांच्या कुंपणावरून थेट उडी टाकून पुढे घुसतात. यातून काही तात्कालिक फायदे जरूर मिळतात. त्यानंतर मात्र एकाने नियम मोडले म्हणून दुसऱ्यानेही मोडायला हरकत नाही अशी वृत्ती बळावते. शेवटी सगळी यंत्रणाच खिळखिळी होत, बंद पडते. अर्थात हा परिणाम दिसायला वेळ लागतो. नियमांच्या उल्लंघनामुळे होणाऱ्या भरपूर फायद्यांच्या तुलनेत येणाऱ्या अडचणी अगदी किरकोळ असतात. राज्यकर्त्यांना अशा अडचणी, संकटांपासून दुहेरी संरक्षण मिळते. विशेष पदावर असल्यामुळे त्यांच्यासाठी अनेक गोष्टी केल्या जातात; ज्या सामान्य नागरिकांसाठी केल्या जात नाहीत. शिवाय त्यांच्या पदामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे अवघड होते. त्यामुळे कायद्यांचे पालन करण्याची निकड सामान्य माणसांपेक्षा राज्यकर्त्यांना खूप कमी भासते. नेमके हेच घडत आले आहे आणि त्यातून आजची अवस्था निर्माण झाली आहे.

हे बदलण्यासाठी लोकांना कायदे आणि नियम यांचे पालन करण्याचे महत्त्व पुन्हा एकदा शिकवायला हवे. अशा कायदेपालनाखेरीज संपूर्ण समाज व्यवस्थित कामच करू शकणार नाही, हेही समजवायला हवे.

या पार्श्वभूमीवर लोकमानसात आज कोणत्या गोष्टी रुजवायला हव्यात त्या नजरेसमोर आणणे अवघड नाही.

प्रत्येक समाजाला काही ना काही नियम पाळावेच लागतात. उदाहरणार्थ– वाहने डावीकडूनच चालवायची असतात. चुकीच्या बाजूने वाहन चालवून दुसऱ्या वाहनाला ओलांडून जायचे असे एखाद्याने ठरविलेच तर करता येईल पण त्यामुळे इतरांनाही तसे करायला उत्तेजन मिळेल आणि सगळेच असे करू लागले तर रस्त्यावरची वाहतूकच ठप्प होऊन जाईल.

लोकशाहीप्रधान समाजव्यवस्थेमधील कायदे आणि संस्था यांतून प्रत्येक व्यक्तीला हवे ते मिळण्याची हमी देता येत नाही. त्याच्या सगळ्या गरजा भागतीलच किंवा त्याच्या योग्यतेप्रमाणे वाटा मिळेलच, याचीही खात्री देता येत नाही. प्रो. हायेक यांनी म्हटल्याप्रमाणे या नियमांचे नि कायद्यांचे सर्वसाधारण पालन झाले तर त्यामुळे समुदायातील प्रत्येक व्यक्तीला आपली वारंवार बदलणारी उद्दिष्टे गाठण्याचा अधिकाधिक प्रयत्न करणे शक्य होते.

आपल्यापैकी प्रत्येकाला काही वेळा विजय मिळेल तर काही वेळा पराभव पत्करावा लागेल हे ओघाने आलेच.

त्यामुळे जेव्हा जेव्हा आपली पीछेहाट आणि इतरांचा फायदा होईल त्या त्या वेळी संपूर्ण यंत्रणेलाच नावे ठेवणे आणि ती मोडण्याचा किंवा ठप्प करण्याचा प्रयत्न करणे चुकीचे ठरते.

व्यक्तीवर किंवा समूहावर सततच अन्याय होत राहिला, तर त्यांनी आपली

शक्ती, एखादी मागणी हिसकावून घेण्याऐवजी नियमांच्या व यंत्रणांच्या चौकटीतच काही बदल घडवून आणण्याकडे वापरली पाहिजे.

नियम बदलताना आणि संस्थांची नव्याने घडण करताना संपूर्ण व्यवस्थेलाच इजा करतील अशी साधने वापरता कामा नयेत. अगदी कमालीच्या परिस्थितीतही अपवादात्मक घटनात्मक तरतुर्दीचाच आश्रय घ्यायला हवा.

या प्रस्तावातून आपल्या परिस्थितीला लागू होणारे अनेक निष्कर्ष निघू शकतील. दोन उदाहरणे पुरेशी होतील.

गांधीजींनी दिलेले सत्याग्रहाचे अमूल्य शस्त्र आपण भ्रष्ट आणि जवळजवळ निकामी करून टाकले आहे. वरील प्रस्तावावरून निष्पन्न होते की, हा मार्ग म्हणजे हे शस्त्र आता म्यान करायला हवे. गांधीजींना अभिप्रेत होते त्याप्रमाणे अगदी क्वचितच हे वापरायला हवे. वापरताना गांधीजींनी सांगितलेल्या कडक शर्तींची अगोदर पूर्तता करायला हवी. संयम आणि शिस्त यांखेरीज सत्याग्रह होऊच शकत नाही. एरव्ही कितीही थोर असलेल्या व्यक्तीने या साधनांचा वापर केला किंवा कितीही उदात्त कारणासाठी केला तरी आपण त्याची योग्य ती चिकित्सा करायला हवी; आणि प्रसंगी त्यांनी आवश्यक त्या पूर्वअटी पाळल्या की नाही हे सडेतोडपणे जाहीर करायला हवे. सत्याग्रहावर असे बंधन आणले म्हणजे आज निकामी झालेल्या यंत्रणांचे पुनरुज्जीवन करणे आपल्याला भाग पडेल आणि त्यातून या शस्त्राची धार पाजळून निघेल. दुसरी गोष्ट उघड दिसते ती अशी की, विधिमंडळ आणि तत्सम महत्त्वाच्या संस्थांमध्ये काम करण्यासाठी योग्य माणसे ज्या कसोट्यांवर आज आपण निवडतो त्या योग्यतेच्या कसोट्याच पूर्णपणे बदलून टाकायला आपण शिकले पाहिजे. माझ्यासाठी, माझ्या जातीसाठी किंवा माझ्या समाजासाठी जास्त फायदेशीर कोण हा विचार आज केला जातो. पण या संस्थांच्या धर्माचे कोण अधिक चांगल्या प्रकारे पालन करील ही खरी कसोटी असायला हवी. संसदेत कोणाला पाठवावे? आपल्या जातीसाठी जो जास्तीत जास्त जागा आरक्षित करून ठेवील त्याला नव्हे. बर्क यांनी ब्रिस्टलमधील आपल्या मतदारांना सांगितल्याप्रमाणे, जो कोणी सार्वजनिक हिताचा विश्वस्त म्हणून काम करेल, तात्पुरत्या आणि सवंग लोकप्रियतेला ठोकरण्याचे धैर्य ज्याच्या अंगी असेल आणि सार्वजनिकदृष्ट्या महत्वाचे प्रश्न आणि संसदेचे कार्य यांचे मूल्यमापन करण्याची क्षमता ज्याच्या अंगी असेल त्याला निवडून द्यायला हवे.

## व्यक्ती कशी हवी ?

आता आपण शेवटच्या नि महत्त्वाच्या मुद्यावर येऊन पोहोचलो. या मुद्यावर मला भर द्यायचा आहे. या मुद्याची तातडीने दखल घेतली जायला हवी आहे. बर्कचे भाषण वाचले तरी त्यावर प्रकाश पडेल. आपल्या खणखणीत भाषणात त्याने सांगितलेली लोकप्रतिनिधींची आदर्श वैशिष्ट्ये आणि प्रतिनिधी निवडण्याच्या आपल्या कसोट्या यांची तुलना अवश्य करायला हवी.

निवडून येण्यापुरता जो आपल्यापुढे गोंडा घोळील, आपला मोहल्ला किंवा जात यांच्या छोट्या गरजा भागवील असा उमेदवार आपण निवडतो. बर्क मात्र

आपल्या मतदारांना स्पष्टपणे बजावतो, "माझ्या जन्मस्थळाविषयी मला प्रेम जरूर आहे पण माझे कार्यक्षेत्र मात्र माझे संपूर्ण राष्ट्र हे आहे."

आपल्याला माणूस पाहिजे तो आपला फायदा साधून देईल असा. आपल्याला तुलमोहनराम चालतो. आपली अपेक्षा एवढीच की, त्याने फक्त स्वतःची तुंबडी न भरता आपलाही काहीतरी फायदा करून द्यावा. त्यामुळे प्रत्येक राजकारणी दुसऱ्यापेक्षा मी तुमचा स्वार्थ कसा साधून देईन अशा चढाओढीने मतदारांसमोर उतरतो. बर्क मात्र आपल्या मतवारांना बजावून सांगतो, "ज्यांना स्वातंत्र्य हवे ते स्वतंत्र राहतील याची खात्री बाळगा. आम्हाला खूष करण्यासाठी कोणीही आपली सदसद्विवेकबुद्धी भ्रष्ट करू नये. कारण भ्रष्ट विवेकबुद्धीच्या बळावर कोणीही लोकप्रतिनिधी आपल्या मतदारांची खरी सेवा बजावू शकणार नाही. लाचारीने वागण्याच्या सवयीमुळे आपल्या लोकप्रतिनिधींच्या मनाला कीड लागली तर असे लोकप्रतिनिधी आमच्या स्वातंत्र्याचे खंबीर रक्षक कधीही होऊ शकणार नाहीत. एक गोष्ट मला स्वच्छपणे सांगितली पाहिजे. आज मी कोणत्याही सार्वजनिक पदावर नाही, त्यामुळे मी ती निश्चितपणे सांगू शकतो. आपण आपल्या प्रतिनिधीशी न्याय्य, सभ्य आणि जिव्हाळ्याची वागणूक ठेवली नाही, त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण केला नाही, त्यांच्या आकलनक्षमतेच्या कक्षा विस्तारल्या नाहीत आणि त्यांना व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून काम करण्याची मुभा दिली नाही, तर आपल्या राष्ट्रीय प्रतिनिधींची अधोगती एखाद्या कमालीच्या गोंधळलेल्या आणि तात्कालिक व स्थानिक प्रश्नापुरत्या पाहणाऱ्या संकुचित गटात होईल. लोकप्रतिनिधींचे विचार जर क्षुद्र आणि संकुचित असले तर आणि योग्य कार्यपद्धती पाहण्याचे धैर्य त्यांच्यात नसले तर आपल्या राष्ट्रात देशहितदक्ष मुत्सद्दी निर्माण होण्याऐवजी तोंडपुजे हुजरे निर्माण होतील. यातून अखेरीस लोकांची ताकदही खच्ची होईल. अज्ञान, मनाचा संकुचितपणा आणि भ्रष्टपणा यांमुळे समाज नपुंसक होतो आणि त्याचे इतर सर्व गुणही निष्फळ, वांझ ठरतात."

आज तरी राजदरबारची इच्छा लोकप्रतिनिधींचे महत्त्व कमी व्हावे अशी दिसते. जनतेनेही तशीच इच्छा धरली तर राज्ययंत्रणेचा कोणताही अवयव निरोगी राहणार नाही आणि तिला वाचवणे शक्य होणार नाही. बर्क यांचा हा इशारा आपल्या बाबतीतही खरा ठरला नाही का?

ब्रिटिश नागरिक म्हणून प्रत्येक प्रश्नाकडे न पाहता बर्क हे आयर्लंडच्या प्रश्नावर आयरिश माणसाच्या आणि अमेरिकेच्या प्रश्नावर अमेरिकन माणसाच्या नजरेतून पाहतात अशी टीकाही त्यांच्यावर झाली होती. त्याचे कारण निव्वळ लोकप्रियता आहे म्हणून एखाद्याला पाठिंबा द्यायचा असे त्यांनी केले नाही आणि काही वेळा आयरिश किंवा अमेरिकनांच्या न्याय्य मागण्या मान्य कराव्यात असा आग्रह धरून लोकांचा रागही ओढवून घेतला. आपल्या भाषणात बर्क मतदारांना खणखणीतपणे बजावतात की, जी संकटे देशबांधवांनी स्वतःवर ओढवून घेतली त्याबाबतचा इशारा आपण त्यांना अगोदरच दिलेला होता. निव्वळ परकीय लोकांचा द्वेष करण्याच्या प्रवृत्तीपायी ही संकटे ओढवली आणि बर्कने तसा इशारा दिला

तेव्हा या देशबांधवांनी त्यांचा तिरस्कार केला होता.

"सभ्य गृहस्थहो, अनेक प्रकारच्या लज्जास्पद गडबड-गोंधळापासून तुम्हाला वाचवण्याचा प्रयत्न मी केला नाही का? त्याची पूर्वकल्पना मी तुम्हाला दिली नव्हती का? आज्ञापालनाच्या गुजगोष्टी, स्वतंत्र मते मांडण्याऐवजी तुमची इच्छा प्रमाण मानणे आणि अशाच निरुद्योगी, निष्फळ, निर्बुद्ध गोष्टी यांमुळे विचार न करणाऱ्या माणसांच्या कानांना गुदगुल्या होत असतीलही, पण अशा गोष्टींनी देशावर कोसळलेल्या या वादळी आपत्तीतून तुमचा बचाव केला का? ज्यांनी सैल जिभेने निरर्थक बडबड केली, भित्रेपणा लपवण्यासाठी अविचारी कृत्ये केली आणि संकटांच्या नजरेला नजर देऊन मुकाबल्याची तयारी करण्याऐवजी संकटांच्या खाईत बेफिकीरीने उडी घेतली त्यांनी या राष्ट्राचा खरा अपमान केला नाही काय? त्यांनीच या आश्रयहीन, सामर्थ्यहीन, प्रतिकारहीन राष्ट्राला या पृथ्वीवर पराभूत, भुईसपाट होऊ देऊन अपमानित केले नाही काय? आता मला सांगा, ज्या दिवशी आपल्या वृथा, अवास्तव राष्ट्राभिमानाला मी विरोध केला, त्या दिवशी मी आयरिश माणूस होतो की ज्या दिवशी ग्रेट ब्रिटनचा भयानक अपमान झाला म्हणून शरमेने मान खाली घालून मी अश्रू ढाळले, त्या दिवशी मी आयरिश माणूस होतो? इंग्लंडमध्ये मी एका कारणासाठी लोकप्रियता गमावली आणि आर्यलंडमध्ये दुसऱ्या कारणासाठी, लोकप्रिय होण्यासाठी मी काय करायला हवे होते? दोन्ही राज्यांची योग्य सेवा बजावणे हे माझे कर्तव्य होते. माझ्या सेवेची दखल घ्यायची की नाही हा त्यांचा प्रश्न होता

"आयरिश लोकांना न्याय द्यावा असे मी म्हटले तेव्हा मी आयरिश ठरलो व हेच तत्त्व अमेरिकेसाठी मांडले तेव्हा अमेरिकन ठरलो. माझी विनंती एवढीच होती की, ज्या वेळी अमेरिका आपल्या पायाशी नमते घेऊन काही सवलती मागत होती त्याच वेळी आपण त्या द्यायला हव्या होत्या. आपले वर्चस्व अबाधित असतानाच तडजोडीसाठी न्याय्य अटी सादर करणे आपल्या हिताचे झाले असते. हे येथे म्हणणे अमेरिकेच्या बाजूने पक्षपात करणे कसे ठरते? त्याऐवजी आपण वाटाघाटी व तडजोडीसाठी क्षण निवडला तो सपशेल पराभवाचा. अधिकार आणि सामर्थ्य यांची जागा दुबळेपणा व शरणागतीने घेतली."

बर्कच्या भाषणातून दिसतो तो स्वत:च्या कार्यक्षमतेबद्दलचा विश्वास, निर्भयता, स्वतंत्र विचार आणि विशिष्टाऐवजी समष्टीशी बांधिलकी.

आपले आदर्श कोण? आणि मग जे निष्पन्न होते त्याबद्दल आश्चर्य कशासाठी वाटून घ्यायचे?

## महत्त्वाच्या सुधारणा

संसदीय लोकशाही ज्या तऱ्हेने काम करील असा आपला विश्वास होता त्याच्या नेमकी उलट परिस्थिती झाली आहे. आपल्या घटनेने गृहीत धरले ते तंत्र म्हणजे जनता आपल्या प्रतिनिधींवर नियंत्रण ठेवील, ते प्रतिनिधी मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवतील आणि मंत्रिमंडळाचे नेतृत्व करणारे पंतप्रधान किंवा मुख्यमंत्री समानांमधील पहिले या पद्धतीने वागतील. आज चित्र दिसते ते म्हणजे पंतप्रधान आणि

मुख्यमंत्री यांच्या हाताखाली कुटिल कारस्थाने करणाऱ्यांची एखादी टोळीच राबत असते. मंत्रिमंडळाच्या मर्जीनुसार लोकप्रतिनिधी वागतात आणि अशा लोकप्रतिनिधींची बनलेली विधिमंडळे लोकहिताला आणि लोकांच्या टीकेला कस्पटासमान तुच्छ मानून कारभार हाकतात.

सध्याची अवस्था ताळ्यावर आणायची तर त्याचा खरा मार्ग हा आहे. न्यायाधीशांनी स्वतंत्र बुद्धीने निकाल द्यावेत असे आपल्याला वाटते पण न्यायाधीश निवडण्याचे अधिकार जर शिवशंकर, शंकरानंद, एच. आर. भारद्वाज अशा मंडळींच्या हातात असतील तर न्यायपद्धती बदलली तरी काय फरक पडणार? त्यामुळे खरा मार्ग आहे तो म्हणजे सार्वजनिक जीवनाची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात सुधारणे.

निव्वळ एवढी सुधारणा पुरेशी नाही. कारण तसे म्हटले तर सार्वजनिक जीवनात आजही काही चांगली माणसे आहेतच; पण त्यांचा प्रभाव पडत नाही कारण अंतिम निर्णय घेण्याची सत्ता जनहिताविषयी बेफिकीर असणाऱ्या अकार्यक्षम मंडळींच्या हातात आहे. त्यामुळे सज्जनांच्या सूचना म्हणजे अरण्यरुदन ठरते. एखाद्या कोपऱ्यातून केलेला आक्रोश दुर्लक्षित होतो. यावर उपाय म्हणजे निवडणुकीच्या राजकारणाची प्रत आणि पद्धती सुधारणे.

सज्जन लोकांचे सत्कार्य ही आज एक त्यांच्यापुरती राहणारी खास बाब झाली आहे. यातून थोडे बाहेर डोकावून त्यांनी उमेदवारांची निवड करावी किंवा एखाद्याची शिफारस करावी असा आग्रह आपण त्यांना करायला हवा. अपयशाच्या भीतीतून आपण त्यांना बाहेर काढायला हवे.

राजकीय पक्षांनी योग्य उमेदवारांना पाठिंबा द्यावा किंवा स्वत:च उभे करावे असा आग्रह आपण त्या पक्षांना केला पाहिजे, हे त्यांच्याच हिताचे ठरेल हे त्यांना दाखवून दिले पाहिजे.

आपल्याकडील निवडणुकांत लाटा उसळतात आणि ज्यांच्या बाजूची लाट असेल त्यांनी उभा केलेला वाटेल तो उमेदवार विजयी होतो. पुढच्या निवडणुकीच्या वेळी लाटेचे स्वरूप अगोदर कळले तर ज्यांच्या बाजूची लाट, त्याला सार्वजनिक जीवन सुधारण्याची ही संधी आहे हे आपण पटवून दिले पाहिजे. श्रीमती गांधींना अशी संधी १९७१ व १९८० मध्ये मिळाली होती. जनता पार्टीला ती १९७७ मध्ये तर राजीव गांधींना १९८४ मध्ये मिळाली. चांगले उमेदवार उभे करून निवडून आणण्याच्या या संधी आजपर्यंत वाया गेल्या. यापुढे तसे होऊ देता कामा नये.

कोणतीही लाट नसेल तर राजकीय पक्षांनी चांगला उमेदवार उभे करणे त्यांच्या हिताचे कसे हे पटवून दिले पाहिजे. लाट नसताना आणि राजकीय पक्षांची कीर्ती रसातळाला गेली असताना प्रत्येक पक्षाने उभे केलेले उमेदवार काय योग्यतेचे आहेत याचाही प्रभाव निकालावर निश्चितपणे पडेल. १८ ते २१ या वयोगटातील नवमतदारांचा कल कोणाकडे झुकणार अशी चर्चा नेहमीच चालते. चांगला उमेदवार नसेल तर ही तरुण मंडळी मतदानकेंद्राकडे फिरकणारसुद्धा नाहीत हे आपण समजावून दिले पाहिजे.

समजावून सांगून उपयोग होत नसेल तर स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी संघटना आणि नैतिक शक्ती असलेल्या व्यक्ती यांना आपला प्रभाव वापरून राजकीय पक्षांना या मार्गाने जाण्यास भाग पाडले पाहिजे. शेवटी चांगल्या चारित्र्याच्या लोकांना निवडणुकीच्या राजकारणात आणायचे ते काही निव्वळ राजकीय पक्षांच्या भल्यासाठी नव्हे. हा एक युक्तिवाद आहे आणि राजकीय पक्षांनी चांगल्या माणसाबाबत आस्था दाखवावी म्हणून हा युक्तिवाद त्यांना सांगायचा. पण सज्जन माणसांना राजकारणात उतरवायचे ते देशाच्या हितासाठी. हे करण्यास फार अवधी नाही. विधिमंडळातील जागा उघडपणे गुन्हेगारी करणाऱ्या व्यक्ती झपाट्याने बळकावत आहेत. पाच वर्षांपूर्वी आम्ही आमच्या लिखाणात ही निव्वळ शक्यता म्हणून लिहीत होतो. आज जिल्हा व राज्यपातळीवर ही वस्तुस्थिती ठरली आहे. इतकी सर्वसामान्य वस्तुस्थिती की, त्यावर भाष्य करणेही निरर्थक ठरावे. या तऱ्हेने आणखी पाच वर्षांनी आपल्या संसदेचाही बट्ट्याबोळ झालेला असेल.

हे टाळायचे तर सर्व स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी संघटना आणि नैतिक प्रभाव असलेल्या व्यक्ती यांनी राजकीय पक्षांना बजावून सांगितले पाहिजे की, आम्ही फक्त चांगल्या चारित्र्याच्या उमेदवारांसाठीच काम करू आणि कोणता पक्ष याचा विचार करणार नाही.

निवडणुकीच्या राजकारणाचा दर्जा सुधारण्याची निकड इतकी तीव्र आहे की, आसामच्या आसू या विद्यार्थी संघटनेने जे केले ते प्रत्येक शक्तिशाली संघटनेने करावे, असे मी म्हणेन. त्यांनी या पक्षांना ठामपणे सांगावे की, तुम्ही उभ्या केलेल्यांपैकी कोणताच उमेदवार चारित्र्यवान नसेल तर त्या मतदारसंघात आम्ही आमचा स्वतःचा उमेदवार उभा करू आणि त्याला विजयी करण्यासाठी झटून काम करू. आज त्यांनी करायचे कर्तव्य हे असे आहे. गौतम बुद्धाच्या शब्दांत सांगायचे तर ज्याचे केस पेटले आहेत असा मनुष्य जितक्या झपाट्याने हालचाल करील तितक्या झपाट्याने त्यांनी आपले ते कर्तव्य पार पाडले पाहिजे.

ऑक्टोबर १९८९

जयप्रकाश नारायण स्मृती व्याख्यान

# गांधीजींचा मार्ग

## २. गांधीजींचा मार्ग आणि आपला मार्ग

आपले राजकारण एक तर खोट्या कारस्थानांनी नाही तर मागण्यांनी पछाडलेले असते. विद्यार्थी संघटना असोत, कामगार संघटना की राजकीय पक्ष असोत, सगळ्यांचा डोलारा मागण्यांभोवती उभारलेला असतो. त्यांनी काढलेले प्रत्येक मोर्चे, धरणे, संप यांची उद्दिष्टे कोठली तरी मागणी एवढीच असतात.

यातील प्रत्येक मागणीची काही वैशिष्ट्ये असतात.

* प्रत्येक मागणी व्यक्तींकडून किंवा एखाद्या गटाकडून मांडली जाते. तिचा रोख बहुधा सरकारच्या दिशेने असतो.

* प्रत्येक मागणी ही ती मांडणाऱ्या व्यक्तीच्या किंवा गटाच्या फायद्यासाठी असते.

* बहुसंख्य मागण्या या काहींच्या फायद्यांसाठी असतात आणि त्यांची किंमत दुसरे कोणीतरी भरत असतात. अनेकदा समाज ही किंमत चुकती करतो.

* 'बेकारी हटाव', 'पंजाबवर श्वेतपत्रिका प्रसिद्ध करा', 'आसाम प्रश्न सोडवा' अशा काही मागण्या म्हणजे निव्वळ घोषणा असतात. अशा मागण्यांचा तपशील क्वचितच दिला जातो.

बहुतेक मागण्या अवास्तव स्वरूपातल्या असतात. त्या मांडतानाच काही मागण्या वाटाघाटीत सोडून देण्याची तयारी ठेवलेली असते. अनेकदा तर मागणी करणाऱ्यांचे त्यातील स्वारस्य मागणी मान्य केल्यावर संपते. एखाद्या हत्याकांडाची चौकशी करण्यासाठी आयोग नेमा अशी मागणी केली जाते. आयोग नेमला जातो. त्यानंतर आयोगाला पुरावा मिळवून देण्यासाठी कितीजण आपले श्रम आणि वेळ खर्च करतात?

मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी जी साधने आपण वापरतो ती मागण्यांना शोभतील अशीच. मागण्या दुसऱ्यांकडे केलेल्या असतात. साहजिकच त्या पदरात पाडून घेण्यासाठी दुसऱ्यांना गैरसोयीचे ठरतील असेच मार्ग वापरले जातात. आपल्याला तर तोशीस लागू नये; पण वेगळ्या समाजाला वेठीस धरता यावे असाच मार्ग वापरला जातो.

अगदी सगळ्याच संस्थांच्या आणि संघटनांच्या मागण्यांचे स्वरूप हे असते असे मात्र नाही. काही थोडे चांगले असतात. आसाम विद्यार्थी संघटनेच्या आंदोलनाची मध्यवर्ती मागणी ही काही त्या संघटनेशी संबंधित असलेल्या स्वार्थापोटी नव्हती

आणि ही मागणी मांडताना विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास केला होता. संबंधित कायद्याचा अभ्यास केला आणि लोकसंख्येविषयीचा आढावाही बारकाईने तपासला. आणखी काही सेवाभावी संस्था आहेत. त्यांची चळवळ निव्वळ मागणी पदरी पाडून घेण्यासाठी नसते. परंतु हा झाला अपवाद. आजच्या आपल्या राजकीय जीवनात असे अपवाद अगदी कमीच आढळतात.

## गांधीजींचा मार्ग

गांधीजींचा मार्ग याच्या अगदी नेमका विरुद्ध होता.

पहिली गोष्ट म्हणजे आपल्या मागण्या स्वतःला उद्देशून असल्या पाहिजेत, दुसऱ्याला नव्हे, असे त्यांनी सांगितले. त्यांनी केलेल्या प्रत्येक चळवळीत काही औपचारिक मागण्या इतरांकडे केल्या हे खरे, परंतु मुख्य मागण्यांचा रोख स्वतःच्या आणि अनुयायांच्या दिशेने असायचा. 'निळीची लागवड करणाऱ्या मजुरांच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी समिती नेमावी', 'जमीन महसुलाच्या आकारणीत सुधारणा करा', 'या वर्षी महसुलाची वसुली थांबवा' अशा काही मागण्या गांधीजी सरकारकडे करीत. पण यापेक्षाही जबरदस्त अपेक्षा ते चळवळीत सहभागी होणाऱ्यांकडून करीत असत.

दुसरी गोष्ट म्हणजे स्वतःकडे कोणती मागणी करावी? व्यापक जनहित साध्य करण्यासाठी स्वतःला उत्तम साधन बनविण्याची क्षमता ज्यातून माझ्या अंगी येईल अशी मागणी करायला हवी. विषयांची मांडणी अशा तऱ्हेने करताना गांधीजींनी सामाजिक व धार्मिक जीवनाच्या एका अतिशय महत्त्वाच्या आदर्शामध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणला. आतापर्यंतचे आदर्श तत्त्व असे होते; साऱ्या दुःखांचे मूळ कारण व्यक्तीशी संबंधित आहे. मी केलेली कृती आणि जगाकडे पाहण्याची माझी दृष्टी यातून दुःख-शोक यांची उत्पत्ती होते. त्यामुळे त्यांना ओलांडून मात करण्याचा मार्ग मी स्वतःमध्ये अंतर्मुख होऊन शोधला पाहिजे. या सर्व विचारपद्धतीमध्ये थोर व्यक्ती, अगदी रमण महर्षीसारखे महापुरुष, संदर्भापासून मुक्त होऊन स्वतःपुरते दुःख-शोकाच्या पलिकडे जाऊन राहत होते. इतर सर्वसामान्य माणसे मात्र त्याच वातावरणात खितपत राहत. कारण मुक्तीचा मार्गच व्यक्तिगत प्रयत्नांतून पुढे जाणारा असतो.

गांधीजींनी हे सारे बदलून टाकले. आत्मसाक्षात्कार हे खरे उद्दिष्ट असे त्यांनी सांगितले. परंतु आत्मसाक्षात्काराचा त्यांचा मार्ग होता तो इतरांच्या, विशेषतः दीन-दुबळ्यांच्या सेवेमधूनच. त्यांच्या लेखनातील हे सारे उतारे या नव्या मार्गाच्या खुणा पटवतील.

'माझ्या लक्षावधी बांधवांना मी ओळखतो असे मला वाटते. दिवसाचे चोवीस तास मी त्यांच्या बरोबर असतो. ही जनता, हीच माझी पहिली आणि कायमची काळजी. त्यांच्या हृदयातील परमेश्वराखेरीज दुसरा कोणताही देव मी ओळखत नाही. या ईश्वराचे अस्तित्व त्यांना जाणवत नसेल; पण मला जाणवते. या ईश्वररूपी सत्याचे आणि सत्यरूप ईश्वराचे पूजन मी या लक्षावधी बांधवांच्या सेवेतून करतो.'

—हरिजन ३ मार्च १९३९

'प्रार्थनेला कोणतेही नवे स्वरूप दिले तरी हरकत नाही. प्रार्थना करणारे अंत:करण हे साधन होय. अंत:करणाला प्रार्थनाशील बनवितो तो सेवाभाव. आजच्या काळात जे 'हिंदू' अंत:करणापासून अस्पृश्यांची सेवा करतात ते खरोखरी उपासनाच करीत असतात. गरिबांसाठी सद्भावाने सूतकताई करणारे हिंदू आणि इतरसुद्धा ईश्वराची भक्ती करीत असतात.'

—यंग इंडिया. २४ नोव्हेंबर १९२५

'मानवतेच्या कल्याणासाठी आपण सर्वस्वाचा त्याग करणे म्हणजे यत्न.'

—हरिजन, ३ मे १९४२

'सत्याचा मी नम्र उपासक आहे. आत्मसाक्षात्काराची मला तळमळ लागली आहे. या जन्मातच मला मोक्षप्राप्तीची इच्छा आहे. मी करीत असलेली देशसेवा म्हणजे शरीराच्या बांधिलकीतून आत्म्याला मुक्ती मिळविण्यासाठी मी घेत असलेले प्रशिक्षण होय.

..... 'कारण मोक्षाकडे जाणारा मार्ग म्हणजे माझ्या देशाची आणि व्यापक मानवतेची अखंड सेवा करणे.'

—यंग इंडिया, ३ एप्रिल १९२४

ईश्वराचा साक्षात्कार हे मानवाचे अंतिम उद्दिष्ट होय. मानवजातीची सेवा हा या व्यापक प्रयत्नाचा एक भाग आहे. कारण ईश्वराला त्याच्या निर्मितीत पाहणे आणि तिच्याशी समरस होणे हा त्याला शोधण्याचा सर्वात उत्तम मार्ग होय. हे घडू शकेल ते फक्त सेवेतूनच. आणि त्यासाठी एकमेव योग्य क्षेत्र म्हणजे आपली मातृभूमी. ईश्वरनिर्मित पूर्णतेचा मी एक अंश आहे आणि संपूर्ण मानव जात वगळून इतरत्र कोठेही मला ईश्वर दिसत नाही. माझे बांधव हे माझे सगळ्यात जवळचे शेजारी आहेत. आज ते इतके असाहाय्य, दीन, दुबळे बनले आहेत की, त्यांच्या सेवेवर लक्ष केंद्रित करणे माझे कर्तव्यच आहे.'

—हरिजन, २९ ऑगस्ट १९३६

अशा तऱ्हेने गांधीजींच्या मागण्या दुसऱ्यापेक्षा स्वत:कडे असायच्या आणि सर्व मागण्यांचे अंतिम उद्दिष्ट स्वत:ला लोककल्याणाचे अंतिम साधन बनवावयाचे, हे असे.

आता तिसरा मुद्दा येतो तो म्हणजे मी दुसऱ्याकडे काय मागावे? ही मागणी निव्वळ स्वार्थापोटी नसावी. स्वत:च्या किंवा आपल्या गटाच्या फायद्यासाठी नसावी. दुसऱ्याला झळ लागेल आणि आपल्या पदरात काही पडेल अशी मागणी नसावी. व्यापक लोककल्याणाचे साधन होण्याची पात्रता इतरांच्याही अंगी यावी यासाठी ही मागणी असावी. आपण सामूहिकरीत्या साऱ्या समाजाकडे मागणी करावी ती कोणती? इतरांना तोशीस लागून आपल्याला बरे दिवस यावेत अशी इच्छा नसावी. अशी मागणी आपल्या गटाच्या हितसंबंधाच्याही पलिकडे जाणारी हवी. संपूर्ण समाजव्यवस्था सुधारणारी हवी, ज्यायोगे ती व्यवस्था सर्वांच्या हितासाठी उपयुक्त ठरेल; म्हणूनच गांधीजी नेहमी म्हणत, 'तुम्ही आपल्या समाजातल्या सगळ्यात

जास्त दरिद्री आणि असाहाय्य माणसाचा चेहरा नजरेसमोर आणा आणि मग स्वतःला विचारा की, तुमच्या मनात असलेल्या कृतीचा त्याला काही उपयोग होणार आहे का? त्याला त्यातून काही फायदा मिळणार आहे का? स्वतःच्या जगण्यावर, भवितव्यावर त्याला अधिक चांगले नियंत्रण ठेवता येणार आहे का? दुसऱ्या शब्दांत, भौतिकदृष्ट्या आणि आध्यात्मिकदृष्ट्या भुकेल्या आपल्या लक्षावधी देशबांधवांना तुमची ही कृती स्वराज्याकडे घेऊन जाणारी आहे का? त्यानंतर तुमच्या शंका आणि तुमचे अहम् वितळून जातील.'

## उदाहरणे

गांधीजींच्या विचारांची ही ओझरती झलक दाखवली, परंतु त्यांच्या व आपल्या मार्गातले फार मोठे अंतर त्यातून पुरेसे स्वच्छ होत नाही. तो फरक लक्षात येईल; गांधीजी प्रत्यक्ष कृती करीत असताना कसे वागत, काय बोलत यातून. दक्षिण आफ्रिका, चंपारण, खेडा येथे त्यांनी केलेल्या चळवळी, अहमदाबादला मजुरांच्या संपाच्या काळातल्या आणि जालियनवाला बाग हत्याकांडाच्या नंतरच्या घटना यातून हा फरक, अंतरे स्वच्छ होतील. अशा संघर्षाच्या प्रसंगी ते कसे बोलत व वागत हे पाहणे उपयुक्त ठरेल. अशा प्रसंगी आपण काय करू याच्याबरोबर गांधीजींच्या वागण्याची तुलना करायला हवी.

आपण नेहमी दुसऱ्याला दोष देतो. सरकारवर ठपका ठेवतो. गांधीजीही पुन्हापुन्हा आपल्याला स्वतःकडे नीट पाहायला सांगत. नोव्हेंबर १९१७ मध्ये गुजरातच्या राष्ट्रीय परिषदेत त्यांनी सांगितले, 'आपण आपल्या हक्कांसाठी सरकारकडे, साम्राज्याच्या विधिमंडळातही आंदोलन करू. परंतु आपल्या लोकांना खरोखर जागे करण्यासाठी अंतर्मुख आंदोलन हे खरे महत्त्वाचे आहे. बहिर्मुख चळवळ ही ढोंग व स्वार्थ यांमुळे डागाळण्याची शक्यता आहे. अंतर्मुख चळवळीत हा धोका कमी आहे. या दोन्हीही चळवळी एकमेकांचा तोल सांभाळतील एवढेच नव्हे, तर दोन्हीही केल्याखेरीज हेतू साध्य होणार नाही.'

(कलेक्टेड वर्क्स, खंड १४, पृष्ठ ६०)

यापुढेही काही उतारे दिले आहेत. बहुसंख्य उतारे गांधीजींच्या संकलित साहित्याच्या खंड १३ ते १७ यातून घेतलेले आहेत.

आपले अपयश, आपली वागणूक आपल्या अवस्थेला जबाबदार आहेत, असे गांधीजी पुन्हापुन्हा सांगत. आपली उद्दिष्टे साध्य करावयाची तर यात सुधारणा करायला हवी. त्यासाठी आपल्या मागण्यांचा रोख स्वतःकडे वळवायला हवा.

'ब्रिटिशांनी आपल्यावर मिळविलेले प्रभुत्व कशा तऱ्हेचे आहे? यात आपला स्वतःचा काही दोष नाही का? ईस्ट इंडिया कंपनीच्या पैशाच्या प्रलोभनाला बळी पडले ते लोक कोण होते? त्या कंपनीने त्यांच्या पद्धतीने काम केले, याचा दोष कंपनीकडे कसा जाईल? दारूचा व्यापारी दारू विकतो, पिणाऱ्याला व्यसन लावल्याचा दोष विक्रेत्याकडे कसा जाईल? सावकाराला तुम्ही मुद्दलाइतके व्याज दिले तर दोष सावकाराचा कसा काय? त्याच्याविरूद्ध मला बोलताच येणार नाही. एक लेखक म्हणतो की, जगात जोपर्यंत बनणारे आहेत, तोपर्यंत

बनविणारेही आहेत, राहतील.

'ब्रिटिशांचे दोष काढून आणि त्यांचा द्वेष करून आपली प्रगती होणार नाही. आपल्यामधील ज्या दुर्गुणांमुळे ब्रिटिशांना आपल्यावर वर्चस्व मिळविता आले ते दुर्गुण दूर करीपर्यंत आपल्याला गुलामच राहावे लागेल.

'आणि तरीही आपण ब्रिटिशांचे दोष दाखवितो आणि दाखवत राहू. काँग्रेसने केलेले ते मुख्य कामच आहे. ब्रिटिशांवर तोंडसुख घेणाऱ्या वक्त्यांची संख्या झाडावरच्या पानांसारखी अगणित असते. त्यामुळे मी ब्रिटिशांचे दोष दाखविण्यापेक्षा आपल्या स्वतःच्या दोषांवर जास्त भर दिला तर फायदा होईल, असे मला वाटते.

'आपल्या ज्या दोषांमुळे आपण असाहाय्य बनलो ती कारणे म्हणजे– बेसुमार स्वार्थीपणा, देशासाठी त्याग करण्यातील कुचराई, अप्रामाणिकपणा, भित्रेपणा, ढोंगीपणा आणि अज्ञान.'

(१७ पृष्ठ ५१६-१८)

'प्लेगची साथ? सरकारला हे कर ते कर असे म्हणत बसू नका. रोगाच्या मुळाशी आहेत त्या आपल्या घाणेरड्या सवयी. त्यात बदल करायला हवा.'

(१४, पृष्ठ ५६-७)

बालमृत्यूचे प्रमाण फार मोठे आहे, त्याला सहा गोष्टी जबाबदार आहेत असे प्रतिपादन गांधीजींनी केले आणि सहापैकी फक्त एका गोष्टीसाठीच सरकारला जबाबदार धरता येते असे त्यांनी दाखवून दिले.

(१६, पृष्ठ ४६८-७१)

देशी उद्योगधंदे मोडकळीला आले याचीही जबाबदारी ब्रिटिशांच्या धोरणावर फार मोठ्या प्रमाणात टाकता येणार नाही, असे गांधीजींनी सांगितले. ब्रिटिशांनी आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करावा हे स्वाभाविकच आहे. शिवाय ब्रिटिशांच्या धोरणांना यश मिळते त्याचे कारण आपण त्यांच्याशी हातमिळवणी करतो हे आहे. साधेपणाचा ठेवा आपण सोडून दिला, हा आपला दोष आहे. त्यामुळे आपले उद्योगधंदे मारले गेले. त्यामुळे ब्रिटिशांनी आपल्या मालाची आयात बंद करावी अशी बहिर्मुख मागणी गांधीजींनी केली नाही. उलट भारतीयांनी स्वदेशी माल वापरण्याची शपथ घ्यावी असा त्यांचा आग्रह होता. (१५, पृष्ठ ३७५.)

गोरक्षण हिंदूंना महत्त्वाचे वाटते म्हणून सरकारने गोहत्याबंदीचा कायदा करावा, अशी मागणी गांधींनी केली नाही. त्यांनी मागणे मागितले ते हिंदूंकडे. हिंदूंना त्यांनी आपल्या गाईंची अधिक काळजी घ्यायला सांगितली. गाईंना पोटभर चारा मिळत नाही आणि त्यांच्या दुधाचा थेंब न् थेंब विक्रीसाठी पिळून घेताना वासरेही उपाशी राहतात. हे सुधारल्यानंतर, मुसलमानांनी गोमांस खाणे सोडून द्यावे यासाठी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न हिंदूंनी करावा. त्यासाठी मुसलमानांना प्रिय अशा उद्दिष्टांसाठी कार्य करावे. त्यातून बंधुभाव निर्माण होईल आणि त्याचा आदर राखण्यासाठी मुसलमान स्वतःहून गोमांस खाणे सोडून देतील. (खंड १४, पृष्ठ २- ४, ५८- ९, १२७, १५१; खंड १६, पृष्ठ ३०५- १२.)

गांधीजींनी मौलाना अब्दुल बारी यांचे उदाहरण दिले. बारी यांनी हिंदू-मुसलमान ऐक्याचा आदर राखण्यासाठी आपल्या घरी बकरी ईदच्या दिवशी होणारी गोहत्या बंद केली. (१६, ९०-९१)

अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असावेत का ? ब्रिटिशांच्या याबाबतच्या फूटपाड्या कारवायांना गांधीजींनी विरोध जरूर केला, पण त्यापेक्षाही अधिक निर्धाराने त्यांनी हिंदू समाजातले अस्पृश्यतेचे पाप निपटून टाकण्याचा प्रयत्न केला. स्वतःमधील दोष, कुटुंबातील, जातीतील आणि समाजातील दोष दूर केल्यानेच आपण स्वराज्य मिळवू शकू (१४, पृष्ठे ५७-७). ब्रिटिश देतील तेव्हा स्वराज्य मिळेल असे नसून आपण अस्पृश्यतेचा नायनाट करून सर्व जाती-जमातींशी बरोबरीने वागून हिंदू-मुसलमान ऐक्य साध्य करू, तेव्हाच स्वराज्य मिळू शकेल (१४, पृष्ठे ७१-२, ८१-३, ३४५ इत्यादी). अशा वेळी परंपरेने सांगितली जाणारी सबब म्हणजे स्वातंत्र्यासारख्या व्यापक उद्दिष्टांसाठी लढा चालू असताना अस्पृश्यांना त्यांचे अधिकार देण्यासारख्या छोट्या, बाजूच्या प्रश्नांना महत्त्व देऊ नये, कारण त्यामुळे जनतेत फूट पडेल आणि चळवळीचे नुकसान होईल. गांधीजींनी ही सबब कधीही मान्य केली नाही. चळवळ ऐन भरात असतानाही आत्मशुद्धीचे काम त्यांनी कधी मागे पडू दिले नाही.

खेडा सत्याग्रह चालू असताना गांधीजींना समजले की 'संदेर' या खेड्यात अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या 'धेड' जमातीच्या लोकांना गेली चार वर्षे शेतीतल्या उत्पन्नातला योग्य तो वाटा मिळत नाही. चळवळ चालू असेपर्यंत ह्या विषय पुढे ढकलावा, असे गांधीजी म्हणाले नाहीत. उलट तक्रार खरी असेल तर ती ताबडतोब सोडविली पाहिजे असे त्यांनी सांगितले. ब्रिटिशांकडून न्याय मिळवावयाचा असेल तर आपली वागणूक शुद्ध आणि न्याय्य हवी. त्यातूनच चळवळ चालविण्याचे सामर्थ्य व एकजूट मिळू शकेल (१४, पृष्ठे ३९९- ४००).

वर्षानुवर्षे, नाना तऱ्हेच्या प्रश्नामध्ये, त्यांची ही भूमिका कायम राहिली. निळीच्या मळ्यातल्या मजुरांची अवस्था, अहमदाबाद संप, स्वदेशी चळवळ, बॉम्बे क्रॉनिकल पत्राचे संपादक हॉर्निमन यांना परत पाठविण्याच्या निर्णयाचा निषेध अशा प्रत्येक प्रसंगी गांधीजींची मागणी सरकारला उद्देशून नव्हे, तर स्वतःला आणि अनुयायांना उद्देशून होती. त्या मागण्याही अशा असत की, ज्यायोगे त्यांचे अनुयायी व्यापक लोककल्याणासाठी अधिक सुसज्ज होत असत.

संपादक हॉर्निमन यांना सरकारने इंग्लंडला परत पाठविले. हॉर्निमन हे जन्माने ब्रिटिश होते; पण भारताची त्यांनी जी सेवा केली तिचा गांधीजी गौरवाने उल्लेख करतात– 'मि. हॉर्निमन अतिशय शूर आणि उदार मनाचे ब्रिटिश गृहस्थ होते. त्यांनी आपल्याला स्वातंत्र्याचा मंत्र दिला. अयोग्य गोष्ट जेव्हा दिसली तेव्हा तेव्हा त्यांनी ती उघडकीला आणली. त्यामुळे ज्या कुळात जन्म घेतला त्यांचे ते भूषण ठरले. त्यांनी भारताची केलेली सेवा प्रत्येक हिंदी माणूस जाणतो. मी शारीरिकदृष्ट्या स्वतंत्र असतानाही एका निर्भय सत्याग्रह्याला घालवून दिलेले पाहावे लागले आहे, याबद्दल मला वाईट वाटते (१५, पृष्ठ २५२). अर्थात

तरीही या कारणासाठी हरताळ पाळणे, मोठ्या सभा, मोर्चे काढणे टाळावे, असा सल्ला त्यांनी दिला. (१४, पृष्ठ २५३). काही तरी ठोस नि उठून दिसणारा निषेध करावा असे दडपण वाढू लागले. त्याला गांधीजींनी ठामपणाने तोंड दिले. ज्या उद्योगपती व व्यावसायिकांना या घटनेचे दुःख होते, त्यांनी धंदा थांबविण्याऐवजी आपल्या व्यवहारात प्रामाणिकपणा आणून त्यायोगे हॉर्निमन यांचा सन्मान करावा असे गांधीजींनी सुचविले (१५, पृष्ठे २५५-६). निषेधाबाबतचा आग्रह आणखी वाढला तरीही गांधीजी खंबीर राहिले. व्यापाऱ्यांनी व्यवसाय थांबविण्याऐवजी सार्वजनिक कार्याला आपला एक दिवसाचा नफा दान करावा असा सल्ला त्यांनी दिला (१५, पृष्ठे २५७-५८). लोकांना अजून पुरेशी शिस्त लागली नसल्याने मोर्चे, सभा, हरताळ नकोत असे गांधीजींनी सांगितले. (१५, पृष्ठे २६३-५६). तरीही त्यांचा सल्ला न जुमानता सत्याग्रही सभेने एक दिवसाचा हरताळ आणि बेमुदत उपोषण करावयाचे ठरविले. आता गांधीजींची भूमिका काय? जनतेने पूर्णपणे स्वयंशिस्त पाळावी, संपात सहभागी होण्यास सक्ती कोणावरही करू नये, चोवीस तासांच्या उपासाच्या काळात धार्मिक विषयांवर चिंतन करावे आणि आपापल्या धर्मग्रंथातील सत्याग्रहाची उदाहरणे आठवून सत्याग्रहाचे सत्य स्वरूप समजून घ्यावे, असा सल्ला गांधीजींनी दिला. (१५, पृष्ठे २७३- ७४, २७८- ८०, २८२- ५). यात सरकारकडे एकही मागणी केली नाही. आपले अनुयायी अधिक चांगले सत्याग्रही बनावेत या दिशेने या साऱ्या अपेक्षांचा रोख आहे.

यांसारखी उदाहरणे सांगावयाची तर कदाचित ती शेकडोंच्या घरात जातील. मी येथे तीनच उदाहरणांचा उल्लेख केलेला आहे. अशा गोष्टी आजच्या काळात कल्पनेपलिकडच्या वाटतील. त्यातही जालियनवाला बाग प्रकरणाशी संबंधित असलेला प्रसंग.

अहमदाबादमधील कापडगिरण्यांची टाळेबंदी जाहीर झाली होती. ३५ टक्के वेतनवाढ मिळेपर्यंत कामावर जाणार नाही आणि संप, टाळेबंदीच्या काळात कोणताही हिंसाचार, मालकाच्या संपत्तीचे नुकसान, शि गाळ करणार नाही, शांतता पाळू अशी प्रतिज्ञा कामगारांनी घेतलेली होती (१४, पृ २१४-१५).

गांधीजींनी या वेळी कामगारांना मार्गद न केले. चळवळीच्या काळात त्यांनी सत्य, धैर्य आणि न्याय्य वागणूक यांची जोप सना करताना जे आपल्या हक्काचे नाही त्याची मागणी करू नये. मालकाबद्दल मनात द्वेष बाळगू नये. हालअपेष्टांचा स्वीकार करावा आणि परमेश्वरावर विश्वास ठेवावा (१४, पृष्ठे २१९-२०). मजुरांनी काय करावे आणि करू नये हे गांधीजींनी आपल्या दुसऱ्या संदेशात सांगितले. मोकळा वेळ मिळाला आहे म्हणून जुगार खेळणे, दिवसभर लोळत पडणे, सतत मालक आणि टाळेबंदी याच विषयावर चर्चा करणे, चहाच्या दुकानी गावगप्पा करीत बसणे, गरज नसताना खाणेपिणे यामध्ये वेळ दवडू नये. त्याऐवजी त्यांनी आपले घर आणि परिसर यांची सफाई करावी, साक्षर असल्यास वाचन करून ज्ञान वाढवावे, दुसरी नोकरी शोधावी किंवा एखादा जोडधंदा त्यांनी मिळवावा (१४, पृष्ठे २४४-२५). वेतनवाढीसाठी केलेल्या आंदोलनाचा एक भाग म्हणूनच

भरमसाट व्याजाने पैसे उसने न घेण्याची शपथ कामगारांनी घेतली पाहिजे, असे गांधीजींनी सांगितले (१४, पृष्ठे २४२-४३). कामगारांची वागणूक चांगली राहिली तरच आपली मदत त्यांना मिळेल असे त्यांनी स्पष्ट केले (१४, पृष्ठ २२७).

यापैकी प्रत्येक मागणे गिरणीमालकांकडे केलेले नसून स्वत:कडे आणि आपल्या सत्याग्रही साथींकडे केलेले आहे. गांधीजींचे आणखी एक वैशिष्ट्य दिसते ते म्हणजे वरील सल्लामसलतीनंतर त्यांनी प्रसिद्ध केलेल्या एका पत्रकातून कामगारांनी आपल्याकडून कोणती अपेक्षा करावी याचे मार्गदर्शन केले आहे (१४, २२७-२८). आजचे आपले कामगार नेते किंवा विद्यार्थी संघटनेचे नेते कसे वागतात हे या कसोटीवरून ताडून पाहायला हवे.

दुसरे उदाहरण आहे ते रौलट कायद्याविरुद्ध उसळलेल्या आंदोलनाचे. सन १९१९ च्या रौलट कायद्यामध्ये दोन विधेयके होती. त्यातून आणीबाणी जाहीर करणे आणि त्या अनुषंगाने दडपशाही करण्याचे अधिकार सरकारला मिळाले होते. पकडवॉरंटशिवाय अटक करणे, गुन्ह्याच्या तपासाच्या कामी पुराव्याच्या कायद्यातून पळवाटा काढणे, प्रक्षोभक साहित्य केवळ ताब्यात असेल तरी त्याला शिक्षा करणे अशा तऱ्हेच्या कडक तरतुदी असलेल्या या विधेयकाची अंमलबजावणी पूर्वलक्षी पद्धतीने करण्यात येणार होती. या कायद्याखाली केलेल्या काही स्वरूपाच्या कारवाया न्यायालयाच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आल्या होत्या. गांधीजींनी या कायद्याविरुद्ध देशव्यापी सत्याग्रहाला सुरुवात केली. तणाव वाढला तशा दिल्ली, पंजाबमध्ये दंगली झाल्या. लोकांना शांत करण्यासाठी गांधीजी आगगाडीने तिथे निघाले. पण वाटेत 'कोसी' येथे त्यांच्यावर मनाई हुकूम बजावण्यात आला. त्यांनी मुंबईला परतावे आणि पुढील सूचना मिळेपर्यंत मुंबई राज्याच्या हद्दीबाहेर जाऊ नये असे त्या हुकुमात बजावण्यात आले होते. हुकूम बजावणाऱ्या अधिकाऱ्याला आपण तो मोडणार असल्याचे गांधीजींनी सांगितले. त्यावर त्यांना अटक करून मुंबईकडे जाणाऱ्या आगगाडीत बसविण्यात आले. दरम्यान काही क्षणांची फुरसत त्यांना मिळाली, त्यात त्यांनी आपला संदेश सांगितला, 'माझ्या अटकेने मला बंधमुक्त केले आहे. आपल्या अनुयायांनी संपूर्ण शांतता राखावी आणि सत्याग्रहाची प्रतिज्ञा चोखपणे पाळावी.' गांधीजींनी निक्षून सांगितले, 'आपल्यापैकी कोणी सत्याच्या मार्गावरून केसभर ढळला किंवा एखाद्या व्यक्तीविरुद्ध (मग तो ब्रिटिश असो की भारतीय) हिंसाचाराचा अवलंब केला तरी सत्याग्रहाच्या महान कार्याची निश्चितपणे हानी होईल.' हिंदू-मुसलमान ऐक्याला वाहून घेण्याचे आवाहन त्यांनी या सर्वांना केले. या साऱ्या संदेशात राज्यकर्त्यांकडे काही मागणी करणारा एक शब्दसुद्धा नाही. (१५, पृष्ठे २०७-०९)

गांधीजींच्या अटकेची बातमी आगीच्या लोळासारखी पसरली. वातावरणात तणावाबरोबरच हिंसेची शक्यताही भरली. मुंबईला आणून सरकारने गांधीजींना सोडले. त्यानंतर चौपाटीवर बोलताना त्यांनी इशारा दिला तो सरकारला नव्हे, तर आपल्या अनुयायांना. पोलिसांच्या वागणुकीबद्दल बोलण्याची ही वेळ नव्हे, असे आपल्या अटकेमुळे खवळलेल्या लोकांना बजावून गांधीजी म्हणाले, 'सत्य आणि अहिंसेच्या

मार्गावरून तुम्ही केसभर बाजूला गेला तरी ही चळवळ मी मागे घेईन आणि तुमच्या विरोधी सत्याग्रह म्हणून आमरण उपोषण करीन' (१५, २११-१२). या वेळी चळवळ सुरू होऊन जेमतेम एक आठवडा झाला होता. तरीही सरकारच्या गैरवर्तणुकीबद्दल बोलण्याऐवजी गांधीजींनी चळवळीतील चुका दाखविल्या. 'विशाल जनसमुदायाचे नियंत्रण करण्याची शक्ती सत्याग्रह्यांमध्ये अजून आलेली नाही हेच गेल्या आठवड्यातील अनुभवाने दिसून आले. सत्याग्रहाचे मर्म अजून लोकांना समजले नाही, त्यामुळे आपल्या भावना सत्याग्रहाला शोभतील अशा मार्गाने ते व्यक्त करू शकत नाहीत. यामुळे दोषाचा ठपका येतो तो सत्याग्रहावर...' (१५, पृष्ठ २१६).

या उणीवा राज्यकर्त्यांपासून लपवण्याचा प्रयत्न करण्याऐवजी गांधीजींनी स्वतःच व्हाइसरॉयच्या खाजगी सचिवांना लिहिले, 'मी राहतो त्या अहमदाबाद शहरात कायद्याऐवजी निव्वळ जंगलीपणाचे थैमान माजले आहे. इंग्रज स्त्री-पुरुषांना आपली निवासस्थाने सोडून कडेकोट बंदोबस्तात काही मोजक्या घरांमध्ये आश्रय घ्यावा लागला आहे. माझ्या दृष्टीने ही अतिशय लज्जास्पद आणि दुःखाची घटना आहे. सत्याग्रहाची तत्त्वप्रणाली जनतेत कितपत मुरली आहे याबद्दल माझा अंदाज चुकला. लोकांच्या मनात इतकी प्रखर द्वेषभावना असेल याचीही कल्पना मला आली नाही. यापुढे गर्दीला काबूत ठेवण्याचे सामर्थ्य माझ्या सहकाऱ्यांच्या अंगात येईपर्यंत दिल्ली किंवा पंजाबात मी प्रवेश करणार नाही असे आश्वासन आपणास देतो. सध्या तरी माझा सत्याग्रह माझ्या देशबांधवांच्या विरोधातच चालू राहणार आहे (१५, पृष्ठे २१८-१९).

अहमदाबादला पोहोचल्यानंतर गांधीजींनी नागरिकांना सांगितले की, आपल्या अटकेनंतर लोकांनी हिंसाचार करावा ही लाज आणणारी, वेदना देणारी गोष्ट होती. तिचा परिणाम म्हणून मनाई हुकूम मोडून दिल्लीला पोहोचण्याचा मूळ बेत गांधीजींनी सोडून दिला आणि लोकांच्या हिंसाचाराच्या विरोधी सत्याग्रह म्हणून तीन दिवस उपोषण सुरू केले. दुकाने पुन्हा उघडावीत आणि सर्व कामगारांनी गिरणीमध्ये कामाला परत जावे असा आग्रह गांधीजींनी धरला (१५, पृष्ठे २२०-२४, २३१-३४). येथेही सरकारबाबत त्यांनी एकही शब्द काढला नाही.

जे घडले ते लपवण्याचा किंवा त्याची तीव्रता कमी करून दाखवण्याचा प्रयत्न गांधीजींनी केला नाही. त्याउलट ज्या युरोपियन नागरिकांना दंगलीची झळ पोहोचली त्यांची यादी त्यांनी अहमदाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे मागितली आणि त्यांच्यासाठी निधी गोळा करायला सुरुवात केली (१५, पृष्ठे २१८, २२४, २३२).

अखेरीस, सरकारच्या चुकीमुळे दंगल उसळली आणि अहमदाबाद आणि विरमगाम येथल्या जमावाच्या हिंसाचाराशी सत्याग्रहाचा संबंध नाही अशी पुराव्यानिशी खात्री पटली तरीही गांधीजींनी चळवळ स्थगित केली (१५, पृष्ठे २४३-४५). दंगलीची चौकशी करणाऱ्या हन्टर समितीने आपले अहमदाबादमधील कामकाज पुरे केले, त्या वेळी गांधीजींनी नवजीवनमध्ये लिहिलेली टिपणे नमुनेदार आहेत : 'अहमदाबादविषयीचे आपले काम समितीने पूर्ण केले आहे. समितीपुढे आलेल्या

पुराव्यानुसार पहिली चूक लोकांनी केली, सरकारने नव्हे, असे सिद्ध होते. सरकारने एखाद्या व्यक्तीला अटक केली याचा अर्थ लोकांना जाळपोळ आणि खून करण्याचा अधिकार मिळाला असा होत नाही (१६, पृष्ठे ४८७-८८).

आपल्याला अटक केल्याबद्दल गांधीजींनी सरकारला दोष दिला आणि पंजाबमध्ये आपल्या उपस्थितीमुळे तणाव निवळला असता असाही अभिप्राय दिला. तथापि अहमदाबादचे आंदोलन सरकारने ज्या संयमाने हाताळले त्याबद्दल त्यांनी सरकारचे कौतुक केले (१६, पृष्ठे ३९५-९७, ४८८). दुसरीकडे लोकांना त्यांची चूक दाखवून देण्याचे काम त्यांनी चालूच ठेवले. अहमदाबाद कराराच्या दुसऱ्या वाढदिवसाच्या प्रसंगी बोलताना त्यांनी आपल्या अटकेमुळे आणि अनसूयाबेनच्या अटकेच्या अफवेमुळे हिंसाचार माजवून कामगारांनी चूक केली असे स्पष्टपणे सांगितले. आजच्या पवित्र दिवशी गेल्या वर्षाच्या एप्रिलमधील चुका आठवाव्यात आणि त्या पुन्हा न करण्याची प्रतिज्ञा करावी, अशी कळकळीची विनंतीही गांधीजींनी केली (१७, पृष्ठ ३२४).

जालियनवाला बाग हत्याकांडानंतर केलेली भाषणे आणि लेखन यातून गांधीजींचा दृष्टिकोन अधिक ठसठशीतपणे व्यक्त झाला. अर्थात या कत्तलीमागचा घटनाक्रम अचूक स्पष्ट व्हावा आणि सरकारची त्यातील जबाबदारी निःसंशय सिद्ध व्हावी यासाठी गांधीजींनी भरपूर कष्ट घेतले. तरीही अगदी टोकाच्या वाटणाऱ्या या प्रसंगीही त्यांनी आपल्या लोकांच्या वागणुकीवर भर दिला. 'जालियनवाला बाग हत्याकांडाविषयी मला दुःख वाटते, त्यापेक्षाही अधिक दुःख आपण ब्रिटिश नागरिकांचे प्राण घेतले आणि मालमत्तेचा नाश केला याबद्दल वाटते (१७, पृष्ठ ४८९).

जालियनवाला बाग हत्याकांडानंतर गांधीजी अमृतसरला पोहोचले. त्यानंतरच्या पहिल्या सभेतील त्यांच्या भाषणाची सुरुवात अशी होती, 'अमृतसर हे निव्वळ माझ्यासाठी नव्हे तर प्रत्येक भारतीयासाठी तीर्थक्षेत्र बनले आहे. अमृतसरला आपल्या हाताने जे दुष्कृत्य आपण केले त्याची भरपाई कोणत्याही प्रायश्चित्ताने होणार नाही. आपले लोक जालियनवाला बागेमध्ये मोठ्या संख्येने मारले गेले ही गोष्ट तर खरीच; परंतु बागेत जमलेला प्रत्येकजण जरी ठार झाला असता तरीही आपण शांतता राखायला हवी होती. खुनाचा बदला खुनाने घेणे माझ्या मते योग्य नव्हे, तर कोणालाही वेदना देऊ नये अशी आपल्या धर्माची शिकवण आहे. (१६, पृष्ठ २८६)

जालियनवाला हत्याकांडानंतर सरकारने कमालीच्या क्रूरपणे दडपशाही चालविली असताना गांधीजींनी पंजाबचा दौरा केला. त्यांनी सभेमध्ये भाषणे केली तसेच नवजीवन पत्रासाठी पंजाबबाबत लेखनही केले. सरकारने या वेळी लष्करी कायदा जारी केलेला होता. तथापि सरकारच्या क्रूर वागणुकीबद्दल गांधीजींनी दोन-तीन वाक्यांपलिकडे फारसे लिहिले नाही. 'गुजराणवालामध्ये सरकारी अधिकाऱ्यांनी सूड घेण्यासाठी म्हणून कोणतेही निर्घृण कृत्य करावयाचे बाकी' ठेवलेले नाही. त्याचे वर्णन येथे करीत बसण्याची गरज नाही', लोकांच्या चुकांबाबत मात्र त्यांनी सविस्तर लिहिले (१६, पृष्ठ ३१६) (१७, पृष्ठे ३३०-३२-४६).

या घटनेनंतर काँग्रेसचे अधिवेशन अमृतसरमध्ये भरले. गांधीजींनी आपल्या

वाचकांसाठी त्याचा वृत्तांत लिहिला (१६, पृष्ठे ३७२-७६, ४६२-६८). आंदोलनकाळात जनतेने केलेल्या हिंसक प्रकारासाठी ठपका देणारा ठराव या अधिवेशनात संमत झाला. गांधीजीच्या मताप्रमाणे हा ठराव सगळ्यात महत्त्वाचा होता आणि इतर ठरावांचा तो पाया होता. हा ठराव मंजूर करायला काहीजणांनी खळखळ का केली हेच गांधीजींना समजले नाही. 'आपल्या चुका मान्य करणारा आणि त्यांचा धिक्कार करणारा ठराव सगळ्यात महत्त्वाचा होता. तो मंजूर करायला काहीजण का तयार नव्हते हे मला समजू शकले नाही. अहमदाबाद, विरमगाम, अमृतसर, गुजराणवाला, कासूरमध्ये आपल्या लोकांनी इमारती जाळल्या, खून पाडले, पूल नष्ट केले, आगगाडीचे रूळ उडवले आणि तारा कापल्या हे सिद्ध करायला पुराव्याची गरज नाही. सरकारच्या गुप्त पोलिसांनी जमावाला भडकवले, हिंसाचारात गुप्तचरांचा हात होता असे काही लोक म्हणतात. हे खरे असेलही; परंतु आपले लोक त्यांच्या जाळ्यात सापडले आणि त्यांनी अक्षम्य गुन्हे केले ही वस्तुस्थिती राहतेच. याचा आपण धिक्कार केला पाहिजे. आपल्या चुका नाकारणारे किंवा मान्य करायला घाबरणारे राष्ट्र किंवा व्यक्ती यांचा कधीच उत्कर्ष होत नाही. आपल्या भोवतीचे दुरित आपण नाकारतच राहिलो, तर त्याविरुद्ध लढण्याची ताकद आपल्या अंगी येणार नाही आणि दुरित आणखी खोल चरत जाईल. शिवाय आपण स्वतःच्या दोषांचा जोपर्यंत स्पष्टपणे धिक्कार करीत नाही, तोपर्यंत सरकारच्या चुका दाखवण्याचा आपल्याला काहीएक हक्क नाही. सरकारी इमारती जाळल्याचा पश्चात्ताप जोपर्यंत आपल्याला होत नाही तोवर आपली मने शुद्ध होणार नाहीत आणि तोवर जनरल डायरने केलेल्या भयानक गुन्ह्याचा धिक्कार करण्याचा हक्क आपल्याला मिळणार नाही. आपण आपल्या चुका मान्य करण्यात कमी पडलो, तर पंजाबचे गव्हर्नर सर मायकेल ओडवायर यांना काढून टाकावे आणि व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांना ब्रिटनला परत बोलवावे अशी मागणी आपण करू शकणार नाही' (१६, पृष्ठ ४६५).

आपल्या लोकांची वागणूक ही कमालीच्या प्रक्षोभक वर्तनाची प्रतिक्रिया होती हे समर्थन गांधीजींना बिलकूल पटले नाही. 'लोकांनी प्रक्षुब्ध व्हावे अशीच परिस्थिती होती हे लक्षात घ्यायला नको का असे काहीजण विचारतात. त्याचे उत्तर असे की, प्रक्षुब्ध परिस्थिती होती म्हणून इमारती जाळणे आणि निर्दोष व्यक्तींची हत्या अशासारखी गैरकृत्ये समर्थनीय ठरत नाहीत. कोणतेही कारण घडले तरीही जो भडकून उठत नाही तोच खरा कायदेपालन करणारा माणूस आणि शेवटी त्याचाच विजय होतो. कायदे कसे पाळावे हे ज्या राष्ट्राला कळत नाही त्याला अन्यायाविरुद्ध तक्रार करण्याचा काही अधिकार नाही. सरकारने मला अटक केली आणि लोक खवळले. पण पोलिस चौक्या जाळून टाकून त्यांच्या पदरात काय पडले? विद्यार्थ्यांच्या परीक्षांचा मांडव जाळून फायदा काय? उलट तोटा झालेला स्पष्ट दिसतो. आपल्याला दंड भरावा लागला, अनेकांना तुरुंगात जावे लागले आणि इतरांना यातना सहन कराव्या लागल्या' (१६, पृष्ठ ४६५).

याच्याही पुढे जाऊन गांधीजींनी दुर्दैवी घटनांची जबाबदारी अप्रत्यक्षरीत्या

लोकांवरच टाकली; '१० एप्रिलला आपण चूक केली नसती तर एव्हाना आंदोलनात पुष्कळ प्रगती केली असती आणि रौलट ॲक्ट रद्द झाला असता अशी माझी तरी खात्री पटली आहे. जवळजवळ हजार निर्दोष माणसे मारली गेली नसती आणि इतर माणसे तुरुंगात खितपत पडली नसती. कोणत्याही दृष्टिकोनातून पाहिले तरी निष्कर्ष असाच निघतो. आपल्या लोकांनी केलेल्या दंगली आणि हिंसा यांचा निषेध करणे हे आपले कर्तव्यच आहे. आपण अशी दुष्कृत्ये सहन करीत राहिलो तर उद्या पूर्ण स्वतंत्र झाल्यानंतर आपण जंगली असल्याचे दृश्य दिसेल' (१६, पृष्ठे ४६५-६६).

आज एखादा नेता अशा तऱ्हेने बोलण्याचे धाडस करणार नाही. एवढेच नव्हे तर या तऱ्हेची दृष्टीही कोणाकडे असणार नाही.

जालियनवाला बाग हत्याकांडाचा स्मृतिदिन आला तेव्हा गांधीजींनी सरकारकडे काहीही मागणी केली नाही किंवा सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध निषेधाच्या घोषणा द्या असे लोकांना सांगितले नाही. त्याऐवजी दहा लाख रुपये लोकवर्गणी जमवावी आणि त्या स्थळाचे रूपांतर राष्ट्रीय स्मारकामध्ये करावे असे गांधीजींनी सांगितले. जालियनवाला बाग ही प्रत्यक्षात बाग नव्हतीच, तर सुमारे चाळीस जणांच्या संयुक्त मालकीची बखळवजा जागा होती (१६, पृष्ठे ३५४-५५). लोकांच्या आजच्या उदासीनतेचे ज्यांना दुःख होते त्यांनी जागेच्या मालकांनी पैशासाठी कशी हावरटपणे सौदेबाजी केली ते जरूर वाचावे (१७, पृष्ठ २३). राष्ट्रीय स्मारकाद्वारे सरकारच्या क्रौर्याचे नव्हे तर निःपाप माणसांच्या त्यागाचे स्मरण करावयाचे होते (१७, पृष्ठे २४,२८, ३८, १०४). लोकांनी उपवास आणि प्रार्थना करावी, द्वेष आणि संताप सोडून द्यावा आणि या गोष्टी स्मारकाच्या बांधकामापेक्षा जास्त महत्त्वाच्या मानाव्यात, असे गांधीजींनी सांगितले. (१७, पृष्ठे १०४, २९८) आपण केलेली अतिरेकी कृत्ये आठवून लोकांनी पश्चात्ताप करावा, सत्याग्रहाची तत्त्वे आपल्या जीवनात प्रत्यक्षात आणावीत, हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि स्वदेशीवर भर द्यावा आणि खिलापतीसाठी हिंदू व मुस्लिम यांच्या संयुक्त सभा घ्याव्यात, असे गांधीजींनी सांगितले (१७, पृष्ठे ७७-७९).

## ओघात येणारे निष्कर्ष

कोणतेही आंदोलन गंभीरपणाने विचार करूनच सुरू केले पाहिजे आणि त्याचा केंद्रबिंदू स्वतःची वागणूक हा असला पाहिजे, लोकांची वागणूक हा नव्हे, हे आंदोलनातील सहकाऱ्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी गांधीजी त्यांना सुरुवातीलाच एखादी प्रतिज्ञा करायला लावीत. त्यात सोप्या शब्दांत आंदोलनाची उद्दिष्टे, ती साध्य करण्यासाठी काय करावयाचे आणि काय करावयाचे नाही याचे निवेदन असे. खेडा सत्याग्रहापूर्वी गांधीजींनी गावकऱ्यांना घ्यायला लावलेली शपथ पाहा. 'आमच्या गावात यंदा चार आण्यापेक्षा कमी पीक आले. त्यामुळे सारावसुली पुढील वर्षापर्यंत पुढे ढकलावी अशी विनंती सरकारला केली. परंतु सरकारने ती मानली नाही. सह्या करणारे आम्ही सर्वजण गांभीर्यपूर्वक जाहीर करतो की, या वर्षीचा शेतसारा आम्ही पूर्ण किंवा अंशतःसुद्धा सरकारला भरणार नाही.

सारावसुलीसाठी कोणती कायदेशीर कारवाई करावयाची याचा निर्णय आम्ही सरकारवर सोडला आहे आणि त्यातून ज्या हालअपेष्टा येतील त्या आम्ही सोसू. सरकारला हवे तर आमच्या जमिनी जप्त कराव्यात. आता यापुढे आम्ही आपणहून सारा भरला तर आम्ही खोटारडे ठरू आणि आमचा स्वाभिमान गमावून बसू. आम्ही तसे करणार नाही. ज्या गावात महसुलाची थकबाकी आहे तेथे ती पुढे ढकलण्याची तयारी दाखविली तरी आमच्यापैकी ज्यांना परवडत असेल ते आताही शेतसारा पूर्णपणे किंवा अंशतः भरतील. एरवी आमच्यापैकी सधन व्यक्तीही सारा भरणार नाही. कारण त्यांनी भरला तर बाकीच्या गरिबांनाही भीतीपोटी गुरेढोरे विकून किंवा कर्ज घेऊन भरावा लागेल आणि त्यांची ससेहोलपट होईल. अशा दुर्दशेपासून गरिबांचा बचाव करणे, धनिकांचे कर्तव्य आहे हे असेच आम्ही मानतो (१४, पृष्ठ २७९).

याखेरीज रौलट ॲक्ट आंदोलनाची प्रतिज्ञा, (१५ पृष्ठे १०१-०२), स्वदेशीची शपथ (१५, पृष्ठे १९८, ३०५-०८), हिंदू-मुस्लिम ऐक्याची प्रतिज्ञा (१५, पृष्ठ २०३) यासुद्धा उदाहरणादाखल वाचण्यासारख्या आहेत.

प्रत्येक भावी सत्याग्रह्याला आपल्या प्रतिज्ञेचा अर्थ नि परिणाम गांधीजींनी अतिशय काळजीपूर्वक समजावून सांगितले. त्यातून कोणकोणती संकटे अंगावर येतात, यावर ते भर देत. अशा वेळी ते अत्यंत सडेतोडपणे आणि सत्याग्रहाच्या पावित्र्याशी कोणतीही तडजोड न करता बोलत. त्याचे उदाहरण म्हणजे दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या प्रारंभी तेथील भारतीयांसमोर गांधीजींनी केलेले भाषण (दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह, पृष्ठे ९७-१००). कोणतीही प्रतिज्ञा संतापाच्या भरात किंवा वरवरच्या उत्साहाने घेऊ नये असा गांधीजींचा आग्रह असे. शांतपणे आणि सखोल विचार करून मगच प्रतिज्ञा घ्यावी, यासाठी प्रतिज्ञेचा संभाव्य परिणाम गांधीजी पुन्हा पुन्हा समजावून सांगत. आजचे आपले पुढारी ज्या पद्धतीने आंदोलन उभे करतात तिच्यापेक्षा गांधीजींची ही पद्धत फार निराळी होती. आजचे पुढारी कामगार संघटनेचे आंदोलन किंवा इतर चळवळी सुरू करताना त्यातील अडचणी आणि संकटे फारशी सांगतच नाहीत. लोकांची दिशाभूल करून त्यांना चळवळीच्या सापळ्यात अडकवतात आणि मग त्यांनी त्यातून निसटून जाऊ नये यासाठी त्यांचा उरला-सुरला अहंकार चेतवीत जातात; "आता तुम्ही कोणत्या तोंडाने परत जाणार?"

गांधीजींच्या दृष्टीने ही प्रतिज्ञेची गरज निव्वळ चळवळी यशस्वी करण्यापुरती नसे. लोककल्याण साधण्यासाठी अत्यावश्यक अशी स्वयंशिस्त अंगी बाणविण्यासाठी प्रतिज्ञेची गरज होती. त्यामुळेच अनेकदा सरकारकडे किंवा गिरणी मालकाकडे केलेल्या मागण्यांबाबत गांधीजी तडजोड करीत. परंतु स्वतःकडे किंवा चळवळीतल्या सहकाऱ्यांकडे केलेल्या मागण्यांबाबत एक पाऊलसुद्धा मागे घेत नसत. घेतलेल्या प्रतिज्ञांप्रमाणेच सत्याग्रह्यांची वागणूक असली पाहिजे याचा आग्रह प्रसंगी ते कमालीच्या गंभीरपणाने धरीत. यातल्या व सद्यःस्थितीतल्या विरोधाभासाची उदाहरणे पानेच्या पाने भरून देता येतील. आपल्या कार्यपद्धतीपेक्षा हे खरोखरच किती वेगळे आहे!

आज आपण आचारसंहितेला काडीइतके महत्त्व देत नाही, महत्त्व देतो ते फक्त सरकारकडे केलेल्या मागण्यांपैकी काहीना काही पदरात पडले पाहिजे याला.

एकदा तडजोड नि करार होताक्षणीच त्यातून आपल्याला मिळणारे फायदे खेचून घेण्याबाबत आपण केवढी धावपळ करतो! त्या बदल्यात आपण काय द्यावयाचे आहे याची मुळीच फिकीर करीत नाही. गांधीजींचा रस्ता नेहमी याच्या उलट होता. करार होताक्षणीच त्यातील आपले कर्तव्य सत्याग्रह्याने पूर्ण करावे, अशी तळमळ त्यांना लागत असे. दुसऱ्या बाजूने आपले कर्तव्य पुरे केले की नाही याची पर्वा ते करीत नसत. खेडा आंदोलनात जप्त केलेल्या जमिनी प्रशासनाने परत दिल्या आणि ज्यांना शेतसारा शक्य असेल त्यांनी भरावा, इतरांना मुदतवाढ मिळेल असे जाहीर केले. त्याप्रमाणे सधन शेतकऱ्यांनी सारा तावडतोब भरावा असा आग्रह गांधीजींनी धरला (१४, पृष्ठे ४१४-१५). जे सारा भरू शकणार नाहीत त्यांची यादी तयार करताना आपली कसोटी इतक्या कठोरपणाने लावा की, आपल्या निष्कर्षांना आव्हान देणे कोणालाही शक्य होऊ नये, असेही गांधीजींनी सांगितले (१४, पृष्ठ ४१८). अहमदाबाद करार झाल्याबरोबर कामगारांनी गिरण्यात कामाला परत जावे आणि आपल्या कर्तव्यदक्षतेने मालकांचे समाधान करावे असाच आग्रह गांधीजींनी धरला (१७, पृष्ठे ४४८-५२).

सत्याग्रहात सहभागी होणाऱ्या सर्वसामान्यांकडून गांधीजींच्या विशेष अपेक्षा असायच्याच; परंतु आपण स्वतः आणि आपल्या निकटच्या सहकाऱ्यांकडून ते अतिशय कठोर आणि उच्च दर्जाच्या अपेक्षा करीत असत. त्यांच्या मते, त्याग करण्यात आणि हालअपेष्टा सोसण्यात जो आघाडीवर असतो तो खरा नेता. दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रह केला तेव्हाही आपल्या पाच हजार अनुयायांबरोबर गांधीजी अर्धपोटी राहिले. इतरांबरोबर मिळेल ती अर्धी भाकरी आपण खाऊ आणि त्यांच्याबरोबरच तुरुंगात जाऊ असा निर्धार त्यांनी केला (दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह , पृष्ठ २६७). अस्पृश्यतेचे पाप समूळ नाहीसे करा असे इतरांना शिकवून गांधीजी थांबले नाहीत. हरिजनांसोबत ते राहिले, त्यांना त्यांनी स्पर्श केला आणि स्वतःही भंगीकाम करायला सुरुवात केली. सरकारकडे नोंदणी न करता ‘सत्याग्रही’ हे वृत्तपत्र त्यांनी सुरू केले, निर्भयपणे ते स्वतःच्या नावानिशी प्रकाशित केले आणि स्वतःच त्याची एक प्रत पोलिस आयुक्तांना पाठविली (१५, पृष्ठ १९०). रौलट कायद्याविरुद्धचा सत्याग्रह पुन्हा सुरू करण्याची वेळ आली तेव्हा आपण एकटे कायदेभंग करणार असे गांधीजींनी जाहीर केले आणि स्वतःच व्हाइसरॉय आणि मुंबई प्रांताचे गव्हर्नर यांना तसे कळविले.

अहमदाबादच्या संपाची सुरुवात करताना गांधीजींनी आणि त्यांच्या जवळच्या सहकाऱ्यांनी आपणहून प्रतिज्ञा केली; ‘या संघर्षात सहभागी असलेल्यांना पर्यायी काम मिळाले नाही आणि त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली तर आम्ही त्यांना अन्न-वस्त्र पुरवून मगच स्वतः अन्नग्रहण करू’ (१४, पृष्ठ २२७).

याच संपाच्या काळात संपकरी कामगार आपला शब्द मोडणार, असे चिन्ह दिसू लागले. त्यांच्यापैकी अनेकांना पोटभर अन्न मिळत नव्हते आणि तरीही,

शरीरकष्टाचे काम खालच्या दर्जाचे म्हणून ते करण्याची त्यांची तयारी नव्हती. आपणहून विचारपूर्वक घेतलेली प्रतिज्ञा दहा हजार कामगार मोडणार, हे दृष्य आपल्याला पाहवणार नाही असे जाहीर करून गांधीजींनी एकीकडे स्वतःच शरीरकष्टाला हात घातला तर दुसरीकडे उपवास सुरू केला. कामगारांनी आपली शपथ एकतर पाळावी किंवा उघडपणे मोडल्याचे जाहीर करावे, तोपर्यंत उपवास चालू राहील असे गांधीजींनी सांगितले (१४, पृष्ठे ३५८-५९, २६१-६३, २८५-८६).

## इतर वैशिष्ट्ये

मागण्या मांडण्याची गांधीजींची पद्धत आणि आपली पद्धत यात इतरत्रही अनेक बाबतीत फरक आहे. ते प्रसंगी अगदी नेमस्तांचीही नाराजी पत्करून किमान आवश्यक तेवढ्याच मागण्या मांडत असत. मात्र एकदा मागण्या मांडल्यानंतर, आंदोलनाचा जोर कमी होतो असे पाहून मग मागण्या कमी करावयाच्या किंवा सौम्य करावयाच्या असा प्रकार गांधीजी करीत नसत. त्याचबरोबर एखादे आंदोलन यशस्वी होत आहे म्हणून किंवा जास्त अनुयायी मिळावेत यासाठी त्यांनी मागण्यांमध्ये वाढही केली नाही. खिलाफत चळवळीला पंजाबविषयीच्या मागण्या जोडायला त्यांनी नकार दिला होता. एक मागणी वाढवायला त्यांनी तयारी दाखविली ती म्हणजे आंदोलन सुरू झाल्यानंतर ते चिरडून टाकण्यासाठी सरकारने उचललेली पावले मागे घ्यावीत (द. आफ्रिकेतील सत्याग्रह, पृष्ठे १९१-९२, २४७).

आणखी एक फरक म्हणजे आपल्या मागण्या निव्वळ घोषणावजा असतात, तर गांधीजी आपल्या मागण्यांचा तपशील बारकाईने अभ्यास करून ठरवीत असत. होणारी अडचण किंवा अन्याय आणि त्यावरचा उपाय किंवा पर्याय हे दोन्हीही तपशिलाने पुराव्यानिशी मांडण्याची गांधीजींची पद्धत होती.

चंपारनला पोहोचल्यापासून एका महिन्यात तब्बल चार हजार शेतकऱ्यांची निवेदने गांधीजींनी नोंदवून घेतली. दीड महिन्यात निवेदनांची संख्या सात हजारांवर गेली- (१३, पृष्ठे ३८५-९०, ४२४). शेतकऱ्यांची ही समस्या त्यांनी किती प्रयत्न करून अभ्यासली होती याचे दर्शन चौकशी समितीच्या कार्यवृत्तातून घडेल. खेडा सत्याग्रह सुरू करण्यापूर्वी गांधीजींनी स्वतः पन्नास गावांना भेटी दिल्या, भरपूर गावकऱ्यांशी चर्चा केली. एकूण चारशे गावांतील पिकांच्या स्थितीची सखोल माहिती घेतल्यानंतरच त्यांनी, 'चार आणेसुद्धा पीक हाती आले नाही,' हा निष्कर्ष काढला. (१४, पृष्ठे २८१, २८९) पंजाबमध्ये लष्करी कायद्याची पकड बसली आणि लोकांवर जुलूम होऊ लागला, तेव्हा वृत्तपत्रांसाठी एखादे पत्रक काढून गांधीजी थांबले नाहीत. अन्याय्य अटक झालेली प्रकरणे त्यांनी तपशिलाने तपासली. आरोपपत्र, बचावाचे पुरावे, सरकारी हुकूमनामे ही कागदपत्रे त्यांनी अक्षरशः विंचरून काढली. खंड १५ आणि १६ मध्ये यांतील हवी तेवढी उदाहरणे सापडतील.

जालियनवाला बाग प्रकरणानंतर निव्वळ निषेधाचे पत्रक काढण्यावर न थांबता गांधीजींनी पंजाबचा विस्तृत दौरा केला आणि जालियनवाला बाग गोळीबार तसेच लष्करी कायद्यान्वये चाललेली दडपशाही यांचा पुरावा गोळा केला. सतराशे साक्षीदारांची

निवेदने तपासण्यात आली. त्यांपैकी सहाशेपन्नास प्रसिद्धीसाठी निवडली गेली. पुरावा स्वीकारताना कमालीची दक्षता घेण्यात आली. साक्षीदारांच्या खरेपणाबद्दल खात्री पटल्यानंतरच त्यांची निवेदने स्वीकारली जात असत. त्यासाठी त्याला प्रश्न विचारून खात्री करून घेतली गेली. असे निवेदन देण्याचे कोणते परिणाम होण्याची शक्यता आहे याची स्पष्ट कल्पना प्रत्येक साक्षीदाराला दिली गेली. निवेदनात दिलेले आरोप खोटे किंवा अतिशयोक्त असल्यास त्यातून कोणते नुकसान होण्याची शक्यता आहे हेही सर्वांना समजावून सांगून त्यानंतरही जो आपल्या निवेदनाला चिकटून राहील त्याचेच निवेदन स्वीकारण्यात आले. काही वेळा साक्षीदारांवर विश्वास ठेवावा असे वाटे, परंतु त्यांच्या निवेदनातील विधानांना फारसा आधार उपलब्ध होत नसे, अशी निवेदने नाकारण्यात आली. बहुसंख्य गावांत जाहीर सभा घेऊन लोकांना निवेदने आणि पुरावे देण्यास पुढे येण्याचे आवाहन केले गेले. प्रत्येक सभेत त्याआधी जमा झालेल्या पुराव्यांची माहिती दिली गेली आणि त्यातील काही भागाला आव्हान द्यायचे असल्यास पुढे यावे असेही सांगितले गेले. त्यासाठी गुप्त निवेदन स्वीकारण्याचीही तयारी दाखविली. अर्थात अशा तऱ्हेची विसंगतिदर्शक निवेदने आली नाहीत (१७, पृष्ठे ३९-४०).

भरपूर पुरावे जमवून अभ्यासल्यानंतर गांधीजींनी स्वतःच काँग्रेस रिपोर्ट ऑन पंजाब डिसऑर्डर्स हा अहवाल लिहून काढला. या विस्तृत आणि समग्र अहवालाच्या पहिल्या खंडात निष्कर्ष आणि दुसऱ्या खंडात पुरावा दिलेला होता. पहिला खंड सुमारे १७५ छापील पृष्ठांचा आहे. कायदेपंडित एम. आर. जयकरांच्या मदतीने गांधीजींनी थकव्याची पर्वा न करता परिश्रम केले आणि शब्दन् शब्द स्वतः लिहून काढला. आजच्या आपल्या पुढाऱ्यांपैकी एकाकडे तरी असे अहवाल लिहिण्याची क्षमता आहे का हाच प्रश्न आहे. पण इतका समग्र, विस्तृत अहवाल शास्त्रशुद्ध पद्धतीने तयार करून घ्यावा हे तरी आजच्या पुढाऱ्यांपैकी कोणाला सुचेल का? पंजाबच्या प्रश्नावर सरकारने श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी अशी मागणी प्रत्येकाने केली होती. स्वतःच अभ्यास करून लिहिण्याची तयारी कितीजणांनी दाखविली?

शिवाय एकीकडे सरकारकडून स्वतंत्र पत्रकाची मागणी करताना हेच लोक दुसरीकडे सरकारच्या शब्दावर आमचा विश्वास नाही असेही जाहीर करून मोकळे झाले. आसामबाबत बोलणाऱ्या किती नेत्यांनी नागरिकत्व आणि निवडणूक याविषयीच्या कायद्यांचा अभ्यास केला आहे? तेथील लोकसंख्येविषयीची आकडेवारी आणि न्यायालयाचा निर्णय यांच्या अभ्यासासाठी आपला मोलाचा वेळ कितीजणांनी खर्च केला? माझ्या मताप्रमाणे एवढा खटाटोप फक्त दोघाजणांनी केला आणि तेसुद्धा त्यांच्या पक्षाचे प्रमुख राष्ट्रीय नेते नव्हेत.

## सर्वांत महत्त्वाचे अनुमान

तथापि गांधीजींच्या आणि आपल्या मार्गामधील मुख्य फरक आहे तो बांधिलकीच्या आशयामध्ये. आपण मागण्या करतो त्या दुसऱ्याकडे आणि एखादी भूमिका किंवा एखादी चळवळ यांची बांधिलकी आपण पत्करतो तेव्हाही ती बांधिलकी उघड तेवढ्यापुरतीच असते. किंबहुना अनेकदा त्या भूमिकेच्या आणि संघर्षाच्या विजयातून

काही फायदे मिळण्याची शक्यता असते, त्यांच्याशी आपली खरी बांधिलकी असते. गांधीजींच्या कार्यपद्धतीत एखाद्या कामाशी किंवा तत्त्वाशी बांधिलकी म्हणजे त्यातून जी संकटे आणि हालअपेष्टा ओढवतील त्या सर्वांशी एकनिष्ठ, बांधील राहणे.

आपण अशा परिणामांबाबत कण्हतो, कुरकूर करतो, तक्रार करतो. गांधीजींच्या मार्गात मागणी स्वत:कडे केलेली असल्याने तक्रार करायला, स्वत:ची कीव करायला जागाच नसते. गांधीजी ठामपणे सांगत आले की, दुसरी बाजू (मग तो राज्यकर्ता असो की, गिरणीमालक) जे करतो ते त्याच्या दृष्टीने स्वाभाविक असते. आपले काम त्याचे होणारे परिणाम आनंदाने सहन करण्याचे असते.

त्यामुळेच अहमदाबादच्या संपाच्या काळात मजुरांसाठी निधी गोळा करण्याची गरज नाही, असा सल्ला गांधीजींनी दिला. खेडा सत्याग्रहात सरकारने शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त करून लिलाव सुरू केले, त्या वेळी प्रत्येक बैठकीत, हे संकट शांतपणे सहन करण्याचा सल्ला गांधीजी शेतकऱ्यांना देत (१४, पृष्ठे ३०३, ३०५, ३११, ३१४, ३२५). जप्ती आणि लिलाव टाळण्यासाठी शेतसारा भरून टाकण्याची तयारी काही धनवान मंडळींनी दाखविली. शेतकऱ्यांनी अशी मदत नाकारावी आणि परिणाम सहन करण्याचा आपला शब्द पाळावा असे गांधीजींनी सांगितले (१५ पृष्ठे ३०४, ३११). शेतकऱ्यांच्या बायकांनी आपल्या नवऱ्यांना हे परिणाम आनंदाने सहन करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे असेही गांधीजी सांगत; 'तुम्ही लग्न केले ते तुमच्या नवऱ्याशी. त्याच्याकडच्या दागिन्यांशी किंवा गाईगुरांशी नव्हे. आपल्या पतीला प्रतिज्ञा पाळण्यासाठी मदत करणे हा तुमचा धर्म आहे.' (१४, पृष्ठे ३०३, ३२८, ३५४, ३५७). जमिनींच्या जप्तीची कारवाई नायका गावात प्रत्यक्ष सुरू झाली तेव्हाही सरकारच्या या जुलमाचा निषेध करणारे पत्रक गांधींनी काढले नाही. त्यांनी शेतकऱ्यांची कीवही केली नाही. उलट त्यांचे अभिनंदन केले; 'तुमच्यापैकी पंचवीस जणांच्या जमिनी जप्त करण्यात आल्याचे मी आता ऐकले. हे खरे असेल तर आघाडीवर राहिल्याबद्दल तुमचे अभिनंदन. जमिनीची जप्ती ही कागदावर राहील, असा मला विश्वास वाटतो. तथापि सर्व तऱ्हेच्या हालअपेष्टा भोगण्याची शपथ तुम्ही घेतली असल्याने मी तुमचे सांत्वन करण्याची गरज नाही. मी तुमचे फक्त अभिनंदन करतो.'

अशा प्रकरणात न्यायालयात शेतकऱ्यांनी बचाव करू नये, खटले लढवू नयेत असा निर्णयही गांधीजींनी दिला. सत्याग्रह्याने या निमित्ताने न्यायालयात फक्त वस्तुस्थितीचे निवेदन द्यावे, शिक्षा झाली, तर त्याविरुद्ध अपील करू नये आणि अटक झाल्यास सुटकेची मागणी करू नये असा दंडकही गांधीजींनी घालून दिला (१५, पृष्ठे २१३-१४, २५५, २६२-६३, ४१५; खंड १७, पृष्ठ ६६). एकामागोमाग एक अशी प्रकरणे समोर आली, तरी गांधीजींनी आपल्या भूमिकेपासून माघार घेतली नाही. आचार्य कृपलानी यांच्याबाबत काकासाहेब कालेलकर यांना लिहिलेल्या पत्रात गांधीजी म्हणतात, 'आरोपी एकतर दोषी असतो किंवा निर्दोष. तो दोषी असेल तर त्याने प्रायश्चित्त म्हणून तुरुंगात जावे. निर्दोष असेल तर न्यायाधीशाला धडा देण्यासाठी तुरुंगात जावे. प्रत्येक निर्दोष आरोपी आपल्या निर्दोषित्वाची जाहीर

ग्वाही देऊन तुरुंगात जाऊ लागला तर अखेरीस अशी परिस्थिती निर्माण होईल की एकाही निर्दोषी माणसाला तुरुंगात जावे लागणार नाही' (१४, पृष्ठ १७२).

'सरकारला जे संशयित वाटतात त्यांना पकडण्याचा हक्क आहे. शिवाय आपल्या चळवळीत सदसद्विवेकबुद्धीस अनुसरून निरपराध असताना तुरुंगात जाणे हे आपण योग्य आणि आवश्यक मानतो. त्यामुळे सत्याग्रहात अटक झाल्यानंतर आपण का म्हणून रागवावे? निरपराध्यांना जितक्या लवकर अटक होईल, तितक्या लवकर हा लढा संपेल, हे आपण लक्षात ठेवायला हवे.' (१५, पृष्ठ २५५). 'लोकांनी खटलेबाजी टाळावी अशी माझी फार इच्छा आहे. तुमच्या विरोधकांशी चटकन सहमत व्हा' ही कायद्याच्या क्षेत्रातील एक म्हण अतिशय रास्त आहे. अर्थपूर्ण आहे. आता यावर दुसऱ्याने आपली कृती कोर्टात तयार करावयाची आहे असा प्रश्न विचारला जाईल, सत्याग्रहात असे नेहमीच होते. अशा वेळी स्वतःचा बचाव करू नका असे मी म्हणेन. निरपराधी असूनही न्यायालयाने तुम्हाला शिक्षा दिली तर असा अन्यायी तुरुंगवास तुमच्या निष्पापत्वाची खात्री तुमच्या मनाला समाधान देत राहील. बचाव न केल्याने शिक्षेची तीव्रता कमी राहते आणि आपले बहुसंख्य देशबांधव स्वतःचा बचाव कधीच करू शकत नाहीत. त्यांच्याशी एकरूप झाल्याचे समाधान तुम्हाला मिळते' (१५, पृष्ठ ४७३).

दुर्गादास अडवानी यांचे वर्णन गांधीजींनी 'मला भेटलेल्यांपैकी एक उत्कृष्ट कार्यकर्ता' असे केले होते. त्यांना अटक झाली आणि अन्याय्य पद्धतीने शिक्षा ठोठावण्यात आली. तरीही गांधीजींचे चित्त विचलीत झाले नाही. 'एक मित्र म्हणून आणि सत्याग्रही म्हणून दुर्गादास यांचे किंवा त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन मी बिलकूल करणार नाही. गुन्हा केला असेल तर न्यायालयात तशी कबुली द्यायला हवी आणि शिक्षा भोगायला हवी. आपण गुन्हेगार नसू आणि तरीही दोषी ठरवून शिक्षा ठोठावली, तरीही त्यात लाज वाटण्यासारखे काहीच नाही आणि तुरुंगवास खडतर असला तरी सत्याग्रह्याला त्याची भीती वाटण्याचे काही कारण नाही.

'संशय व भीतीचे वातावरण आणि सरकारी गुप्तचर खाते यातून सुटका करून घेण्याचा सगळ्यात चांगला आणि सोपा मार्ग म्हणजे फाजील भित्रेपणा आणि सर्व प्रकारच्या हिंसा यांतून संपूर्ण देशाला मुक्त करणे; पण असा मुक्ततेचा दिवस उजाडेपर्यंत तरी मोजक्या संख्येने असलेल्या सत्याग्रहींनी तुरुंग हे आपले दुसरे घर मानण्याची तयारी ठेवली पाहिजे.

'त्या वेळी दुर्गादास यांचे मित्र त्यांना किंवा त्यांच्या पत्नीला माफीचा अर्ज करण्याचा सल्ला देणार नाही, अशी आशी मी बाळगतो. या मित्रांनी दुर्गादास यांच्या पत्नीला सहानुभूती दाखवून त्यांच्या दुःखात भर टाकू नये. त्याउलट त्यांनी आपली मने कठोर करावी आणि आपला पती कोणताही अपराध केलेला नसतानाही तुरुंगात आहे याची नाराजी बाळगू नये असा सल्ला आपण दिला, द्यायला हवा' (१६, पृष्ठ ३२७).

लष्करी कायद्याखाली कामकऱ्यांना खास न्यायालयाने दिलेल्या शिक्षेविरुद्ध

प्रिव्ही कौन्सिलकडे अपिले करण्यात आली होती. ती फेटाळली गेली, तेव्हाही गांधीजींचा सल्ला असाच होता; 'माझ्या पंजाबी मित्रांनी धीर सोडू नये, असे माझे त्यांना आग्रहाचे सांगणे आहे. वाइटात वाईट तेच घडेल यासाठी आपण आपल्या मनाची तयारी ठेवली पाहिजे. ज्यांना शिक्षा झाली त्यांनी खरोखरच खून, किंवा खुनाला चिथावणी यासारखे कृत्य केले असेल तर त्यांची शिक्षेतून सुटका का व्हावी? त्यापैकी बव्हंशी लोकांनी असे खून केले नाहीत, अशी माझी खात्री आहे. हे खरे असेल तर सर्वसामान्यांपासून एखादे पाऊल उंच टाकणाऱ्या प्रत्येकाला जे भोग भोगावे लागतात त्यातून सुटण्याचा प्रयत्न कशासाठी? स्वार्थी वृत्तीमुळे आपण इतके नीच होणार असाल तर त्याची भीती कशासाठी? त्यागाशिवाय कोणतेही राष्ट्र वर येत नाही आणि त्यागाचा आधार निष्पाप हाच असू शकतो, गुन्हेगार हा नव्हे' (१५ पृष्ठ, ६६).

गांधीजींची ही कर्तव्यकठोर शिकवण कुणीकडे आणि वाट्याला येतील त्या परिणामाबद्दल रडत-भेकत बसण्याची वृत्ती कुणीकडे! तत्त्वासाठी एखादी भूमिका घेतल्यानंतर आपली बदली झाली तरी तेवढे किरकोळ संकटसुद्धा आपण धैर्याने सोसू शकत नाही! गांधीजी या मार्गावर टिकून राहू शकले, कारण या गोष्टी त्यांनी निव्वळ फायद्या-तोट्याच्या पलिकडे नेल्या. त्यांनी त्या आपल्या व्यक्तित्वात आत्मसात केल्या, आपल्या सत्त्वाचा एक अंश बनविल्या आणि तरीही त्यांनी केलेल्या या मार्गाच्या निवडीमागे काही विचार होताच, कारणे होतीच. गांधीजींच्या असे लक्षात आले की, आपल्या लोकांना एखादे ध्येय हवेसे वाटते. ते काहीसे गूढ, संदिग्ध असेल तरीही चालेल; मात्र त्यासाठी स्वार्थत्याग करण्याची त्यांची तयारी नसते. फार काय, जीव तोडून प्रयत्न करायलाही ते तयार नसतात. 'आपल्याला पूर्ण स्वातंत्र्य हवे,' गांधीजी म्हणत, 'पण एक जीव न गमावता. शक्यतो एकाही पैशाचा त्याग न करता ते मिळाले तरी हवेच आहे!' (१७, पृष्ठ ४९४).

हे लक्षात घेऊन गांधीजींनी आपली शिकवण हालअपेष्टा आणि त्यागासाठी तयार राहा, अशी ठेवली. त्याशिवाय कोणताही देश मोठा झालेला नाही आणि होऊ शकत नाही. त्यामुळे आपण स्वयंस्फूर्तीने आणि हसतमुखाने कष्ट सोसायला तयार असले पाहिजे. आपल्या सहकाऱ्यांनी कष्ट भोगण्यात वाटा उचलावा अशी अपेक्षा ठेवता कामा नये, (१७, पृष्ठे ४७[illegible], ४८८/९०, ४९३). याच कारणासाठी अस्पृश्यता निवारणासारख्या ज्या विशिष्ट मोहिमा गांधीजींनी हाती घेतल्या त्यांचीही व्यापक उद्दिष्टे सामाजिक जाणीव वाढावी, स्वयंशिस्त अंगी बाणावी अशा तऱ्हेची होती. अशा चळवळी करताना समाजात जी जागृती आणि एकजूट निर्माण होईल त्याचा उपयोग शेवटी स्वराज्य मिळविण्यासाठी होईल, अशी गांधीजींची धारणा होती. अस्पृश्यता निवारणाच्या त्यांच्या कार्यक्रमाविषयी प्रश्न निघाला. त्याला त्यांनी दिलेले उत्तर पाहा, 'दलितांच्या प्रश्नामुळे भारताची अधोगती झाली आहे. या संदर्भात एका भगिनीने प्रश्न विचारला की, निव्वळ दलितांवरून अस्पृश्यतेचा शिक्का पुसून टाकल्यामुळे भारताची प्रगती होणार आहे का? यावर काही चांगले

निष्पन्न होईल याची मला खात्री वाटते. कारण अस्पृश्यतेचे पाप धुऊन काढण्यासाठी जी ताकद आपल्याला मिळवावी लागली तीच आपल्या इतर दोषांचा नायनाट करण्यासाठी कामी येईल. जोपर्यंत आपण अशा पापामध्ये रुतलेले राहू, तोपर्यंत आपले भवितव्य अंधारलेले राहील, अशी माझी खात्री आहे.' (१७ पृष्ठ ४०१).

चळवळीच्या प्रत्येक वळणावर कितीही प्रक्षोभक चिथावण्या सामोऱ्या आल्या तरी आपण मनाची शांतता आणि सद्भावना ढळू देता कामा नये, अशी शिकवण गांधीजींनी नेहमी दिली. आपला असंतोष सोडावॉटरप्रमाणे काही क्षणात फसफसून नाहीसा होऊन जाणारा नसावा. आता शांतता आणि सद्भावना ठेवायची तर प्रबळ इच्छाशक्ती हवी. मनावर आणि भावनांवर पूर्ण संयम हवा. थोडक्यात सांगावयाचे तर स्वयंशिस्त हवी. यासाठी जे प्रयत्न करावे लागतील त्यातून हळूहळू स्वातंत्र्याच्या अंतीम युद्धासाठी आपल्या अंगी गुण बाणत जातील आपण स्वतः आणि आपले निकटचे सहकारी यांच्याकडून कार्याची आणि त्यागाची अपेक्षा गांधीजी अतिशय कठोरपणाने करीत असत. हा त्यांचा आग्रहसुद्धा व्यावहारिक अनुभवातूनच आला होता. दक्षिण आफ्रिकेतल्या सत्याग्रहात हजारो सत्याग्रहींच्या ज्योती घेऊन गांधीजींनी चार्लसटाऊन या गावात प्रवेश केला. मूळच्या जेमतेम सहा हजार लोकवस्तीच्या या गावात एवढी भर पडल्यानंतर सर्व जागी स्वच्छतेचा आणि आरोग्याचा प्रश्न उभा राहणे स्वाभाविकच होते. याबाबतचा नियम पाळायला सर्वांना शिकविणे अवघडच होत. गांधीजी लिहितात, 'काही सत्याग्रही सहकाऱ्यांनी माझे काम सोपे केले. लोकसेवकाने लोकांना उपदेश करण्याऐवजी स्वतः सेवाकार्य केले तर त्यातून खूप काही साध्य होते, असा माझा अनुभव आहे. त्यांनी स्वतः शारीरिक परिश्रम केले, तर सामान्यजन त्यांचा कित्ता गिरवतात. त्यावरून मला तसा अनुभव आला. माझे सहकारी आणि मी भंगीकाम करायला लाजत नव्हतो. त्यामुळे इतर सहकाऱ्यांनीही त्यात उत्साहाने भाग घेतला.' (दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह, पृष्ठ ३६८).

कमालीच्या चाणाक्षपणे नेतृत्व करणारे गांधीजी पुढे लिहितात, 'अशी काही सहानुभवाची कार्यपद्धत नसली तर निव्वळ दुसऱ्याने हुकूम सोडून काहीही उपयोग होणार नाही. सगळेच पुढारी बनतील आणि दुसऱ्यांना धडा देतील. त्यातून शेवटी निष्पन्न काहीच होणार नाही. जेथे नेता स्वतः सेवक बनतो तेथे त्याच्या नेतृत्वाला आव्हान देणारे प्रतिस्पर्धी उभे राहू शकत नाहीत.' (दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह, पृष्ठ ३६८).

गांधीजी जनतेला प्रभावीपणे मार्गदर्शन करू शकले त्याचे कारण म्हणजे त्यांना मिळालेले विलक्षण नैतिक सामर्थ्य. आणि सामर्थ्यामागे कारण होते ते म्हणजे आपल्या अनुयायांकडून ज्या अपेक्षा त्यांनी केल्या त्यापेक्षाही अधिक कठोर अपेक्षा त्यांनी स्वतःकडून पूर्वीच केलेल्या होत्या. उपासमार झाली तरी प्रतिज्ञा मोडू नका, असे ते अहमदाबादच्या संपकरी कामगारांना सांगू शकले, कारण प्रतिज्ञा मोडण्यापेक्षा स्वतः उपोषण करून मरण्याची त्यांची स्वतःची तयारी होती (१४, पृष्ठे २५८-६१, २६२-६३, २८५-८६). ज्या सत्याग्रहींवर खटला भरण्यात

आला, त्यांना स्वत:चा बचाव न करण्याचा सल्ला गांधीजींनी दिला यामागे त्यांच्या स्वत:च्या वागणुकीचा आदर्श होता. ज्या अहमदाबाद खटल्यात त्यांना सरकारविरुद्ध असंतोष फैलावण्याच्या गुन्ह्यासाठी सहा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली त्या खटल्यातही त्यांचे वर्तन या आदर्शाला साजेल असेच होते. गांधीजींनी आपल्या कार्यासाठी सर्वस्व झोकून दिले, त्याग केला, त्यातूनच इतरांकडून त्यागाची अपेक्षा करण्याची शक्ती त्यांना मिळाली, याची शेकडो उदाहरणे देता येतील. गांधीजींनी लिहिलेले एक पत्र येथे दिले आहे. वाचल्यानंतर आश्चर्याने नि:स्तब्ध व्हावे असे हे पत्र आहे. गांधीजींच्या भगिनी रलियनबेन यांनी बहुधा गांधीजींकडे पत्र लिहून आर्थिक मदतीची मागणी केली असावी. जगणे अगदी कठीण झाले आहे आणि इतरांची दळणे दळून देऊन पैसे मिळवावे लागतात असे काही तरी लिहिलेले असावे. आपल्या बहिणीला गांधीजींनी दिलेले हे उत्तर.

साबरमती<br>
११ फेब्रुवारी, १९१८

प्रिय भगिनीस,

तुला मी नेहमी लिहीत नसलो तरी माझे मन घटकाभरही तुला विसरत नाही. तू माझ्याबरोबर नाहीस ही अगदी न भरून येणारी जखम आहे. ती तूच भरून काढू शकशील. तू माझ्या बरोबर असतीस तर तुला पाहून मला आईची आठवण काढता आली असती. तो आनंद तू माझ्यापासून हिरावून घेतला आहेस. माझी तुझ्याबद्दल नेहमीची तक्रार आहे. माझी बहीण माझ्या कार्यात सहभागी आहे, हे गौरवाने सांगण्याची संधी तू मला मिळवून देत नाही. मी पत्र लिहायचे म्हटले तर माझे हे दु:ख त्यातून पुन:पुन्हा व्यक्त होईल आणि तुला वाईट वाटेल. त्यामुळे मी लिहिणे टाळतो. आज वस्तूंच्या किमती भडकल्या आहेत हे मी जाणतो. पण मी तरी पैसे कोठून आणू? मला ते कोणत्या तरी मित्राकडून घ्यायला हवेत. कोणत्या तोंडाने मी ते मागायला जाऊ? तुमची बहीण तुमच्या जवळ का राहत नाही असे कुणीही म्हणेल, त्याला मी काय उत्तर देऊ? मी बिघडलो असे जग आज म्हणत नाही. तुला मात्र तसे वाटत असेल तर या स्थितीत एकच गोष्ट सांगता येईल. तुझ्यापेक्षा माझे राहणे जास्त आरामाचे मुळीच नाही. त्यामुळे तुझी अडचण असाध्य आहे असे मला वाटत नाही. दळण करून तुला पैसे मिळवावे लागतात याची मला बिलकूल लाज वाटत नाही. मी विनंती करतो की, तुझ्यात सहानुभूतीची भावना जागृत असेल तर माझ्याकडे येऊन राहा आणि माझ्या कामात भाग घे. तसे केलेस तर आपल्याला भाऊ नाही ही तुझी भावना दूर होईल, एवढेच नव्हे तर तुला अनेक भाऊ मिळतील, अनेक मुलांची तू आई बनशील. हा खरा वैष्णव धर्म आहे. तुला हे समजेपर्यंत आपली ताटातूट सहन करावीच लागणार. (१४, पृष्ठ १९०)

हा सारा युक्तिवाद चुकीचा आहे असे कोणी म्हणू शकेल. आपल्या अनुयायांनी दुसऱ्याऐवजी स्वतःची वागणूक सुधारण्याकडे लक्ष द्यावे आणि दुसऱ्याकडून अपेक्षा करण्याअगोदर स्वतःकडून करावी असा आग्रह गांधीजी धरू लागले, कारण त्यांच्यापाशी प्रचंड नैतिक सामर्थ्य होते. आज या गोष्टी सांगून उपयोग काय? या प्रश्नाचे उत्तर असे : गांधीजींकडे मुळातच नैतिक सामर्थ्य होते आणि म्हणून त्यांनी इतरांना रस्ता आखून दिला असा प्रकार घडलेला नाही. उलट तीन दशके स्वतःच्या तत्त्वाप्रमाणे स्वतःचे आचरण काटेकोरपणे ठेवल्यामुळे गांधीजींना विलक्षण नैतिक सामर्थ्य प्राप्त झाले होते.

# ३. आशेची कारणे

आजची अवस्था पाहिली की चीड येते, कमालीचा उदासवाणेपणा येतो आणि अखेरीस निराशावाद आपल्याला घेरतो. चीड येणे ही प्रक्रिया रास्त आहे; पण निराशावाद योग्य नाही.

आपण फार चटकन निराश होतो. परिस्थिती बिघडत चालली आहे हे आपण पाहतो. त्याबाबत अहोरात्र ओरड करतो, कोणीच लक्ष देत नाही. परिस्थिती आणखी बिघडते आणि मग आपण निराशेने खचून जातो. मग चुका दुरुस्त करणाऱ्या चळवळी उभ्या राहतात. १९७३-७४ मधील नवनिर्माण आंदोलन, बिहारमधील विद्यार्थ्यांची चळवळ, आसाममधील विद्यार्थी संघटनेचे आंदोलन. कालांतराने ह्या चळवळीही विरून जातात. ज्या दुरितांविरुद्ध त्या उभ्या राहिल्या ती मात्र शिल्लक राहतात आणि वाढतात. आपण पुन्हा निराश होतो. कण्हत म्हणतो, "आपल्याला एकत्र सांधण्यासाठी, रस्ता दाखविण्यासाठी एखादे गांधीजी असते तर?" पण असे कोणी गांधीजी आसपास नसतात. आपण पुकारले म्हणून कोणी गांधीजी निर्माण होत नसतात. मग पुन्हा निराशा दाटून येते. भोवतालच्या परिस्थितीबाबत, चळवळीबाबत आणि गांधीजींबाबत. मग एकूणच निराशा. पण खरे तर ही निराशा गैरसमजातून येत असते. ऱ्हास आणि पुनर्निर्माण यांचे स्वरूप. या प्रक्रियेत आंदोलकांचे योगदान आणि प्रक्रियेची गती वाढविण्यासाठी व्यक्तिशः धोरण या सगळ्याविषयीचा गैरसमज मनात असतो. व्यक्तिअहम् भावामुळेही निराशेत भर पडते. आपण आपल्या बडेजावात मश्गुल असतो. परिस्थितीचे मूल्यमापन अतिशयोक्तीने करतो आणि मग मनासारख्या गोष्टी घडत नाहीत म्हणून निराश होतो. आपण जे काही थोडेसे काम करीत असतो, ते आपल्याला फार महान वाटते आणि मग तेवढ्या ताकदीवर प्रतिकूल परिस्थितीची लाट परतवता येत नाही, ही जाणीव झाल्यानंतर निराशा येते. हा निराशावाद, हा हताशपणा म्हणजे येऊ घातलेल्या अपयशाचे आणि पळपुटेपणाचे आगाऊ तयार करून ठेवलेले समर्थनही असू शकते. हाती घेतलेल्या कामातून अंग काढून घेण्यासाठीही त्याचा उपयोग होतो. त्यामुळे सुरुवातीला गैरसमजातून आलेली निराशा ही पुढे आपली सवय बनते आणि शेवटी तर तेच आपले आश्रयस्थान बनते.

## ऱ्हास आणि पुनर्निर्माण

ऱ्हास आणि पुनर्निर्माणाच्या चक्राची दोन वैशिष्ट्ये दिसतात. दोन्ही परिस्थितीत

अंतीम निर्णयाचे परिणाम फार मोठ्या लोकसंख्येवर होत असतात. खूप लोकांच्या कामावर आणि मनोवस्थेवर हा परिणाम घडतो आणि दुसरे म्हणजे परिणाम घडून यायला दीर्घकाळ लागतो. एखादे बटन चटकन सुरू किंवा बंद करता येते तसे येथे होत नाही. हिमनदीच्या संथ प्रवाहासारखी ही प्रक्रिया असते. भारतासारख्या उपखंडात राजकीय आणि सामाजिक यंत्रणेचा ऱ्हास आणि पतन यांची सुरुवात ही यंत्रणा आतून कीड लागून पोखरली जाण्यामुळे होते. बाहेरून होणारा हल्ला हा निव्वळ शेवटचा घाव घालण्यापुरता असतो. मोगल साम्राज्याचे उदाहरण घ्या. भारताबाहेर पोपच्या धार्मिक साम्राज्याचे मध्ययुगात जे अध:पतन झाले होते ते आठवा. आपल्या आजच्या संसदीय यंत्रणेचीही अवस्था अशीच आहे. एखादी व्यवस्था किंवा यंत्रणा अशी आतून सडत-किडत जाते, तेव्हा तिचे उघड रूप दिसते, ते राज्यकर्त्यांच्या वाढत जाणाऱ्या बेकायदेशीर वागणुकीतून. मध्ययुगातील रोमन पोप्सचा अप्रामाणिकपणा आणि भ्रष्टाचार आपल्याकडील मोगल बादशहांच्या अखेरच्या काळातही दिसला आणि आजच्या काळात भजनलाल व जगन्नाथ मिश्रा अशांच्या वागण्यातही दिसतो. सत्तेवर येणारा प्रत्येकजण समोर एकच ध्येय ठेवतो. आपला फायदा करून घ्यायचा. स्वार्थासाठी जेवढी काही मोडतोड करता येईल तेवढी करायची. सगळ्यात जवळचा शेजारी हा त्यांचा सगळ्यात मोठा वैरी आणि त्याच्यावर तात्पुरता विजय मिळविण्यासाठी सैतानाचीही मदत घेण्यात कोणाला संकोच वाटत नाही.

निराद चौधरी यांनी क्लाईव्हचे चरित्र लिहिले आहे. त्यात दोन नमुनेदार ऐतिहासिक पत्रे उद्धृत केली आहेत. फ्रेंचांनी मद्रास जिंकले होते. तेथून त्यांचे उच्चाटन करण्याच्या प्रयत्नात कर्नाटकचा नबाब अन्वरउद्दीन खान हा होता. नोव्हेंबर १७४६ पर्यंत नबाब दोन लढाया हरला. हा नबाब ज्याचा मांडलिक होता तो निजाम उल्मुल्क याला खेद वाटण्याऐवजी फ्रेंच सेनापती डुप्लेचे अभिनंदन करावेसे वाटे. 'अन्वरउद्दीन खान याच्या मुलाने आपल्याविरुद्ध चालविलेल्या अन्याय्य युद्धाची हकीकत आपण लिहिली होती ती समजली. तुम्ही त्याला युद्धाची सुरुवात केल्याचा पश्चात्ताप करायला लावलात याचा आम्हाला आनंद वाटतो. यापेक्षा वेगळे काही घडेल असे मला वाटलेच नव्हते. आपले अभिनंदन. नबाब अन्वरउद्दीन खानाला लवकरच जबरदस्त धडा शिकावा लागेल याची मला कल्पना आहे.'

दुसरे अभिनंदनाचे पत्र नागपूरचा मराठा सरदार प्रभूजी भोसले यांनी लिहिले होते. 'मद्रास शहर पडले आणि तुम्ही त्याचे स्वामी झालात हे समजल्यानंतर मला जो अपार आनंद झाला तो खरेच शब्दांत सांगता येत नाही. आमच्या भागात आणि इतरत्र तुमच्या या विजयाच्या बातम्या अशा पसरल्या आहेत की, तुमचे शत्रू– मग कोणत्याही देशाचे असोत- थरथर कापू लागले आहेत. सर्व हिंदुस्थानात ही बातमी दुमदुमत आहे, याची खात्री बाळगा.

दुर्दैवाची गोष्ट म्हणजे ज्या देशाने आणि ज्या भूमीने या राजांच्या गरजा, चैनी पुरवल्या त्याची काळजी करायला यांना एक क्षणही फुरसत नाही. आज तरी एखादा भजनलाल भारताच्या ईशान्येकडे काय घडत आहे याची कितपत

फिकीर करतो? पंजाबातील हिंदू व शिखांमधील तणावाची काळजी अंतुले यांना वाटते काय?

यंत्रणेतील कीड ही वरिष्ठांपुरतीच नसते. बड्या मंडळींमुळे भ्रष्टाचाराला चालना मिळते आणि राजरोसपणा मिळतो हे खरे असले, तरी भ्रष्टाचाराची लागण फक्त त्यांनाच होते असे नाही. सामान्य माणसालाही अशा विनाशकारी दुर्वर्तनामध्ये भाग घ्यावासा वाटणे हीच मुळी ऱ्हास काळाची ठळक निशाणी आहे. सामान्य व्यक्तीही फार मोठ्या संख्येने नाना तऱ्हेच्या भ्रष्टाचारात हातमिळवणी करतात, हीच अंधारयुगाची ठळक खूण आहे.

आपल्या इतिहासातील एक नमुनेदार घटना : प्लासीची नाममात्र लढाई जिंकून क्लाईव्हने मुर्शिदाबादमध्ये प्रवेश केला. त्या वेळी त्याच्या बरोबर फक्त दोनशे युरोपियन आणि तीनशे भारतीय शिपाई होते. त्यांना पाहण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला आणि अगदी वेशीबाहेरसुद्धा इतकी मोठी गर्दी झाली होती की, त्यातील प्रत्येकाने एकेक जरी दगड भिरकवला असता तरी क्लाईव्ह आणि त्याचे शिपाई दगडांच्या राशीखाली गाडले गेले असते.

आपल्या इतिहासातील एक नमुनेदार वस्तुस्थिती : ब्रिटिश भारतात असेपर्यंत त्यांची राजवट सावरून धरली ती भारतीयांनीच. उदा. १९३० च्या सुमाराला भारताची लोकसंख्या पस्तीस कोटी होती. भारतातील युरोपियन्सची संख्या त्या वेळी फक्त दीड लाख होती आणि त्यांच्यापैकी पुरुषांची संख्या एक लाख १० हजार होती. सशस्त्र ब्रिटिश शिपाई होते फक्त ५५ ते ६० हजार. त्याआधीच्या काळात तर भारतातील ब्रिटिश सैन्य १५ हजार इतके होते. पंधरा लाख लोकसंख्येच्या जिल्ह्यावर कलेक्टर, डी.एस.पी. असे दोन-तीन ब्रिटिश अधिकारी निर्वेधपणे राज्य करत! आज आपली परिस्थिती ज्या बिकट वळणावर आहे तेथपर्यंत ती आणण्यात भारतीय मध्यमवर्गीयांचा वाटा मोठ्या प्रमाणात नाही का?

सामान्य नागरिक ऱ्हासप्रक्रियेत सहभागी होतात त्यामागे अनेक कारणे असतात. काहीजण राज्यकर्त्यांचा धडा गिरवतात. ते शोषण करतात तर आपणही करायला काय हरकत? आजच्या उच्चवर्गाची, मध्यमवर्गाची आणि कामगारांच्या नेत्यांची वागणूक या प्रकारची आहे. इतर काहींना भ्रष्टाचार वाईट हे समजते, ते तो मुकाटपणे सहन करून साथ देतात. यातून व्यवस्था कोसळेल हे त्यांना माहीत असते; पण संघर्ष करण्याची त्यांच्यात ताकद नसते किंवा व्यवस्थेच्या चौकटीपासून ते इतके दूर असतात की, वर कोण काय करीत आहे याचे सोयरसुतक त्यांना राहत नाही. निराद चौधरींच्या पुस्तकातील उदाहरण घेऊ. १८ व्या शतकाच्या मध्याला ल्यूक स्क्रॅफ्टन हा ब्रिटिश गृहस्थ भारतात राहिला होता. त्याचे निरीक्षण चौधरींनी उद्धृत केले आहे. 'शासनामध्ये एखादी कृती झाली तरी सामान्य प्रजेवर तिचा प्रभाव इतका कमी जाणवतो की, त्याचे आश्चर्य कुठल्याही ब्रिटिश माणसाला वाटल्यावाचून राहत नाही. राजदरबारच्या छोट्याशा वर्तुळापलिकडे असे कोणाला जाणवतच नाही. इतरेजनांना त्याबद्दल उदासीनता वाटते. हुकूमशहा पर्शियन आहे की तार्तार याचे सुखदुःख त्यांना नसते. कारण कदाचित असे असेल की, राजवटीचा

फायदा सामान्य जनतेला काहीही मिळत नाही. दुष्परिणाम मात्र नेहमीच भोगावे लागतात. आज ते भोगतात त्यापेक्षा वाईट अवस्था एकच ती म्हणजे अराजक.'

आज बिहारमधील भूमिहीन शेतमजुरांची आपल्या वर्तमानपत्रातील प्रमुख विषयांबाबत काय प्रतिक्रिया असते ? न्यायाधीशांच्या बदल्या, संसदीय पद्धत की अध्यक्षीय पद्धत, अशा बाबतीत त्यांना काय वाटते याचे निरीक्षण जर एखाद्या परदेशी पाहुण्याने केले तर तो वर दिलेल्या निरीक्षणापेक्षा काय वेगळा अभिप्राय लिहील ?

कारणे काहीही असोत; गैरवर्तनात, सगळ्या यंत्रणेलाच खाऊन टाकेल अशा भ्रष्टाचारात हातमिळवणी करणे किंवा तो चालवून घेणे हे वैशिष्ट्य आज समाजाच्या सगळ्या थरात दिसते. समाजातील प्रत्येक संस्थेला हा रोग जडलेला दिसतो. त्यामुळे कुठलीही एखादी संस्था इतरांपेक्षा वेगळे काम करेल आणि एकूण समाजव्यवस्थेला बुडण्यापासून वाचवेल अशी आशा दिसत नाही. सगळ्याच संस्था नि यंत्रणा अशा नेभळ्या होण्यामागची कारणे समानच आहेत. विधिमंडळे, न्यायालये, प्रशासकीय सेवा, पोलिस दल, वृत्तपत्रे या साऱ्या संस्थांना एकाच आजाराने ग्रासल्याचे दृष्य दिसत नाही का ? काही लोकांना मात्र हे सत्य समजायला फार वेळ लागतो. काही थोडी तळमळीची सच्ची माणसे न्यायाच्या आशेने, या दरबाऱ्याकडून त्या सरदारांकडे, या अधिकाऱ्याकडून त्या आमदाराकडे, खासदाराकडे आणि न्यायालयांपासून पत्रकारांकडे धावत राहतात.

पण आपल्या पत्रकारितेची अवस्था तरी इतर साऱ्या संस्थांपेक्षा काही निराळी आहे का ? लोकांचा भ्रम नाहीसा व्हायला खूप वेळ लागतो. रोग किती खोलवर चरत गेला आहे हे खूपजणांना लवकर जाणवत नाही. हा रोग एखाद्या अवयवातच नाही तर शरीराच्या प्रत्येक पेशीपेशीत घर करून बसला आहे आणि तरी हे जाणवायला वेळ लागतो कारण हा रोग धिम्या गतीने वाढतो– पसरत जातो. आकाशातून एकदम कडाडून कोसळणाऱ्या विजेसारखा येत नाही. रोगाचा प्रत्येक टप्पा आपल्याला पुढच्या अधिक गंभीर टप्प्यासाठी तयार करतो. त्यामुळे साऱ्यांना गदगदा हलवून जागे करील इतका मोठा बदल एकदम कधीच होत नाही. हा रोग प्रत्येक पेशीला आणि या देशाच्या प्रत्येक नागरिकालाच जडला आहे ही जाणीव मनाच्या शक्य तेवढ्या दूरच्या कोपऱ्यात ढकलण्याचा प्रयत्न प्रत्येकच नागरिक शक्य तितका करतो. कारण ही जाणीव जागी राहिली तर प्रत्येकालाच आपली वागणूक बदलावी लागेल. त्या मानाने वाढत्या रोगाशी जुळवून घेणे वाटते तेवढे अवघड नसते. काय वाटेल ते खपवून घ्यायची प्रचंड क्षमता आपल्यापैकी प्रत्येकामध्ये आहे. शिवाय असल्या सहनशीलतेची समर्थने रचण्याची बुद्धिमत्ताही प्रत्येकाला भरपूर आहे. त्यामुळे समाजातील दूरितांचा ज्यांच्यावर सगळ्यात जास्त दुष्परिणाम होतो त्यांना दूरित सहन करण्याची ताकदही भरपूर असते. शिवाय रोजच्या जगण्याच्या झगड्यात पुरते गुरफटलेले हे लोक आपल्या वागणुकीवर विसावलेल्या या ऱ्हासशील यंत्रणेविरुद्ध लढू शकत नाहीत. मोठ्या लढ्यात पाय रोवून टिच्चून उभे राहण्याची ताकदही त्यांच्यापाशी नसते. त्यापेक्षा सहिष्णुतेचे समर्थन करणे सोपे जाते.

अशा परिस्थितीत व्यवस्थेत संपूर्ण परिवर्तन घडून यायला फार वेळ लागतो. समाजाचा ऱ्हास होतो तो सामान्य माणसाच्या भ्रष्टाचारातील सहभागामुळे. तसेच संपूर्ण परिवर्तनाची शक्यता होते ती सामान्य माणसे ही भयानक अवस्था बदलण्याचा निश्चय करतात तेव्हाच. या अवस्थेत आपण कायम खितपत राहू शकत नाही हा निश्चय केल्यानंतर त्यांना जो आणखी एक सामुदायिक निर्णय घ्यावा लागतो तो म्हणजे भ्रष्टाचारात सहभागी व्हायचे नाही. त्याऐवजी साऱ्यांनाच गोचीत पकडणाऱ्या या दूरितांविरुद्ध लढा द्यायचा आणि काय होईल ते परिणाम भोगायचे.

ब्रिटिश राजवटीला सर्वसामान्य भारतीयांनी सुरुवातीला विरोध केला नाही. पारतंत्र्याचे शतक ओलांडल्यानंतरच सामान्य भारतीय नागरिकाची खात्री पटली की, भारतावर राज्य करण्याचा कोणताही ईश्वरी अधिकार ब्रिटिशांना नाही. त्यांनी चालते झाले पाहिजे आणि त्यांना जायला भाग पाडणे शक्य आहे. तेव्हा महत्त्व आहे ते असंख्य सामान्य माणसांच्या कृत्यांना आणि मनोबळाला. काही थोड्या राज्यकर्त्यांचेच चाळे किंवा थोड्या शूर क्रांतिकारकांच्या बंडखोरीला नव्हे.

## सद्यःस्थिती

लोकांनी डोळे झाकायचा खूप प्रयत्न केला तरी शेवटी परिवर्तन घडून येतेच. ते लोकांचे डोळे उघडतेच. आज सामान्य नागरिकांच्या झोपाळूपणाबद्दल बुद्धिमंत मंडळी टीका करीत असली तरी आजच्या परिस्थितीत विविध समाजघटकांना एकापाठोपाठ जागृत करून धडे देता येत नाहीत.

अस्पृश्यतेची रूढी कदाचित गांधींच्या उपवासांना दाद देणार नाही; पण भरगच्च गर्दीने भरून जाणाऱ्या बसपुढे तिचा निभाव लागेल का ? खेड्यातील माझ्या उच्चवर्णीयांच्या विहिरीतून कदाचित मी एखाद्या दलिताला पाणी भरू देणार नाही; पण नगरपालिकेच्या नळावरून पाणी भरायला नि प्यायला मी त्याला अडवू शकेन का ? त्याहीपुढे जाऊन ज्या सार्वजनिक जलकेंद्रावरून वरील पाणीपुरवठा होतो तेथेच नोकरी करण्यापासून तरी मी दलितांना थांबवू शकणार आहे का ? तेव्हा मनूने दिलेले निवाडे मुद्दाम बदलायला हवेत असे नाही. कारण ते आपोआपच विरून जात असतात.

निसर्गात बदल घडवून आणता येतो ही महत्त्वाची गोष्ट नव्या तंत्रज्ञानाने सिद्ध केली आहे. बी-बियाण्यांच्या नवनव्या जाती आल्या, नव्या धर्तीचे कालवे आले. निसर्गाला वाकविता येते आणि जुन्या सामाजिक व्यवस्थाही नव्या तंत्रज्ञानापुढे हार खातात हेही सिद्ध झाले. स्वातंत्र्यानंतर प्रौढ मताधिकाराचे तत्त्व प्रस्थापित झाल्यामुळे नव्या संधी उपलब्ध झाल्या. तेव्हा जुनी समाजव्यवस्था अढळ, अपरिवर्तनीय नाही हे दिसून आले. राज्यकर्त्यांना ईश्वराचे थेट प्रतिनिधी आणि म्हणून तितकेच श्रेष्ठ मानण्याचा जमाना गेला. जनतेने १९७७ मध्ये एका हुकूमशाही सरकारला फेकून दिले, तर काम न करणाऱ्या दुसऱ्या सरकारला १९८० मध्ये हाकलले. यातून सिद्ध झाला तो एक नवा आत्मविश्वास.

लोकांच्या लक्षात आले की, समाजव्यवस्था लवचिक असते आणि आपल्या भल्यासाठी हवी तशी वाकविता, वळविता येते. अलीकडच्या निवडणुकांत गरीब



३७६३ २६५४८ निबंध ६३।१९२

आणि अशिक्षित भारतीय मतदारांनी एकेका वेळेस दोन तृतीयांश खासदारांना पुन्हा निवडून देण्याऐवजी पराभूत करून घरी बसवले! राज्यकर्ते आपले प्रतिनिधी आहेत, म्हणूनच त्यांनी जनहितासाठी काम करायला हवे आणि ते तसे करीत नसतील तर त्यांना बदलण्याचा हक्क आम्हाला आहे ही नवी संकल्पना, नवी जाणीव जनतेत रुजलेली आहे.

या जाणिवेचा लखलखाट सुरुवातीला डोळे दिपवून टाकतो. त्यामुळे प्रत्येक समाजघटकाची प्रवृत्ती आख्खी व्यवस्थाच बदलून टाकावी अशी होते. काही काळाने आपल्या बदलण्याच्या ताकदीच्या मर्यादा लक्षात येऊ लागतात. १९५० च्या दशकात सर्वसामान्य भारतीय बुद्धिमंतांना प्रत्येक संप हा महान संघर्ष वाटत असे. प्रत्येक कामगारनेता सद्गुणांचा पुतळा भासत असे. आज तशी परिस्थिती नाही. आज धनबादमधील माफिया टोळीच्या इशाऱ्यावर, मुंबईच्या दत्ता सामंताच्या गरजेवर चालणाऱ्या कामगार चळवळीकडे आपण चकीत होऊन पाहतो आणि सगळे कायदे नि योजना वाऱ्यावर उधळून दिल्या, तर आधुनिक उद्योग चालणार कसे याची चिंता करतो.

परिवर्तनाच्या पहिल्या चमचमाटात समाजमनावर नोंद होते, ती आपल्या हातातील जबरदस्त ताकदीची. निवडणुका जाहीर झाल्या की, जी पहिली गोष्ट लोकमानसात नोंदली जाते, ती म्हणजे आपण बेकार सरकार फेकून देऊ शकतो. पण लवकरच साधनांच्या मर्यादाही ध्यानात येऊ लागतात. आज हरियानातील सामान्य नागरिकांच्या लक्षात येऊ लागले आहे की, निव्वळ आपल्या मर्जीने उमेदवार निवडून दिला याचा अर्थ ते पुढेही मतदारांच्या गरजेनुसार वागतील असा होत नाही. तसे घडवायचे तर आणखी काहीतरी करायला हवे आहे.

मूलतः भयानक असणाऱ्या काही घटनाही काही वेळा चांगल्या दिशेने बदल घडत असलेले दाखवून देतात. बिहारातून पंजाबात मजुरीसाठी गेलेल्यांना हालअपेष्टा भोगाव्या लागतात, याबद्दल पुष्कळ तक्रारी केल्या जातात हे रास्तही आहे; पण मजूर असे स्थलांतर करतात यातही एक बदलाची खूण आहे. एक नवा विश्वास यातून दिसतो. आपण जन्माला आलो तेथेच गोळाभर भातासाठी कष्ट करून झिजून मेले पाहिजे अशी सक्ती आज नाही. त्याऐवजी पाच-सातशे किलोमीटर प्रवास करून चार घास मिळविण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. दरवर्षी शेतमजुरी संपवून बिहारमधील आपल्या न बदलणाऱ्या खेड्यात ही मंडळी परततात, तेव्हा जगाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन त्यांना जरूर मिळालेला असतो. उत्तर प्रदेश आणि बिहारमधील ठाकूर दलितांना गोळ्या घालून ठार मारतात याबद्दल आपण आरडाओरडा करतो हे योग्यच आहे; पण ठाकुरांना गोळ्या चालवाव्या लागतात याचा अर्थच दलितांमध्ये नवी जागृती येत आहे. कैक शतकांनंतर त्यांना आपल्या हक्काची जाणीव होत आहे, स्वतःची जमीन किंवा निदान किमान वेतन मिळविण्याचा आपल्याला हक्क आहे असे दलितांना वाटू लागले आहे. एका कवीने म्हटल्याप्रमाणे अजून तांबडं फुटलं नसलं तरी निदान काहीजणांनी आपले हात पूर्वेकडे उंचावले आहेत! समाजातील हे बदल

संथपणे पसरलेल्या विविध थरांतून अगदी वरपर्यंत संक्रमित होत जातात.

पाहण्यासारखी गोष्ट म्हणजे तळागाळात होणाऱ्या या बदलांमुळे राज्यकर्त्यांना अनेक पुरोगामी पावले टाकावी लागली आहेत. या सुधारणा परिस्थितीच्या दडपणाखाली भलेही झालेल्या असोत, त्यातून राज्यकर्त्यांवर काही आवश्यक बंधने जरूर आली आहेत.

आज आपल्या वृत्तपत्रात सामाजिक महत्त्वाच्या विषयांना किती जागा दिली जाते आणि त्यासाठी किती प्रयत्न केला जातो हेसुद्धा पाहण्यासारखे आहे. दोन दशकांपूर्वी या विषयांना पत्रकारितेत एवढे महत्त्व मिळत नव्हते. अशा अडथळ्यांमुळे राज्यकर्त्यांच्या पायाखालची वाळू घसरू लागते. शेवटी त्यांना आपले मखमली हातमोजे टाकून देऊन आपले खरे स्वरूप प्रकट करावे लागते. त्यांचे बेत कोलमडतात व त्यातून येणाऱ्या निराशेपोटी त्यांचे खरे वर्तन, खरा स्वभाव स्पष्ट होतो आणि सध्याच्या व्यवस्थेचे पितळही उघडे पडते.

आज बिहारमधील भूमिहीन शेतमजुराला राजवटीचे सत्य स्वरूप समजावून सांगायला एखादा वाचापंडित आणण्याची गरज नाही. गावातील दरोगा, सावकार, त्यांनी पोसलेले गुंड आणि त्यांच्या बंदुका या शेतमजुरांना शहाणे करून सोडायला पुरेशा असतात. खेड्यापाड्यातील परिस्थिती अशी बदलत आहे की, निव्वळ मनुस्मृतीचा हवाला देऊन हरिजनांना दडपून ठेवणे शक्य होत नाही. दडपशाही करायचीच तर तेथील दांडगेश्वरांना आपली शस्त्रे उपसावी लागतात. गावात ही परिस्थिती, तर दिल्लीत अत्युच्च स्थानावर बसलेल्या इंदिरा गांधींना सभ्य, सुसंस्कृत समर्थक मिळत नाहीत. त्यामुळे भजनलाल, झैलसिंग अशासारख्यांची मदत घ्यावी लागते. गोष्टी इतक्या थराला आल्यानंतर राज्यकर्त्यांच्या अप्रामाणिकपणाबद्दल लोकांची खात्री पटवून द्यायला वेगळा पत्रकबहाद्दर हवा कशाला? भजनलालसारखी माणसे एका आठवड्यात लोकांना आपल्या वागण्याने जो धडा देतात तो पत्रके कित्येक दशकांत तरी देऊ शकतील का? तेव्हा सर्वांगीण प्रगती चालली आहे आणि त्यातून अनेक भयानक परिणामच निष्पन्न झाले आहेत. वेळच अशी आली आहे की, दर आठवड्याला अधिकाधिक लोकांना सद्य:स्थितीचे स्वरूप स्पष्ट होत चालले आहे. राज्यकर्तेच लोकांना शहाणे करून सोडीत आहेत.

## लक्षवेधी व्यक्ती

ऱ्हास होण्याच्या प्रत्येक टप्प्यावर काही वेगळी माणसे भेटतातच. ही माणसे इतरांबरोबर घसरत जाण्याचे नाकारतात. तडजोडी करण्याचे नाकारतात आणि त्याखातर आपला व्यक्तिगत स्वार्थ वाऱ्यावर उधळून द्यायला कमी करीत नाहीत. एकाकीपण, अपमान, छळ-यातना, उपहास या साऱ्याला तोंड देऊन अशी माणसे काही मूलभूत मूल्यांची ज्योत पेटती ठेवतात. आसपास उद्ध्वस्त इमारतींचे ढिगारे कोसळत असतानाही नव्या समाजाच्या उभारणीसाठी नवी मूल्ये घडविण्याचे काम चालू ठेवतात. प्रत्येक टप्प्यावर अशी माणसे अगदी थोडी असतात. ती उठून दिसत नाहीत की नजरेत भरत नाहीत. सध्याच्या व्यवस्थेच्या मापाने मोजले तर अशी माणसे अपयशी ठरतात, प्रवाहाबरोबर फेकली जातात.

आचार्य कृपलानी यांनी मुझफ्फरपूरमधील आपली प्राचार्याची जागा सोडली आणि गांधींच्या चळवळीत उडी घेतली तेव्हा ते फारसे कोणालाच माहीत नव्हते. कियांसगी पर्वतप्रदेशातील टोळीवाद्यांना माओ यांनी एका नव्या उद्देशाने भारून टाकले आणि घडविले त्यापूर्वी तेही अज्ञानातच होते. आजच्या मोजमापाने यशस्वी आणि प्रसिद्ध होणारी माणसे अशा खडतर रस्त्यावर पाय रोवून उभी राहिलेली दिसत नाहीत. ते नैसर्गिकही आहे. आहे त्या यंत्रणेतून त्यांना सर्व फायदे मिळत असतात. त्यांच्यापैकी फारच थोड्या माणसांची मने संवेदनक्षम असतात. त्यांना चालू व्यवस्थेमधील विषमता जाणवते व मग ती व्यवस्था आपल्या फायद्याची असतानाही ती उलथून पाडायला अशी निवडक माणसे उभी राहतात. दीनबंधू, सी. एफ. ॲन्ड्रयूज, ही अशी काही मोजकी माणसे. आज भारतात अशी काही मूठभर माणसे दिसतात, त्यांच्या बाबतीत दोन मुद्यांची नोंद घ्यायला हवी. एक: दूरितामध्ये सामील व्हायला नकार देणारी माणसे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात, कीड लागलेल्या प्रत्येक संस्थेत आणि सर्व स्तरांवर दिसतात.

खटले लांबणीवर पडल्यामुळे दीर्घकाळ तुरुंगात डांबल्या गेलेल्या दुर्दैवी लोकांविषयी इंडियन एक्स्प्रेसमध्ये एक लेखमाला प्रसिद्ध झाली आहे. अखेरीस सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्णय दिले आणि शेवटी ४० हजार कैद्यांची सुटका झाली. हा अहवाल दिला होता के. एफ. रुस्तमजी यांनी आणि ज्या भारतीय पोलिस सेवेची आपण भरपूर निंदानालस्ती करतो त्याच सेवेत रुस्तमजी यांनी आपले उभे आयुष्य घालविले होते. भागलपूरमधील कैद्यांना आंधळे करण्याचे प्रकार पोलिसांनी केले, ते थांबविण्यासाठी पहिले पाऊल उचलले ते भागलपूर तुरुंगाचे अधीक्षक व्ही. एल. दास यांनी. भारतातील तुरुंगाचे अधिकारी ही जमात एरव्ही बदनाम आहे हे येथे लक्षात घ्यावे.

बिहारच्या पोलिसांचा गुन्हे अन्वेषण विभाग हासुद्धा बदनाम झालेला आहे. परंतु याच विभागाचे उपमहानिरीक्षक ललितविजय सिंग यांनीच भागलपूरमधील घटनांचे तपशीलवार पुरावे गोळा केले आणि एकतीस संशयित गुन्हेगारांना आंधळे करण्याच्या प्रकाराला पोलिसच जबाबदार आहेत हे या पोलिस अधिकाऱ्यानेच स्पष्ट केले.

अंतुले यांना सिमेंट भ्रष्टाचार प्रकरणी सत्ता सोडावी लागली. त्यांच्याविरुद्ध पुरावे आणि महत्त्वाचे तपशील गोळा करणारी व्यक्ती म्हणजे तहसीलदाराच्या दर्जाची एक सामान्य सरकारी अधिकारी होती. या पातळीवर आपल्या देशात ज्या दडपणाला, असुरक्षिततेला तोंड द्यावे लागते त्यातून हे गृहस्थही सुटलेले नव्हते. अंतुले यांच्या प्रतिष्ठानला मिळालेल्या देणग्या व वाटप झालेल्या सिमेंटच्या गोण्या यांच्यात थेट परस्परसंबंध आहे हे न्यायालयात पुराव्याने सिद्ध करणे आवश्यक होते. ही महत्त्वाची माहिती महाराष्ट्रातील एका बड्या बिल्डर्सच्या घराण्यातील एका तरुणाने दिली. कुटुंबियांच्या दडपणाला दाद न देता आणि स्वार्थाची पर्वा न करता या श्रीमंत तरुणाने ही माहिती उपलब्ध करून दिली. कोलमडत चाललेल्या आपल्या न्यायव्यवस्थेतही लेंटिन आणि रेळे यांसारखे न्यायाधीश आहेत आणि

सत्ताधाऱ्यांशी साटेलोटे करणाऱ्या सनदी अधिकाऱ्यांमध्ये पी. एस. अप्पूंसारखे अधिकारीही आहेत.

दुसरा मुद्दा : वस्तुस्थिती जशसशी स्पष्ट होत जाते, तसतशी सध्याच्या करव्यवस्थेवर नाराज असणाऱ्यांची संख्या वाढत जाते. राज्यकर्त्यांना पत्रे लिहून ही व्यवस्था बदलता येणार नाही, याबद्दल खात्री पटलेल्यांची संख्या वाढू लागते. भारतातील बुद्धिवाद्यांचे उदाहरण घ्या. १९६९ मध्ये त्यांच्यापैकी भरपूर व्यक्तींनी श्रीमती गांधींना पाठिंबा दिला. निव्वळ संस्थानिकांचे तनखे रद्द केले, बँकांचे राष्ट्रीयीकरण केले किंवा समाजवादाची भाषा वापरली एवढ्यामुळे श्रीमती गांधी या भारतातील क्रांतीच्या अग्रदूत आहेत असे या विचारवंतांना वाटले. आज श्रीमती गांधी असत्या तर त्या किंवा त्यांच्यासारखी दुसरी कोणीही व्यक्ती विचारवंतांना कितपत फसवू शकतील ?

तेव्हा ऱ्हासकाळात निव्वळ बड्या व्यक्तींच्या वागणुकीकडे पाहून नाउमेद होण्याचे कारण नाही. सध्याच्या करव्यवस्थेतून ज्यांचे उखळ पांढरे होते त्यांची वागणूक यापेक्षा वेगळी ती काय असणार ? लक्ष ठेवायला हवे ते संख्येने थोड्या असलेल्या पण प्रवाहाविरुद्ध जाण्याचे धाडस दाखवणाऱ्या व्यक्तींकडे. अशा व्यक्ती आसपास आहेत ना, त्यांची संख्या वाढत आहे ना, आणि त्या थकून, खचून जात नाहीत ना याकडे लक्ष द्यायला हवे.

## चळवळीचे योगदान

गांधींनी चळवळीचे शस्त्र आपल्याला दिले तेव्हापासून सगळ्या बिघडलेल्या गोष्टी दुरुस्त करण्यासाठी हा अंतिम उपाय असे व्यक्तीला वाटत आले आहे. त्यामुळे वेळोवेळी जन-आंदोलने उभी राहताना दिसतात. पण त्यात फार थोडे लोक सामील होतात; काही महिन्यांतच चळवळीचा जोर ओसरतो आणि चळवळीचा रोख ज्याच्याविरुद्ध होता ती दुरिते वाढतच जाताना दिसतात. मग आपण पन्नास वर्षांपूर्वीच्या भूतकाळात जाऊन माहिती करून घेतो : सत्याग्रहाची फेरउभारणी आपण का करू शकत नाही ? चंपारण, बार्डोली, खर्डा, दांडीयात्रा अशा आंदोलनाच्या लाटांमागून लाटा उसळल्या, नाट्यमय पद्धतीने त्यांनी आपली उद्दिष्टे साध्य केली, लक्षावधी लोक त्यात सामील झाले आणि विजेचा झटका बसावा तसा देश खडबडून उभा ठाकला, तसे आता का होऊ शकत नाही ?

याच्या उत्तरादाखल बरेच काही सांगता येईल. पण मी आता एकाच गोष्टीवर भर देणार आहे. सत्याग्रह ही काही भलतीच रोमांचकारी आणि उदात्त गोष्ट आहे अशी अवास्तव कल्पना करून घेतली तर अखेरीस निराशा पदरी येते. असे सत्याग्रह वा चळवळीपासून काय निष्पन्न होईल याबद्दल अवाजवी अपेक्षा ठेवल्या तरीही पदरी निराशा येऊ शकते.

आता काही वस्तुस्थिती पाहा

* मागे उल्लेख केलेले सत्याग्रह समुद्राच्या लाटेसारखे एका पाठोपाठ एक झालेले नाहीत. या सर्व सत्याग्रहांच्या दरम्यान शांततेचा, स्तब्धतेचा फार मोठा कालावधी गेलेला आहे.

* गांधीजींच्या ज्या चळवळी आज आपल्याला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक वाटतात, त्यातील अनेक चळवळी फक्त काही महिनेच टिकल्या होत्या. १९२०-२१ ची असहकार चळवळ अठरा महिने चालली. तर १९३०-३१ मध्ये दोन हप्त्यात चाललेली सविनय कायदेभंगाची चळवळ अनुक्रमे बारा व सोळा महिने टिकली होती. मात्र चंपारणचा सत्याग्रह दोनच महिने चालला. खेडा आणि बार्डोली सत्याग्रह प्रत्येकी सहा महिने, तर दांडीयात्रा एकच महिना चालली.

* संपूर्ण देशाच्या विस्ताराचा विचार केला तर गांधीजींचे बहुसंख्य सत्याग्रह म्हणजे स्थानिक स्वरूपाच्या चळवळीच होत्या. चंपारण, खेडा, बार्डोली ही अशी उदाहरणे. दांडीयात्रेबद्दल लोकांत उत्कंठा असली तरी संपूर्ण देश उसळून उठला असे घडले नाही.

* गांधीजींच्या सत्याग्रहात सहभागी झालेल्यांची संख्या थक्क करून सोडेल इतकी प्रचंड नव्हती. स्थानिक स्वरूपाच्या सत्याग्रहाची गोष्ट सोडाच, पण १९२०-२१ मध्ये व १९३०-३१ या काळच्या देशव्यापी आंदोलनाचे चित्रही संमिश्र होते.

पाच मुद्दे ठळकपणे नजरेत भरतात. एक : देशाच्या वेगवेगळ्या भागांतून, भिन्न भिन्न समाजांतून आणि वर्गांतून गांधीजींच्या सत्याग्रहाला मिळणारा प्रतिसाद समान नव्हता. याचे पुरावे पुष्कळ विस्ताराने देता येतील. दोन : सत्याग्रहाचे काही भाग चांगले यशस्वी झाले, काही झाले नाहीत. उदा. १९२०-२१ मध्ये व १९३० मध्ये त्यापूर्वीच्या निवडणुकांपेक्षा खूपच कमी मतदारांनी मतदान केले. या काळात परदेशी कापडाच्या आयातीचे प्रमाणही पुष्कळ कमी झाले, पण काही असमाधानाच्या जागाही होत्या.

तीन : बहुतेक सर्व क्षेत्रांत चळवळी संपताच गोष्टी झपाट्याने पूर्वस्थितीला आल्या. शिक्षणावर बहिष्कार पडला तेव्हा सुमारे ५० हजार ते ९० हजार विद्यार्थ्यांनी शाळा-कॉलेजला रामराम ठोकला. पण फेब्रुवारी २१ पर्यंत बंगालमध्ये विद्यार्थी शाळेत परतले होते, तर मुंबई प्रांतातील परिस्थिती एप्रिल २१ पर्यंत सर्वसामान्य बनली होती. दारूवर बहिष्कार टाकला तेव्हा देशातील दारूच्या दुकानांची संख्या एक टक्क्याने कमी झाली, तर दारूपासून मिळणारे महसुली उत्पन्न वीस टक्क्यांनी घटले; पण पुढील दोन-तीन वर्षांत ही घट भरून आली. चार : आणीबाणीच्या काळात पकडलेल्यांची संख्या एकूण लोकसंख्येच्या मानाने अगदी क्षुद्र, किरकोळ आहे असे श्रीमती गांधी म्हणत असत. गांधीजींच्या सत्याग्रहातील खऱ्या कार्यकर्त्यांची संख्या अशीच असे. १९३०-३१ च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत साठ हजार लोक तुरुंगात गेले. ही संख्या देशाच्या लोकसंख्येच्या एक टक्क्याचा पन्नासावा भाग इतकी कमी होती. पाच : अपेक्षेनुसार समाजातील प्रमुख व्यक्ती, उच्चपदस्थ यांचा चळवळीत सहभाग कमीच असे. सरकारकडून मिळालेली पदके आणि किताब परत करून टाका असे आवाहन गांधींनी केले. ऑगस्ट १९२० मध्ये पदके व किताब मिळालेल्यांची एकूण संख्या ५१८६ होती. त्यातील फक्त ६१ जणांनी गांधींचा शब्द मानला आणि नाईटहूड किंवा तत्सम मोठी पदवी तर कोणीच परत केली नाही. न्यायालयांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन गांधींनी केले त्याला

कसा प्रतिसाद मिळाला ? दोन आकडे मिळतात. अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या असहकारितेच्या चळवळीच्या नोंदवहीप्रमाणे हा आकडा एकशे ऐंशी इतका कमी आहे तर या समितीने नेमलेल्या सविनय कायदेभंग चौकशी समितीच्या अहवालानुसार ही संख्या जरा बरी म्हणजे पंधराशे एवढीच आहे.

प्रत्येक चळवळीत सामील होणाऱ्यांचे व्यक्तिगत किंवा संमिश्र स्वरूपाचे स्वार्थ असायचे. काहीजण ध्येयाने खरोखरीच भारून जाऊन सहभागी होत. काहीजण मात्र चळवळीत सामील झालो नाही तर राजकारणामधूनच बाहेर फेकले जाऊ या भीतीपोटी सामील होत. एका संपूर्ण समाजाचे हे उदाहरण नमुनेदार ठरेल. १९२०-२१ मध्ये खिलाफतीबाबतच्या भावना तीव्र असल्याने मुसलमानांनी हिंदूंपेक्षा जास्त उत्साहाने निवडणुकीवर बहिष्कार घातला. मद्रास प्रांतात एकूण मतदान पन्नास टक्के होते. शहरी मुस्लिमांच्या मतदानाचे प्रमाण ८.४ टक्के तर ग्रामीण मुस्लिमांचे मतदान १४ टक्के झाले. मुंबई शहरात पात्र मतदारसंख्येच्या फक्त ८ टक्के मतदान झाले. मुस्लिम मतदारांचे प्रमाण ४.४ टक्के होते. आसाममध्ये २४.७ टक्के हिंदूंनी तर १९.२ टक्के मुस्लिमांनी मतदान केले. बंगालच्या शहरी भागात ४० टक्के हिंदूंनी तर २७ टक्के मुस्लिमांनी मतदानाचा हक्क बजावला. बिहारच्या शहरी भागात हिंदू-मुस्लिमांच्या मतदानाचे प्रमाण अनुक्रमे २७.३ टक्के व १२.१ टक्के होते तर ग्रामीण भागात हेच अनुक्रमे ४२ टक्के व २८ टक्के असे होते. पण १९३० मध्ये खिलाफत चळवळ विसरली गेली होती. हिंदू-मुस्लिम यांच्यातील तणाव मात्र खूपच वाढला होता. या वेळी परिस्थिती उलट झाल्याचे दिसते. स्थानिक प्रश्नांचा विचार करून मतदान झाले. बिहारमधील चौकीदारी कर, उत्तर प्रदेशातील जंगलविषयक धोरण यांनाच राष्ट्रीय प्रश्नापेक्षा जास्त महत्त्व आले. अखेरीस १९३०-३१ मध्ये चळवळीचे नियंत्रण करण्याचा प्रयत्न राष्ट्रीय नेत्यांना सोडून द्यावा लागला आणि स्थानिक पुढाऱ्यांना स्थानिक प्रश्नांना महत्त्व देऊन चळवळ चालविण्याची परवानगी द्यावी लागली.

* यातील प्रत्येक मोहीम जितका काळ चालली तितक्याच प्रमाणात अनुयायांमधील दुफळी उघड झाली. उत्तर प्रदेशच्या ग्रामीण भागात राष्ट्रीय चळवळी नेण्याचा प्रयत्न पंडित नेहरूंनी केला त्या वेळी तेथील जमीनदार आणि सामान्य शेतकरी यांच्यांत मतभेद होऊ लागले. गांधींनी हरिजनांचे प्रश्न लावून धरण्यास सुरुवात केली तेव्हा त्यांच्याकडे पाठ फिरविणारे काही तथाकथित उच्चवर्णीय हिंदू निघालेच. चळवळीच्या अखेरीस हिंदू व मुस्लिमातील दुही आवरण्यापलीकडे गेली. तेव्हा संपूर्ण देश एकत्रितपणे उसळून उभा राहिला असे प्रसंग तेव्हाही फारच दुर्मिळ होते.

* मागे उल्लेख केल्याप्रमाणे विशिष्ट सत्याग्रह मागे घेतला गेल्यानंतर त्याचे परिणाम टिकून राहिले नाहीत, तर विरून गेले. चंपारणमधून दौरा करताना गांधींना जाणवले की, निळीच्या समस्येतून लोकांना सोडविणे एवढेच पुरेसे नाही, त्यांना शिक्षण द्यायला हवे. त्याची सुरुवात अगदी व्यक्तिशः सार्वजनिक आरोग्याच्या काळजीपासून करायला हवी. त्यामुळे सहा शाळा उघडण्याचा इरादा त्यांनी प्रगट

केला. त्यासाठी स्वयंसेवकांनी पुढे यावे असे आवाहन गांधींनी केले. अशा प्रकारचे विधायक कार्य हाच चळवळीतील सगळ्यात महत्त्वाचा आणि टिकाऊ उपक्रम असे गांधींनी सांगितले. याबाबत 'गांधीज राईज् टू पॉवर' या आपल्या पुस्तकात ज्युडिथ ब्राऊन लिहितात, 'फक्त पाच बिहारी स्वयंसेवक पुढे आले. शेवटी गांधींना मुंबई प्रातांतून एकवीस स्वयंसेवक बोलावून घ्यावे लागले. त्यातील दहा तर अहमदाबादच्या त्यांच्या स्वत:च्या आश्रमातून आले. १४ नोव्हेंबर १९१७ ते १७ जून १९१८ या काळात तीन शाळा सुरू झाल्या. सुरुवातीला मुला-मुलींची संख्या तीनशे ऐंशीच्या आसपास होती. १९१८ च्या मध्याला ती घसरून साठवर आली, तर फक्त तीन स्वयंसेवक शिल्लक राहिले!'

* प्रत्येक घटनेचे काही अवांच्छित असे दुय्यम परिणाम होतातच. उदा. १९४२ च्या सत्याग्रहाला हिंसक दंगलीचे गालबोट लागलेच. चळवळीचा साकल्याने विचार केला तर त्याची अनेक प्रमुख उद्दिष्टे साध्य होऊ शकली नाहीत, असे दिसते. अस्पृश्यतानिवारण, जातीय सलोखा, संयमाने वागणूक आणि अखंड भारताचे राजकीय स्वातंत्र्य ही उद्दिष्टे कोणत्याच आंदोलनाला पूर्ण करता आली नाहीत. पाश्चात्य जीवनपद्धतीला पर्याय देणे हे गांधींचे खरे अंतिम उद्दिष्ट तर बाजूलाच राहिले. अशा अनेक वस्तुस्थितींचा उल्लेख करता येईल. त्याचेच एक पुस्तक होऊ शकेल. यामध्ये वानगीदाखल थोडी उदाहरणे दिली आहेत ती एच. डी. शर्मा याच्या 'नॉन-को ऑपरेशन मुव्हमेंट १९१९-२२' या पुस्तकातून. तसेच ज्युडिथ ब्राऊन यांच्या 'गांधीज् राईज् टू पॉवर १९१५-२२' आणि 'गांधी अँड सिव्हिल डिसओबीडियन्स १९२८-३४' या पुस्तकातून घेतले आहेत. पण अशा गोष्टी आपण क्वचित आठवतो आणि खरे म्हणजे फारच क्वचित त्यांच्या नोंदी ठेवतो.

* उदा. राजेंद्रप्रसाद यांचे 'चंपारण गांधी' हे पुस्तक आणि डी. जी. तेंडूलकर यांचे 'गांधी इन चंपारण' हे पुस्तक या दोन्हीमध्ये तीन शाळा सुरू केल्याचा उल्लेख आहे. परंतु त्या शाळांचे पुढे काय झाले याबद्दल मात्र काहीही लिहिलेले नाही. एकीकडे आपण अशा तऱ्हेने पुढच्या आंदोलनांचे अवाजवी उदात्तीकरण करतो तर दुसरीकडे त्याला जोड मिळते ती सर्वसामान्य मानवी प्रवृत्तींची. भूतकाळाबद्दल काही सोनेरी, रूपेरी कल्पना मनात बाळगायच्या आणि वर्तमानकाळातील अपयश किंवा संकटे आहेत त्यापेक्षा खूप मोठी करू पाहायची ही ती प्रवृत्ती. या दोन घटकांमुळे माणूस नाउमेद होतो. याउलट पूर्वीच्या घटना नीट तपासल्या तर आजच्या चळवळीची अनेक बरी-वाईट वैशिष्ट्ये गांधीजींच्या चळवळीतही अस्तित्वात होती असे दिसून येईल. आज गांधीजींनी आपल्यासाठी अशा चळवळी पुन्हा उभाराव्यात असे वाटते, तेव्हा आपल्या समाजातील दुष्ट प्रवृत्तीमुळे खचून, मोडून जाण्याचे कारण नाही.

दोन मुद्दे आणखी महत्त्वाचे आहेत. एक : वर उल्लेख केलेल्या संख्याबळातून पूर्ण चित्र मिळत नाही. किंबहूना चित्राचे काही महत्त्वाचे भागसुद्धा ही आकडेवारी सांगत नाहीत.

* श्रीमती गांधी सत्तेच्या ऐन भरात असताना त्यांच्या सभांना जितकी माणसे जमत त्यापेक्षा खूप कमी माणसे गांधीजींच्या सभांना जमा होत. पण लाखो माणसे गांधींची मनोमन पूजा करीत हेही लक्षात ठेवायला पाहिजे. १९३०-३१ मध्ये सत्याग्रह करून तुरुंगात गेलेल्यांची संख्या फक्त साठ हजार एवढीच असेल, पण त्या वेळी उरलेल्या सगळ्या देशबांधवांची एवढी मानसिक तयारी नक्कीच झालेली होती की, ब्रिटिशांना राज्य करण्याचा कोणताही दैवी अधिकार नाही आणि त्यांना हाकलून देणे शक्य आहे. त्याचप्रमाणे आणीबाणीत तुरुंगात गेलेल्यांची संख्या फक्त एक लाखाच्या घरात असेल; पण आणीबाणी अयोग्य होती हे सत्य मात्र १९७७ च्या निवडणुकीत प्रचंड बहुमताने जनतेने दाखवून दिले

तेव्हा आज आपले लक्ष पाहिजे ते विविध घटनांमधून शेवटी नेमके काय निष्पन्न होईल याकडे. आज प्रस्थापित व्यवस्थेबाबतचा आपला भ्रम लोक झटकून टाकताना दिसतात ? आपल्या राज्यकर्त्यांची खरी ओळख त्यांना पटत आहे ना ? आपली स्वतःची खरी ताकद त्यांना लक्षात येत आहे ना ? आणि या थराला गोष्टी येऊन ठेपल्या याच्या जबाबदारीत काही वाटा तरी आपला आहे याची जाणीव त्यांना होत आहे ना ? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत आणि माझ्या मते त्या सर्वांचे उत्तर त्रिवार होय असेच आहे. दोन : एकएकटे सत्याग्रह उभे राहिले, एकूण लोकसंख्येच्या मानाने अगदी थोड्या लोकांनी त्यात भाग घेतला, खास उद्दिष्टांपैकी बरीच असाध्य राहिली, हे सारे जरी खरे असले, तरी गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या चळवळी यशस्वी झाल्या. याचे कारण अशा चळवळींकडून ज्या गोष्टींची अपेक्षा आपण करतो त्या गोष्टी गांधीजींच्या चळवळींनी जरूर साध्य केल्या. अशा चळवळीतून आपल्या काय अपेक्षा असतात ?

समाजाची स्थिती निव्वळ चळवळींमुळे मुळापासून बदलेल असे होत नाही. चळवळीमागे उत्कट भावना असते, काही विशिष्ट समस्येभोवती त्या उभ्या राहतात. त्यांची एक आंतरिक जडणघडण असते. तरीही त्या चळवळीत समाजव्यवस्थेचा नूर असतो. समाजातील माणसे त्यात सहभागी होत असतात. अर्थात तरीही इतिहासाला पुढे नेण्याचे काम अशा चळवळी करीत असतात. त्यांची मुख्य कार्ये अशी सांगता येतील :

* एखाद्या राजवटीचा बुरखा फाडण्याचे काम चळवळी करतात. उदा. निळीच्या मळ्यातील मजुरांच्या दुर्दशेची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्याची साधी मागणी होती. यासाठीसुद्धा हे सरकार कांकू करीत असेल तर त्याने एरवी तुमच्या कल्याणाच्या कितीही घोषणा केल्या तरी त्यावर विश्वास कोण ठेवणार ?

* सामान्य लोकांना आपल्या आणि राज्यकर्त्यांच्या बळाचा खरा अंदाज नसतो. जनतेला वाटते त्यापेक्षा ती अधिक ताकदवान असते आणि राज्यकर्ते वाटतात त्यापेक्षा दुबळे असतात ही गोष्ट चळवळी सिद्ध करून देतात. गांधीजी आणि सरदार पटेल खेडा जिल्ह्यातील लोकांना उद्देशून म्हणाले होते की, "कलेक्टर तुमची मालमत्ता, जमीन शेतसारा न भरल्यामुळे जप्त करतील हे खरे. तुमच्या जमिनीचा ते लिलावही करतील; पण लिलावात बोली बोलायलाच कोणी पुढे

आले नाही तर कलेक्टर काय करील ? पुढच्या वेळी कलेक्टर तुमच्या गावात येईल तेव्हा त्याला सांगा की, तुमच्या जमिनी खिशात टाकून त्याने इंग्लंडला न्याव्यात.'' एका क्षणात लोकांच्या डोक्यात प्रकाश पडतो, आपण एकत्रित, एकजुटीने राहिलो तर राज्यकर्ते काहीही करू शकत नाहीत.

* समाजाच्या कसोट्या, मूल्ये आणि मानदंड यात उलटापालट करण्याचे सामर्थ्य चळवळीत असते. सन १९२०-२१ मध्ये पदके व पदव्या परत करणारे ५१८६ मध्ये ६२ निघाले ही गोष्ट खरी. पण त्याने समाजाची एक मनोभूमिका निश्चित तयार झाली. त्यापुढच्या काळात नव्याने पदव्या मिळविणे ही शरमेची, देशद्रोहाची खूण ठरली. याउलट सत्याग्रहात भाग घेऊन तुरुंगात जाऊन येणे ही सन्मानाची बाब ठरली.

* अशी जनआंदोलने म्हणजे योग्य ते घडण्याची मूस. लोककल्याणासाठी कष्ट कोण सोसतो याची पारख त्यातून लोक करू शकतात. तर चळवळी करणे एकमेकांची पारख करू शकतात. महाविद्यालये सोडून चळवळीत आलेले प्राध्यापक आणि न्यायालयावर बहिष्कार टाकून आलेले वकील ही कृती करताना सामान्य, अज्ञान असेच लोक होते. पण त्यांच्यातूनच चळवळीच्या पुढच्या पिढीचे पुढारी निर्माण झाले.

आज भारतात लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे गांधीजींसारखे उत्तुंग व्यक्तिमत्त्व नसतानाही वेळोवेळी अशी जनआंदोलने उभी राहतात आणि वर उल्लेख केलेल्यांपैकी बहुसंख्य कार्ये ही आंदोलने पार पाडतात.

* १९७७ नंतर जनता पार्टीच्या नेत्यांनी दुर्वर्तन केले या कारणासाठी, १९७३-७४ पासून बिहार व गुजरातमधील विद्यार्थ्यांनी आंदोलने केली, जे.पींचे मार्गदर्शन घेतले, त्या सगळ्याबद्दलच आपल्याला निराशा वाटते. पण या आंदोलनांनीसुद्धा राज्यकर्त्यांचे बुरखे फाडण्याची, प्रस्थापित व्यवस्थेचे सत्य स्वरूप उघडे करून दाखविण्याची कामगिरी बजावली नाही का ?

दुसरी गोष्ट अशी की, प्रस्थापित राजकीय व्यवस्थेवर ही आंदोलने एका पाठोपाठ एक उभी राहिली. प्रस्थापित व्यवस्था किडलेली आहे म्हणून आपला स्वभाव निराश राहतो. पण अशा रोगट चौकटीबाहेर उभी राहिलेली ही आंदोलने चौकटीबाहेर खूप काही होऊ शकते ते दाखवून देतात. नवे नेतृत्व, नवी राजकीय संस्कृती या सडलेल्या व्यवस्थेबाहेरही घडू शकते.

* आसाममधील चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या किती विद्यार्थ्यांची नावे आज आपल्याला सांगता येतील ? पण तरीही त्यांनी आसामी जनतेला आणि या सगळ्या देशाला निश्चित काही गोष्टी शिकविल्या. देशाचे संपूर्ण नेतृत्व आणि संपूर्ण राजकीय चौकट इतकी नादान बनली आहे की, देशाला जीवनमरणाच्या वाटणाऱ्या प्रश्नांचा विचार करायला त्यांना फुरसत नाही हे या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले नाही का ? अगदी संकुचित राजकीय विचार करायचा म्हटला, तरी या विद्यार्थ्यांनी दाखविलेले राजकीय हाताळणीचे कौशल्य राज्यकर्त्यांच्या कौशल्यापेक्षा थोडे कमी भरेल का ? येथेच नवे नेतृत्व घडते आहे हे सिद्ध झाले नाही

का ?

एखाद्या आंदोलनाची काही तात्कालिक उद्दिष्टे असतात. १९७३-७४ मध्ये बिहारचे अब्दुल गफूर आणि गुजरातचे चिमणभाई पटेल हे मुख्यमंत्री बदलले जावेत या तात्कालिक मागण्या होत्या; पण या मागण्या म्हणजेच आंदोलनाचे खरेखुरे उद्दिष्ट असा गैरसमज करून घेणे योग्य नाही. या चळवळी इतिहासाला यापेक्षा खूप अधिक असे काही देत असतात. आणि दुसरी चूक म्हणजे एखाद्या-दुसऱ्या आंदोलनामुळे एकदम परिवर्तन घडून येईल असे काही जण मानतात. प्रत्यक्षात अनेक चळवळी मिळून एकत्रित परिणाम होत असतो. अशा चळवळींची कैक दशके जावी लागतात. प्रत्येक चळवळ थोडा थोडा बदल घडवून आणत असते. यापेक्षा वेगळे काही घडूच शकत नाही. आज जी दुर्दशा आसपास दिसते तीसुद्धा लाखो लोकांनी लक्षावधी गैरव्यवहार दररोज केल्यामुळे निर्माण झाली आहे. फार मोठ्या संख्येने लाखो माणसांच्या मनात, समजुतीत, वृत्तीत बदल घडून आल्याखेरीज दुर्दशा एकाएकी सुधारणार नाही आणि याला खूप वेळ लागणार आहे.

‘गुहार को करती है अश्कबारी पैदा
तमकीन को मौजे– बेकरारी पैदा
चमन में सौ बार जब तडपती है बदे नसीम
होती है कली पें एक धारी पैदा....’

उशीर झाला तरी अंतिम परिणाम घडून येणार असतो. असे परिवर्तन थांबविण्याचा एकच रस्ता राज्यकर्त्यांकडे असतो– त्यांनी स्वत:च्या वर्तनात परिवर्तन करणे आणि हे तर करण्याची शक्यता नाही, हे एकदा निश्चित झाल्यानंतर असे राज्यकर्ते परिवर्तनाची प्रक्रिया थांबवूही शकत नाहीत आणि चळवळीचा पराभवही करू शकत नाहीत. एखाद्या कमालीच्या भ्रष्ट राज्यकर्त्याला बदला यासारखी छोटीशी मागणी जेव्हा ते मान्य करतात तेव्हा ते दुबळे आहेत, घाबरून माघार घेत आहेत असे स्पष्ट होते. अशी मागणी त्यांनी ठोकरली तर ते दुराग्रही, हट्टी आहेत हे सिद्ध होते आणि मग ज्या पद्धतीच्या शिडीवरून ते वर चढून आले तीच बदलायला हवी हेही जनतेच्या ध्यानी येते.

## व्यक्तीची भूमिका

“गांधीजींसारखा कोणीतरी नेता असता तर त्याने आमच्याकडून उत्कृष्ट कामगिरी करून घेतली असती ! आम्हाला कार्यप्रवृत्त केले असते...” हे काहीजणांचे विव्हळणे अडाणीपणाचे आहे आणि निष्फळ आहे. आंदोलनाच्या नायकाची भूमिका खूप महत्त्वाची असते यात शंकाच नाही. वेगवेगळ्या पद्धतीत कुशल असलेल्या नाना व्यक्तींना एकत्र आणून एका समान ध्येयाच्या रथाला जुंपणे, योग्य समस्या आणि योग्य वेळ आंदोलनासाठी निवडणे, लोकभावना चेतवणे या गोष्टींतील नेत्याचे कौशल्य निश्चित महत्त्वाचे ठरते. पण नेता निव्वळ एकट्याने संपूर्ण चळवळ वेळेमध्ये उभारू शकत नाही किंवा चळवळीला योग्य परिस्थिती किंवा क्षण एकट्याने निर्माण करू शकत नाही.

१९२०-२१ मध्ये गांधीजींनी असहकारितेची हाक दिली तेव्हा त्यांना भारताच्या

राजकीय क्षितिजावर आल्याला जेमतेम पाच वर्षे झाली होती; तरीही त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला. एका दशकानंतर गांधी तेच होते. लोकांना त्यांच्याबद्दल वाटणारा आदर कमी झालेला नव्हता. पण तरीही १९३० ची सविनय कायदेभंगाची चळवळ १९३१ मध्ये पुन्हा उभी करावयाचा प्रयत्न त्यांनी केला तेव्हा तो यशस्वी झाला नाही.

* १९७२ मध्ये जेपींविषयी अभिप्राय घेतला असता तर कोणीही त्यांना अपयशी ठरविले असते. ते कायमचे हॅम्लटेच्या भूमिकेत असतात असे म्हटले गेले असते आणि तरीही अवघ्या चार वर्षांनंतर अधिक जराजर्जर, गलितगात्र असूनही जेपी साऱ्या भारतीय जनतेच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे प्रतीक बनले.

वरीलप्रमाणे विव्हळणे निष्फळ आहे; कारण आपण मागणी केली म्हणून गांधी निर्माण होत नसतात. असे महान नेते अनेक वैशिष्ट्ये घेऊन येत असले तरी त्यांची एक खूण- अगदी ठळक- आपल्याला चटकन जाणवेल अशी असते. ती म्हणजे असे नेते एखाद्या अगदी वेगळ्याच संस्कृतीतून पुढे येतात. ज्या भ्रष्ट, सडक्या संस्कृतीविरुद्ध लढायचे असते त्यातून ते निर्माण होत नाहीत.

* गांधीजींची जीवनमूल्ये, त्यांना महत्त्वाचे वाटलेले प्रश्न आणि त्यांनी वापरलेली तंत्रे पाहिली तर ध्यानात येईल की, ब्रिटिश राज्यकर्ते आणि पारंपरिक भारतीय राजकारणी यांच्या संस्कृतीपेक्षा गांधीजींची संस्कृती अगदीच निराळी होती. ते प्रभावी ठरले याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे.

* १९७३-७४ मध्ये जेपींना हाताळणे श्रीमती गांधींना फार अवघड गेले. याचे कारण असेच होते. त्या वेळच्या राजकीय संस्कृतीपेक्षा मूल्यांच्या दृष्टीने अगदीच वेगळ्या राजकीय संस्कृतीतून जेपी आलेले असल्याने श्रीमती गांधींची हत्यारे काम करीनात. सत्तापदाचा लोभ जेपींना आकर्षित करू शकला नाही. मग बदनामीचा प्रयत्न करून झाला. जेपींच्या प्रवासदौऱ्याचा खर्च कोण करतो ? त्यांच्या सहयोगी संस्थांना परदेशी पैसा मिळतो का ? पण असली चिखलफेक मुळीच टिकली नाही.

सामान्य असूनही चाकोरीपेक्षा थोडी वेगळी असलेली माणसे महत्त्वाची ठरतात ती यामुळेच. नवा समाज ज्या मूल्यांच्या भोवती घडवायचा, ती जतन करण्याचे काम अशी माणसे बजावतात. नवसमाजनिर्मितीच्या आंदोलनाची बांधणी अशी माणसे करतात. पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे ज्या समुदायातून अशा माणसांचा नायक उदयाला येतो तो समुदाय अशा माणसांचा बनतो. कारण प्रस्थापित भ्रष्ट व्यवस्थेच्या मोहाला ही माणसे बळी पडलेली नसतात. त्यामुळेच तर त्यांची संस्कृती पूर्ण वेगळी ठरते. अशाच संस्कृतीतून महान नेते जन्म घेत असतात. अशी माणसे प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक काळात नेहमीच आपल्या आजूबाजूला असतात. आजही आपल्या देशात आहेत. ऱ्हास जितका झपाट्याने होत जाईल तितकी त्यांची संख्या वाढते. त्यांचे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे काळ जितका कठीण असेल, आकाश जितके जास्त अंधारलेले असेल तितकी अशा माणसांच्या संख्याबळाची गरज कमी होते; मग त्यांचे आवश्यक कार्य त्यातील एखादी व्यक्तीही पार

पाडू शकते.

युगोस्लोव्हियामध्ये तब्बल तीन दशके, सद्‌विवेकबुद्धी, तर्कसंगती आणि माणूसकी जिवंत, जागती ठेवण्याचे काम एकट्या जिलासने केले. माणुसकीशून्य अशा सोविएत रशियन राज्ययंत्रणेच्या विरोधात एकटे सोल्झेनित्सिन ताठ कण्याने उभे राहिले.

आताचा जो काळ आहे त्या काळात आणि परिस्थितीत, फार मोठे प्रश्न उभे राहतील तेव्हा हाताळू असे म्हणून वाट पाहण्यात अर्थ नसतो. एखाद्या देशव्यापी समस्येसाठी थांबून राहायचे नसते. चंपारण हा तर बिहार व नेपाळच्या सरहद्दीवरचा एक छोटासा जिल्हा होता आणि नीळ हे तुलनेने किरकोळ असे एक पीक होते. बार्डोलीमधील शेतसाऱ्यात केलेली वाढ, खेडा जिल्ह्यातील जमीनमहसुलाची वसुली, मिठावरचा किरकोळ कर यातील कुठलाही प्रश्न सारा देश हादरवून सोडेल इतक्या ताकदीचा नव्हता. त्यांच्यापैकी कोणताही प्रश्न गांधींनी ठरविलेल्या उद्दिष्टापर्यंत नेऊन पोचवील इतका महत्त्वाचा नव्हता. राजकीय स्वातंत्र्य काय किंवा पाश्चात्य संस्कृतीला पर्याय उभे करणे काय, गांधीजींची ही उद्दिष्टे या समस्येच्या मानाने खूप उच्च होती. आजही छोट्या छोट्या प्रश्नांना हात घालून मोठ्या ध्येयाची वाट चालणे अशक्य नाही; पण या कामामागे काही आदर्शवाद हवा. अशा छोट्या प्रश्नांची तीव्रता सामान्य नागरिकांना जेवढी जाणवते तेवढीच त्याच्यासाठी भांडणाऱ्या कार्यकर्त्या नागरिकाला जाणवली तरी पुरेसे आहे. किंबहूना सामान्य नागरिकापेक्षा कार्यकर्त्याला त्याची झळ कमी बसते, असे प्रश्न निव्वळ लोकहिताच्या बुद्धीने चळवळीसाठी निवडले तर ते केव्हाही जास्त चांगले ठरेल. असे छोटे प्रश्न हाती घेऊनही आज दोन आवश्यक ते इशारे देशाला देता येतील. पहिला म्हणजे आहे त्यातून अधिक चांगले जगण्याचा , अधिक चांगला मार्ग असू शकतो आणि दुसरे म्हणजे आजही स्वार्थ न पाहता काम करणारे, दुसऱ्यासाठी धोका पत्करणारे आणि अधिक चांगल्या विश्वाची निर्मिती व्हावी यासाठी झटणारे लोक अस्तित्वात आहेत.

आज गरज आहे ती मूल्यांचा गाभा जिवंत ठेवण्याची, गरज आहे ती सर्वांना जगण्याचा अधिक चांगला मार्ग दाखवून देण्याची. गरज आहे ती यासाठी संघर्ष करणारी माणसे शिल्लक आहेत याची खात्री पटवण्याची. एवढेच करून थांबता येणार नाही. पण तरीही तेवढे केल्यानेही काही महत्त्वाचे काम केले असे म्हणता येईल. कदाचित एवढ्यामधून आपल्याला करता येण्याजोगे एवढेच काम असू शकेल. सोल्झेनित्सिन यांनी 'द ओक अँड द काफ' यामध्ये हे किती चांगल्या प्रकारे मांडले आहे. "एखाद्या अचल, प्रचंड वस्तुमानाला निव्वळ शब्दांनी हलवून सोडायचे म्हटले तर त्याची सुरुवात करणे विलक्षण अवघड असते. परंतु कोणतीही प्रत्यक्ष शक्ती तुमच्या बाजूला नसली तर शब्दशक्तीखेरीज दुसरा काही मार्गही नसतो. हेही खरेच की, एखाद्या पर्वताच्या कुशीत आरोळी ठोकल्यानेही कडा कोसळून पडू शकतो...."

# ४.   धीराचे शब्द

समाजसेवा करणारे आणि राजकीय प्रक्रियेत सुधारणा करू इच्छिणारे यांना आपल्या कामाचा काही परिणामच होत नाही असे अनेकदा दिसते आणि त्यामुळे ते निराश होतात. त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास कोणी तयार नसतात; मग त्यांच्या सल्ल्याप्रमाणे वागणे किंवा त्यांचा कित्ता गिरविणे बाजूलाच राहिले.

त्यांच्या मार्गाने वाटचाल करण्याऐवजी इतर लोक त्यांच्या हेतूविषयी प्रवाद उठवितात, त्यांच्या प्रतिष्ठेवर शिंतोडे उडवितात, त्यांची वक्तव्ये आणि कृती विकृत स्वरूपात मांडतात आणि अखेरीस त्यांच्यावर हल्ला चढवितात.

आणि तरीही गांधीजींचे उदाहरण जरूर पाहावे. त्यांच्यावर, त्यांची शिकवण आणि कार्य यांवर टीकेचा भडीमार झाला आणि त्यांना शिव्याशाप देण्यात आले, एवढेच नव्हे तर अखेरीस त्यांना ठार मारले. ज्या महान तत्त्वासाठी त्यांनी आयुष्य वेचले ते अखंड भारताचे स्वातंत्र्य अखेरीस साध्य झाले नाही. त्यापेक्षा वाईट म्हणजे हिंदू-मुस्लिम एकजूट, पाश्चात्त्य जीवनाच्या समस्येवरील प्रभाव दूर करणे ही त्यांची तुलनेने लहान उद्दिष्टेसुद्धा साध्य होऊ शकली नाही. या साऱ्यांची हकीकत अवश्य वाचावी ती मनूबेनच्या दैनंदिनीत. गांधीजींच्या नौखाली आणि कलकत्ता येथील वास्तव्याच्या नोंदी त्यात आहेत. निर्मलकुमार बोस आणि प्यारेलाल यांनी गांधीजींची शेवटची काळजी त्यात लिहून ठेवलेली आहे. उपोषणाचा अनुभव गांधीजींना आयुष्याच्या शेवटी आला असे नाही. गोष्टींची पुस्तके आणि चित्रपट यांतून कोणाचाही असा समज होईल की, गांधीजींची सामान्य जनतेवर आणि सहकाऱ्यांवर विलक्षण मोहिनी होती आणि त्यांचे शब्द जणू काही फुलासारखे उचलले जात असत. खरी गोष्ट अशी की, गांधीजींनी सांगितलेल्या, सोप्या सोप्या गोष्टीही करायला कोणी तयार नसतात, असा अनुभव त्यांना वारंवार आला. शेवटी अनेक वर्षे तो सतत येत राहिला.

लोकहिताची कळकळ त्यांच्यात कुणी भरली नाही. त्यांचे भले करण्यासाठी त्यांच्या नाकदुऱ्या काढून आणि दादापुता करून त्यांना त्यांच्या भल्यासाठी आपल्याबरोबर चालण्यासाठी खटपट करणे ही गोष्ट सोपी नाही. गांधीजींना ते आयुष्यभर करावे लागले. ज्यांना आपल्याबरोबर नेण्याचा प्रयत्न त्यांनी केला ती माणसे गांधीजीपेक्षा सर्वार्थाने खुजी होती. त्यातील अनके माणसे अविश्वासार्हच नव्हती तर दुसऱ्या अनेकांचे प्रयत्न गांधीजींशी स्पर्धा करावी आणि त्यांनी चळवळीपूर्वी केले ते

मोडून टाकावे असा होता. चळवळीच्या प्रत्येक वळणावर निष्पन्न काय होणार ते असल्या माणसांच्या निर्णयावर अवलंबून राहत असे. भारताची फाळणी व्हावी की नाही ही गोष्टसुद्धा अखेरीस ब्रिटिशांच्या मंत्रिमंडळाने ब्रिटिश संसदेत कायदा करून ठरविली जाणार होती.

अर्थात ज्याच्यावर टीका होते, त्याचे काम निष्फळ ठरते आणि सामान्यजनांना आपल्याबरोबर आणले त्यांची दमछाक आणि निराशा होते, तो प्रत्येक माणूस गांधी असतो असा त्याचा अर्थ नाही.

मुद्दा आहे तो म्हणजे गांधीजींनासुद्धा या सगळ्या गोष्टींना सामोरे जावे लागले. यातून आपल्याला धीर आला. एवढ्या महात्म्याला सुद्धा जर उपेक्षा आणि शिव्याशाप, योग्य प्रतिसादाअभावी निराशा आणि जीवितकार्याची निष्फळता या गोष्टी सोसाव्या लागल्या, तर त्यांच्यासमोर किडामुंगीसारखे असणाऱ्या आम्ही कशासाठी दुःख करावे ?

असा विचार केला तर गांधीजींचा निराशेचा उद्‌गार हा आपल्यासाठी उत्तेजनाचे शब्द होऊ शकतात आणि गांधीजींची भाषणे आणि लिखाण हे असे प्रोत्साहनाचे अमोल भांडारच आहे. महादेवभाईंच्या दैनंदिनीत. महादेवभाई देसाई गांधीजींना येऊन मिळाले ते सन १९१७ मध्ये. १९४२ मध्ये येरवड्याला एकत्र अटकेत असताना महादेवभाईंचे निधन झाले. या एवढ्या काळात ते गांधीजींचे अतिशय निकटचे सहकारी होते. जिद्दी महादेवभाई हार खाण्याऱ्यापैकी नव्हते. गांधीजींचे सचिवालय त्यांनी एका हाती सांभाळले. गांधीजींचे रोजचे वेळापत्रक आणि कार्यक्रम कुणालाही थकवा आणील असा होता. दौऱ्यावर असताना तरी बहुधा ते दोन-दोन तास झोप घेत. उरलेल्या वेळापैकी प्रत्येक क्षण माणसे, बैठका, सार्वजनिक सभा आणि आगगाडी, मोटार, बैलगाडी अशा वाहनांतून प्रवास यांत ते गुंतलेले असत. महादेवभाई सतत त्यांच्या शेजारी असत. गांधीजींचा उपक्रम, पत्रव्यवहार, भाषणे आणि संभाषणे यांबद्दल जी माहिती आज आपल्याला मिळते त्याचे श्रेय महादेवभाईंना आहे.

महादेवभाईंनी आपली दैनंदिनी लिहिली. तिचे मूळ गुजराती २१ खंड आहेत. त्यांपैकी १९ अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत. १९ हिंदीमध्ये आणि पहिले १० इंग्रजीमध्ये अनुवाद होऊन प्रकाशित झाले आहेत. आजकाल असे आहे की, या प्रकाशनासाठी पुरेसा निधी मिळत नाही आणि प्रकाशित खंडांना पुरेसे ग्राहक मिळत नाहीत. त्यामुळे प्रकाशनाचे काम गोगलगाईच्या गतीने चालले आहे.

## कालखंड

तरीही ही दैनंदिनी म्हणजे सोन्याची खाण आहे. योगायोगाने सुटीत या दैनंदिनीचे शुद्ध अनुवादाचे पाच ते नऊ खंड वाचण्याची संधी मला मिळाली. त्यात उतरलेला कालखंड १७ नोव्हेंबर १९२४ ते मार्च १९२७. तुलनेने शांततेच्या काळात. चंपारण आणि रौलट चळवळ होऊन पुष्कळ काळ उलटला होता. खिलाफत चळवळीतून आरोप आणि दूषणाखेरीज दुसरे काही निष्पन्न झाले नव्हते. या चळवळीतून ज्या शौकत अली आणि महंमद अली यांना गांधीजींनी मोठे

केले त्यांच्याजवळ आता गांधीजींना द्यायला वेळ नसतो. गांधीजी त्यांना आपल्या दौऱ्यात सामील करून घेण्यासाठी बोलावीत आणि ते अगोदर दुसरी कामे ठरली असल्याची सबब सांगतात. गांधीजींनी त्यांच्यावर सर्वार्थाने विश्वास टाकला होता. त्यामुळे कोहाटमधील हिंदूंच्या कत्तलीबाबत शौकत अलीने घेतलेली भूमिका पाहून गांधीजींना अतिशय आश्चर्य वाटले. त्या भागात तणाव वाढून खुनाखुनी होण्याचे कारण होते ते हिंदूंना सक्तीने धर्मांतर करून मुस्लिम बनवीत असत हे. याबाबतचा शौकत अलीचा दृष्टिकोन धक्कादायक होता. स्वामी श्रद्धानंद यांचा दिल्लीत एका मुसलमानाने दगाबाजीने खून केला. गांधीजी याच काळात गंभीररीत्या आजारी पडले. अखेरीस सर्वांसाठी एक वर्षभर पूर्णपणे बाजूला राहण्याचा निर्णय त्यांना घ्यावा लागला. राजकीय पातळीवरही स्वराज्य पक्षाने विधिमंडळात प्रवेश करण्याचा हट्ट धरला होता. गांधीजींनी काँग्रेसचे नियंत्रण पूर्णपणे त्यांच्याकडे देऊन टाकले. आपण फक्त तीनच उद्दिष्टांसाठी काम करणार असे त्यांनी सांगितले; हिंदू-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यतानिवारण आणि खादीचा प्रसार. काही काळाने यात गोरक्षणाची भर टाकली.

गांधीजींचा कार्यक्रम सौम्य आणि मवाळ होता. तो राबविल्याने देशात एकजुटीचे वातावरण वाढले असते आणि स्वराज्य खेचून आणण्याचे घटनात्मक सामर्थ्य मिळाले असते.

अशा स्थितीत गांधीजींच्या विचाराला लोकांचा प्रतिसाद कसा होता ? आणि लोक जे करीत होते किंवा करीत नव्हते त्याबाबत गांधीजींची प्रतिक्रिया काय होती ?

## ‘मी मेलो असे समजा’

नोव्हेंबर १९२४ मध्ये गांधीजींनी लाला लजपतराय यांना लिहिले होते– ‘सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे मी प्रश्न सोडवावा अशा अपेक्षेने प्रत्येकजण माझ्याकडे पाहतो, तरीही माझे असे स्थान कोठेच नाही. माझ्या सुशिक्षित देशबांधवांना माझ्या चळवळी कमालीच्या अव्यवहारी वाटतात. मला मात्र देशासमोर सध्या तेवढा एकच मार्ग खुला आहे असे वाटते’ (५, पृष्ठ १९).

गांधीजींनी जालियनवाला बागेला भेट दिली त्या वेळी झालेल्या सभा त्या दोन-तीन वर्षांतील सगळ्यात मोठ्या सभा ठरल्या. येथे वीस हजार लोक हजर होते. प्रास्ताविक स्वागताच्या भाषणात हिंदू-मुस्लिम ऐक्याचा उल्लेख कोणी केला नाही. महादेवभाई नोंद करतात, गांधीजींनी आपल्या भाषणात अतिशय करुण उद्‌गार काढले. ‘१९२१ साली मी देशाच्या दौऱ्याला सुरुवात केली त्या वेळी महात्मा गांधी की जय अशा घोषणा लोकांकडून ऐकण्याची सवय मला झाली होती. अमृतसरमध्येही तशा घोषणा अपेक्षित होत्या. त्या वेळी अशा घोषणा ऐकून मला वेदना होत असत आणि मी म्हणत असे की, या घोषणांचा वीट आला आहे. तुम्ही एकीकडे माझ्या नावाचा जयघोष करणार आणि दुसरीकडे गुन्हे करणार. यापेक्षा तुम्ही मला विसरून गेलात आणि त्याऐवजी सत्कृत्ये केलीत तर अधिक चांगले. अर्थात तरीही आजपर्यंत या घोषणा मी चालवून घेतल्यानंतर

त्याच्यासोबत हिंदू-मुस्लिम की जय या घोषणा दिल्या जात असत. हा जयजयकार एका व्यक्तीचा नसून स्वराज्य, चरखा, सत्य-अहिंसा यांचा आहे असे मी मानून घेत असे. आज मात्र या जयजयकाराची मला मनापासून घृणा वाटते. मी मेलो असे समजा. जगण्यात काहीही राम राहिला नाही आणि अस्तित्वाचा प्रत्येक क्षण एखाद्या ओझ्यासारखा वाटतो. मी सतत प्रार्थना करीत राहतो, परमेश्वरा, तू मला जिवंत ठेवणार असशील तर हिंदू-मुसलमान यांचा बंधुभाव निर्माण कर. त्यांच्या मनातून द्वेष, मत्सर आणि शत्रुत्वाचे विष नाहीसे कर. या गोष्टी आपण आपल्या अंत:करणातून उपटून बाहेर फेकून दिल्या नाहीत, तर गुलामगिरीचा ललाटलेख नियतीच्या हातानेच कायमचा लिहून ठेवला आहे असे समजा. आज तुम्ही महात्मा गांधी की जय ही घोषणा दिली. पण हिंदू-मुसलमान की जय असे मात्र कोणीही ओरडले नाही. कोणी तसे म्हणाला असता तर त्याला प्रतिसाद मिळाला नसता (५, पृष्ठ ४७).

डिसेंबर १९२४ च्या शेवटी काँग्रेसचे अधिवेशन बेळगावला भरले. गांधीजींनी अध्यक्षीय भाषण केले आणि इतरही प्रसंगी ते बोलले. एरवी अतिशय संयमाने बोलणाऱ्या गांधीजींच्या भावना बांध फुटून ओसंडून वाहिल्या. भाषणाची सुरुवात त्यांनी अशी केली–

'आजच्या इतक्या उदासीनतेने मी यापूर्वीच्या कुठल्याही काँग्रेस अधिवेशनाला गेलो नव्हतो. आज मला कणभरही उत्साह किंवा आस्था नाही. अंत:करण उल्हसित व्हावे असे आज काय आहे? १९२१ मध्ये नेता म्हणून मला त्यांनी मान्यता दिली होती. आज माझे स्थान तसे नाही. माझे म्हणणे ऐकण्याची लोकांची तयारी नाही. मला नेतृत्व आणि सत्तेची हाव आहे म्हणून हे बोलतो असे समजू नका. मी सत्तालोलूप असेन तर साऱ्या जगाने माझी छी:थू करावी. वस्तुस्थिती अशी आहे की, माझ्या सहकाऱ्यांच्या तुलनेत माझे स्थान कोणते हे आज मला समजत नाही. माझा पहिला आत्मविश्वास हरवला आहे. माझ्या या सहकाऱ्यांनी माझा पराभव केला, मी नकोसा झालो आहे असे स्पष्टपणे सांगितले, मूर्खपणाची बडबड थांबवा, चालते व्हा असे मला बजावले, तरीही मला आनंदच वाटेल. तथापि नियती तो आनंदही मला मिळू देत नाही' (५, पृष्ठ ६२).

## खादीधारी चोर

जानेवारी १९२५ च्या सुरुवातीला गांधीजी गोध्रा येथे पोहोचले. अस्पृश्यतानिवारणाचे कार्य कोणत्या परिस्थितीत चालले आहे याची पाहणी करण्यासाठी त्यांचे एक अगदी जुने सहकारी मामा फडके यांनी त्यांना बोलावले. नेहमीप्रमाणे गांधीजींच्या नजरेने एक बारकावा टिपला. एका शौचकुपाची बांधणी आलिशान, राजेशाही थाटाची आहे असे त्यांचे मत बनल्याचे महादेवभाई नोंदवितात. त्याबद्दल ठक्करबाप्पांकडे बोलताना गांधीजींनी शेरा मारला. 'हे सगळेच काम सोडून देऊन आत्मशुद्धीच्या मार्गाने का जाऊ नये असे मला वाटू लागले आहे. मी दिलेल्या उत्कृष्ट साधनांचा लोक गैरवापर करतात त्यामुळे त्यांचा प्रचार का करावा किंवा लोकांनी ती घेण्याचा आग्रह का करावा असा प्रश्न मला पडतो. बेळगावमध्ये खादीधारी

चोरांचा मेळावा पाहून हाच प्रश्न माझ्या मनात आला होता' (५, पृष्ठ ११९).

गांधीजी बोरसदला पोहोचले ते फेब्रुवारीच्या मध्याला. तेथे जुलमी करआकारणीविरुद्ध फार छान सत्याग्रह झाला होता. त्यामुळे गांधीजींच्या लेखी ते तीर्थक्षेत्र बनले होते. त्या वेळी गांधीजींचे भाषण ऐकण्यासाठी अफाट जनसमुदाय तेथे जमला होता. या वेळी मात्र एकच वर्ष उलटले असले तरी सभेला फारच थोडी हजेरी होती. गांधीजींनी आपल्या भाषणात असा उल्लेख केला; 'कैराचा सत्याग्रह म्हणजे आजवरचा उच्चांक आहे. याच्या तुलनेत बोरसदचा सत्याग्रह छोटा होता. तरीही तुमच्या उज्ज्वल यशाबद्दल मी तुमचे मन:पूर्वक अभिनंदन केले आणि हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र झाले आहे असे म्हणालो. पण आज मात्र देशातील इतर तीर्थक्षेत्रे जशी तीर्थक्षेत्रे राहिली नाहीत, तसेच बोरसदचे झाले आहे का असा प्रश्न पडतो. तुम्ही दिलेला लढा आणि मिळविलेला विजय हे सामान्य नव्हे. पण लढा सुरू करणे वेगळे आणि त्याचा योग्य तऱ्हेने शेवट करणे वेगळे. त्यानंतर काही विधायक काम चालू राहिले म्हणजे त्याचा योग्य शेवट. यशस्वी झालेला संघर्षही नंतर हवेत विरून जातो आणि त्यापासून दीर्घकाळ टिकणारा काही लाभ निष्पन्न होत नाही, असे अनेकदा घडते. संघर्षाचा शेवट विधायक कामाने करणे आणि दीर्घकाळ चाललेल्या उपोषणाचा योग्य शेवट करणे अनेकदा कठीण जाते. आपण हा अनुभव कैराच्या सत्याग्रहात घेतला, येथे घेत आहोत आणि युरोपात महायुद्ध संपल्यानंतर व्यापक प्रमाणात हाच अनुभव आला.

पण तरीही इतक्या पवित्र सत्याग्रहानंतरही पुढील काळासाठी काहीच निष्पन्न होत नाही हे कसे घडले ? एकच कारण दिसते. आपल्या लढण्याच्या पद्धती, नवथर उत्साह, घाईगर्दी होते, उत्साहाची सळसळ होते पण अपरिपक्वता होय. सत्याग्रह करताना आपण मन शांत ठेवायला पाहिजे आणि धीर बाळगला पाहिजे. हेच होत नसल्याने आपल्या विजयाचे लाभ विरून हरवून जात होते (५, पृष्ठे २६८-७३).

## अश्रुपूर्ण विनवणी

फेब्रुवारी १९२५ च्या अखेरीस गांधीजी आपल्या जन्मस्थळी, काठेवाड येथे एका सभेत बोलताना म्हणाले, 'काठेवाडला ही कदाचित माझी शेवटची भेट असेल. माझे आयुष्य फार राहिले असेल असे वाटत नाही. मी वारंवार सांगितलेल्या गोष्टींपैकी चरख्यावर सूतकताई केल्याने तुमचे काही नुकसान होत नाही ना ? उलट देशाला गरिबीतून वर येण्याची तशी संधी मिळते. तुम्ही जागे होऊन कृती करावी यासाठी आणखी किती वेळा डोळ्यांत पाणी आणि तुमच्या विनवण्या कराव्या हेच मला समजत नाही...!' (५, पृष्ठे ३१८).

लोक गांधीजींना देवाप्रमाणे भजत असत, पण त्यांची शिकवण, अश्रुपूर्ण विनवण्या प्रत्यक्ष आचरणात मात्र आणीत नसत. गांधीजी याबद्दल त्यांना नक्कीच रागवत, धारेवर धरीत. पालिताना येथल्या सभेत ते म्हणाले, 'आतापर्यंतच्या भाषणात राहून गेलेला एक मुद्दा लक्षात घ्या. नेहमी उल्लेख होतो तो फक्त माझाच, म्हणजे एका बाजूचा. पण तुमच्या रूपाने दुसरा पक्ष येथे हजर आहे,

त्याचे काय? तुम्ही माझी स्तुती केली खरी, पण जे गुण तुम्हाला माझ्यात दिसले ते तुमच्या अंगी बाणविण्यासाठी तुम्ही आजपर्यंत काय केले? लोकांना जे गुण आदर्श वाटतात ते आचरणात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावा, अशी माझी प्रार्थना आहे' (६, पृष्ठे १५५-५६).

आणखी काही दिवसांनंतर गांधीजी कराडी येथील सभेत बोलत होते. हिंदू-मुसलमान संघर्षाने आपल्याला अगदी हतबल करून टाकले आहे ही व्यथा या काळातील आपल्या भाषणांत गांधीजींनी अगदी खुल्या अंत:करणाने व्यक्त केलेली दिसते. 'हिंदू-मुसलमान ऐक्याच्या प्रश्नाने आज घेतलेले वळण दुर्दैवी आहे. तुम्ही तर सारे दोर कापून टाकले आहेत. शौकत अली आणि शोएब यांनी काल दिवसभर हा विषय हाताळला. त्यांना माझ्याबरोबर मी येथे आणू शकलो नाही कारण स्थानिक खिलाफत समितीच्या विरुद्धच्या मुंबईकरांच्या संशयाचे निराकरण करण्याचा त्यांनी विडाच उचललेला आहे. माझ्यापुरता मी या प्रकरणातून बाहेरच पडलो आहे. या वळणावर माझ्या सल्ल्याचा काही फायदा नाही. तुम्ही सुचविलेला मार्ग फक्त शूर माणसे आचरणात आणू शकतील. सामान्य माणसाचे ते काम नाही. खून के बदले खून माझ्या धर्मात बसत नाही आणि लोकांची मने बदलून त्यांना माझ्या धर्माकडे आणण्यात मला यश येत नाही. अखेर मी तो प्रयत्न सोडून दिला. मुसलमान आणि हिंदू दोघेही माथेफिरू बनले आहेत. दोघेही एकमेकांचे लचके तोडीत आहेत' (६, पृष्ठे, १८९-९०).

गांधीजींचा दौरा येथे संपला; त्यामुळे जागोजागी सामोरी आलेली उघड उदासीनता आणि त्यावर चाललेली बिकट अवस्था यासाठी त्यांनी सहन केले; 'या बैठकीसोबतच माझा दौरा संपला. येथे ज्या अनुत्साहाच्या भावना दिसतात त्याची काही कारणे असू शकतील. सामान्य लोक हे पहिले, कार्यकर्ते हे दुसरे आणि देशातील सद्य:स्थिती हे तिसरे. देशातील उत्साहाला लागलेल्या ग्रहणाची खरी कारणे काहीही असोत. पण मी लोकांपुढे फार अवघड कार्यक्रम मांडले आणि त्यामुळे लोकांचा उत्साह ओसरला म्हणून मी दोषी असे लोक म्हणतात. अशातून दोष घ्यायला मी तयार आहे. पण माझ्यापुढे दुसरा काही पर्याय नव्हता. रोग्याने वैद्याला बोलाविले, वैद्याने विशिष्ट औषधोपचार सांगितले, रोग्याने ते घेतले नाहीत, परिणामी रोग बरा झाला नाही, तर दोष कोणाचा? याउप्परही तोच वैद्य हवा असा आग्रह धरला असेल तर करावे तरी काय? अशा वेळी वैद्याची जी अवस्था होईल तीच माझी आज झाली आहे. तुमचे दु:ख दूर करण्यासाठी जे उपाय मी सांगितले ते तुम्हाला नकोत आणि तरीही तुम्ही मला बोलावता आणि माझे म्हणणे ऐकून घेऊ इच्छिता. मात्र माझा सल्ला कृतीत आणीत नाही. अशा चमत्कारिक पेचात मी सापडलो आहे (६, पृष्ठे २१४-१५).

## निरुपयोगी आणि असाध्य

मे १९२५ मध्ये गांधीजी कलकत्याला होते. डॉ. पी. सी. रे सभेच्या अध्यक्षस्थानी होते. गांधीजींनी भाषणात काँग्रेसचे नेहमीचे कार्य इतरांकडे का सोपवावे लागले आहे आणि आपण स्वत: त्रिसूत्रीवर लक्ष केंद्रित का करीत आहोत

याचा खुलासा केला; 'काँग्रेसच्या कामाचे मी दोन विभाग केले आहेत. एकाने बाहेर तर दुसऱ्याने आत होईल ते काम करावयाचे आहे. पहिला भाग स्वराज्य पक्ष पाहील आणि आपण सगळे दुसऱ्याकडे लक्ष देऊ. उत्साहाने कार्यक्रम घेऊन मी देशभर फिरतो आहे. आपले पहिले सूत्र हिंदू-मुसलमान एकता. त्याबाबत माझे पंख कापले गेले आणि मी पूर्णपणे असहाय्य झालो आहे. एके काळी हुकमी इलाज ठाऊक असलेला डॉक्टर अशी माझी स्वत:बद्दलची कल्पना होती. धार्मिक वृत्तीवर रामबाण उपायाचा जणू ताईत माझ्या जवळ आहे असे मला वाटत होते. पण मी काही करू शकत नाही हे माझ्या लक्षात आले. आज मी सुचविलेले उपाय हिंदू किंवा मुसलमान दोघांनी स्वीकारले नाहीत. मी एवढेच म्हणेन की, हिंदू-मुसलमान एकजुटीविना स्वराज्य पोकळ, निष्फळ ठरेल' (६, पृष्ठे २२८-२९).

या विषयावर ते आपली निराशा आणि असहाय्यता पुन:पुन्हा व्यक्त करीत होते. 'हिंदू-मुसलमान ऐक्य अनावश्यक आहे का? अशक्य आहे का? पण या समस्येवर मी सांगितलेला तोडगा कमी आहे असे दिसते. मी सुचविलेले उपाय तुम्हाला नापसंत आहेत. एकमेकांची डोकी फोडण्याचा जर आपला विचार असेल, तर ते काम तरी धैर्याने करा. मग नक्राश्रू कशाला ढाळायचे?' (६, पृष्ठे २३१-३२).

'हिंदू-मुसलमान आणि भारतातील सर्वांनी प्रेमाने सामंजस्याने नांदले पाहिजे. पण त्यांच्यातला अविश्वास वाढत चालला आहे. एकमेकांविषयी वाटणारा द्वेष एकजुटीच्या आड येतो. यावर मी उपाय सुचविले, पण मला यश आले नाही. आता काय करावयाचे? कोणत्या ना कोणत्या ठिकाणी आपण एकमेकांशी झुंजण्याची रग जिरवून घ्यावी. या प्रश्नाचा निकाल लढूनच लावायचा तर निदान शूरवीरासारखे लढू. पण ही लढाई संपल्यानंतरही राहावे लागेल ते एकजुटीच्या भावनेनेच. हिंदू किंवा मुसलमान दोघांपैकी कोणाचीही पूर्णपणे कत्तल उडविणे अशक्य आहे. कधीही एका जमातीने पूर्णपणे स्थलांतर किंवा धर्मांतर करणे हे अशक्य आहे. त्यामुळे आज मी शांत राहतो, काय घडत आहे ते पाहात आहे. मनसोक्त लढून झाल्यानंतर तरी एकजूट होईल अशी आशा मला वाटते. माझी इच्छा अशी की, हिंदू किंवा मुसलमान कोणीच एकमेकांची डोकी फोडून पळून जाऊ नये किंवा एकदा लढावयाचे ठरवल्यानंतर न्यायालयाच्या आडोशाला लपू नये' (६, पृष्ठे २३५).

दौऱ्यातील प्रत्येक मुक्कामावर बोलताना गांधीजींनी आपली असहाय्यता व्यक्त केली. मुसलमानांच्या सर्व मागण्या हिंदूंनी देऊन टाकाव्यात हाच शहाणपणाचा मार्ग आहे हे एक दिवस सर्वांनाच पटेल, याबद्दल त्यांची खात्री होती. परंतु आज मी निरुपयोगी आणि असाहाय्य ठरलो आहे. माझ्या उपायांचा आज काही उपयोग नाही. हिंदू आणि मुसलमानांना लढावयाचेच असेल तर एकदाचे समाधान होईपर्यंत लढू द्या. पद्मा नदी त्यांच्या रक्ताने लाल होऊन जाऊ द्या. हे जर घडले तर काय फरक पडणार आहे? मुसलमान देश सोडून जाणार आहेत

का? हिंदू स्थलांतर करणार आहेत का? शेवटी निसर्गच आपल्या पद्धतीने प्रश्न सोडवेल. पण हा काही माणुसकीचा मार्ग म्हणता येणार नाही' (७, पृष्ठे २२).

वेश्यांचे पुनर्वसन करावे असे आवाहन गांधीजींनी केले होते. एका सहकाऱ्याने त्यालाही वाकडे वळण दिले. गांधीजींना अतिशय वेदना झाल्या. वेश्यांचा व्यवसाय सोडून द्यावा यासाठी त्यांचे मन वळवून समाजात त्यांना दुसरा व्यवसाय आणि स्थान मिळवून द्यावे असे आवाहन गांधीजींनी केले होते. त्यांच्या काही अनुयायांनी मात्र वेश्यांना शरीरविक्रयातून मुक्त न करता त्यांचा राजकारणासाठी उपयोग करून घेतला. गांधीजींनी आपली निराशा कडक शब्दांत व्यक्त केली, 'माझ्या उपदेशाला इतके विकृत स्वरूप देण्यात येणार असेल तर मी बुडून मेलेला बरे' (७, पृष्ठे ७८-७९).

शोएब कुरेशी या राष्ट्रीय मुस्लिम गृहस्थाने गांधीजींच्या तुरुंगवासाच्या काळात १९२२ मध्ये 'यंग इंडिया'चे संपादन केले होते. त्यांना लिहिलेल्या एक पत्रातही असहाय्यतेमुळे बाजूला राहण्याचा गांधीजींचा इरादा स्पष्ट दिसतो. 'हिंदू-मुसलमान झगड्याच्या संबंधात तुम्ही जे लिहिले ते योग्यच आहे. महंमद पैगंबराच्या सहकाऱ्याने उस्मानच्या काळी जे केले त्याचेच मी अनुकरण करीत आहे. इस्लामची विविध धर्मपंथांत फाळणी झाली तेव्हा हे निष्ठावंत घसरून जाऊ लागले. आज या दोन जमाती कुत्र्या-मांजरासारख्या भांडत असता पाहणे एवढेच आपल्या हातात आहे' (७, पृष्ठे १२०-२१).

कटकमध्ये गांधीजी गेले ते मुख्यतः मधुसूदन दास यांनी उभारलेला चामडे कमविण्याचा कारखाना पाहण्यासाठी. तिथल्या सभेला प्रचंड गर्दी झाली होती. ऐन वेळी जोरदार पाऊस आला आणि सभेची व्यवस्था विस्कळित झाली. आपल्या साध्या-सोप्या संदेशात गांधीजींनी खादी आणि संयमावर भर दिला. लोकांची दरिद्री अवस्था पाहून ते हळहळले. 'माझे दुःख कोणत्या शब्दांत व्यक्त करू ते समजत नाही. खादीच्या कामात तुम्ही सहभागी झालात तर संपूर्ण देशाला पुरेल इतकी खादी तुम्ही तयार करू शकाल. त्याऐवजी तुम्ही आपले खेडे सोडून शहरात जाता, मजुरी करून मिळणाऱ्या थोड्या पैशात जुगार आणि दारूसारखी व्यसने करता. हे सगळे कष्ट तुम्ही सोसता, त्याऐवजी घरी राहून काम का करीत नाही?' (७, पृष्ठे १८२).

देशबंधू चित्तरंजनदास निधन पावले. त्यांच्या शेवटच्या दिवसांत त्यांच्यासोबत राहण्यासाठी गांधीजी दार्जिलिंगला गेले होते. आपल्या भाषणात ते या दिवसांची आवर्जून आठवण करतात. खादीच्या प्रचारासाठी त्यांनी देशबंधू स्मारक निधी स्थापन केला. पण सधन बंगाली लोकांकडून त्याला फारच कमी प्रतिसाद मिळाला. बऱ्याचशा देणग्या आल्या. त्या मध्यम व कनिष्ठवर्गीय बंगाल्यांकडून आणि मारवाडी आणि गुजराती यांच्याकडून (७, पृष्ठे १९६-९७).

## आणखी एक अधिवेशन व ठराव

काँग्रेसचे अधिवेशन कानपूरला भरले. मुख्य ठराव होता तो विधिमंडळात

प्रवेश करण्याबाबत. मतभेद भरपूर होते आणि प्रत्येकजण आपल्या मताला सर्वार्थाने गांधीजींच्या भाषणाचा आधार घेत होता. हताश आणि एकाकी झालेले गांधीजी शांत बसले होते. शामसुंदर चक्रवर्ती हे बोलत होते. महादेवभाई यांनी त्यांचे वर्णन कट्टर गांधीवादी आणि म्हणून नाफेरवादी असे केलेले आहे. आपल्या भाषणात त्यांनी गांधीजींच्या अवस्थेचे वर्णन केले आहे. 'महात्मा गांधीजींनी •हा ठराव मान्य केला आहे असे सांगण्यात येते. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव बारकाईने पाहात आहे. विषयनियामक समितीच्या चार तासांच्या बैठकीत मी जे काही अनुभवले त्यामुळे या ठरावाला विरोध करावा असे मी ठरविले. गांधीजींची अवस्था आहे ती 'हात उंचावून मी ओरडतो पण कोणीही माझे ऐकत नाही,' अशा तऱ्हेची. जेथे धर्म आहे तेथे जय आहे हे लक्षात ठेवा. तुम्ही परमेश्वराला हाक तर मारता, पण त्याने सांगितल्याप्रमाणे वागत मात्र नाही. ठरावाला पाठिंबा देण्याऐवजी मला संत तुळशीदासांचा मार्ग जास्त योग्य वाटतो; 'तुलसी मस्तक नमाई तब धनुष्यबाण लिओ हाथ!' हा ठराव मंजूर केला तर महात्माजींना धक्का बसणार नाही का ?'

शेवटी लाला लजपतराय यांच्या आवाहनाला मान देऊन गांधीजींनी आपला हात वर केला. महादेवभाई सांगतात की, सर्वनाश ओढवणार असेल तर शहाणा मनुष्य निम्म्याचा त्याग करायला तयार होतो. (सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडिता) या वचनानुसार त्यांनी अखेर नाइलाजाने ठरावाला पाठिंबा दिला.

प्रत्येक युद्धात सरकार आपला पराभव का करते? या अधिवेशनातील भाषणांमध्ये निराशेची झलक मोठ्या प्रमाणात दिसली. सर्वच विचारसरणीचे नेते निराश झालेले दिसत होते.

मालवीयजी म्हणाले, 'असहकार आंदोलन फसले, त्यातील स्वराज्यपक्षवाले उभे राहिले. त्यांना विधिमंडळात जावयाचे तर खुशाल जाऊ द्या असे मी म्हणेन. परंतु तेथेही त्यांनी सतत अडथळे आणण्याचे धोरण स्वीकारले आणि नंतर ते सोडून दिले. दुर्दैवाने आज मला असे म्हणावे लागेल की, माझे मित्र मोतीलाल नेहरू अपयशी ठरले आहेत. देशाच्या मुक्ततेची आज गरज आहे, ती एक हृदय, एक आवाज आणि देशबांधवांना एकच आवाहन याची. आज सरकार आपल्या मागण्या मानीत नाही. खडकसिंगांसारखे वीर तुरुंगात खितपत पडले आहेत. प्रत्येक लढाईत सरकार आपल्याला पराभूत कसे करू शकते? विजय मिळवायचा असेल तर भक्कम आदर्श असलेला काँग्रेस पक्ष हाच उपाय आहे. आज आपण एकमेकांत लढतो आहोत. काँग्रेस पक्षात पूर्वीपासून व्यासपीठे स्थापन करायला परवानगी असल्याने अशी अंतर्गत भांडणे चालूच राहणार. आज खरी गरज आहे ती सर्वांना एकत्र आणणाऱ्या कार्यक्रमाची. जमीनमालक आणि कुळे, आधुनिकतावादी, स्वराज्यवाले, स्वतंत्र ह्या साऱ्यांनी एकत्र यायला हवे. मी बोलतो आहे ते सारे सत्य आहे आणि आज ना उद्या तुम्ही ते स्वीकाराल याची मला खात्री आहे. आज गरज आहे ती पक्षासाठी नव्हे, तर देशासाठी स्वतःला वाहून घेण्याची. त्यासाठी गांधीजींचा सल्ला ऐकावा.' पंडित मोतीलाल नेहरूंनी उत्तर दिले, 'पंडित

मालवीय यांच्याबद्दल मला वडिलांसारखा आदर वाटतो. गांधीजींविषयी मला प्रेम आणि भक्ती आहे. निखळ सत्य हा असहकारी आंदोलनाचा आधार होता. परंतु आपल्यातील ती नाव आपण प्रवाहाच्या मध्यावर आल्यानंतर बुडू दिली. १९१९ पर्यंत आपण सरकारशी सहकार्य केले. परंतु त्याचे फळ मिळाले ते जालियनवाला बागेच्या रूपाने. ब्रिटिश लोक स्वतः प्रामाणिक असतील तेवढे ते त्यांच्या प्रजाजनांच्या दृष्टीने धोकेबाज ठरतात. जगाच्या राजकीय शब्दकोषात न्याय आणि दया हे शब्दच नाहीत. महात्माजी स्वतः प्रामाणिक आणि अध्यात्मवादी असल्याने आपला प्रतिस्पर्धी तितकाच शुद्ध चारित्र्याचा असेल असे त्यांना वाटते. असहकार आंदोलन सरकारच्या बळाचा पराभव करू शकेल; परंतु त्यांच्या कावेबाज मुत्सद्देगिरीचा पराभव करता आला पाहिजे. मी छातीठोकपणे सांगतो की, भारतीयांनी अगदी काटेकोरपणे तर्कशुद्ध वर्तन करावयाचे असेल तर ते कधीच ध्येय गाठू शकणार नाहीत.' अशा तऱ्हेने काँग्रेसचे कामकाज चालू होते. महादेवभाईंनी लिहिले आहे की, 'बहुतेक सर्व भाषणांना निराशेची गडद किनार होती' (७, पृष्ठे ३४९-५४).

## राष्ट्रीय सप्ताह

एप्रिल १९२६ मध्ये पंजाबमधील पूर्वीच्या अत्याचाराच्या स्मरणार्थ राष्ट्रीय सप्ताह पाळावा असे गांधीजींनी सुचविले. ६ एप्रिलला तो सुरू होणार होता. याच दिवशी डायर यांनी जालियनवाला बागेत गोळीबार केला होता. गांधीजी अहोरात्र खादीचा मंत्र जपत होते. लोकमान्य टिळकांनी दिलेला मंत्र "स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच" हा होता. गांधीजी हा मंत्र लोकांना वारंवार सांगत आणि पुढे असेही सांगत की, लोकमान्यांनी ध्येयाप्रत जाण्याचा मार्ग सांगितला नाही, तो सांगून मी त्यांचा मंत्र पूर्ण करतो; "स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि सूतकताई हा त्याचा मार्ग आहे." अहमदाबादमधील या दिवसाच्या सभेत वक्ते म्हणून राजाजींना बोलाविले होते. आसपास नजर टाकून ते म्हणाले, 'या पवित्र दिवशी स्वराज्य आणि खादीचा पाया घातला गेला त्याचा उत्सव साजरा करण्यासाठी आपण सारे परदेशी कपड्यात जमलो आहोत, ही किती विचित्र गोष्ट आहे! शाकाहाराच्या समर्थनार्थ आपल्या तत्त्वाचा सोहळा मांसाहाराने साजरा करावा अथवा पूर्णपणे निर्व्यसनी असणाऱ्यांनी आपल्या सभेत मद्याचे वाटप करावे इतके हे चमत्कारिक आहे. आपण ज्या सोहळ्याला जमलो आहोत त्याची कल्पना गांधीजींच्या प्रतिभेतून उगम पावली. अशा दिवशी आपण राष्ट्रवेष परिधान केला तरच असा दिवस साजरा करण्याला काही अर्थ राहील. आपल्या मुक्तीची ती पहिली पायरी ठरेल आणि ही पहिली पायरी आपण नीट पार पाडली, तर तो कदाचित प्रयत्नांचा शेवट ठरू शकेल. परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे तब्बल सात वर्षे लढा दिल्यानंतरही खादी हा आपला एकमेव राजकीय कार्यक्रम आहे. हे अजून आपल्या लक्षात आलेले दिसत नाही. सरकारकडे अर्ज-विनवण्या करणे, विधिमंडळात भाषणे देणे, जाहीर सभा घेणे, उच्च शिक्षण किंवा वृत्तपत्रीय लेख लिहिणे यापैकी कुठलाही कार्यक्रम खादीइतका

परिपूर्ण नाही, प्रभावशाली नाही. जे खादी वापरत नाहीत ते या राष्ट्रीय उपक्रमात सहभागी तर होत नाहीतच, पण त्याच्या विरोधात काम करतात...'

एकात्मतेचा मार्ग सुस्पष्ट आहे आणि त्याचा शेवट अगदी डोळ्यांसमोर आहे, असे सांगून राजाजी म्हणाले, 'वेडाचार करण्याचे आपण जाणूनबुजून ठरविले आहे. तेव्हा आपण सहभागींचा सल्ला ऐकणार कसे?'' (७, पृष्ठे १२९-३२).

## असाध्य रोग

हिंदू व मुसलमान तणाव आणि दंगली देशाला भेडसावीत राहिल्या परंतु एकमेकांना क्षुद्र मानणाऱ्यांना शहाणपण शिकविणे, वेळ खर्च करणे म्हणजे आपली शक्ती आणखी क्षीण करून घेणे, असे गांधीजींना वाटले. त्यांच्या मते दोन्ही बाजूंच्या शहाण्यासुरत्या लोकांनीही बेफाट अफवांनी आपली माथी भडकवून घेतली होती. महंमद अली यांच्या विचारांचे समर्थन करणे आपल्याला शक्य नाही, असे गांधीजींनी एका मुस्लिम मित्राला सांगितले (८, पृष्ठे १९५-९६). गांधीजी त्यामुळे शांत राहिले. ते म्हणाले, 'काही वेळा असे असते की, अडचणी सोडविण्याच्या प्रयत्नांमुळे अडचणी वाढतात. अगदी बीजगणितातील एक प्रश्न सोडविण्यात माझे सर्व प्रयत्न फसले. थकून मी माझी पाटी बाजूला ठेवून दिली. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचे उत्तर आपोआप मिळून गेले. परंतु प्रथम मला पाटी बाजूला ठेवावी लागली होती. आजच्या दंगली हा असा असाध्य रोग आहे. लोक मोर्चाने एकमेकांविरुद्ध उठले की, आपण मार्गदर्शन आणि नियंत्रण करूच शकत नाही. तेव्हा आपण करणार तरी काय? चिखलात हात घातला तर तो बरबटणारच. चिखल काही स्वच्छ होणार नाही. प्रेषिताच्या मृत्यूनंतर असा प्रश्न आला होता. त्यावर पुन्हा सज्जन लोकांनी गुहांमध्ये एकांतवासाचा आसरा घेतला होता आणि तेथून त्यांनी इस्लामला वाचविले. ज्याला आपल्या मर्यादा कळतात आणि आपली असहाय्यता जाणून जो प्रसंगी शांत बसतो तोच शेवटी जिंकतो. असाच माणूस एके दिवशी हा रोग बरा करतो. त्यांची ही आग विझविण्याचा प्रयत्न करायला गेलो तर आग आणखी भडकेल. आपल्या कृतींनी आग आणखी पेटविता कामा नये. आग लागते तेव्हा अग्निशमन दल अजून न पेटलेल्या घरावर पाण्याचा फवारा मारते. जे अगोदर जळून गेले आहे त्या घरावर नव्हे' (८, पृष्ठे २२२).

गांधीजींनी बायबलावर प्रवचने देण्यास सुरुवात केली. प्रवचने अगदी निरुपद्रवी होती. गांधीजी धर्मग्रंथावर बोलत त्यामुळे त्यामधील अहिंसा आणि सत्याग्रह यांना पोषक अशा भागावर भर देत. परंतु सनातनी हिंदूंनी गांधीजी आपल्या आश्रमातील अनुयायांना ख्रिस्ती करणार आहेत, अशा वावड्या उठविल्या. त्याउलट चर्चच्या धर्मगुरूंनी गांधीजी बायबलभाष्य करण्यासाठी पात्र नाही असा आक्षेप घेतला! त्यावर गांधीजी म्हणाले, 'काळ असा आहे की, मी चांगले किंवा वाईट काही बोललो तर त्यावर टीकेचा भडीमार होतो. दुसऱ्या कोणी बायबल वाचले असते तर असा निषेध झाला नसता' (८, पृष्ठे २२३; ९, १२३).

## गांधीजींना हुरूप यावा म्हणून-

१९२६ साल संपत आले. गांधीजींनी आपले मौनव्रत सोडून पुन्हा क्रियाशील होण्याची तयारी दाखविली. मध्यप्रांतात ते दौरा करणार होते. जमनालाल बजाज मोठे जिद्दीचे कार्यकर्ते. महादेवभाईंनी लिहिले आहे की, गांधीजी जाणार असलेल्या भागात जमनाजींनी दोन-तीन आठवडे लोकजागृतीचे कार्य केले. लोकांनी गांधीजींचे भरघोस स्वागत करावे आणि पुन्हा गांधीजींना कामाला हुरूप मिळावा हा उद्देश त्यामागे होता. (९, पृष्ठे १७).

या वेळी वर्ध्यामध्ये एक सभेत बोलताना जमनालाल म्हणाले, 'तुम्ही आश्रमात येता ते भक्तीपोटी. पण तुम्ही विदेशातून आयात केलेल्या किंवा करून बनविलेल्या कपड्यांची वस्त्रे परिधान करून आलात तर तुमचा काय उपयोग ? तुम्हाला अशा कपड्यात पाहून गांधीजींना वेदना होतात, म्हणजे तुमचे कष्ट वाया जातात. अशा भेटीचा मलाही काही फायदा नाही आणि गांधीजींनाही. त्यापेक्षा तुम्ही त्यांना न भेटलेलेच बरे. गांधीजी आपले मौन सोडून आपल्या शहरात वीस तारखेला येत आहेत. त्यांना न आवडणारे कपडे घालून तुम्ही त्यांचे स्वागत करणार का ?' अर्थात प्रत्यक्ष वीस तारखेला सभा झाली तेव्हा जमनाजींच्या आवाहनाचा लोकांवर फारसा परिणाम झाला नाही, असे दृष्य दिसले ! (९, पृष्ठे १८, १९).

गुवाहाटी येथील काँग्रेस अधिवेशनाला उपस्थित राहण्यासाठी गांधीजी निघाले. लाला लजपतराय यांना कलकत्ता येथे भेटले. लालाजींनी सांगितले, 'मित्रांबरोबर वाद-भांडणे होऊ नयेत यासाठी मी अधिवेशनाला हजर राहणार नाही.' (९, पृष्ठ २५).

शीरभोग रेल्वे स्थानकावर गांधीजींना लालाजींची तार मिळाली, 'स्वामी श्रद्धानंद यांची दिल्लीत एका मुस्लिमाने दगाबाजीने हत्या केली.'

काँग्रेस अधिवेशन भरले ते अशा उदास वातावरणात !

स्वागत समितीने दरडोई प्रतिनिधी शुल्क एक रुपयांपासून पाच रुपयांपर्यंत वाढविले होते. महादेवभाईंनी लिहिले होते, 'काँग्रेसकडे निधीच नव्हता, त्यामुळे स्वागत समितीला ती काही मदत करू शकली नाही. निधीच नव्हता हे स्वाभाविकच आहे. कारण काँग्रेसने लोकांचा विश्वास गमावला होता. त्यामुळेच प्रतिनिधी शुल्क वाढविण्याचा घटनाबाह्य ठराव मंजूर झाला. आमची किती अधोगती झाली आहे हेच यातून दिसले' (९, पृष्ठ ५४).

गांधीजींची खादीबद्दलची आग्रहाची कल्पना असल्यामुळे आणि काँग्रेसमधील स्वराज्य पक्ष व नाफेरवादी गटात तडजोड झालेली असल्यामुळे पंडित मोतीलाल नेहरूंनी खादीचा प्रचार कसोशीने करण्याबाबतचा ठराव मांडला. गांधीजींनी त्यावर आपले ठाम मत खास शैलीत मांडले, 'माझ्याविषयी आदर किंवा सहानुभूती असली तरी ती बाजूला ठेवा. मी काय म्हणालो हे पूर्णपणे लक्षात घेऊन तुम्ही या ठरावाच्या बाजूने मतदान केले तर ते योग्य होईल. हा ठराव तुम्ही संपूर्ण प्रामाणिकपणे आणि कार्यक्षमतेने अमलात आणलात तरच त्याचा फायदा

होईल. पण नावापुरता पाठिंबा दिलात तर त्यात काही अर्थ नाही. मला कोणाच्याही दयेची गरज नाही. माझ्यावर मेहेरबानी म्हणून हा ठराव करणार असाल तर त्याची काहीही गरज नाही. मी स्वातंत्र्यप्रेमी आहे आणि इतरांचे स्वातंत्र्य हिरावून घेणेही मला आवडणार नाही. आपल्या सदसद्विवेक बुद्धीचे समर्थन करणे मला आवडते. सदसद्विवेक बुद्धी म्हणजेच परमेश्वर. म्हणूनच तुमच्या सारासार विवेकानुसार मतदान करा' (९, पृष्ठे ४७).

गुवाहाटीहून परतताना गांधीजींनी बंगाल आणि महाराष्ट्राचा दौरा केला. हिंदू व मुसलमानांतील तणाव वातावरणात आणि प्रत्येकाच्या मनात होता. गांधीजींचे याबाबतचे उत्तर ठरलेले होते. या अतिशय महत्त्वाच्या बाबतीत त्यांनी करण्यासारखे काही बाकी राहिले नव्हते. खरे म्हणजे हा प्रश्न आता मानवी प्रयत्नांच्या कक्षेबाहेर गेला होता. परमेश्वरच आता तो सोडवू शकला असता. पती असहाय्य ठरल्यानंतरच द्रौपदीने जसा ईश्वराचा धावा केला होता. तशी आपण सर्वांना सद्बुद्धी देण्यासाठी ईश्वराची प्रार्थना करीत आहोत असे गांधीजींनी सांगितले (९, पृष्ठे ७८, ८३, ९६, १११/१२).

## माझ्या आत्म्याच्या यातना

मार्च १९२७ मध्ये गांधीजींचा दौरा धुळे, नाशिक, सोलापूर, गुलबर्गा असा सुरू होता. आपल्या भाषणातून ते नेहमीच्याच साध्या, व्यावहारिक आणि देशहिताच्या मुद्यांची उजळणी करीत होते. अस्पृश्यतानिवारण, खादी, जुन्या धर्तीच्या पांजरपोळामध्ये सुधारणा करून आदर्श गोशाळा स्थापन करणे, चामडे कमावण्याची केंद्रे सुरू करणे, यांसारख्या गोष्टींवर त्यांचा भर होता. 'परदेशात खादीचा व्यापार करणे अजूनही आपल्याला आवडेल. आपली जनावरे मरण पावली तर आपणच त्यांचे चामडे कमवावे हे आपल्याला पटत नाही. आपल्या पांजरपोळाचे रूपांतर चांगले दूध आणि कातडे देणाऱ्या गोशाळेत करावे, ही कल्पना आपल्याला मुळीच पसंत पडत नाही. माझ्या आत्म्याला यामुळे किती यातना होतात ते सांगणेसुद्धा अवघड आहे. मी चुकीचे सांगत आहे असे तुम्हाला वाटते का ? म्हातारपणाने माझी बुद्धी चळली आहे का ? मी चुकीचे बोलतो आहे हे कोणी सिद्ध करून दाखविले तर माझा सगळा अहंकार गुंडाळून मी त्याच्या पायावर लोळण घेईन. एक तर हिमतीने तुमचे मत पटवून द्या, नाहीतर माझ्या मार्गाने चला आणि खादी व गोरक्षेचे व्रत घ्या' (९, पृष्ठे २००-२०१).

हिंदू व मुसलमानांनी एकमेकांच्या हत्या कराव्यात यामुळे गांधीजींना वेदना झाल्या; पण याही बाबतीत ते असहाय्य होते. गुलबर्ग्यातील भाषणात ते म्हणाले, 'आपल्या मनातील व्यथा तुमच्या समोर उघड कराव्यात असे मला कधीही वाटले असले तरीही ते अरण्यरुदन ठरेल, हे मी जाणतो. त्यामुळे मला या वणव्यातून सोडव अशी प्रार्थना मी परमेश्वराकडे दररोज करीत असतो. तथापि, मी एक श्रद्धाळू आणि सत्याग्रही हिंदू आहे. त्यामुळे माझ्या अंतःकरणातील भावना तुमच्यापासून लपविणे माझ्या ब्रीदाला शोभणार नाही. मी देवळात गेलो तेव्हा जेथून मूर्ती हलविली आणि नंदीचा पावित्र्यभंग केला ते ठिकाण दाखविले.

त्या दृष्याने मला अत्यंत दुःख झाले. तुम्ही मला मूर्तिपूजक म्हणालात तरी चालेल. मी तर सर्वत्र आणि सगळ्याच गोष्टीत ईश्वरी रूप पाहतो. अपवित्र कृत्य परमेश्वराला मुळीच आवडणार नाही. येरवड्याच्या तुरुंगात असताना मौलाना शिब्ली यांनी लिहिलेले महंमद पैगंबराचे चरित्र वाचले. मी उस्वा-ई साहेबा हेही वाचले आणि ज्यांनी ही कृत्ये केली, ते चुकले असे मी खात्रीने म्हणतो. इस्लामला अशा गोष्टी अजिबात मान्य नाहीत. ज्यांनी हे कृत्य केले ते माणसाचेच नव्हे तर ईश्वराचे गुन्हेगार ठरतील. ह्या गोष्टी ऐकल्यावर हा सारा मामला आपल्या हद्दीबाहेर गेला आहे, अशी माझी खात्री पटली. हिंदू-मुसलमान ऐक्यासाठी ज्यांनी आपला सारा वेळ खर्च केला आणि परिश्रम घेतले, त्यांच्यापैकी मी एक आहे. पण माझ्या प्रयत्नाला फळ येत नाही. असे पाहिल्यानंतर मी सारा भार परमेश्वरावर टाकला आहे. पैगंबराच्या निधनानंतर समाजामध्ये पडझड, विसंवाद, भांडणे माजली असे इस्लामी संत-सज्जनांच्या लक्षात आले. पुन्हा त्यांनी भांडणाऱ्यांची संगत सोडली. इजिप्त, पर्शिया आणि इतर देशांत स्थलांतर केले. तेथेही एकांतवासात राहून त्यांनी ईश्वराकडे सतत प्रार्थना केल्या. या मंडळींनीच इस्लाम जिवंत ठेवला. आपणही अशा तऱ्हेने निघून जावे अशी ओढ मला लागली आहे. परंतु ईश्वराचा सेवक म्हणून माझ्या प्रयत्नांची नोंद इतिहास घेईल याची मला खात्री आहे. माझ्या हातून हिमालयाएवढ्या मोठ्या चुकासुद्धा झाल्या असतील. पण त्या कबूल करण्याचे आणि त्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त करण्याचे धैर्यही माझ्याकडे आहे. पण आज मात्र या प्रश्नावर गप्प बसण्यापलिकडे मी काही करू शकत नाही (९, पृष्ठे २२१-२२).

## मला वीट आला आहे

सोलापूर येथे बोलताना गांधीजींनी स्वर आणखी कडक केला. 'या झगड्याचा मला आता अगदी वीट आला आहे. ही माणसे सुधारण्यासाठी मी आपले आयुष्य घालविले. परंतु माझे प्रयत्न निष्फळ ठरले आहेत असे लक्षात आले, तेव्हा मी तो नाद सोडून दिला आहे. स्वतःला परमेश्वराच्या मर्जीवर सोडून स्वस्थ बसलो. अशा वेळी इस्लामच्या इतिहासातील एका घटनेची आठवण मला होते. पैगंबरांच्या निधनानंतर सत्तास्पर्धा, भांडणे सुरू झाली. ती पाहून त्यांचे सच्चे अनुयायी इजिप्त, पर्शिया आणि तुर्कस्थान अशा देशांत निघून गेले, तर काही अनुयायी आपल्याकडील ऋषीमुनींप्रमाणे डोंगरातील गुहांमध्ये एकांतवासात जाऊन राहिले. अशा आध्यात्मिक व्यक्तींनीच आजपर्यंत इस्लाम जिवंत ठेवला. मला स्वतःला सांगावेसे वाटते, जा एखाद्या गुहेत आणि ईश्वराची प्रार्थना कर. पण मला खात्री वाटते की, भविष्यात केव्हातरी हिंदू-मुसलमान प्रश्नाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा माझ्याबद्दल त्यात असे लिहिलेले असेल, 'हा देवमाणूस होता. त्याने हिमालयाएवढ्या चुका केल्या असतील, परंतु प्रायश्चित्त घेतले.' आज मी परमेश्वराच्या मर्जीला शरण जाऊन शांत बसलो आहे, पण आज येथे येऊन निदान एवढेतरी तुम्हाला सांगावे असे वाटले. निदान स्वतःच्या समाजातील इतर भुकेकंगाल लोकांचा विचार करा. आज हिंदू कामगार शेकडो नव्हे तर

हजारो मुसलमान स्त्रियांना मदत करीत आहेत आणि तेथे कोणालाही धार्मिक भांडणासाठी वेळ नाही. ज्याच्या पोटातून कृतज्ञतेचा ध्वनी उमटत असेल, तो माणूस कसा भांडणार ?' (९, पृष्ठे २२४-२५). भाषणांमागून भाषणांत गांधीजींनी या आपल्या वेदनांची तळमळ, हृदयात पेटलेल्या वणव्याचा उल्लेख केलेला दिसतो. आपण वेडे ठरलो आहोत, म्हातारपणामुळे बुद्धी भ्रष्ट झाली आहे, अशा तऱ्हेने लोक आपल्याकडे पाहतात, असेही त्यांनी वारंवार म्हटलेले आहे (९, पृष्ठे २५८-६१).

## पाषाणाला पाझर फुटेल

हा खंड संपतो तेव्हा गांधीजी पूर्वी जेथे अनेक लढे जिंकले अशा भागांतून दौरा करताना दिसतात. त्यांच्या प्रेरणेने आदिवासींसाठी पूर्वी केलेल्या मढी आश्रमालाही त्यांनी भेट दिली. महादेवभाईंनी नोंद केली आहे, 'या वेळचे त्यांचे भाषण इतके करुण होते की, त्यामुळे पाषाणाच्या हृदयालाही अश्रूंचा पाझर फुटला असता.'

"या तालुक्यात प्रवेश केल्यापासूनच अनेक प्रश्नांचे काहूर माझ्या मनात माजले आहे. हास्यविनोद करून मी माझे दुःख झटकून टाकतो खरे, पण अशा तऱ्हेने मुद्दाम विनोदाचा आश्रय घ्यावा लागला हे मनातील खोल वेदनेचेच लक्षण आहे. एकेकाळी या सुरत जिल्ह्याकडे गुजरात प्रांतच नव्हे तर सारा भारत आदराने पाहत होता. स्वराज्याच्या चळवळीत या जिल्ह्याने पैसा, शिस्त, कार्यक्षमता, राष्ट्रीय शिक्षण आणि अस्पृश्यतानिवारण या सर्वच क्षेत्रांत जास्तीत जास्त योगदान दिले होते. सुरत व कैरा या दोन प्रगत जिल्ह्यात मैत्रीपूर्ण चुरस चालत होती आणि बार्डोली तालुक्यानेही आघाडी मारली होती. त्या वेळेपुरताच हा छोटासा तालुका जगाच्या नकाशावर आला. ते चित्र कोठे आणि आज हे चित्र कोठे ! आज बार्डोलीमध्ये पांढऱ्या टोप्या तुरळक दिसतात आणि हरिजनांचे मित्रही कमी झाले आहेत. त्यातच सारभूम येथल्या दुर्दैवी घटना आठवल्या म्हणजे स्वराज्य येणार तरी कसे, अशी काळजी लागते. त्या पलिकडच्या झाडाखाली आपण एक शपथ घेतली होती. परमेश्वराला साक्ष ठेवून अठ्ठेचाळीस व्यक्तींनी मला खंबीरपणे एक वचन दिले होते आणि त्याच्या आधारावर मी व्हॉइसरॉयना अंतीम इशारा दिला होता. ती शपथ, ते वचन आपण विसरून जाणार का ? आज मी येथे आलो ते उसळत्या उत्साहाच्या लाटेवर आरूढ होण्यासाठी नव्हे, तर निव्वळ आश्रमाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर करण्यासाठी ! या सगळ्यातून आपल्याला शिकावयाचे आहे ते हे की, आपण एकही पराभव मान्य करता कामा नये, आपला विश्वास केव्हाही ढळू देता कामा नये आणि अपमानास्पद मार्ग कधीच घेता कामा नये.... स्वातंत्र्यलढ्याच्या चुरशीतून पंजाबने अंग काढून घेतले आहे की काय अशी शंका मला कधी कधी येते. पण मी चिवट आशावादी आहे. काळ्याकुट्ट ढगातही मी आशेची रूपेरी किनार पाहतो. असाच एक किरण म्हणजे हा आश्रम. त्यातच निदान एक चांगली गोष्ट आहे. त्यात अशी विलक्षण भारलेली काही माणसे आहेत. त्यांची वाढ होवो आणि आज हताश झालेला बार्डोली तालुका आणि उद्ध्वस्त झालेला सुरत जिल्हा पुन्हा ठीक होऊन गुजरात आणि साऱ्या

देशाला अंधारातून प्रकाश देवोत अशी माझी इच्छा आहे' (११, पृष्ठे २७२-७४).

## नंतरच्या काळातील बदल

गांधीजींसारख्या प्रचंड व्यक्तिमत्त्वालाही सहकाऱ्यांची उदासीनता आणि काही वेळा क्रूर वृत्ती यांमुळे कमालीची निराशा घेरून टाकत असे. ही गोष्ट आपल्याला माहीत नसते आणि त्यामुळे आपण छोट्याशा अपयशाने नाउमेद होतो. आपल्या निराशेचे आणखी एक कारण म्हणजे अगदी लढ्यापर्यंत परिस्थिती कशी होती आणि ती किती मोठ्या प्रमाणात बदलेल याची आपल्याला कल्पना नसते. आपण आपल्या प्रयत्नात, कामात गुरफटून गेलेलो असतो आणि मग आपण प्रयत्न करूनही समस्या शिल्लकच आहे असे दिसल्यानंतर खचून जातो. पण बदल दूरच असतात. जर आपल्या प्रयत्नापासून आपण थोडेही हललो नाही, जर परिस्थितीकडे दुरून पाहिले तरी घडून येणारे बदल साफ दिसतील आणि मग आपण अधिक हताश होणार नाही.

महादेवभाईंच्या आठवणींच्या ज्या खंडाबाबत मी बोलतो आहे त्यात गांधीजींना सगळ्यात जास्त कळकळ समाजातील अस्पृश्यतेचे निवारण करण्याकडे होती हे स्पष्ट दिसते. समाज या दुरितांना कवटाळून बसतो त्या-त्या वेळी गांधीजी एरवी कधी नसतील इतके व्याकूळ, प्रक्षुब्ध झालेले दिसतात.

आज आपण हरिजनांच्या अवस्थेबद्दल बोलतो, त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांच्या बातम्या वाचतो आणि निराश होतो. गांधीजींनी खूप प्रयत्न केले. घटनेने समान स्थान दिले तरी दलितांचे दुर्दैव होते तेच कायम आहे असे वाटून आपल्याला निराशा येते. पण गांधीजींच्या काळात दलितांची अवस्था खरोखर किती भयानक होती याचे चित्र आपल्याला महादेवभाईंच्या दैनंदिनीतून मिळते. तरीही त्या काळापासून आजपर्यंत किती विलक्षण बदल झाला आहे हे आपणाला दिसून येईल. अस्पृश्यतानिवारणाबद्दल गांधीजी आपल्या भावना तीव्रतेने, हातचे राखून न ठेवता वारंवार व्यक्त करीत असत. या प्रथेला ते 'अधर्म', मनुष्यत्व आणि हिंदू धर्माला 'काळीमा', 'लाजीरवाणी गोष्ट', 'मूर्खपणा, अमानूष, अनैतिक, अन्याय्य' अशी दूषणे देत आले. हिंदू धर्मावर हा मोठा लागलेला डाग कायम असेपर्यंत प्रत्येक हिंदूने लाजेने मान खाली घातली पाहिजे, असे गांधीजी म्हणत. आपल्या देशाला आणि धर्माला मिळालेला हा सगळ्यात मोठा आणि विध्वंसक शाप आहे, हे पाप आहे, गुन्हा आहे, क्रूरपणा आहे, राक्षसी वागणूक आहे, काळ्या प्लेगइतकाच हा आजार भयानक आहे, गलिच्छपणा आहे अशा कडक शब्दांत गांधीजींनी अस्पृश्यतेचे वर्णन केलेले आढळते.

अस्पृश्यता हा ज्यांना हिंदू धर्माचा पाया वाटतो ते या धर्माची कबर खोदायला निघाले आहेत. हिंदू धर्म या परिस्थितीला चिकटून बसला तर तो झिजून खलास होऊन जाईल, अंत्यज व गरीब यांना आपला भाऊबंद मानला नाही तर आपला सर्वनाश अटळ आहे, असे कडक इशारे गांधीजी देत. अस्पृश्यांवर तुम्ही घातलेला बहिष्कार म्हणजे माझ्यावर घातलेला बहिष्कार, असे ते हिंदूंना बजावून सांगत. अस्पृश्यता ही गुलामगिरीच्या परिस्थितीपेक्षाही अधिक धर्मविरोधी

आहे, असे म्हणतात. 'धर्म पाळणाऱ्यांच्या हृदयात दया नसावी ही उघड क्रूर विटंबना! त्यांच्या रक्ताच्या थेंबाथेंबातून क्रौर्य पेरले आहे,' असे गांधीजींचे उद्गार आहेत. आपल्याच काही देशबांधवांना अस्पृश्य मानणे हा आंधळेपणा आणि पोकळ अहंकार आहे आणि ही प्रथा मोडली नाही, तर हिंदूंच्या आणि देशाच्या कपाळी सर्वनाश लिहिलेला आहे असे गांधीजी वारंवार बजावीत.

एका भाषणात ते म्हणाले, 'आपण येथे हिंदू धर्मात अस्पृश्यता पाळतो याचे कठोर प्रायश्चित्त दक्षिण आफ्रिकेत कसे घ्यावे लागत आहे ते पाहा. तेथे आपल्या लोकांनाच अस्पृश्य ठरविले आहे आणि आपले तेथील बांधव आपल्या येथील पापाची कठोर शिक्षा भोगत आहेत. एका अर्थाने हा विनोद आहे. मी हिंदू असल्याने आपले हे पाप मला दिसते आणि हिंदू धर्मावर याचा केवढा मोठा बोजा झाला आहे ते दिसते. हे पाप नाहीसे होईपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही आणि एकाही हिंदूला स्वस्थ बसू देणार नाही.' हरिजनांना त्यांनी सांगितले, 'आम्ही उच्चवर्णीय हिंदूंनी तुमच्यावर लादलेला अन्याय इतका विपुल आणि भयानक आहे की, आमच्या कातड्याचे जोडे करून पायात घातले तरी त्याचे ओझे कमी होणार नाही.' अस्पृश्यतेचा संपूर्ण नायनाट, समूळ उच्चाटन करण्याचे आवाहन त्यांनी वारंवार केलेले दिसते. आपल्या प्रत्येक आश्रमात हरिजन आश्रमवासी हवेतच असा आग्रह गांधीजींनी धरला. नव्याने सुरू होणाऱ्या राष्ट्रीय पाठशाळेत हरिजन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत त्यांनी आग्रह धरला. सभेमध्ये हरिजन हक्काने बसण्याची व्यवस्था इतरांपासून वेगळी केली असेल तर स्वागत स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला. गावागावांत हरिजनांच्या वस्तीत मुक्काम केला. एका अस्पृश्य मुलीला दत्तक घेतले. हरिजनांना देवाला जाता यावे यासाठी चाललेल्या सत्याग्रहाला पाठिंबा दिला.

आणि येथल्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना विरोध करणारे लोक कोण होते याची आपण कल्पनाही करू शकत नाही आणि हे अडथळे आणि विरोध कुणा सामान्य सुधारकाच्या नव्हे तर प्रत्यक्ष गांधीजींच्या वाट्याला येत होते. फार काय, स्वतः कस्तुरबा आणि अहमदाबादच्या आश्रमाचे व्यवस्थापक असलेला गांधीजींचा पुतण्या यांनीही सुरुवातीला आश्रमात हरिजनांना प्रवेश द्यायला विरोध केला. आश्रमाला मदत देणाऱ्या स्थानिक आश्रयदात्यांनी पाठिंबा काढून घेतला. वधावनचे बालक मंदिर उत्तम चालले होते. पण हरिजन विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर इतरांची उपस्थिती रोडावली आणि जेमतेम पंचवीस मुले शिल्लक राहिली (६, पृष्ठ २४). राजाजींनी पाच हरिजनांना आपल्या आश्रमात प्रवेश दिला तेव्हा आसपासच्या गावात प्रचंड प्रक्षोभ उसळला (६, पृष्ठ १३४).

## भीती नव्हे, भयानक दहशत

त्रिचूरमध्ये एक सभा होती. त्यात अस्पृश्य मानल्या गेलेल्यांपैकी नयादी या एका जमातीतर्फे गांधीजींना स्वागत व मानपान देण्यात येणार होता. पण ती माणसे इतकी विलक्षण दहशतीत बसली होती की, गांधीजींच्या जवळ जाण्याचे धैर्य त्यांना होईना. महादेवभाईंची नोंद वाचण्यासारखी आहे.... 'महाराजांच्या मुलाने

आपल्या भाषणात अस्पृश्यतेचा धिक्कार केला. गांधीजींच्या भेटीची आठवण म्हणून त्याने नयादींना खादीची भेट दिली. ही अत्याचारी पद्धत लौकरच संपुष्टात येईल अशी आशा राजपुत्राने व्यक्त केली, पण माझ्या आठवणीत कोरलेली आहे ती मात्र कोचीनची प्रचंड सभा नव्हे आणि महाराजांचा पुत्र नव्हे, तर नयादींचे ते हृदय हेलावून टाकणारे दर्शन. जगन्नाथपुरीला दुष्काळ पडला तेव्हा तेथील भुकेने खंगलेल्या लोकांचे दर्शनही अधिक पिळवटून टाकणारे नव्हते. ते भुकेले असले तरी त्यांना अन्न द्यायला अनेक दानशूर पडलेले होते. हे नयादी मात्र मानव जातीने नाकारलेले, बहिष्कृत, तिरस्कृत, निष्प्रेम, घृणास्पद जीवन जगत होते. ते दृश्य आठवले तर मान खाली झुकते. गांधीजींच्या कार्यक्रमात नयादींतर्फे स्वागताचा एक भाग होता. उत्साही राजाने तो सर्व कार्यक्रम ठरविला असावा. पण गांधीजी पडले उच्चवर्णीय हिंदू ! त्यांच्याजवळ जाऊन त्यांना मानपान देण्याची हिंमत नयादींना होणार कशी ? ते गरीब लांबच बसून राहिले. जणू आपल्या जन्माची आणि अस्तित्वाची त्यांना लाज वाटत असे. जणू आपल्या सावल्यांचासुद्धा त्यांना संकोच वाटत असावा. गांधीजींनी जवळ बोलाविले; पण आयुष्यात आजवर न केलेली ही गोष्ट करायची कशी ? शेवटी त्यांना उचलून गाडीत ठेवावे लागले. त्यातही ते अंग चोरून अस्वस्थ मनाने बसलेले होते. त्यांच्या भयभीत चेहऱ्यावरून ते जणू एखादे भयानक दुःस्वप्न पाहत असावेत असे वाटत होते. एखादा वर्षानुवर्षे अंधाऱ्या कोठडीत खितपत पडलेला कैदी एकदम उजेडात आल्यानंतर बावचळलेला दिसतो तशी स्थिती त्या लोकांची निव्वळ एक उच्चवर्णीय माणसाच्या सहवासाने झाली होती. मनुष्याची काया धारण करणारे हे जीव जणू दुसऱ्याच एका जगातून आले असावेत इतके वेगळे भासत होते. मोटारीतून बाहेर आल्यानंतर डोंगरावरच्या आपल्या गुहांमध्ये ते पटकन् पळून गेले'' (६, पृष्ठे १२७-२८).

## काठेवाड

गांधीजी बोटदला पोहोचले. काठेवाडला त्यांची ही तिसरी भेट होती. कोणत्याही उच्चवर्णीय हिंदूंनी त्यांच्या सभेला जाऊ नये किंवा त्यांचे स्वागत करायला अथवा निरोप द्यायला जाऊ नये असाच ठराव तेथील ब्राह्मणांनी केला होता (६, पृष्ठे १४२-४४).

गांधीजींची याबद्दलची प्रतिक्रिया त्यांना शोभेल अशीच होती, 'बोटदमधील सर्वांग काय होते. हिंदूंनी माझ्यावर बहिष्कार टाकला असता तर मला निश्चितच राग आला नसता. अशा बहिष्काराचा मी एवढाच अर्थ घेतला असता की, माझे म्हणणे लोकांनी ऐकावे यासाठी मला अजून पुष्कळ तपश्चर्या करायला हवी. पण जग निंदा करते म्हणून मी माझा धर्म सोडावा, असे होणार नाही. आपली श्रद्धा, कर्तव्य आणि तत्त्वे यांसाठी पहाडासारखा उभा राहातो तोच खरा धर्मनिष्ठ. संपूर्ण जगाने आपल्या धर्माची हेटाळणी केली तरी जो पर्वा करीत नाही, धर्म ज्येष्ठ मानून सर्वस्व त्यागण्याची, मरण पत्करण्याची तयारी ठेवतो तो खरा धर्मनिष्ठ. तत्त्वासाठी वेदीवर सर्वस्वाचा होम करावा इतका आत्मविश्वास ज्याला आपल्या श्रद्धेबद्दल असेल, तोच खरा धार्मिक माणूस. अस्पृश्यांबाबत

माझे मन मनोनिग्रही या टोकाला गेले आहे आणि म्हणून मी नगारे वाजवून सुद्धा घोषणा करीन की, अस्पृश्यता हे गलिच्छ पाप आहे आणि ते मुळापासून उपटून फेकल्याखेरीज भारताचा उद्धार होणार नाही'' (६, पृष्ठ १४५).

एवढे होऊनही, अस्पृश्यांसाठी सुरू केलेल्या शाळेत शिकविण्यासाठी एकही चांगला सवर्ण हिंदू शिक्षक मिळू शकला नाही. हरिजनांना गांधीजींच्या बैठकीत एका बाजूला कोंडाळे करून बसावे लागत होते. गांधीजी संतापले. परिस्थिती कशी होती हे दाखविणारा एक नमुनेदार प्रसंग घडला. गांधीजी आणि त्यांचे सहकारी गुजरातमधील मंगरोळ येथे होते. त्यांच्या स्वागतासाठी भाषणे चाललेली होती. महादेवभाई लिहितात, 'गांधीजींची सहनशीलता संपण्याच्या बेतात आली होती, तेवढ्यात ते जेथे बसले होते ते व्यासपीठ काड्कन कोसळले. कोणाला इजा मात्र झाली नाही आणि गांधीजींनी 'निरुपद्रवी भूकंप', म्हणून तो अपघात हसण्यावर नेला. पण पुढे होणाऱ्या भूकंपांची ही नुसती नांदी होती. दूर अंतरावर काही हरिजन मुली बसल्या होत्या. त्यांना कोणीतरी खुणावले तशा त्या स्वागतगीत गाण्यासाठी उठून उभ्या राहिल्या. त्यासरशी गांधीजी उद्गारले, 'माणसाच्या सहनशीलतेला मर्यादा असतात. माझा संयम आता ताणला गेला. हरिजन मुलींना इतक्या दूर अंतरावर तुम्ही गायला लावता हे मी गप्प बसून पाहू शकत नाही. दर पाच मिनिटांनी माझी नजर लांबवरच्या कोपऱ्यात उभ्या असलेल्या त्या हरिजनांकडे वळते, हे तुम्ही पाहिलेच असेल. त्यांना बसायला दिलेल्या जागेत तुम्ही दोर बांधून वेगळे ठेवले आहे. मला हे सर्व दृष्य सहनच होत नाही. हरिजन मुली इतक्या लांबवर गाणे म्हणणार असतील तर स्थानिक काँग्रेस समितीच्या अध्यक्षांनी केलेले माझे स्वागताचे भाषण पोकळ आणि निरर्थक ठरते. मी अंत्यजांपेक्षा कुणी वेगळा नाही. मी थेड आहे, भंगी आहे हे मी वारंवार सांगितले आहे... आतापर्यंत आपण नुसते ठराव मंजूर केलेले आहेत. माझ्या स्वागतासाठी कमानी उभारल्या जातात त्यावर अस्पृश्यता निवारणाच्या घोषणा मोठाल्या अक्षरात लिहिलेल्या असतात. एकतर तो तरी मूर्खपणा म्हटला पाहिजे किंवा तुम्ही पाळत असलेला हा भेदभाव म्हणजे ठरावाची कार्यवाही करण्याबाबत तुमचा दुबळेपणा असा तरी मानला पाहिजे. हा दुबळेपणा घालविणे हे माझे पहिले काम आहे. मी निक्षून सांगतो की, एक तर माझे केलेले स्वागत तुम्ही परत घ्या किंवा मग मलाही त्या अंत्यजांमध्येच जाऊन बसू द्या' (६, पृष्ठ १७८-७९).

## गुरांसाठी खोदलेल्या खड्ड्यातील पाणी

त्या काळात अस्पृश्यांना पाणी घ्यावे लागत होते ते गुरांना पाणी पाजण्यासाठी खोदलेल्या खड्ड्यातून. गांधीजी यामुळे संतापले आणि त्यांनी लोकांशी सतत युक्तिवाद केला, 'थोडे तरी व्यावहारिक शहाणपण शिका, असे माझे तुम्हाला आवाहन आहे. वैष्णवपंथी प्रेम हे आपले वैशिष्ट्य सांगतात. अंत्यजांबद्दल त्यांनी कोणते प्रेम आजवर दाखविले आहे ? बगासराच्या वाटेवर मला काही हरिजन भेटले. आपल्याला विहिरीतून पाणी घेऊ दिले जात नाही, गुरांसाठी खोदलेल्या खड्ड्यातील पाणी घ्यावे लागते, अशी तक्रार त्यांनी केली. ही दयाभेट आहे

असे कल्पनाशक्तीला कितीही ताण दिला तरी मानता येईल का ? हे तर निव्वळ क्रौर्य आहे, पाप आहे, अधर्म आहे, सैतानी वृत्ती आहे. वैष्णव धर्म काय किंवा त्यांना पूज्य असलेले भागवत काय अशा दुष्टपणाची तरफदारी मुळीच करीत नाही. असा दृष्टिकोन या पवित्र ग्रंथात मानला गेलेला आहे, असे कोणी सिद्ध करून दिले तर असे वैष्णवपण किंवा स्वधर्माशी मला संबंध ठेवावयाचा नाही (गांधीजी जन्माने वैष्णवपंथी होते.) हाडाळा येथेही मला हीच दुःखद कहाणी ऐकायला मिळाली. परमेश्वराने दिलेली ती पाण्याची देणगी तुम्ही कोणाला नाकारता ? तर आपल्याप्रमाणेच पंचेंद्रिये असलेल्या, आपल्याप्रमाणेच गुण-दोष असणाऱ्या, आपल्याप्रमाणेच हाडामांसाची माणसे असलेल्या अंत्यजांना !" (६, पृष्ठ १८२).

## प्रत्येकजण पेचात

गांधीजी कच्छमध्ये पोहोचले. ते आणि त्यांचे सहकारी यांना जेवणासाठी वेगळी खोली देण्यात आली होती. त्यांना नेहमीच्या पितळी भांड्यात जेवण न वाढता द्रोण, पत्रावळीमध्ये वाढले जाई. अर्थात सरदार पटेल खचून जाणारे नव्हते. यजमानांना आणखी थोडे अडचणीत आणण्याच्या हेतूने त्यांनी बेधडकपणे बातमी सोडून दिली की, कृष्णदास (प्रत्यक्ष गांधीजींचा पुतण्या) हा अस्पृश्य आहे. त्यामुळे बिथरलेल्या वाढप्यांनी त्यांना जेवण वाढण्याचे थांबविले' (७, पृष्ठे २०४).

मंगरोळ येथे गेल्यानंतर गांधीजींनी सांगितले की, त्यांची प्रेरणा घेऊन अस्पृश्यता मोडण्याची शपथ ज्यांनी घेतलेली होती त्यांनी गांधीजी गाव सोडून जाताच आपली शपथ फिरविली ! (७, पृष्ठ २०९).

सभेतल्या स्वागतपर भाषणात सर्वणीयांनी अस्पृश्यतेवर विश्वास नसल्याची ग्वाही दिली. प्रत्यक्ष मात्र सभेसाठी आलेल्या हरिजनांना गांधीजींच्या पाठच्या बाजूला एका कोपऱ्यात बसविले होते आणि दोर बांधून तो कोपरा बाकीच्या सभेपासून वेगळा केला होता. गांधीजींनी याला विरोध केला. एकतर हरिजनांना माझ्याजवळ बसू द्या किंवा माझे टेबल त्यांच्या राखीव जागात हलवावा आणि मला तेथून भाषण करू द्या असे त्यांनी सांगितले. हा निर्णय लोकांनी मतदानाने करावा असे आवाहन त्यांनी केले. मतदान झाले आणि अस्पृश्यांना वेगळे ठेवावे या बाजूला बहुमत मिळाले. गांधीजींनी आपले टेबल अस्पृश्यांच्या राखीव भागात हलवून घेतले !

दुसऱ्या दिवशी झालेल्या बैठकीत गांधीजींनी जाहीर केले, 'माझ्या सभेत अस्पृश्यांना कोठेही बसता आले पाहिजे. उलट ज्या सवर्णीय हिंदूंना हरिजनांसमवेत मिसळून बसणे पटत नसेल त्यांच्यासाठी एक वेगळा भाग सभेत राखून ठेवावा.' हरिजनांबद्दलचे माझे प्रेम ज्यांना आवडत नाही त्यांनी माझ्या बैठकीला येऊ नये, असेही गांधीजींनी निक्षून सांगितले (६, पृष्ठे २१५-१७).

कोतडा येथील एका बड्या तंबाखू व्यापाऱ्याकडून हरिजनांच्या शाळेसाठी देणगी मिळाली. पण देणगीपोटी अट अशी होती की, या शाळेच्या शिक्षकांनीसुद्धा अस्पृश्य मुलांना स्पर्श करावयाचा नाही. महादेवभाईंनी लिहिले की, एका दगडात

दोन पक्षी मारण्याचा हा प्रकार होता. देणगीदाराला एकीकडे अस्पृश्यांसाठी शाळा उघडल्याचा मान हवा होता आणि पुन्हा दुसरीकडे अस्पृश्यता कायम ठेवल्याचे श्रेयही हवे होते. गांधीजींनी मात्र ही अट मागे घ्यायला लावली व मगच या शाळेच्या मुहूर्ताची कोनशिला बसविण्याचे मान्य केले' (७, पृष्ठ २२५).

मांडवी येथे गांधीजींना आसरा देण्याचा धोकाच कोणी पत्करला नाही. गांधीजींनी अस्पृश्य मुलगी दत्तक घेतली हे यामागचे कारण होते (७, पृष्ठ २२७).

शेवटी ऐंशी वर्षे वयाच्या साधूने गांधीजींना निवारा देण्याचे आणि आपल्या आवारात त्यांची सभा होऊ देण्याचे मान्य केले. दुसऱ्या दिवशी सभास्थानी येण्यासाठी दोन वेगळे रस्ते आखण्यात आले. एक सवर्णांसाठी तर दुसरा अस्पृश्यांसाठी. अस्पृश्यांसाठी ठेवलेला रस्ता एक अरुंद बोळ होता. त्याचा उपयोग घाणीसाठी केला जात असे. गांधीजी स्वाभाविकच अस्पृश्यांसाठी ठेवलेल्या रस्त्याने बैठकीला आले. साधू संतापले. गांधीजींचा निरोप त्यांच्याकडे पोहोचविण्याचे काम कोणीच अंगावर घेईना. त्याउलट साधूचीच माणसे लाठ्या घेऊन आली आणि त्यांनी सभेतून अस्पृश्यांना पिटाळून लावले.

या घटनेचा गवगवा होईल आणि आपली बेअब्रू होईल या भीतीपोटी काही नागरिकांनी दुसऱ्या दिवशी एक सभा घेण्याचे ठरविले. पण श्रोत्यांत अस्पृश्यांसाठी पुन्हा स्वतंत्र कक्ष राखून ठेवण्यात आला होताच. अस्पृश्यांसाठी राखीव ठेवलेल्या जागेतच त्या सभेत बसण्याची हिंमत दाखविली ती फक्त गांधीजींबरोबर आलेल्या सहकाऱ्यांनीच. सभेच्या अध्यक्षांनी सत्काराच्या वस्तू थरथरत्या हाताने गडबडीत गांधीजींच्या हातात टाकल्या. स्पर्श न करता झालेल्या या प्रकाराला सारे लोक हसले आणि अध्यक्षांना हसू आल्यावाचून राहिले नाही (७, पृष्ठे २२७-३२).

भुजपार गावाने तर गांधीजींचा सन्मान करण्याचेच नाकारले. पुन्हा स्पृश्य आणि अस्पृश्य श्रोत्यांचे दोन कक्ष तयार करण्यात आले आणि अस्पृश्यांच्या कक्षात कोणीच सवर्ण हिंदू बसले नाही (७, पृष्ठे २४०-४१).

गांधीजींनी आपले हृदय मोकळे केले. 'तुम्ही माझे हृदय आता फाडलेत तरी ते अश्रूंनी भरलेले दिसेल. आणि त्यातून आर्त उद्‌गार ऐकू येतील, 'अरेरे !, काय हा हिंदू धर्म ! यात कोणालाच हरिजनांबद्दल सहानुभूती नाही. शहरातील एकही हिंदू त्यांच्या मदतीला धाऊन येत नाहीत ! तुमचा विश्वास एका धर्मावर आहे तर माझा दुसऱ्या धर्मावर. आपण एकमेकांवर प्रेम करतो, परंतु आपल्यामध्ये समान धागे नाहीत. दोघांमध्ये नुसते अंतरच नव्हे तर एक महासागर पसरला आहे... सध्या तुम्ही जो धर्म पाळता तो पाहून माझे मन अतिशय अस्वस्थ होते आणि ओरडून उठते, 'नाश होवो या धर्माचा ! बोअर युद्धामध्ये इंग्लंडच्या पराभवाची कामना एका ब्रिटिश नागरिकाने केली. महाभारताच्या युद्धामध्ये भीष्मांनी जशी कौरवांची बाजू घेतली आणि मग भगवान श्रीकृष्णाचे आशीर्वाद फक्त पांडवांच्या बाजूला आले, त्याप्रमाणे माझी परमेश्वराकडे प्रार्थना आहे की, हिंदू धर्म म्हणजे केवळ अस्पृश्यताच असेल तर त्या धर्माचा नायनाट व्हावा. मी माझ्या पत्नीलाही एकदा बजावले होते, 'तुझा धर्म माझ्या धर्मापेक्षा वेगळा असेल

तर आपण दोन अलग अलग झोपड्यांतून राहू. परंतु लक्ष्मीला (गांधीनी दत्तक घेतलेली हरिजन मुलगी) मी माझ्यापासून दूर लोटणार नाही. अर्थात तू तिला जवळ घ्यावे अशी सक्तीही मी तुझ्यावर करणार नाही. हरिजनांना स्पर्श केल्यामुळे आपण विटाळतो असे तुम्हा सगळ्यांना वाटते तर माझ्यापासूनही दूर राहणे हाच तुमचा धर्म. मग माझे विचार तुम्ही फक्त माझ्या लिखाणातूनच समजावून घ्या (७, पृष्ठे २४३-२४५).

गांधीजी अंजारला पोहोचले. स्वागत समितीने तयारी करताना काही अपवादात्मक प्रसंगाचा आधार घेतला होता. गांधीजी रागावले. समितीच्या अध्यक्षाला त्यांनी सांगितले, 'माझ्या सर्वात अधिक जिव्हाळ्याच्या गोष्टीबद्दल तुम्हाला प्रेम वाटेल तेव्हाच मी तुमच्याकडून सन्मान स्वीकारीन. हरिजनांना मी माझे भाईबंध समजतो. त्यांचा अपमान हाच माझा अपमान. अशा परिस्थितीत तुम्ही केलेल्या गौरवाच्या भाषणात मला काय गोडी वाटणार ? अशा स्वागताला काय अर्थ आहे ? भूज येथे एका अनपेक्षित परिस्थितीत समाजाला हा उपाय मी सुचविला. पण हा उपाय म्हणजे कायमचा तोडगा असे मानणे चुकीचे आहे. माझ्या मुलाला मी म्हटले, तुला हवे तर मला शिव्या दे आणि त्याने मला खरोखरीच दिवस-रात्र शिवीगाळ सुरू करावी, तसे हे झाले. मांडवीमधील पहिल्या बैठकीत मी म्हणालो होतो की, रिद्धागरजींना मला स्पर्श करायचा नव्हता तर सभा सोडून जाण्याऐवजी त्यांनी वस्तू माझ्या हातात लांबून टाकायला हरकत नव्हती. तेव्हा दुसऱ्या दिवशीच्या बैठकीत अध्यक्षांनी माझे बोलणे शब्दशः मानले आणि वस्तू माझ्या हातात फेकून दिली. मुन्द्राला तर कमालच झाली आणि येथे तुम्ही मुन्द्राला जे झाले त्याचीच पुनरावृत्ती सुचवत आहात (७, पृष्ठ २५१). गांधीजी माघार घेत नाहीत असे म्हटल्यानंतर स्वागत समिती अडचणीत सापडली. दोन-तीन तास चर्चा करून शेवटी त्यांनी ठरविले, गांधीजींनी अस्पृश्यांच्या मेळाव्यात एका चौथऱ्यावर बसावे आणि सभेच्या अध्यक्षांनी स्वतंत्रपणे बसावे आणि तेथूनच स्वागतपर भाषण वाचावे. स्वागतसमितीच्या आठ सदस्यांनी अस्पृश्यांमध्ये बसावे आणि नगरपालाने भेटवस्तू देताना गांधीजींना स्पर्श केला तरी हरकत नाही. पण घरी गेल्यावर शुद्धीसाठी स्नान करावे ! सभेच्या वेळेआधी या निर्णयाची माहिती गांधींना देण्यात आली. ते एवढेच म्हणाले की, मला माझी इच्छा विचारणार असाल तर मी सुचविलेली योजना मान्य करा. पण तुम्ही सुचवता तेच मी करावे असा तुमचा आग्रह असेल, तर ठीक आहे, मी ते मान्य करतो (७, पृष्ठ २५३).

ज्या ज्या ठिकाणी गांधीजी गेले त्या त्या ठिकाणी अशा प्रकारच्या प्रसंगांनी गांधीजींची पाठ सोडली नाही. त्या भागातील शेवटच्या बैठकीत गांधीजींनी केलेल्या भाषणाच्या प्रतिक्रिया महादेवभाईंनी नोंदविल्या आहेत. एक श्रोता म्हणाला, 'आज अस्पृश्यता, खादी, सुतकताई याबद्दल गांधीजी एक शब्दही बोलले नाहीत. हे तर सोडाच, पण देशबंधू निधीसाठी मदतीचे आवाहनही त्यांनी केले नाही.' दुसरा श्रोता म्हणाला, 'पण गांधीजींनी त्या दिवशी आपले डोळे आभाळाकडे लावले होते. जनतेकडे त्यांनी काहीच मागितले नाही. आपली तक्रार, आपली

कळकळीची प्रार्थना ते विश्वनिर्मात्याच्या दरबारात रुजू करीत होते!' (७, पृष्ठ २५६).

आज दलितांना सार्वजनिक सभेत वेगळे बसवण्याची कल्पनाही कोणी करणार नाही. मग त्यांचा कैवार घेणाऱ्या गांधीजींसारख्या माणसाचा अपमान करणे तर दूरच राहिले.

निराशा येते ती पूर्वपरिस्थिती काय होती हे पुरेसे माहिती नसल्यामुळे. शिवाय आपल्या प्रयत्नाबद्दल आणि त्यातून मिळणाऱ्या यशाबद्दल आपण वाजवीपेक्षा हळवे असलो तर निराशा येऊ शकते. आपण ज्या गोष्टी सुधारू इच्छितो त्या सुधारत नाहीत म्हणून तर निराशा येतेच. पण आपण प्रयत्न केला तरी सुधारणा होत नाही म्हणजे काय, या विचारानेही आपला धीर खचतो.

वर दिले तसे आणखी अनेक प्रसंग सांगता येण्यासारखे आहेत. पण त्यांची शिकवण लक्षात घ्यायला हवी. नम्र व्हावे अशी ती शिकवण आहे. गांधीजींनासुद्धा असे अडथळे आणि अडचणी सहन कराव्या लागल्या असतील, तर त्यांनासुद्धा अनेकदा टोकाचा हताशपणा जाणवला असेल. त्याला समाजाचा प्रतिसाद सहजपणे मिळावा अशी अपेक्षा कशी करता येईल ? आणि मग अशा अवास्तव अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत, तर निराश होणे योग्य आहे का ? याचा अर्थ महादेवभाईंची डायरी म्हणजे अडचणी आणि अपयशाची कहाणी आहे असे नव्हे. महाप्रचंड सभा-बैठकींची हकीकतही त्यात आहे. प्रचंड जमावाने गांधींवरून कसा जीव ओवाळून टाकला होता त्याची कहाणी आहे. गांधीजींच्या जीवनापासून आणि लेखनापासून स्फूर्ती घेऊन ज्यांनी श्रेष्ठ कार्य करून दाखविले अशा व्यक्तींचा उल्लेख आहे. त्यांनी केलेल्या प्रतिज्ञा कार्यकर्त्यांनी किती निकराने पाळल्या याची उदाहरणे आहेत. एका गावातील धोब्याने खादीशिवाय दुसरे काहीही धुणार नाही अशी शपथ घेतली होती. एवढेच नव्हे तर भर सभेत आपली दुकाने काढून राष्ट्रीय निधीसाठी गांधीजींच्या हवाली केली होती. यातूनच गांधीजींना स्फूर्ती मिळाली असेल. यातूनच त्यांची उमेद अडचणींवर मात करण्यासाठी जिवंत राहिली असेल. गांधीजींनी कार्य पुढे चालू ठेवले यात थोडा का होईना या गोष्टींचा वाटा असेल. नौखालीच्या वणव्यातून ते चालत गेले. त्यामागेही हीच प्रेरणा असेल का ? त्यांचे नीतिधैर्य टिकवून ठेवणाऱ्या अशा कोणत्या गोष्टी आहेत ? वाट्याला येणाऱ्या धीराच्या, प्रोत्साहनाच्या शब्दांपेक्षा हा घटक आपण शोधून काढायला हवा. ही आपली गरज आहे. हे शोधण्यासाठी आपल्याला दैनंदिनीची मदत मिळते. सोप्या शब्दांत सांगायचे तर गीतेतील पुनरुज्जीवन. पण त्याविषयी पुन्हा केव्हा तरी !

# ५. सुजनांमध्ये विसंवाद का होतो ?

आर्यसमाज, अरविंद आश्रम, सर्वोदयी संस्था, नवनिर्माण समिती, भोपाळमधील वायुपीडितांच्या साहाय्याचे कार्य– या सगळ्यांबाबत विचार केला, तर तीन गोष्टी समान असल्याचे जाणवते. किंबहूना एखादे चांगले काम सुरू करणाऱ्या सर्व संस्था, गट, चळवळी यांना हे मुद्दे समानपणे लागू पडतात.

एक : सर्व गटांत किंवा चळवळीत नवनिर्मितीचे प्रमाण फार कमी असते. निर्मितिक्षमता फारच अल्पायुषी ठरते.

दोन : वरवरचे थर खरवडून पाहिले तर अशा गटांतील किंवा संस्थांतील परस्परसंबंध सामंजस्याचे अजिबात नसतात. थोड्या काळातच त्या गटांचे किंवा चळवळीचे विभाजन होत जाते.

तीन : असे गट बहुधा इतर गटांविषयी कडवटपणे बोलतात. विशेषतः आपल्यासारख्याच काम करणाऱ्या इतर गटांची तर आवर्जून निंदानालस्ती करतात.

अर्थात फक्त चांगल्या कामात गुंतलेले लोकच एकमेकांबरोबर सामंजस्याने राहू शकत नाहीत असे नाही. आपले राजकीय पक्षही एकत्र नांदू शकत नाहीत. आपल्या संतमहात्म्यांच्या अनुयायांचेसुद्धा एकमेकांशी जमत नाही. त्यामुळे खरे म्हणजे हा प्रश्न थोडा बदलून चांगल्या लोकांचेसुद्धा एकमेकांशी का जमत नाही असा प्रश्न विचारला पाहिजे. सेवाभावी संस्था आणि राजकीय पक्ष यांच्यात समान विषय सापडणे हीसुद्धा एक महत्त्वाची गोष्ट आहे. त्यालाही काही अर्थ आहे. हे सगळे गट– अरविंद आश्रम ते विनोबांभोवतीचे सर्वोदयी ते चिपको आंदोलनातील मंडळी यांच्यांत आणि आपल्या राजकीय पक्षांत समान धागे आहेत तरी कोणते ? आपल्या संतमहात्म्यांच्या भोवतीचे मेळावे तशाच दुसऱ्या गटाविषयी वाईट बोलतात. त्यांच्यातही फाटाफूट आहे; असे का ?

## संप्रदाय

यात एक समान सूत्र दिसते. ते म्हणजे आपले राजकीय पक्ष म्हणजे जशी व्यक्तीभोवती जमा झालेली टोळकी आहेत. त्याचप्रमाणे विधायक कामे करणारे अनेक गट एखाद्याच व्यक्तीभोवती केंद्रित झालेले दिसतात. याच्या पुराव्यादाखल रकानेच्या रकाने भरता येतील आणि या गोष्टीचे परिणामही दाखवून देता येतील. मी एक किंवा दोन गोष्टींचा निर्देश करणार आहे. त्याच्या आधारे वाचकांनी अशा गटांचे आपापले अनुभव आठवावेत आणि माझ्या भावना त्याच्याशी जुळतात

का ते तपासावे.

अशा गटांमध्ये नेते हे निव्वळ मार्गदर्शक नसतात. त्यांचे दैवत केले जाते. सगळ्या शहाणपणाचा साठा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते आणि हे शहाणपण निव्वळ त्या गटाच्या कार्यापुरते मर्यादित नव्हे, तर मानवी जीवनाच्या सर्व अंगांचे सर्व नियम नेत्याला माहीत आहेत असे मानले जाते. असे हे ज्ञानभांडार त्याच्या एकट्याकडेच आहे अशी अनुयायांची खात्री असते. गटातील बाकीची मंडळी त्याची सहकारी नसतात. अगदी भाई किंवा साथी असे वरवर संबोधणाऱ्या गटातही ती अनुयायी आणि त्याहीपेक्षा भक्त बनून राहतात.

साहजिकच या गटामधील एखाद्याची प्रगती होणार की नाही हे त्या गटाच्या कामामध्ये त्याचा सहभाग किती यावर अवलंबून राहात नाही. नेत्याबाबत त्याची भक्ती किती गाढ आहे, नेत्याची तो किती सेवा-चाकरी बजावतो, आपल्या निष्ठेचे जाहीर प्रदर्शन किती झोकात मांडतो यावर ते अवलंबून असते.

नेत्यावरील विश्वास आणि श्रद्धा या गोष्टी खरे म्हणजे कार्यात साह्यीभूत ठरू शकतात; पण येथे मात्र त्याचा उपयोग नेत्याचा अहंकार फुगवणे आणि अनुयायांचा अहंकार शाबूत ठेवणे एवढ्यापुरताच होतो.

अशा गटातील एखाद्याच्या प्रगतीची खूण तरी काय ? विधायक कार्याला अधिक वाव मिळाला म्हणजे प्रगती झाली असे समजले जात नाही, तर नेत्याच्या कोण किती जास्त जवळ सरकला, नेत्याचे आशीर्वाद कोणाला जास्त आहेत यावर व्यक्तीची प्रगती ठरते. कित्येक वेळा याबद्दलच्या अफवाच प्रगतीच्या द्योतक मानल्या जातात.

अनुयायांची ही टोळी येथे स्वतःपुरती जगत असते. नेत्याचा कृपाप्रसाद हेच अनुयायांना सर्वस्व वाटले पाहिजे. यावर नेत्याची ताकद अवलंबून असते. त्यामुळे माहितीचे आणि ज्ञानाचे आपल्या टोळीबाहेरचे सारे मार्ग बंद करणे किंवा बदनाम करणे यासाठी नेत्याचे प्रयत्न अखंडपणे चालतात. परिणाम शेवटी असा होतो की, असे गट स्वतःभोवती पोलादी कोष विणून त्यात राहतात आणि अशा बंदिस्त पद्धतीने आपली मनःशांती शोधतात.

## वाढती असुरक्षितता

नेता आणि अनुयायी यातील परम दयाळूपणाचे संबंध बाजूला पडले तरी काही महत्त्वाचे परिणाम दिसतात. पहिला म्हणजे कमालीची असुरक्षितता. ही दोन कारणांनी येते. पहिले म्हणजे गटातील प्रत्येकजण दुसऱ्याचा प्रतिस्पर्धी असतो आणि दुसरे म्हणजे नेता आणि अनुयायी यांच्यांतील संबंध कमालीचे अस्थिर असतात.

याखेरीज आपल्या गटाच्या नेत्याचे उघड उघड प्रतिस्पर्धी म्हणजे इतर गटांचे नेते. कारण नेत्याचे महात्म्यच मुळी आधारलेले असते, तो एकटाच सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान आहे या गृहितावर. त्यामुळे दुसऱ्या गटाचे नेते आपल्या नेत्याला थेट विरोध करीत नसले तरी त्यांची निष्ठा, अस्तित्व मान्य करणे म्हणजेसुद्धा आपल्या नेत्यामध्ये काहीतरी उणीव आहे असेच दिसते. दुसरे गटनेते आपल्या

अनुयायांना ओढून घेतील अशी भीती नेत्याला वाटते. त्यातून त्यांची निष्ठा बदलण्याची शक्यता वाढते आणि त्यातही दुसऱ्या नेत्याची विचारसरणी, त्याने सुचविलेले उपाय आपल्या नेत्याच्या सूचनांशी मिळतेजुळते असतील तर मग आपल्या नेत्याला त्यांच्याकडून असलेला धोका खूपच वाढतो. जो चमत्कार फक्त आपलाच नेता करू शकतो असे अनुयायांना वाटते तोच दुसरा नेताही करू लागला तर आपल्या नेत्याच्या अस्तित्वाला आव्हान मिळणार असे वाटू लागते.

अनुयायांची अवस्थाही फार वेगळी नसते. सुरुवातीला आपला नेता आपल्या वर्तुळाबाहेरच्या नामवंतांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करतो. असे लोक शिष्यपरिवारात जमा झाले तर कोणत्याही गुरूला आनंदच वाटतो. पण लवकरच इतर अनुयायांचे लक्ष आणि निष्ठा आपल्यावरून उडून या नामवंत अनुयायांकडे तर जाणार नाही ना अशी भीती नेत्याला वाटू लागते. विनोबा भावे स्थितप्रज्ञ होते असे म्हटले जाते. नेता तसा असला आणि अनुयायी जेपींसारखा प्रसिद्धीपराङ्मुख असला तरीसुद्धा कर्तृत्ववान आणि कृतिवान अनुयायांची भीती वाटल्यावाचून राहात नाही.

अनुयायांच्या दृष्टीने इतर कोणत्याही संप्रदायाचा नेता म्हणजे मानसिक अस्वास्थ्याचे कारण. आपल्या पंथाचा नेता हाच सर्वज्ञ अशा श्रद्धेवर तर त्यांची मन:शांती अवलंबून असते. त्यांचा अहंकारही या श्रद्धेवर पोसला जात असतो. अंतीम ज्ञानाचा मार्ग आपल्याकडेच आहे असे त्यांना वाटत राहणे महत्त्वाचे असते.

त्याखेरीज प्रत्येक निष्ठावान भक्ताला इतर अनुयायी हे आपले थेट प्रतिस्पर्धी वाटत असतात. कारण संप्रदायाचा नेता हा कोणी गुरू, संत, महंत असेल तर त्याचा अनुग्रह, त्याची जवळीक मिळविण्यासाठी तेही धडपडत असतात. स्वामी मुक्तानंदांनी आपल्या चिद्शक्तिविलास ग्रंथात वर्णन केल्याप्रमाणे आपले गुरू स्वामी नित्यानंद यांच्या आश्रमातील वातावरणाचे रेखीव कार्य करणारे अनेक गट एवढेच नव्हे तर कित्येक प्रगत अध्ययनकेंद्रांना हे वर्णन अगदी चपखलपणे लागू पडते. भगवान नित्यानंदांकडे अनेक लोक येत असत. ते साधना करीत आणि सर्वांची इच्छा ठरलेली असे. अलौकिक सिद्धी प्राप्त व्हाव्यात, मानसन्मान मिळावा आणि आपणही नित्यानंद व्हावे. प्रत्येकजण म्हणत आहे, 'मीच महत्त्वाचा. मी मोठा. नित्यानंदांचे माझ्यावर केवढे प्रेम आहे. त्यांनी मला विशेष आशीर्वाद दिला आहे. माझ्याइतका अनुग्रह त्यांनी कोणावरही केलेला नाही.' हे ऐकून निराशा यावी, उद्वेग यावा असे हे उद्गार शिष्यपरिवारात नेहमीच ऐकू येत. त्यातून मत्सर, द्वेष आणि ढोंग यांची वाढ झाली. त्यामुळे नित्यानंदांनी दिलेला ध्यानधारणेतील परमानंद कमी होऊ लागला. लोकही ध्यानधारणा कमी करू लागले. तो काय म्हणाला, तेथे काय चालते, अमक्याला काय अक्कल आहे, माझ्यासारखा आहेच कोण, आणि नित्यानंदसुद्धा माझे बोलणे ऐकून घेतात तर बाकीच्यांची पर्वा मी कशाला करू हीच बडबड सारखी चालू असे. तो अमका स्वत:ला समजतो तरी कोण ? असल्या भ्रमांचे तण वाढू लागले. आपणच नित्यानंद अशा थाटात वागणारे भक्त अधिकाधिक उन्मत्त आणि ढोंगी बनू लागले. त्यामुळे त्यांच्या मार्गात फार मोठे अडथळे आले. जेथे सर्व पापे धुऊन जावीत, प्रत्येकजण

शुद्ध व्हावा तेथेच हा रोगटपणा पसरला.

अशी स्थिती कमालीची अस्थिर असते. नेत्याचीच गोष्ट पाहा. त्याच्या पंथात त्याचा दबदबा जितका वाढतो, तितका बाकीचे जग आपली पूजा करीत नाही याचे वैषम्यही वाढते. आपल्या पायाशी लोळणाऱ्यांच्या स्तुतीला काय अर्थ आहे असे वाटून तो बाहेरच्या जगाकडून प्रशंसा मिळविण्याच्या मागे लागतो. पण त्याचे अनुयायी अंधभक्तीचा जितका अतिरेक करतील तितके बाहेरच्या जगाविषयीचे त्याचे आकर्षण कमी होत जाते. शिवाय सुरुवातीला त्याच्याभोवती अनुयायी गोळा होतात, त्याच्याकडे आपल्या प्रश्नांना उत्तर आहे, तो चमत्कार करू शकतो यासाठी. पण लवकरच नेत्याची उत्तरे शिळी होतात आणि चमत्कारही नित्याची बाब बनू लागते. नवीन नेत्याला तरी तसे होण्याची भीती नेहमीच वाटत असते. शिवाय त्याने चार हात अंतर ठेवले तरी त्याच्या अलौकिक सद्‌गुणांप्रमाणेच त्याचे सामान्यपणही अनुयायांपर्यंत पोहोचते. महान योद्धा, रोमन सम्राट सीझर याला पाण्यात बुडताना कॅशियसने वाचविले. त्या वेळी केलेल्या आकांतामुळे सीझरचा भित्रेपणा तेवढा उघडा पडला. कुठल्याही नेत्याचे असे होऊ शकते. यावर उपाय म्हणजे नेत्याने आपल्या आराधनेचा आणि प्रशंसेचा एक आखीव-रेखीव पंथ बनवावा. म्हणजे तो काही मोठे कार्य करीत असो किंवा नसो. अनुयायांना त्याची चवीचवीने स्तुती करायलाच हवी, अशी अट नेत्याने बसवायला हवी. आज घडीला मिळालेल्या यशामुळे अनुयायी लाभले; पण तेवढ्यावर ते कायम टिकतील असे नाही. या भीतीमुळे अनुयायांची टीका सोडाच पण त्याच्याबद्दल बारीकशी शंका घेतली तरी नेत्याला तो द्रोह वाटतो, दगाबाजी वाटते. यावर उपाय म्हणजे नेत्याने सतत नवनवे अनुयायी शोधत राहावे. नव्या भक्तांना तरी त्याच्या चमत्काराचे कौतुक वाटत राहते. याचा परिणाम म्हणजे इतर पंथांच्या नेत्यांकडून त्याला अधिकच स्पर्धा जाणवते. दुसरे म्हणजे जुन्या भक्तांपैकी काहींना तरी नवे अनुयायी शोधण्याच्या धंद्यात भागीदार बनवावे लागते. त्यासाठी खरा-खोटा प्रचार करायला त्यांना प्रवृत्त करावे लागते. वाढत्या असुरक्षिततेच्या भावनेपोटी असा नेता काही ठराविक युक्त्या योजतो. आपल्या अनुयायांना तो आणखी परावलंबी बनवितो. गुरुकृपा, अनुग्रह, विश्वास हेच त्यांना सर्वस्व वाटले पाहिजे आणि ते कायम टिकून राहावेत यासाठी वाटेल ती किंमत द्यायला भक्त तयार झाले पाहिजेत. त्यांचा हा दुबळेपणा वाढावा यासाठी गुरुमहाराज आपली कृपापात्रे नेहमी आणि निष्कारण बदलत राहतात. भक्त नेहमी भ्यालेले राहायला हवेत. त्यासाठी त्यांच्यात स्पर्धा, गटबाजी, दुफळी माजविण्याचे कामही गुरू किंवा नेता करतो. त्यांना आपली निष्ठा वारंवार सिद्ध करायला लावतो. दुसऱ्या पंथाच्या गुरूपेक्षा त्यांनी आपल्याला जास्त भजले पाहिजे, कदाचित संप्रदायाचे ध्येय किंवा तत्त्वज्ञान यापेक्षाही गुरू त्यांना मोठा वाटला पाहिजे. गुरूच्या आज्ञेमुळे कार्याची हानी होणार आहे असे खात्रीने वाटले, तरी त्याने आज्ञा पाळली पाहिजे इतकी त्याची तयारी व्हायला हवी.

गुरूची मर्जी राखण्यासाठी शिष्य काय लागेल ते सर्व करतो. याच्या युक्त्या

आपल्याला नेहमी अनुभवाला येतात. मानसशास्त्रज्ञांनी त्याचा चांगला अभ्यास केलेला आहे. भक्त आपल्या गुरूच्या महात्म्याबद्दल स्वत:ला जणू संमोहित करून घेतात. त्याची जी गोष्ट पटत नसेल तीही पटवून घेतात. पटत असेल तर अगदी मनापासून पटल्याचे दाखवितात. गुरूच्या मार्गदर्शनाखेरीज आपल्याला काही एक करता येणार नाही असा आपण एक अडाणी गोळा आहोत, असेच जणू ते सिद्ध करीत असतात. गुरूशी मतभेद झाले तर आपले मत बदलतात. 'योग्य काय ते मला काय उमजणार? तुम्ही म्हणता ते सत्य. त्यामुळे पूर्वेकडे जावे असे मला वाटत असले, तरी तुम्ही म्हणत असाल तर मी पश्चिमेकडे जातो.' पुढे असा शिष्य प्रत्येक विषयावर गुरूचे मत काय पडेल याचा अंदाज बांधायला लागतो. गरजेपेक्षा जास्त स्तुती करायला लागतो. गुरूला एवढी स्तुती बरी नव्हे, खरीही नव्हे असे ठाऊक असले, तरी आपल्या भक्ताला खरेच परम आनंद वाटतो आहे, मनापासून तो स्तुती करतो आहे असे वाटू लागते. जे गुण, ज्या शक्ती, जी दिव्य दृष्टी आपल्यापाशी आहेत की नाहीत याची गुरूला शंका वाटत असते, त्याचीच भलावण भक्त जास्त करतो. असे भक्त गुरूकडे कथा रचून घेऊन येतात. गुरूविरुद्ध कट चालू आहे अशा बातम्या आपल्याला सांगतो. यातून अनुयायी आपल्या हितासाठी डोळ्यात तेल घालून दक्ष आहेत अशी गुरूची खात्री पटते. गुरूची मर्जी संपादन करण्याची आपल्याकडची ही सगळ्यात जास्त लोकप्रिय पद्धत आहे. त्याचप्रमाणे आपल्या नेत्याच्या प्रतिस्पर्ध्याची निंदानालस्ती करणेही. आपल्या नेत्याची स्तुती करण्याची सगळ्यात लोकप्रिय पद्धत ठरलेली आहे. प्रतिस्पर्ध्याची निंदा ऐकणे हे गुरुला तीन कारणांनी समाधानाचे वाटते– त्यांच्या निंदानालस्तीत त्याची स्तुती लपलेली असते. प्रतिस्पर्ध्याला योग्य रस्ता सापडत नाही असे त्याला वाटते आणि त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे प्रतिस्पर्ध्याची सर्वांत जास्त नालस्ती करणारा अनुयायी निष्ठा बदलून त्याच्याकडे जाण्याची शक्यता खूपच कमी होते.

पण एका संप्रदायात यामुळे समाधान पसरत असले तरी दुसऱ्याच्या दृष्टीने ही बदनामी ठरते. त्यातून दोन नेत्यांमध्ये आणि दोन पंथांच्या अनुयायांमध्ये द्वेषाचे विष पसरत जाते आणि हे विष मग सगळ्याच गटांच्या अंगात भिनते.

## वाढता एकाकीपणा

एकदा नेता हा सर्वज्ञ, सर्वशक्तिमान ठरला म्हणजे संवाद, संभाषण संपतेच. आपण पुष्कळ युक्तिवाद करू, वस्तुस्थिती मांडू, पुरावे नि कारणे देऊ, पण त्यांना त्याची गरज नसते, त्यांचा शब्द शेवटचा, त्यांचा निर्णय हाच युक्तिवाद व तोच पुरावा. शिवाय तो काय म्हणेल तेच फक्त महत्त्वाचे.

आपले म्हणणे समजावून सांगावे, सिद्ध करावे याची गरजच नेत्याला भासत नाही. बाहेरच्या जगातून काही दुरुस्ती सुचविली जाणे शक्यच नसते. कारण जो जो आपल्या वर्तुळाबाहेरचा तो तो काफर-पाखंडी हे ठरलेलेच असते! आता आपल्या वर्तुळातही नेता वगळता इतरांच्या मनाला किंमत राहत नाही. या साऱ्याचा शेवट जवळ येतो तो नेता आणि अनुयायी यांच्यात वाढत जाणाऱ्या दरीमुळे.

ते दोघे आणि बाहेरचे जग यांच्यातील वाढत्या अंतरामुळे संप्रदायात त्यांची पूजा होते आणि त्याची इच्छा हीच आज्ञा ठरते. त्याच्याबद्दलच्या भक्तीमुळे तो म्हणेल तसे अनुयायी वागतात. पण त्याच्या वर्तुळाबाहेर हे चालत नाही. आपल्या वर्तुळाबाहेर डोकावण्याचा प्रयत्न तो काही वेळा करतो. पण बाहेरच्यांवर प्रभाव पाडण्याचा त्याचा आत्मविश्वास खचत जातो. मग तो ठरवून टाकतो की, या अश्रद्ध लोकांना शिकविणे म्हणजे वेळ फुकट घालविणे होय. मग तो आपल्या कोषात कायम परततो. विचारांची देवाण-घेवाण संपलेली असल्याने सृजनशीलतेला चालना मिळत नाही. शिवाय आपल्या संप्रदायात आपले निर्णय बिनबोभाट मानले जात असल्याने वैचारिकतेची गरजही वाटत नाही.

अशा परिस्थितीत हातून चूक घडणे अपरिहार्य असते. कारण कोणतीही चूक दुरुस्त व्हायला वावच राहिलेला नसतो. हाती एकवटलेल्या सत्तेचा गैरवापर होणे अपरिहार्य असते. अनुयायांची लाचारी, गुरूच्या सर्वज्ञतेची त्यांनी गायिलेली स्तोत्रे यांमुळे गुरूची खात्रीच पटते की, आपल्याला निव्वळ दिव्य दृष्टी नसून आपण कोणी वेगळेच आहोत. आपल्या अनुयायांचे सुयश आणि सद्‌गुण याला आपणच कारणीभूत आहोत अशीही गुरूची खात्री पटत जाते. नेता म्हणेल ती पूर्व दिशा. त्याच्या साक्षात्काराबद्दल शंका घेईल तो लबाड, टीका करेल तो बंडखोर किंवा विद्रोही. त्यांचा पंथ किंवा त्यांची चळवळ याचे हित त्यालाच समजते, एवढेच नव्हे तर पंथाचे किंवा चळवळीचे कल्याण म्हणजे गुरू किंवा नेता.

यातून दोन अनुमाने निघतात. एक : अनुयायी म्हणजे पालापाचोळा– स्वेच्छेने बनलेला. कारण तत्त्वासाठी, ध्येयासाठी आपले सर्वस्व अर्पण करणे हेच आपले सद्‌भाग्य ही त्याची पहिली श्रद्धा असते. गुरू म्हणजेच ते ध्येय ही दुसरी श्रद्धा असते. नेत्याची आज्ञा पाळणे आवश्यक आहे या कल्पनेपासून सुरुवात करून फक्त आज्ञापालनच पुरेसे आहे. इतर कशाचीही गरज नाही अशा विश्वासापर्यंत भक्तगण येतात. गुरूच्या दृष्टीने ध्येय किंवा तत्त्व म्हणजे सर्वस्व. त्यासाठी अनुयायांना आज्ञेत ठेवले पाहिजे, हवे तसे वाकविले पाहिजे. कालांतराने आपण म्हणजेच ध्येय, तत्त्वज्ञान अशीही त्याची खात्री पटते.

दुसरा निष्कर्ष : अनुयायांच्या नेत्याबद्दलच्या पराकोटीच्या आदरामुळे नेतामहाशय कायद्याच्या आणि प्रस्थापित नीतिमत्तेच्या बाहेर आहेत असे चित्र निर्माण होते. पंथाचे किंवा चळवळीचे मूळ ध्येय नाहीसे होऊन त्याची जागा इतरांवर प्रभुत्व, वर्चस्व यांनी घेतलेली असते. आता हे प्रभुत्व मिळविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी वाटेल ते करायला हरकत नाही, हवी ती साधने वापरावीत. अशी धारणा बनते. असे नेते आणि त्यांचे भक्तगण नैतिकतेकडून जुलमी अनैतिकतेकडे झुकतात. कोठूनच विरोध व्हायची शक्यता नसल्याने संयमाचे सर्व बंध गळून पडतात. आता सृजनशीलतेची जागा निव्वळ कर्मकांडे आणि दडपशाही घेते. यातून गटबाजी आणि दुही माजते. यातून शेवटी निर्माण होते ती सर्वंकष यादवी. प्रत्येकाच्या पोटात दुसऱ्याविषयी संशय उभा राहतो. अनुयायी सोडून जातील ही भीती नेत्याला

वाटते तर गुरूची मर्जी आपल्याऐवजी दुसऱ्या शिष्यावर बसेल ही भीती अनुयायांना वाटते.

एव्हाना चळवळीकडून अपेक्षित असलेली किंवा नेत्याने आश्वासन दिलेली क्रांती केव्हाच पराभूत झालेली असते. हे अपयश अनुयायांच्या माथी मारण्याचा प्रयत्न नेता करतो. नेत्याने मार्ग दाखविला आहे. अनुयायी तसे म्हणाले होते. तेव्हा अंदाजाप्रमाणे यश मिळाले नसेल तर त्याचा अर्थ नेत्याची शिकवण त्यांनी नीटपणे अमलात आणली नाही असाच होतो.

संवेदनक्षम अनुयायांच्या बाबतीत हा क्रम थोडा वेगळा असतो. सुरुवातीला तो नेत्याकडे आकर्षिला जातो, तो नेत्याच्या ध्येयवादी घोषणांमुळे क्रांती, स्वातंत्र्य, समता, सेवा वगैरे. प्रत्यक्षात त्याला दिसते ते ठोकळेबाजपण, परावलंबन, विषमता आणि वर्चस्वाची हाव. खुली चर्चा होऊ शकत असती तर काही सुधारणा घडविता आल्या असत्या. पण तोही मार्ग बंद होतो. अशा वेळी मतभेद दाखविण्याचा एकच मार्ग राहतो. पंथ सोडून जाणे.

पण अनेकदा असे होते की, एक पंथ सोडून बाहेर पडलेला संवेदनक्षम अनुयायी दुसरा पंथ स्थापन करतो आणि मग हाच क्रम चालू राहतो. मार्क्सच्या खेडेगावासारखा.

## कारणे काय ?

या घटना इतक्या साचेबंद घडतात की, त्यातील टप्पे आणि त्यांचे विषय उदाहरणे देऊन सिद्ध करण्याची मुळीच गरज नाही. आपल्यापैकी ज्याला ज्याला विविध सामुदायिक चळवळी, पारंपरिक संस्था यांची चांगली माहिती आहे, अशा कोणालाही आपला गट हा सांप्रदायिकतेच्या मार्गावर आहे की नाही हे सहज ओळखता येईल. अशा सांप्रदायिकतेमुळे सृजनशीलतेचा विद्ध्वंस होतो, परस्परसंबंध नासतात याही गोष्टी आपल्या अनुभवावरून सहज सिद्ध होतील. प्रश्न असा पडतो की, आपल्या चळवळी, गट आणि संस्था सांप्रदायिकतेकडे इतक्या सहजपणे का झुकतात ?

चिकित्सा किती खोलवर करता येईल याला मर्यादाच नाही. परंतु त्यातून बाहेर पडण्याची शक्यता कितपत आहे आणि बाहेर पडण्यासाठी कोणत्या मार्गाने जायला हवे याची खातरजमा करून घेण्यासाठी वरवरचे एक-दोन पापुद्रे उलगडून पाहिले तरी पुरेसे होईल. दोन मानसिक वैशिष्ट्ये उठून दिसतात. पहिले म्हणजे आपला अहंभाव (ईगो) फार असुरक्षित असतो. त्यामुळेच तर एखादी चळवळ सुरू होते किंवा संस्था उभी राहते न राहते तोच आपण तिला आपल्या अहंभावाचे संरक्षक आवरण म्हणून वापरण्याचा प्रयत्न करतो. अपयशाची आपल्याला विलक्षण भीती वाटते. त्यातूनही ही गोष्ट स्पष्ट होते.

अपयशाच्या भीतीमुळे आपण आपली प्रयोगशीलता मारून टाकतो आणि ठराविक परिचित गोष्टींच्या कोषात स्वतःला बंद करून घेतो. आपले वर्तुळ ओळखीच्या व्यक्ती आणि परिस्थितीपुरतेच आखून घेतो. आपल्या गटाने किंवा आपण एखाद्या साहसाला नुकतीच सुरुवात करावी, तोपर्यंतच आपल्याला भविष्याच्या चिंता, संभाव्य

अपयशाच्या काळज्या भेडसावू लागतात. मग आपण त्याचे खापर दुसऱ्याच्या माथी कसे फोडले जाईल याच्या खटपटीला लागतो. त्यासाठी आपल्याभोवती प्रतिबंध आणि इशारे यांचे कुंपण घालून घेतो. इतरांची कार्यक्षमता आणि निष्ठा यांविषयीचा संशय हवेत पेरतो. एवढी सावधगिरी घेतली, म्हणजे मी फार प्रयत्न केले तरी हे अपयश आले, माझे इशारे इतरांनी जुमानले नाहीत म्हणून काम फसले असे म्हणायला आपण मोकळे होतो. असल्या सावधगिरीच्या उपायांमुळे परस्परसंबंध आणखी बिघडतात आणि भीतिदायक वाटणारे अपयश खरोखरच येण्याची शक्यता वाढते. अपयशाला आपण जबाबदार धरले जाऊ याची प्रत्येकाला वाटणारी भीती आणि तो दोष दुसऱ्यावर ढकलण्यासाठी प्रत्येकाची धडपड यांतूनच घोटाळे होण्याची शक्यता वाढते.

३ ऑक्टोबर १९७७ ची गोष्ट आहे. जनता पार्टीचे सरकार अधिकारावर येऊन सहाच महिने झाले होते. श्रीमती गांधींना दिल्लीत अटक झाली आणि नंतर त्यांची सुटका करावी लागली. एकूण मोहिमेला साफ अपयश आले आणि तशी बातमी टेलिप्रिंटरवर आली. मी त्या वेळी न्यूयॉर्कला संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यालयात जनता सरकारमधील एका ज्येष्ठ नेत्याशी बोलत होतो. "तुम्ही तावडतोब परत जायला हवे," मी त्यांना म्हटले. "तुम्ही लोकांनी या घोटाळ्याचा ठपका गृहमंत्र्यांवर ठेवला पाहिजे. म्हणजे साऱ्या सरकारची अब्रू जाणार नाही. मागून तुम्ही त्यांना काय पद द्यायचे असेल ते द्या. पण या क्षणी तरी दोष त्यांचाच आहे. त्यांनीच जबाबदारी घ्यायला हवी. यासाठी तुम्ही परत जायला हवे. श्रीमती गांधी आता हा प्रश्न सामान्य जनतेपर्यंत पोचवतील. त्या बाबतीत त्यांना चांगले प्रत्युत्तर देऊ शकाल अशा थोड्या लोकांपैकी तुम्ही आहात." "काय पोरकटपणे बोलता आहात." पुढारी मला म्हणाले, "आम्ही खूप दूर अंतरावर आहोत, म्हणूनच तर आम्ही सुरक्षित आहोत. सगळा घोटाळा केला तो या म्हाताऱ्यांनी असे आम्ही मागून म्हणू." "पण यातूनही नाव बुडाली तर तुम्ही तिच्याबरोबर बुडणार नाही का ?" "ही नाव तर काही झाले तरी बुडणारच. आम्ही काळजी घेणार ती एवढीच की, आमचे नाव लोक कोणत्या यादीत घालतील ? नाव बुडवणाऱ्यांच्या की जे इतरांमुळे बुडाले त्यांच्या ?" हे गृहस्थ जनता सरकार अधिकारावर आल्यापासून केवळ सहा महिन्यांतच या गोष्टी बोलत होते, हे ध्यानात घ्यायला हवे. पुढे ज्या वेड्यावाकड्या घटना घडल्या त्यात त्यांची आणि त्यांच्या गटाची भूमिका, त्यांच्या हालचाली या गोष्टी प्रेरणा होत्या, हे वर दिलेले त्यांचे उद्गार स्पष्ट करतात. मानसिकतेचे दुसरे वैशिष्ट्य उठून दिसते, ते म्हणजे आपला अहंभाव कमालीचा नाजूक, तकलादू असा असतो आणि त्याचबरोबर तो फार सहजपणे संतोषविता येतो. म्हणजे आपल्याला काय वाटेल ते करून सत्ता हवी असते. सारी परिस्थिती बदलून टाकणारी ताकद नव्हे, तर आपल्या वर्तुळातील व्यक्तींवर सत्ता गाजविता येईल आणि त्यांचे बरे-वाईट करता येईल इतपत मर्यादित सत्तेवर आपण खूष असतो.

हे दोन्ही विषय परस्परांशी सुसंगतच आहेत. आपल्याला असुरक्षितता भेडसावते

म्हणूनच किरकोळ काही मिळाले तरी आपण समाधान पावतो.

अपयशाची आपल्याला एवढी दहशत का ? लोक आपल्याविषयी काय बोलतात याची आपल्याला एवढी काळजी का ? काही थोड्या व्यक्तींवर हुकमत गाजविण्याची एवढी लालसा आपल्याला का वाटते ?

एक संभाव्य स्पष्टीकरण दिसते ते असे, समाजातील उत्पादनाची यंत्रणा काय किंवा एकंदरीत जीवनक्रम काय यांत वर्षानुवर्षे फार बदल झालेला नाही. कोणीही जीव तोडून प्रयत्न केला तरी जीवनपद्धतीत फार बदल झाला नाही. यातून येणारे दुःख आणि संताप आपल्याला परिस्थितीविरुद्ध वेळोवेळी युद्ध पुकारण्याची प्रेरणा देतात. पण शेवटी आपण थकून खाली पडतो. वाळूचे चार ढीग इकडचे तिकडे होतही असतील, पण पुढ्यातले विस्तीर्ण वाळवंट होते तसेच राहते.

या संरचनेविरुद्ध लढणे निसर्गाविरुद्ध लढण्याइतकेच निष्फळ होते. आपण वर्चस्व गाजवू शकतो काही मोजक्या व्यक्तींवर. तेवढ्यावरच समाधान करून घ्यायला हवे. अशा परिस्थिती, संधी फार मोजक्या येत. त्यामुळेच अपयश येणे फार महागात पडत असे.

अपयश म्हणजे कारकीर्द खलास अशी परिस्थिती होती. अशी परिस्थिती बोलून-चालून आटोक्याबाहेरची असल्यामुळे मी कितीही प्रयत्न केला तरी ती बदलणार नव्हती. त्यामुळे खरे माझे कर्तृत्व किती यापेक्षा जास्त महत्त्व आले ते माझ्या कामाबद्दल चार लोकांना काय वाटते याला. आणखी असे की, आपली जागा सोडून इतरत्र कर्तृत्व गाजविण्याची प्रवृत्ती फारशी नसल्याने प्रत्येकाचे वर्तुळ जवळपासच्या मोजक्या माणसांपुरतेच मर्यादित राहत असे.

कधी न बदलणाऱ्या वातावरणाचे इतरही परिणाम होतातच. त्यामुळेच समाजातील उच्च-नीचतेची संरचना अगदी थिजून घट्ट होऊन जात असे. समाजातील बलिष्ठ आणि दुर्बल यांच्यातील परस्परसंबंध गोठून दगडी होऊन जात. अशी रचना आणि अनुषंगाने येणारी मूल्ये यातून अधिकारशाही गाजविणारे व्यक्तिमत्त्व जन्माला येत असे. अशा व्यक्तिमत्त्वाच्या माणसांना एकतर्फी आदरभाव फक्त अपेक्षित असतो. अशा व्यक्ती इतर माणसांकडे श्रेष्ठ आणि कनिष्ठ एवढ्याच नात्याने पाहू शकतात, सहकारी म्हणून नव्हे.

## न बदलणारे वातावरण

उच्च-नीचतेच्या घट्ट संकल्पना अशा परिस्थितीत एखाद्याची प्रगती किंवा सुरक्षितता ही परिस्थिती सुधारण्यासाठी त्याने काय केले यावर अवलंबून नसते, तर त्याने आपल्या वरिष्ठांना कसे संतुष्ट केले आणि कनिष्ठांना सांप्रदायिक चाकोरीतून कसे वागायला लावले यावर अवलंबून राहते. आपल्या चळवळींमध्ये या विषयांचे प्रतिबिंब दिसते. ज्या गटाचा विचार आपण करतो आहोत त्यात आणखी एक घटक प्रभावी ठरतो. ज्या गटात नेता आणि अनुयायी या दोघांनीही भौतिक समृद्धी आणि संपत्तीचा मार्ग सोडून दिलेला असतो. त्यामध्ये मार्गदर्शन आणि नियंत्रण करण्यासाठी भावनिक उपायांचाच आधार घ्यावा लागतो. एखाद्या गटाचे इतक्या घट्टपणे संप्रदायात रूपांतर झाले असेल तर तितक्या प्रमाणात अशा भावनिक

युक्त्या प्रभावी ठरतात. वर उल्लेख केलेल्या मुद्द्यात आणखी काही गोष्टी स्पष्ट दिसतात.

आपण त्याची चर्चा केली तर त्याचे परिणाम भारतापुरतेच लागू होतात असे नाही. मध्ययुगीन युरोपातील उज्ज्वल भवितव्याचे भाकित करणाऱ्या संप्रदायांमध्ये आणि आदर्शवादी समाजवाद्यांच्या प्रयोगामध्ये याच गोष्टी आपल्याला दिसून येतील. आकर्षण वाटण्याचा स्वभाव हा काही भारतापुरताच मर्यादित नाही. इतरत्रही तो दिसतो. पण आपल्याकडील संस्था आणि चळवळींच्या सद्यःस्थितीला हा बदल बऱ्यापैकी जबाबदार आहे हा मुद्दा लक्षात घेतला पाहिजे.

तसेच सगळे गट आणि सगळ्या चळवळी पहिल्यापासून शेवटपर्यंत फक्त कर्मठ संप्रदायातच असतात असे नाही. मात्र काही वर्षे सृजनशील कार्य केल्यानंतर सर्वच संस्थांची आणि चळवळींची संप्रदाय बनण्याकडे प्रवृत्ती होते. अशा वेळी परिस्थिती बदलण्यासाठी आपण काय करावे ?

## काय करायला हवे ?

चांगल्या कामातून आपल्यामधील सर्वोत्तम गुणांचा आविष्कार होतो. क्षुद्र व्यक्तिगत अहंकारातून बाहेर येऊन सर्वांच्या खांद्याला खांदा लावून सहकार्याने काम करण्याची प्रेरणा मिळते. त्यातून नम्रता येते आणि स्वभाव बळकट होतो. या सगळ्या गोष्टी चांगल्या कामामुळे होतात; पण आपोआप घडून येत नाहीत. यातून काही वेळा माणसे अहंमन्य, उद्धट होऊ शकतात. इतरांकडे तुच्छतेने पाहतात. स्वतंत्र भावनेतून काही वेळा दुसऱ्यावर वर्चस्व गाजविण्याची भावना निर्माण होते. सेवाकार्य हाती घेणारी माणसे व्यावहारिक दृष्टीने काही गोष्टींचा त्याग करीत असतात. त्यातून सामाजिक सन्मान आणि मान्यतेपोटी त्यांच्यांतच स्पर्धा लागण्याचा धोका असतो. समाजाला मुळात आस्था कमी. त्यांचे लक्ष वेधण्यासाठी खटाटोप करणारे अनेक आणि त्यांच्यातून सर्वोच्च पदावर जाऊ शकतो तो एखादाच. अशा परिस्थितीत स्पर्धा जीवघेणी होण्याचा संभव असतो.

नेता आपल्या अनुयायांसाठी अनेक प्रकारे त्याग करतो ही गोष्ट खरी आहे. तसेच अनुयायीसुद्धा नेत्यासाठी आणि समाजासाठी सर्वस्व अर्पण करायला तयार होतात. काही प्रमाणात दोघेही स्वतःच्याच प्रेमात पडले तर मात्र बाहेरून सल्ला मिळणे किंवा मूल्यमापन होणे या दोन्ही गोष्टी अशक्य होतात. एखादा गट, वंश, पक्ष यांची ताकद व्यक्तीच्या ताकदीपेक्षा ज़ास्त असल्याने त्यांचा रस्ता चुकला तर होणारे दुष्परिणाम भयानक असतात. हिटलरने जर्मन नागरिकांमध्ये असा आत्मप्रीतीचा वणवा पेटवला की, त्यात जर्मनीचे शेजारी, ज्यू लोक आणि स्वतः जर्मन नागरिक होरपळून निघाले.

समजा, एखादा नेता मान-सन्मानासाठी इतरांच्या स्पर्धेत नसला, आपल्या अनुयायांना त्याने आत्मप्रीती शिकविली नाही, तरी काही वेळा चांगले काम करणाऱ्या इतर नेत्यांत आणि त्याच्यात दुरावा वाढत जातो. एखादी व्यक्ती एखाद्या प्रश्नासाठी, समस्येच्या सोडवणुकीसाठी आपली मालमत्ता, कारकीर्द, कुटुंब या सगळ्यांवर पाणी सोडते आणि संकट, कष्टाचे व्रत घेते, त्या वेळी हीच समस्या

आजच्या काळातील सगळ्यात मोठी समस्या आहे अशी त्याची खात्री पटलेली असते. पण या खात्रीमुळे आपण या समस्येसाठी करीत असलेले काम हेच तेवढे महत्त्वाचे असे मानण्याकडे प्रवृत्ती असते. निःशस्त्रीकरणासाठी मी माझे सर्वस्व अर्पण करणार असेन तर आण्विक शस्त्रांच्या भयानक परिणामांमुळे माझे मन झपाटून जायला हवे. अशा झपाटलेल्या स्थितीत ज्या वेळी आसाममधील विद्यार्थी नेत्यांची भाषणे मी ऐकतो तेव्हा माझी प्रतिक्रिया अशी होते, "यांची निष्ठा तर खरी दिसते, हे चतुरही दिसतात. पण असल्या काठाकाठावरच्या किरकोळ गोष्टींसाठी हे का आपली शक्ती फुकट घालवीत आहेत ? अणुयुद्ध झाले तर देशातील नागरिक काय किंवा परकीय काय सगळेच खलास होतील हे यांच्या लक्षात कसे येत नाही ?"

तेव्हा चांगले वातावरण निर्माण होण्यासाठी निव्वळ चांगले काम करणे पुरेसे नाही. त्यापलिकडे जाऊन काहीतरी करायला हवे. बुद्धाच्या शब्दांत 'आपले मन सज्ज असायला हवे.' सतत आत्मपरीक्षण करायला हवे. आपला दृष्टिकोन, आपले उद्देश, संघटना आणि काम या सगळ्यांची चौकट करायला हवी.

* आपली संघटना ही तिची मूलभूत उद्दिष्टे साध्य करण्याचे साधन आहे की, आपला अहंकार पोसण्याचे साधन आहे ?

* आपण जे चर्चासत्र आयोजित करणार ते काम पुढे नेण्यासाठी की संस्था जिवंत आहे एवढे इतरांना व आपल्याला जाणवून देण्यासाठी ?

* राजकारणी मंडळी दौऱ्याच्या काळात पत्रकार परिषदा घेतात. त्यांचा जेवढा परिणाम राहतो त्यापेक्षा काही अधिक टिकाऊ परिणाम आपल्या चर्चासत्रांतून किंवा सभांतून निष्पन्न झाला का ?

या वर्षीची परिषद गतवर्षीच्या परिषदेपेक्षा कितपत वेगळी होती ? मागच्या वर्षीचे ठराव अंमलात आणण्यासाठी आपण नेमके काय केले याचा आढावा घेण्यासाठी या वर्षीच्या परिषदेत आपण किती वेळ खर्च केला ?

* आपल्या संघटनेची स्थिती आणि आपले काम यांची कितपत खरी माहिती आपण एकंदर जनतेला देतो ? आपल्या सभासदांना तरी आपण खुलेपणाने पूर्ण सत्य सांगतो का ?

* आपल्या संस्थेचा कारभार, संस्थेतील घटकांचे परस्परसंबंध आणि त्या क्षेत्रातील इतर संस्थांबरोबरचे आपले संबंध यांसाठी आपण आपली कार्यशक्ती किती प्रमाणात खर्च करतो ? आणि प्रत्यक्षात ज्या कार्यासाठी ही संस्था स्थापन झाली त्या कार्यासाठी किती कार्यशक्ती खर्च केली जाते ?

आपल्या वर्तुळातील लोकांशी संभाषण करण्यात आपला किती वेळ खर्च होतो ? आणि आपल्या वर्तुळाबाहेरील जगाशी, विशेषतः आपल्या विरोधकांशी संबंध साधण्यासाठी किती वेळ खर्च केला जातो ? असे प्रश्न विचारणे, अशी मानसिक सतर्कता यांची गरज पडते, ती चळवळ चांगले काम करीत असल्यामुळेच. प्रत्येक चळवळीला एक मार्गदर्शक, स्फूर्तिदाता लागतो. अशा व्यक्ती अपवादानेच मिळतात आणि त्यामुळे त्यांचा उदोउदो होण्याची शक्यता जास्त असते. त्याचबरोबर

गट किंवा चळवळ स्वतःला विधायक कार्याला वाहून घेत असल्यामुळे आत्मसमर्थन अधिक सोपे होते. एखादा विशिष्ट प्रश्न हाताळत असताना त्याच्यापासून थोडे तरी अलिप्त राहणे आवश्यक असते. कोणता प्रश्न निवडला जाईल हे अनेक योगायोगांनी ठरते. काही प्रमाणात हे आपल्या आवडी-निवडी, पूर्वीचे शिक्षण, अनुभव आणि परिस्थिती यांवरही अवलंबून राहते. तुम्ही राहत असता त्या भागात दरड कोसळून भीषण अपघात होतो आणि त्याने तुम्ही झपाटले जाता. तुम्ही छत्तीसगडमध्ये राहत असता. आसपास आदिवासी नागविले जाताना पाहता. कंत्राटदार आणि खाणमालक यांची बदमाषी तुम्हाला दिसते. या गोष्टी तुमच्या मनाचा ठाव घेतात. संघर्ष छेडताना त्या समस्येशी स्वतःला पूर्णपणे एकरूप बनविणे आवश्यक असले, तरी त्यामुळे दुसऱ्या एखाद्याने इतरत्र अन्य काही कार्य हाती घेतले तर त्याला कमी लेखण्याचे काहीच कारण नाही. आपल्या आताच्या दुर्दशेचे कारण काय, त्याला जबाबदार कोण, आपली ताकद आणि दुबळेपणा कशात आहे या गोष्टी लोकांना मूर्त स्वरूपात दाखवून देण्याचा रस्ता म्हणजे आंदोलनासाठी निवडलेला विशेष प्रश्न, ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. या गोष्टीची जाणीव जनतेला होईल तेव्हाच व्यापक परिवर्तन शक्य होईल आणि लोकांना ही जाणीव स्वतःच्या अनुभवानेच होऊ शकेल. हे अनुभव, ही जाणीव यांना नेमकेपणा देण्याचे साधन म्हणजेच आपण हाती घेतलेला प्रश्न. परंतु इतरांनी हाती घेतलेले प्रश्नही नेमके हेच कार्य करीत असतात.

इतरांच्या या कार्याबाबत आपण सहिष्णू तर असले पाहिजेच, पण तेवढेच पुरेसे नाही. देशाच्या वेगवेगळ्या भागांत शेकडो गट विधायक कार्य करीत आहेत. पण त्या सगळ्यांचा एकत्रित असा प्रभाव जाणवत नाही. दुसरे एक कारण म्हणजे प्रत्येक गट आपल्या कार्याने भारावून गेलेला आहे. राज्यकर्ते त्याकडे लक्ष देत नाहीत. एखादी समस्या राष्ट्रीय स्वरूप घेईपर्यंत तिच्याकडे पाहण्याची गरज त्यांना वाटत नाही आणि अनेक समस्या राष्ट्रीय समस्येचे स्वरूप धारण करू शकत नाहीत. दुसरे कारण म्हणजे ज्या गटाने ही समस्या मांडली असेल तो वगळता इतर गट तिच्याकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे अशा तऱ्हेच्या लोकसेवेत गुंतलेल्या इतर गट आणि संस्थांचा समन्वय साधणे हे आपल्या विधायक कार्याचाच भाग मानले पाहिजे. त्यामुळे कामाचा प्रभाव तर वाढेलच पण एकमेकांशी सहकार्य केल्याने विविध गटांचे नेतेही, चांगली माणसे एकत्र येऊ शकतात हे जनतेला दाखवून देऊ शकतील. यातूनच जनतेला वाटणारा निराशायुक्त अविश्वास दूर होऊ शकेल.

अंतर्मुख होऊन विचार करणे आणि परस्परांशी सहकार्य हे तर हवेच. पण आपल्या गटांना आणि चळवळींना दुबळेपणे का येतो याचे वर दिलेले विश्लेषण लक्षात घेता सांप्रदायिकतेचा बीमोड करणेही गरजेचे वाटते. आपल्या चळवळींना मठ किंवा संप्रदाय बनविणाऱ्या प्रवृत्तींपैकी काही विरून जाताना दिसतात. सत्तेच्या कृत्रिम उतरंडी गडगडताना दिसतात. गतिमानता वाढली आहे आणि अधिक संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे गटातील इतरांच्या व्यक्तिमत्त्वावरील पकड

थोडी ढिली होत आहे. पण तरीही हे घटक अजूनही मूळ कार्यामध्ये अडचण आणण्याइतके प्रभावी आहेतच. गेल्या ५० वर्षांत समाजात विलक्षण बदल घडून आला आणि नव्या संधीची दारे उघडली. आपले सेवाव्यवसाय विस्तारले. पण तरीही समाजव्यवस्थेची नवी चौकट अजून उभी राहिलेली नाही. सर्वांना लागू होतील अशी नवीन जीवनमूल्ये निर्माण झालेली नाहीत. सर्व क्षेत्रांत आपले कार्य ज्याच्या आधारे ताडून पाहावे असे नवे निकष पूर्णत्वाने उपलब्ध नाहीत. अशा मूल्यांची चौकट देण्याचा प्रयत्न स्वामी विवेकानंद, गांधीजी अशा थोड्या व्यक्तींनी केला. आपले अन्न, सूतकताई आणि वस्त्रनिर्मिती, आपल्या मुलांचे शिक्षण, रोग्यावरील औषधोपचार येथपासून सार्वजनिक जीवनातील आपल्या सहभागापर्यंत सर्व गोष्टींचा परस्परसंबंध स्पष्ट झाल्याचे वाटावे असा त्यांचा प्रयत्न होता. त्यांच्या निर्वाणानंतर लोटलेल्या काळात समाजात मोठ्या प्रमाणात बदल घडून आल्यामुळे त्यांनी शिकविलेली अनेक तत्त्वे आज परिस्थितीशी सुसंगत वाटत नाहीत. जगाकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनात एक सखोल सुसंगती होती. तिचे चिंतन आपण कधीच केलेले नसल्यामुळे त्यांनी दिलेल्या मूल्यव्यवस्थेचा काळाशी सुसंगत असा विकास आपण करू शकलो नाही. याउलट वरवरच्या आधुनिकतेला किंवा उथळ गैरलागू मार्क्सवादाला भुलून त्यांच्या शिकवणीचीही टर उडविली. त्यामुळे परिस्थिती झपाट्याने बदलली आणि नव्या संधी उपलब्ध झाल्या, आपल्या सेवा विस्तारणे आवश्यक ठरले तेव्हा आपल्यातील असुरक्षिततेची भावना अधिक तीव्र झाली. दुसऱ्यावर वर्चस्व गाजविणे किंवा दुसऱ्याच्या पायावर सर्वस्व झोकून देणे या दोन्ही प्रवृत्ती अशा भयगंडापोटीच आहेत. इतिहास आपल्याला अनेक क्षेत्रांत मदत करीत असतो. सांप्रदायिकतेला कारणीभूत असे अनेक घटक इतिहासाच्या काळात विरघळले. आता आपल्याकडील विधायक चळवळीत गुंतलेल्या गटांच्या नेत्यांनी आपले मठ नि संप्रदाय जाणून-बुजून मोडले पाहिजेत. त्यांनी स्वतःच आपल्या अनुयायांना इतरांची विचारधारा अनुभवण्यासाठी उद्युक्त केले पाहिजे. आपल्या आसपासचे इतर सभासद आपल्याविषयी, आपल्या कार्याविषयी काय बोलतात याकडे फार लक्ष देऊ नका असे त्याने आपल्या अनुयायांना बजावले पाहिजे. विविध गटांत आपली प्रगती करून घेण्यासाठी अनुयायांना आज जे मार्ग चोखाळावे लागतात ते पूर्ण बदलून त्यांच्या जागी कार्याच्या मूलभूत उद्दिष्टांची स्थापना केली पाहिजे. यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक नेत्याने आपल्या प्रभावक्षेत्राच्या बाहेर पाऊल टाकण्याची सवय करून घेतली पाहिजे.

सुफी पंथात एक कथा सांगतात. भर बाजारपेठेत गुलामांचा लिलाव चालला होता. एक गुरुजी बाजूने चालले होते. ते पाहण्यासाठी थबकले. त्यांच्या कपड्यांच्या चिंध्या झालेल्या होत्या. त्वचा उन्हाने करपलेली होती. एका व्यापाऱ्याने शंभर नाणी अशी गुरूची किंमत पुकारली. आपला सौदा पूर्ण झाल्याचे गुरूच्या लक्षात आले. तथापि श्रद्धाळू असल्याने त्यांनी हा एक ईश्वरी संकेत मानला आणि आपल्या मालकाच्या घराची वाट धरली.

आपल्या मालकाची सेवा त्यांनी मनोभावे केली. वर्षे लोटली. एक दिवस ते मालकाला म्हणाले, "मला आज तुमच्या सेवेत येऊन नऊ वर्षे पुरी झाली.

आता मला जाण्याची परवानगी द्या."

"पण झाले तरी काय? मला तुझी गरज आहे. तू येथे प्रत्येकाला हवाहवासा वाटतोस. अन्न कमी मिळते काय? दुप्पट करीन. घर अपुरे पडते का? मोठे घर देतो." गुरूंनी मालकाला आपली खरी ओळख सांगितली आणि आपला सौदा कसा होऊन गेला तेही सांगितले. मालकाने गुरूच्या पायांवर लोळण घेऊन म्हटले, "अरे देवा, माझ्याकडून हे केवढे मोठे पाप घडले! तुम्ही मला हे आधीच का सांगितले नाही."

गुरू म्हणाले, "तुम्ही वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. बाजारात जे घडले तो एक ईश्वरी संकेत होता. कदाचित मी माझ्या नावाशिवाय जगायला शिकावे हेच त्या वेळी माझ्यासाठी आवश्यक असेल!" आज आपली गरज नेमकी हीच आहे.

# ६. एक राष्ट्रीय सवय आणि त्यावरील उपाय

एखादा अपवाद वगळला तर सर्वसाधारण अनुभव असा : भारतात जो जो दुसऱ्याच्या भल्यासाठी झटतो त्याला त्याला बदनाम केले जाते आणि त्याच्या प्रयत्नांचा' प्रभाव जितका जास्त, तितकी बदनामीची धार अधिक, विषारीपणा जास्त.

चिपको आंदोलनाला चंडीप्रसाद भट्ट यांनी दिलेले योगदान हे अतुलनीय आहे. मिर्झापूरमधील आदिवासींच्या जीवनात प्रेमभाई आणि त्यांचे निष्ठावान सहकारी यांनी परिवर्तन घडवून आणले. छत्तीसगडमध्ये बेघर लोकांना एकत्रित आणून, त्यांचे आयुष्य बदलून टाकण्यासाठी शंकर गुहा नियोगी यांनी केलेले काम धडा घ्यावा असेच आहे. जपानी लोक हुषार व्यक्तींना जिवंत राष्ट्रीय संपत्ती मानतात आणि तरीही यातील प्रत्येकाला नाना आरोपांना तोंड द्यावे लागले आहे. भारतात नेहमी सोसावी लागणारी नमुनेदार चिखलफेक म्हणजे परकीय हस्तक असल्याचा आरोप. कधी सी.आय.ए. एजंट तर कधी चीनचा आणि काही वेळा तर दोघांचाही. चंडीप्रसाद यांना तर अशा आरोपांसाठी गुप्तचर खात्याच्या चौकशीलासुद्धा तोंड द्यावे लागले. परदेशी हस्तक असल्याचा आरोप प्रेमभाईंवरही करण्यात आला. उत्तरप्रदेश विधानसभेत विशेष काही घडले नाही तरी एका राष्ट्रीय वृत्तपत्राने मात्र काहीही चौकशी न करता या आरोपांना ठळकपणे प्रसिद्धी दिली. प्रेमभाईंना आपले काम सोडून यात लक्ष घालावे लागले. शंकर गुहा एका अगदी साध्याशा कुटीत राहतात. इतर आरोपांबरोबरच राहत्या जागेखाली त्यांनी ट्रान्समीटर पुरून ठेवला आहे आणि त्यावर रोज रात्री ते न्यूयॉर्कमधील आपल्या मालकांशी बोलतात, असले किटाळ त्यांना सहन करावे लागले.

अशी दूषणे आणि नालस्ती दोन स्वरूपात समोर येते आणि तीन ठिकाणांहून उगम पावते. पहिले म्हणजे अगदी उघड उघड चालणारा मौखिक दहशतवाद– बेपर्वाईने, गलिच्छपणे चालविलेली चारित्र्यहननाची मोहीम. तिचा जोर ओसरल्यानंतर सुरू होते ती तितकीच विषारी कुजबूज आणि अफवांची पेरणी. या तंत्रात सराईत असलेली धंदेवाईक मंडळी दोन्ही शस्त्रे एकदमच वापरतात. समाजसुधारकांच्या कार्यामुळे ज्यांच्या स्वार्थाला तडा जातो अशा स्थानिक हितसंबंधी दबावगटापासून ते राजकीय पक्षांपर्यंत अनेकजण या बदनामी मोहिमेत हात धुऊन घेतात. राजकीय पक्षांना असे समाजसुधारक हे भावी प्रतिस्पर्धी वाटतात. दारूचा बेकायदेशीर धंदा करणारे,

सावकार, जंगल कंत्राटदार, स्थानिक राजकीय पुढारी यांच्या टोळ्या आदिवासींचे रक्त शोषण्याचे काम बिनबोभाट करीत असतात. मिर्झापूरमधील प्रेमभाईंचे काम किंवा छत्तीसगडमधील शंकर गुहांचे काम यांमुळे अशा टोळ्यांच्या कारवायांना अडथळा येतो. दुसरीकडे साम्यवाद्यांना आपल्याला प्रतिस्पर्धी उभा राहतो याची भीती वाटते.

अर्थात विषारी अफवा किंवा कुजबूज या गोष्टी काही एखाद्या गटापुरत्याच मर्यादित नाहीत. ती आपली राष्ट्रीय सवय आहे. निदान मध्यमवर्गीयांचे तरी ते वैशिष्ट्य आहे. त्यांच्यात जाणून-बुजून, पद्धतशीरपणे अफवा पसरविल्या जातात असे नाही. सहजपणे, जाता-जाता हे काम होऊन जाते. करणाऱ्यांचे हितसंबंध त्यात असतातच असे नाही. पण तरीसुद्धा हे काम प्रभावी ठरते. ज्यांची निंदा करावीशी वाटत नाही अशी माणसे क्वचितच असतात व निश्चय केला नाही; तरी या कृत्यामागे वाईट हेतू होता असे सिद्ध करता येते. इतरांचा नीचपणा सिद्ध करण्याची अगदी साधी संधीही आपण वाया दवडीत नाही.

चांगले काम करणाऱ्यांची बदनामी करण्याची सवय खरे तर मध्यमवर्गीयांची. तिचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. समान कार्य करणाऱ्यांमध्ये मत्सर, अफवा किंवा चहाड्या यांचा जोर जास्त दिसतो. यशस्वी नर्तकाची त्याच्यामागे नालस्ती करणाऱ्यांत इतर नर्तकच पुढे असतात. हीच गोष्ट वकील, पत्रकार यांची. एक साम्यवादी दुसऱ्या पठडीतील साम्यवाद्याची बदनामी करण्यात पुढाकार घेतो. प्रत्येकाला जवळचा शेजारी हा सगळ्यात मोठा शत्रू वाटतो. या सवयीतून स्वतः चांगले काम करणारे सुटलेले आहेत असेही नाही. चांगले काम करणाऱ्या इतरांविषयी, निष्कारण शंका घेणे, अशा शंका चारचौघांत बोलून दाखविणे अशा गोष्टी चांगल्या कार्यकर्त्यांच्या हातूनही घडतात. तो करत नसेल तर त्याचे अनुयायी ही कामे करतात. अशी निंदानालस्ती चांगल्या कामात अडथळे आणते. अशा बदनामीच्या मोहिमेमुळे आपण अधिक दुबळे बनतो. ही राष्ट्रीय सवय आपण सोडून दिली पाहिजे, हे स्पष्ट आहे. अशा बदनामीच्या मागे नेमके काय असते ? त्याबाबत आपण काय करायला हवे ? उत्तरादाखल मी दोन उदाहरणे घेणार आहे. एका सुसंघटित गटाने चालविलेली व्यावसायिक प्रचार मोहीम आणि समांतर कामे करणारे आणि मध्यमवर्गीय यांच्यांतील काहीशी अस्ताव्यस्त परंतु प्रभावी विषारी कुजबूज. पहिल्या प्रकारचे आधुनिक भारतातील सगळ्यात उत्तम उदाहरण म्हणजे बदनामी हा ज्यांचा खास स्वभाव बनला आहे असे साम्यवादी.

## साम्यवाद्यांचा मार्ग

साम्यवाद्यांच्या सिद्धांतामधूनच जणू बदनामीचा उगम होत असतो. धार्मिक अंधश्रद्धेची चार-पाच वैशिष्ट्ये असतात. या वैशिष्ट्यांतून साम्यवादीप्रणीत बदनामीची मोहीम जन्म घेते. पहिले वैशिष्ट्य म्हणजे साम्यवादी एकाच महान ध्येयावर श्रद्धा ठेवतात. ज्यासाठी धडपडावे असे एकच एकमेव महान उद्दिष्ट, सर्वसाधारण अपरिहार्य ध्येय. दुसरे म्हणजे या महान ध्येयापर्यंत पोहोचण्याचा सांप्रत परिस्थितीत एकच मार्ग आहे असे साम्यवादी मानतात. परिस्थिती बदलेल त्यानुसार आजचा

योग्य मार्ग उद्या योग्य असेलच असे नाही. पण प्राप्त परिस्थितीत एका वेळी एकच मार्ग ध्येयाकडे जात राहतो. तिसरी गोष्ट : प्राप्त परिस्थितीत कोणता मार्ग सगळ्यात जास्त योग्य ते ठरविणे फार अवघड आहे. साम्यवादी स्वतः, त्यांचे गट आणि त्यांचा पक्ष यांच्याकडे स्वतःचे अमोघ शस्त्र असल्याने अशी निर्णयक्षमता फक्त त्यांच्याकडेच असते. चौथी गोष्ट : मार्क्सपासून आजपर्यंत सारे साम्यवादी एवढेच घोकत आले आहेत की, एखादे तत्त्व, धोरण, मत मांडणारा प्रत्येक माणूस किंवा गट यांचे वर्गीय हितसंबंध त्यामध्ये गुंतलेले असतात. सामान्य जनतेच्या खऱ्या हिताला वाहून घेतात, ते फक्त साम्यवादी, त्यांचा गट आणि त्यांचा पक्ष एवढेच. त्यामुळे त्यांच्यापेक्षा वेगळे मत जे जे मांडतील ते ते सगळे आपोआपच प्रतिक्रांतीचे हस्तक ठरतात, बुर्झ्वा ठरतात. साम्यवादापेक्षा भिन्न मत मांडणाऱ्या व्यक्ती या समाजाच्या प्रगतीचा घात करण्याचे कारस्थान रचत असतात. त्या एकमेव, अपरिहार्य महान ध्येयाकडे जाण्याच्या मार्गात अडथळे आणत असतात. या चार विधानांचे एकत्रित परिणाम काय दिसतात त्याचे चांगले आविष्कार रेव्हेल यांच्या 'टोटॅलिटेरियन टेम्प्टेशन' या ग्रंथात दिसतात. साम्यवादाला विरोध असणारा प्रत्येकजण अप्रामाणिक असतो. साम्यवादाबद्दल खरोखर काही शंका आहेत, साम्यवादी राजवटीत न राहावेसे वाटण्यासाठी काही खरीखुरी कारणे आहेत किंवा साम्यवादी राजवटीचे काही वाईट अनुभव आहेत म्हणून मग साम्यवादाला विरोध होत नाही, तर सर्वांचा साम्यवाद विरोध हा जन्मजातच असतो अशी साम्यवाद्यांची खात्री असते. त्यांची अशीही खात्री असते की, जन्मतः साम्यवादविरोधी असलेली मंडळीच पुढे अशा विरोधासाठी जरूर ती कारणे शोधून काढतात किंवा निर्माण करतात. साम्यवादाच्या विरोधकांनी, आपली मते, साम्यवादाबद्दलची वस्तुस्थिती जाणून घेण्यापूर्वीच बनवलेली असतात असे साम्यवादी मानतात. एखाद्याचा साम्यवाद विरोध हा कशाचाही परिणाम नसतो, तर तेच मूळ कारण असते. साम्यवाद्यांच्या मतानुसार साम्यवादविरोध हा इतिहासाच्या अभ्यासाचा परिणाम नसून निव्वळ विरोधकांच्या दुष्ट स्वभावाचा परिणाम असतो. प्रत्येक चांगला कम्युनिस्ट आपले तत्त्वज्ञान, सिद्धांतांना जागूनच दुसऱ्याची निंदा-नालस्ती करीत असतो. साम्यवाद्यांचे याबाबतचे पवित्र तत्त्वज्ञान व्हॅलिटिनोव्ह याने 'द एनकाऊन्टर्स विथ लेनिन' या आपल्या ग्रंथात एकत्रित केलेले आहे. लेनिनने एकदा त्याला सांगितले, 'साम्यवाद ही संपूर्ण एकाकार आणि चिरेबंदी अशी संकल्पना आहे. तिच्यामध्ये सैलपणाला थारा नाही. ती सौम्य करणे किंवा तिच्यामध्ये नव्या गोष्टींची भर घालून तिचे स्वरूप बिघडविणे मान्य होण्यासारखे नाही.' मार्क्सवादाच्या एका टीकाकाराबाबत (त्याचे नाव मी आता विसरलो). लेखानोव्ह एकदा मला म्हणाला होता, 'प्रथम त्याच्यावर दोषी असल्याचा शिक्का मारून मोकळे होऊ, मग बघता येईल त्याच्या प्रकरणाची चौकशी कशी करायची ते!' मार्क्सवादाला दुर्बल करण्याचा जे जे प्रयत्न करतील त्या सर्वांवर अपराधीपणाचा शिक्का आपण मारलाच पाहिजे, असे मला वाटते. मग त्याच्या प्रकरणाची तपासणी नाही केली तरी चालेल. प्रत्येक सच्च्या क्रांतिकारकाने असेच वर्तन करायला हवे.'

या चार विधानांमध्ये पाचव्याची भर घालू. साम्यवादाचे हे महान आणि अपरिहार्य असे ध्येय गाठणे इतक्या कमालीच्या निकडीचे असते की, ते गाठण्यासाठी काय वाटेल ते मार्ग आणि साधने वापरणे समर्थनीय ठरते. व्यक्तींची हत्या, दहशतवाद, कत्तली, हत्याकांडे, हिंसाचार इथपासून अगदी संसदीय, निवडणुकीपर्यंत कोणतीही साधने त्या त्या वेळी उपयोगी असतील किंवा नसतील, परंतु त्यातील कोणतीही मुळातूनच बाद ठरविली जात नाहीत. एकदा सगळीच साधने पावन करून घेतल्यानंतर बदनामी हे हिंसेच्या मानाने अगदी सौम्यसे साधन साम्यवाद्यांना स्वीकारार्ह वाटते यात नवल नाही. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे या पाच विधानांमुळे बदनामीचा पाठपुरावा करण्यास फक्त तात्कालिक समर्थन लाभते. मौखिक दहशतवाद विशिष्ट परिस्थितीत डावपेच म्हणून मान्य केले जातात. पण पहिली चार विधाने मात्र बदनामीच्या हत्याराचे सर्वंकष सैद्धांतिक समर्थन देतात.

## बदनामी : एक सहज सवय

आपले साम्यवादी नियमितपणे दर आठवड्याला इतरांवर बदनामी आणि शिवीगाळीची विखारी आग ओकतात. त्यातून या पाच विधानांचा एकत्रित परिणाम दिसून येतो. एका वर्षात त्यांनी प्रसिद्ध केलेल्या बदनामकारक विधानांचे उदाहरण द्यावयाचे झाले, तर त्याचे बऱ्यापैकी जाड पुस्तक तयार होईल. या बदनामीच्या मोहिमेचा उगम तीन ठिकाणांहून होतो. तिची तंत्रे आणि वाक्प्रचार लेनिनवरून आणि स्टॅलिनच्या कॉमिन्टर्नच्या शैलीवरून उचलली जातात. मग त्याची सर्वसाधारण दिशा ही आपल्याकडील साम्यवाद्यांच्या परकीय स्फूर्तिदात्यांकडून मिळणाऱ्या आदेशानुसार ठरते. नेमकी कोणाची बदनामी करायची त्यांची नावे पक्षातील अज्ञात 'देवा'कडून सांगितली जातात.

आपल्याकडील मार्क्सवादी पक्षाच्या प्रकाशनात अशी भरपूर उदाहरणे वाचकांना सापडतील. मी येथे उल्लेख करणार आहे तो विशिष्ट शब्दांपेक्षा एकूण जातकुळीचा. त्यासाठी लेनिनच्या लिहिण्या-बोलण्यातील उदाहरणे घेणार आहे. कारण आपल्या साम्यवाद्यांनी लेनिनच्या साच्याला आदर्श मानून अनुकरण केलेले आहे. आपल्यापेक्षा भिन्न मत असलेल्या कोणालाही कुत्रा, डुक्कर,, पाजी, लुटारू, हलकट, थुंकीचाटू, पूर्णपणे अडाणी अशी शेलकी विशेषणे चिकटविणे ही लेनिनच्या दृष्टीने नित्याची बाब होती. त्याची अनेक भाषणे आणि पुस्तके यांच्यामध्ये वस्तुस्थितीची तर्कशुद्ध मांडणी किंवा युक्तिवाद यांचा अंशही नाही. त्यात आहेत फक्त आरोप आणि शिवीगाळ. याचे नमुनेदार उदाहरण म्हणजे 'द प्रोलेटेरियन रेव्होल्यूशन अँड द रेनगेद कॉटस्की' ही वादग्रस्त पुस्तिका. आपल्याकडील साम्यवादी तिला आदर्श मानतात. या एकाच पुस्तिकेत लेनिनने आपणास विरोध करणाऱ्यांवर उधळलेली निवडक शब्दफुले मुद्दाम पाहावीत अशी आहेत. शरम वाटावी अशी संपूर्ण दिवाळखोरी (१७), झोपेत चिंध्या चावाव्यात तसे त्यांचे हे बोलणे वाटते (२०), बेअकलीपणाचे बोलणे, बाष्कळ बडबड्या (२०), मार्क्सवादी पढतपंडित (२१), महाभयानक विसंगतीने भरलेली असत्य विधाने (२२), एकदा या बाजूला आणि एकदा त्या बाजूला हुंगत जाणाऱ्या कुत्र्याच्या आंधळ्या पिल्लाप्रमाणे (२२), बुर्झ्वाजींची चाकरी बजावणारे

तिरस्करणीय स्तुतिपाठक (२३), निव्वळ मूर्खपणा किंवा गुंतागुंतीची चलाखी (२३), बिनडोक सल्लागार (२७), भांडवलदारांचे बूटचाटे मूर्ख कॉट्स्की (३६), कॉट्स्कीनामक भावूक मूर्खांची दिवास्वप्ने (३८), बुर्झ्वाजींचा भाट (४६), असली गोड किलबिल अजाण बालकाने केली तर गोड वाटते; पण मतिमंदपणाचे अधिकृत शिफारसपत्र न मिळालेल्या एखाद्या प्रौढाच्या तोंडी तिची शिसारी येते (५३), क्षुद्र, स्वार्थी, प्रतिगामी विचार (६५), दूरदृष्टी नसलेले जडवादी (६७), डुकराचा मेंदू असलेले असंस्कृत (७४), कामगारांच्या क्रांतीची नालस्ती करण्यासाठी भांडवलदारांनी वापरलेले भाडोत्री कुत्रे (८९), बुर्झ्वाजींच्या छावणीत घुसलेला दगाबाज (८९). (कंसातील आकडे पृष्ठसंख्या दाखवितात : व्ही. आय. लेनिन, सिलेक्टेड वर्क्स, खंड तीन, प्रगती प्रकाशन, मॉस्को ७५)

ही सारी शिवीगाळ लेनिनने कोणाला उद्देशून केली होती तर ज्याचे कौतुक त्याने स्वत:च केले होते ते असे : 'कॉट्स्कीच्या पुष्कळशा लिखाणावरून आपल्या लक्षात येईल की, मार्क्सवादी इतिहासकार बनणे म्हणजे काय ते त्याला समजले आहे. त्याचे लिखाण क्रांतिकारी कामगार वर्गाचे कायमचे वैभव होऊन राहील, नंतरच्या काळात त्याने पाखंडीपणा केला असला तरी.' (४९)

फक्त एका पुस्तकात नव्हे तर कोणताही एखादा परिच्छेद घेतला तरी त्यात अपशब्दांची गटारगंगा वाहताना दिसते. लेनिनच्याच 'इन मेमरी ऑफ काउन्ट हेदेन' यातून घेतलेला हा नमुनेदार उतारा : 'गुलामीमधून क्रांतिकारक तयार करण्याऐवजी तुम्ही त्यांना अधिकच लाचार, असहाय्य बनवत आहात हे तुमच्या लक्षात येत नाही. लोकशाही किंवा स्वातंत्र्य यांबद्दलचे तुमचे सगळे बोलणे म्हणजे निव्वळ पोपटपंची आहे, ढोंग आहे, बाष्कळ बडबड आहे, निव्वळ चांगले रंगविलेले नामफलक आहेत. तुम्ही क्षुद्र वृत्तीचे जंगली लोक आहात आणि तुमचे शिक्षण, संस्कृती व ज्ञान म्हणजे निव्वळ वेश्यावृत्तीचा एक प्रकार आहे. कारण तुम्ही आपले आत्मे विकत आहात आणि ते गरजेपोटी नव्हे तर विकण्याच्या आनंदासाठी विकत आहात.' (कलेक्टेड वर्क्स, १३, ५३) आपल्याकडील साम्यवाद्यांनी ही शैली अशी काही आत्मसात केली आहे की, आजतागायत त्यांना नवीन शिव्या, अपशब्द शोधून काढणे जमलेले नाही. काळाच्या ओघात अशा अपशब्दांचे महत्त्व वाढले आहे. लिखाण भरीव व वजनदार करण्यासाठी असले वाक्प्रचार आवश्यकच नव्हे तर पुरेशी अट झाली आहे.

लेनिनप्रणित बदनामीची अनेक ठराविक तंत्रे आणि तत्त्वे आपल्या साम्यवाद्यांनी अंगी बाणवली आहेत. मी फक्त दोनच उदाहरणे देतो. पहिले म्हणजे दोन गोष्टींचा एकमेकांशी संबंध जोडून माणसाला बदनाम करण्याची युक्ती आणि दुसरे म्हणजे एखाद्याला भलतेच हेतू चिकटवून बदनामी करण्याची युक्ती.

लेनिनने समाजवादी क्रांतिकारकांची भरपूर बदनामी केली. कारण एवढेच की, एडवर्ड डेव्हीड यांनी एका पुस्तकात दिलेला कृतिविषयक कार्यक्रम साम्यवाद्यांच्या कार्यक्रमाशी मिळताजुळता होता. लेनिननेच म्हटल्याप्रमाणे एडवर्डचा साम्यवादी पक्षाशी काहीही संबंध नसून तो निव्वळ एक संधिसाधू मनुष्य होता (कलेक्टेड वर्क्स,

खंड ६, पृष्ठे ४३१ ते ४३५). कॉट्स्कीची बदनामी करण्याचे कारणही असेच क्षुद्र होते. त्याच्या पुस्तकांचा उल्लेख फ्रेंच रेडिओवर झाला होता. बुर्झ्वा समीक्षकांनी त्याची स्तुती केली होती (कलेक्टेड वर्क्स ३०, पृष्ठे २७-३७). लेनिन आपल्या सहकाऱ्यांवरही सतत शाब्दिक हल्ले चढवीत असे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे सहकाऱ्यांचे युक्तिवाद हे इतर कोणाच्या नवीन युक्तिवादाशी साम्य दाखवणारे असत. कधी बुर्झ्वाजीच्या विचाराशी तर कधी डाव्या वृत्तपत्रांच्या विचारांशी (कलेक्टेड वर्क्स, खंड १, पृष्ठे ११९-२०, ५८५-८६; खंड २ पृष्ठे ३७३-७४, ५४६) 'इंपीरियालिझम, द हायेस्ट स्टेज ऑफ द कॅपिटॅलिझम' या लेनिनच्या प्रसिद्ध पुस्तकात कायम आढळणारे एक पालूपद म्हणजे 'कॉट्स्कीचे निष्कर्ष हे बुर्झ्वा सिद्धांतवादाशी मिळतेजुळते आहेत.'

लेनिनच्या मते त्याच्यापेक्षा वेगळा दृष्टिकोन मांडणारे आणि टिकवून ठेवणारे सगळेजण थोडेतरी दुष्ट, अंतःस्थ हेतूमुळे तसे करीत असतात. बहुधा भिन्न मताच्या व्यक्तींवर बुर्झ्वाजींकडून पैसे घेऊन मते बनविण्याचा आरोप लेनिन करीत असे. (कलेक्टेड वर्क्स, खंड १, पृष्ठ ६३७)
'द प्रोलेटेरियन रेव्होल्युशन ऑफ द रेनगेड कॉट्स्की' या पुस्तकात पढतपंडित कॉट्स्की हा बूर्झ्वाजींना खूष करण्यासाठी मार्क्स आणि एंगल्सचे सिद्धांत निर्लज्जपणे विसरून गेला आहे असे वाचायला मिळते (कलेक्टेड वर्क्स, खंड ३, पृष्ठ २९). लेनिनने टॉलस्टॉयची संभावना कशी केली असेल याचा सहज अंदाज येईल. टॉलस्टॉय लेनिनच्या विचारांशी सहमत आहे तेवढ्या बाबतीत त्याची मते सच्चेपणाची. लेनिनचे मतभेद असतील तेवढ्या बाबतीत तो 'रशियन बुद्धिवादी' या नावाखाली वावरणारा खोटारडा, मेंदूत वात भरलेला रड्या ठरतो! (कलेक्टेड वर्क्स, खंड १५, पृष्ठे २०२-२०९).

टॉलस्टॉयबाबतचे लेनिनचे निदान सहज अंदाज करता येईल असे आहे. त्याच्या मते टॉलस्टॉय तत्कालीन रशियातील संक्रमणावस्थेत असणाऱ्या संदिग्ध आणि व्यामिश्र स्वरूपाच्या शक्तींचे प्रतिनिधित्व करतो. (हे मूल्यमापन मार्क्सवादी साहित्यसमीक्षकांनी आधार म्हणून स्वीकारले आणि त्यातून काढलेली सूत्रे इतर लेखकांना मोजपट्ट्या म्हणून लागू केली हे वेगळे सांगण्याची खरे तर गरज नाही. हा प्रकार अखेरीस अगदी घृणास्पद ठरला). यापेक्षा वेगळे करणारे समीक्षक निव्वळ स्वार्थापोटी तसे करतात हेही लेनिनने जाहीर करून टाकले. अशा समीक्षकांचा एक गट म्हणजे अधिकृतपणे हाताशी धरलेले भाडोत्री तट्टू. त्यांना काल सांगितले होते त्याला बदनाम ठरवा आणि आज सांगितले जाते की तो देशभक्त आहे हे सर्व मंडळींना सभ्यपणे सिद्ध करून दाखवा. लेनिनच्या म्हणण्याप्रमाणे अशा भाडोत्रींना त्यांच्या बडबडीसाठी पैसा दिला जातो. हे सर्वांनाच माहिती आहे. त्यानंतर राहतात ते आदर्शमतवादी समीक्षक. लेनिनच्या म्हणण्याप्रमाणे त्यांची ढोंगबाजी अधिक धोकादायक ठरते. आदर्शमतवादी समीक्षक टॉलस्टॉयच्या परमेश्वरावरही विश्वास ठेवत नाहीत किंवा समाजव्यवस्थेवर. टॉलस्टॉयने केलेल्या टीकेशीही ते सहमत नसतात. लेनिनच्या म्हणण्याप्रमाणे आपले राजकीय भांडवल वाढविण्यासाठी ते

एखाद्या लोकप्रिय नावाची सोबत करतात. राष्ट्रीय पातळीवरील विरुद्ध नेत्यांची भूमिका बजावण्याची त्यांची इच्छा नसते. फालतू बडबडीचा गदारोळ करून महत्त्वाच्या प्रश्नाला सरळ आणि स्पष्ट उत्तर देण्याची टाळाटाळ ते करतात. टॉलस्टॉय वादातील ठळक विसंगती कशामुळे उत्पन्न झाली ? आपल्या क्रांतीतील अनेक दोष आणि उणीवा त्यातून कळत होत्या का ?

एखाद्या व्यक्तीचा प्रामाणिकपणा आणि कार्यावरील निष्ठा सुस्पष्ट आणि वादातीत असेल तर त्याविरुद्ध आक्षेप कसा घेणार ? लेनिनचे याबाबतचे नामी सूत्र आजही उपयोगी पडते. लेनिनच्या लिखाणात आणि आपल्याकडच्या प्रकाशनातही वारंवार वाचायला मिळते. ते म्हणजे व्यक्तिसापेक्ष हेतू महत्त्वाचा नसतो. व्यक्तिगत उद्दिष्टे महत्त्वाची असली तरी लेनिनपेक्षा (किंवा साम्यवादी गट– पक्षापेक्षा) वेगळी भूमिका घेणारी माणसे व्यक्तिनिरपेक्षतेने म्हणजेच व्यवहारात प्रत्यक्षात प्रतिक्रियावाद्यांना आणि बूर्झ्वाजींना मदत करीत असतात. तोंडाने समाजवाद सांगणाऱ्या परंतु आपल्या कृतीतून आपले स्थान उच्च असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना लेनिनने 'सोशल शॉव्हिनिस्टस्' असे नाव ठेवले. त्यांच्या बाबतीत तो लिहितो, 'सोशल शॉव्हिनिस्टस आपले वर्गशत्रू आहेत. ते कामगारवर्गाच्या चळवळीतील बूर्झ्वा आहेत. कामगारवर्गातील एका विशिष्ट स्तराचे, गटाचे किंवा काही भागाचे प्रतिनिधित्व ते करतात. त्यांना अधिक चांगला पगार, मानाची जागा यांची लाच देऊन बाहेरच्या बूर्झ्वाजींनी विकत घेतलेले असते. भांडवलशाहीचा तुकडा मोडून घेण्यासाठी कामगारांना परस्परात भांडायला योग्य फूस ते देतात (कलेक्टेड वर्क्स, खंड २, पृष्ठ ५३). अशाच पद्धतीने लेनिनपेक्षा युद्धाबाबत वेगळी भूमिका घेणारे डाव्या विचारसरणीचे पुढारी हेही प्रत्यक्षात साम्राज्यवाद्यांचे हस्तक ठरतात (कलेक्टेड वर्क्स, खंड २, पृष्ठे ६२३-६२७).

दुसऱ्या दिवशी कामगारांच्या हिताबाबत किंवा सुखसोयीबाबत लेनिनपेक्षा वेगळ्या विचारांचा आग्रह धरणारे कामगार किंवा त्यांचे प्रतिनिधी हेसुद्धा भांडवलदारांचे आणि त्यांच्या पांढरपेशा बगलबच्च्यांचे मदतनीस ठरविले जातात (कलेक्टेड वर्क्स, खंड ३, पृष्ठे ५३६-३७).

तिसऱ्या दिवशी बॉगडॉगनोव्ह यांचीही गत तशीच होते. व्यक्तिशः हा प्रतिक्रियावाद्यांचा आणि त्यातसुद्धा बूर्झ्वा प्रतिक्रियेचा कट्टर शत्रू आहे अशी ग्वाही लेनिनच देतो. परंतु अस्तित्व आणि जाणीव यांविषयीच्या मार्क्स सिद्धांतात काही बदल केल्याबद्दल त्यालासुद्धा प्रतिक्रियावाद्यांचे हस्तक ठरविले जाते. आपल्या तत्त्वज्ञानाचा वापर त्याने प्रतिक्रियावाद्यांना वापरण्याचे सोपे असे साधन म्हणून करून दिला असा आरोप ठेवला जातो (कलेक्टेड वर्क्स, खंड १४, पृष्ठे ३२५-३२६).

हे सूत्र किती सोयीस्कर आहे ! कामगारांनी बूर्झ्वाजींकडून लाच घेतली हे सिद्ध करण्याचीही गरज पडत नाही. आपण फक्त त्यांच्यावर टीका करणाऱ्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवायला हवा. त्यांची वागणूक हीच ते विकले गेल्याची साक्ष पटवून देत असते.

आपल्याकडील साम्यवादी बदनामीचा हा प्रकार सढळ हाताने वापरतात

यात नवल नाही. वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहिले तर तो लेखणीटाक्या, अमक्यातमक्याचा पगारी, भाडोत्री दलाल आहे वगैरे वगैरे. यातही आपल्या तंत्राला परकीय सत्तेची दलाली चिकटवणे हे साम्यवाद्यांचे आवडते काम. एखादा माणूस त्यांच्या विरोधात जातो तेव्हा त्याला परकीयांच्या भाडोत्रीपणाचे विरूद बहाल केले जाते. त्या वेळी तो त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीपासूनच परकीयांचा दलाल होता असे जाहीर केले जाते. स्टॅलिन वगळता लेनिनचा प्रत्येक हयात असलेला सहकारी हा प्रत्यक्षात परकीय गुप्तचर यंत्रणेचा, विशेषत: जर्मन गुप्तचरांचा एजंट म्हणून कित्येक दशके काम करीत होता. हे महान सत्य सोविएत रशियन कम्युनिस्ट पक्षाला १९३६-३८ या दरम्यान सापडले. 'हिस्टरी ऑफ द सीपीएसयू (CPSU)' या ग्रंथात ही वस्तुस्थिती नोंदविण्यात आली. आपले साम्यवादी हे पुस्तक अजूनही आपल्या प्रशिक्षण वर्गात वापरतात. अशाच प्रकारे टिटो आणि स्टॅलिन यांचे मतभेद झाले तेव्हा बूर्झ्वा साम्यवादी पक्षाच्या पुढाकाराने जगातील साम्यवादी चळवळीने शोध लावला की, १९३० पासून टिटो हा गेस्टॅपोचा हस्तक होता. ही उदाहरणे झाली जर्मनी किंवा इतरांची दलाली करून सोविएत रशियाशी दगाबाजी करणाऱ्यांची. याउलट माओचा दीर्घकाळ उजवा हात आणि वारसदार लिन पिआवो हा सोविएत रशियाचा हस्तक म्हणून चिनी साम्यवादी पक्षाशी दीर्घकाळ गद्दारी करीत होता असाही शोध एके दिवशी लावण्यात आला. या पार्श्वभूमीवर आपल्याकडील साम्यवाद्यांनी १९६० च्या दशकात जेपींचे नाव परकीय सरकारच्या वेतनपत्रकावर आहे, असे जाहीर केले; किंवा १९७५ च्या सुमारास जेपींची चळवळ ही सी.आय.ए.शी हातमिळवणी करून भारताचे तुकडे करण्यासाठी चालविली जात आहे असे आरोपही केले; त्याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आपल्याच कार्यकर्त्यांतून आणि विशेष करून महान नेत्यांतून देशाचे गद्दार आणि परकीयांचे एजंट शोधून काढण्यात साम्यवाद्यांचा हातखंडा असतो.

हा उद्योग म्हणजे साम्यवाद्यांची निव्वळ साहित्यिक किंवा तर्कशास्त्रीय युक्ती असते असे मानण्याचे कारण नाही. मागे मी उल्लेख केलेल्या चार विधानांना अनुसरून प्रत्येक निष्ठावंत साम्यवाद्याचा असा विश्वास असतो की, त्याच्याशी मतभेद असणारा किंवा त्याच्या मताविरुद्ध वागणारा प्रत्येकजण मनात काहीतरी दुष्ट हेतू बाळगूनच तसे करतो. तसेच या तत्त्वानुसार प्रत्येक भूमिका आणि पवित्रा यांचे मूळ वर्गीय हितसंबंधात असते आणि मी, माझा पक्ष, माझा गट शेतकरी आणि कामगारांच्या हिताचे, गरजांचे प्रतिनिधित्व करीत असल्यामुळे माझ्यापेक्षा वेगळे मत बाळगणारा प्रत्येकजण बूर्झ्वाजींच्या वर्गीय हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करीत असतो. अशा प्रकारे साम्यवाद्यांशी मतभेद असणे म्हणजे प्रतिक्रियावाद्यांशी हातमिळवणी असे समीकरण मानले जाते. अशा दुष्टांना संपविण्यासाठी शक्य ती सर्व शस्त्रे वापरणे हे साम्यवाद्यांचे कर्तव्यच होय. बदनामी हे यातील सगळ्यात सौम्यसे शस्त्र. एक नमुनेदार उदाहरण : बोल्शेविक सत्तेवर येऊन तीन महिने उलटले होते. एका सभासदाने सरकारवर टीका करणारे भाषण केले असे लेनिनला समजले. हा कारस्थानाच्या तयारीचा पुरावा असेच लेनिनने ठरविले. स्टॅलिन व बोल्शेविक

ब्यूरोच्या इतर सभासदांना त्याने ताबडतोब पत्र लिहिले : या माणसाला ताबडतोब आजच्या आजच अटक करा. पूर्ण चौकशी होईपर्यंत तीन महिने तुरुंगात टाका. समितीच्या इतर सदस्यांना मॉस्कोतून ताबडतोब, आजच्या आज तडीपार करा. त्यांना दूरवरच्या, शक्यतो रेल्वे नसलेल्या गावात एकएकटे राहू द्या. त्यांच्यावर नजर ठेवा. दुष्काळनिवारण समिती बरखास्त करा. सरकारतर्फे उद्या पाच ओळींचे अधिकृत पत्रक प्रसिद्ध करा. त्यात कामचुकारपणामुळे समिती बरखास्त करण्यात आली असे जाहीर करा. अटक केलेल्यांची व समितीच्या इतर सदस्यांची बदनामी उद्यापासून सुरू करा. तसे आदेश वृत्तपत्रांना आजच पोचते करा. पुढील दोन महिन्यांत दर आठवड्याला एकदा तरी या आरोपींना शक्य त्या पद्धतीने बदनाम केले व छळले पाहिजे. लेनिन आपल्या सहकाऱ्यांना सांगतो, 'दुखणारा दात ताबडतोब काढून टाकला तर त्याचे अनेक फायदे असतात. त्यामुळे चलबिचल होता कामा नये. हे सारे निर्णय आजच घेऊन टाकले पाहिजेत. अशी माझी सूचना आहे' (कलेक्टेड वर्क्स, खंड ४५, पृष्ठे २६८-२७०). आपल्याकडील साम्यवाद्यांनी बदनामीचे तंत्र आणि वाक्प्रचार कोणाकडून कसे उचलले आहेत हे यावरून स्पष्ट होईल. बदनामी आणखी एका अर्थाने परप्रकाशित असते. भारतातील साम्यवादी एखाद्याला लाखोली वाहतात तेव्हा बहुधा त्यांची प्रेरणा त्यांना त्यांच्या परदेशातील स्फूर्तिदात्यांकडून मिळालेली असते. निदान ते त्यांचे अनुकरण तरी करीत असतात.

साम्यवादी आजवर गांधीजी, नेहरू, समाजवादी यांच्या बाबतीत वेळोवेळी काय म्हणत आले आणि त्यांत अनेक वेळा त्यांनी पूर्णपणे घूमजाव कसे केले हे एकदा तरी मॉस्कोच्या धोरणाशी ताडून पाहावे असे आहे. भारतीय साम्यवादी वयात आले तेव्हापासून म्हणजे सन १९३५ पासून त्यांनी गांधीवादाचा धिक्कार केला. मॉस्कोमध्ये १९२० साली झालेल्या कॉमिन्टर्नच्या पहिल्या जागतिक अधिवेशनातील ठरावापासून पुढे वेळोवेळी झालेल्या ठरावानुसार ते वागले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा डिसेंबर १९३० मध्ये मॉस्कोमधून जाहीर करण्यात आला. त्यातही आपल्या नेहमीच्या पद्धतीने गांधीजींची हेटाळणी करावी, असा आदेश आपल्याकडील साम्यवाद्यांना देण्यात आला. काँग्रेस चळवळीतील पुरोगामी प्रवाह ठेचून टाकणे हे साम्यवादाचे पहिले कर्तव्य आहे, असे त्यांना बजावण्यात आले. साम्यवाद्यांनी यथाशक्ती प्रयत्न केला. १९३५ मध्ये कॉमिन्टर्नचे सातवे जागतिक अधिवेशन मॉस्कोमध्ये भरले त्यात सोविएत रशियाच्या गरजेनुसार धोरण पूर्णपणे बदलण्यात आले. त्यात असे ठरविण्यात आले की, भारतीय कम्युनिस्ट पक्षाने जी धोरणे राबविली (ती कॉमिन्टर्नच्या आदेशानुसार होती हे सांगायला नकोच) ती गटबाजी, फुटिरता वाढविणारी होती आणि त्यांनी केलेल्या बदनामीमुळे गांधीवादी दुर्बल होण्याऐवजी अधिक सशक्त झाले व साम्यवादीच एकाकी पडले. लगेच आपल्याकडील साम्यवाद्यांनी रस्ता बदलला. शिव्याशाप थांबविले गेले आणि अहोरात्र ज्यांची नालस्ती केली त्यांच्या सहकार्याने संस्था स्थापन करण्याची त्यांनी तयारी दाखविली. ऑगस्ट १९३९ मध्ये स्टॅलिनने हिटलरशी अनाक्रमणाचा करार केला.

या नव्या धोरणानुसार आपल्याकडील साम्यवाद्यांनी गांधी व इतरांविरुद्ध पुन्हा जोरात गरळ ओकण्यास सुरुवात केली. ब्रिटिशांना भारतातून हाकलून लावण्यासाठी चांगली संधी आहे आणि गांधीजी ती वापरीत नाहीत हे आताच्या शिवीगाळीचे सूत्र होते.

जून १९४१ मध्ये हिटलरने सोविएत रशियावर आक्रमण केले. त्यामुळे प्रस्थापितांशी आघाडी करण्याची गरज स्टॅलिनला निर्माण झाली. लगेच आपल्याकडील साम्यवाद्यांनी गांधी, भारतीय समाजवादी व इतरांवर नव्या उत्साहाने हल्ला चढविला. फक्त आता त्यामागचे कारण बदलले होते. ब्रिटिशांच्या युद्धविषयक प्रयत्नांना गांधी व इतर मंडळी अडचणीत आणीत आहेत हे नवे कारण होते. या सर्व काळात पंडित नेहरूंच्या विरोधी प्रचारमोहीम चालू होती. तिचे मुख्य कारण होते, ते काँग्रेसमधील बूर्झ्वाजींच्या पुरोगामी गटाचे प्रतिनिधित्व करतात. युद्ध संपले तसे सोविएत रशिया व त्याचे युद्धातील सहकारी देशांमधील तणाव वाढला. स्टॅलिनचा चमचा झडोनोव्ह याने जाहीर केले की, जगात फक्त दोनच शक्ती अस्तित्वात आहेत. सोविएत रशियाच्या बाजूला नाहीत ते त्यांच्या विरोधातले समजले जातील. साहजिकच अलिप्ततावादाचा आग्रह धरणारे पंडितजी नव्याने साम्यवाद्यांच्या शिव्याशापाचे धनी ठरले. आपल्या साम्यवाद्यांनी त्यांना साम्राज्यवाद्यांच्या पायात घोटाळणारे कुत्रे म्हटले. पण नंतर कोरियामध्ये बांडुंगमध्ये रशियाला नेहरूंचा उपयोग होऊ शकतो असे लक्षात आले तेव्हा पुन्हा धोरण बदलले !

हा लाजिरवाणा प्रकार आजतागायत चालू आहे. १९७३ ते ७७ या दरम्यान आपल्या साम्यवाद्यांनी जेपींवर केलेला टीकेचा भडिमार जरूर पाहावा आणि त्यांच्या तीर्थक्षेत्रात जेपींबद्दल काय म्हटले गेले त्याच्याशी तुलना करावी. १९६० पासून हा मुद्दा चटकन सिद्ध करतील अशी आणखी नव्या धर्तीची उदाहरणे उपलब्ध झाली. कारण त्यानंतर आपल्याकडचे साम्यवादी केवळ इतरांना शिव्याशाप न देता एकमेकांची निंदानालस्ती करण्यातही गुंतून पडले. एकमेकांना दिलेल्या या शिव्या म्हणजे मॉस्को आणि पेकिंग एकमेकांबद्दल काय म्हणतात याचा निष्ठावंत प्रतिध्वनी असे.

## विद्वेषाची मुळे आणि परिणामकारकता

आपल्याकडील साम्यवाद्यांच्या लिखाणात लेनिनची भाषणे व लिखाणातील शिवीगाळ, बंडखोरी आणि ताकदीचे प्रतिबिंब दिसते. तसलीच भाषा वापरल्याने आपणही जोमदार बंडखोर होतो असे त्यांना वाटते. प्रत्यक्षात अशा लिखाणातून ऊठून दिसते ती विलक्षण निराशा आणि असुरक्षिततेची भावना. निराशा येण्याचे कारण काय ? तर यांच्या सिद्धांतानुसार भारत साम्यवादी क्रांतीसाठी अगदी योग्य असा देश आहे. तरीही त्यांना क्रांती घडवून आणणे जमलेले नाही. घडले उलटेच. एखादा गांधी किंवा जेपी क्षितिजावर येतो आणि विशाल जनसमुदाय साम्यवादी क्रांतीसाठी तळमळत, धडपडत राहण्याऐवजी अशा नेत्यांच्या मागे श्रद्धेने जातो. असुरक्षिततेची भावना ही वैयक्तिक आहे आणि सामुदायिकही आहे. सामूहिक

विचार केला तर प्रत्येक साम्यवादी पक्ष आणि त्यातील गट यांना अगदी मोजके अनुयायी व लोकमताचा माफक पाठिंबा मिळाला आहे. त्यामुळे लोकांमध्ये मिसळून काम करणारा प्रत्येक कार्यकर्ता हा त्यांना आपला जबरदस्त प्रतिस्पर्धी वाटतो. गांधी, जेपींची गोष्ट वेगळीच. पण प्रेमभाई, शंकर गुहा अशा कार्यकर्त्यांचीही त्यांना भयानक धास्ती वाटते. अशा कार्यकर्त्यांच्या मागे थोडेसे लोक जरी गेले तरी त्यातून त्या भागात साम्यवाद्यांची मृत्युघंटा वाजू शकते. त्यामुळे साम्यवादी त्यांचा इतका विखारी द्वेष करतात. वेगळ्या पातळीवरही अस्तित्वाला धोका आहे अशी भीती त्यांना वाटते. साम्यवाद्यांचे नेते, विचारवंत, बुद्धिवादी मध्यमवर्गातून आलेले आहेत. या कारणामुळे त्यांना सतत असुरक्षितता जाणवते. कामगारवर्ग आपल्याशी एकरूप झालेला आहे हे स्वतःला व इतरांना पटवून देण्यासाठी त्यांची केविलवाणी धडपड चालते. त्यासाठी ते कडक, तिरस्कारी व घाणेरडी भाषा वापरतात आणि आपली राहणी मुद्दाम अस्ताव्यस्त, असभ्य ठेवतात. दुसऱ्याची निंदानालस्ती हा अशा धडपडीचा एक भाग आहे. तेव्हा साम्यवादी टीका आणि निंदा यांचे मूळ व्यक्तिशः व सामुदायिक असुरक्षिततेत आणि नालस्तीत आहे. अशा निंदानालस्तीचा उगम, स्थान, प्रेरणा, तंत्रे, वाक्प्रचार आणि लक्ष्ये या साऱ्या गोष्टी दुसऱ्याकडून आलेल्या असतात. या ठरीव ठशाच्या असल्या तरी त्यांचा आगावू अंदाज बांधणे सोपे जाते. अर्थात तरीही अशी टीका अनेकदा प्रभावी ठरते. त्याची कारणे चार आहेत. पहिले म्हणजे पक्षातील कार्यकर्त्यांच्या फळ्यांना उद्देशून ही टीका लिहिली किंवा बोलली जाते आणि ही मंडळी याला सरावलेली आहेत किंबहूना यावरच पोसलेली आहेत. त्यांच्या दृष्टीने शिवीगाळ म्हणजेच युक्तिवाद आणि शिवीगाळ म्हणजेच वादाचा निर्णय. पक्षात घेतल्यापासूनच स्वतंत्र विचार करण्याची त्यांची सवय पार चिरडून टाकलेली असते. त्यामुळे नेता ज्याला प्रतिक्रियावादी किंवा बूर्झ्वा एजंट ठरवील तो तसा आहेच याबद्दल कार्यकर्त्यांची खात्री पटते. अशा कार्यकर्त्यांच्या संचाला असा माणूस माहिती होतो तोच मुळी निंदानालस्तीच्या माध्यमातून. रशियन साम्यवाद्यांना माखची माहिती मिळते तीच मुळी लेनिनने 'मटेरिॲलिझम अँड इम्पिरिओ-क्रिटिसिझिम' या पुस्तकात त्याच्यावर केलेल्या टीकेच्या माध्यमातून. तसेच कॉट्स्कीची माहिती त्यांना मिळते ती 'द प्रोलेटेरियन रेव्हॉल्युशन अँड द रेनेगेड कॉट्स्की' या पुस्तकात लेनिनने त्याला दिलेल्या शिव्याशापांतून. स्टॅलिनच्या काळापासून ट्रॉटस्कीवर अपशब्दांचा जो भडिमार झाला त्यातूनच नव्या पिढीला त्याचा उलगडा झाला. खलनायक ठरविल्या गेलेल्या या मंडळींची पुस्तके कोणीही अभिमानी साम्यवादी मुळातून वाचणार नाही. त्यांची कृत्येही त्याला समजतील, पक्षाने ठरविलेल्या इतिहासावरून आणि तेसुद्धा आपल्याकडील साम्यवाद्यांपैकी खरोखर गंभीरपणे वाचन करणाऱ्या मूठभर मंडळींनाच लागू होते. बहुसंख्य मंडळी वाचन करीतच नाहीत. त्यांच्या दृष्टीने एखाद्यावर चिकटविले गेलेले लेबल पाहिले म्हणजे पुरे. आणि लेबल पक्षाने चिकटविलेले असले तर प्रश्नच मिटला. दुसरी गोष्ट म्हणजे बदनामीच्या अशा मोहिमा व्यापक कारस्थानाचा भाग म्हणून राबविल्या जातात. त्यामुळे ती

प्रभावी ठरते. स्टॅलिनच्या काळाचे उदाहरण घेतले तर निव्वळ बदनामीवर न थांबता त्याने आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा काटाच काढला. अर्थात अशा कत्तलीसाठी आवश्यक ती पार्श्वभूमी तयार करण्यात बदनामीचा वाटा मोठा असतो. भारतासारख्या देशात साम्यवादी सत्ताधारी होऊ शकत नाहीत. पण त्यांचे सहप्रवासी अर्थव्यवस्थेत किंवा पत्रकारितेत महत्त्वाच्या जागांवर बसलेले असतात. पक्षाने एखाद्या व्यक्तीची बदनामी सुरू केली की, तो इशारा मानून शिक्षणक्षेत्रातील पक्षाचे सहानुभूतीदार अशा लक्ष्यांचे संशोधननिधी कापतात, शक्य तर त्यांची पदे काढून घेतात. तर पत्रकारितेतील डावी मंडळी बदनामीच्या मोहिमेत सक्रीय सहभागी होतात.

तिसरे म्हणजे उदारमतवादी विचारवंत आणि साम्यवाद्यांचे सहप्रवासी अनेकदा साम्यवादी पक्षाने आपल्याला मानमान्यता द्यावी यासाठी व्याकूळ झालेले असतात. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध टीका सुरू झाल्यास ती चांगलीच परिणामकारक ठरते. आपल्या बाबतीत साम्यवाद्यांची प्रतिक्रिया काय आहे याचा सतत अंदाज घेतच ही मंडळी आपले वागणे, बोलणे ठरवीत असतात. तरीही त्यांच्यावर टीकेचा मारा झाला तर साम्यवाद्यांची मान्यता इतक्या खरोखर लायकीची आहे का याचा विचार करण्याऐवजी ही मंडळी अधिकच लाचार होऊन साम्यवाद्यांची मनधरणी करू लागतात.

चौथे म्हणजे आपल्या वाचकांपैकी बहुसंख्य मध्यमवर्गीय आहेत. त्यांच्या एकंदर मानसिक जडण-घडणीमुळे बदनामीची मोहीम आणखीनच परिणामकारक ठरते. वाचकांच्या मानसिक वैशिष्ट्यांपैकी म्हणजे पुराव्याची छाननी स्वत: करण्याचे कष्ट फारच थोडे लोक घेतात आणि सर्वांसमक्ष तपशिलात जाण्याइतका धीर फारच थोड्यांपाशी असतो. त्यामुळे एखाद्याने शिव्याशापांचा कोलाहल माजविला तर समोरच्या माणसाचा युक्तिवाद आणि पुरावा त्यात बुडून जातो. गोंधळलेला, वैतागलेला सामान्य माणूस म्हणतो, हे प्रकरण वादग्रस्त दिसते. काहीच प्रकरण नसते तर त्यांनी तेवढा कल्लोळ माजविला नसता. ते काही असले तरी खोलात जाण्यास मला वेळ नाही. ते तुम्हा मंडळींचे काम आहे. मला एवढेच माहिती आहे की, प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. एखाद्या व्यक्तीच्या वागणूक किंवा शिकवणीमुळे आपल्याला आपले वर्तन बदलण्याची गरज दिसू लागते, तेव्हा त्या व्यक्तीला टाळण्याचीच आपली खटपट असते. त्यातच ती व्यक्ती वादग्रस्त आहे असे एकदा ठरले, तर त्याच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करण्यासाठी चांगले कारणच आपल्याला मिळते. साम्यवादी काय किंवा सारेच सर्वंकष सत्तावादी काय, सामान्य माणसाच्या या प्रतिक्रियेचा अंदाज बांधूनच आपल्या शिव्याशापांची नि बदनामीची मोहीम पुढे रेटत असतात.

## काय करायला हवे ?

अशा बदनामीच्या मोहिमेबाबत करण्यासारख्या पाच गोष्टी आहेत.

एक : अशी बदनामी एखाद्या सिद्धांतातून उगम पावत असल्यास त्या सिद्धांतातील दावे नीट तपासले पाहिजेत. साम्यवाद्यांनी मागे उल्लेख केलेल्या पहिल्या तीन

विधानांचा आधार घेतला असेल, तर अशा प्रकारचा इतिहास या सिद्धांताचा आहे का हे तपासले पाहिजे. हे विधान म्हणजे जगात एकच अपरिहार्य आणि वांच्छनीय असे उद्दिष्ट, ध्येय आहे हे साम्यवाद्यांना माहिती आहे आणि फक्त त्यांनाच त्याच्यापर्यंत पोचण्याचा मार्ग माहिती आहे. पुरावा तसा असेल तर भारतात विधायक कार्य करून साम्यवाद्यांचे शिव्याशाप घेणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना त्या त्या सिद्धांतातील पोकळपणा सहज लक्षात येईल आणि मग साम्यवाद्यांच्या हल्ल्यापासून कसाबसा बचाव करण्याची वेळ त्यांच्यावर येणार नाही.

दोन : बदनामीच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करून तिचे स्वरूप सर्वांसमक्ष उघडे केले पाहिजे. बदनामीचे स्वरूप परपुष्ट, परप्रकाशित असते. त्यातील तंत्रे, वाक्प्रचार ठराविक धर्तीचे असतात. या गोष्टींची ओळख आपले श्रोते आणि वाचकांना करून दिली पाहिजे. यापुढे साम्यवादी संतप्त गैरसोयीची वास्तवता कशी लपवितात हे लोकांना आपोआपच समजू शकेल.

तीन : उदारमतवादी आणि लोकशाहीवादी साम्यवाद्यांच्या शिव्यागाळीला घाबरून गप्प बसतात किंवा त्यांच्या पसंतीला उतरेल अशी आपली वागणूक बदलण्याचा प्रयत्न करतात. या दोन्ही गोष्टी सोडून दिल्या पाहिजेत. साम्यवाद्यांच्या कर्तृत्वाचा इतिहास मुळीच सुखकारक नाही आणि त्यांचे दावे इतके पोकळ आहेत की, त्यांनी दिलेल्या प्रशस्तीपत्रकांना काडीचीही किंमत नाही.

चार : बुद्धिनिष्ठ विश्लेषणाच्या प्रवृत्तीला आपण उत्तेजन दिले पाहिजे. पुराव्याचा मुख्य भाग स्वतः तपासण्याची सवय ठेवली पाहिजे आणि तपशिलात जाऊन लक्ष घातले पाहिजे. बदनामीच्या तोफा बंद पाडण्याचा तो प्रभावी मार्ग आहे. साम्यवाद्यांसारख्या व्यावसायिक गटांनी बदनामीच्या तंत्रावर आपला एकमेव युक्तिवाद म्हणून अवलंबून राहण्याचे प्रमाण इतके मोठे ठेवले आहे की, तो त्यांचा स्वभावच बनला आहे. ही गोष्ट आपण नीट अभ्यासली तर ती आपल्या पथ्यावरच पडते. कारण भरपूर शिव्या दिल्या की, आपण प्रतिस्पर्ध्याच्या युक्तिवादाला समर्पक उत्तर दिले आहे अशी या गटाची समजूत होत असते. प्रत्यक्षात निव्वळ शिव्यांमुळे सर्वच युक्तिवाद नष्ट होत नाही. पण शिव्यागाळीच्या सवयीचा या तऱ्हेने फायदा व्हायला हवा असेल तर प्रतिस्पर्ध्यांनी घाबरून गप्प बसता कामा नये. त्यांनी मुद्दा मांडत राहिले पाहिजे आणि श्रोत्यांनीही युक्तिवाद, तर्कशुद्ध मांडणी, वस्तुस्थिती यांच्याऐवजी शिव्या देऊन कोण काम भागवत होते हे चटकन ओळखले पाहिजे.

पाच : काही काळ जाऊ दिला पाहिजे. कारण ज्या पाच विधानांनुसार साम्यवादी इतरांबाबत असहिष्णू बनतात, त्याच कारणासाठी ते एकमेकांबद्दलही असहिष्णू बनतात आणि एकमेकांना शिव्या देऊ लागतात. हे घडून येण्यासाठी त्यांना फक्त सवड दिली पाहिजे. म्हणजे आज तुम्हाला शिव्या देणारे एकमेकांवर तुटून पडतील, त्या वेळी त्यांचे शिव्याशाप आजच्यापेक्षाही अधिक विखारी असतील.

## अपशब्दांचे सर्वसामान्य स्वरूप

आतापर्यंत आपण अपशब्दांचे शस्त्र म्हणून उपयोगाचे दोन प्रकार पाहिले.

पहिला म्हणजे प्रयत्नपूर्वक, सराईतपणे, धंदेवाईक गटांनी केलेला वापर आणि दुसरे म्हणजे चांगले काम करणाऱ्यांची मध्यमवर्गीय मंडळींनी विशिष्ट हेतू न ठेवता केलेली प्रासंगिक हेटाळणी. पहिल्या प्रकारचे उदाहरण म्हणून आपण साम्यवाद्यांच्या बदनामीच्या तंत्राचा वापर केला. कारण धंदेवाइकांमध्ये अपशब्दांच्या वापरात सगळ्यात आघाडीवर साम्यवादी होते आणि सगळ्यात दीर्घकाळ आघाडी टिकवून राहिले होते. त्यांच्या तंत्रांचा विचार मी केला आहे. त्यांचे उदाहरण प्रत्यक्ष व्यवहारात आणि त्यांच्या प्रकाशनात वाचकांना हवे तेवढे आढळेल.

वेगळ्या प्रकारचे काम करणाऱ्यांची मध्यमवर्गाने केलेली हेटाळणी खूप व्यापक प्रमाणात आढळते. फार उदाहरणे देण्याची गरज नाही. सामाजिक संभाषणांत, मासिकांत याचे उदाहरण दररोज आढळते. एखादा सर्वसामान्य राजकीय नेता, सनदी अधिकारी, पत्रकार किंवा विद्वान यांना, 'तुम्हाला ज्यांचे कौतुक वाटते अशा पाच व्यक्तींची नावे सांगा ?' असा प्रश्न विचारा. त्यातील बहुतेकांना एखादे नाव सांगणेही कठीण जाईल. त्याउलट एखादे चांगले काम करणाऱ्या धडाडीच्या कार्यकर्त्याविषयी तुम्ही त्याच्याशी दोन कौतुकाचे शब्द बोलून पाहा. एक क्षणही न दवडता त्याच्याविषयी हेटाळणीवजा शेरा मारून तो मोकळा होईल. 'पण त्याच्या कामाचा परिणाम दिसतो कुठे ? शिवाय तो प्रसिद्धीला हपापलेला आहे हे तुम्हाला ठाऊक नाही काय...' अशा प्रकारची बदनामी, असत्य यांमागे कोणती प्रेरणा असावी ? त्याविषयी आपण काय करायला हवे ? या दोन प्रश्नांची उत्तरे शोधायची तर अशा सर्वसाधारण बदनामीची चार वैशिष्ट्ये लक्षात घ्यायला हवीत.

अशी हेटाळणी व्यापक प्रमाणात फैलावलेली आहे. त्यातील बरीचशी सहज जाता जाता सवयीने निरुद्देश केली जाते. एकादा कार्यकर्ता आपल्या कामाने जितका जास्त प्रभावी ठरेल तितकी त्याची हेटाळणी अधिक प्रखर होते. त्याच स्वरूपाच्या कामात गुंतलेले इतर कार्यकर्ते त्याच्या बदनामीमध्ये आघाडीवर राहतात.

मध्यमवर्गाची प्रवृत्ती कमीत कमी श्रमाचे काम शोधण्याकडे असते. अशा कामाचा दर्जा दुय्यम राहील याची जाणीव त्याला असते. त्याचे मुख्य लक्ष्य आपले नजीकचे हित गाठण्याचा असतो. या वर्गापैकी तक्रारखोर मंडळीही प्रचलित व्यवस्थेशी तडजोडी करून सुखी होत असतात. शंकर गुहासारख्या कार्यकर्त्याची प्रत्येक गोष्ट यापेक्षा वेगळी असते. असे कार्यकर्ते जितके जास्तीत जास्त श्रम करता येतील तितके करतात. या समस्या त्याला इतर सामान्य नागरिकांपेक्षा जास्त प्रमाणात भेडसावत नाहीत. त्या सोडविण्यासाठी तो झपाटून जाऊन काम करतो. कारण प्रस्थापिताशी तडजोड करण्याऐवजी त्यात बदल घडविण्यासाठी तो आटोकाट प्रयत्न करतो. त्यामुळे मध्यमवर्गीयांच्या तडजोडवादी भूमिकेशी त्याचे खटके उडणे काही वेळा अटळ ठरते. असा कार्यकर्ता म्हणजे मध्यमवर्गावर कृतीच्या माध्यमातून केलेली टीकाच असते. साहजिकच त्याच्या चांगुलपणावर एखादा तरी डाग असायलाच हवा असे मध्यमवर्गीयाला आवर्जून वाटते. त्याच्या निःस्वार्थी वागणुकीमागे काहीतरी दुष्ट, गुप्त हेतू आहे हे शोधून काढण्यासाठी अनेकांच्या

मनाची अगदी उलघाल होत. त्यातून प्रसिद्धीची हाव, सी.आय.ए.चा हस्तक असल्याचा आरोप किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शिक्का असे काहीतरी शोधून काढण्याचा प्रयत्न चालतो. आपल्या आणि त्यांच्या वागण्यातील फरकाचे आपल्याला अनुकूल असे समर्थन शोधून काढण्याची ही धडपड असते. त्याची नि:स्वार्थी वागणूक एखाद्या दुष्ट हेतूने प्रेरित होती असे मानले, असा प्रचार केला की, त्याच्या आदर्शाने आपली वागणूक बदलावी लागण्याचा प्रसंग टळतो.

इतर काही वैशिष्ट्यांचीही संगती लावायला हवी. मध्यमवर्गापेक्षाही समान स्वरूपाचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून एकमेकांची हेटाळणी अधिक विखारीपणे केली जाते. एखाद्या यशस्वी किंवा विलक्षण बुद्धिमान वकिलाची बदनामी करण्यात वकीलच आघाडीवर राहतात. मात्र ते सहसा एखाद्या सामाजिक कार्यकर्त्याच्या बदनामीत उत्साहाने भाग घेत नाहीत. हे काम इतर सामाजिक कार्यकर्ते करतात. याची कारणे दोन. पहिले तर आपल्याकडील व्यावसायिकांत सुमार दर्जा हाच सर्वसामान्य नियम झालेला असल्याने असामान्य ताकदीचा एकादा माणूस निर्माण होणे ही त्या क्षेत्रातील इतरांवर अप्रत्यक्ष टीका ठरते. दुसरे म्हणजे आपल्या अस्तित्वाला अशा माणसामुळे धोका होतो असे त्यांना वाटू लागते. प्रत्येक क्षेत्रात आपल्याकडे संधी अगदी मर्यादित असतात. त्यामुळे एखाद्या क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारा एखादा माणूस हा त्या क्षेत्रातील मानाची मोजकी पदे अडवून बसलेला धोकादायक वाटते. हा धोका टाळायचा तर त्याच्याहून अधिक चांगले काम तरी करायला हवे किंवा त्याच्या कामाला काळे तरी फासायला हवे. यातील दुसरा रस्ता जास्त सोपा आणि आपल्याकडे हमखास यशस्वी होणारा.

आणखी एक घटक महत्त्वाचा ठरतो. आपल्याकडील एक विलक्षण बुद्धिमान अर्थशास्त्रज्ञ प्रणववर्धन यांनी हा मुद्दा मांडला होता. समाजात बचावात्मक वागणूक टोकाला गेलेली दिसते याचे आणखी एक कारण म्हणजे निव्वळ संधी कमी आहेत एवढेच नसून त्या संधीचा फायदा घेणारेही फार कमी आहेत. चांगले काम करणारे फार कमी आहेत. उदा. भारतात अमेरिकेसारख्या प्रगत देशाच्या मानाने निष्णात अर्थशास्त्रज्ञांची संख्या मुळातच कमी. त्यामुळे थोड्या काळात त्यांच्या स्वत:बद्दलच्या कल्पना, अहंकार, भरमसाट फुगतात. त्यामुळे आपोआपच आपल्या क्षेत्रातील इतरांबद्दल तुच्छतेची भावना निर्माण होऊ शकते आणि आपली फुगीर प्रतिमा कायम ठेवण्यासाठी शिंतोडे उडविण्याची गरज भासू लागते. अवाजवी फुगलेला अहंकार म्हणजे तकलादू वास्तू. कालांतराने या फुग्याला भोक पाडण्याचे काम वास्तवता करते. काम चांगले असले तरी त्याचे इतके अवडंबर माजविण्याचे कारण नाही, ही जाणीव वस्तुस्थिती व्यक्तीला करून देते. मग अशी माणसे भेदरून जातात आणि इतरांना खाली खेचण्याची त्यांची गरज, धडपड अधिकच वाढते. इतरांचे काम जितके चांगले असेल तितक्या प्रमाणात ते हिणकस ठरविण्याचा प्रयत्न तो करतो. यातून आपले स्थान सुरक्षित राहील असे त्याला वाटते.

## या बाबतीत आपण काय करायला हवे ?

या प्रकारची निंदानालस्ती कमी लेखण्याचे कारण नाही. चांगल्या गोष्टींची झीज घडवून आणण्याची ताकद त्याच्यातही भरपूर असते. शिवाय हवेशी लढाई करण्याइतकेच या बदनामीशी झुंज देणे अवघड. सत्यमेव जयते नाकृतम हे वचन वाजवीपेक्षा थोडे जास्तच आशावादी आहे. कदाचित सत्याचा अंतिम विजय होत असेलही; परंतु सामान्य मर्त्य माणसांना समस्या सोडविण्यासाठी जेवढा काल हाताशी मिळतो त्यात तरी सत्याचा विजय नेहमीच होतो असे म्हणता येत नाही. चारित्र्यहननावर जेथे सामान्य लोकांचा चटकन विश्वास बसत असेल, खोट्या-नाट्या गोष्टींवर लोक जेथे सहज विश्वास ठेवत असतील अशा पिढीत असत्याला टक्कर देणे जास्तीत जास्त अशक्य गोष्ट होते. अशा ठिकाणी साक्षीदार शपथेवर खोटी साक्ष देतात आणि वकील खऱ्या तपशिलात जाण्याच्या भानगडीत पडत नाहीत.

'बने हैं अहले - हवास मुद्दई भी, मुन्सिफ भी किसे वकील करें, किससे मुन्सिफी चाहें...'

अखंडपणे मने झिजवणाऱ्या अशा चारित्र्यहननाशी कसा लढा द्यावा ? पहिली गोष्ट म्हणजे अशी निंदा-नालस्ती क्लेशकारक असली तरी, कामात अडथळे आणत असली तरी, एक चांगली कामगिरी बजावत असते, हे निंदेचे लक्ष्य ठरलेल्या व्यक्तीने लक्षात घ्यायला हवे. अशी निंदा त्याला अधिक सावध बनविते. आपल्या कृतीबाबत तो अधिक दक्ष राहतो. अशी नालस्ती त्याच्यासमोर आरसा धरते. 'मीही इतरांची अशीच बदनामी करतो का ? मीही अफवा पसरवतो का ? इतरांबद्दल मते व्यक्त करण्यापूर्वी ती वस्तुस्थिती समजावून, तपासून घेतो का ? या शोधातूनच अशी व्यक्ती स्वतःला लोकहिताचा अधिक सुयोग्य कार्यकर्ता बनविते. आपल्या रस्त्यात अडथळे आणणारे कोण याची चांगली ओळख त्याला पटते. अफवा पसरवणारे एखाद्या व्यक्तीबद्दल जे बोलतात ते आपण चटकन खरे मानतो की नाही ? तेच इतरांना सत्य म्हणून सांगतो की नाही ? आपल्याबद्दल कुजबूज सुरू होते आणि अफवा पसरविल्या जातात तेव्हा त्यातील खोटेपणा, अन्याय आपल्याला अधिक तीव्रतेने जाणवतो. अशा अनुभवानंतर खोटारड्या लोकांची चांगली ओळखही पटते व त्यांनी सुरू केलेली कुजबूज इतरत्र पसरविणेही आपण थांबवितो. या अर्थाने अशी निंदानालस्ती हाच तिच्यावरचा उताराही असतो. आपले समव्यावसायिक किंवा समांतर क्षेत्रातले कार्यकर्ते सगळ्यात जास्त निंदा करीत राहतात. यातून आपण आणि त्यांच्यात अंतर वाढत जाते. शिवाय त्यांचे खरे स्वरूप उघड होत जाते. त्यामुळे ते काय म्हणतात याची पर्वा आपण कमी प्रमाणात करू लागतो. चांगले काम करणाऱ्यांना बदनामीच्या मोहिमेमागची अंतःप्रेरणाही दिसू शकते. बहुधा अशा मोहिमा असुरक्षिततेच्या भावनेतून जन्म घेतात. निंदकाचा स्वतःबद्दलचा न्यूनगंडही कारणीभूत ठरतो. या गोष्टी समजल्यानंतर आपल्याला अशा बदनामीचे दुःख होत नाही. याचा अर्थ आपण निंदकांबद्दल तिरस्कार बाळगावा असा नाही. निंदकाच्या बोलण्याबाबत फार संवेदनक्षम असणे किंवा पूर्ण तिरस्कार

बाळगणे या दोन्ही टोकाच्या प्रक्रिया टाळायला हव्यात. कारण त्या आपल्याला निंदकावर अवलंबून राहायला लावतात. ध्यानसाधनेच्या मार्गात प्रारंभी विचाराबाबत आपण जो दृष्टिकोन बाळगतो तोच निंदेच्या बाबतीत हवा. साधक दोन्ही मार्गात येणाऱ्या विचारांशी झगडा करून त्याला मनातून ढकलत नाही किंवा त्या विचारापाशी थांबून अडकूनही पडत नाही. तो त्याची दखल घेतो आणि मग हलकेच त्याला बाजूला सारतो.

जनहितासाठी झटणारे, त्यापायी निंदेचे घाव सोसणारे अशा व्यक्तींनी एक अतिशय महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यायला हवी. निंदानालस्तीला निधडेपणाने तोंड देणे हा त्यांच्या सत्कार्याचाच एक आवश्यक असा भाग आहे. कारण निंदानालस्ती ही एक राष्ट्रीय सवय झालेली आहे. देशाला कमजोर करणारी ही सवय आहे. त्यामुळे अशी सवय मोडावी यासाठी देशाला सहकार्य करणे अशा व्यक्तींचे कर्तव्यच आहे. गांधीजींनी आपले कार्य अनेक प्रकारच्या टीकेला तोंड देऊनच चिकाटीने चालू ठेवले आणि निंदेला तोंड देऊनही आपल्या क्षेत्रात टिकून राहाणारे लोक असतात हे समाजाला दाखवून दिले. महात्म्याचीही बदनामी करायला मागेपुढे न पाहणाऱ्या समाजाच्या चेहऱ्यासमोर त्यांनी आरसा धरला. आपले व आपल्या सहकाऱ्यांचे मनोबळ त्यांनी वाढविले. बदनामी तर काय, गांधीजींचीही केली गेली होती, हा दिलासा त्यांना कायमसाठी मिळावा याचा अर्थ निव्वळ तुमची निंदा होती म्हणून गांधीजी इतके मोठे झाले असा होत नाही. निंदकांनी आपल्या तडाख्यातून गांधींनाही सोडले नाही हे लक्षात घेतले, म्हणजे त्यांच्यापेक्षा कितीतरी छोट्या प्रमाणात कामे करणाऱ्या कार्यकर्त्यांनी बदनामीमुळे नाउमेद होण्याची गरजच उरत नाही.

आपल्यासारख्या समाजात निंदेचे घाव सहन करणे हेच एक कार्य होऊन बसते. पण तेवढेच पुरेसे नाही. त्यापुढे जाऊन काही केल्याखेरीज समाजाला ही घातक सवय सोडून जाण्याची शक्ती मिळणार नाही. त्यासाठी चांगले कार्य करणाऱ्यांनी जाणीवपूर्वक विशाल अंत:करणाची जोपासना केली पाहिजे. आपल्या कामाबद्दलच्या निष्ठेबरोबरच इतरांबाबतचे औदार्य मनात बाणविले पाहिजे. हे नेहमीच नैसर्गिकरीत्या होणार नाही. कारण चांगले काम करण्यासाठी पुष्कळ स्वार्थाचा त्याग करावा लागतो. या त्यागाच्या जाणिवेतून इतरांची कामे कमी लेखण्याची प्रवृत्ती निर्माण होते. हा दृष्टिकोन जाणीवपूर्वक बदलला पाहिजे.

## गांधींचे उदाहरण

आपण गांधींचे उदाहरण घेऊ. ऐतिहासिक महापुरुषांपैकी काळाने आपल्याला सगळ्यात जवळचे तेच आहेत. त्यांचे लेखन आणि भाषण यांचे ९० खंड उपलब्ध आहेत. जवळजवळ अर्धशतकभर ते सामाजिक क्षेत्रात अखंडपणे वावरले. त्यांना जवळून पाहिलेल्या अक्षरश: शेकडो लोकांनी आपल्या आठवणी प्रकाशित केल्या आहेत. एवढ्या सगळ्या शब्दभांडारात द्वेष-मत्सराचा एकही शब्द गांधींनी उच्चारल्याचे उदाहरण नाही. गांधींनी कित्येकदा कडक भाषा वापरली आहे. बोचरी

टीका केलेली आहे. त्याचे समर्थन करताना निंदा-नालस्ती म्हणजे शब्दांचा गैरवापर, विकृत वापर, अनावश्यक वापर अशी व्याख्या ते करीत. त्यामुळेच चोराला चोर म्हणतो त्या वेळी त्याची बदनामी होत नाही. अनेक माणसांना दुरितांपासून परावृत्त करण्यासाठी किंवा दुष्ट माणसांचे अनुकरण इतरांनी करू नये यासाठी कठोर शब्द वापरणे आवश्यक ठरते. पण अशा शब्दांच्या वापरासाठी काही कसोट्याही गांधीजींनी ठरविल्या : कठोर शब्दांमागे दुष्ट हेतू असता कामा नये आणि ते उच्चारणाऱ्या माणसाची त्याचे परिणाम भोगण्याची तयारी असली पाहिजे (कलेक्टेड वर्क्स, खंड २१, पृष्ठे ४५२-५४)

ज्या ज्या वेळी त्यांनी एखाद्या व्यक्तीवर कडक टीका केली त्या त्या वेळी त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्याचाच उद्देश टीकेमागे असे. व्यक्ती किंवा चळवळ किंवा गट नाउमेद व्हावेत यासाठी त्यांनी टीका केली नाही. शिवाय ज्यांच्यावर टीका केली जात असे त्यांच्यापर्यंत ते थेट व सरळपणे पोचवीत असत. गांधीजींनी यापेक्षा महत्त्वाची गोष्ट केली. माणसातील चांगुलपणाचा त्यांनी सतत शोध घेतला. चांगले आढळले तेथे त्यांचे तोंड भरून कौतुक केले. आजच्या आपल्या नेत्यांपैकी एखाद्याने तरी दुसऱ्याची प्रशंसा केल्याचे उदाहरण तुम्हाला आठवते का ? गांधीजींच्या उद्‌गारांशी याची तुलना करून पाहा. दादाभाई नौरोजींबद्दल बोलताना गांधीजी म्हणाले होते, 'त्यांच्या देशसेवेचे मूल्यमापन करणारा मी कोण ? माझी योग्यता तर त्यांच्या पायाशी बसण्याची आहे. सर्वात प्रथम एक शिफारसपत्र घेऊन मी त्यांना भेटलो तेव्हापासूनच मला ते पूजनीय वाटत आले. दादाभाईंची अखंड निष्कलंक देशसेवा, त्यांचा नि:पक्षपातीपणा, त्यांचे उज्ज्वल चारित्र्य यांचा आदर्श भारतासमोर नेहमीच राहील' (खंड १४, पृष्ठ ६१). टागोरांबद्दल, 'ते कवी तसेच तत्त्वज्ञही होते. ईश्वरावर त्यांचा विश्वास होता. ॲन्ड्रयूज यांनी तर त्यांना प्रेषित म्हटले आहे. हा महान कवी म्हणजे भारताचे एक अमोल रत्न.' (खंड १७, पृष्ठे ७२-७३). मालवीयांबद्दल, 'आज भारतात मालवीयजींना कोण ओळखत नाही ? सेवाकार्याची क्षमता त्यांच्या इतकी आज दुसऱ्या कोणाकडेच नाही.' (खंड १५, पृष्ठ २४५).

ज्यांच्याशी मतभेद होते त्यांच्या श्रेष्ठ कार्याची पावती देताना गांधीजींनी शब्दांची काटकसर केली नाही. श्रीमती ॲनी बेझंट यांच्याशी आपले तीव्र मतभेद आहेत असे त्यांनी नोंदविले होते; पण इतरांना त्यांचे उदाहरण देताना गांधीजी काय म्हणाले ते पाहा, 'स्वराज्याच्या घोषणांनी सारा देश दुमदुमला आहे. लाखो स्त्री-पुरुषांच्या ओठी स्वराज्य शब्द उमटला तो ॲनी बेझंट यांच्यामुळेच. दोन वर्षांपूर्वी आपल्याला अनोळखी असणारी ही कल्पना बेझंट यांच्या विलक्षण कौशल्यामुळे आणि अथक परिश्रमामुळे आज जणू सार्वजनिक संपत्ती झाली आहे. स्वराज्य मिळविण्यासाठी फार काळ लागणार नाही अशी प्रेरणा ज्यांनी आपल्यामध्ये जागविली अशा नेत्यांच्या यादीत त्यांचे नाव अग्रभागी असेल याबद्दल मला मुळीच शंका नाही' (खंड १४, पृष्ठ ५०).

'मिसेस ॲनी बेझंट यांची ओळख करून देण्याच्या कामाला मी पूर्ण

न्याय देऊ शकणार नाही आणि दुसरा कोणी देऊ शकेल असेही मला वाटत नाही. (यानंतर गांधींनी दोघांतील मतभेदाचा उल्लेख केला). हे सारे बोलल्यानंतरही त्यांच्याकडे मी कमालीच्या आदरभावनेनेच पाहतो, त्यांचा सन्मान करतो हे सांगितलेच पाहिजे. मला त्यांच्याविषयी आदर वाटतो तो त्यांच्या उत्कृष्ट गुणांमुळेच. भारताला त्यांनी आपले सर्वस्व अर्पण केल्यामुळे त्यांचे जीवन केवळ भारतासाठीच आहे आणि हीच त्यांची एकमेव अभिलाषा आहे. (खंड १४, पृष्ठे २५१-५२, खंड १६, पृष्ठे २०१-२०२, २१५-२१६).

लोकमान्य टिळकांच्या मतांबाबत गांधींच्या मनात अनेक शंका होत्या आणि त्यांनी त्यांच्यावर टीकाही केली. परंतु टिळक हे लोकांचे पुण्यदैवत होते, ही गोष्ट त्यांनी मान्य केली होती. हजारो लोकांना टिळकांचा शब्द म्हणजे कायदा वाटे आणि लोकांवरील टिळकांच्या प्रभावाची बरोबरी इतर कोणीही करू शकणार नाही. त्यांचा संपूर्ण त्याग, लोकांच्या मागण्यांसाठी त्यांनी दिलेला निश्चयी लढा यामुळे भारताच्या राजकारणाच्या इतिहासात सर्वोच्च स्थान टिळकांना प्राप्त झाले आहे, अशा प्रकारचे उद्‌गार गांधींनी टिळकांबद्दल काढलेले आहेत. (खंड १४, पृष्ठ ४२७).

एके ठिकाणी, गांधीजी म्हणाले, 'टिळक आणि ॲनी बेझंट यांचे धोरण निश्चितपणे चुकीचे होते. परंतु त्यांनी मिळविलेले यश मात्र अभूतपूर्व आहे. काही काळानंतर सुशिक्षित लोकांनी त्यांच्या धोरणाकडे पाठ फिरविली तरी त्या दोघांबद्दलचा पूज्य भाव लोकमानसातून कधीही जाणार नाही.'

लोकमान्य टिळक महत्त्वाचा खटला हरले तेव्हाही त्यांची महान देशसेवा, विद्वत्ता, स्वार्थत्याग यांचा गौरव करण्यात गांधीजी आघाडीवर राहिले. टिळकांच्या वृत्तीचा आपल्याला अभिमान वाटतो असे सांगून खटल्यासाठी उभारलेल्या निधीसाठी वर्गणी देण्याचे आवाहन त्यांनी लोकांना केले. त्यांच्या मतानुसार भगवद्‌गीतेची जी मूलभूत शिकवण आहे ती ते आयुष्यात संपूर्णपणे आचरणात आणत आले आहेत. (विशेष म्हणजे टिळकांनी लावलेला भगवद्‌गीतेचा अन्वयार्थ गांधींना बिलकूल अमान्य होता). आपल्या श्रद्धेनुसार जे आपले कर्म आहे त्यासाठी ते स्वतःला संपूर्णपणे वाहून घेत आणि त्याच्या फळाचा निर्णय मात्र ईश्वरावर सोपवीत. अशा थोर व्यक्तीची प्रशंसा केल्यावाचून कसे राहवेल ? (खंड १५, पृष्ठे ३३६-३७).

गांधींनी असे शब्द केवळ महान व्यक्तींसाठी राखून ठेवले असे नाही. सामान्य कार्यकर्त्यांवरही ते कौतुकाची उधळण करीत असत. आनंद शंकर ध्रुव एक प्राध्यापक होते. त्यांच्याबद्दल गांधीजी लिहितात, 'श्री. आनंद शंकर ध्रुव यांची ओळख झाल्यपासूनच मी त्यांचा चाहता बनलो. गुजरातचे ते एक अमोल रत्न आहे, नव्हे साऱ्या भारताचे ते रत्न आहे. अत्यंत कळकळीने केलेले त्यांचे भाषण ऐकणे ही मोठी आनंदाची संधी मला वाटली. त्यांच्या संगतीत राहायला मला आवडेल. श्री. ध्रुव हे एक झाकले माणिक आहेत.' (खंड १४, पृष्ठे ४३-४४).

मालवीयजींनी ध्रुव यांची निवड बनारस हिंदू विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून

केली, तेव्हा देशाला ध्रुव यांचा परिचय गांधींनी करून दिला. 'आनंद शंकरभाई हे गुजरातचे एक अमोल रत्न आहे. त्यांना काशीला पाठवून गुजरात भारताला एक अमूल्य भेट देत आहे. या भेटीतून देशाला जो फायदा होणार आहे त्याचा अभिमान बाळगावा तेवढा थोडाच.' (खंड १६, पृष्ठे २३७-३८).

सी. एफ ॲन्ड्र्यूज यांना त्यांनी ऋषीची उपमा दिली. 'सी. एफ ॲन्ड्र्यूज यांच्या सेवेचे मोल कसे करावे हेच मला समजत नाही. या महान व्यक्तीला धन्यवाद देणे कधी जमेल असे वाटत नाही' (खंड १४, पृष्ठे २७३-७४). 'मि. ॲन्ड्र्यूज हा सद्‌गृहस्थ आपल्या बांधवांना मदत करण्यासाठी जायला निघत आहे. त्यांच्या सेवा-कार्याचे मोजमाप करणे अशक्य आहे. संकटात सापडलेल्या भारतीयांचा आक्रोश ऐकू आला की, तो त्यांच्या मदतीसाठी धावलाच (खंड १६, पृष्ठ २९१). 'मि. ॲन्ड्र्यूज यांच्याबद्दल मी काय सांगणार ? त्यांना अभिवादन करणार तरी कोणत्या शब्दांत ? आपले सारे आयुष्यच त्यांनी आपल्यासाठी वाटून टाकले आहे' (खंड १६, पृष्ठे ३१४-१६).

गांधीजींबरोबर दक्षिण आफ्रिकेत काम केलेले सोराबजी शापुरजी हे तरुण गृहस्थ वयाच्या पस्तिसाव्या वर्षी मरण पावले. गांधींनी देशासमोर त्यांचे उदाहरण ठेवले. 'सर्वोत्तम नागरिकांपैकी एक. आफ्रिकेतील लढ्यात ते सतत आपल्या ध्येयाला चिकटून राहिले. स्वच्छ चारित्र्य, मनाचा शांतपणा आणि प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी दाखविलेले धैर्य हे गुण आपल्यापैकी अनेकांमध्ये दिसत नाहीत. अतिशय खंबीर हृदयाचे लोकही मोडून पडावेत असे प्रसंग आले, पण सोराबजी डगमगले नाहीत. भारताविषयीचे प्रेम हे त्यांचे सर्वस्व होते. भारताची सेवा ही त्यांची जीवन-श्रद्धा होती. खरे तर ते फार दुर्मिळ माणूस होते' (खंड १४, पृष्ठे ५०७-५०८).

काही आठवड्यांनंतर अहमद मोहंमद कचालिया या आपल्या दुसऱ्या सहकाऱ्याची आठवण त्यांनी काढली : 'अशी प्रतिष्ठा दुसऱ्या कोणत्याही भारतीयाला लाभली नव्हती. आठ वर्षांच्या खडतर कष्टांच्या या काळात जे थोडे लोक खचून गेले नाहीत त्यांपैकी हे एक होते. नेता म्हणून आपला त्याग सर्वोच्च असला पाहिजे आणि आपल्या देशाचा सन्मान राखण्यासाठी कोणतीही गोष्ट करायला मागेपुढे पाहता कामा नये हा त्यांचा बाणा होता. त्यांनी देशासाठी स्वतःहून फकिरी पत्करली' (खंड १५, पृष्ठे २७३-७४).

दाऊद महंमद या दक्षिण आफ्रिकेतील व्यापाऱ्याबद्दल गांधीजी लिहितात, 'दक्षिण आफ्रिकेत ज्यांनी भारताची सेवा केली अशांपैकी सर्वोत्तम नागरिकांत त्यांचा समावेश होईल. त्यांच्यापाशी चतुरस्र क्षमता होती आणि चिकाटी होती. ते जितके चांगले व्यापारी होते तितकेच चांगले राजकारणी होते. माझ्या मताने भारतभूमीला त्यांची माहिती नसली, तरी अशा माणसाला जन्म दिल्याबद्दल तिला जरूर अभिमान वाटावा' (खंड १६, पृष्ठे ७८-७९).

दहा दिवसांनंतर मौलाना अब्दुल बारी यांचा गौरव करताना गांधीजी लिहितात, 'भारताच्या या भागात मुसलमान सोडता इतरांना या थोर सद्‌गृहस्थाची फारशी माहिती नाही. इस्लामच्या प्रमुख धार्मिक नेत्यांपैकी एक अशा या गृहस्थास भारतभरात

हजारो अनुयायी मिळाले. त्यांचा स्वभाव निगर्वी, सत्यवादी आहे. आपल्याकडील हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, ज्यू अशा सर्व वंशांच्या व्यक्तींमध्ये उदारपणा, न्यायीपणा आणि विशाल दृष्टी हे सद्गुण असोत अशी माझी परमेश्वराकडे प्रार्थना आहे' (खंड १६, पृष्ठे ९०-९१).

पुढच्याच आठवड्यात गांधीजी चरख्याचा प्रचार करणाऱ्या महिलेबद्दल कौतुकाने शब्द लिहितात, 'माझ्या मते श्रीमती गंगाबेन यांचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. आपले सर्वस्व त्यांनी या कामासाठी वाहिले आहे' (खंड १६, पृष्ठे १६१-१६२).

दोन महिन्यांनंतर गांधीजींनी भाई परमानंद यांचे प्रशंसा केली (खंड १५, पृष्ठे ३०३-३०४). पंधरवड्यानंतर पाळी आली ती दुर्गादास अडवानी यांची. 'ज्यांना भेटण्याचे भाग्य मला लाभले अशा सर्वोत्कृष्ट कार्यकर्त्यांपैकी दुर्गादास अडवानी हे एक होत. सिंधमध्ये अनेक वेळा त्यांनी प्रामाणिकपणे, चिकाटीने कार्य केले आहे' (खंड १६, पृष्ठे ३२५-३२६).

अलीबंधूंबद्दल गांधीजींनी अनेक गौरवाचे उद्गार काढले. 'अलीबंधूंनी आपल्या समाजाचे प्रेम संपादन केले आहे. त्यांचे मधुर भाषण, कार्यतत्परता, सर्वांविषयी सहानुभूती आणि धार्मिक उत्साहभावना या गुणांमुळे कोण भारून जाणार नाही? त्यांच्या नुसत्या उपस्थितीनेही मुसलमान बांधवांना किती आनंद होतो. मुसलमान समाजाचे तर अलीबंधू म्हणजे दोन डोळेच आणि आता ते हिंदू समाजाला प्रेमाने जिंकून घेत आहेत' (खंड १४, पृष्ठ ५१३). अलीबंधूंच्या सहकार्याबद्दल ते लिहितात, 'अलीबंधूंनी हसरत मोहानी यांना आलिंगन देऊन पागल मुल्लाजी अशी त्यांची ओळख करून दिली. हा माणूस सन्मानाची अपेक्षा करीत नाही आणि अभिमानाने त्यांचे मन विचलित होत नाही. तो आपल्या कामात गुंतलेला राहतो. बऱ्यावाईट परिस्थितीविषयी उदासीन राहतो आणि दिवस-रात्रीची पर्वा करीत नाही. मुसलमान समाजाचे हे तीन हिरे आहेत. हसरत मोहानी हा त्यातील सर्वांत तेजस्वी हिरा आहे, असे मला वाटते. हिंदू समाजातही इतक्या एकाग्र चित्ताने सेवाकार्य करणारे लोक थोडे मिळतील' (खंड १६, पृष्ठ ५१७). अशा प्रकारे दर महिन्याला गांधीजी कोणत्या ना कोणत्या कार्यकर्त्याचा परिचय देशाला करून देत आणि तोही त्यांच्यावर उदारपणे स्तुतिसुमने उधळून. अशांची नुसती यादीच अनेक पाने भरेल. गांधीजींनी गौरविल्यामुळे देशाकडून तर त्यांची दखल घेतली जात असेच, पण त्या कार्यकर्त्यांनाही बापूंनी आपल्याला चांगले म्हटले तेव्हा काही विशेष दर्जा राखून काम करायला हवे, अशी प्रेरणा मिळत असे. शिवाय अशा कार्यकर्त्यांच्या गुणांचा गौरव करता करता गांधीजींनी साऱ्या देशाला हाती घेतलेल्या कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या जीवनमूल्यांची शिकवणही दिली.

आजचे आपले नेते इतर नेत्यांची किंवा कार्यकर्त्यांची अशी तोंड भरून शिफारस करताना तुम्ही कधी ऐकले आहे का? आज एकही चांगला माणूस शिल्लक नाही किंवा एकही चांगले काम केले जात नाही, असे तर काही घडलेले नाही. उलट काही प्रमाणात गांधीजींच्या वारशामुळे आज विधायक कार्याचे

प्रमाण वाढले आहे. त्यातील विविधता आणि कल्पकता वाढली आहे. मग काय गांधीजींपेक्षा आपल्या अपेक्षा वाढल्या आहेत ? हे कोणाला खरे वाटत असेल तर त्याची संपूर्ण तपासणी करावी लागेल. कारण आजचा आपला लोकव्यवहाराचा दर्जा पाहिला तर गांधीजींना पुरेशी वाटली त्यापेक्षा जास्त गुणवंतांची अपेक्षा करण्याचा हक्क आपल्याला मुळीच पोहोचत नाही.

## निष्कर्ष

आपल्या या राष्ट्रीय सवयीबद्दल गांधीजींनी फार पूर्वीच खेद व्यक्त केला आहे. अरुंदेल यांना त्यांनी लिहिले, 'तुम्ही ऐक्याची आवश्यकता सुचविता; पण ध्येयाची एकता आपल्याकडे आहेच असे मला वाटते. वेगवेगळे स्तर मात्र राहणारच. सध्या सर्वमान्य असा काही कार्यक्रम कदाचित आपल्याला सापडणार नाही. काहींना इतरांपेक्षा पुढे जावेसे वाटेल. परंतु यात काहीच गैर दिसत नाही. माझ्या दृष्टीने गरज आहे ती दुसऱ्याबद्दलचा अविश्वास आणि त्याच्या हेतूबद्दलचा संशय प्रत्येकाने आपल्या मनातून काढून टाकण्याचा. आपण शब्द आणि वाक्प्रचारांवर भांडत बसतो. सावलीसाठी भांडतो आणि दुसरा आशय आपल्या हातून सुटून जातो. आपले राजकारण फावल्या वेळचा छंद म्हणून चालते. पूर्ण वेळच्या व्यावहारिक जीवनक्रमाची सुरुवात म्हणून नव्हे. ना. गोखले म्हणत असत ते अगदी खरे आहे. तुम्हाला आणि प्रत्येक संपादकाला माझे आवाहन आहे, राजकारणामध्ये मनाचा उदारपणा, नि:स्वार्थीपणा आणि खंबीर निश्चय यांना जागा करून देण्याचे. हे केले तर आपले मतभेद आजच्या इतके त्रासदायक वाटणार नाहीत. वैचारिक मतभेद ही खरी अडचण नव्हे, तर त्यामागचे क्षुद्र मन ही नि:संशय कुरूप गोष्ट आहे' (खंड १६, पृष्ठ ६).

जीवनातील सत्याची जाणीव त्यांनी आपल्याला करून दिली. 'प्रत्येक सजीव व निर्जीव वस्तू ही चांगल्या आणि वाईट गुणधर्मांचे मिश्रण आहे, असे संत तुलसीदासांनी म्हटले आहे. चांगल्या वाईटात फरक करायला शिकणे, वाईट गोष्टी दूर करून चांगले आत्मसात करणे हे आपले कर्तव्य आहे. राजहंसाला दूध आणि पाणी मिसळून दिले तर तो फक्त दूध सेवन करतो, तसे आपण केले पाहिजे. परंतु आपल्या जवळचे लोक आणि आपला समाज यांनी फक्त आपले दुर्गुणच पाहायचे ठरविले तर आपले काय होईल ?' (खंड १७, पृष्ठ ४६९). 'द्वेष, मत्सर, दुसऱ्याचे दोष काढणे ही दुबळेपणाची व रोगटपणाची लक्षणे आहेत. दुबळ्या माणसाला सगळीकडे दुबळेपण दिसते. दुष्ट माणसाला सारेजण दुष्ट दिसतात. साप आणि विंचू यांना सगळ्या प्राण्यांची भीती वाटते. आपण भले तर जग भले हा जगाचा नियम आपण विसरता कामा नये' (खंड १७, पृष्ठ ४६९). काही लोक स्वभावत: मोठ्या मनाचे असतात काही नसतात. पण निव्वळ उपजत स्वभाव हे पुरेसे कारण नाही. गांधींनी स्वत:च स्वत:मध्ये उदारपणाची जोपासना केली. इतरांच्या कामाचे, व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन आपण कोणत्या नियमांनुसार करतो हे त्यांनी अनेकदा सांगितले आहे.

एखाद्या माणसाच्या शब्दाचा अर्थ लावताना त्याच्यावर अन्याय होऊ नये याबाबत गांधीजी अतिशय दक्षता घेत (दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह, पृष्ठ ११८). याच पुस्तकात ते पुढे म्हणतात, 'मी नियमच ठरविला आहे की, एखादी व्यक्ती एखाद्या गोष्टीची ग्वाही देत असेल तर आपल्या मनातील शंकांना महत्त्व द्यायचे नाही' (पृष्ठ १९३). आपल्या शत्रूवर अविश्वास दाखविण्याजोगे सबळ कारण नसेल तर आपण विश्वासच ठेवू, मग भलेही तो दिलेले वचन पाळत नसेल. असा गांधीजींचा आग्रह होता. (पृष्ठे १४७, १७५-१७६, ३०१). आपले दोष मोठे करून पाहणे आणि दुसऱ्याचे दोष सूक्ष्म करून पाहणे हे आपले कर्तव्यच असल्याचे त्यांचे वचन प्रसिद्ध आहे. यातील प्रत्येक नियम त्यांनी विचारपूर्वक बनविला होता आणि त्यांचे त्यांनी आयुष्यभर निष्ठेने पालन केले.

एके ठिकाणी गांधीजी म्हणाले, 'एखाद्या व्यक्तीने अन्याय केला असे वरवर आपल्याला वाटले तरी तसा निष्कर्ष काढण्याची घाई करता कामा नये. परंतु काळजीपूर्वक निरीक्षण केल्यानंतर अन्याय झाला आहे अशी आपली खात्री पटली, तर मात्र आपण त्याचा शेवटपर्यंत मुकाबला केला पाहिजे. मात्र त्याच वेळी आपली चूक होत आहे असे लक्षात आले, तर ती त्याच क्षणी कबूल करून माफी मागण्याची आपली तयारी पाहिजे' (कलेक्टेड वर्क्स, खंड १७, पृष्ठ ३२९).

या बाबतीत तीन नियम आहेत. गांधीजींचे हे नियम आपल्या आजच्या वर्तनापेक्षा कितीतरी वेगळे आहेत. आपण फार घाईने निष्कर्ष काढतो. लढा शेवटपर्यंत लढवत नाही आणि आपल्या चुका मान्य करीत नाही. गांधीजींचे मत लेनिनच्या तत्त्वापेक्षाही किती वेगळे आहे ते पाहा. मार्क्सवादाचा पाया उखडून टाकण्याचा जो जो प्रयत्न करीत त्या सर्वांवर आपण गुन्हेगारीचा शिक्का मारला पाहिजे, मग मग भले त्याची तपासणी होवो अथवा न होवो, असे लेनिनचे म्हणणे होते. आज आपल्याला हवेत ते गांधीजी; लेनिन नव्हे. सगळ्याच बाबतीत आपण गांधीजींच्या पावलावर तंतोतंत पाऊल टाकू शकत नसलो तरी, प्यारेलाल म्हणाले तसा 'निदान चार आणे गांधी व्हायचा प्रयत्न तरी करायला हवा.'

३७६३

# ७. कोलाहलातून सुसंगत विचाराकडे

राजकीय विचारविनिमयाची प्रक्रिया अगदी १९५० चे तोडगे संपेपर्यंत जिवंत होती. ही विचारप्रक्रिया राजकीय अशा अर्थाने होते की, देशाच्या विविध भागांतील लोक, त्यातही विचार करणारे आणि आविष्काराची रीती देणारे लोक, त्यातही पुढारी देशाच्या दृष्टीने मुद्याच्या विषयांची चर्चा करीत असत. आणि हे विचार व ही चर्चा आपल्या अस्तित्वासाठी आणि विकासासाठी महत्त्वाची आहे अशी जाणीव देशाच्या सर्व भागात दिसून येत असे. शिवाय ही विचारप्रक्रिया सुसंगत, सुस्थितीत अशी असते. त्यात मुद्दा असे, वस्तुस्थिती पूर्ण मांडणारी विद्वत्ता, कल्पकता असे आणि विचारांची देवघेव करण्याची पद्धत सभ्यपणाची असे.

आज अनेक समुदाय, अनेक वस्त्या नी वाड्या विचार घेऊन उसळत आहेत; पण निरनिराळ्या कारणांमुळे ते प्रक्षुब्ध आहेत. अखिल आसाम विद्यार्थी संघटनेचे (आसू) आंदोलन घ्या. आसाममध्ये त्याला कमालीची उत्कट दाद मिळते. उरलेल्या राष्ट्राने मात्र त्याच्याकडे दुर्लक्ष केले. पंजाबमधील हत्याकांडाचा तमिळनाडूमध्ये विशेष परिणाम होताना दिसत नाही. त्याचप्रमाणे श्रीलंकेमधील परिस्थितीचे पडसाद पंजाबमध्ये कमी उमटतात. आज आपल्या संवेदना विखुरल्या गेल्या आहेत. एकसंध नाहीत. देशाच्या निरनिराळ्या भागांत काय घडत आहे हे जाणून घेण्याची साधने विलक्षण वेगाने वाढली, विस्तारली आहेत. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन ही प्रभावी माध्यमे. तरीही आज वैचारिकदृष्ट्या सुसंघटित असलेले विवेचन जणू कालबाह्य झाले आहे. आज राज्य आहे ते कोलाहल, आरोळ्या, शिव्याशाप आणि धक्काबुक्कीचे ! सभ्य विचारप्रक्रियेला, विचारांच्या सुसंगत मांडणीला येथे जागा नाही.

## नाटकातील पात्रे

कोलाहलावर प्रभुत्व आहे ते तीन तऱ्हेच्या गटांचे. पहिला गट म्हणजे अर्थातच राजकारण. त्यांच्यापैकी त्या त्या वेळी जे सत्तेवर असतील ते जास्तच प्रभावी असतात. आकाशवाणी आणि दूरदर्शनवर त्यांची भाषणे, दौऱ्याच्या बातम्या, निवेदने दुमदुमत असतात. निव्वळ ही दोनच माध्यमे नव्हे तर वृत्तपत्रेसुद्धा मंत्र्यांच्या घोषणांना अगदी अवाजवी महत्त्व देतात. कुठल्याही वृत्तपत्रातील संसदेच्या कामकाजाचा अहवाल पाहिला तर त्यातील जास्तीत जास्त जागा, त्यांचे मथळे मंत्र्यांच्या पदरात पडतात. विरोधी पक्षांची भाषणे अधिक तर्कशुद्ध असली तरी त्यांना तितकी

जागा मिळत नाही. याचा परिणाम ताबडतोब दिसतो आणि तो अतिशय घातक असतो. दिवसामागून दिवस दूरदर्शनवर अखंडपणे राजीव गांधींचे दर्शन घडत राहते. तीन वर्षे असे घडल्यानंतर एकेकाळी कोणीच नसलेले हे नेते आता देशाचे एकमेव नेते होतात. लक्षात जरूर घ्या, 'त्यांच्याबद्दल तुम्ही म्हणता ते खरे आहे, पण दुसरा पर्याय आहे कोठे ?' मुद्दा हा की, लोकांना राजीव गांधींखेरीज दुसऱ्या कोणाचे दर्शनच घडत नाही, त्यांच्याबद्दल काहीही वाचायला मिळत नाही, तर जनमानसावर दुसऱ्या कोणाचा ठसा उमटणार तरी कसा ? अशा स्थितीत त्या-त्या क्षणी सत्तेवर असलेल्या व्यक्तीला हटवल्याखेरीज पर्याय उभा राहणे कठीण होऊन बसते. तीन वर्षांनंतर कदाचित लोक पुन्हा म्हणतील, 'त्यांच्याबद्दल तुम्ही म्हणता ते खरे आहे. पण दुसरा पर्याय आहे तरी कोठे ?' या वेळी मात्र ते त्या दुसऱ्या माणसाबद्दल बोलत असतील.

दुसरा गट आहे तो व्यावसायिक पत्रकारितेचा.

तिसरा म्हणजे ज्यांनी युक्तिवादाचा मार्ग अजिबात सोडून दिला आहे अशा समूहाचा. समोर उभ्या असलेल्या समस्या सोडविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ताकदीचा किंवा बंदुकीचा वापर, अशी या घटकांची खात्री पटलेली असते. अशा घटकांचे असंख्य वाद चाललेले आहेत. गेल्या काही महिन्यांतील दिल्लीच्या आसपासच्या घटना पाहिल्या तर विचारविनिमय आणि युक्तिवादाच्या परिघाबाहेर जाऊन प्रश्न सोडविण्यासाठी ताकद वापरण्याचा मार्ग, धंदेवाईक राजकारणी एवढेच नव्हे तर औद्योगिक कामगार, शेतकरी आणि अगदी वकील यांनीसुद्धा चोखाळलेला दिसून येतो. युक्तिवादाला अधिकाधिक हिंसक पर्याय शोधून वापरले जात आहेत. धनबादचे कामगारनेते आणि पंजाबमधील दहशतवाद ही या वाढत्या प्रवृत्तीची दोन टोकाची उदाहरणे.

तथापी राजकीय नेते व पत्रकार या पहिल्या दोन गटांमध्येही तर्क, कल्याण, युक्तिवाद यांना चिकटून राहतील ते घाट्यात जातील, असे दिसते. लोकमान्य टिळक, गांधीजी, चित्तरंजनदास, तेजबहाद्दर सप्रू, डॉ. आंबेडकर, राजाजी, जवाहरलाल नेहरू, सरोजिनी नायडू, मौलाना आझाद ही सारी विद्वान माणसे होती. विचारांना महत्त्व देणारी होती. भरपूर वाचन करीत असत. दीर्घकाळ सखोल विचार करीत असत. आज काही थोडे अपवाद सोडले तर राजकीय नेते वाचन करीत नाहीत. इंदिरा गांधी, राजीव गांधी हे असे नमुने होत. मग किरकोळ पुढाऱ्यांची गोष्टच सोडा. ते तर नीट काही ऐकूनही घेत नाहीत.

त्याचे कारण त्यांची क्षमता नाही हे नव्हे. याचा काही उपयोग नाही असे त्यांना वाटते. परिस्थिती सुधारण्यासाठी काय करावे हे जाणून घेण्याची तळमळ देशातील लोकांना आहे; पण एखादा-दुसरा नेता वगळता कोणत्याही राजकारण्याला या विषयावर आपले विचार मांडावेत असे वाटलेले नाही. याची तुलना करायला हवी ती प्रस्तावामागून प्रस्ताव नी सूचना लिहून काढणाऱ्या गांधीजींशी. रेल्वेतील तिसऱ्या वर्गातील प्रवास कसा सुधारावा इथपासून निसर्गोपचारापर्यंत आणि घटनात्मक व्यवस्थेपासून धार्मिक श्रद्धेपर्यंत नाना विषयांवर गांधीजी आपले

विचार शब्दबद्ध करीत असत.

पत्रकारांनी मनात आणले तर त्यांना हे शक्य आहे; पण ते हे करीत नाहीत. येथेही क्षमता नाही असे नाही. त्याचे महत्त्व त्यांना कळत नाही. शहाबानो खटल्याचा निकाल म्हणजे इस्लामवरील हल्ला असे 'क्ष'ने म्हटले तर 'य'ने नेमके त्याविरुद्ध मत व्यक्त केले असेल तर वार्तापत्रे पानेच्या पाने भरून लिहितील. परंतु स्वत: कुराण वाचून त्यातील या विषयावरची जेमतेम एक ओळही उद्धृत करणार नाही. त्यांनी नाना डावपेच वापरले आहेत. उपलब्ध असणाऱ्या कोणत्याही संस्थेचा गैरवापर करताना त्यांना वाईट वाटत नाही. ठक्कर आणि नटराजन यांसारखे न्यायाधीश असतात, संसद असते नि संसदेच्या समित्या असतात, लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठी त्या वापरल्या जातात. परिणामी चुकीची माहिती आणि खोट्यानाट्या गोष्टी यांचा महापूर लोटला आहे. दूरदर्शन आणि आकाशवाणी या सरकारनियंत्रित माध्यमातून असत्याचे लोंढे वाहतात. शिवाय सरकारच्या लक्षात आले की, आपल्या थापा आणि फसवेगिरी यांना वृत्तपत्रात जागा मिळाली तर त्यांची विश्वसनीयता वाढेल. सरकारचा हा अंदाजही बरोबर ठरला आणि या कामासाठी वृत्तपत्रांची चाचपणी केल्यानंतर त्यांना चांगले उत्साही ध्वनिक्षेपक मिळाले आहेत. आज पत्रकारितेत सत्यशोधात अडथळे आणणारे आणि सत्य शोधणाऱ्यांना बदनाम करणारे लोक भरघोस फोफावले आहेत. वृत्तपत्रे अशा तऱ्हेने वापरल्याने किती नुकसान होईल या काळजीला सत्ताधारी राजकारणी कवडीची किंमत देतात. खरे तर इतर कोणत्याही सार्वजनिक संस्थांइतकीच देशाला स्वतंत्र वृत्तपत्रांची गरज आहे. पण पत्रकारितेतील एका फार मोठ्या वर्गाला याची काडीइतकीही कदर नाही. यातून होणारी हानी किमान चार स्तरांवर दिसते.

सत्याचा शोध करणे अधिकच जिकीरीचे होऊन बसते. कारण सरकारच्या प्रेरणेने पत्रकारांचा एक मोठा वर्गच आपल्या खुरांनी धूळ उडवून सत्याचा मार्ग धूसर करीत असतो. भारतीय वृत्तपत्रात बोफोर्स व जर्मन पाणबुडी भ्रष्टाचाराची प्रकरणे गेल्या वर्षी ज्या तऱ्हेने हाताळली गेली त्याची तुलना अमेरिकेतील वॉटरगेट दरोडा प्रकरणाच्या केलेल्या हाताळणीशी करून पाहा. एखादे वॉटरगेट प्रकरण उघडकीस आले मात्र, द वॉशिंग्टन पोस्ट आणि द न्यूयॉर्क टाइम्स, अशा वृत्तपत्रांनी सत्य शोधून काढण्याचा चढाओढीने प्रयत्न केला. पेन्टागॉन पेपर्स प्रकरणात पुढील काही कागदपत्रे प्रसिद्ध करायला न्यायालयाने एक वृत्तपत्राला मनाई केली तरीही दुसरे पुढे आले आणि त्याने पुढे काम चालू ठेवले. आपल्याकडे मात्र बोफोर्स प्रकरण ही जणू काही एक-दोन वृत्तपत्रांची मोहीम आहे असे मानून बहुसंख्य वृत्तपत्रांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. इतरांनी– उदाहरणार्थ 'द टाइम्स ऑफ इंडिया' जाणून-बुजून चुकीच्या विकृत बातम्या छापल्या. याचे एक नमुनेदार उदाहरण म्हणजे भारत सरकारच्या भुलथापांना बळकटी आणतात म्हणून स्वीडनच्या नॅशनल ऑडिट ब्यूरोची काही विधाने छापण्यात आली. वस्तुस्थिती अशी होती की, केंद्राने ब्युरोला दिलेले निवेदन ब्यूरोच्या अहवालाचा निष्कर्ष म्हणून छापण्यात आले होते! सत्याच्या शोधात असे अडथळे येत असतात. आणि त्यामुळे आपले

सार्वजनिक जीवन सुधारण्याच्या प्रयत्नात अडचणी येतात. दुसरीकडे यातून पत्रकारितेला हानी पोहोचते. सत्ताधाऱ्यांच्या हातातील बाहुले बनणाऱ्या वृत्तपत्रांमुळे एकूण वृत्तपत्र माध्यमाचीच विश्वासार्हता धोक्यात येते. त्यातून राज्यकर्ते एकानंतर एक अशा तऱ्हेने वृत्तपत्रांची प्रकरणे हाताळीत जातात.

एक्स्प्रेस गटावर सरकारने सर्वस्वाने हल्ला चढविला तो सप्टेंबर १९८७ मध्ये. दिल्लीतील एक्स्प्रेस आवृत्ती बंद ठेवण्यास भाग पाडले. ज्या इमारतीतून हे वृत्तपत्र प्रसिद्ध होते, ती इमारत ताब्यात घेतली गेली. या इमारतीचा काही भाग भाड्याने दिल्यामुळे उत्पन्न मिळते आणि त्यातून एक्स्प्रेसच्या दिल्ली व चंडीगड आवृत्त्या आर्थिकदृष्ट्या तग धरू शकतात. हे उत्पन्न बंद व्हावे आणि एक्स्प्रेसची आर्थिक कोंडी व्हावी असा प्रयत्न झाला. एक्स्प्रेस गटाविरुद्ध विविध न्यायालयांत दाखल केलेल्या खटल्यांची संख्या दोनशेच्या पुढे जाईल. सरकारच्या आणि सार्वजनिक संस्थांच्या जाहिराती बंद करण्यात आल्या. दीनमणी, आंध्रप्रभा, फिनान्शियल एक्स्प्रेस यांच्या आवृत्त्या प्रसिद्ध करण्यासाठी बंगलोर येथे एक्स्प्रेस गटाला दिलेले फॅसिमिली सर्किट अचानक बंद करून टाकण्यात आले. आणीबाणीच्या काळात झालेल्या हल्ल्याइतकाच हा हल्ला पूर्वनियोजित आणि निकराचा होता. मात्र हा अधिक व्यापक स्वरूपाचा होता. राज्यकर्ते काही वस्तुस्थिती दडविण्याच्या प्रयत्नात होते आणि त्या बाहेर काढण्याच्या प्रयत्नाबद्दल एक्स्प्रेसला ही शिक्षा देण्यात आली आणि तरी एखादा दुसरा अपवाद वगळता इतर वृत्तपत्रांनी त्याकडे दुर्लक्ष करणे पसंत केले. एकूण वृत्तपत्र सृष्टीकडून प्रतिकार नाही, असे पाहून राज्यकर्त्यांचे धैर्य वाढले. आपल्याला गैरसोयीचे लिखाण करणाऱ्या इतरांवरही धाक धरण्यात आला. इनाडू गटाविरुद्ध कारवाया सुरू झाल्या. वृत्तपत्रे त्याविरुद्ध मूग गिळून बसल्याने सामान्य जनतेलाही अशा हल्ल्याचे काही वाटेनासे झाले.

आणखी एका पातळीवर काही वृत्तपत्रांनी सरकारी हस्तक बनून सरकारला नकोशा झालेल्या व्यक्तींवर धाडी टाकल्या. त्यांची भरपूर बदनामी वृत्तपत्राद्वारे करून घेतली. ती करण्यापूर्वी वस्तुस्थिती तपासून घेण्याचा प्रयत्न बहुसंख्य वृत्तपत्रांनी केला नाही. परदेशाचे हस्तक, तस्कर, अशी विशेषणे या व्यक्तींना सहजपणे चिकटविण्यात आली. छाप्यामध्ये गुन्हेगारीचा पुरावा देणारी अनेक कागदपत्रे सापडली अशा तऱ्हेच्या बातम्या काही विचार न करता छापून टाकण्यात आल्या.

## मानसिक सवयी

हा सारा कोलाहल अपुऱ्या माहितीवर आधारलेला आहे. हे त्याचे एक दूषण झाले. परंतु त्यापुढची वाट म्हणजे वस्तुस्थितीचे विकृतीकरण राज्यकर्त्यांच्या भल्यासाठी जाणून-बुजून करणे आणि त्यासाठी काही संपादकांनी आपले माध्यम सरकारला उपलब्ध करून देणे या गोष्टी म्हणजे सुसंगत विचारप्रक्रियेतील फार गंभीर अडथळा होता. त्याखेरीज अलिकडच्या काही दशकांत आपल्याकडे मध्यमवर्गातल्या काही मानसिक समस्यासुद्धा सुसंघटित विचारप्रक्रिया अडचणी निर्माण करतात. माओने अशा परिस्थितीचे वर्णन 'ऑफुल मेस स्कूल' असे केले होते. या

विचारसरणीच्या लोकांनी सगळीकडे भयानक गोंधळ माजविला आहे. सगळ्या गोष्टींचे वाटोळे झाले आहे असे त्यांना सतत वाटत असते आणि त्यामुळे ते कायमचेच रागावलेले, निराश झालेले आणि खचलेले असतात. आपणही असे विव्हळत कण्हतो आणि शिव्याशाप देतो. पण त्याचे रूपांतर कृतीत होत नाही. चांगली आखणी करून दोष दूर केले, काही कमी केले आणि आपल्या टीकेमागील कारणांचे परिमार्जन केले असे घडत नाही. जणू काही भयानक गोंधळ आणि तोही सगळ्यांच्या वाट्याला ही भावनाच आपल्याला आवडू लागली आहे, या धगीत आपण रमतो आहोत.

सरकारने रुपयाचे अवमूल्यन केले तर जगाच्या दडपणाला ते लोक बळी पडले असा निष्कर्ष आपण काढतो. अवमूल्यन न करता रुपयाचा कृत्रिम विनिमयदर रेटत राहिले तर आपल्या बगलबच्च्या आश्रयदात्या उद्योगपतींची अकार्यक्षमता जपण्यासाठी सरकार रुपयाचे अवमूल्यन करीत नाही, असा आरोप आपण करतो. सरकारने उद्योगावरील नियंत्रणे चालू ठेवली तर कालबाह्य झालेल्या समाजवादाची लक्तरे सांभाळून ठेवण्याचा प्रयत्न अशी त्यावर टीका होते. नियंत्रणे शिथिल केली तर सरकारने उद्योगपतींची चमचेगिरी केली अशी हाकाटी होते. आजारी गिरण्या चालविण्यासाठी सरकार ताब्यात घेतल्या तर सार्वजनिक पैशाचा अपव्यय होतो असे आपण म्हणतो. आजारी गिरण्या ताब्यात घेतल्या नाहीत, तर कामगारांना उपासमारीच्या खाईत लोटून दिल्याचा ठपका सरकारवर ठेवला जातो. क्रोधातून नवनिर्मिती होऊ शकते; पण नुसते जागेवर विव्हळत बसलो तर त्यातून निरुत्साही होण्यापेक्षा काही निष्पन्न होत नाही. त्यातून जुन्याची रया जाते आणि नवे काही निर्माण होत नाही.

आज आपल्याकडे विलक्षण तर्कशुद्ध युक्तिवाद हे काही कृती करण्याची पूर्वतयारी राहिली नसताना कृती टाळण्यासाठी वापरण्याचे हत्यार ठरले आहेत. संपूर्ण समाजरचना आणि दृष्टी बदलून टाकण्याची अपेक्षा एखाद्याने केली तर आपण त्याची वासलात लावतो, 'येथे एखाद्या पोलिस हवालदाराला त्याचे दिवसाचे काम नीट करायला लावणे शक्य होत नाही आणि तुम्ही सारी संरचना बदलून टाकण्याच्या गोष्टी करता आहात!' आणि हवालदाराला आपले काम चांगल्या पद्धतीने करायला लागेल अशी काही उपाययोजना त्यांनी सुचविली तर तीही आपण निकालात काढतो! 'येथे सगळा देश फुटीच्या उंबरठ्यावर उभा आहे आणि तुम्हाला एका पोलिसचौकीतील हवालदाराच्या कामाची चिंता पडली आहे!' परिणाम असा की, यातील कुठलीही सूचना अंमलात येत नाही. एकूण पाठपुरावा केलात तर त्या बाबींची चर्चा एक तर नको तितकी तपशिलात केली जाते किंवा फारच व्यापक आणि भोंगळपणे केली जाते. म्हणजे एकंदर बदलच महाग पाडला जातो किंवा उपनिषदांच्या काळात सर्व भारतीयांचा दृष्टिकोन जसा दिसतो तसा तातडीने करण्याच्या संघटनांच्या बाबींवर किंवा या सूचनांचे प्रत्यक्ष प्रभावी कृतीत रूपांतर कसे करावे, त्यासाठी आवश्यक ती माणसे कशी शोधून तयार करावी अशा गोष्टींवर चर्चा होत नाही. त्यामुळे परिषदांमागून परिषदा होतात

आणि ठरावामागून ठराव; तेच चक्र पुन्हा पुन्हा तसे फिरत राहते !

प्रगती मंदावण्याची आणखी कारणे. उदाहरणार्थ, लोकांच्या उणिवा किंवा दोष आपण फार मोठे करून पाहतो. जपानी लोकांच्या प्रचंड तांत्रिक प्रगतीबद्दल कोणी कौतुकाने बोलू लागले, त्यांनी अखंड संशोधनाची जननी ठरेल गतिमान व्यवस्था कशी विकसित केली आहे, याची कोणी वाहवा केली की, आपल्या मनात येते ती जपानी विद्यार्थ्यांत आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे, अशा काही तरी बातम्या. अमेरिकेचे साहित्य किंवा संगीत कसे सर्जनशील असे कोणी म्हटले तर लगेच आपण म्हणतो, 'अमेरिकेतही गरिबी आहे की !' एखादे अंतराळयान शनी ग्रहाचे फोटो घेऊन पृथ्वीवर प्रक्षेपित करत असते. आपल्याकडून मात्र कुजबूज होते, 'पण शास्त्रीय प्रगतीतून मानसिक आनंद मिळत नाही !' अशा रीतीने मानवी कृतीचे परिणाम हे चांगले नाहीत असे एकदा ठरवून टाकले की, कोणतीही कृती करण्यापासून आपोआपच सुटका होते.

अशा स्थितीतल्या जगतात आता आपण जे काही करू शकतो ते कार्य करण्याऐवजी एखादे काल्पनिक परंतु परिपूर्ण अशा विस्तारासंबंधीचा गोड विचार करण्यात आपले मन गुंग होते. इतके की, आपण त्या काल्पनिक विस्तारात अगदी बुडून जातो. विसाव्या शतकाच्या तिशीपासून ते सत्तरी संपेपर्यंत भारतातील डाव्या विचारसरणीच्या बुद्धिवाद्यांनी उच्च आवाजात भाषणे करण्यापलिकडे काही केले नाही. दूरवरच्या देशातील स्वर्गाच्या स्वप्नात जगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्टॅलिनचा रशिया, माओचा चीन, होचि मिन्हचा व्हिएटनाम, पोलपोतचा कंबोडिया आणि शेवटी होक्साचा अल्बानिया यांची स्तुतिस्तोत्रे गाताना ही मंडळी स्वत:ला हरवून बसली. येथे काही काम करण्याऐवजी हा उपक्रम त्यांच्या भावनांचे विरेचन म्हणून अधिक सोयीचा ठरला.

तेव्हा आपल्या मनात आस्था असते ती कृतीविषयी नव्हे तर बोलण्याविषयी असते व बोलणे साध्य व्हावे तर कोणाची तरी निंदानालस्ती करणार. त्यामुळे जे कार्य व्हावेसे आपल्याला वाटते त्यासंबंधी त्याला साहाय्यक ठरेल अशा विचारासंबंधी आपण बोलत नाही. अशा विचारावर प्रत्यक्ष प्रयोग करावा, त्यात विकास आणि बदल करावा याऐवजी तो विचार म्हणजे दुसऱ्याचा पवित्रा आहे, अशी कल्पना आपण करून घेतो. साहजिकच आपण त्याविरुद्ध पवित्रा घेऊन थांबतो. मग आपल्या पवित्र्याला चिकटून राहणे आणि दुसऱ्याला उद्ध्वस्त करणे हा प्रतिष्ठेचा प्रश्न बनतो. आपली घसरण होते ती कार्याकडून विचाराकडे, तेथून पवित्र्याकडे, तेथून व्यक्तीकडे. व्यक्तीबाबत (नेहमीच प्रतिकूल) अभिप्राय देण्याकडे ! कारण यातून आपल्याला संपूर्ण मुक्तता लाभणार असते. मात्र त्यात काही धोके असतात. एखाद्या माणसावर काहीतरी शिक्का मारला, त्याला काहीतरी अंत:स्थ हेतू चिकटविला, की विचार करण्यापासून आपली सुटका होते. अमूक विचार हा त्या संशयिताकडून मांडला गेला किंवा त्या नक्षलवाद्यांनी पुढे आणला असा ग्रह करून घेतला की, आपण खांदे उडवून आपले विचार झटकून टाकतो. असल्या माणसापासून सरकार अपेक्षा तरी काय करणार ?

तेव्हा एकीकडे काही विशिष्ट स्वभाव असतो आणि आपल्या मानसिक सवयी असतात. त्याचा परिणाम फार झपाट्याने व गुंतागुंतीचा होताना दिसतो. तो प्रसारमाध्यमांद्वारे एकदम होणाऱ्या परिवर्तनामुळे. दूरदर्शन आणि आकाशवाणीचा विस्तार वेगाने होत आहे. वृत्तपत्रांतही अनेक बदल झालेले आहेत.

या शतकाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या दशकांत, चंपारण, बार्डोली, खेडा सत्याग्रह झाला, त्या वेळी माहितीचा प्रवास तसा संथपणे होत असे. म्हणून जनमानसात मुरणे, चर्चा होणे, विचार ठरवून कृती होणे याला बरोबर वेळ मिळत असे. आजचा वाचक आणि विशेषत: प्रेक्षक यांच्यावर एकापाठोपाठ एक बातम्या-प्रतिमेचा नुसता भडिमार केला जातो. दुसरीकडे दैनंदिन दबावामुळे क्षितिज अरुंद होत चालले आहे. आला दिवस पार पाडावयाचा एवढे बहुसंख्य सामान्य माणसांना जमते. त्यामुळे जंगलतोडीचा आजचा झपाटा चालू राहिला तर आणखी पंधरा वर्षांनी जमिनीवर जंगलच शिल्लक राहणार नाही आणि पंधरा वर्षे हा काही मोठा कालखंड नव्हे हे समजूनसुद्धा आजच्या जगण्याच्या प्रश्नात गुरफटलेले लोक इतक्या जवळच्या भविष्याचासुद्धा विचार करू शकत नाहीत. शिवाय आधुनिक जीवनपद्धतीमुळे आलेला अलिप्ततावाद त्याचे मन फार संकुचित करतो. पंजाबमध्ये आणखी वीस लोक मारले गेले हे वाचल्यानंतर त्याचे मन त्या व्यथेशी समरस होत नाही. त्याऐवजी दूरस्थपणाची भावना निर्माण होते. जे घडले ते तिकडे पंजाबमध्ये, येथे नव्हे; शिवाय मेला तो माणूस कम्युनिस्ट आणि काँग्रेसवाला किंवा भाजपाचा होता! माणसाच्या मनाची दारे आज बातम्या वाचून आणि पाहून बदलत राहतात. पंजाबमधील आणि श्रीलंकेतील हत्याकांडाची आकडेवारी वाचून तो निव्वळ पाने उलटतो. बहुधा संपूर्ण बातमी वाचण्याऐवजी मथळे वाचून दाखविले जातात. तेही मनात राहतातच असे नाही. मग असा माणूस म्हणतो, हल्ली वृत्तपत्रात वाचायला काही नसतेच. त्याला म्हणायचे असते ते असे की, वृत्तपत्रात काही चटपटीत रंजक बातम्या नाहीत. काही रोमांचकारी अफवा नाहीत. अशा स्थितीत राजधानी दिल्लीत सरकारी आकडेवारीनुसार सत्तावीसशे शिखांचे मुडदे पडल्यानंतर राजीव गांधी खुशाल म्हणतात, 'हा काही चालू घडीचा प्रश्न नाही!' अर्थात अशी क्रूर शाब्दिक कसरत हे राजीव गांधींचे वैशिष्ट्य आहे. लोकांच्या दु:खाचे उसासेपण ऐकू येत नाहीत हे त्यांचे दुसरे वैशिष्ट्य आहे. पण आपणही बहिरे झालो आहोत. या स्थितीत विचारविनिमयाची अपेक्षा तरी कशी करावयाची?

आपल्या जीवनक्रमाने आपले क्षितिज क्षणिक आणि तात्कालिक गोष्टींपुरते मर्यादित करून घेतले आहे. या क्षणी या आपल्या दोघा-तिघांच्या कुटुंबापुरते तेवढे आपल्याला दिसते- जाणवते. पण हा झाला फक्त संदर्भ. आधुनिक प्रसारमाध्यमाचा विस्तार, वेग आणि बदलते स्वरूप आपली ही जाणीव पूर्णपणे पुसून टाकतात. आधुनिक माध्यमांचे सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे क्षणिक, तात्कालिक गोष्टींवर

त्याचा मुख्य भर असतो. एखाद्या लेखकाने समजा वीस हजार शब्दांचे पुस्तक लिहिले तर तो दीर्घकाळ टिकून राहतील असे विचार आणि प्रसंग निवडतो आणि त्यांच्यातील टिकाऊ पैलू असतील त्यांवर भर देतो. परंतु वीस हजार शब्दांचा मजकूर देणारे दैनिक वृत्तपत्र मात्र फक्त तात्कालिक गोष्टींवर भर देते. परंतु त्या टिकून राहणार आहेत की नाही याची कदर ते करीत नाहीत. झालेल्या घडामोडींचे वृत्तांत ताजे आहेत याला महत्त्व येते. दीर्घकाळ टिकून राहील याला नव्हे.

आकाशवाणी आणि दूरदर्शन यांचे स्वरूप याहीपेक्षा जास्त क्षणभंगूर असते. प्रतिमा एका पाठोपाठ एक येऊन निघून जातात. एका अंदाजानुसार बातम्या या कार्यक्रमातही एक प्रतिमा पडद्यावर सरासरी फक्त साडेतीन सेकंद टिकते आणि घटनेला सरासरी पंचेचाळीस सेकंद एवढा वेळ मिळतो.

विचारांचे महत्त्व पुस्तक आणि वृत्तपत्रांत कमी असते आणि वृत्तपत्रांपेक्षाही दूरदर्शनवर कमी असते असे नील पोस्टमन यांनी 'अम्यूझिंग अव्हरसेल्व्हज् दी डेथ' या पुस्तकात मांडले आहे (वायकिंग पेंग्विन १९८५). बातम्या, मजकूर अगदी थोडक्यात द्या असे वृत्तपत्राचे संपादक आपले वार्ताहर आणि स्तंभलेखकांना वरच्यावर सांगत असतात. दूरदर्शन तर महत्त्वाचे विचार मांडण्यासाठी दोन-तीन वाक्यापेक्षा जास्त सवड देऊ शकत नाही. "तर जसवंत शिवजी, आपल्याला १० सेकंदच वेळ दिला आहे. आपल्या मतानुसार पंजाबमध्ये काय केले पाहिजे ?" अशामुळे विचारधारेचे अवमूल्यन होत नाही. शिल्लक उरतात त्या शंका, क्षणिक निष्कर्ष, घासून घासून चाललेले शब्द, विरोधी मतांचा घोळ आणि ठरीव निष्कर्ष याचा परिणाम घातक होतो हे उघड आहे. लोकमान्य टिळक किंवा गांधीजी यांना समक्ष पाहणाऱ्या किंवा त्यांची छायाचित्रे पाहण्यात येणाऱ्या लोकांच्या शंका मर्यादित होत्या. तरीही त्यांचे विचार, त्यांचे वर्णन आणि त्यांची जीवनमूल्ये यांमुळे लक्षावधी लोक कमालीचे प्रभावी होत असत. आज लक्षावधी लोक पडद्यावर एम. जी. आर. किंवा एन. टी. आर. यांचे प्रभावी दर्शन घेतात किंवा राजीव गांधींना दूरदर्शनवर सतत पाहतात तरीही पाहणाऱ्यांच्या मनात या प्रतिमेची सागंड कुठल्याही विचारसरणीशी किंवा जीवनमूल्यांशी घातली जात नाही.

आधुनिक प्रसारमाध्यमे केवळ क्षणिक बाबीच हाताळतात किंवा क्षणजीवी पद्धतीने हाताळतात एवढेच नाही, तर ती त्या सर्वांचा उत्तमपैकी गोंधळ सादर करतात. एखाद्या पुस्तकाचे एक प्रकरण आणि वृत्तपत्राचे एक पान किंवा दूरदर्शनवरच्या समाचार, बातम्या यांची तुलना करा. पुस्तकातील प्रकरणात एखाद्या विषयाची सखोल मांडणी करता येईल. त्याउलट वृत्तपत्राचे पान किंवा दूरदर्शनच्या बातम्या म्हणजे निव्वळ खिचडी. अगदी पंजाब, ढाका, श्रीलंका, खड्ड्यात पडलेल्या बसेस, एखादी हृद्य हकीकत, संसदेतील गोंधळ, एखादा गौप्यस्फोट सगळ्या गोष्टी कशातरी एकत्र मिसळलेल्या असतात.

दैनंदिन वृत्तपत्रांत फारसे सुसंगत किंवा सगळे असतेच असे नाही. आज घडलेल्या एखाद्या गोष्टीला उद्याच्या वृत्तपत्रांत किती महत्त्व मिळेल हे निव्वळ

थोड्या गोष्टींच्या अंगच्या महत्त्वावर अवलंबून नसते. त्यासोबत इतर कोणत्या कमी-जास्त महत्त्वाच्या घटना रात्री अकरापर्यंत घडणार आहेत, यावर ते अवलंबून राहते. त्यामुळे पंजाबमध्ये काल सहाजणांची हत्या झाली ही बातमी आज पहिल्या पानावर तीन कॉलमसह येऊ शकते. पण आज नऊ लोक ठार झाले त्या बातमीला उद्याच्या अंकात कदाचित पान तीनवर एक कॉलम एवढीही जागा मिळू शकत नाही.

पोस्टमन आणि इतरांनी म्हटल्याप्रमाणे प्रसारमाध्यमांचे स्वरूप असे आहे की, ती प्रतिमा किंवा शब्द नुसता प्रसारित करीत नाही तर पुसूनही टाकतात. आजचे वृत्तपत्र कालच्या बातम्यांची आठवण पुसून टाकते. दूरदर्शनची एक प्रतिमा आधीच्या प्रतिमेला निव्वळ पडद्यावर नव्हे तर प्रेक्षकांच्या मनावरही फिकी करून सोडते.

संपर्क यंत्रणा अधिक प्रगत झाल्यामुळे आज या माध्यमाचे कार्यक्षेत्र भौगोलिकदृष्ट्या विस्तारत चालले आहे. त्यामुळे घटना आणि प्रतिमांच्या दौडीचा वेग अधिक वाढत आहे. साहजिकच त्या पुसल्या जाण्याचा वेगही जास्त आहे. शब्द व प्रतिमांचा अधिक भडीमार झाल्यानंतर आपली स्मरणशक्ती दुबळी ठरली तरी निवळत नाही. हाती घेतलेल्या गोष्टीवर आपण मन एकाग्र करू शकतो त्याचे कारण आपली इंद्रिये आणि आपले मन वगैरे लाख गोष्टींना स्थान देत नाही. आपण वाहन चालवत असतो त्या वेळी समोर, आसपास येणाऱ्या सर्वच गोष्टी पाहत किंवा ऐकत नाही. हीच गोष्ट ज्या गोष्टीबाबत फारसे काही करू शकत नाही त्याबद्दलची.

माहितीचा मारा होऊ लागला तर त्यामुळे हाती घेतलेल्या कामापासून मन विचलित झाल्याखेरीज राहणार नाही. शिवाय अनेकदा असा व्यत्यय आपल्याला हवा असतो. हातातील काम, आपला वेळ निःसंशय मागत असते. आपण आपल्या वागण्यात बदल करावा, असे सुचवीत असते. त्याऐवजी ही सारी माहिती करून घेणे व करमणूक यांची निवड करून घेण्यापासून आपण वंचित राहिलो तर हातातील कामातून सुटका मिळते. सुटका होते खरी, पण आपली उमेद खच्ची होते. कारण निव्वळ माहिती मिळते असे होत नाही. आपल्याशी संबंधित नसलेल्या, आपल्या कक्षेबाहेरच्या नाना गोष्टींची माहिती विचारात इतका अडथळा आणते की, आपल्या भोवतीच्या वातावरणात तातडीने करण्याजोग्या गोष्टी आपण करू शकत नाही.

एक प्रतिमा दुसऱ्याला अस्पष्ट करते व आकडेवारी आधीच्या आकडेवारीचे महत्त्व कमी करते. मग सगळ्या गोष्टी सारख्याच क्षणभंगूर आणि सारख्याच क्षुद्र दिसू लागतात. शिवाय त्या सगळ्या आपल्या कार्यक्षेत्राबाहेरच्या असल्याने असहाय्यतेची भावना निर्माण होते. त्यातून आपण जागीच खिळून राहतो आणि विझून जातो.

खरेच वाचक किंवा प्रेक्षक कसे वैतागून गेलेले असतात, याचा विचार करायला हवा. सकाळी वृत्तपत्र वाचायला वाचकाला जेमतेम पंधरा ते वीस

मिनिटे मिळतात. एकीकडे चहा पिणे, बाहेर जाण्यासाठी तयार होणे, घरगुती कामे उरकणे, बस पकडण्यासाठी बाहेर पडणे चालू असते. त्यातही त्याचे लक्ष वेधून घ्यावे यासाठी वृत्तपत्रे, मासिके, दूरचित्रवाणी यांची धडपड सतत चालू असते. त्यामुळे त्यांना एकसारखे नवे, आकर्षक, वेधक असे काहीतरी शोधत राहावे लागते. अमेरिकन नागरिकांना तेहरानमध्ये ओलिस म्हणून ठेवले जाते. अमेरिकेच्या दृष्टीने ही घटना अतिशय महत्त्वाची. त्यामुळे टाईम आणि न्यूजवीक ही दोन्हीही प्रकाशने ओलिसांची कथा आपापल्या मुखपृष्ठावर झळकवतात. ओलिसांची सुटका होत नाही आणि प्रश्न चिघळतो तेव्हा लागोपाठच्या आठवड्यात पुन्हा ती मुखपृष्ठकथा ठरते. पण ओलिस त्यानंतरही अडकलेले राहिले तर तिसऱ्या आठवड्यानंतर त्यांना मुखपृष्ठावर स्थान देत नाहीत. ते शक्य नसते. मग त्यातले एखादे रॉकी ग्रुपची वर्णी मुखपृष्ठावर लावते, दुसरे काही असेच निवडते.

याचा परिणाम उलट होऊ लागतो. एखादा कॅन्सरचा रोगी डोळ्यासमोर आणा. त्याच्या दृष्टीने तो रोगी म्हणजे सगळ्यात महत्त्वाची गोष्ट. आता त्याच्यासाठी व संबंधी एखादे वृत्तपत्र किंवा मासिक प्रकाशित केले जाणार अशी कल्पना करा. त्यात रोगाची भर पडली. सलग दहा मुखपृष्ठकथा छापणार का ? आणि छापल्या तरीही तो कॅन्सरचा रोग त्या माणसाच्याच दृष्टीने जितका, तितकाच महत्त्वाचा, जीवन-मरणाचा प्रश्न होऊन राहील ? देशाच्या संदर्भात पंजाबची अवस्था अशी बिकट आहे. पण म्हणून पंजाबवर सलग दहा मुखपृष्ठकथा छापता येतील का ?

आज माध्यमांची प्रकाशज्योत पडते ती त्या क्षणावर. आताच्या क्षणी महत्वाच्या असलेल्या घटनेवर. सतत काहीतरी नवीन शोधून काढण्याची निकड त्यांना आहे. या आधुनिक प्रसारमाध्यमांचा झपाटा आणि पसारा इतका जबरदस्त आहे की, वाचक-प्रेक्षक यांचे लक्ष दीर्घकाळ महत्त्वाच्या गोष्टीवर खिळवून ठेवावयाचे म्हटले तर ते शक्य नाही. आणखी एक महत्त्वाची गोष्ट आहे. भारतात माध्यमे फक्त गतिमान होत आहेत एवढेच नव्हे, तर इतर अनेक गोष्टींप्रमाणे तीही उपभोगवाटेच्या लाटेत वाहात चालली आहेत. दूरदर्शनचे प्रतीक काय तर सामान्य माणसाच्या दृष्टीने चित्रहार व जाहिरात. त्यात दूरदर्शनच्या निर्मात्यांचा काही दोष असतो असेही नाही. त्याखेरीज गुळगुळीत, चकचकीत, रंगीत मासिकांची लांबलचक चाळ उभी राहिली आहे. उच्च वृत्तपत्रे दिवसेंदिवस मासिकांसारखी होत चाललेली आहेत. गंभीर विचारप्रक्रियेवर या सगळ्यांचा कसा विपरीत परिणाम होतो ते आता पुन्हा लक्षात घ्या. पंजाबचा प्रश्न हा देशाच्या जीवनमरणाची गोष्ट आहे. आदिवासींमधील वाढती अस्वस्थता तितकीच महत्त्वाची आहे. पण दूरदर्शनवर जेव्हा पंजाबमधील भयानक हत्याकांडाच्या बातम्यांपाठोपाठ जाहिराती किंवा चित्रहार दाखविले जातात, तेव्हा या देशाच्या नागरिकांना गंभीर प्रश्नावर लक्ष केंद्रित करण्यासाठी भान राहणार तरी कसे ?

शेवटी प्रसारमाध्यमे हाच मुळी आजचा विषय बनतो. जीवनाच्या खऱ्याखुऱ्या प्रश्नाबाबत ती काय म्हणतात यापासून त्या माध्यमांतर्गत काय घडते याची चर्चा

होऊ लागते. उत्तर प्रदेशात 'बुनियाद'सारखी दूरदर्शनवरील चित्रमालिका इतर कुठल्याही सभेपेक्षा किंवा कार्यक्रमापेक्षा जास्त लोक आपल्याकडे खेचून घेते. त्यामुळे त्या मालिकेचे आणखी काही भाग प्रसारित करायला हवे होते हाच लोकांच्या चर्चेचा महत्त्वाचा विषय ठरतो. अशा स्थितीत निवडणूक पद्धतीतील सुधारणा यांसारख्या विषयांवर विचारविनिमय होणार तरी कसा ?

## गंभीर विचारप्रक्रियेची पुनर्स्थापना

आपल्या मनाच्या सवयी, नाट्यातील पात्रांची चरित्रे, घटनांचा गरगरता भोवरा, आधुनिक प्रसारमाध्यमांचे स्वरूप, या साऱ्या गोष्टी मिळून बनते त्या परिस्थितीची एक भक्कम भिंत. गोंधळाचे रूपांतर गंभीर विचारविनिमयात करावयाचे तर त्यासाठी नेमके काय करायला हवे ? महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या सामाजिक संस्था आणि यंत्रणांमध्ये अनेक हितसंबंधाचे सुसंवाद साधले जाऊ शकले, त्या पुन्हा सक्रीय केल्या पाहिजे. आणि त्यासाठी निवडणुकीचे राजकारण सुधारले पाहिजे, किंबहूना, आपल्याकडील सार्वजनिक जीवनाचा दर्जा उंचावला पाहिजे. पण ही चर्चा आपल्याला फार दूरवर घेऊन जाईल. आता प्रश्न आहे तो म्हणजे, जेव्हा उल्लेख केलेले मूलभूत उपाय करता येत नसतील तर विचार-विनिमयाच्या क्षेत्रात काय सुधारणा करता येईल ? ध्यानधारणा करणाऱ्या प्रत्येकाला मन:शांती मिळविण्यास पहिली पायरी महत्त्वाची असते. मन:शांती करावयाची आणि सत्याची ओळख करून घ्यावयाची तर प्रथम मनात डोकावून पाहावे लागते, त्याची चांगली ओळख करून घ्यावी लागते. त्याचप्रमाणे गंभीर व सुसंगत विचारप्रक्रियेतील जाणण्याची पहिली पायरी म्हणजे सत्याच्या कोलाहलाचे निरीक्षण करणे, अभ्यास करणे, लोकांचे लक्ष अधिक महत्त्वाच्या बाबीकडे वळविण्याची गरज समजावून घेणे. लोकांनाही ही गरज समाजावून देऊन मग महत्त्वाच्या गोष्टी त्यांच्या मनातून मागे न पडतील, याची खबरदारी घ्यायला हवी. प्रसारमाध्यमांची साथ मिळाली नाही, तरीही हे काम करायला हवे.

वाचक आणि प्रेक्षक यांना माध्यमाकडून आज जे कार्यक्रम, माहिती पुरविली जाते तिचा दर्जा, स्वरूप, आशय व परिणाम यांबाबत जागरूकता निर्माण केली पाहिजे. ते जे वाचतात आणि ऐकतात त्याबद्दल त्यांनी शंका घ्यावी, प्रश्न विचारावेत, तपासणी करावी याची गरज त्यांना पटवून दिली पाहिजे. त्यांच्या स्वत:च्या अनुभवाशी त्या गोष्टी सुसंगत आहेत का ? ते माध्यम किंवा लेख यांच्या पूर्वेतिहासाशी ही गोष्ट जुळते का ? या गोष्टी जोपासल्या गेल्या पाहिजेत. प्रत्येक नव्या राजकीय लाटेबरोबर पक्ष पुरविणारा कोणी विचारवंत असेल तर त्याच्या ताज्या विधानांची चिकित्सा बारकाईने लक्षात घेऊन करायला हवी. वृत्तपत्रांनी अशा महत्त्वाच्या बातम्यांची कात्रणे जपून ठेवायला हवीत. अशा छाननाचा निष्कर्ष त्यांनी आपल्या मित्रांना सांगायला हवा. धर्ममार्तंड आणि विचारवंत सत्य घटना लपवतील, जेव्हा आपली मते बदलतील त्या वेळी त्यांच्या पूर्वीच्या वक्तव्यांची नेमकी उदाहरणे त्यांच्या अंगावर टाकली पाहिजेत. वाचक आणि प्रेक्षक यांना

आपण निवड करायला शिकविले पाहिजे. ते एकाऐवजी दुसरे वृत्तपत्र घेऊ शकतात किंवा प्रसंगी दूरचित्रवाणी संच बंद ठेवू शकतात. आणीबाणीच्या काळात आकाशवाणी जोरजोरात ज्या खोट्यानाट्या गोष्टी ध्वनिक्षेपित करीत असे, त्यामुळे आपण गुरमरून जात आहोत असे वाटे, असा अनुभव कोणी मित्राने मला सांगितला. महत्त्वाचा प्रश्न म्हणजे त्याऐवजी त्यांनी आपला रेडिओ बंद का केला नाही ? त्याचप्रमाणे एखादे वृत्तपत्र तुम्ही निव्वळ रद्दीचे पैसे जास्त मिळतात म्हणून विकत घेणार असाल तर तुमच्या पदरात रद्दीच येईल, हेही लक्षात ठेवायला पाहिजे.

सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाचा प्रश्न प्रसारमाध्यमामार्फत मांडणाऱ्या सर्वांनी आपल्या कृतीमागचा खरा अर्थ वारंवार समजावून सांगितला पाहिजे. उदाहरण द्यावयाचे तर भ्रष्टाचार उघडकीला आणणे यालासुद्धा सिनेपत्रकारितेत अफवाबाजीचे जे स्वरूप येऊ शकते, त्यामुळे मिळेल त्या प्रत्येक संधीचा उपयोग करून आपले लिखाण म्हणजे ताज्या अफवा नव्हे, तर समाजाला लागलेल्या किडीचे दर्शन आहे हे समजावून सांगितले पाहिजे. सोन्याच्या चोरट्या व्यापारातून शस्त्रांचा चोरटा व्यापार जन्म घेत असतो. त्यामुळे पैसा घेऊन चोरटे सोने देशात येऊ द्यायला जे पोलिसदल मदत करीत असते ते एकदम सद्‌गुणी होऊन शस्त्रांची चोरटी आयात थांबवू शकणार नाही आणि दहशतवादाचा माग काढू शकणार नाही हे लोकांना समजावून दिले पाहिजे. प्रश्न मोजकेच हाती घ्यावेत, पण चांगल्या तऱ्हेने हाताळावेत. रोज एक भानगड उघडकीस आणू लागलो तर वाचकाला त्याबद्दल पुढेपुढे काही वाटेनासे होते. सगळ्याच गोष्टींचे वाटोळे झाले आहे असा निष्कर्ष काढून तो स्वस्थ बसतो.

जे निवडक प्रश्न आपण हातात घेणार, त्यांचा पाठपुरावा न कंटाळता, न थकता शेवटपर्यंत केला पाहिजे. समस्यांबद्दल निव्वळ तक्रार, कुरकूर केली तर त्यातून निराशावाद बळावतो. एका प्रश्नाची तड लावण्याऐवजी तुम्ही लगेचच दुसऱ्या प्रश्नाकडे मुसंडी मारली, तर तुमच्या एकूण कामाचे महत्त्व कमी होते. वाचकाला तुमचे प्रत्येक नवे लिखाण म्हणजे जणू एखाद्या दूरचित्रवाणीवरच्या मालिकेचा ताजा भाग आहे, एक चमत्कारिक करमणूक आहे असे वाटू लागते.

याउलट एखाद्या प्रश्नाचा गंभीरपणाने, कल्पकतेने निष्कर्ष निघेपर्यंत पाठपुरावा केला तर ते तुमचे महत्त्वाचे योगदान ठरल्याशिवाय राहत नाही. त्यातून एखाद्या राजकारण्याची हकालपट्टी झाली तरी चर्चेनेच बदल घडविणे शक्य आहे असा विश्वास लोकांना मिळतो. काही थोड्या लोकांनी कंबर कसून प्रयत्न केले, तरी परिवर्तन घडू शकते हा अनुभव दिलासा देणारा असतो. अशी प्रतिष्ठा नसलेला राजकारणी विधिमंडळात बहुमताच्या आधारावर, न्यायप्रक्रियेचा दुरुपयोग करून किंवा माध्यमातील काही मंडळींचा गैरवापर करून जागेवर टिकून राहिला तर परिवर्तनाची प्रक्रिया किती खडतर आहे याची शिकवण लोकांना मिळते. पण हा सारा परिणाम निष्पन्न होण्यासाठी आपले काम अचूक आणि परिपूर्ण असायला हवे. परंतु पुढाऱ्याने वापरलेली प्रत्येक युक्ती आपल्याला लगेचच उघडकीला आणता आली पाहिजे. वस्तुस्थिती, इन्कार करणारे मुद्दे, आयोगाचा अहवाल, लांबलचक

निकालपत्रे, पक्षाचा ठराव- प्रत्येक गोष्टीची कसून तपासणी व्हायला हवी, म्हणजे त्या पुढाऱ्याला किंवा आपल्या वाचकांना निसटण्याची एकही पळवाट शिल्लक राहू नये. एवढे सगळे केल्यानंतरही निव्वळ पाशवी बळाच्या जोरावर असा पुढारी टिकून राहील. मग विधिमंडळातले बहुमत असो, न्यायाधीशांना झुकविण्याची ताकद असो की, शारीरिक बळाचा वापर असो. तर त्यांचे टिकून राहणे हाच आपला महत्त्वाचा मुद्दा बनतो.

एकीकडे या प्रश्नाचा पाठपुरावा करीत असताना, भ्रष्टाचार आणि गैरवर्तन उघडकीला आणित असताना दुसरीकडे मुक्त बहुमुखी लोकशाहीच्या महत्त्वाबद्दलही आपण वारंवार लिहिले पाहिजे. ती संपूर्ण व्यवस्था अधिक लोकाभिमुख करण्याचे एक साधन म्हणजे आपली ही कृती, तीही आपण दाखवून दिली पाहिजे.

गेल्या पन्नास किंवा शंभर वर्षांत लोकशाही पद्धतीतील राजकारण, सार्वजनिक जीवन आणि प्रशासन यांमधील सुधारणा नेमकी याच प्रक्रियेतून घडून आली आहे हे आपण दाखवून दिले पाहिजे. आपण विशिष्ट समस्या किंवा विशिष्ट राज्यकर्ते यांना लक्ष्य बनवितो त्याचे कारण आपण संपूर्ण व्यवस्थेचा विचार सोडून दिला आहे हे नसून, खुली बहुपर्यायी लोकशाही हीच आपली भरभक्कम व्यवस्था हवी याची आपल्याला खात्री पटली आहे, यावर आपण वारंवार भर दिला पाहिजे. अशीच व्यवस्था सुधारायला वाव असतो. हुकूमशाही– मग ती स्टॅलिनची असो, फ्रॅन्कोची असो किंवा खोमेनीची असो, तीमध्ये कोणतीही सुधारणा करायला वावच राहिलेला नसतो.

सध्याच्या स्थितीत आपले कार्य अतिशय जिकिरीचे असल्याने पूर्णाकार व्यवस्थेचे मूल्य आपण वारंवार अधोरेखित केले पाहिजे. काय चुकते आहे यावर आपण एकंदरीत जास्त भर देतो. चुका आणि अन्याय अक्षम्य असतात, हानी अनावश्यक असते आणि त्यांना हद्दपार करण्यासाठी आपण त्यांच्यावर लक्ष केंद्रित करतो. पण तुम्ही सतत एका चुकीच्या गोष्टीवरून दुसऱ्या चुकीच्या गोष्टीकडे धावत राहिलात तर त्यातून वाचकांच्या पदरी निराशा येते. सगळ्याच गोष्टी सडून गेल्या आहेत, सगळीकडेच सावळा गोंधळ आहे, हे कधीच सुधारणार नाही. कशाचाच काही उपयोग नाही, अशी हताश भावना निर्माण होते. त्यातूनच मिळेल ते लचके तोडा अशी दुष्प्रवृत्ती फैलावते. यातून समस्या अधिक गुंतागुंतीची होते. त्यामुळे सामान्य माणसेही शॉर्टकट्‌ शोधून काढायला प्रवृत्त होतात.

संपूर्ण व्यवस्थेचा मेळ स्पष्ट करून ती व्यवस्था सुरळित चालावी यासाठी पाळावयाचे निकष आपण लोकांना पटवून दिले पाहिजेत. सर्व उद्दिष्टे व ध्येये सारखीच हवीशी वाटत असतील, तर प्रत्येक क्षणाला आणि परिस्थितीत ती सर्व एकत्र नांदू शकत नाहीत, व्यक्ती आणि समूहांना त्यातून निवड करावी लागते किंवा काही ध्येये साध्य करण्यासाठी इतर काही लांबणीवर टाकावी लागतात, ही गोष्ट आपल्या नागरिक बंधू-भगिनींना पटवून देण्यासाठी, आज करतो त्यापेक्षा अधिक परिश्रम आपण केले पाहिजे. आणखी काही गोष्टी लोकांना पटवायला हव्यात. आपल्यापैकी प्रत्येकाने प्रत्येक वेळी विजय मिळालाच पाहिजे अशीच

ईर्षा धरली तर बहुमुखी, बहुपर्यायी समाजव्यवस्था जिवंत राहू शकणार नाही. प्रत्येकाला काही वेळा विजय तर काही वेळा पराभव हे अशा समाजव्यवस्थेचे सार आहे. आपण सर्वांनी काही नियम पाळावयाचे ठरविले, घटनात्मक व कायदेशीर साधने आणि शांततामय मार्ग यांचाच फक्त वापर करावयाचा ठरविला तरी ही व्यवस्था टिकून राहील. वैध मार्गाने प्रश्न सुटत नाही म्हणून प्रत्येकजण कायदा हातात घेऊ लागला, तर ते चालणार नाही. त्याऐवजी ज्यांच्यामुळे प्रश्न सुटत नाही त्यांना पर्याय शोधण्याची कार्यवाही सर्वांनी एकत्र येऊन करायला हवी. केवळ राजकीय नेत्यांचीच छाननी करून आपण थांबावे असे नाही. कामगार पुढारी आपल्या संघटनेचा बाजारू धंदा करीत असतील, हिंसेचा आसरा घेत असतील, नुकतेच सर्वोच्च न्यायालयात घडले त्याप्रमाणे वकील मंडळीच मतपेट्या पळवून आपल्या सहकाऱ्यांना मतदान करू देत नसतील, तेव्हा त्यांच्यावरही आपण गैर वागणाऱ्या कार्यकर्त्यांइतकी कडक टीका केली पाहिजे. आज आपणही कर्तव्याकडे दुर्लक्ष करतो. संप किंवा चळवळ घडवून आणणाऱ्यांचे वागणे नेहमी बरोबर असते असे आपण धरून चालतो. अशा पद्धतीने आपण काही निवडक वेळी मौन पाळू लागलो तर लोकशाहीची ध्येये आणि आपली विश्वासार्हता या दोन्हींची आपण हानी केल्यासारखे होईल.

## भलेपणाची वकिली

आज विचारविनिमयाचा फक्त केंद्रबिंदू बदलण्याची गरज आहे असे नव्हे, तर त्यात सहभागी होणाऱ्यांचे वर्तुळही प्रशस्त आणि विविधतापूर्ण बनविण्याची आवश्यकता आहे. आज विचारविनिमयाच्या नावाखाली जे काही खपविले जाते त्यात राजकारणी आणि व्यावसायिक पत्रकार यांचे भाषण आणि लिखाणाचे वर्चस्व जास्त असते. आणीबाणीसारख्या काळात शब्द हीच कृती असू शकते. पण एरव्ही अनेकदा शब्द निव्वळ सुकलेल्या पालापाचोळ्यासारखे निरर्थक ठरतात. आज तसेच झाले आहे. आज गरज आहे ती विचारविनिमयाच्या प्रांतात शब्द जुळवणाऱ्यांखेरीज इतरांना प्रवेश देण्याची. लोकसेवा करणाऱ्यांचे म्हणणे आपण ऐकावे आणि त्यांचे विचार प्रसारित करावेत, याची गरज आहे. बाबा आमटे यांची पंजाबयात्रा त्या दृष्टीने स्वागतार्ह आहे. 'ते पंजाबामध्ये गेले आणि तुम्ही त्याला खूप प्रसिद्धी दिली. शेवटी त्यातून काय साध्य झाले ?' असा प्रश्न अनेकजण विचारतात. पण फारसे साध्य झाले नसले तरी त्याचे कारण एकच बाबा आमटे तेथे गेले हे आहे. शंभर बाबा आमटे हजार वेळा तेथे गेले असते तर परिस्थितीत निश्चितपणे फरक पडला असता याबद्दल शंका वाटत नाही.

कोणी म्हणतात, 'ही माणसे सज्जन आहेत. मी त्यांना संत म्हणायला तयार आहे. पण कायदा, प्रशासन, पोलिसयंत्रणा यांबद्दल त्यांना काय माहिती असणार ? कुठलाही तज्ज्ञ आपल्या क्षेत्राबाहेर पडला म्हणजे तो हौशी प्रवासी ठरणार.' यावर प्रतिप्रश्न म्हणजे या गोष्टीबद्दल धंदेवाईक राजकारणी किंवा पत्रकार यांना तरी कुठे माहीत असते ? दुसरी गोष्ट म्हणजे तज्ज्ञसुद्धा लौकरच चाकोरीत

अडकतात. त्याउलट अनेक दशकांची सेवा करण्यात ज्यांचा दृष्टिकोन घडला आहे अशी माणसेच कदाचित चाकोरीबाहेरचा, द्रष्टेपणाची बीजे असलेला प्रस्ताव देऊ शकतील. तज्ज्ञांच्या डोळ्यांवर काही वेळा नियमबद्धतेचा पडदा येतो, तसा तो या माणसांच्या दृष्टीवर असणार नाही.

त्यामुळे चांगले काम करणाऱ्या या स्त्री-पुरुषांना मी अशी आग्रहाची विनंती करीन की, त्यांच्या महान कार्यातून त्यांनी थोडा वेळ द्यावा वा, आज आपल्या देशाला भेडसावणाऱ्या समस्यांचा विचार करावा आणि त्याबाबत मोकळेपणाने बोलावे. वृत्तपत्रांनी त्यांच्या मताला ठळकपणे प्रसिद्धी द्यावी, असे मला वाटत राहील. अशी मते परंपरा सोडत असली, तरी ती देशभर प्रसृत करायला हवीत.

चांगल्या लोकांनी केवळ बोलून थांबू नये. त्यांनी एकमेकांच्या बाजूने उभे राहायला हवे. ते करीत असलेले काम समाजातल्या बलाढ्य व्यक्तीचा पाया उखडणारे असते. गावातला सावकार, जंगल कंत्राटदार, दारू विकणारे यांच्यापासून तो त्यांच्या आधारावर मोठ्या झालेल्या मंडळींच्या सामर्थ्याला त्यातून हादरा बसतो. त्यामुळे असे हितसंबंधी वर्ग विधायक कार्याच्या विरोधात उभे राहतात. तथापी असे कार्यकर्ते, आपली सत्कृत्ये घडून गेलेली असल्यामुळे आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना तसेच निष्ठावंत कार्यकर्त्याला अशा दुर्जनांचा त्रास होत असेल तर त्याविरुद्ध आवाज उठवत नाहीत. त्यामुळे दुर्जन माणसे एका-एका कार्यकर्त्याला अलग पाडून टिपतात. त्यामुळे अतिशय महत्त्वाच्या कामाची हानी होते, राष्ट्राचे रत्न म्हणावे अशा कार्यकर्त्यांना उपद्रव होतो, पण एवढेच नव्हे तर निःस्वार्थ सेवेच्या परंपरेलाच तडाखा बसतो. हे टाळण्यासाठी अशा विधायक कार्यकर्त्यांनी एकमेकांच्या बाजूने उभे राहणे हासुद्धा सत्कार्याचाच एक भाग समजायला पाहिजे.

अशा स्त्री-पुरुषांनी एकत्र येऊन पन्नासेक व्यक्तींचा गट बनविला पाहिजे, कारण त्यामुळे त्यांचा आवाज देशाला अधिक स्पष्टपणाने ऐकू येईल. अशा घटनांचे यश चार गोष्टींवर अवलंबून राहील...

एक : प्रारंभी सदस्यांनी निवड अतिशय काळजीपूर्वक केली पाहिजे. दोन : प्रश्नावर विचारपूर्वक मत बनविता यावे यासाठी माहितीची गरज भासेल. संशोधनाद्वारे माहिती देणाऱ्या एका कार्यक्षम सचिवालयाची मदत अशा गटाला मिळावी. तीन : गटाची बैठक होऊन सविस्तर चर्चा व्हावी यासाठी आवश्यक त्या वेळी साधने द्यावीत. चार : या पन्नास सभासदांचा राहण्याचा आणि प्रवासाचा खर्च आणि सचिवालयाचा खर्च यासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा. अशा प्रकल्पासाठी दूरदृष्टी असलेली उदार माणसे, लोकहिताची कळकळ असलेली वृत्तपत्रसंस्था आणि विधायक कार्यकर्ते यांनी एकत्र सहयोगाने काम केले तर फारच उत्तम होईल. अर्थात अशा गटाने जरूर त्या सुविधा पुरविल्यानंतर मात्र त्यांचे पुरस्कर्ते त्यांच्या कामात हस्तक्षेप करणार नाहीत. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फन्डामेंटल रीसर्च या संस्थेला टाटा उद्योग समूहापासून स्वतंत्र व मुक्त ठेवण्यात आले आहे, तशी ही व्यवस्था असावी. अशा गटातील सदस्यांनी नियमितपणे बैठका घेणे, त्यासाठी कसोशीने तयारी करणे आणि त्यांचा पाठपुरावा करणे ही शिस्त पाळावी लागेल.

भूतकाळात अशा तऱ्हेचे जे प्रयत्न झाले त्यांचा इतिहास पाहिला तर या माफक अपेक्षासुद्धा अवाजवी वाटू लागतात. परंतु तरीही त्यांची पूर्तता झाली तर गंभीर विचारप्रक्रियेची पुनर्स्थापना करण्याच्याच दिशेने उत्तम पावले टाकली जातील, याची मला खात्री वाटते, आज या देशाला सदसद्विवेक बुद्धीची गरज आहे. अशा तऱ्हेचे गट विचारपूर्वक राष्ट्रीय प्रस्ताव मांडू शकतील आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नावर अशा प्रस्तावाच्या आधारे लोक विचारविनिमयाला सुरुवात करू शकतील.

## नवा चरखा

अशा विधायक कार्यकर्त्या स्त्री-पुरुषांचे विचार प्रकाशात आणणे ही सार्वजनिक चर्चेमध्ये चांगला आशय भरण्याची पहिली पायरी ठरेल. त्यानंतर येते ती सामाजिक कृती. निर्विवाद संशयवाद, असाहाय्यता यांचे सावट दूर होऊ शकेल ते प्रत्यक्ष कृतीनेच. शक्य झाले तर इतरांबरोबर, गरज पडली तर एकट्याने. गांधींनी कार्याला सुरुवात करताना सार्वजनिक हितासाठी प्रत्येकजण आपल्या सर्वस्वाचा त्याग करणार नाही याची जाणीव ठेवली होती. आपल्या सहकाऱ्यांनी राष्ट्रीय कार्यात स्वतःला पूर्णपणे झोकून द्यावे अशी मागणी त्यांनी जरूर केली, पण त्याचबरोबर भरपूर विविधता असलेले कार्यक्रम त्यांच्यासमोर ठेवले. एखाद्या माणसाची किती त्याग करावयाची तयारी आहे त्यानुसार त्याला कार्य निवडता येत होते. कोणतेही कार्य निवडले तरी आपण राष्ट्रीय चळवळीचे एक अंग आहोत याची समज त्याला मिळत होती. सूतकताईबद्दल अनेक गोष्टी सांगता येतील. त्यातून सामान्यापासून मनःशांतीपर्यंत अनेक गोष्टी साध्य करता येतील, असे गांधीजींना दिसले. या कामाचा महत्त्वाचा गुण म्हणजे ब्रिटिशविरोधी लढ्यात जे रस्त्यावर येऊ शकत नव्हते, सर्वस्वावर पाणी सोडून धीराने जाऊ शकत नव्हते असे लोकही घरी बसून चरखा फिरवून राष्ट्रीय चळवळीत सहभागी झाल्याचा आनंद मिळवू शकत असत.

वर उल्लेख केलेल्या गटाचे कार्य एकदा चालू झाले, त्यातून विचारांचे जाळे विणले गेले, म्हणजे अशा तऱ्हेचा काहीतरी उपक्रम ते आपल्याला देतील अशी आशा मला वाटते. महत्त्वाची शिफारस म्हणजे सार्वजनिक स्वच्छतेचे काम. सध्याच्या संदर्भात त्याच्या अनेक बाजू आहेत, हे गांधीजींना पटले असते.

* त्याला फारसे भांडवल लागत नाही
* समाजातल्या कमीत कमी लोकांशी संबंध येईल असे हे काम आहे
* आज हे काम करण्याची गरज आहे
* या कामात योग्य ती प्रतिकात्मकता आहे– आपले ध्येय आपल्या भोवतीचे संपूर्ण वातावरण स्वच्छ करण्याचे आहे. त्यासाठी आसपासचा परिसर साफ करण्याइतकी दुसरी चांगली सुरुवात कोणती असणारा ?
* या कामात कोणाशी संघर्ष ओढवण्याची धास्ती नाही.
* आपल्या काही अगदी असाध्य, अंगवळणी पडलेल्या सवयींकडे या कार्याचा रोख राहील. आपण स्वतः रोज आंघोळ करतो पण सार्वजनिक ठिकाणी

थुंकायला कचरत नाही. आपले घर झाडून साफ करतो पण तो कचरा रस्त्यावर फेकून देतो.

* या कामाचा परिणाम तावडतोब उघडपणे दिसून येणारा आहे.

* हे काम दररोज करावे लागते असे आहे. सार्वजनिक जीवन सुधारण्यासाठी अशा नियमित कृतीची आपल्याला गरज आहे.

* चार लोकांबरोबर मिळून मिसळून केले तर ते काम अधिक चांगले होते. म्हणजेच सामूहिक भावना पुन्हा निर्माण करणारे. शेजारधर्म जागविणारे हे काम आहे आणि तरीही ते एकटा माणूस सुरू करू शकतो. पुन्हा गरज पडल्यास एकट्याने पुढे नेऊ शकतो.

* तंत्रज्ञान बदलले तरी हे काम कालबाह्य होत नाही.

* जमा झालेला कचरा खतनिर्मितीपासून घरबांधणीपर्यंत अनेक चांगल्या कामांसाठी वापरता येतो.

## निष्कर्ष

अशा तऱ्हेने विचारविनिमयाचा केंद्रबिंदू बदलला पाहिजे. विशेषतः संपूर्ण व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित केले पाहिजे. संपूर्ण व्यवस्था चांगल्या तऱ्हेने चालावी यासाठी आपल्यापैकी प्रत्येकाने काय करायला हवे यावर भर दिला पाहिजे. लोकसेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांना देशातील सार्वजनिक विचारप्रक्रियेतही मध्यवर्ती स्थान दिले पाहिजे. आज देशात चालू असलेल्या सार्वजनिक कोलाहलाची वैशिष्ट्ये मी प्रारंभी स्पष्ट केली होती, ती लक्षात घेऊन आणि चांगल्या लोकांतही विचारविनिमय होऊ शकतो याची कारणे लक्षात घेऊन शेवटी मी 'हंगामीपणाचा' आग्रह धरीन. सेवाकार्य आणि संघर्ष यांसाठी अनेकदा पुढारलेल्या दृष्टीची गरज लागते. संशय आणि शंकांचे पडसाद ऐकण्याची बंदी करावी लागते आणि ऐकणेच थांबवावे लागते. मग उडी, उंच झेप घेता येते. हिशोबी वृत्ती, तर्कनिष्ठा यांना बाजूला ठेवून चिकाटीने प्रवाहाविरुद्ध हात मारत राहावे लागते. पण आत्मविश्वासाच्या तळमळीचे रूपांतर चिरेबंदी हट्टीपणात होऊ शकते, मग मात्र त्यातून कार्यहानी होते.

हे तर खरेच की, एखाद्या तत्त्वासाठी किंवा कार्यासाठी सर्वस्व झोकून देणारे लोक अधिक दृढनिश्चयी असतात. किंबहुना मनाचा निर्धार करण्याच्या या अपेक्षेमुळे ते चिकाटीने काम करू शकतात. आपण करीत असलेले काम चांगले तर आहे. पण तेच जगातले सगळ्यात चांगले काम असते. विश्वासाने भारून जाण्याच्या त्यांच्या क्षमतेमुळे ते उद्दिष्टांचा अखंड पाठलाग करू शकतात. मनोनिग्रह ही त्याची गरज असते. पण याचीच दुसरी बाजू म्हणजे आपल्या कार्याव्यतिरिक्त इतर कोणतेही काम निष्फल करणाऱ्या व्यक्तींकडे दुर्लक्ष होऊ शकते. आपल्याला जी समस्या महत्त्वाची वाटते तिच्याखेरीज इतर कोणताही प्रश्न घेऊन उभ्या राहणाऱ्या माणसाचा त्यामागे काहीतरी अंतःस्थ हेतू असतो असा संशय घेण्याची प्रवृत्ती या निश्चितपणातून बळावू शकते. चांगल्या माणसांना यासाठीच

थोड्या अनिश्चितपणाची गरज असते. कमालीची भावनाशीलता आणि निश्चितपणाचा परिणाम काय होतो ते पाहिले म्हणजे आपल्याला याची गरज पटेल.

काल्पनिक स्वर्गसुखाची चर्चा करताना वितंडवाद झाला आणि आपल्यातच किंवा आपल्या मित्रांत किंवा सहकाऱ्यांत दुरावा निर्माण झाला असेही कित्येक वेळा घडते. डाव्या विचारसरणीच्या कार्यकर्त्यांत स्टालीन, माओ, लिन पियाओ अशा एकएका व्यक्तींची मूल्यमापनावरून फूट पडलेली आहे. रशियातील सामुदायिक शेती आणि चीनमधील कम्युनचा प्रयोग यांच्यावरून गट-तट पडले आहेत. नवा माणूस घडविण्यासाठी स्टालीनने केलेला प्रयोग आणि माओची सांस्कृतिक क्रांती यांवरून घनिष्ट मित्रांत वितुष्ट आल्याची उदाहरणे आहेत आणि शेवटी या प्रयोगावरून काय निष्पन्न झाले ? अशा प्रश्नावरून मित्रांनी शत्रू बनून एकमेकांवर तुटून पडणे योग्य होते का ? सुरुवात करण्याचा हा एक व्यावहारिक रस्ता आहे. एखाद्या युक्तिवादाला वाईट हेतूने लेबल डकवून मनाची दारे बंद करू नका. तो तर्क मांडणाऱ्या माणसाला संशयाची चिठ्ठी चिकटवून बाजूला सारू नका. हेतूंनाही महत्त्व असते, जरूर असते; पण युक्तिवादाची दखल त्यांच्या गुणवत्तेवर घेतली पाहिजे. कारण एखाद्या वस्तुस्थितीला चांगले आणि वाईट असे दोन्हीही हेतू चिकटविणे शक्य असते. दुसरीकडे हेतू चांगलाच असला तरीही त्याआधारे केलेल्या युक्तिवादातून किंवा कृतीतून चांगलेच ध्येय घेतले जाईल याची खात्री नसते. आणखी एक बाजू म्हणजे एखाद्या दुष्ट माणसाने मांडलेले मत हासुद्धा आपल्याला इशारा ठरू शकतो.

दुरून साजरे दिसणारे स्वर्गसुख किंवा मनातील हेतू यांबद्दलची व्यवस्था नेहमीच माहीत असते असे नाही. शिवाय प्रत्येक मोठ्या निर्णयात निव्वळ तार्किक विचारांच्या पलिकडची अशी काही बाजू असते. पहिल्या महायुद्धाच्या काळात गांधीजींनी ब्रिटिश सैन्यासाठी लष्करभरतीसाठी प्रचार केला, हे योग्य झाले का ? खिलाफतीचा प्रश्न उचलून धरण्याची त्यांची कृती बरोबर होती का ? काँग्रेसच्या मंत्रिमंडळाने १९३९ मध्ये राजीनामे देऊन जिनांना मैदान मोकळे करून दिले हे योग्य झाले का ? कॅबिनेट शिष्टमंडळ योजनेतून काही निष्पन्न होऊ शकले असते का ? पंजाब चर्चा केली पाहिजे ?

तर्कशुद्ध विचार करणाऱ्या व्यक्तींच्या मनात या मोठ्या निर्णयांच्या योग्य-योग्यतेच्या बाबतीत फरक पडण्याची शक्यता आहे. या उद्दिष्टांतून आपल्याला जो मार्ग योग्य दिसेल त्याचा आग्रह आपण धरावा. उत्साहाने आणि कळकळीने धरावा. पण म्हणून तिसऱ्याचे मत दडपून टाकण्याचा प्रयत्न करणे योग्य नाही. आपल्यापेक्षा वेगळे मत मांडणाऱ्या व्यक्तीला बदनाम करणे तर मुळीच योग्य नाही. अनेकदा असे होते की, भूतकाळातल्या आपल्या आवाजांकडे आपण मागे वळून पाहतो किंवा आपल्याला कवीचे शब्द आठवतात.

All We have gained then by our unbelief
Is a life diversified by faith,
For one of faith diversified by doubt
We called the chess-board white we call it back

# व्यवसाय

## ८. सावळ्या गोंधळाचे गोंधळी

टीका आणि टीकाकार यांची गरज असते हे निश्चित. काही वेळा तर गांधीजींनी एकदा म्हटले आहे त्याप्रमाणे व्यक्तीला दुरितांपासून परावृत्त करण्यासाठी कडक शब्द वापरावे लागतात. कुमार्गी व्यक्तींपासून इतरांना दूर ठेवण्यास आणि त्यांच्या दुष्कृत्यात इतरांनी सहभागी होऊ नये म्हणूनही कठोर शब्द वापरावे लागतात.

परंतु यातून होते असे की, समाजातील अनेकांना इतरांमधील वाईट तेवढेच हुडकून काढण्याची सवयच लागते. कुठल्याही परिस्थितीत त्यांना दिसू लागतात ती आणखी बिघडण्याची, हताश होण्याची लक्षणे. चीनचे नेते माओ यांनी अशा लोकांचे वर्णन 'गोंधळ्यांची जमात' असे केले होते. 'सावळ्या गोंधळाचे गोंधळी' नेहमी विव्हळत, तक्रार करीत असतात. इकडे-तिकडे चोहीकडे गोंधळ माजला आहे, प्रत्येक गोष्ट साफ चुकलेली आहे, असे त्यांचे रडगाणे असते. एखाद्याची प्रशंसा करणे, एखाद्या परिस्थितीतील सामर्थ्याचे बीज शोधणे अशा गोष्टींबाबत हे गोंधळी संशयग्रस्त तर असतातच, पण त्यांना ते आवडतही नाही. सगळीकडेच वाईट बघण्याच्या सवयीला त्यामुळे धक्का बसतो आणि अस्वस्थ वाटते. एखाद्याने दुसऱ्याचे कौतुक केले किंवा परिस्थितीची बलस्थाने दाखविली तर तो विकला गेला आहे, कमकुवत झाला आहे असे आपल्याला वाटू लागते.

या गोंधळी सवयीमागे ज्या अनेक गोष्टी असतात त्यांमधील एक म्हणजे मानसिक आळशीपणा. सरकारने उद्योगांवरील नियंत्रण कायम ठेवले, तर विशिष्ट उद्योगपतीला खुल्या स्पर्धेपासून संरक्षण दिल्याबद्दल आपण सरकारवर टीका करतो. नियंत्रित परिस्थितीचा फायदा करून घेण्याची सरकारची इच्छा आहे, अशी दूषणे देतो. दुसरीकडे सरकारने नियंत्रण शिथिल केले, तर सरकार उद्योगपतींना शरण गेले आणि समतेचा त्याग केला असा टीकेचा भडिमार केला जातो. आजारी गिरण्या सरकारने घेतल्या तर सरकार वाईट, कारण अनीतिमान धंदेवाइकांनी अगोदर भरपूर नागावलेले भाकड धंदे सरकार आपल्या गळ्यात बांधून घेत आहे. पण अशा गिरण्या ताब्यात न घेता सरकारने मरू दिल्या तर कामगारांच्या हलाखीबाबत निष्काळजी राहिल्याबद्दल आपण सरकारला धारेवर धरतो. यातून स्पष्ट दिसते ते एखाद्या समजाचा आरपार विचार करण्यासाठी आपण कष्ट घेत नाही. दोन किंवा अधिक परस्परविरोधी किंवा परस्पर स्पर्धक समोर आले तर योग्य निवड विचारपूर्वक करण्याची तसदी आपण स्वतःला देत नाही. कायमस्वरूपी तत्त्वनिष्ठ

टीकाकार होणे फार सोपे आहे, कठोर शब्द, नंतर अतिशय कठोर शब्द अशा क्रमाक्रमाने टीका करीत जाणे फार सोपे आहे.

## परिणाम

या सवयीच्या परिणामांचा अंदाज सहज करता येईल. सुरुवातीलाच जाणवणारा परिणाम हा 'गोंधळ्या टीकाकारांच्या' मनावर होत असतो. दुसऱ्याचे दोषच हुडकून काढणे ज्याला जमते, प्रत्येक परिस्थितीत विनाशाच्या खुणा शोधण्याची सवय ज्याला लागते, त्याचे दुःखच मानसिक क्लेशात बरोबर पडते. ही सवय अगदी जीवनाचे एक अंगच होऊ शकते आणि तितक्या वेळा आलेले नसले तरी सुद्धा पूर्णवेळ टीका करण्याचा उद्योग करणारी माणसे असुरक्षित, परावलंबी बनतात. परावलंबित्व अशा अर्थाने की, ज्यावर टीकास्त्र सोडावयाचे त्या व्यक्तीची परिस्थिती हाच टीकाकाराच्या जीवनाचा हेतू, आधार बनून जातो आणि असुरक्षिततेचे कारण म्हणजे टीका आपल्यावरच उलटण्याची भीती. सतत टीका होणारा एखादा माणूस केव्हाही वळून विचारू शकतो, "महाशय, हा राग कसा गावा याबद्दल तुम्हाला एवढे सगळे माहीत आहे, तरीही तुम्ही स्वतःच तो गात का नाही ?" त्याखेरीज एखाद्या दिवशी टीका ऐकणाराच पाठ फिरवून निघून जाईल आणि आयुष्यात पोकळी निर्माण होईल, ही भीती असते.

ह्या सावळ्या गोंधळाने आपल्याला सपशेल चुकीच्या मार्गाने नेले, आजपर्यंत किती वेळा आपण महाप्रलयाचे भविष्य वर्तविले आणि प्रत्यक्ष किती वेळा प्रलय झाला ? किती वेळा आपल्याला साफ मोडीत काढलेले लोक सतूपक्षाच्या बाजूने ठाम उभे राहिले ?

प्रत्येक वेळी बहुतेक दुसऱ्यांमधील उणिवा आणि प्रत्येकाच्या अडचणी एवढेच आपल्या नजरेला येऊ लागला तर आपणच लवकर खचून जाण्याची खूप शक्यता असते. कोणत्याही परिस्थितीत ती सुधारण्यासाठी काहीतरी करण्याची शक्ती शिल्लक असते. खचून गेल्यामुळे अशा उपाययोजना आपण करू शकत नाही आणि इतरांना करण्याची प्रेरणा देऊ शकत नाही. काही व्यक्तींची स्वतःची वागणूक अगदी आदर्श असते, जनहितासाठी त्यांनी स्वतःला वाहून घेतलेले असते. पण टीका गिरविण्याच्या आणि दोष काढण्याच्या या सवयीमुळेच लौकरच आपण वगळता प्रत्येकजण स्वार्थापोटी लागलेला बदमाष आहे अशी त्यांची खात्री पटते, साहजिकच आपण अगदीच एकाकी, दुष्टांनी घेरले गेलेलो आहोत अशी त्यांची कल्पना होऊ लागते. यातूनच आदर्श व्यवहाराला शत्रू मानण्याकडे त्याची प्रवृत्ती होते. एकदाची बैठक सुरू होते न होते तोच कोणीतरी उठून जाहीर करतो, "या सगळ्या गोष्टी निव्वळ उच्चभ्रू अभिजन वर्गासाठी आहेत. आपण हा संदेश सामान्य जनापर्यंत नेला पाहिजे. चळवळी आणि उपक्रम खेड्यामध्ये नेले पाहिजेत !" अशा भावूक, प्रक्षोभक टीकेमुळे इतरही भडकून उठतात. "तुमचा कोणी हात धरला आहे ? तुमच्या का नाही खेड्यात चळवळी उभारल्या जात ?" शब्दाने शब्द आणि वादाने वाद वाढतात. संघर्ष फुटतात आणि चालू शिष्ट समाजाच्या

मध्यम वर्गाला प्रवृत्त करून जे काही थोडेसे काम झाले असते तेसुद्धा होत नाही.

लवकरच या सावळ्या गोंधळ्यांच्या वाट्याला सार्वजनिक दुर्लक्ष येते. उदा. वृत्तपत्रातून दररोज काय चुकते आहे तेवढे सांगावे याला आजचा वाचक कंटाळला आहे. काय चुकले आहे, ते खरे म्हणजे त्याला स्वतःच्या दैनंदिन अनुभवातून माहीत होत असते. त्यांचा प्रश्न होतो ते म्हणजे, चूक सुधारण्यासाठी काय करायला हवे ? आणि त्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही स्वतः त्याबाबत काय करणार आहात ? सामान्य वाचकांना या प्रश्नाची उत्तरे हवी आहेत. वृत्तपत्रे उत्तरे शोधण्यात मदत करू शकत नसतील तर लोक कालांतराने वृत्तपत्राकडे साफ दुर्लक्ष करतील.

अशा गोंधळाने काय केले ? समाजाचे लक्ष वेधून घेतले, तरी वाईट तेवढे पाहण्याच्या त्यांच्या उद्योगाचा समाजाला उपद्रव झाल्यावाचूत राहात नाही. एकतर अशा दोष-दर्शनालाही नियम लागू होतात, दोषदर्शन वाईट पद्धतीने केले तर त्यातून सद्‌गुण उठून दिसतात. दुसरे म्हणजे अशा उद्योगामुळे ऱ्हासप्रक्रिया गतिमान होत असतात. आज आपण इतरांचे दोष दाखविण्यात आनंद मानतो. उद्या काम करण्यासाठी अधिक कठोर शब्द वापरावे लागतील. परवाच्या दिवशी मग शिव्याबाजी करण्यावरच उतरावे लागेल. त्याचे उदाहरण म्हणजे शोधपत्रिका. या नावाखाली अफवा पिकविण्याचा, चारित्र्यहननाचा उद्योग चाललेला आहे. जास्त महत्त्वाचे म्हणजे निव्वळ दोष काढण्याच्या सवयीमुळे लोकांना बैठकीत तक्रार नी कुरकूर करण्याची, विव्हळत राहण्याची सवय लागते. शेवटी त्यामुळे समाज दुबळा होत जातो. किरकीर करण्यापलिकडे कुणाचीच मजल जात नाही. शेवटी सगळा समाजच जर सडला आणि त्याचे वाटोळेच होणार असेल तर मग आपण एखादी छोटी चोरी करायला काय हरकत आहे असे अनेकांना वाटू लागते. निव्वळ टीका करण्याचे सोडून देण्यासाठी, दोष शोधण्याचे उद्योग थांबविण्यासाठी एवढी सगळी कारणे पुरेशी आहेत. पण आणखी एक कारण; या सवयीला वास्तवाचा कसलाही आधार नाही.

## जीवनातील वास्तवता

वाइटातून चांगले निर्माण होते, हानी-नुकसानीतून एखादा फायदा निष्पन्न होतो आणि पीछेहाट झाली तरी त्यातून पुढे प्रगती होऊ शकते, अशी उदाहरणे आपण नेहमीच पाहतो. आपल्या एखाद्या मित्राला हृदयविकाराचा लहानसा झटका येतो, त्यामुळे तो आपल्या जीवनपद्धतीची फेररचना करतो आणि मोठा प्राणघातक झटका टाळण्यात यशस्वी होतो. एखाद्या मित्राच्या कारकीर्दीच्या प्रगतीचा मार्ग एकाएकी खुंटतो, तो विजनवासात ढकलला जातो आणि मग त्यातूनच त्याला नवा रस्ता मिळतो. अशाच प्रकारे चांगल्याची अधोगती होऊन वाइटात रूपांतर झालेल्यांची उदाहरणे दिसतात. एखाद्या व्यक्तीच्या स्वभावाच्या बलस्थानाचे रूपांतर मर्मस्थानी होत असते असे दृष्य दिसते. एखाद्या ठिकाणी त्रासदायक वाटणारी

गोष्ट तिला योग्य अशा ठिकाणी सुखद वाटू शकते. वाळू डोळ्यात गेली तर उपद्रव होतो, पण तीच समुद्रकिनाऱ्यावर डोळ्यांना सुखावते, अग्नी तळहातावर घेतला तर भाजते, पण तोच शेकोटीमध्ये पेटला की ऊब देतो. अमर्याद घेतले तर विष आणि मर्यादित घेतले तर उतारा अशी द्रव्येही दिसतात.

तेव्हा यातील अंतरे अगदी सूक्ष्म आणि तात्पुरती असतात. शिवाय बहुसंख्य व्यक्ती आणि परिस्थितीच्या संदर्भात बऱ्याचशा गोष्टींबाबत चांगले आणि वाईट या दोन्ही शक्यता असतात. त्यामुळे निवड करण्याची संधी नेहमीच असते. एखाद्या व्यक्तीमधील किंवा परिस्थितीमधील, वस्तूमधील दुर्गुण असतील त्याबद्दल तक्रार करणे आपण पत्करू तेव्हा त्यामध्ये सद्गुणांचा विकास व्हावा यासाठी मदत करू शकतो. निदान त्याऐवजी काही बरी गोष्ट असेल त्याचा फायदा आपल्या भल्यासाठी व्हावा असा प्रयत्न तर नक्कीच करू शकू. अशा तऱ्हेच्या विचारांचे लोक आपल्याला भेटले तर आपला मार्ग कसा बदलायला हवा हे लक्षात येईल.

एक : आपले निरीक्षण, विश्लेषण आणि भाष्य यांची उद्दिष्टे असली पाहिजे, ती म्हणजे काय करायला हवे ते शोधून काढणे. विशेषत: आपण आणि आपले सहकारी यांना करण्यायोग्य गोष्टींचा शोध घेणे. अनेक भयावह बुद्धिमंतांचा रोख असतो तो इतरांचे मूल्यमापन करावे आणि आपल्या वागण्यात बदल करण्याऐवजी इतरांचा पंचनामा आणि न्यायनिवाडा करावा असा असतो. आपला मार्ग नेमका विरुद्ध असायला हवा. आपण स्वत: काय करायला हवे, आपली वागणूक कशी सुधारायला हवी याची काळजी प्रथम घेतली पाहिजे. दुसरीकडे त्या घडामोडींवर भाष्य करणाऱ्या लेखकांची जबाबदारी म्हणजे एखाद्या समस्येचे विश्लेषण केल्यानंतर ती सोडविण्यासाठी आपण काय करायला हवे हे त्यांनी आपल्या लेखात स्पष्टपणे मांडायला हवे. एखाद्या लेखकाने समस्येची चिकित्सा करूनही ती सोडविण्यासाठी करण्यायोग्य कृत्याबाबत काहीच स्पष्ट अभिप्राय दिलेला नसेल, तर त्याचा अर्थ त्यांनी एकतर या विषयावर पुरेसा विचार केलेला नाही किंवा आपली निवड स्पष्टपणे मांडण्याचे धैर्य त्यांच्यापाशी नाही हे वाचकाने समजून घ्यायला हवे. राखीव जागांच्या प्रश्नावर आपल्याकडच्या बहुसंख्य लेखकांची भाष्ये आणि राजकारण्यांची वक्तव्ये हे त्याचे उत्तम उदाहरण.

दोन : आपले उद्दिष्ट काय करावे हे शोधून काढण्याचे असल्याने आपले लक्ष हातातील कामावर केंद्रीत व्हायला हवे. दुसऱ्याच्या कामाचा पंचनामा करणे आणि त्याबाबतचा आपला निकाल जाहीरपणे घोषीत करून त्यावर आपण भर देता कामा नये.

तीन : एखाद्या व्यक्तीबाबत अभिप्राय देणे आवश्यकच असेल तर त्याच्यातील दोष नव्हे तर चांगली गोष्ट शोधणे ही आपली प्रथम प्रवृत्ती व्हायला हवी. अशा चांगल्या गोष्टींचा उपयोग करून अधिक चांगल्या गोष्टीकडे जाण्याचा प्रयत्न करायला हवा.

व्यासमुनींचा सल्ला अगदी शहाणपणाचा ठरतो ! भगवान श्रीकृष्णाने युधिष्ठिर

आणि दुर्योधन या दोघांना एक-एक काम नेमून दिले. युधिष्ठिराला त्याने जगातील अधिक वाईट माणसाला आणून हजर करण्यास, तर दुर्योधनाला भला माणूस शोधून आणण्यास फर्मावले. युधिष्ठिर जगभर फिरला आणि अनेक दृष्कृत्ये त्याने पाहिली; पण त्याला त्या सर्वांत चांगलेपणाचा अंश दिसला, त्यामुळे एकही माणूस वाईट नाही असा निष्कर्ष काढून तो रिकाम्या हाताने परत आला. दुर्योधनाने जग पिंजून काढले. त्याने अनेक संत-महात्म्यांची सत्कृत्ये पाहिली. पण त्या प्रत्येकातही त्याला काहीतरी दोष दिसलाच. त्यामुळे कोणी चांगले नाही, असे ठरवून तो रिकाम्या हाताने परतला. निदान एवढ्यापुरती तरी आपण दुर्योधनवृत्ती सोडून युधिष्ठिराच्या वागणुकीचे अनुकरण करायला हवे.

चार : एखाद्या परिस्थितीतला दोष दुर्लक्षित करणे शक्यच नसेल तर तो उघडकीला आणण्यामागे आपले उद्दिष्ट भानगडी बाहेर काढून खळबळ उडवून देण्याचे नसावे. दोष दूर व्हावा आणि अन्याय पुन्हा होऊ नये ही भावना त्यामागे असावी. यातून आपली पत्रकारिता आणि विरोधीपक्ष यांनी घेण्यासारखे तीन धडे आहेत. एक म्हणजे त्यांची टीका ही अचूक, नेमकी आणि योग्य तपशिलासह असायला हवी आणि दुसरे म्हणजे टीकेसोबत नेमका सविस्तर असा पर्यायही सुचविला पाहिजे. तिसरे म्हणजे फक्त बोलून किंवा लिहून भागणार नाही. बोलणे-लिहिणे ही निव्वळ साधने आहेत. साध्य असायला हवे ते म्हणजे अधिक चांगल्या पर्यायाची प्रतिष्ठापना करणे.

अशा तऱ्हेने व्यक्तीमधील दोष किंवा व्यक्तीचे गैरवर्तन यांकडे कानाडोळा करणे शक्यच नसेल अशा वेळी आपल्या मनात पहिला विचार यायला हवा तो म्हणजे हेच दोष माझ्याही वागणुकीत नाहीत ना ? ही दुसरी व्यक्ती, दगड मारून पाणी काच न ठरवता, आपला आरसा ठरवा. स्वतःच्या आणि दुसऱ्यांच्या दोषांचे मूल्यमापन करताना गांधीजी अतिशयोक्तीचे तंत्र वापरतात असे प्यारेलालनी नोंदविले आहे. म्हणजे ते स्वतःचे दोष खूप मोठे करून पाहत आणि दुसऱ्याचे दोष खूप लहान करून पाहात. यानंतरही दुसऱ्या व्यक्तीचे दोष जाहीर करण्याची वेळ आलीच तर त्याला दुर्वर्तनापासून परावृत्त करावे आणि इतरांना त्याच्या मार्गाने जाण्यापासून रोखावे हा असायला हवा आणि त्यासाठी हे दोष-दर्शन होते. व्यक्तीला उद्देशून आणि सर्व समाजाला उद्देशून अशा खुलेपणाने व्हायला हवे.

आज आपण इतरांच्या तोंडावर स्तुती करतो आणि पाठीमागे निंदा करतो. हा क्रम नेमका उलटा करायला हवा. दुसऱ्यावर टीका करणे आवश्यकच असेल तर ती त्याच्या तोंडावर करायला हवी. लॉर्ड चेस्टरफील्ड यांनी आपल्या मुलाला सल्ला दिला होता त्याप्रमाणे दुसऱ्याच्या पाठीमागे त्याची प्रशंसा करायला हवी.

## इतर सवयी

टीकेचा अतिरेक झाला म्हणजे मग नेमके वाईट तेवढे शोधून काढून आणि त्यातच अडकून पडणे, निव्वळ टीका करण्यावरच समाधान मानणे ही आपली

प्रवृत्ती होते. त्यामुळे योग्य उपाययोजना शोधून काढणे अशक्य होऊन बसते. पण या प्रवृत्तीचा अडथळा आपण ओलांडला तरी वेगाने शोधण्याच्या कामात आपल्या इतर सवयींची अडचण होतेच. यात कोणता बदल करायला हवा हे यापुढील उदाहरणांवरून लक्षात येईल.

समस्येवर प्रभावी उपाय शोधणे आणि तो तपशिलाने मांडणे याऐवजी आपण काय करतो, समस्येची मांडणी अगदी बारीक-सारीक तपशिलाने करतो. ती समस्या किती गंभीर झाली आहे आणि त्याच्याकडे तावडतोब लक्ष दिले नाही तर सगळा देश कसा तुकडे होऊन कोसळून पडेल असे भावूक लिखाण आपण करीत बसतो. यातील बरेचसे लिखाण म्हणजे निव्वळ शब्द जुळविण्याचा खेळ असतो. दूरदर्शन आणि आकाशवाणीची भाषणे आठवा किंवा आपल्या राजकीय तज्ज्ञांची गंभीर इशाऱ्यांनी भरलेली भाष्ये आठवा आणि ती संपल्यावर स्वत:ला हा प्रश्न विचारा; 'हे सगळे खरे आहे असे गृहीत धरले, तर त्याबाबत नेमके काय करायला हवे ?'

पुष्कळसे लिखाण म्हणजे निव्वळ शास्त्रोक्त अवतरणे एकत्र गुंफलेली असतात. काही वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाच्या एका न्यायमूर्तींना भेटण्यासाठी ताटकळत बसण्याचा उद्वेगजनक अनुभव मला आला होता. महाशय आपले निकालापत्र लेखनिकाला सांगत होते. त्यांच्या समोर एक अवतरणांचा संग्रह पडला होता आणि त्यामुळे ते एकापाठोपाठ एक अवतरणे वापरत होते. माझ्या माहितीप्रमाणे अंतिम निकालापूर्वी त्यांनी ती सारी अवतरणे वापरली. देशातील सर्वोच्च न्यायसंस्थेचे हे एक महत्त्वाचे न्यायाधीश कमालीच्या जुनाट, परावृत्त आणि पुन्हा पुन्हा तेच करण्याच्या उद्योगात गढून गेलेले होते. एका परिच्छेदाची सुरुवात ब्लॅकस्टोनच्या उद्गाराने होते तर दुसऱ्याची रूसो काय म्हणाला याच्या हवाल्याने दिली जाते. त्यापुढील प्रत्येक परिच्छेदाची सुरुवात ऑस्टिनने म्हटल्यानुसार, जे. सी. कार्टरचे उद्गार लक्षात घेऊन, केलीसन असे म्हणतो, ॲरिस्टॉटल, सेंट ऑगस्तिन आणि इतर वितिन यांचा अभिप्राय लक्षात घेऊन सेंट थॉमस् ॲकिनास याने म्हटले आहे, जॉन लॉक याचा दृष्टिकोन असा होता, वॉल्टर बेगहॉट याने म्हटले आहे अशासारखे झालेले दिसते. आणखी एक नमुना पाहा : कायद्यामध्ये सर्वसामान्यांची गरज काय याबाबतचे सगळ्यात अधिक सविस्तर विवेचन बहुधा आपल्याला पॅटरसनच्या ज्यूरिस्प्रूडन्स, मेन अँड आयडीयाज ऑफ द लॉ या ग्रंथात पाहायला मिळेल. त्यासाठी पाचवे प्रकरण पाहा.

याच प्रकाशनात आपले निकालपत्र लिहिताना त्याच दुसऱ्या एका न्यायाधीशानेही सार्वभौम सत्य आणि सार्वभौमता यावर एक सविस्तर निबंधच लिहून टाकला आहे. त्यातही अवतरणांची आणि भाष्य-विवेचकांच्या नावांची भरताड आहेच. लॉक, रूसो, बोदिन, कॉर्लाईल, रसेल, जास्तिज् होम्स्, लेनॉर्ड शॉपिरो, टी. एस. ग्रीन, व्ही. ए. सय्यद मुहंमद, लॉर्ड डेनमन, सर एडवर्ड कोक, क्रोपो, ए.व्ही. डायसी अशी मोठमोठी मंडळी आणि त्यांचे ग्रंथ आपल्याला या निबंधात एकत्रितपणे भेटतात आणि एवढा मजकूर भरला आहे तो निकालपत्राच्या केवळ

आठ पानात. हे एकूण निकालपत्र शहाण्णव पानांचे आहे आणि त्या सर्व न्यायाधीशांनी लिहिलेली निकालपत्राची एकूण पृष्ठसंख्या भरली दोनशे एकोणतीस !

आणि एवढा सर्व उच्च विचारसरणीचा हवाला दिल्यानंतर न्यायाधीशांनी केले काय ? तर निवडणुकीतून भ्रष्टाचाराचा अवलंब केल्याबद्दल अलाहाबाद जिल्हा न्यायालयाने दोषी ठरविलेल्या श्रीमती गांधींना त्यांनी निर्दोष मुक्त केले. कारण काय, तर दरम्यानच्या काळात संसदेने घटनादुरुस्ती केली होती आणि पंतप्रधानांची निवडणूक ज्यामुळे रद्दबातल ठरू शकेल असा कोणताही कायदा त्या निवडणुकीला लागू होणार नाही, असे ठरविण्यात आले होते. या दुरुस्तीला पूर्वलक्ष्यी अभिप्राय दिला होता आणि ही संसद पूर्णपणे श्रीमती गांधींच्या ताब्यात होती. कारण सर्व विरोधी पक्षांचे खासदार तुरुंगात पडलेले होते, ही गोष्ट सर्वांनाच आठवत होती. तरीही एवढी मोठाली अवतरणे आणि व्यक्तिनामे व शेवटी असे हे निकालपत्र ! या साऱ्यांची तुलना विनोबा भावे यांच्या नियमांशी करायला हवी. आपले सारे आयुष्य त्यांनी गांधीजींच्या तत्त्वज्ञानाच्या मार्गाने चालून व्यतीत केले आणि विकासही केला. पण त्यांनी एक नियम पाळला. एखाद्या वादाच्या मुद्याचा निर्णय करताना त्यांनी कधीही गांधीजींच्या एखाद्या वचनाचा आधार घेतला नाही. किंवा अशा स्थितीत गांधीजींनी अमूक केले असते असाही दावा त्यांनी प्रश्न सोडविताना केला नाही. अवतरणांच्या रणातून आपण बाहेर पडलो म्हणजे खोट्या लेबलांच्या आणि वर्गबंधांच्या जंजाळात अडकतो. गेली कैक दशके भारतीय पत्रकारितेसंबंधी लिहिताना आणि बोलताना मोठ्या वृत्तपत्रांविरुद्ध छोटी वृत्तपत्रे, इंग्लिश वृत्तपत्रांविरुद्ध प्रादेशिक भाषांतील वृत्तपत्रे, मालकाविरुद्ध संपादक असे वाद पूर्वी करण्यात येत. या जोड्यांतील दुसरी बाजू जास्त सत्य, जास्त अस्सल भारतीय आणि जास्त स्वतंत्र असते, असाही समज करून दिला जातो. खरे पाहता हजारो छोट्या वृत्तपत्रांनी त्यांच्या स्वतःच्या खऱ्या व्यवहाराबद्दल धिक्कार करावा अशी स्थिती आहे. यातील अनेक वृत्तपत्रे काय वाटेल ते छापतात. मोठ्या वृत्तपत्रात छापून येणारा मजकूर निर्भयपणे चोरून वापरतात आणि आपल्या वृत्तपत्राचा कागद काळ्या बाजारात विकतात. भारतीय भाषांत प्रसिद्ध होणारी बरीच वृत्तपत्रे इंग्लिशमधील वृत्तपत्रांच्या तुलनेत अधिक लाचार आणि अफवाबहाद्दर असतात आणि त्यांचा प्रकाशकीय दर्जाही भिकार असतो. आंध्र प्रदेशातील इनाडूसारखी काही स्वतंत्र बाण्याची वृत्तपत्रे प्रादेशिक भाषेत निघतात तशी इंग्लिशमध्येही निघणारी स्वतंत्र बाण्याची वृत्तपत्रे आहेत. पत्रकार आणि संपादकांमध्येही राज्यकर्त्यांपुढे लाचार होणारे, भ्याड, खुषमस्करे आहेत, तसेच वृत्तपत्रांचे काही मालक स्वतंत्र धोरणांचे पुरस्कर्तेही आहेत. एक्स्प्रेस गटाचे रामनाथ गोएंका, इनाडू गटाचे रामोजीराव ही याची काही उदाहरणे.

या छोट्या वर्गभेदातून बाहेर पडलो तरीसुद्धा प्रवृत्ती होते ती एका ध्येयाला पुरस्कृत करावयाचे आणि दुसऱ्यावर तुटून पडावयाचे याकडे. प्रत्यक्षात विनोबा सांगतात त्याप्रमाणे दोन्हीही लक्षात घेणे आवश्यक असते. आपण मात्र एखाद्या प्रश्नावर तोडगा काढताना त्या क्षणी हवीशी वाटणारी गोष्ट कोणती, त्यावर भर

देतो. शेतकऱ्यांच्या अडचणीचे प्रश्न उभे राहिले तर सरकारने शेतमालासाठी किमान हमी भाव वाढवून द्यावा यासाठी आपण आंदोलन करतो. पाठोपाठ औद्योगिक कामगारांचे प्रश्न उभे राहिले म्हणजे शेतमालाचे भाव वाढलेले असल्याने या कामगारांनाही वेतन वाढवून द्यावे अशी मागणी आपण करतो. आपल्या सर्व आकांक्षा एकाच वेळी पूर्ण करता येणार नाहीत, याची जाणीव आपल्याला राहत नाही. आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, एखाद्या तोडग्याची कार्यवाही सुरू झाली आणि त्यामुळे होणाऱ्या पेचप्रसंगाचा परिणाम किंवा त्यासाठी चुकवावी लागणारी किंमत या गोष्टी समोर आल्या की, ज्यांची कार्यवाही करावयाची त्या मूळ उद्दिष्टाकडेच आपले दुर्लक्ष होते हे उघड आहे. गांधीजी म्हणत असत की, भारतीयांना स्वातंत्र्य तर हवे, पण त्याची किंमत चुकती करायला नकोय, उलट त्या सौद्यात काही कमाई करता आली तर त्यांना खरा आनंद होईल ! समस्येवर उपाययोजना असतात. पण त्यांची काही एक किंमत असते. अनेक तोडग्यांतून नवे प्रश्न निर्माण होत असतात. त्यामुळे एके दिवशी आपण पंजाबमधील अतिरेक्यांच्या खटल्यासाठी खास न्यायालये पंजाबबाहेर असावीत असे प्रतिपादन करतो. कारण पंजाबमध्ये फैलावलेल्या दहशतवादामुळे साक्षीदार घाबरतात आणि न्यायाधीशांच्याही जीवाला धोका आहे. दुसऱ्याच दिवशी अशा राज्याबाहेरच्या खास न्यायालयांमुळे किती गैरसोय होते आणि हे किती भेदभाव करणारे आहे याबद्दल हाकाटी सुरू होते. देशात साधनसंपत्तीचा तुटवडा आहे, त्यांचे वाटप योग्य तऱ्हेने व्हावे म्हणून आपण परवाना पद्धत सुरू केली. त्यातून भ्रष्टाचार, ताठरपणा आणि अकार्यक्षमता हे दुर्गुण बोकाळले. त्यामुळे एकीकडे आपण उदार, सैल, लवचिक धोरणांची मागणी करतो आणि लगेचच दुसरीकडे 'श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होत आहेत' असा ओरडा सुरू करतो. न्यायालयात हजारो खटले अनिर्णित अवस्थेत आहेत याचा आपल्याला राग येतो, पण एखाद्या मुख्य न्यायाधीशाने युक्तिवादाच्या लांबणीवर मर्यादा आणावी असे सुचविले तर आपल्याला त्यापेक्षाही जास्त राग येतो. अनेक वेळा काय करायला हवे हे डोळ्यांसमोर स्वच्छ दिसत असते. पण तरीही लोक काय म्हणतील या भीतीने आपल्या तोंडून स्पष्ट शब्द फुटत नाही. भारतीय दूरमतवादी विचारवंत अनेकदा तथाकथित पुरोगामी पवित्रे घेतात किंवा खोट्या धर्मनिरपेक्षतेचा' आडोसा घेऊन एखाद्याचा निषेध करतात त्याचे कारण या भयगंडातच आहे.

अनेक वेळा आपण सुचविलेले तोडगे म्हणजे निव्वळ भोंगळ वचनांची मालिका असते. 'श्रीलंकेतील शांतिसेना आपण मागे घ्यावी; पण तेथील तमिळांना दगा पोहोचणार नाही याची खबरदारी घ्यावी, तमिळांच्या सुरक्षिततेची दक्षता जरूर घ्यावी पण श्रीलंकेच्या सार्वभौमत्वावर आपण घाव घातला आहे, असे तेथील सिंहली लोकांना वाटता कामा नये.' 'पंजाबमध्ये राजकीय प्रक्रिया पुन: सुरू करायला हवी.' 'जम्मू आणि काश्मीरमध्ये राजकीय प्रक्रियेचे पुनरुज्जीवन करायला हवे', 'दहशतवाद्यांशी बोलणी जरूर करायला हवी, पण त्यातून पोलिसांचे नीतिधैर्य खच्ची होणार नाही व ते निष्क्रिय होणार नाहीत याकडे लक्ष दिले पाहिजे.'

'अर्थसंकल्पातील तूट मर्यादित राहील याची काळजी घेतली पाहिजे.' अनेकदा आपले तोडगे म्हणजे निव्वळ चमत्कारिक शब्दयोजना असते– 'आपण संथपणे घाई करायला हवी', 'विकासाला चालना देण्यासाठी योग्य आणि आवश्यक ती सर्व उपाययोजना केली पाहिजे', 'आपण निवड केली पाहिजे ती समतोल'...... (यापुढे विकास, विकेंद्रीकरण, स्वदेशीकरण, नव्या तंत्राचा स्वीकार आणि घरबांधणी कार्यक्रम, केंद्र व राज्यातील सत्तावाटप, सेनादलाच्या तीनही शाखांतील साधनसंपत्तीचे वाटप, असे काय वाटेल ते विषय येऊ शकतात. संदर्भासाठी गेल्या काही दिवसांतील कोणतेही वृत्तपत्र पाहा.) त्यामुळेच सध्याच्या समस्येवर वृत्तपत्रांत आणि मासिकांत तावच्या ताव छापून येत असले तरी ज्याला प्रत्यक्ष कार्यवाहीचा निर्णय घ्यावयाचा आहे अशा धोरणविषयक निर्णय घेणाऱ्या व्यक्तीला त्यातून फारसे मार्गदर्शन मिळत नाही. सरतेशेवटी आपण काही विशिष्ट बदल सुचवितो, तेव्हा असे लक्षात येते की, आपल्या वाटचालीच्या मूळ दिशांपासून या बदलाची दिशा वेगळी नाही! हे बदल अनेकदा अगदी किरकोळ स्वरूपाचे निघतात. चाळीस वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयात सात न्यायाधीश होते आणि अनिर्णित खटल्यांची संख्या हजारांच्या आतच होती. वीस वर्षांपूर्वी न्यायाधीश चौदा आणि अनिर्णित खटले तेवीस हजार अशी स्थिती होती. अनिर्णित खटल्यांची संख्या सतत वाढतच गेली आहे याला प्रतिसाद मिळाला न्यायाधीशांच्या संख्येत थोडी थोडी वाढ करण्याचा. आज न्यायाधीश आहेत सव्वीस आणि अनिर्णित खटले दोन लाखांवर गेले आहेत. या वाढीतून दिसते ते असे की, येणाऱ्या संकटाला नीटपणे तोंड देण्यासाठी नियोजनाच्या अंगाने जे बदल झपाट्याने करायला हवे होते ते आपण केले नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने कोणते अर्ज दाखल करून घ्यावेत याबद्दलच्या नियमांची कठोरपणे अंमलबजावणी करणे, लेखी व तोंडी युक्तिवादाच्या लांबीवर कठोरपणे मर्यादा घालणे, वकील अथवा पक्षकार यांच्या निव्वळ व्यक्तिगत समस्यांसाठी तारीख पुढे ढकलणे, घटनात्मक प्रकरणे चालविण्यासाठी स्वतंत्र न्यायालये, न्यायाधीशांच्या संख्येत किरकोळ वाढ न करता ती तिप्पट करणे, निवृत्त होणाऱ्या न्यायाधीशाने त्याच्या जागी नेमलेला न्यायाधीश रुजू होईपर्यंत काम पाहात राहणे अशा गोष्टी केल्या जायला हव्या होत्या, त्या झाल्या नाहीत. वाढत्या दहशतवादाबद्दल सरकारचे प्रसिद्धी नियम याच तऱ्हेचे आहेत. त्या मार्गाने आपण दहशतवादाच्या स्थितीला येऊन ठेपलो आहोत. हे झाले आपल्या गोष्टी साधण्याच्या उपायाबद्दल. सरकारने काही उपाय सुचविले तर त्याबाबत आपण अधिक बचावात्मक पवित्रा घेतो की, त्याच्या तपशिलात जाऊन तपासणी करणे आपल्याला शक्य होत नाही. उलट सूचना करणाऱ्या व्यक्तीविषयी बहुधा प्रतिकूल अभिप्राय देऊन आपण त्यांच्या सूचनांची वासलात लावायला मोकळे होतो. अमूक असा आहे, तमूक पुराणमतवादी आहे, तो फलाणा कामगारविरोधी आहे अशा चिठ्ठ्या, सूचना करणाऱ्या व्यक्तीच्या कपाळावर चिकटवून शिक्का मारला जातो. ही सवय इतकी घातक झाली आहे की, लिखाणातून लेखकाचे नाव वगळण्याच्या उपनिषद्कालीन पद्धतीचा आपण पुन्हा स्वीकार करावा असे मला वाटू लागले आहे. पण हे वाटणे काही करीत

नाही. कारण विशिष्ट व्यक्तींनी सुचविले म्हणून तर प्रस्ताव नाकारला जातो. त्याच पद्धतीने सुचविणाऱ्यांची नावे माहीत नाहीत म्हणून हे प्रस्ताव, उपाय फेटाळले जाण्याची शक्यता आहे.

एकंदर अशा पद्धतीने एखादा तोडगा सापडला की, आपण या सगळ्याच समस्या संपवून टाकतो. उदाहरणार्थ एखादी समस्या लक्षात येते तेव्हा तिचे समाधान करण्यासाठी आपण कायदे करतो. किमान वेतन कायदा, बालकामगार संरक्षण कायदा वगैरे. पण असे कायदे प्रत्यक्षात राबवले जातात की नाही याची चौकशी मग वळून कधीच करीत नाही. असे कायदे कागदावरच राहिल्याने राजकीयदृष्ट्या गैरसोय होते असे दिसले, तर आपण जुन्यापेक्षा कडक असे नवे कायदे करतो. तेही त्याच वाटेने जातात. मग ही बाब न्यायप्रविष्ट होते. न्यायालये मग सरकारला स्पष्ट करा किंवा करू नका असा आदेश देतात. सरकार त्याची अंमलबजावणी करीत नाही असे दाखविणारे अनेक रिट अर्ज न्यायालयासमोर येतात. न्यायालय या चुकांकडे दुर्लक्ष करून कमालीच्या उदारपणे सरकारला आपल्या मूळ आदेशाची कार्यवाही करण्यासाठी मुदतवाढ देते. एक उपचार म्हणून कायदा करतात त्याच्या उपचारादाखल संस्था स्थापन करतात. खरे तर सध्याची मंत्रालये, विभाग, संस्था यांत थोड्या थोड्या बाबी हाताळायला हव्या, पण तसे होत नाही. अशा स्थितीत त्याचे कामकाज सुधारण्याऐवजी आपण नव्या संस्था स्थापन करतो. मग नव्या संस्था जुन्याच मार्गाने जातात. दरम्यान त्या काही बदल घडवून आणतील ही अपेक्षाही कोणाला वाटेनाशी होते. पण तरीही आपण थोडेथोडे करीत असतो.

आपल्या मानसिक समस्येची ही यादी वाचक त्यांच्या अनुभवानुसार वाढवू शकतील. त्यांनी तसे करावे हा या विचारप्रकियेमागचा हेतू. इतरांच्या सूचनांबद्दलची आपली प्रतिक्रिया काय याची बारकाईने चिकित्सा करायला शिकले पाहिजे. स्वत:बद्दलच्या अशा जागरूकतेतून आपल्याला या गचाळ सवयी सोडून देणे शक्य होईल. आपल्या विद्यार्थ्यांना नावे आणि सन पाठ करायला लावणे, ठराविक माहिती घोळायला लावणे, ठराविक प्रश्नांची ठराविक उत्तरे अशी पोपटपंची शिकवणे या साऱ्यांऐवजी त्यांना विचारप्रक्रियेचीच चिकित्सा करायला उत्तेजन दिले पाहिजे. समस्या सोडविण्याच्या सर्जनशील मार्गाविषयी, संघर्ष सोडविणे आणि वाटाघाटीने मार्ग काढणे, व्यक्ती-व्यक्तीतील संबंध यांविषयी जगात इतरत्र भरपूर काम झालेले आहे. तरी काही काळानंतर लॅटरललापिंका कॉग्नेटीव्ह थेरपी अशा नव्या तंत्राची भर त्यात पडतच असते. आज आपल्याला गरज आहे ती अशा नवनव्या ज्ञानी शाखांचा उपचार करून घ्यावा आणि त्यामध्ये अवगाहन करावे याची. ठराविक प्रश्न आणि त्याचे घासून गुळगुळीत झालेले उत्तर गिळून पचविणे ही आपली आजची गरज नाही. गरज आहे ती आपली वैचारिक पद्धती, समस्या हाताळण्याची पद्धत आणि एकमेकांशी वागण्याची पद्धत या बाबतीत सखोल विश्लेषण करण्याची !

ऑगस्ट १९८५

# ९. सनदी अधिकारी की निव्वळ अभिनम्र नोकर ?

आजचे आपले राज्यकर्ते– केंद्रात असोत की राज्यात- राज्यसत्ता ही आपली खासगी मालमत्ता समजतात आणि त्याप्रमाणे वापरतात. व्यक्तिगत बडेजाव वाढविण्यासाठी आणि आपली तुंबडी भरण्यासाठी ते सत्तेचा वापर करतात; पण थेट नव्हे, तर सनदी अधिकाऱ्यांमार्फत.

नाझी जर्मनीत अधिकाऱ्यांना जे-जे करायला सांगितले गेले ते बव्हंशी अधिकाऱ्यांनी निमूटपणाने केले. अमेरिकेने व्हिएटनामवर आक्रमण केले तेव्हा जॉर्ज. बॉटलीचा अपवाद वगळता एकाही अधिकाऱ्याने निषेध म्हणून राजीनामा दिला नाही. याच पंगतीत बसणाऱ्या आपल्याकडच्या सनदी अधिकाऱ्यांनी राज्यकर्त्यांच्या हातचे बाहुले बनवायला क्वचितच नकार दिला.

आणीबाणीत लाखो लोकांना तुरुंगात टाकावयाचे होते, तेव्हा आपल्या अधिकाऱ्यांनी कोऱ्या पकडवॉरंटवर सह्या करून दिल्या. आसाममध्ये बनावट निवडणुका घ्यावयाच्या असोत, विधानसभा निवडणुका पुढे ढकलावयाच्या असोत किंवा पुढे ढकलल्यानंतरही काही जागांच्या निवडणुका घ्यावयाच्या असोत, या सगळ्यांवर राज्यकर्त्यांच्या सोयीनुसार कायदेशीरपणाचा शिक्कामोर्तब करायला निवडणूक आयोगातील अधिकारी तयारच होते. अजिताभ, ललित सुरी यांच्याविरुद्धचा पुरावा बासनात निमूटपणे ठेवायचा आहे का ? गुरुमूर्तींना अटक करण्यास पुरावा हवा आहे का ? कमलनाथ यांची सुटका करून हवी आहे का ? इंडियन एक्स्प्रेसला चूप बसविण्यासाठी दोनशेतीस फौजदारी खटले दाखल करावयाचे आहेत का ? सनदी अधिकारी आपल्या सोयीसाठी आहेत ! बिहारमध्ये अस्तित्वात असलेले जमीनविषयक आणि कामगारविषयक कायदे फक्त अंमलात आणावेत एवढ्या साध्या मागणीसाठी संघर्षवाहिनीचे कार्यकर्ते उभा राहिले. त्यांना खोट्या खटल्यात गुंतवून निष्क्रिय करून सोडावयाचे का ? एकाएका माणसावर साठ खटले भरायला अधिकारी सज्ज आहेत. त्यासाठी विनाकारण रस्त्यावर घोटाळण्यापासून गुन्ह्याच्या प्रयत्नापर्यंत हवा तो आरोप लादायला कोठेही अडचण नाही !

## कारणे

आपली बाजू मांडणारे हे अधिकारी म्हणतात, "पण आम्ही करणार तरी काय ? ही आहे लोकशाही. लोकांनी ज्यांना निवडून दिले ते मंत्री झाले. ते

लोकांचे प्रतिनिधी. त्यांचा हुकूम आम्हाला पाळलाच पाहिजे.''

पण जनतेने त्यांना निवडून दिले ते देशावर असे दृष्कृत्यांचे ढिगारे रचायला नव्हे. आमदार किंवा खासदार हे लोकप्रतिनिधी असतात याचा अर्थ निव्वळ लोकांनी त्यांना निवडून दिलेले असते एवढाच होत नाही; तर ते लोकांच्या हिताचे प्रतिनिधित्व करीत असतात. लोकहितासाठी सरकारने काम करावे याची दक्षता ते घेतात. शासनाचा वापर असे प्रतिनिधी ज्या वेळी स्वार्थासाठी करून घेतात, त्या वेळी ते आपले प्रातिनिधिक स्वरूप गमावतात., त्या वेळी सरकार अधिकाऱ्यांनी त्यांचा हुकूम पाळावा असा दावा करीत नाही.

लोकप्रतिनिधी शासनाचा गैरवापर करतात, स्वार्थासाठी किंवा पक्षासाठी कायदा आणि नियम वाकविण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा त्यांना थांबविण्याचे कर्तव्य जितके सामान्य नागरिकांचे आहे तितकेच सनदी नोकरांचे आहे. खरे पाहता या सनदी अधिकाऱ्यांची जबाबदारी अधिक मोठी आहे.

मंत्र्यांच्या आदेशामागचा हेतू सामान्य माणसापेक्षा अधिकाऱ्याला निश्चितच लवकर कळतो आणि जास्त चांगला कळतो. असा खराब आदेश उघडकीला आणणे किंवा थांबवून धरणे ही गोष्ट सामान्य माणसापेक्षा सरकारी अधिकाऱ्यांना जास्त शक्य असते. हे केले नाही तर गैरव्यवहाराचे साधन म्हणून असा अधिकारी वापरला जाणार असतो. निवडणूक हा विषय घेतला तरी या संदर्भात अनेक विचार समोर येतील.

चांगल्या काळातसुद्धा निवडणुकीचा केंद्रबिंदू एक किंवा दोन मोठ्या प्रश्नांपुरताच मर्यादित राहतो. एखाद्या प्रश्नाबाबत उठलेल्या लाटेत मतदार वाहवत गेले तर लोकप्रतिनिधींचा भ्रष्टाचार आणि अन्यायाच्या अनेक छोट्या-मोठ्या कारणांकडे ते फारसे लक्ष देऊ शकत नाहीत. नालायक राज्यकर्त्यांना मतदार निवडणुकीद्वारे हाकलून देऊ शकतील हे खरे असले, तरीही दररोज होणारा प्रशासनाचा आणि कायद्याचा गैरवापर ते पाच वर्षांतून एकदा होणाऱ्या निवडणुकीतून थोपवू शकणार नाहीत. ज्यांच्या हातून, ज्यांच्या मार्फत हा गैरवापर केला जातो, तेच त्याला आळा घालू शकतील. शेवटी देशाच्या अनेक भागांत आणि पातळ्यांवर निवडणुकांना आज जे स्वरूप आले आहे, त्यामुळे लोकांच्या इच्छेचे खरे प्रतिबिंब त्यात नीट उमटू शकत नाही. लोकांना हवे तेच प्रतिनिधी निवडून येतात असे दिसत नाही.

यापेक्षा महत्त्वाची आहे ती आजची राजकीय वास्तवता. आज संसदीय लोकशाहीची मूलतत्त्वेच उलथून पडली आहेत. ही मूलतत्त्वे म्हणजे लोकांनी आपल्या प्रतिनिधींवर नियंत्रण ठेवावे, लोकप्रतिनिधींनी मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवावे आणि मंत्रिमंडळातील पंतप्रधानांचे किंवा मुख्यमंत्र्यांचे स्थान समानांमधील पहिले असावे. आज प्रत्यक्ष परिस्थिती आहे ती अशी : पंतप्रधान किंवा मुख्यमंत्री यांच्या हाताखाली एखादी टोळी किंवा चौकडी असते, तीच बहुसंख्य आमदारांवर आणि खासदारांवर हुकूम गाजवीत असते. लोकप्रतिनिधी म्हणजे या टोळीच्या हातातले खेळणे असते. नेता आणि त्यांची टोळी लोकांना काय हवे याची बिलकूल पर्वा करीत नाही. या

साऱ्या पार्श्वभूमीवर सरकारी अधिकाऱ्यांनी 'मंत्री हे लोकप्रतिनिधी असल्याने मला त्यांची आज्ञा पाळली पाहिजे' असे म्हणणे म्हणजे निव्वळ गैरकारभाराचे साधन बनण्यासाठी बनावट भूत उभे करण्यासारखे आहे.

या बाबतीत काहीजण आक्षेप घेतील की, प्रत्येक सनदी अधिकारी प्रत्येक आदेशाचा अशा तऱ्हेने स्वतः न्यायनिवाडा करू लागला तर, कारभार करणेच अशक्य होऊन बसेल, प्रत्येक गोष्टीला खीळ बसेल.

मंत्री किंवा इतरांनी आपला स्वार्थ किंवा बडेजाव पोसण्यासाठी किंवा आपल्या पक्षाची किंवा गटाची तुंबडी भरण्यासाठी दिलेले आदेश संख्येने कमी असतील, अपवादात्मक असतील, तरी त्यांची कार्यवाही करण्यास नाकारल्यामुळे प्रशासन ठप्प होण्याचा प्रश्नच येत नाही. पण असे आदेशच संख्येने जास्त असतील किंबहुना तेच नियम होऊ लागले असतील तर असले प्रशासन बंद पडलेले चांगले. शिवाय प्रशासनाचा उद्देश निव्वळ चालू ठेवावे एवढाच असू शकत नाही, तर एखाद्या उद्देशाने, तेही जनहितासाठी ते चालू ठेवावे असा असू शकतो.

काही सरकारी अधिकाऱ्यांचे यावरचे म्हणणे असे, 'पण एखादा नियम राबविल्याने किंवा अंमलबजावणीने एखाद्याचा फायदा व दुसऱ्यावर अन्याय असे होणार असेल तरीही आम्ही आदेश आणि नियम पाळायला पाहिजे. आम्ही ते धुडकावू लागलो किंवा त्याबाबत विश्वासघात करू लागलो तर कायदाच राज्यात शिल्लक राहणार नाही.'

या युक्तिवादातील कर्तव्यदक्षता वाखाणण्यासारखी असली, तरी प्रत्यक्ष आपले सरकारी अधिकारी कायदे व नियमांचे इतके एकनिष्ठ उपासक नाहीत. मंत्र्यांची गोष्ट सोडा, पण अंवानींसारख्यांसाठी नियम सहजपणे वाकविणे, कायद्याकडे दुर्लक्ष करणे हा अनेकांनी शिरस्ता बनविला आहे.

शिवाय हा युक्तिवाद केव्हा समर्थनीय वाटला असता ? तर एखादा आदेश किंवा नियम अन्यायकारक, गैर आहे हे समजल्यानंतर हा अधिकारी तो शिस्त म्हणून राबवीत राहिला असता पण दुसरीकडे तो बदलून घेण्याचा प्रयत्न चालू ठेवला असता. परंतु चुका दुरुस्त करण्याचा असा निश्चय किंवा प्रयत्न कोठेही दिसून येत नाही. त्यामुळे हा युक्तिवाद वरवर कितीही तत्त्वनिष्ठ वाटला, लांब पल्ल्याचा वाटला तरीही या ठिकाणी सबब म्हणून तो उपयोगी पडणार नाही. अधिकाऱ्यांचा पुढचा युक्तिवाद असतो, 'पण या आदेशाची अंमलबजावणी मी केली नाही तरी दुसरा कोणीतरी करीलच की.'

याचे उत्तर म्हणजे दुसरा कोणीतरी चुकीची गोष्ट करील, हे मी चूक करण्यास समर्पक कारण होऊ शकत नाही. उलट अन्यायाविरुद्ध स्वतः उभे राहताना इतर चार-चौघांना तशी प्रेरणा मी द्यायला हवी.

"पण यातून घडेल ते एवढेच की, माझी बदली होईल, उपेक्षा होईल, मी अडगळीत फेकला जाईन. त्याउलट प्रामाणिक माणसाने काही काळ दबून राहणेच चांगले. निर्णायक महत्त्वाच्या पदावर पोहोचल्यानंतर आम्ही खऱ्या अर्थाने काही बदल घडवू शकू."

आज जे सचिव आणि अतिरिक्त सचिव अशा वरिष्ठ पदांवर आहेत, त्यांच्यापैकी किती अधिकाऱ्यांनी वीस वर्षांपूर्वी अशा तऱ्हेने दबून राहावयाचे ठरविले असेल ? आणि आता निर्णायक पदावर पोहोचल्यानंतर त्यातील कितीजण आपल्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरून काम करीत आहेत ? वैशिष्ट्य असे आहे की, दोन दशके वाट पाहिल्यानंतर काही चांगले घडविण्याचा निश्चय सहसा राहतच नाही, त्याविरुद्ध झालेले असते.

आणि या वाईट पाहण्याच्या, गप्प बसण्याच्या काळात, निर्णायक पदाकडे जाणारी शिडी बेधडक चढण्याच्या प्रयत्नात समाजाचे जे हाल होतात त्याचे काय ?

"पण हा सगळा निव्वळ आदर्शवाद झाला. लोकांनी आपल्यावर दुःख, यातना ओढवून घ्याव्यात अशी अपेक्षा कशी करता येईल ? अधिकाऱ्यांना प्रामाणिकपणे काम करता येईल आणि अशा वेळी मंत्री त्यांना सतावू शकणार नाही अशी परिस्थिती प्रथम निर्माण करायला हवी."

महत्त्वाचे आदेश लेखी द्यावेत, या आदेशावर आयोगाची शिफारस काय झाली ? पोलिसांच्या कामात राजकीय हस्तक्षेप नसावा, अशा शिफारशी आयोगामागून आयोगांनी केल्या, त्याचे काय झाले ? गोष्टी अशा थराला येऊन पोहोचल्या आहे की, आपल्या सहकाऱ्यांना संरक्षण मिळावे असा निर्णय करण्यासाठी मुळातच अनेक ज्येष्ठ अधिकाऱ्यांना निर्भयपणे ताठ उभे राहावे लागते. आपल्या सार्वजनिक यंत्रणा इतक्या खालच्या थराला जाऊन पोहोचल्या आहेत की, निव्वळ कायद्यात एखाद्या कलमाची भर घालून त्यांची अवस्था सुधारता येणार नाही. आयोगाची शिफारस मान्य करून तुम्ही कायदा कराल की, सर्व आदेश लेखी असावेत. मग मंत्री सचिवाला आदेश लिहिणे भाग पाडतील. चुकीच्या गोष्टीला निर्भयपणे विरोध केल्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांची बदली होऊ नये असा नियम तुम्ही कराल. पण अशा कारणासाठी आपण एखाद्याची बदली करीत आहोत असे कोणता मंत्री म्हणाला आहे ? कुठलीही बदली मंत्रिमहोदय रोजच्या तातडीच्या आणि महत्त्वाच्या कार्यासाठी करीत असतात. भारत–पाकिस्तान सरहद्दीवर तणाव वाढला म्हणून राजीव गांधींना विश्वनाथप्रताप सिंग यांची बदली अर्थमंत्री पदावरून संरक्षणमंत्री पदावर करण्याची तातडीची गरज वाटली. तसेच निकडीने मंत्री अधिकाऱ्यांच्या बदल्या करीत असतात ! तेव्हा मुलकी सेवकांची परिस्थिती सुधारावयाची, तर त्यावर एकमेव उपाय म्हणजे शेकडो ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी परिणामांची तयारी ठेवून अन्याय व गैरवृत्तीविरुद्ध ताठ उभे राहण्याचे धाडस दाखविले पाहिजे.

एक घटक निर्णायक ठरतो. आज एखादा मुलकी अधिकारी सचिव पदावर असता तर त्याने कोणता विशिष्ट निर्णय घेतला असता, ही बाब महत्त्वाची नाही. प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांनी स्वतःला मंत्र्यांच्या किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हातातले बाहुले बनू देण्याची जी वस्तुस्थिती रूढ होत आहे, तिलाच सपशेल नकार देणे महत्त्वाचे आहे. असा नकार देण्यासाठी आपण सचिव पदावर असायला हवे ही समजूत चुकीची आहे. हे काम एखाद्या वरिष्ठ सचिवाने करावयाचे

नसून शेकडो सर्वसामान्य मुलकी अधिकाऱ्यांनी एकत्रपणे निश्चय करून पार पाडावयाचे आहे. अनिष्ट प्रथा रुजूच देणार नाही हा निश्चय एकाने नव्हे तर अनेकांनी करायला हवा. 'दिलेल्या आदेशाचे पालन करा' ही आदर्श व्यवस्था होऊ शकत नाही. ती रूढ होता कामा नये. 'जे आदेश लोकांच्या हिताचे असतील त्यांचे पालन करा', ही आदर्श व्यवस्था आहे.

## वाईट घडते कसे ?

अनिष्ट प्रथा मोठ्या प्रमाणात नाकारणे व उलटविणे याची गरज आपल्या व्यवस्थेतला रोग दूर करण्यासाठी निकडीची आहे. हा रोग सूक्ष्म जीवाणूसारखा सगळ्या शरीराला ग्रासून टाकतो. एकीकडे लहानशा पावलाने दुरितांचा प्रवेश व प्रयोग घडून येतात. प्रत्येक पाऊल पुढच्या पावलाचा निश्चय करत असते. अमेरिकेने व्हिएतनामविरुद्ध कोणकोणत्या टप्प्यात जात संपूर्ण युद्ध पुकारले ते आठवा. त्याच मार्गाने रशियाने अफगाणिस्थानविरुद्ध युद्ध छेडले.

अशा तऱ्हेने भीषण प्राणघातक दुरित हे बहुधा इतरांना यातना देण्याच्या दुष्ट माणसांच्या इच्छेतून जन्माला येत नाही. ज्यूंची कत्तल करणारा आइखमन हासुद्धा हॅना अरिन्ट यांच्या नोंदणीनुसार अगदी सर्वसामान्य असाच माणूस होता. अशी सामान्य माणसे दुरितांकडे जाणारे टप्पे बहुधा अगदी नाइलाजाने ओलांडून जातात. अनेकदा त्यांच्या मनातून वाईटही नसते. एखादा निर्णय घेतला पाहिजे अशी वेळ निर्णायक भूमिकेतील व्यक्तीवर येते तेव्हाही तिच्या मनात अनेक शंका गोंगावत असतात. अनेकदा विशिष्ट निर्णय किंवा कृती करण्यामागे 'या बाबतीत खात्री करायला हवी' इतपतच कारण असते. परंतु अशा शंका बाजूला साराव्या लागतात किंवा शिताफीने दडवाव्या लागतात आणि निर्णय घ्यावा लागतो. कारण निर्णय घेणाऱ्यांच्या मनात त्याबद्दल शंका होती ही वस्तुस्थिती त्याची कार्यवाही करणाऱ्यांना कळली तर त्या यंत्रणेकडून त्याची म्हणावी तशी चोख कार्यवाही होणार नाही. म्हणून शंकांना रजा देऊन निर्णय घ्यावा लागतो आणि मग मात्र अंमलबजावणी करणारी यंत्रणा झपाट्याने व निर्धाराने कामाला लागते. हा निर्धार आणि पहिली पायरी पार पडल्याने होणारे परिणाम यांमुळे दुसरा टप्पा ओलांडणे अटळ होऊन बसते.

हे टप्पे छोटे व अटळ असतात एवढेच नव्हे, तर त्या टप्प्यातील काम पुरे करण्यासाठी एकेका अधिकाऱ्याला द्यावे लागणारे योगदान अगदी किरकोळ स्वरूपाचे असते. नाझी जर्मनीमध्ये नोकरशाहीचा फार मोठा भाग या ना त्या प्रकारे ज्यूंच्या शिरकाणासाठी राबला. अगदी तीन किंवा चार दशकांपूर्वी ज्यांच्या घरात ज्यूंचे रक्तसंबंध होते अशा कुटुंबांचा शोध लावून निकाल लावण्यात आला. पण त्यानंतर कोणाही एखाद्या सरकारी अधिकाऱ्याला ज्यूंच्या कत्तलीला मदत का केली अशी विचारणा केली असती, तर त्याने अगदी शिस्तीत उत्तर दिले असते की, असले काहीही माझ्या हातून घडलेले नाही. मी फक्त जमिनीच्या जुन्या दस्तऐवजांचे आणि जन्म-मृत्यूंची नोंद असलेली पुस्तके तपासण्याचे काम

केले. अगदी स्पीअर्सनेसुद्धा फक्त अधिक चांगले रेल्वे डबे बांधण्याचे काम तेवढे केले. त्यातून गुरांसाठी चारा आणण्याऐवजी ज्यूंना गॅस चेंबरकडे न्यावे असा आमचा इरादा मुळीच नव्हता असेच म्हणू शकतात.

निव्वळ एखादा आदेश लेखी स्वरूपात आहे किंवा संसदेने तो मंजूर केला एवढ्यामुळेच त्या आदेशाच्या कार्यवाहीच्या परिणामांची जबाबदारी आपल्याला टाळता येत नाही, किंवा त्या आदेशाला बळी पडतात त्यांच्या हालअपेष्टा कमीही होत नाही.

काही उदाहरणे आठवू. १६ फेब्रुवारी १९४२ या दिवशी हिमलर यांनी पोलंडमधील मूळच्या जर्मन वंशाच्या नागरिकांसाठी एक आदेश जारी केला. अशा नागरिकांची मुले त्यांच्यापासून वेगळी करून खुद्द जर्मनीतल्या कुटुंबांना दत्तक देण्यात येतील. या मुलांमधील शुद्ध रक्ताच्या प्रेमावर ही कुटुंबे त्यांचा स्वीकार व सांभाळ करतील असे या आदेशामध्ये म्हटले होते. हा आदेश व्यवस्थित लेखी असला तरी योजना मात्र अमानुष होत्या. १९४२ मध्ये हिमलर आणि तत्कालीन न्याय मंत्री थिराक यांच्यामध्ये झालेला करारही लेखी स्वरूपातच होता. काही श्रेणीतील कैद्यांना भरपूर काम करायला लावावे इतके की श्रमाने झिजून ते मेले पाहिजेत, असा या कराराचा आशय होता. त्यामध्ये मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष आणि हिमलर महाशय यांच्यामध्ये एक लेखी करार झाला होता. तो असा : वेळोवेळी ठार मारण्यात येणाऱ्या ज्यूंकडून त्यांच्या दातातील सोने, घड्याळे, अंगठ्या वगैरे ज्या काही मौल्यवान वस्तू मिळतील, त्या या बँकेने ठेव म्हणून ठेवाव्यात, असे या करारात ठरले ! एस. एस. या दहशतवादी संघटनेची मालकी या वस्तूंवर राहणार होती, खात्याचे नाव मात्र वेगळे ठेवण्याचे ठरले. अशा तऱ्हेने आणखी एक लेखी आदेश होता तो वैद्यकीय प्रयोगासाठी प्राणी वापरतात त्याप्रमाणेच ज्यूंचा वापर करावा असा. याच काळात पोलंडमधील विचारवंतांची एकजात कत्तल करण्याची तपशीलवार लेखी योजना तयार करण्यात आली होती आणि तिला 'अभूतपूर्व शांततेच्या प्रस्थापनेचा कार्यक्रम' असे नाव दिले होते. जर्मनीतील सर्व मनोरुग्णांना ठार मारून टाकावे असाही अधिकृत लेखी आदेश हिटलरच्या सरकारने काढला होता. अशी भरपूर उदाहरणे देता येतील. आपल्या देशातही संसदेने १९७५ च्या आणीबाणीवर शिक्कामोर्तब केले होते. खरे तर वेळोवेळी सरकारने केलेल्या सर्व गोष्टी संसदेने मुकाटपणे मान्य केल्या आहेत. याचे कारण संसदेने सरकारवर नियंत्रण ठेवावे ही संकल्पनाच मुळी उलटी झाली आहे.

शेवटचेच एक वैशिष्ट्य नोंदवायला हवे. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत नेमके काय करायला हवे याचा शोध घेणे फार अवघड नसते. दुरितांचे उगमस्थान व स्वरूप याबद्दलचा पेचदार प्रश्न, तत्त्वज्ञानाच्या युक्तिवादातील मुक्त इच्छेची वीण असेल. या गोष्टी प्रशासकाला दैनंदिन व्यवहारात सतावीत नाहीत. शिवाय आपल्याकडील संस्था व यंत्रणांना आलेले विकृत स्वरूप, कायद्याची पायबंदी या गोष्टी इतक्या उघड निगरगट्टपणाने घडत आहेत की, आपला वापर गैरकृतीसाठी साधन म्हणून होतो आहे ही गोष्ट एखाद्या मतिमंदालाही सहज समजेल. भल्या-बुऱ्यात

फरक करणे अवघड जाते आहे आणि म्हणून आपण आपला वापर वाइटासाठी होऊ देतो, अशी कल्पना करून घेण्याचे कारण नाही. खरे कारण म्हणजे आपल्यालाच कोणत्याही प्रकारे असुरक्षिततेची धास्ती नको असते. दुरिताविरुद्ध ताठ उभे राहण्याने, काही वेळा त्रास होऊ शकतो, तो आपल्याला नको असतो.

## काय करायला हवे ?

पहिली उघड दिसणारी गोष्ट म्हणजे सनदी अधिकारी असोत, पत्रकार असोत वा अभियंता, आपण सर्वांनी प्रथम नागरिक असले पाहिजे आणि नंतर व्यावसायिक. आपले व्यावसायिक कौशल्य, आपल्या नोकरीकाळातील पद ही नोकर म्हणून कर्तव्य बजाविण्याची आपली साधने झाली पाहिजेत. हे तत्त्व पायाभूत मानून प्रत्येक सनदी अधिकाऱ्याने वरिष्ठांचा आदेश पाळण्याच्या आपल्या कर्तव्याची चिकित्सा केली पाहिजे. आदेश लोकहितासाठी आहे की मंत्र्यांच्या किंवा त्यांच्या पक्षाच्या भल्यासाठी ? त्यामागचे समर्थन खरे आहे की फसवे ?

दुसरी गोष्ट म्हणजे एखादी मोठी समस्या उभी राहीपर्यंत किंवा आपण उच्च पदावर पोहोचेपर्यंत संघर्ष लांबणीवर टाकणे चुकीचे ठरेल. मुलकी सेवकांचे आज जे अध:पतन होत आहे, ते थांबवावयाचे तर लगेचच सुरुवात करायला हवी आणि त्यासाठी हजारो नाही तरी निदान शेकडो अधिकाऱ्यांनी आज करीत नसलेल्या छोट्या-छोट्या गोष्टी करायला हव्यात. त्याउलट दुरितांशी तडजोड न करण्याची आणि स्वत:ला गैरकृत्याचे साधन न होऊ देण्याची सवय त्यांनी लावून घेतली पाहिजे. छोट्या-छोट्या गोष्टींसाठी संघर्ष करण्यातूनच मोठ्या लढ्याची ताकद निर्माण होत असते. ज्या ज्या वेळी आपण दुरिताविरुद्ध ताठ उभे राहतो त्या त्या वेळी इतरांनाही तसे करण्याला उत्तेजन मिळत असते. आपण तडजोड केली तरी इतरांचे पाय आपण मागे ओढीत असतो. दिलेले आदेश पाळावेत आणि त्या महान क्षणाची वाट पाहात थांबावे असा मोह अनेकदा होतो. आपल्या प्रभावीपणाबद्दलच्या चुकीच्या कल्पना त्यामागे असतात. मंत्र्यांनी माझा मुद्दा आपल्या भाषणात समाविष्ट केला किंवा नव्या वनविषयक धोरणात माझा मुद्दा समाविष्ट झाला एवढ्यानेच काही तरुण अधिकारी हुरळून जातात आणि आपल्याला अधिक महत्त्व देणाऱ्या मंत्र्याला महत्त्वाची गरज असेल तर काय हरकत आहे असे म्हणून त्याच्या चरणावर लीन होतात. असे करताना मंत्र्याची भाषणे किंवा धोरणविषयक निवेदने यांच्या महत्त्वाबद्दल काहीतरी अतिशयोक्त कल्पना त्यांनी करून घेतलेली असते. आज प्रत्यक्षात कुठलेही राजकारणी आपले आचरण जाहीर केलेल्या धोरणाप्रमाणे ठेवतात ? वनविषयक धोरणे आणि कायदे भरपूर संख्येने होत असताना अरण्ये किती झपाट्याने नष्ट होत आहेत हे अशा अधिकाऱ्यांनी लक्षात ठेवले तर आपल्या प्रभावीपणाबद्दल त्यांची कल्पना अधिक नम्र आणि व्यावहारिक होईल.

मंत्र्याच्या आवडत्या कामासाठी स्वत:चा उपयोग होऊ देण्याऐवजी सरकारी अधिकाऱ्याने आपल्याला जे योग्य वाटते त्याचा पाठपुरावा मंत्र्यांकडे केला पाहिजे. मंत्र्यांना गैरसोयीचे वाटले तरी योग्य ती टिप्पणी फाईलमध्ये लिहिली पाहिजे.

आणि मग त्यांना हव्या तेवढ्या वेळा आपल्या बदल्या केल्या तरी त्याची पर्वा करू नये. दुसरा कोणीतरी याची सुरुवात करील म्हणून वाट पाहणे चुकीचे आहे. कारण त्याचीही मनोवृत्ती आपल्याप्रमाणेच वाट पाहणारी असू शकते. त्याची कारणे आपल्या कारणांइतकीच खरी असू शकतात.

यापुढचे पाऊल म्हणजे आपण मुलकी सेवा आणि इतर व्यवसायातही समानधर्मी लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे. एकमेकांना प्रेरणा व संरक्षण दिले पाहिजे. सरकारी अधिकाऱ्यांच्या बहुसंख्य संघटना वर्षातून एकदा एक स्नेहसंमेलन आयोजित करण्यापुरत्या सक्रिय असतात. त्यासाठी कामाची दिशा बदलली पाहिजे. त्यातही पगारवाढ आणि भत्तेवाढ यांसाठी प्रयत्न करणे ही दिशा नसावी. आपले जे सहकारी भ्रष्टाचारविरोधी संघर्ष केल्यामुळे अडचणीत येत असतील, त्यांच्या संरक्षणासाठी ढाल म्हणून अशा संघटनांनी कामे केली पाहिजेत.

तेव्हा सरकारी अधिकाऱ्यांनी स्वत: विचार करायला हवा. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी त्याचे मूल्यमापन करायला हवे. नव्या कायद्याचा मसुदा बनविताना हे करायला हवे. या आदेश किंवा कायद्याचा विकृत वापर करणे कितपत शक्य आहे, याची तपासणी केली पाहिजे. सगळा पुरावा हाती येऊ द्या असे म्हणून थांबणे चुकीचे आहे. अतिशय विलंबाने घेतलेला निर्णय निरुपयोगी ठरू शकतो. गांधीजींच्या सल्ल्याप्रमाणे तो तो अधिकारी व नागरिक दोघांतही सदसद्विवेकबुद्धी जागी असावी. गांधीजी म्हणत,

'प्रत्यक्ष सरकारपैकी निरो किंवा मुसोलिनी यांच्या कारभारातही जरी चांगले गुण असतील पण एकदा या राज्यव्यवस्थेशी असहकार उभे करण्याचे आपण ठरविले की मग ती संपूर्णपणे नाकारायला पाहिजे. आज आपल्या देशात काही उत्कृष्ट दर्जाचे सार्वजनिक रस्ते आणि भव्य शिक्षणसंस्था आहेत. पण या गोष्टीसुद्धा देशाला दडपून टाकणाऱ्या एका राज्यव्यवस्थेचा हिस्सा आहेत. अशा स्थितीत मी त्यांच्याशी काही संबंध ठेवणार नाही. या गोष्टी फण्यावर मणी असलेल्या नागाप्रमाणे, वरवर आकर्षण वाटले तरी शेवटी विषारी आहेत.'

तरी शेवटी अशी वेळ येऊ शकते की, या संपूर्ण व्यवस्थेच्या चौकटीत आपण बसूच शकत नाही. या जाणिवेने राजीनामा देणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याने आपण आपल्या कारकिर्दीत कशा तऱ्हेने समाजवादी आहोत याचे अगदी तपशीलवार विवेचन शक्य तेवढ्या मोठ्या जनसमुदायासमोर केले पाहिजे. अनेक अधिकारी सभ्यतेच्या किंवा सौजन्याच्या कल्पनेपोटी असे करीत नाहीत, अशी माझी कल्पना आहे. पण अशा अधिकाऱ्यांना मी भेटलेलो नाही. मी ज्या अधिकाऱ्यांना भेटू शकलो ते अगदी भाष्य घेत राहतात. पंतप्रधानांकडे राजीनामा पाठविल्यानंतर तरी त्यांना परिस्थितीची चूक आणि आपला प्रामाणिकपणा समजून येईल आणि पंतप्रधान आपल्याला परत बोलावतील अशी त्या अधिकाऱ्याची कल्पना होती. पंतप्रधान किंवा इतर मंत्री अशा लोकांना नीट ओळखून असल्याने स्वत:ची फसवणूक करण्याच्या त्यांच्या उपक्रमाला हातभार लावतात. त्यासाठी काही वेळा त्यांच्या विशेष संबंधातील मंडळी अशा अधिकाऱ्यांना पटवून पंतप्रधानांना तुमच्या राजीनाम्यामुळे

किती वाईट वाटले याची हकीकत सांगतात. तुम्हाला ज्यांनी त्रास दिला त्यांनी पंतप्रधानांना कशी चुकीची माहिती दिली हे आता उघड झाले आहे, मात्र दरम्यान तुमच्या राजीनाम्याची बातमी पसरल्याने आता तुम्हाला त्याच जागी कायम राहण्याची विनंती करणे अवघड झाले आहे. तरीही पंतप्रधानांनी वर दुसरी एखादी जबाबदारी शोधून काढण्याचे आदेश दिले आहेत, असे या अधिकाऱ्याला सांगण्यात येते. या स्थितीत निव्वळ काही विरोधकांवर सूड उगविण्यासाठी तुम्ही वृत्तपत्रांकडे धाव घेणार नाही अशी आशा व्यक्त केली जाते. प्रक्षुब्ध झालेल्या भावना शांत होऊ देण्याचा आणि हिताचा असा सल्ला त्याला दिला जातो.

या सगळ्या गोष्टींत काही आठवडे निघून जातात. ज्या आठवड्यांत देशाने, समाजाने या अधिकाऱ्याचे म्हणणे कान देऊन ऐकले असते असाच काळ नेमका फुकट जातो !

## निष्कर्ष

आज वातावरण लक्षात घेता दुरितांचे साधन म्हणून आपला वापर होऊ देणारा कोणताही अधिकारी झपाट्याने यश मिळवील हे निश्चित. शिवाय गैरकृतीतून निर्माण होणारा अन्याय त्याला माहीत नसलेल्या एखाद्या समाजघटकावर कोसळणार असतो. काही वेळा तातडीने लगेचच काही दुष्परिणाम होत नाहीत. काही दुष्परिणाम दिसायला अगदी किरकोळ दिसतात.

पण तरीही या गोष्टी, हे परिणाम घातक असतात. शरीरात कर्करोगाची एक पेशी असली तरी ती प्राणघातक ठरते. एका अधिकाऱ्याने गैरवर्तनात भाग घेतला तर त्यातून इतरांना उत्तेजन मिळू शकते. सनदी अधिकारी एक तर आपल्या गैरकृत्यात बदल करू शकतात किंवा हा मार्ग सोडून समाजाचे, देशाचे भले करू शकतात. हा दुसरा मार्ग त्यांनी पत्करला तरी त्याची काही किंमत मोजावी लागते. सगळ्याच यंत्रणा आजारी पडल्यामुळे सुधारण्याचा प्रयत्न करणारेही रोगी ठरविले जाण्याची शक्यता आहे. गोपनीय अहवालात प्रतिकूल अभिप्राय नोंदविले जातील किंवा बदल्या होतील; पण ही किंमत जबर नक्कीच नाही. इतरांनी जे सोसावे असे आपल्याला वाटते त्याच्याशी तुलना केली तर ही किंमत जबर नसते. आज देशाची ही मोठी गरज आहे हे लक्षात घेतले तर ही किंमत मुळीच जबर नाही.

ऑगस्ट १९८७

# १०. कामगार संघटनांतील दलाल

"गोदरेज माझ्याशी असेच बोलत असत. भोसकले जाण्यापूर्वी...." बोलणाऱ्याने भोसकणे हा शब्द उच्चारण्याऐवजी हाताने अभिनय करून दाखविला. ते होते दत्ता सामंत. मुंबईच्या कामगार क्षेत्रात त्या वेळी टेरर म्हणून गाजलेले.

आम्ही रजनी पटेलांच्या कार्यालयात बसलो होतो. सामंतांनी इंडियन एक्स्प्रेसची मुंबई आवृत्ती बंद पाडण्याची धमकी दिलेली होती. कारण कळले नव्हते. त्यांच्या मागण्या काय आहेत याची माहिती घेण्यासाठी मला दिल्लीहून मुंबईला यावे लागले होते. सामंत म्हणाले, "तुमच्या लोकांनी अजून पालेकर अहवालाची अंमलबजावणी केलेली नाही." न्या. पालेकर यांच्या आयोगाने १९८१ मध्ये वृत्तपत्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत आपला निवाडा दिला होता, त्याचा हा संदर्भ आहे. मी म्हणालो, "पण एक्स्प्रेसने त्याची अंमलबजावणी अगोदरच केलेली आहे. खरे तर या निवाड्याच्या अंमलबजावणीची घोषणा करणारे या क्षेत्रात सगळ्यात पहिले होते ते रामनाथजी गोएंका."

"काय सांगता ? तुम्ही तो अंमलात आणला आहे?" सामंतांना आश्चर्य वाटले. "पण ते लोक माझ्याकडे आले होते. ते म्हणाले की, तुम्ही अंमलबजावणी केलेली नाही."

रजनी पटेल म्हणाले, "ते लोक बाहेर बसले आहेत. त्यांना आत बोलावू या." त्या लोकांना आत बोलावण्यात आले. मग असे लक्षात आले की, त्यांचे म्हणणे सामंतांना नीट समजलेच नव्हते. त्या लोकांनी सामंतांच्या मदतीची मागणी केली होती ती त्यांचे व्यवस्थापन पालेकर निवाड्याची अंमलबजावणी करीत नसल्यामुळे. ते लोक बाहेर गेल्यानंतर सामंत मला म्हणाले, "ते काही असले तरी असले निवाडे बोगसच असतात. तुम्ही प्रत्येकाला एक हजार रुपये जास्त दिले पाहिजेत."

"पालेकर निवाड्यात जाहीर केलेल्या वेतनवाढीशिवाय ?"

"अर्थातच."

"मग एक हजारच का ? आठशे किंवा बाराशे का नकोत ?" आता मी चर्चेत उतरलो.

गोदरेजचा संदर्भ सामंतांनी दिला तो माझ्या या प्रश्नाला उत्तर म्हणून. ही घटना होती जानेवारी १९७९ मधील. सामंतांची संघटना आणि गोदरेज गटाची

एक कंपनी यांच्यात कामगार प्रश्नावरून वाद चालू होता. त्या काळात गोदरेज कुटुंबापैकी उद्योगपती श्री. एन. पी. गोदरेज, त्यांच्या सासूबाई आणि सूनबाई यांना क्रूरपणे भोसकण्यात आले होते आणि सामंत व त्यांच्या पाच सहकाऱ्यांना अटक झाली होती. खटल्याचा निकाल उच्च न्यायालयात चार वर्षांनंतर लागला आणि पुराव्याअभावी सामंतांची निर्दोष सुटका झाली. सामंतांनी एक्स्प्रेसची मुंबई आवृत्ती बंद करायची तर खुशाल करावी; पण त्यांना ते महागात पडेल, असे शेवटी मी त्यांना बजावले. कामगार पुढाऱ्याशी थेट संपर्क येण्याची माझी ही पहिलीच वेळ होती. माझ्या दृष्टीने हा एक नवा साक्षात्कार होता.

प्रत्येक कामगार पुढारी हा स्वभावतः सद्गुणांचा पुतळा असतो अशा समजुतीत मी वाढलो आणि प्रत्येक संप हा संघर्ष मानत आलो. आज माझ्यासमोर हा एक नामांकित कामगार नेता बसला होता. लढा पुकारण्यापूर्वी अगदी प्राथमिक गोष्टींचीही माहिती करून घेण्याची पर्वा त्याला नव्हती. उलट पहिल्याच भेटीत त्याने मला धमकी दिली होती. त्यानंतर काही दिवसांनी एक्स्प्रेसमध्ये संप सुरू झाला. सामंत स्वतः कामगारांना कधीच भेटत नसत. ज्या ज्या वेळी काही थोड्या कामगारांनी त्यांच्यापर्यंत शिरकाव करून घेतला त्या त्या वेळी त्यांनी अपशब्द उच्चारून त्यांना हाकलून दिले. वृत्तपत्र चार महिने बंद राहिले. एवढे झाल्यानंतर शेवटी कामगारांच्या एका गटाने अवसान गोळा केले. एके दिवशी पहाटे दोनच्या सुमाराला आम्ही त्यांना एक्स्प्रेसच्या इमारतीत घेऊन आलो. वृत्तपत्राचे प्रकाशन पुन्हा सुरू झाले. नंतर एक-दोन दिवसांतच बाकी सगळे कामगार कामावर परत आले. व्यवस्थापनाने मागितलेल्या हमीपत्रावर सही करून त्यांनी कामाला पुन्हा सुरुवात केली. संपापूर्वी व्यवस्थापनाने कामगारांना जे देऊ केले होते त्यापेक्षा जास्त काही त्यांच्या पदरात पडले नाही. उलट चार महिन्यांचा पगार बुडाला. सामंत या काळात कोठे दिसलेही नाहीत.

कामगार नेत्याचे दुसरे दर्शन मला घडले ते एक्स्प्रेसची दिल्ली आवृत्ती बंद केली तेव्हा. या वेळी तर संप पुकारला गेलाच नव्हता. राजीव गांधींच्या सरकारने एक्स्प्रेसविरुद्धच्या युद्धाचा एक भाग म्हणून एका कामगार पुढाऱ्याला हाताशी धरले होते. हा पुढारी एक्स्प्रेसच्या कर्मचाऱ्यांपैकी नव्हता. तरी तो त्यांच्या संघटनेचा अध्यक्ष बनला होता. त्याने एकतर्फी संप जाहीर केला. पोलिसांनी इमारतीभोवती गराडा घातला. कर्मचाऱ्यांना इच्छा असूनही कामावर जाता येईना. तेव्हा एक्स्प्रेसच्या गेस्ट हाऊसमध्ये ते कामासाठी एकत्र येऊ लागले. त्यांनी एकत्र येऊन इमारतीत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. कामगार आयुक्तांसमोर गाऱ्हाणे मांडले, पोलिस चौकीवर तक्रार नोंदविली, तरी त्यांना कामावर जाण्याचा हक्क बजावू देण्यात आला नाही. काहींना बसथांब्यावर अडवून मारहाण करण्यात आली. सहाजणांवर ॲसिड फेकण्यात आले. या सगळ्या काळात मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गुंडांची मदत घेऊन कामगारांचा संप मोडून काढण्याचा प्रयत्न करीत आहे असा आक्रोश वृत्तपत्रक्षेत्रातील साऱ्याच दलालांनी चालविला होता.

हा सगळा काळ एखाद्या भयानक स्वप्नासारखा होता. प्राणभयाच्या प्रदेशात

सतत वावरण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता. या काळातील माझे त्रस्त करून सोडणारे अनुभव त्या वर्षीच्या लेखातून व्यक्तही झालेले होते. या वेळी वृत्तपत्राचे प्रकाशन ४७ दिवसांच्या खंडानंतर सुरू होऊ शकले. कामगारांना एक नवा पैसाही मिळाला नाही. उलट गेस्ट हाऊसवर कामासाठी जमण्याचे धैर्य ज्यांना झाले नव्हते किंवा जे येऊ शकले नव्हते त्यांना त्या काळाचे वेतनही मिळाले नाही.

प्रकाशनात तिसऱ्यांदा खंड पडला तो अंतर्गत मामल्यातूनच. वेतनविषयक नवा निवाडा दिला गेला होता. त्याचा एक भाग कमालीचा पक्षपाती होता. त्यामुळे वृत्तपत्र गंभीर अडचणीत सापडणार होते. तेवढा भाग वगळता सर्व भाग आम्ही अंमलात आणू असे व्यवस्थापनाने जाहीर केले. परिणामी कामगारांना दरमहा ६२० रुपये पगारवाढ मिळणार होती. जो भाग अन्याय्य आहे त्याला न्यायालयात आव्हान देणार असे व्यवस्थापनाने जाहीर केले. करारावर सह्या झाल्यापासून ९० दिवसांत या तरतुदींना न्यायालयाकडून स्थगिती मिळविता आली नाही, तर त्यांचीही अंमलबजावणी करू असे व्यवस्थापनाने सांगितले.

आता मोठ्या प्रमाणात वरची मंडळी या प्रकरणात उतरली. अनेक उदारमतवाद्यांनी- त्यात देशातील काही नामांकित पत्रकारही होते- एकही पान न वाचता एक विशिष्ट भूमिका घेतली. सर्वसाधारण सभेत चर्चेला विषय खुला करण्याला नकार, वृत्तपत्रांत एकांगी आणि विपर्यस्त वृत्त येऊ लागले. दुसऱ्या माणसाने पुढाकार घ्यावा याची प्रत्येकजण वाट पाहू लागला. ७५० कर्मचाऱ्यांवर २० जण सत्ता गाजवू लागले. त्या वीस जणांचे नियंत्रण शेवटी दोघांच्या हातात राहिले आणि त्या दोघांना सूचना मिळत होत्या त्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या राज्यसरकारकडून. वेतन निवाडा अवाजवी आहे याची कबुली खासगीत देणारे मंत्री पत्रकारांच्या कोलाहलाला घाबरून सार्वजनिक ठिकाणी मात्र वेगळ्याच गोष्टी बोलले. त्यातून संप आणखी लांबला.

त्याआधीच्या तीन वर्षांत अनेक गुंतागुंतीच्या गोष्टीत अडकून पडल्यामुळे आमच्या संस्थेची संघटनात्मक स्थिती फारशी मजबूत नव्हती आणि अनेकांच्या मनात एकमेकांविषयी शत्रुत्वाची भावना निर्माण झाली होती. त्यामुळे या नव्या संकटाला आम्ही नीट तोंड देऊ शकलो नाही. संस्था जिवंत ठेवण्यासाठी आपण किती किंमत मोजली आहे याकडे पत्रकारांनी कानाडोळा करावा याचा संताप व्यवस्थापनाच्या मनात होता. त्यामुळे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने त्यांनी पुरेशी पावले उचलली नाहीत. पत्रकारांच्या मनात व्यवस्थापनाबद्दल अविश्वास, तिरस्कार आणि संकटातील आपल्या कामगारांची व्यवस्थापन दखल घेत नाही ही भावना. त्यामुळे ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या छावणीत गोळा झाले. या पक्षाने आपल्या मालकीच्या वृत्तपत्रात नव्या निवाड्याची अंमलबजावणी मुळीच केलेली नव्हती. तरी एक्स्प्रेसविरुद्धच्या लढ्यात त्यांनी उडी घेतली. त्यांना रस होता तो दिल्लीत कामगार संघटनांच्या भाऊगर्दीत आपला झेंडा उभारावा, आपले राज्य वाढावे आणि विशेषतः पत्रकारांच्या संघटनेत आपला शिरकाव व्हावा यामध्ये. नव्याने

सत्तेवर आलेल्या दुबळ्या सरकारला धाक दाखवून आपले म्हणणे ऐकायला लावण्याची कम्युनिस्टांची इच्छा होती.

सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण हाताळले. वृत्तपत्राच्या वकिलांनी उपस्थित केलेल्या अनेक मुद्यांपैकी एकालाही सॉलिसिटर जनरल समर्पक उत्तर देऊ शकले नाहीत. चार तास चाललेल्या सुनावणीत निवाड्यामध्ये चुका आणि पक्षपात आहे याची कबुलीच न्यायाधीश देताना दिसत होते. तरीही निकाल देण्याची वेळ आली तेव्हा तो सरकार आणि संघटनेच्या बाजूनेच दिला. कामगार संघटनेने आपला विजय झाल्याचे जाहीर केले व कामाला सुरुवात केली. तोवर तब्बल ४९ दिवस वृत्तपत्र बंद राहिले होते.

## वस्तुस्थिती :

आपल्याकडच्या कामगारांच्या एकूण संख्येमध्ये संघटित कामगारांचा वर्ग अतिशय लहान आहे. दहा वर्षांपूर्वी प्रा. दांडेकर यांनी केलेल्या अंदाजानुसार संघटित कामगार एकूण कामगारसंख्येच्या १/२४ होते. मात्र या अल्पसंख्येला भरपूर हक्क आणि फायदे मिळतात. गेली अनेक दशके विविध घटकांनी एकत्र येऊन या अल्पसंख्याक वर्गाला प्रचंड ताकद मिळवून दिली आहे.

* एक घटक म्हणजे उरलेला कामगार वर्ग हा कमालीचा असंघटित आहे.

* अर्थव्यवस्था वाढत्या प्रमाणात आधुनिक आणि एकात्म होत आहे. त्यातून तिचा फार मोठा भाग नियंत्रित करण्याची शक्ती अगदी छोट्याशा गटाला मिळाली आहे. त्यातून ते आपल्या मागण्या रेटू शकतात.

* प्रमुख देशव्यापी कामगार संघटना विशिष्ट राजकीय पक्षांशी संलग्न आहेत.

* अनेक कंपन्यांचे व्यवस्थापन पुरेसे जागृत आणि संवेदनक्षम नसते. त्यातील काही भ्रष्टाचारी असतात. दत्ता सामंत इतके यशस्वी होण्याचे आणि अनेक वर्षे टिकून राहण्याचे हे एक प्रमुख कारण. त्यांचा ग्रह पुढे असा होतो की, मालक व्यवसायातून इतका काळा पैसा कमावत आहेत तर व्यवसाय बंद पडू देण्यापेक्षा आपल्या प्रचंड मोठ्या मागण्यांपुढेही ते मान तुकवतील. बराच काळ ही गोष्ट खरी ठरली. कामगारांनाही व्यवस्थापनाच्या भ्रष्टाचाराची खात्री पटल्यामुळे दत्ता सामंत बॅलन्स-शीट (Balance-Sheet) सारख्या अधिकृत माहितीकडे ढुंकूनही पाहत नाहीत, याचे कौतुकच झाले.

* अगदी अलिकडेपर्यंत आपल्या राज्यकर्त्यांचे अघोषित अधिकृत तत्त्वज्ञान म्हणजे समाजवादाचे ढोंग. त्यांचे धोरण मुळातच गरिबांना अनुकूल नसल्यामुळे पुरोगामी घोषणा देऊन उभा राहील त्याच्या दंडेलीला शरण जाण्याचे उद्योग राज्यकर्त्यांनी केले. अशाच पद्धतीने अगोदर केलेले पुरोगामी कायदे ते अमलात आणत नसल्यामुळे सतत नवे पुरोगामी कायदे करण्याची गरज भासत राहिली.

* न्यायाधीशांनी हेच केले. अनेकांचा एक डोळा वृत्तपत्रीय प्रसिद्धीवर तर दुसरा बांधिल न्यायव्यवस्था मागणाऱ्या मंत्र्यांवर असल्याने पुरोगामीपणाचा आव आणणारी निकालपत्रे दिली गेली. त्यांची अंमलबजावणी व्हावी अशी इच्छा त्यामागे

नव्हती. त्यातून अटळपणे एक साखळी निर्माण झाली. वेठबिगारीवर, किमान वेतन कायद्यावर पूर्वी दिलेल्या निकालपत्रांच्या कार्यवाहीकडे डोळेझाक करायची आणि दिल्लीत सुरू केलेल्या सरकारी कामावरील मजुरांना कायद्याप्रमाणे किमान वेतन दिलेच पाहिजे, असे सरकारला ठणठणीतपणे बजावणारी निकालपत्रे द्यायची. उदाहरणादाखल १९८२ ची एशियाड लेबर केस, १९८४ ची बॉन्डेड लेबर केस पाहा. आपले आदेश नोकरशाही धुडकावून लावते याबद्दल न्यायाधीशांनी आक्रोश केलेला दिसतो. त्याचबरोबर त्याकडे दुर्लक्षही केलेले पुढे दिसते. त्याऐवजी जेथे कर्मचाऱ्यांना शिस्त लावणे आवश्यक होते तेथे न्यायाधीशांनी कडवेपणाने त्यांची बाजू उचलून धरली. एकदा पुरोगामीपणाचा पायघोळ झगा पांघरला म्हणजे संप-निदर्शने याच्या नावाखाली चाललेली दहशत, हिंसा, गुंडगिरी आणि त्यातून देशाच्या कायद्याची होणारी पायबंदी याकडे डोळेझाक करणे ओघानेच आले. त्यामुळे कामगार संघटनांमधील बेजबाबदार आणि कशाचाही विधिनिषेध न मानणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळाले आणि अनेक क्षेत्रांत वर्चस्व मिळविता आले. या मूठभर न्यायाधीशांनी चुकार कामगारांना शिस्त लावणेच अशक्य करून सोडले. कामाच्या वेळेत कामगार काम करण्याऐवजी इतर उद्योग करीत असतील तर त्याला आळा घालणेसुद्धा व्यवस्थापनाला अशक्य झाले.

* न्यायाची म्हणून आपली जी काही संकल्पना झाली आहे, त्यामुळे परिस्थिती आणखी बिघडली. बरोबर काय आणि चूक काय हे ठरविण्याऐवजी आपले न्यायाधीश आणि लवाद देवाण-घेवाणीने तडजोड करण्याचा सल्ला देतात. व्यवस्थापनाच्या निवेदनामधील दोन मुद्दे घ्यायचे व कामगारांच्या निवेदनातील तीन मुद्दे घ्यायचे आणि एकत्र करून निवाडा द्यायचा अशी रीत झाली आहे. त्यामुळे बेजबाबदारपणाला उत्तेजन मिळते. अवास्तव आणि अवाजवी मागण्या करायला दोन्ही बाजू प्रवृत्त होतात.

* उदारमतवादी विचारवंत आणि बुद्धिवादी यांचा प्रभावही नुकसानकारक ठरतो. अशा मंडळींना कोठल्याही बड्या, नामांकित संस्थांमधील संप ही आपल्या अपराधीपणाच्या भावनेचा निचरा करून घेण्याची उत्कृष्ट संधी वाटते. त्यातून त्यांना कष्टकरी समाजघटकांशी आपली बांधिलकी पुन्हा दाखवून देता येते. अशा वेळी ते वास्तव परिस्थितीचा अभ्यास करीत नाहीत. कामगार एकजुटीला पाठिंबा देणारी, संघर्षाचे समर्थन करणारी भाषणे करून मोकळे होतात. अशा वेळी आपले डोळे ही मंडळी घट्टपणे मिटून घेतात, यावर कोणाचा विश्वास बसणार नाही. ऑक्टोबर ते डिसेंबर १९८७ या काळात एक्स्प्रेसमधील बनावट संप ही सबब म्हणून वापरून सरकारनेच वृत्तपत्र बंद पाडले होते, ही गोष्ट एखाद्या आंधळ्यालाही स्वच्छ दिसली होती. परंतु आपल्या पत्रकारांनी स्पष्ट बोलण्याचे टाळले. याचा उत्तम नमुना म्हणजे एडिटर्स गिल्ड संघटनेने दिलेला अहवाल. कमालीच्या गोंधळाने भरलेला हा अहवाल वाचला म्हणजे तो कशासाठी तयार केला होता हेसुद्धा नीट उमजत नाही. त्यांच्या नजरेला वस्तुस्थिती आणून दिली तेव्हा त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. हीच गोष्ट तुम्ही मला तीन दिवसांपूर्वी सांगितली असती तर...

वगैरे वगैरे. पण सार्वजनिक पातळीवर ही मंडळी वास्तवतेचा स्वीकार करीत नाहीत. त्यांचा शेवटचा युक्तिवादही ठरलेला असतो. "मान्य आहे. तुमचे म्हणणे बरोबर आहे; पण या घडीस बिचाऱ्या कामगारांनी संपकाळात फार हाल काढले. त्यांना काही थोडे तरी द्या." मी स्वत: अनुभवलेल्या तिन्ही संघर्षात बुद्धिवादी मंडळी आपल्या वैचारिक पवित्र्यात गोठून गेलेली असतानाच चळवळ संपुष्टात आली.

## प्रतिनिधित्व नव्हे, वर्चस्व

अशा विचित्र गोंधळाच्या परिस्थितीतही काही थोड्या कामगार संघटना जबाबदारीने वागत- बोलत आल्या आहेत. त्यांपैकी एक म्हणजे भारतीय मजदूर संघ. जबाबदारीने वागणे कायम ठेवूनही ही संघटना देशव्यापी झाली आहे. पण एकंदर परिस्थितीला हा अपवाद आहे. एरव्ही आजच्या परिस्थितीतून कामगार नेते निर्माण होत नाहीत, तर कामगार संघटनांचे दलाल उभे राहतात.

कामगारांनी स्वत:साठी उत्स्फूर्तपणे संघटना बांधल्या आणि त्यातून आजच्या मोठ्या कामगार संघटना निर्माण झाल्या, असे घडलेले नाही. कामगार चळवळीच्या प्रक्रियेतून नैसर्गिकरीत्या नेते उदयाला आले असेही घडलेले नाही. गुंड, पुढारी आणि त्यांची टोळकी यांनी आपल्या संघटनांची दुकाने उघडली आणि त्यात कामगारांचे कळप हाकलीत नेले, ही वस्तुस्थिती आहे. कामगारांच्या नावाने हे पैशाचे व्यवहार करतात एवढेच नसून, सत्तेची दलालीही करतात. ते कामगारांचे प्रतिनिधित्व करीत नाहीत तर त्याच्यावर वर्चस्व गाजवितात. आज कामगार संघटना चालतात त्या या नेत्यांचा स्वार्थ साधण्यासाठी. कामगारांचे हित साधायचे किंवा साधलेले दाखवायचे ते नेत्याचे स्थान बळकट करण्यापुरतेच. तत्त्व म्हणून विचार केला तर कामगारांच्या हितासाठी काम केले नाही, तर कोणालाही आपला प्रभाव टिकविता येणार नाही. पण हे तत्त्वज्ञान कागदावरच राहते. कारण कामगार संघटना लोकशाही तत्त्वपद्धतीने चालत नाहीत. जेथे पदाधिकारी ठरविण्यासाठी निवडणुका होतात तेथे कोण निवडून येणार हे कामगार पुढाऱ्याने आणि त्याच्या टोळीने ठरविलेले असते. हा दादा आणि त्याची टोळी एकजुटीने वागतात तर कामगार एकएकटे असतात. संप करावा की नाही असे महत्त्वाचे निर्णयही लोकशाही पद्धतीने मतदान करून कामगारांनी घेतले असे उदाहरण फारच क्वचित आढळते. अशा निर्णयापूर्वी काही वाटाघाटी झाल्या का, त्यांचे स्वरूप आणि फलित काय ही माहिती फारच क्वचित दिली जाते. अशी एखादी कारवाई फसते आणि कामगारांचे कमालीचे नुकसान होते. मुंबईतील कापड गिरण्यांचा संप हे एक उदाहरण. त्यानंतरही कामगार पुढारी आणि टोळके यांच्या वर्चस्वाला सहसा धक्का बसत नाही. कारण त्यांची एकजूट भक्कम असते. शिवाय एव्हाना त्यांनी या फसलेल्या संपाशी कामगारांची प्रतिष्ठा आणि आत्मसन्मान यांची सांगड मोठ्या हुशारीने घालून दिलेली असते. समजा एखादा नेता संप फसल्यानंतर बाहेर फेकला गेला तरी त्याच्या जागी दुसरा तसाच नेता आणि त्याची टोळी येते. कामगार

तरीही परिस्थितीबद्दल अज्ञानी राहतात. एकएकटे राहतात आणि संघटनेने स्वीकारलेल्या तंत्राबद्दल अनभिज्ञ राहतात.

बहुसंख्य कामगार संघटनांत हीच परिस्थिति आढळते. याचे कारण सामान्य नागरिक सार्वजनिक जीवनात रस घेत नाही, त्याचप्रमाणे कामगार संघटनेच्या कामात बहुसंख्य सामान्य कामगार आस्था दाखवीत नाहीत. याची कारणे अनेक आहेत.

* कामगार पुढारी आणि त्याचे टोळके यांच्या बोलण्यात सर्वसामान्य कामगार मूक राहतो. संघटनेच्या बैठकीत पुढाऱ्याला गैरसोयीचा असा एखादा मुद्दा मांडायला त्याने सुरुवात केली तर पुढाऱ्याचे टोळीवाले त्याला तावडतोब गप्प बसवितात.

* अशा पुढाऱ्यांना खूष केले, निदान त्यांच्याबरोबर राहिले तरी बराच फायदा असतो. त्याउलट त्यांच्या रस्त्यात आडवे आले तर त्याची भारी किंमत मोजावी लागते.

यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे निव्वळ मुक्याचे व्रत घेऊन पुढाऱ्याच्या पाठीमागे राहिलेल्या कामगारालाही संपामुळे काही जादा वेतन पदरात पडले तर फायदाच होतो. त्याउलट संपामुळे होणारा तोटा फार गंभीर नसतो. व्यवस्थापन आणि विशेषत: सरकार खंबीर राहत नसल्यामुळे बेकायदेशीर संपाचे परिणामही किरकोळ राहतात. अनेकदा संपाचा काळ हा रजेतून वजा केला जातो. फार तर संपकाळाचे वेतन बुडते. पण हिंसक कृत्ये करणाऱ्या कामगारांवर सुरू केलेली शिस्तभंगाची कारवाईही अवश्य बारगळते.

## जबर किंमत

प्रत्येक दत्ता सामंत शेवटी निष्प्रभ होऊन जातो हे खरे आहे; पण त्यापूर्वीच्या काळात त्याने कामगारांचे नुकसान केलेले असते आणि अर्थव्यवस्थेची जबरदस्त हानी केलेली असते.

* कामगारांनी आपले कौशल्य सतत वाढवत राहावे यात आपले हित आहे हे समजण्याइतकी कल्पकता कामगार पुढाऱ्यापाशी नसते. त्यामुळे पश्चिम बंगालसारख्या अनेक महत्त्वाच्या प्रदेशात आधुनिकीकरण अशक्य होऊन बसते. अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांत नवीन उत्पादने किंवा अधिक कार्यक्षमता येणे अवघड होते. आज आपल्या बँकांच्या कामकाजात इतकी अकार्यक्षमता बोकाळली आहे की, निव्वळ सवयीमुळेच आपण ती सहन करू शकतो.

* संपकाळाचे उदाहरण सोडा; पण शांततेच्या काळातही कामगारांना शिस्तीने कामाला लावण्यात अनेकदा व्यवस्थापनाला अडचण येते. त्यामुळे पश्चिम बंगालसारख्या काही प्रदेशात नवी भांडवल गुंतवणूक होऊच शकत नाही. शिवाय नवे प्रकल्प शोधताना उद्योगपती ते मनुष्यबळप्रधान नसतील याकडे लक्ष देतात.

* अशा कामगार संघटनांमुळे शेवटी कामगारांतच अनेकदा विसंगती निर्माण झाली आहे. जे मग जास्त दबाव आणतील त्यांना राजकारणी नेते बळी पडतात आणि सवलती देतात. त्याउलट दुबळ्या गटांच्या मागण्या नाकारून आपण किती कडक आहोत ते दाखवून देण्याचा प्रयत्न करतात. एरवी पत्रकारांसाठी सरकार

वेतन आयोग नेमते आणि महामंडळाच्या सफाई कामगारांसाठी नेमत नाही याचे कारण काय ? सफाई कामगार पत्रकारांपेक्षा संख्येने जास्त नाहीत की सरकारच्या संरक्षणाची गरज पत्रकारांना सफाई कामगारांपेक्षा जास्त वाटते असेही नाही. खरे कारण म्हणजे राजकारण्यांना वृत्तपत्रात प्रसिद्धी हवी असते.

* अशा कामगार चळवळीमुळे सरकार काही विशिष्ट धोरणांच्या चौकटीत अडकून पडले आहे. हे धोरण शेवटी कामगारांचाच घात करणारे आहे. आजारी गिरण्या जगविण्यामुळे किती प्रचंड भांडवल अडकून पडले आहे ते पाहा. कंपनीच्या नफ्याचा विचार न करता कामगारांना सरसकट एक महिन्याच्या पगाराएवढा किमान बोनस मिळालाच पाहिजे या कायद्यामुळे कशा प्रकारच्या वातावरणाला प्रोत्साहन मिळते ते लक्षात घ्या. या परिस्थितीमुळे प्रत्येक कामगार कोणत्या दर्जाचे काम करतो याला काहीच महत्त्व राहिलेले नाही.

या सगळ्याचा परिणाम म्हणजे कामगारवर्गाविषयी समाजात निर्माण झालेली अनास्था किंवा अप्रीती. बंगलोरमध्ये १९८० मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील कारखान्यात झालेला ८० दिवसांचा संप काय, १९८१ ते १९८४ दरम्यान मुंबईतील गिरणी कामगारांचा अडीच वर्षे चाललेला संप काय किंवा मार्च १९८८ मधील दिल्ली परिवहन निगमच्या बसचालकांचा संप काय, यातून समाजमनात कामगारांविषयी उलट शत्रुत्वाची भावना निर्माण झाली नसली, तरी अनास्था निश्चितच निर्माण होते. याची कारणे सांगणे अवघड नाही. कामगारांना ही ताकद ज्या घटकातून मिळते त्याच्यामुळे समाजात नाराजी निर्माण होते. अर्थव्यवस्था अधिकाधिक एकात्म होत आहे तसतशी बहुसंख्य लोकांना वळविण्याची आणि वाकविण्याची ताकद दूरस्थ लोकांच्या हातात एकवटते आहे. आज उत्तर प्रदेशातील काही शेकड्याच्या संख्येत असलेले वीज मंडळातील अभियंते संपूर्ण उत्तर भारतातील वीजपुरवठा बंद पाडू शकतात. यातून त्यांना ताकद मिळते आणि नव्या कल्पनाही सुचतात. त्यामुळे एका पाठोपाठ एक अडथळे कामकाजात येत राहतात. याचा आणखीही एक परिणाम होतो. कामगार संपासाठी तयार होतात ते एखाद्या अन्यायाविरुद्ध. हा अन्याय अगदी खरा असला तरी तो कामगारांच्या तेवढ्या गटापुरताच असतो. पण त्यांनी काम थांबविल्याचा परिणाम मात्र सार्वजनिक असतो. त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या सर्वच ग्राहकांना त्याची झळ बसते. या भल्या मोठ्या ग्राहकवर्गाला संपकरी कामगारांवरचा मूळ अन्याय तेवढ्याच तीव्रतेने जाणवणे शक्य नसते. आपल्यापैकी प्रत्येकजण एखादे उत्पादन किंवा एखादी सेवा देशाला देत असतो. तथापि आधुनिक एकात्म अर्थव्यवस्थेत आपल्यापैकी प्रत्येकजण हा इतर अनेकांच्या एकत्रित कामाचा ग्राहक असतो. त्यामुळे आपल्यावर अनेक गटांच्या निर्णयांचा प्रभाव पडत असतो. त्यामुळे आपल्यावर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध संप करणे समर्थनीय आहे, असा निष्कर्ष त्या त्या गटाने आपल्यापुरता काढला आणि विविध गटांनी स्वतंत्रपणे निर्णय घेतले तरी त्या सर्व निर्णयांचे देणे म्हणजे शेवटी बहुसंख्य ग्राहकांचे नुकसान असाच होतो.

## हे करणे आवश्यक

अर्थव्यवस्थेच्या आणि कामगारांच्या हितासाठी काही गोष्टी बदलणे आवश्यक आहे हे उघड दिसते.

एक : सरकार आणि व्यवस्थापक यांनी न्यायाची आणि तरीही खंबीर अशी भूमिका घेतली पाहिजे. आज अनेक आंदोलने उभी राहिलेली दिसतात, कारण ठरलेले करार पाळले जात नाहीत किंवा करार होऊनही त्याला दोन-दोन, तीन-तीन वर्षे या किंवा त्या मंत्रालयाची मान्यता मिळत नाही म्हणून. इंडियन एअरलाइन्स हे याचे एक ताजे उदाहरण. जुना करार संपला तर त्या जागी नवा करार योग्य वेळेत केला जात नाही. काही वेळा असेही घडते की, अगोदर ठामपणे अमान्य केलेल्या मागण्या काही आठवडे, महिने संप चालल्यानंतर दबावामुळे व्यवस्थापन मंजूर करते. हिंसक आणि दहशतवादी कृत्ये केलेल्या कामगारांविरुद्धची कारवाई थांबविते. संपकाळातील वेतन देऊन टाकले जाते.

सुरुवातीचा कडकपणा व नंतरचा मवाळपणा दोन्ही घातक ठरतात. सुरुवातीचा कडकपणा हा खरे तर निष्काळजीपणा किंवा अन्यायीपणा असतो. संपानंतर येणारा उदारपणा हा खरे म्हणजे भित्रेपणा आणि दुबळेपणा असतो. पहिल्या चुकीमुळे दुसरी करावी लागते. दुसरीमुळे पुढच्या काळातील चुकांचा रस्ता खुला होतो. दोन्ही गोष्टी टाळायला हव्यात. त्यासाठी व्यवस्थापनाने मुळातच न्याय्य वागणूक ठेवायला हवी. दबावामुळे नव्हे, तर न्यायबुद्धीने. कर्तव्य पार पाडल्यानंतरही एखादा दादा दहशत घालत असेल तर त्याच्या विरोधात शेवटपर्यंत उभे राहिले पाहिजे. अशा `दहशतवाद्यांना केवळ एखाद्या कारखान्याच्या भल्यासाठी नव्हे तर समाजाच्या हितासाठी हाकलून काढले पाहिजे.

दोन : देशातील सर्वसामान्य कायद्याची नीट अंमलबजावणी केली पाहिजे. संपावरील कामगार हिंसाचाराच्या धमक्या देत असेल किंवा हिंसा करत असेल तर त्याला इतर गुन्हेगारांहून वेगळी वागणूक देण्याचे कारण नाही.

तीन : अत्यावश्यक सेवांमध्ये संपाला घातलेल्या बंदीची कार्यवाही कडकपणे केली पाहिजे. न्यायालयात जाताना वकिलांनी काळा कोट घालावा किंवा संरक्षणदलातील कर्मचाऱ्यांनी काही विशिष्ट शिस्ती पाळाव्यात या अटी जशा सर्वमान्य असतात त्याचप्रमाणे अत्यावश्यक सेवांमध्ये नोकरीला लागतानाच कर्मचाऱ्यांनी संपाचा हक्क राहणार नाही, ही अट मान्य केली पाहिजे. त्याचप्रमाणे अशा सेवांचे व्यवस्थापन बहुधा सरकारी असावे. अशा सेवांमधील कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी आपली गाऱ्हाणी किंवा मतभेद विशिष्ट लवादाकडे सोपविले पाहिजेत असा कायदा हवा. अनेकदा केंद्र किंवा राज्य सरकारची काही मंत्रालये लवादाचा न्यायनिवाडा अनेक वर्षे अमलात आणत नाहीत. यातून तंटा निर्माण होतो. त्यामुळे अशा प्रकरणात संबंधितांना न्यायालयाच्या अवमानासाठी दोषी ठरवून कडक शिक्षा करावी.

चार : लवाद आणि संबंधितांनी आपला दृष्टिकोन बदलायला हवा. एका बाजूच्या निवेदनातले दोन आणि दुसऱ्या बाजूच्या निवेदनातले तीन मुद्दे ऐकून

निर्णय देणे योग्य नाही. 'जाऊ द्या', 'काहीतरी देऊन टाका' याला न्याय म्हणायचे का ? याऐवजी लवादांनी इंग्लंडमध्ये प्रचलित झालेली लंबक न्यायपद्धती हे तंत्र वापरले पाहिजे. या तंत्रात लवाद कोणत्या तरी एका बाजूचे म्हणणे संपूर्णपणे मान्य करतो. आपण बाजू मांडताना एखादा मुद्दा खोटेपणाने मांडला किंवा अवास्तव, अवाजवी मागणी केली तर त्यासाठी आपले म्हणणे पूर्णपणे नाकारले जाईल हे वादी व प्रतिवादी दोघांनाही समजले म्हणजे मग वाईट बाजू सुरुवातीपासूनच तर्कशुद्ध आणि व्यावहारिक मुद्देच तेवढे मांडतील.

पाच : संप, धरणे यांबाबत कायदे मोठ्या प्रमाणात बदलले पाहिजेत.

* वाटाघाटीमध्ये कोणते मुद्दे आणि तोडगे चर्चिले गेले याची माहिती व्यवस्थापन आणि कामगार नेते या दोघांनीही सर्व कर्मचाऱ्यांना लेखी व तोंडी दिली पाहिजे, असे बंधन त्यांच्यावर घालावे.

* संप करायचा की नाही हा निर्णय कर्मचाऱ्यांनी गुप्त मतदान पद्धतीने घेतला पाहिजे, असे बंधन कामगार नेत्यावर घालावे.

* संप एक महिन्यापेक्षा जास्त काळ चालला तर तो पुढे चालू ठेवायचा की नाही याचा निर्णय पुन्हा एकदा सर्व कर्मचाऱ्यांनी गुप्त मतदानाने किंवा पोस्टाने मतपत्रिका पाठवून घेतला पाहिजे. त्यानंतर दर महिन्याला अशा पद्धतीने निर्णय व्हायला हवा. धरणे, घेराव यांसारखे कार्यक्रम शांततेनेच पार पडले पाहिजेत आणि ही जबाबदारी प्रशासन, पोलिस आणि न्यायालय यांनी कठोरपणे पार पाडली पाहिजे. मतपरिवर्तन करण्याचा हक्क जरूर हवा पण दुसऱ्याच्या कामात अडथळा आणण्याचा आणि त्याला दहशत घालण्याचा हक्क कोणालाही नसावा. याबद्दलचे नियम अनेक निकालपत्रात येऊन गेले आहेत. धरणे धरणाऱ्यांनी प्रवेशद्वारापासून पन्नास मीटरच्या आत येऊ नये. संपावरील कामगारांनी इतरांना कामावर जायचे असेल तर प्रतिबंध करू नये. अशा प्रकारचे नियम कडकपणे अंमलात आणले पाहिजेत.

* एखादा करार किंवा निवाडा त्याची मुदत संपेपर्यंत चोख पाळला गेला पाहिजे. मुदतीपूर्वी तो एकतर्फी मोडण्याचे स्वातंत्र्य कोणत्याही बाजूला असता कामा नये.

* चालू कराराची मुदत संपण्यापूर्वी किमान तीन महिने नव्या कराराच्या वाटाघाटी चालू करण्याचे बंधन व्यवस्थापन आणि कामगार संघटना या दोघांवरही असले पाहिजे.,

* अशाच प्रकारच्या तरतुदी संथगतीने काम, सामुदायिक किरकोळ रजा, अशा प्रकारच्या इतर आंदोलन प्रकारांना लागू केल्या पाहिजेत.

## जबाबदाऱ्या

या बदलांची कार्यवाही कशी करावी ? इंग्लंडसारख्या देशात संप आणि इतर आंदोलनाबद्दलची धोरणे, नियम अधिक कडक करणे भाग पडले. तेथे कामगार संघटनांनी नवे निर्बंध पाळावेत अशी तरतूद करण्यात आली. नवे निर्बंध

न पाळणाऱ्या संघटनांना मिळणारे कायदेशीर संरक्षण गमवावे लागेल असेही त्यांना बजावण्यात आले. अशा प्रसंगी संघटनेची मालमत्ता गोठविता येईल अशी तरतूद करण्यात आली आणि योग्य वेळी तशी कृतीही करण्यात आली. भारतातही अशा शिक्षेची तरतूद हा व्यवस्थापनावर प्रभावी अंकुश ठरू शकेल. मात्र मालमत्तेचे प्रमाण काहीतरी मोठे हवे. याउलट आज दिल्लीमध्ये एखादी टाळेबंदी बेकायदेशीर आहे आणि व्यवस्थापन चर्चेला तयार नाही असे कामगार आयुक्तांच्या निदर्शनाला आले तर त्यांना सत्ता आहे ती जास्तीत जास्त एक हजार रुपये दंड करण्याची किंवा व्यवस्थापनाच्या एखाद्या प्रतिनिधीला एक महिनाभर शिक्षा द्यावी अशी मागणी न्यायालयाकडे करण्याची. अर्थात दंड किंवा मालमत्तेची जप्ती यांचा आपल्याकडील कामगार संघटनांवर मात्र फारसा परिणाम होणार नाही. कारण समाजाच्या इतर घटकांप्रमाणेच संघटनाही आपली मालमत्ता कागदोपत्री नोंदविण्याबाबत विशेष उत्साही नसते. त्यामुळे आपल्याकडे नियमांचे उल्लंघन करण्याबद्दलच्या कारवाया फौजदारी स्वरूपाच्या हव्यात, दिवाणी नकोत. अशा कारवाईसाठी व्यवस्थापन आणि संघटना तसेच पदाधिकारी यांना जबाबदार धरले पाहिजे. दिवाणी शिक्षा हवी असे वाटले तर दंडाची कात्री संघटनेचा निधी किंवा कंपनीच्या उत्पन्नावर चालणे पुरेसे नाही. संघटनेचे पदाधिकारी, कामगार, व्यवस्थापनाचे प्रतिनिधी यांच्या व्यक्तिगत उत्पन्नावर दंड लागू झाला पाहिजे. यापेक्षाही महत्त्वाची गरज आहे ती न्यायालयांनी त्वरित निकाल देण्याची. जेथे कायद्याची पायमल्ली झालेली दिसेल किंवा होण्याची शक्यता असेल तेथे स्थगितीसारखे उपाय ताबडतोब योजले गेले पाहिजेत आणि संपूर्ण प्रकरण सुनावणीसाठी आले म्हणजे ते त्वरित निकालात काढले गेले पाहिजे.

## इतर बदलही हवेत

संप, धरणे यांबाबतच्या कायद्यात बदल करायला हवेत, तो येथे एकूण औद्योगिक संबंधांच्या क्षेत्रातील व्यापक बदलांचा एक छोटासा भाग होय. त्याखेरीज हवे असलेले इतर काही बदल असे :

* लोकप्रियतेच्या हेतूने केलेले कायदे आणि दिलेली निकालपत्रे बदलली पाहिजेत.

* आपल्याकडच्या सगळ्याच व्यवसायात, संपूर्ण सार्वजनिक क्षेत्रात आणि पत्रकारितेसह अनेक क्षेत्रांत नोकरीची हमी आणि सुरक्षितता वाजवीपेक्षा जास्त आहे. आपण हायर अँड फायर तत्त्वाकडे थोडा तरी रोख वळविला पाहिजे.

* वेतनाची निश्चिती व्यक्तीची कामगिरी आणि कामाचे स्वरूप यांनुसार व्हायला हवी. त्यात गुणवत्तेनुसार फरक ठेवायला हवा. सरसकटपणे ते ठरता कामा नये.

* अकार्यक्षम व्यवस्थापन, निष्काळजी कामगार, बदलती बाजारपेठ किंवा बदलते तंत्रज्ञान यांपैकी कोणत्याही कारणाने एखादा व्यवसाय नुकसानीत येत असेल तर तो बंद होऊ देणे आवश्यक आहे. यात दोन सुधारणा अपेक्षित आहेत : (१) असे कायमचे आजारी उद्योग जिवंत ठेवण्यासाठी सार्वजनिक पैसा वापरला

जातो, (२) एखादी आस्थापना बंद करण्यासाठी आज ज्या प्रचंड अडचणी ओलांडाव्या लागतात त्या काढून टाकल्या पाहिजेत.

एखादी संस्था बंद होईल तेव्हा कामगारांना देय रकमा जरूर मिळाव्यात आणि त्याची खातरजमा सरकारने अवश्य करून घ्यावी. कामगारांना भरघोस भरपाईची रक्कम मिळेल हेही सरकारने पाहावे; पण बंद करण्याचा निर्णय सहजपणे होऊ द्यावा. अलिकडे दिल्लीतील डी.सी.एम. युनिट बंद करण्याचा प्रस्ताव असाच अनेक वर्षे रेंगाळत पडला आहे. खरे पाहता या संस्थेने यापूर्वी कधीही कोठेही मिळाली नसेल एवढी मोठी रक्कम कामगारांना भरपाई म्हणून देऊ केली आहे आणि त्याबाबत व्यवस्थापन आणि कर्मचारी यांच्यात करारही झाला आहे. तरीही असा प्रश्न लोंबकळत राहणे यातून औद्योगिक वाद आणि कामगारांचे हित या दोन्हींचे नुकसान होते.

## एक उदाहरण

हे बदल तातडीने व्हायला हवेत ही आजच्या आपल्या परिस्थितीची निकड आहे. बदल होण्यासाठी दोन गोष्टी सहाय्यक ठरतील. एक म्हणजे अशा प्रकारचे कामगारविषयक कायदे आणि त्यांची कार्यवाही यांचा इतर समाजावर किती दुष्परिणाम झाला आहे; इंग्लंडमध्ये यातून किती नुकसान झाले याकडे आपण आपले लोकप्रतिनिधी, पत्रकार आणि कामगार यांचे लक्ष वेधले पाहिजे. इंग्लंडसारख्या अनेक देशांना हे कायदे शेवटी का बदलावे लागले याचीही माहिती आपण त्यांना दिली पाहिजे. दुसरी सुधारणा म्हणजे आपल्याकडील कामगार संघटनांचे अंतर्गत व्यवहार, कामगार पुढाऱ्यांचे सामाजिक वर्तन, संप आणि इतर गोष्टी यांविषयीचे खरेखुरे चित्रण वृत्तपत्रात यायला हवे. या दोन्ही मुद्यांचा विचार आता मी करणार आहे.

या क्षेत्रातले आपले बहुसंख्य कायदे आणि व्यवहार हे इंग्लडच्या नमुन्यानुसार बेतलेले आहेत. येथे ऐंशी वर्षांपूर्वीच्या इंग्लंडचे उदाहरण ठेवू. कामगार संघटना आणि त्यांचे नेते यांनी औद्योगिक विवाद सोडवून घेण्यासाठी केलेल्या अनेक प्रकारच्या कृत्यांना या कायद्यांनी संरक्षण दिलेले होते. यातून अनेक दशके औद्योगिक असंतोष निर्माण झाला आणि प्रगती खुंटली तेव्हा थोडी तरी लक्ष्मणरेषा आखणे आवश्यक आहे हे अगदी पुरोगामी न्यायाधीशांनाही पटले. त्यांनी वेळोवेळी दिलेल्या निकालपत्रातून या कायद्यामध्ये फार मोठे बदल घडून आले.

गेल्या दशकात केलेल्या कायद्यानुसार कामगार संघटनांना आपल्या कारभाराची अंतर्गत साफसफाई करणे आवश्यक ठरले. उदा. दर पाच वर्षांनी कामगार संघटनेचे पदाधिकारी थेट मतदानाने निवडले गेले पाहिजेत, असा निर्बंध आला. शिवाय सक्षम अधिकाऱ्याने अथवा उच्च न्यायालयाने सांगितलेल्या निवडणूकविषयक नियमांचे पालन न केल्याबद्दल दोषी ठरविले तर कोणत्याही कारणासाठी अपील स्वीकारले जाणार नाही, अशी तरतूद केली गेली. कामगार संघटना ज्यासाठी आंदोलन छेडतात त्या औद्योगिक विवादाची व्याख्या अतिशय स्पष्ट आणि अव्याप्त करण्यात आली. उदा. खासगीकरणासारख्या एखाद्या सर्वसामान्य धोरणाविरुद्ध केलेले आंदोलन

हे औद्योगिक विवादाच्या व्याख्येत बसण्याची शक्यता नाही. या व्याख्येत बसण्यासाठी संघटनेची कृती ही कर्मचारी आणि त्यांचे व्यवस्थापन यांच्यामधील तंट्याविरुद्ध कर्मचारी जेथे काम करतात तेथील परिस्थितीशी, सोयी-सुविधांशी अशा विवादाचा थेट संबंध असायला हवा. १९०६ च्या जुन्या कायद्यानुसार अप्रत्यक्ष संबंध असला तरी संघटनेचे आंदोलन कायदेशीर ठरत असे. नव्या कायद्याने ही परिस्थिती बदलली.

कामगार संघटना एखाद्या त्रयस्थ व्यक्ती किंवा संस्थेवर दबाव टाकत असेल, औद्योगिक विवादात ज्याचा प्रभाव नाही अशा मालकाच्या कामात निदर्शने, धरणे या मार्गांनी अडथळा आणत असेल तर अशा कृतीला कायदेशीर संरक्षण नव्या कायद्यानुसार मिळणार नाही. त्याचप्रमाणे एका गटात अनेक कंपन्या असतील आणि त्यांपैकी एका कंपनीत औद्योगिक विवाद उद्‌भवला तर कामगार संघटनांनी त्याच कंपनीच्या इतर केंद्रांचे कामकाज बंद पाडणे किंवा त्यात अडथळा आणणे आता कायदेशीर ठरणार नाही. इंग्लंडमध्ये १९६० ते १९७० या दशकातील उग्र कामगार चळवळीनंतर हा नवा कायदा निर्माण करण्यात आला. त्याबद्दल लॉर्ड वेडरबर्न लिहितात : "या सर्व कायदेशीर प्रक्रियेत एक समान धागा दिसतो. कामगारांच्या संघटित शक्तीला आपल्या स्वतःच्या नोकरीच्या ठिकाणाच्या हद्दीत सीमित केले पाहिजे. अशी सीमारेषा कामगार किंवा त्यांची संघटना स्वतःभोवती घालून घेणार नाही. तर खासगी क्षेत्रात भांडवलदार आणि सार्वजनिक क्षेत्रात शासन आणि भांडवलदार यांनी संयुक्तपणे या मर्यादा घातल्या पाहिजेत. व्यापक स्वरूपाचे आंदोलन करणे बेकायदेशीर ठरेल. औद्योगिक विवादाची संकल्पना या मर्यादा ओलांडून जाणार नाही. समिती असो, लहान गट असो किंवा महाप्रचंड बहुराष्ट्रीय कंपनीचा गट असो, त्यातील प्रत्येक खासगी कंपनी आपला विवाद आपल्या कंपनीच्या परिघापुरता मर्यादित ठेवील. आस्थापनाच्या अशा मर्यादित व्याख्येमुळे संपावरील कामगारांना काढून टाकणे सुलभ होईल. या मर्यादा ओलांडून काम करणाऱ्या कामगारांना वाटाघाटीचा किंवा सल्लामसलतीचा फायदा घेता येणार नाही."

संप किंवा यासारखी अन्य कार्यवाही करण्याचा निर्णय कामगारांमध्ये गुप्त मतदान न घेता संघटनेने घेतला तर त्या कृत्याला कायद्याचे संरक्षण मिळणार नाही. असे मतदान घेण्याची कार्यपद्धती कायद्याने अतिशय कठोरपणे ठरवून दिली आहे. तिचा आढावा घेताना लॉर्ड वेडरबर्न लिहितात– "मतदानाचे नियम अतिशय कडकपणे ठरवून देण्यात आले आहेत. ज्या ज्या सभासदांना संघटना आपल्या कार्यवाहीमध्ये सहभागी करून घेणार आहे त्या सर्वांना मतदानाची संधी मिळाली पाहिजे. त्याखेरीज इतर कोणालाही तशी संधी मिळता कामा नये. एखाद्या अनधिकृत व्यक्तीला मतदान करू दिले किंवा एखाद्या पात्र व्यक्तीला मतदानाचा हक्क नाकारला तर न्यायालय असे मतदान अवैध ठरवू शकते. अशा वेळीं मालक संघटनेवर खटला भरू शकेल. तसेच अशा युनियनच्या कृतीला मिळणारे कायदेशीर संरक्षण गैर मतदानामुळे नाहीसे झालेले असेल. मतदान कामाच्या ठिकाणी घेतले पाहिजे किंवा पोस्टाने झाले पाहिजे. प्रत्येक सभासदाला मतपत्रिका दिली गेली

पाहिजे आणि शक्यतो त्याच्या सोयीच्या वेळेनुसार त्याला मतदान करता आले पाहिजे. त्यासाठी त्याला वेगळा खर्च करावा लागू नये. मतपत्रिकेत आपण या कारवाईत सहभागी व्हायला तयार आहोत का असा थेट प्रश्न विचारला गेला पाहिजे. या कारवाईला तुमचा पाठिंबा आहे का असा संदिग्ध प्रश्न नको. अशा कारवाईने त्याने मालकाशी केलेल्या नोकरीविषयक कराराचा भंग होण्याची शक्यता आहे याचीही जाणीव मतपत्रिकेत करून देणे आवश्यक आहे.'' (लॉर्ड वेडरबर्न यांच्या 'द न्यू पॉलिसीज् इन इन्डस्ट्रियल रिलेशन्स लॉ' या निबंधातून हे दोन्ही उतारे घेतले आहेत. पृष्ठ ४३-४४. पॅट्रिशिया फॉश ॲन्ड क्रेग लिटलर यांनी संपादित केलेल्या 'इन्डस्ट्रियल रिलेशन्स ॲन्ड द लॉ इन द नाईंटिनएटी' या पुस्तकात समाविष्ट आहेत. प्रकाशक : गावर, लंडन, १९८५)

अशा प्रकारचे मतदान संघटनेने संपाचा पुकारा करण्यापूर्वी घेतले पाहिजे. या मतदानातून संपाला मान्यता मिळाली तर ती चार आठवड्यांपुरतीच वैध राहील. एखाद्या संघटनेने न्यायालयाच्या आज्ञेचा भंग केला, आंदोलनाला न्यायालयाने दिलेली स्थगिती जुमानली नाही तर संघटनेची सर्व मालमत्ता गोठविली जाईल आणि तिच्या पदाधिकाऱ्यांना तुरुंगवास घडू शकेल. अशा वेळी संघटनेने आपल्या पदाधिकाऱ्यांना या आंदोलनाचे अधिकार दिले आहेत किंवा नाहीत याचा विचार केला जाणार नाही. धरणे, निरोधने यांबाबत कायद्यात केलेले बदल आणखी कडक आहेत. अडथळे आणणे किंवा हिंसाचार हे तर गुन्हे ठरतातच. परंतु सौम्य स्वरूपाची दहशत घालणे हाही गुन्हा ठरतो. दहशत घालणे म्हणजे काय ? यात अनेक गोष्टी येतात. एखाद्या व्यक्तीला किंवा तिच्या कुटुंबियांना भीती दाखविणे, तिच्या मालमत्तेचे नुकसान करणे, तिचा पाठलाग करणे, तिचे सामान व इतर मालमत्ता लपवून ठेवणे, तिला तिचे काम करू न देणे, अशा व्यक्तीच्या निवासस्थानाभोवती टेहळणी करणे अशा अनेक गोष्टींचा समावेश दहशत घालण्यामध्ये होतो.

नव्या कायद्यानुसार औद्योगिक विवादासाठी धरणे धरायचे असेल तर कामगार फक्त स्वतःच्या कामाच्या जागी किंवा जागेजवळ तसे करू शकतात. कामगार संघटनांचे पदाधिकारीही धरण्यात सहभागी होऊ शकतात. परंतु अशा धरण्यांचा उद्देश काय असावा हे कायद्याने ठरवून दिले आहे. शांततेने वागून काही देणे किंवा मिळविणे आणि दुसऱ्या व्यक्तीचे मन शांततामय रीतीने वळविणे एवढ्याच उद्देशाने धरणे धरणे कायद्याला मान्य आहे. आपले म्हणणे ऐकण्याची दुसऱ्यावर सक्ती करता येणार नाही. हिंसाचार, धमक्या, शिवीगाळ यांना कायदेशीर संरक्षण मिळणार नाही. याबाबतच्या काही खटल्यांचा गोषवारा कायद्याच्या पुस्तकात दिला आहे.

थॉमस न्यूज ग्रुप प्रकरणात न्यायालयाने दिलेल्या निकालपत्रात मोठा जमाव घेऊन निरोधने करणे हे स्वभावतः कायदेशीर असू शकत नाही, असा अभिप्राय व्यक्त केला होता. विशेषतः धरण्याच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पोलिसांचा बंदोबस्त लागणार असेल आणि निरोधनात सहभागी न होता कामावर येऊ इच्छिणाऱ्या कामगारांना बंद जाळीच्या खिडक्यांच्या खास बसेसमधून कामावर आणावे लागत

असेल तर, असे निरोधन कायदेशीर म्हणता येणार नाही. मेसेंजर्स न्यूज पेपर्स ग्रुप लिमिटेड विरुद्ध नॅशनल ग्राफिकल असोसिएशन (१९८४ आयएलएलआर ९७, परिच्छेद ४८) या प्रकरणात न्यायमूर्ती कॉल्फिड यांनी हिंसाचार करू पाहणाऱ्या जमावाचे वर्णन 'घृणास्पद झुंडशाही' असे केले... निरोधने किंवा धरणे यासाठी नेमून दिलेली आचारसंहिता स्पष्टपणे सांगते की, कामाच्या ठिकाणी प्रवेशद्वारावर धरणे धरायचे असेल तर साधारणतः सहा लोक पुरेसे मानले जातील. अनेक वेळा यापेक्षा कमी संख्या असणेही योग्य ठरेल. ही आचारसंहिता कायदेशीर दृष्टीने बंधनकारक नाही. परंतु सहा ही संख्या अनेक निकालपत्रांत योग्य मानली गेली आहे. थॉमस विरुद्ध नॅशनल युनियन ऑफ माईन वर्कर्स आणि न्यूज ग्रुप प्रकरणामध्ये कार्यालयाच्या प्रवेशद्वारात सहापेक्षा अधिक लोकांनी धरणे धरण्यास परवानगी दिली जाणार नाही असे न्यायाधीशांनी म्हटले होते. (वरील प्रकरणाच्या तपशिलासाठी पाहा : जॉन बॉवर्स व मायकेल ड्यूगन : द मॉडर्न लॉ ऑफ स्ट्राइक्स, फिनान्शियल ट्रेनिंग, लंडन, पृष्ठ ५६-५७

## वृत्तांत आणि वाचन

अशा तऱ्हेच्या औद्योगिक परंपरा भ्रष्ट झाल्या. अगदी खालच्या थराला जाऊन पोहोचल्या याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे कामगार संघटनांच्या पुढाऱ्यांच्या एकंदर सामाजिक वागणुकीविषयी कोठेच काही लिहिले जात नाही. कामगारसंघटनांमध्ये अंतर्गत लोकशाहीचा अभाव असतो, याच्या खऱ्या हकीकती छापून येत नाहीत. ही परिस्थिती बदलली पाहिजे आणि यात वृत्तपत्रांनी महत्त्वाचा वाटा उचलला पाहिजे. एखादा संप त्याबद्दल प्रसार माध्यमांनी बातमी द्यावा इतका महत्त्वाचा असेल तर वृत्तपत्रांनी आणि या माध्यमांनी काही गोष्टी स्पष्ट केल्या पाहिजेत.

* संपामागील नेमक्या घटना कोणत्या ? वादग्रस्त मुद्यांबाबत दोन्ही बाजूंचे नेमके म्हणणे काय ? वाटाघाटी कोणाकडे चालतात ? लवादासारखा इतर तडजोडीचा मार्ग चोखाळला गेला का ? नसल्यास का नाही ?

* संप किंवा संथगती काम याबद्दलचा निर्णय मताला टाकण्यात आला होता का ? असल्यास गुप्त मतदान झाले की अ ाजी मतदान ?

* संपावरील कामगारांचे सरासरी वेतनमा .

* धरणे शांततामय आहे का ? दहशत किंवा हिंसा यांचा वापर होतो का ? निदर्शकांत कर्मचारी किती आणि बाहेरचे किती ?

* कामगार अशा काही बोलक्या कसोट्या लावून परिस्थितीचे मूल्यमापन करू शकतील. तडजोडीचा एखादा प्रस्ताव फेटाळला आणि संपाची हाक दिली त्यापूर्वी कामगारांचे मत घेतले होते का ? आपल्या सहकाऱ्यांना घाबरविण्यासाठी किंवा बदडून काढण्यासाठी पुढाऱ्यांनी भाडोत्री गुंड बोलावले होते का ? पुढाऱ्यांची निवेदने वस्तुस्थितीशी सुसंगत आहेत का ? संप चालू ठेवण्यासाठी बाहेरच्यांना बोलावणे पुढाऱ्यांना कितपत निकडीचे वाटते ? काही मोजमापांनी कामगार आपल्या पुढाऱ्यांचा नेमका स्वभाव जाणून घेऊ शकतील. संप करावा किंवा संप चालू

ठेवावा असे बहुसंख्य कामगारांचे मत आहे, असे विधान कामगार नेते करतात ते खरे आहे का याचा अंदाज कामगारांना घेता येईल.

वृत्तपत्र वाचणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांनी एखाद्या संपाला पाठिंबा देण्याआधी किंवा विरोध करण्याआधी वरील सर्व मुद्यांबाबत पुरेशी माहिती मिळविली पाहिजे. निव्वळ काही भल्या व्यक्तींनी संपाच्या बाजूने किंवा विरोधात निवेदने काढली म्हणून नागरिकांनी भारून जाण्याचे कारण नाही. अशा व्यक्ती वस्तुस्थितीची पुरेशी तपासणी न करता निवेदने काढतात किंवा दुसऱ्यांनी काढलेल्या निवेदनावर सह्या करतात असा माझा अनुभव आहे. ही माणसे मनाने फार चांगली असतात; पण लोकांनी आपल्याला पुरोगामी म्हटले पाहिजे, सतत म्हणत राहिले पाहिजे याची भलतीच काळजी त्यांना लागून राहिलेली असते. त्यामुळे हे घडते.

संस्थांनी काढलेल्या निवेदनांची स्थितीही बहुधा अशीच असते. त्यांची निवेदने वृत्तपत्रे आपल्याकडे पोचवितात. अशा संस्थांपैकी बहुतेकांचे अस्तित्व कागदोपत्रीच असते. अनेक संस्थांचे पदाधिकारी समान असल्याने त्या आतून एकमेकांशी मिळालेल्या असतात. उदाहरण द्यायचे तर पत्रकार संप करतात तेव्हा इतर वृत्तपत्रांत संपावरील कामगार संघटनेच्या निवेदनाबरोबरच एखाद्या राष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या स्थानिक शाखेचे निवेदन वाचायला मिळते. मग ती राष्ट्रीय संघटना आणि इतर राष्ट्रीय संघटना आणि त्यांच्या स्थानिक शाखा ही निवेदने प्रसिद्ध करतात. त्यामागील नावे तपासली तर ती समान असतात किंवा त्यांच्यात थेट संबंध असतो. अनेक संघटना एखाद्या राजकीय पक्षाशी संलग्न असतात. उदा. साम्यवादी पक्षाशी संलग्न अशा कामगार संघटना अनेक क्षेत्रांत आहेत. एका क्षेत्रातील संघटनेने संप पुकारला तर इतर सर्व संलग्न संघटना पाठिंब्याची पत्रके काढतात. कामगारांची बाजू चूक असो किंवा बरोबर, सामान्य नागरिकांनी पत्रकबहाद्दरांच्या संख्येने भारून न जाता आपले मत बनवावे.

एवढ्या सगळ्या बारकाव्यांची छाननी करण्याइतका वेळ आहे कोणाला असा प्रश्न यावर विचारला जातो. परंतु एखाद्या प्रश्नाबाबत आपण काही भूमिका घ्यावी इतका तो मोठा असेल तर वस्तुस्थितीची छाननी करण्यात वेळ घालविणे आणि त्यासाठी जरूर ते कष्ट घेणे हे आपले कर्तव्यच आहे.

## जेव्हा पत्रकार संप करतात

एखाद्या संपात पत्रकारांचा सहभाग असतो तेव्हा अधिक काळजी घ्यायला हवी. अशा वेळी निव्वळ विविध व्यक्तींनी काढलेली निवेदनेच तपासणे पुरेसे नाही तर अशा संपाला किती प्रसिद्धी दिली याचीही चिरफाड करावी लागेल; असे माझे अनुभव सांगतात. पत्रकारांच्या संपाच्या काळात वृत्तपत्रे जे काही छापतात ते जवळजवळ अर्धसत्य असते, असे वाचकांनी खुशाल गृहित धरावे. जवळजवळ अर्धसत्य असे मी म्हणतो; याला कारण आहे. मी पाहिलेल्या तीनही संपांत वृत्तपत्रांतील बातम्या निव्वळ एकांगी होत्या एवढेच नव्हे, तर त्यातील अनेक सपशेल खोट्या होत्या. या खोटेपणाची कारणे तीन.

पत्रकारितेत खोटे नि अर्धवट क्रांतिकारी आणि उदारमतवादी यांचा भरणा खूप आहे. त्यामुळे संपाबद्दलच्या लिखाणाला एक विशिष्ट रंग येतो. एखादा तरुण वार्ताहर नुकताच विद्यापीठातून निघून पत्रकारितेत आलेला असतो. त्याच्या डोक्यात अर्ध्याकच्च्या संकल्पना असतात. कामगारांच्या प्रत्येक छोट्या-मोठ्या कुरबुरीत त्याला नव्या क्रांतीची पहाट दिसू लागते. कामगार संघटनातील दलालांची त्याच्यावर छाप पडते आणि मग त्यांची मते कामगारवर्गाचे भले करणारी आहेत अशी बातमी तो लिहून टाकतो. संपादक अर्धवट बुद्धीचा, उदारमतवादी असल्यास अशा वार्ताहराला वस्तुस्थिती पुन्हा एकदा तपासून पाहायला सांगण्याचे धैर्य तो दाखवीत नाही. यामधून येणारा पक्षपाती वृत्तांत अखेरीस कामगारांचेही नुकसान करतो. त्यांनी चुकीचा आणि न टिकणारा पवित्रा घेतला असेल तर अशा चुकीच्या बातम्यांमुळे तो घट्ट होतो. कामगार संघटनांचे जे दलाल यातून आपली पोळी भाजून घेत असतात त्यांच्यावरची कामगारांची श्रद्धा बळावते.

दुसरे कारण म्हणजे वृत्तपत्रांमधील परस्परसंबंध. सन १९८१-८२ मध्ये एक्स्प्रेसने जी कामगिरी बजावली त्यातून त्या वेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अंतुले यांची हकालपट्टी झाली. १९८७ मध्ये हे वृत्तपत्र राजीव गांधींच्या सरकारची दुष्कृत्ये चव्हाट्यावर आणण्यात गुंतलेले होते. अशा प्रकारचे कार्य करणे याचा एक अर्थ म्हणजे सरकारची री ओढणाऱ्या इतर वृत्तपत्रांना लाजविणे किंवा धडा शिकविणे असा होता. त्यामुळे या दोन्ही प्रसंगी एक्स्प्रेसच्या प्रकाशनात खंड पडला तेव्हा इतर वृत्तपत्रांत आलेल्या बातम्या पक्षपाती आणि एकांगी होत्या. दत्ता सामंतांची माणसे मुंबईच्या इंडियन एक्स्प्रेसच्या कर्मचाऱ्यांना धमकावीत आणि बडवीत होती हे कोणत्याही वृत्तपत्राने छापले नाही. १९८७ मध्ये तर बहुसंख्य वृत्तपत्रांनी सरकारच्या बाजूचाच प्रचार केला. टाईम्स ऑफ इंडिया आणि हिंदुस्थान टाईम्स यांसारखी अनेक वृत्तपत्रे म्हणजे सरकारी प्रचाराचे कर्णेच बनली होती. त्या वेळचा संप हा सरकारनेच घडवून आणला असल्यामुळे इतर वृत्तपत्रे केवळ कामगार संघटनेच्या दलालांचीच नव्हे तर थेट सरकारचीच भूमिका आवर्जून मांडत होते. एक्स्प्रेस गटातील साठ पत्रकारांची प्रथम आणि नंतर शंभर पत्रकारांची निवेदने, इतर वृत्तपत्रांनी छापलीच नाहीत. या सगळ्यावर कळस म्हणजे आमच्यावरच आमच्या कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याचा आरोप ठेवण्यात आला. याबद्दलचे भले मोठे वृत्तांत देशभरच्या सगळ्या वृत्तपत्रांत छापून आले आणि आम्हाला दूषणे देणारे अग्रलेख लिहिले गेले. सुदैवाने हे सगळे प्रसंग दोन महत्त्वाच्या ठिकाणांहून व्हिडिओ कॅमेऱ्यांनी चित्रित केले होते. आमच्या कामगारांना मारहाण करणारे भाडोत्री गुंड होते आणि काही इतर कामगार संघटनांतील सभासद होते हे या चित्रपटात स्पष्ट दिसले. घोषणा देणारे, प्रवेशद्वारावर अडवणारे आणि शेवटी कामावर जाऊ पाहणाऱ्या कामगारांना पिटणारे कोण याची ओळख पटवणे सहज शक्य होते. कोणताही संवाद न करता हा चित्रपट बारा पत्रकारांना दाखविला गेला. त्या अगोदर लिहिलेल्या गोष्टी आठवून त्यातील अनेकांची पंचाईत झाली, त्रेधा उडाली. पण एकानेही चुकीची दुरुस्ती छापण्याचे धैर्य दाखविले नाही. नमुनेदार उदाहरण म्हणजे

हा चित्रपट मी टाईम्स ऑफ इंडियाचे त्या वेळचे कार्यकारी संपादक आणि वरिष्ठ अधिकारी यांना दाखविला होता. तेव्हा मारहाण करणारे काहीजण टाईम्सचे कर्मचारी आहेत, असे त्यांनी ओळखले. मारहाण कोणाला झाली आणि कोणी केली या गोष्टी चित्रपटात स्पष्ट दिसत होत्या. आपण आता ही वस्तुस्थिती आपल्या संपादकांच्या नजरेला आणाल का ? अशी विचारणा मी त्यांना केली. त्यावर उत्तर मिळाले, "पण त्याचा उपयोग काय ? अरुण, आमच्या संपादकांचे भाष्य हे नेहमीच वस्तुस्थितीपेक्षा स्वतंत्र असते हे तुला माहिती आहेच !" टाईम्सच्या बातम्या, लेखात आणि अग्रलेखात आमच्याविरुद्ध जे गरळ ओकले जात होते त्याला तेथेच उत्तर देण्याची संधी मिळावी, अशी विनंती मी कार्यकारी संपादकांना केली. एक दशकाहून अधिक काळ युरोपमध्ये घालवून परतलेले हे महाशय म्हणाले, "पण भारतामध्ये उत्तर देण्याच्या हक्काला मान्यता आहेच कोठे ?"

तिसऱ्या संपात हीच गोष्ट पण वेगळ्या कारणासाठी घडली. या वेळी वृत्तपत्रांविरुद्ध विशिष्ट सरकार उभे ठाकले अशी गोष्ट नव्हती. व्यवस्थापन आणि कामगार यांच्यांत काहीं वेळा मतभेद होतात तसा हा प्रसंग होता. या वेळी पत्रकारांनी एकजुटीने फळी उभी केली. परिणाम असा झाला की, एक्स्प्रेसच्या कार्यालयाबाहेर निदर्शनें करणारे बहुसंख्य लोक बाहेरून आलेले होते ही गोष्ट इतर वृत्तपत्रांनी दडपून टाकली आणि एक्स्प्रेसचेच कर्मचारी निदर्शनें करीत आहेत असा आभास निर्माण करणाऱ्या बातम्या दिल्या. बाहेरच्या लोकांनी दिलेल्या धमक्या आणि निर्माण केलेली दहशत यांच्या बातम्या दडपून टाकल्या गेल्या. वेतन आयोगाच्या निवाड्यातील ज्या तरतुदींबद्दल वाद होता तिचे स्वरूप कमालीचे पक्षपाती होते याचा साधा उल्लेखसुद्धा कोणी केला नाही. मग त्याची चर्चा करणे बाजूलाच राहिले. पुढे पत्रकारेतर कर्मचाऱ्यांपैकी ऐंशी टक्क्यांहून अधिक कर्मचाऱ्यांनी कामगार आयुक्तांना निवेदन दिले आणि संप संपवून कामागवर जाण्याची इच्छा असल्याने टाळेबंदी उठविण्याची मागणी केली ही गोष्टही दडपून टाकली गेली. मग या कामगारांनी त्या अर्थाचे निवेदन तयार केले, तेही वृत्तपत्रांनी छापले नाही. वृत्तसंस्थांनी नेहमीच्या बातमीचा भाग म्हणून हे निवेदन प्रसारित केले. ज्या वृत्तपत्रांनी हे प्रसिद्ध केले त्यांनी कामगारांच्या निवेदनाचा उल्लेख असलेला मजकूर वगळून टाकला. एका पाठोपाठ एक कामगार कामावर परत येऊ लागले ही वस्तुस्थितीही वृत्तपत्रांनी दडवून ठेवली. बातम्या इतक्या विकृत करून दिल्या जात होत्या की, शेवटी इतर वृत्तपत्रांत जाहिराती देऊन लोकांसमोर वस्तुस्थिती मांडणे एक्स्प्रेसला भाग पडले. या जाहिराती स्वीकारण्याचे ज्या वृत्तपत्रांनी मान्य केले त्यांनी एक्स्प्रेसला त्यातील मजकूर सौम्य स्वरूपात मांडायला भाग पाडले. कारण एरवी बातम्यांतून त्यांनी केलेली फसवणूक उघडकीला आली असती ! इतर क्षेत्रांप्रमाणेच कामगार चळवळीच्या क्षेत्रातही जनमत महत्त्वाचे आहे आणि जनमत तयार करण्याचे महत्त्वाचे साधन वृत्तपत्र हे आहे. त्यामुळे सुधारणेला सुरुवात करायला वृत्तपत्रसृष्टी हे उत्तम क्षेत्र. त्यासाठी–

* औद्योगिक वादासंबंधी वृत्तपत्रे जे लिहितात, त्याबद्दल नेहमी सावध राहा,

संशयी राहा.

* एखाद्या आंदोलनात पत्रकारसुद्धा सामील असतील तर त्याबद्दलच्या वृत्तपत्रात येणाऱ्या बातम्या या जवळजवळ अर्धसत्य असू शकतील हे ध्यानात घ्या.

* वृत्तपत्रीय कर्मचाऱ्यांना एकत्र आणणाऱ्या कामगार संघटनेच्या व्यवस्थेची छाननी करा. त्यांच्यात अंतर्गत लोकशाही आहे का, त्यांना निधी कोठून मिळतो, विशेषत: त्यांच्या नेत्यांचे सामाजिक व्यवहार कसे आहेत याचा शोध घ्या आणि तुमचे निष्कर्ष प्रकाशित, प्रसिद्ध करा. शक्य असेल तर वृत्तपत्रांत आणि गरज पडली तर वृत्तपत्राशिवाय !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# ११. वृत्तपत्रांबाबत काय करायला हवे ?

वृत्तपत्रे एखाद्या व्यक्तीबद्दल लिहितात, तेव्हाच त्या व्यक्तीला त्यांची अवस्था काय आहे ते लक्षात येते. आज आपल्या वृत्तपत्रसृष्टीची वैशिष्ट्ये दोन प्रकारची दिसतात. एकीकडे व्यवस्थित संशोधन करून जबाबदारीने केलेले लिखाण छापतात तर दुसरीकडे द्वेषमूलक, बातम्या म्हणून वाटेल ते जावईशोध छापणे. त्यातून निरपराध व्यक्तींना होणाऱ्या मानसिक त्रासाची पर्वा न करणे, दुसऱ्याने जाणून-बुजून घुसविलेल्या बातम्या वापरणे, काहीही चौकशी न करता टीकेचा आसूड ओढणे, हे प्रकार बळावलेले दिसतात.

काही वृत्तपत्रांनी मी कधीही न दिलेल्या मुलाखती माझ्या नावे छापल्या आहेत. मी न केलेली निवेदने माझ्या तोंडी घातली आहेत. मी ज्या व्यक्तींची किंवा कामांची कधी चर्चा केली नाही, त्या माझ्या बातम्या असल्याचे काही वृत्तपत्रांनी जाहीर करून टाकले. अनेकदा मी समारंभाला हजर असल्याच्या बातम्या छापून आल्या मी तर त्या शहरात त्या दिवशी नव्हतो.

सुरुवातीला मी अशा गोष्टींमुळे दुखावला जात असे. पण खोटारड्या लिखाणाचा ओघ वाहतच राहिला तसतसा मी दुर्लक्ष करायला शिकलो. वृत्तपत्रे ज्यांच्यावर टीका करतात त्यांनी हा पहिला धडा शिकला पाहिजे, असे मला वाटते. भारतात ज्याला चांगले काम करायचे आहे त्यांनी वृत्तपत्रांकडे दुर्लक्ष करायला शिकावे. आपली वागणूक शुद्ध असेल, जनहिताला आपली खरीखुरी बांधिलकी असेल, तर वृत्तपत्रातल्या बातम्यांपलिकडे जाऊन लोकांना आपली ओळख पटेल, अशी मला आशा वाटते. पण ही आशा आहे, खात्री नाही. त्यामुळे धूर सोडणारी वाहने आणि कर्कश किंचाळणारे कर्णे या गोष्टी जशा आपण अटळ म्हणून खपवून घेतो, तशाच प्रकारे वृत्तपत्रांतील बदनामीचीही आपण सवय लावून घेतली पाहिजे. अर्थात तरीही जेथे कमालीचा निष्काळजीपणा, विद्ध्वंस, क्रौर्य दिसेल तेथे ते दुरुस्त केले पाहिजे, निगरगट्टपणा उघडकीला आणला पाहिजे.

## निष्काळजीपणा व बेपर्वाई

याची शेकडो उदाहरणे मी देऊ शकेन. बेपर्वाईने वृत्तपत्रे माणसाला मनाने जखमी कशी करू शकतात याचा एक नमुना पाहण्यासारखा आहे. हा प्रसंग जयप्रकाश नारायण (जे. पी.) यांच्याबाबत घडला. जेपीइतका निगर्वी, मृदू स्वभावाचा

आणि छोट्या-मोठ्या गोष्टींवर अपमान न मानून घेणारा माणूस सापडणे विरळा. १९७० मध्ये मुसाहारी भागात केलेल्या कामाची हकीकत 'फेस टू फेस' या पुस्तकात त्यांनी दिली आहे.

"ही घटना गेल्या जूनच्या सुरुवातीची आहे. माझा उत्तराखंडाचा दौरा अचानक रद्द करून मी तातडीने मुझफ्फरला पत्नीसह पोहोचलो. त्या जिल्ह्यातील मुसाहारी भागात ठाण मांडून बसण्याचा निर्धार जाहीर केला. त्या भागात नक्षलवादी चळवळ जोरात होती. नक्षलवाद्यांनी चार खून केले होते, एक सशस्त्र दरोडा घातला होता आणि आमच्या दोन प्रमुख सर्वोदयी कार्यकर्त्यांना खुनाची धमकी दिली होती. माझ्या या घोषणेला वृत्तपत्र आणि आकाशवाणी यांनी भलतेच नाटकी स्वरूप दिले आणि जेपींनी नक्षलवाद्यांचे आव्हान स्वीकारून त्यांच्या संघर्षात उडी घेतल्याची बातमी दिली. हे प्रकरण सनसनाटी बनविण्यावर वृत्तपत्रांचा इतका भर होता की, मुझफ्फरला मी पोहोचल्यानंतर तीन मुसाहारी खेड्यात एक खून झाला, तेव्हा नक्षलवाद्यांनी जेपींना दिलेले हे उत्तर आहे असे वृत्तपत्रांनी जाहीर केले. एका वृत्तपत्राने तर ज्याचा खून झाला तो सर्वोदयी कार्यकर्ताच होता असाही शोध लावला. काही आठवड्यांनंतर मी ज्या गाडीतून प्रवास करीत होतो तिला किरकोळ अपघात झाल्यानंतर तो माझ्या खुनाचा प्रयत्न आहे असेही वृत्तपत्रांनी ठरवून टाकले. या दोन्ही गोष्टी खोट्या होत्या. अपघात किंवा खून, दोन्ही राजकारणी हेतूने घडलेले नव्हते. अशा बातम्या चटकदार वाचन म्हणून उपयोगी पडत असतील, परंतु त्यांनी मला किंवा माझ्या कामाला न्याय दिला नाही किंवा नक्षलवाद्यांची कारणे आणि त्यावरील विधायक उपाय याबाबत लोकांचे प्रबोधनही केले नाही. अशी कित्येक उदाहरणे देता येतील. परंतु अशा खोट्या-नाट्या गोष्टी छापल्यामुळे वृत्तपत्राला, त्यांच्या संपादकाला किंवा बातमीदाराला काही त्रास झाला आहे, अशी उदाहरणे मात्र बहुधा आढळणार नाहीत."

## क्रौर्य

वृत्तपत्रे इतरांना दुखावतात आणि जेपींसारख्या बड्या पुरुषाचे कामही अवघड करून ठेवतात, ते काही निव्वळ निष्काळजीपणे नव्हे. अनेकदा ती उघड विखारी क्रौर्य दाखवितात, असे भरपूर अनुभव माझ्या गाठी आहेत. त्यांपैकी हा एक. महाराष्ट्राचे तेव्हाचे मुख्यमंत्री अ. र. अंतुले यांची कृत्ये मी चव्हाट्यावर मांडली होती. त्यावर काहूर माजल्याने अंतुले आणि दिल्लीतील त्यांचे आश्रयदाते अडचणीत सापडले होते. अशा वेळी मुंबईतून प्रसिद्ध होणाऱ्या 'सुसाट' या मासिकाने एक बातमी छापली. मी सी. आय. ए.चा एजंट आहे आणि अंतुलेंनी अमेरिकेने पाकिस्तानला केलेल्या शस्त्रपुरवठ्यावर टीका केली म्हणून सी. आय. ए.च्या चिथावणीने मी अंतुल्यांवर हल्ला चढविला, असा बातमीचा आशय होता. माझ्या मुलाच्या आजारीपणाच्या सबबीवर मी वारंवार परदेशी जातो आणि माझ्या तिथल्या साहेबांना भेटतो, असे बातमीत म्हटले होते. अंतुले यांच्याकडे याबाबतचा पुरावा असून योग्य वेळी ते तो पुढे आणतील, असा दम दिलेला होता.

यातील प्रत्येक अक्षर खोटे होते. कित्येक वर्षांत मी परदेशात गेलेलो नव्हतो. अर्थात एव्हाना बदनामीची अशी सवय झाल्याने मला या बातमीचे वाईट वाटले नाही. पण माझ्या मुलाचे आजारपण त्यात ओढलेले मात्र मला सहन झाले नाही. त्या वेळी तो सहा वर्षांचा आणि मज्जारज्जूंच्या गंभीर दुखण्याने आजारी होता. त्याला दमछाक होत असे आणि चालणे तर सोडाच पण तो उभासुद्धा राहू शकत नसे. त्याला आपल्या एकाच हाताचा उपयोग करता येत असे. फिट येण्याच्या आजारातून तो नुकताच बरा झाला होता. इतके सारखे आजारपण म्हणजे लंगडी सबब असे या मासिकाचे म्हणणे होते !

मी या मासिकाला कोर्टात खेचले. संपादक आणि प्रकाशकांनी आपली बाजू मांडणारे निवेदन दिले. जी बातमी छापली त्यासाठी काही पुरावा उपलब्ध नाही, असे निवेदनात म्हटले होते. जी बातमी छापली त्यावर आमचा विश्वास नाही असे त्यांनी म्हटले होते. शौरी यांच्याबद्दल आम्हाला आदर आहे आणि ते उत्तम तऱ्हेने देशसेवा करतात असे आमचे मत आहे आणि अशा चांगल्या माणसाबाबतसुद्धा किती खोटे लिहिले जाते हे वाचकांना कळावे म्हणून म्हणे त्यांनी ही सगळी बनावट कथा छापली होती !

अशा तऱ्हेचा हा एकच अनुभव नाही. पत्रकार आणि त्यांच्या संघटना यांनी शपथेवर खोटी निवेदने केल्याचे मी पाहिले आहे. माझ्या लिखाणाच्या विरोधात लिहिणाऱ्या काही स्तंभलेखकांनी खासगीत माझ्यापाशी क्षमायाचना केल्या आहेत आणि सार्वजनिकरीत्या दिलगिरी व्यक्त करण्याची आपली हिंमत नसल्याचेही कबूल केले आहे. एखादी अफवा पसरविणे आणि नंतर सत्यस्थिती छापून चुकीची दुरुस्ती करायला नकार देणारे संपादक मी पाहिले आहेत. त्यामुळे सर्वसाधारण अशा लोकांकडे दुर्लक्ष करणे आणि आपण आपले काम पुढे चालू ठेवणे हेच चांगले. पण तरीही एखाद्या वेळी त्यांच्यापैकी एखाद्याला न्यायालयात खेचणे आणि जाहीररीत्या त्याची शोभा करणे हेसुद्धा उदाहरण घालून देण्यासाठी आवश्यक ठरते. यामुळे त्यांची वागणूक सुधारण्याची शक्यता कमी असते. सोसायटी मासिकाने अगदी निर्लज्जपणे जाहीर माफी मागितली. त्याचे त्यांना काही वाईट वाटल्याचे मला दिसले नाही. पण कितीही निगरगट्ट असले तरी काही लेखनाची अधून-मधून धुलाई करणेसुद्धा उपयुक्त ठरते. त्यात निदान एवढे तरी समजते की, छापून येते ते सर्व खरे असतेच असे नाही, अशी शंका घ्यायला लोक शिकतात.

अशा धुलाईसाठी बदनामीच्या कायद्यात कोणी दुरुस्ती करण्याची गरज नाही. आपल्या न्यायालयांच्या कार्यपद्धतीत मात्र बदल करायला हवा. न्यायालयांनी वारंवार पुढच्या तारखा देणे टाळले पाहिजे. अनेक वृत्तपत्रांचे, पुढच्या तारखा घेऊन वेळ घालविणे हे बचावाचे तंत्र होऊन बसले आहे. ज्यांची बदनामी होते त्यांच्या मागे कोणत्याही संस्थेचे पाठबळ नसल्याने त्यांना सतत वेळ फुकट घालविणे परवडत नाही, त्यामुळे एक तर अशा बदनामीकडे ते साफ दुर्लक्ष करतात, दुसरे मधून-मधून एखाद्या वेळी बदनामी करणाऱ्याला वैध मार्गाने धडा शिकवितात आणि तिसरे म्हणजे न्यायाधीशांना वारंवार तारखा पुढे न ढकलण्याची विनंती

करतात.

## धंदेवाईकपणा

निष्काळजीपणाने बातम्या छापून आणि काही वेळा खोडसाळपणे विपर्यस्त गोष्टी छापून वृत्तपत्रे एखाद्या व्यक्तीला घायाळ करू शकतात. चांगली कामे करणारी सर्वच माणसे बदनामीला अत्यंत धैर्याने तोंड देऊ शकतात असे नाही. त्यातील काही नाउमेद होऊन काम सोडून देण्याचीही शक्यता असते. त्यामुळे चांगल्या कामाला खीळ बसते आणि त्यातून होणाऱ्या फायद्यापासून लोक वंचित राहतात. दुसरे एक उदाहरण घेऊ. आसामसारख्या देशाच्या मुख्य भूमीपासून दूरवरच्या प्रदेशात राष्ट्रीय वृत्तपत्रे ही स्थानिक लोकांच्या दृष्टीने देशाची प्रतिके बनतात. १९८० च्या दशकाच्या सुरुवातीला आसाममध्ये अभूतपूर्व असे जनआंदोलन सुरू असताना ही वृत्तपत्रे चित्रपटांच्या, नाचगाण्यांच्या परीक्षणाला किती तरी जास्त जागा आणि महत्त्व देत राहिली. अशा वेळी या देशाला आपली पर्वा नाही, असे आसामी जनतेला वाटणे स्वाभाविक आहे. अनेक राष्ट्रीय वृत्तपत्रे आणि विशेषत: कलकत्त्याच्या बड्या वृत्तपत्रांनी बातम्या विपर्यस्त पद्धतीने छापल्या. त्यामुळे आपल्या खऱ्याखुऱ्या अडचणींवर या देशाच्या नागरिकांचा विश्वास नाही, असे आसामी जनतेला वाटणे स्वाभाविक होते. अशा गोष्टींतून परकेपणा वाढत जातो. बेपर्वाई आणि निष्काळजीपणा यांच्याखेरीज आणखी काही गोष्टींमुळे पत्रकारितेला असलेले धोके वाढतात. सार्वजनिक कर्तव्यबजावणीची वृत्तपत्रांची क्षमता त्यामुळे अधिक कमी होते. श्री. रोमिका गोयंका यांचे अचूक वर्णन करतात... "पत्रकारिता एके काळी मिशनरी बाणा होता. आता तेथे मारेकरी वावरत आहेत."

धंदेवाईकपणा अगदी मोकाट सुटला आहे. त्यात आज-काल आपल्या समाजात बोकाळत चाललेल्या ग्राहकवादाची भर पडून गोंधळ वाढतो आहे. वृत्तपत्रसृष्टीत अनेक नवीन प्रकाशक येत आहेत आणि त्यातील कित्येकजण आपण येथे पैसा कमविण्यासाठी आलो असल्याचे उघडपणे सांगतात. कित्येक संपादक व पत्रकारही आज जी मूल्ये उघडपणे बदलतात ती पाहिली तर एखाद्या साबण विकणाऱ्या धंद्यातसुद्धा विक्रेता म्हणून ते सहज खपतील असे वाटते. निदान एका अगदी बड्या प्रकाशकाची गोष्ट तरी मी स्वानुभावाने सांगू शकेन. या गृहस्थाने तर एखादा साबणविक्रेता म्हणून खपतील अशीच माणसे संपादक व पत्रकार म्हणून नेमण्याचा वसाच घेतला आहे. या प्रकाराला संस्थात्मक रूप देण्याच्या उद्देशाने टाईम्स ऑफ इंडिया गटात स्थानिक संपादक व जाहिरात व्यवस्थापक यांची पदनामे बदलण्यात आली आहेत. आता त्यांना अनुक्रमे 'स्थानीय संपादक– व्यवस्थापक (प्रतिसाद)' आणि 'व्यवस्थापक (प्रतिसाद)– दुय्यम स्थानीय संपादक' असे म्हटले जाते. काही संपादकांनी अशी व्यापक जबाबदारी अंगावर घेण्याच्या बाबत फाजील उत्साह दाखविला आहे.

तेव्हा एकीकडे आपल्या काही प्रकाशकांना आपल्या कक्षेतील विविध प्रकाशने म्हणजे जुन्या साबणाचे वेगवेगळे नमुनेच वाटतात. आपले संपादक, पत्रकार यांनी

त्यांच्या उत्पादनाकडे याच दृष्टीने पाहावे आणि साबण विक्रेता आपले उत्पादन बदलतो त्याच पद्धतीने संपादकाने आपल्या प्रकाशनाबद्दल बोलावे, अशी अपेक्षा आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यांच्या हातात-हात घालून निघालेले संपादक-पत्रकार यांना वाचकाला हवे ते देण्याची उत्कंठा लागली आहे. वृत्तपत्र व्यवसायात येत असलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान, आक्रमक जाहिराती आणि प्रकाशक व पत्रकारितेचा हा असा व्यापारी दृष्टिकोन या तीनही संयोगाने आपल्या प्रकाशनांचे स्वरूप पालटत आहे. याचा अटळ परिणाम म्हणजे व्यवस्थापकाचे लक्ष सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयाकडे वेधून घेण्याऐवजी अनेक वृत्तपत्रे त्यांची दिशाभूल करण्याचे साधन बनत आहेत.

लोकांनी निर्णय घ्यावेत हे लोकशाही कारभाराचे महत्त्वाचे सूत्र. परंतु ज्या समाजात लोकांना खरी माहिती मिळत नसेल, कृतीसाठीही प्रेरणा आणि क्वचित प्रक्षोभसुद्धा लाभत नसेल, त्याऐवजी निव्वळ दिशाभूल आणि करमणूक मिळत असेल, त्या लोकांनी घेतलेले निर्णय तरी काय लायकीचे असतील ?

पत्रकारांनी शुद्ध व्यावसायिक दृष्टिकोन स्वीकारावा ही कल्पनासुद्धा थोडीशी कमी घातक आहे. आल्बर्ट स्पीयर हाही उत्तम व्यावसायिक होता. एखाद्या व्यावसायिक मारेकऱ्याची नेमबाजी आणि एखाद्या योद्ध्याची नेमबाजी यांचा दर्जा सारखाच असू शकतो. नवे तंत्रज्ञान आणि कौशल्य यांच्यामध्ये सार्वजनिक हिताची कळकळ भरली नाही तर त्याचा शेवट महत्त्वाच्या पण अप्रिय समस्यांपासून आपल्याला दूर नेण्यात होईल. यातून आपली परिस्थिती सुधारणार नाही.

आज वृत्तपत्र विकणाऱ्या दुकाना-दुकानांत काय दिसते ? गेल्या दशकात भारतीय पत्रकारितेत घडलेली एक फार चांगली गोष्ट म्हणजे मासिकांची वाढ आणि प्रगती. परंतु त्यातून किती प्रकाशनांनी आपली चाल बदलली, झटकन समस्यांकडून व्यक्तीकडे लक्ष केंद्रित केले. व्यक्तीकडून अफवा व कुजबूज, चारित्र्यहनन यांच्याकडे अगदी झपाट्याने वाटचाल झाली. त्यांना व्यावसायिक दृष्टिकोन भरपूर आहे, पण त्यांनी कोणते सामाजिक कर्तव्य बजावले ? समाजाच्या दृष्टीने जो जीवनमरणाचा प्रश्न आहे त्याच्याकडून आपले लक्ष तिसरीकडेच वेधण्याचा गुन्हा ती करीत नाहीत काय ? पण तुम्ही जे सुचवीत आहात त्यात तर नेमका व्यावसायिकतेचा गाभा आहे. समतोल न्यायीपणा, रास्त वागणूक हे गुण चांगल्या व्यावसायिकतेच्या ठिकाणी हवेतच. व्यावसायिकता म्हणजे निव्वळ मांडण्याचे तंत्र शिकणे किंवा चटकदार लिखाण एवढेच गृहीत धरून तुम्ही त्याला ठोकून काढता !

ही गोष्ट खरी असेल तर वाद होण्याचे कारण नाही. आज खरी अडचण आहे ती म्हणजे एवढ्याच कौशल्याच्या गोष्टी असल्या की पुरे, असे पत्रकारांना वाटते आणि तसेच वरिष्ठांना आणि मालकांना वाटते. हीच तर खरी अडचणीची गोष्ट आहे. त्याहून वाईट म्हणजे असे तांत्रिक कौशल्य असले पाहिजे; प्रयत्न, सामाजिक सारासार विवेक नसला तरी चालेल, अशी समजूत रूढ होत आहे. तांत्रिक कौशल्याच्या पलिकडे जाणाऱ्या पत्रकारांवर इतर हल्ला चढवितात. 'हे काम पत्रकारांचे नव्हे', 'हा पत्रकार नाहीच, कार्यकर्ता आहे' असे त्याच्याविषयी

अवहेलनापूर्वक बोलले जाते. खरे म्हणजे असे पत्रकार समाजातले तत्कालीन महत्त्वाचे प्रश्न उचलून धरीत असतात. बालकामगारांची अवस्था, आदिवासींची हलाखी अनेक वर्षे खटल्याविना तुरुंगात खितपत पडलेल्या कैद्यांची दुर्दशा असे प्रश्न ते लढवीत असतात. तेव्हा व्यापारीकरण, उपभोक्तीकरण आणि निव्वळ शोधव्यावसायिकतेचे तत्त्वज्ञान हे खरे काही धोके आहेत.

## संधिसाधूपणा

पुढचे धोके याहूनही अधिक भयंकर आहेत. ते म्हणजे संधिसाधूपणा. इतर व्यवसायांप्रमाणेच पत्रकारिताही संधिसाधू लोकांपैकी एक आहे, ही गोष्ट तर खरीच, पण गेल्या काही वर्षांत हा धोका दोन कारणांमुळे फार गंभीर बनला आहे.

पहिले कारण म्हणजे जीवनाच्या इतर क्षेत्रांप्रमाणेच पत्रकारितेतही शासनाचे हातपाय फार खोलवर आणि लांबवर पसरले आहेत. शासनव्यवस्थेचे म्हणजे वेळोवेळी सत्तेच्या खुर्चीवर बसणाऱ्या राज्यकर्त्यांचे. पत्रकारांना अनेक सवलती दिल्या जात आहेत आणि तेही त्यावर झडप घालीत आहेत. दौरे, सवलतीच्या किमतीत भूखंड आणि इतरही पुष्कळ काही. अनेक राज्यकर्त्यांनी पत्रकारांना खरेदी करण्याची ही कला विकसित केली आहे. परिणामी अशा राजकारण्यांनी पेरलेल्या बातम्या वृत्तपत्रांतून ओसंडून वाहत आहेत. स्वाभाविकच या कलेचा अवलंब करणारे राजकारणी एकटेच नव्हे, व्यावसायिक संस्था, फार काय विदेशी सरकारेही या गोष्टी अधिक प्रभावीपणे करतात. साम्यवादी राजवटीत असलेल्या देशांची सरकारे या उद्योगात चांगलीच अनुभवी आहेत. ते सांगतील त्या गोष्टी छापणारे भरपूर पत्रकार त्यांच्या तबेल्यात बांधलेले आहेत. बड्या कंपन्या किमती भेटवस्तू देऊन पत्रकारांना बांधून घेतात. एके काळी गुपचूप देणाऱ्या या भेटी, देवघेवीला धिरूभाई अंबानींच्या रिलायन्सने खुल्या बाजारपेठेची कला आणून दिली.

याचे परिणाम उघड दिसतात. एक म्हणजे जनहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असे प्रश्न वृत्तपत्रे घेतच नाहीत. उदाहरणार्थ धिरूभाई अंबानी यांनी एका पाठोपाठ एका संस्थेला व्यवसाय बंद करायला लावले ही वस्तुस्थिती इंडियन एक्स्प्रेस वगळता कितीजणांनी उघडकीला आणली ? उलट त्यांच्यापैकी बरीचशी वृत्तपत्रे एक्स्प्रेसच्या उत्तम कार्यावर बेपर्वाईने शिंतोडे उडविण्यासाठी अंबानींनी अगदी भरपूर आणि सहजपणे वापरली. एक्स्प्रेसने हे प्रकरण बाहेर काढले ते जणू काही अंबानींच्या धंद्यातील एका प्रतिस्पर्ध्याच्या प्रकरणावरच असा कांगावा इतर वृत्तपत्रांनी केला. अलिकडे तर संधिसाधूपणाचे रूपांतर तत्त्वज्ञानात झाले आहे. टाईम्स ऑफ इंडियासारखी वृत्तपत्रे तर गेली अनेक दशके जे सरकार सत्तेवर असेल त्याच्या कर्ण्याची भूमिका बजावीत आली आहेत. १९७५ मध्ये न्या. जगमोहनलाल सिन्हा यांनी श्रीमती गांधींना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून दोषी ठरविले तेव्हा या वृत्तपत्रांनी त्यांना राजीनामा देण्याचा आग्रह केला. श्रीमती गांधींनी आणीबाणी जाहीर केली. लगोलग या वृत्तपत्रांनी जयप्रकाश नारायण यांना दोष दिला आणि त्यांच्या चळवळीमुळे श्रीमती गांधींसमोर दुसरा काही पर्यायच उरला नव्हता, असे प्रतिपादन केले. आणीबाणीच्या

संपूर्ण काळात त्यांच्या सद्गुणांची आणि फायद्यांची भलावण या वृत्तपत्रांनी केली. मार्च १९७७ मध्ये जनतेने इंदिरा गांधींना सत्ताभ्रष्ट केले आणि आणीबाणी संपली. यासरशी आपण नरकवासातून बाहेर पडलो आहोत अशा घोषणा वृत्तपत्रांनी केल्या.

अलिकडे राजीव गांधींच्या सरकारची एकेक भीषण दुष्कृत्ये बाहेर येऊ लागली तेव्हा टाइम्स गटातील प्रकाशनांनी सत्याचा अपलाप केला. खऱ्या बातम्या दडपल्या आणि त्या उकरून काढणाऱ्यांवर दोषारोप केले. सत्यशोधकांची बदनामी केली. या अशा संधिसाधूपणाला तत्त्वज्ञानाचा मुलामा देण्याचे थक्क करून सोडणारे प्रयत्न त्यांनी त्यांच्या वृत्तपत्रांच्या दीडशेव्या वाढदिवसाच्या निमित्ताने केले. टाईम्स ऑफ इंडियाच्या २८ ऑक्टोबर १९८८ च्या अंकात एक पानभर संपादकीय निवेदन प्रसिद्ध झाले. त्यात म्हटले होते की, गेल्या शंभर वर्षांत टाईम्सची वाढ होत होती. त्यासोबत दुसरी एक गोष्ट आकाराला येत होती ती म्हणजे भारताचे राज्य आणि टाईम्सच्या मते भारतीय राज्याची जडणघडण झाली ती प्रामुख्याने वेळोवेळी सत्तेवर असलेल्या राज्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळे– ब्रिटिशांपासून सुरुवात करून ते श्रीमती गांधी आणि राजीव गांधी यांच्यापर्यंत ! निवेदनात पुढे म्हटले होते की, राज्याची जडणघडण होणे याला हे वृत्तपत्र अतिशय महत्त्व देत असल्यामुळे साहजिकच त्यांनी सदैव राज्यकर्त्यांची पाठराखण केली आणि त्यांच्या प्रयत्नांना बळकटी देण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच राज्ययंत्रणा ब्रिटिशांच्या ताब्यात होती तेव्हा टाईम्सने ब्रिटिशांना साथ दिली. श्रीमती गांधींना आणीबाणीत टाईम्सने साथ दिली ती त्याचसाठी आणि त्याचसाठी टाईम्स राजीव गांधींना पाठिंबा देत आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, सध्याच्या काळात भ्रष्टाचार ही मोठी समस्या झाली आहे. इतरांच्या कळपात सामील होऊन भ्रष्टाचाराच्या मागे धावणे टाईम्सला सहज जमले असते. पण अशा तऱ्हेने लोकप्रियता मिळविण्याचा मोह टाईम्सने आवरला आणि राज्याचा गाभा असणाऱ्या माणसांना पाठिंबा देण्याचे धोरण कायम ठेवले. भारतीय राज्याची प्रगती वेगाने व्हावी हे उद्दिष्ट त्यामागे आहे.

कायम संधिसाधूपणा करता यावा यासाठी तत्त्वज्ञानाचे हे अवडंबर ! आपण आता काही प्रस्तावांचे स्वरूप एकत्र पाहू.

## आचारसंहिता

भूतकाळात वेळोवेळी राजकारण्यांनी वृत्तपत्रांना आचारसंहिता असावी असे सुचविले तेव्हा-तेव्हा पत्रकारितेतल्या इतर अनेकांप्रमाणेच माझी प्रतिक्रियाही अशी होती. 'प्रथम राजकारणीच स्वत:साठी एखादी आचारसंहिता बनवून अंमलात का आणत नाहीत ?' पत्रकारांची आचारसंहिता म्हणजे राजकारण्यांच्या हातात आणखी एक शस्त्र अशी भीती मला वाटत असे. एकदा का आचारसंहिता बनली– 'मग ती तुम्ही सत्य लिहिले, संपूर्ण सत्य लिहिले आणि सत्याशिवाय दुसरे काहीही लिहिले नाही' अशा एका ओळीची आचारसंहिता असली तरी त्यातून धोका होतो. धोका असा की, आपण या आचारसंहितेचे पालन करीत आहोत ही गोष्ट दुसऱ्या कोणाचे तरी समाधान होईतो पटवून देण्याचे जोखड पत्रकारांच्या

गळ्यात पडत असते. मग भल्यामोठ्या वृत्तपत्रीय क्षेत्राला वाकविण्याच्या किंवा झुकविण्याच्या उद्योगापेक्षा राजकारण्यांना पत्रकारांचा न्याय करणाऱ्या त्या मोजक्या व्यक्ती अथवा संस्थांना वाकविणे, झुकविणे सोपे झाले असते. यातून पत्रकारांना अधिकच बचावात्मक पवित्रा घ्यावा लागेल, अशी भीती मला वाटत असे.

दुर्दैव असे की, आजपर्यंतच्या किंवा दिलेल्या अनुभवानुसार निदान पत्रकारांच्या बाबत तरी राजकारणी बरोबर होते हे सिद्ध झाले आहे. खरोखरच पत्रकारांना बंधनकारक अशी एक आचारसंहिता असायला हवी आहे. त्यांचे कामकाज मापता येतील असे काहीतरी मोजमाप हवे आहे आणि यानंतर लगेचच स्पष्ट होईल तो मुद्दा म्हणजे अशी आचारसंहिता बनविणे शक्य आहे. वृत्तपत्रांना जी खोड्यात अडकवणार नाही उलट मुक्त करील, ज्यात पाळणाऱ्या पत्रकारांवर हल्ला चढविणारा कोणताही अधिकारी चुकत असल्याचे स्पष्ट दिसेल, अशी आचारसंहिता बनविण्यासाठीही गांधीजींइतके चांगले मार्गदर्शक दुसरे कोण असणार ? त्यांनी वेळोवेळी वृत्तपत्रे आणि पत्रकार यांना जो सल्ला स्पष्टपणाने दिला, स्वत:च्या प्रकाशनाबाबत त्यांनी जी पथ्ये पाळली, ती विचारात घेऊन आजच्या परिस्थितीतील दोष दूर करणारी ही आचारसंहिता मी पत्रकारांसाठी तयार केली आहे.

* भारतात मुक्त समाज अत्यावश्यक आहे असे मी खात्रीने सांगतो. गरीब लोक आणि गरिबांच्या भल्यासाठी सामाजिक धोरणाने काम करणारे कार्यकर्ते यांच्या हितासाठी मुक्त समाजाची गरज जास्त आहे, श्रीमंतांच्या कल्याणासाठी नव्हे. त्यामुळे समाजाला आवश्यक त्या सर्व संस्था आणि यंत्रणा माझ्या बाजूला राहतील आणि त्यासाठी मी लढा देईन.

* समाज मुक्त राखण्यासाठी आणि सुधारण्यासाठी प्रथम लोकांना भरपूर माहिती देणे आवश्यक असते. त्यामुळे मुक्त, स्वतंत्र वृत्तपत्रे ही मुक्ततेची आवश्यक अशी साधने आहेत असा माझा विश्वास आहे.

* मी निव्वळ व्यावसायिक होऊन राहणार नाही तर प्राधान्याने नागरिक म्हणून काम बजावेन आणि सामान्य नागरिकापेक्षा काही जास्त मिळावे अशी अपेक्षा करणार नाही. नागरिक या नात्याने मी स्वत:ला जनहितासाठी संपूर्णपणे आणि अखंडपणे वाहून घेईन.

* ज्या समाजात लोकहिताचा फार मोठा भाग बोलका नसतो, तेथे लोकांपर्यंत पोहोचणाऱ्या माध्यमात तुमचा सहभाग असतो. हा मोठा अधिकार ठरतो. अशा माध्यमाचा अथवा व्यासपीठाचा उपयोग चांगल्या आणि वाईट अशा दोन उद्देशाने मोठ्या प्रमाणात कार्य करतो. माझे कार्य मी लोकांच्या वतीने विश्वस्त आहे असे मानून चालवीन. विशेषत: अशा माध्यमाशी अथवा व्यासपीठाशी असलेल्या माझ्या संबंधाचा उपयोग मी व्यक्तिगत हितासाठी करणार नाही. माझ्या लिखाणावर मी खासगी वैरभावनेचा परिणाम होऊ देणार नाही.

हे व्यासपीठ समाजातील एखाद्या गटाच्या भल्यासाठी नव्हे, तर एकंदर जनहितासाठी मी वापरीन. वृत्तपत्रे किंवा त्यातील एखादा घटक यांच्या स्वार्थासाठी मी हे व्यासपीठ राबविणार नाही

## कर्तव्यपालन

* एखादी गोष्ट लिहिणे आवश्यक असेल तर भीतीने व बक्षिसाच्या लालचीने मी ती लिहिण्याचे थांबविणार नाही, उदाहरण लिहिल्याजोगी गोष्ट अशा कारणासाठी लिहायची, हेही करणार नाही. मग ते प्रलोभन किंवा ती दहशत सरकारी बाजूने असो की खासगी.

*अशा तऱ्हेने लोकसेवा करण्याच्या मार्गात कायदा करून किंवा इतर मार्गाने अडथळे आणले गेले तर, लोकांपर्यंत सत्य पोहोचविण्याचे माझे प्रयत्न मी दुप्पट जोराने चालू ठेवीन.

* अशा तऱ्हेने लोकसेवा करीत असलेल्या माझ्या कोणत्याही सहकाऱ्याच्या लिखाणाला मी कात्री लावणार नाही.

* मी स्वत: कोणत्याही नियंत्रणापुढे (सेन्सॉरशिपपुढे) मान तुकविणार नाही. ज्या प्रयोजनासाठी मी लिहितो त्या बाबतीत किंवा त्यातून लेख सेन्सॉरशिप झाला तर मी ताबडतोब शक्य तेवढ्या वाचकांना हा बदल कळवीन तसेच लोकांपर्यंत सत्य पोचविण्याचे इतर मार्ग शोधून काढेन.

## वस्तुस्थिती

लिखाण करण्यापूर्वी या विषयाबाबतची सर्व सुक्तासुक्ते मी बारकाईने तपासून घेईन आणि त्यावर कोणाचे नफा-नुकसान होते याचा विचार न करता संपूर्णपणे प्रसिद्ध करीन.

जी गोष्ट सिद्ध करता येत नाही ती मी वस्तुस्थिती म्हणून मांडणार नाही. एखादा आरोप इतर लोक करीत आहेत म्हणून आपण करावयाचा ही गोष्ट लोकहितासाठी उघडपणे आवश्यक असल्याखेरीज मी करणार नाही. उलट कट करणारांनाही पाठिंबा देणारा धंदा मी उघडकीला आणीन.

माझे लिखाण चूक आहे असे सिद्ध झाल्यास मी ताबडतोब व जाहीरपणे चुकीची कबुली देईन आणि वाचकांचे समाधान होईल अशी शिक्षा स्वत:ला करीन. अशा वेळी माझ्याकडून ज्यांचे नुकसान झाले त्यांना संपूर्ण न्याय लांबविण्यासाठी मी न्यायालयाचा किंवा कायद्याचा आसरा घेणार नाही.

## भाषा

वस्तुस्थिती मांडताना आणि तिच्यावर भाष्य करताना मी सुयोग्य शब्द वापरीन. अतिशयोक्ती करणे किंवा सनसनाटी करून मी लिखाणाचा प्रभाव वाढविणार नाही किंवा संदिग्ध शब्द वापरून तो मुद्दाम कमीही करणार नाही.

## वृत्तपत्रे

वृत्तपत्रविश्वात वस्तुस्थिती राखणे आणि ती बळकट करणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे. त्यासाठी मला शक्य ते सर्व प्रयत्न मी करीन. त्यातील सत्याच्या दुबळेपणामुळे वृत्तपत्रे अनिष्ट शक्तींना आज सहजपणे बळी पडू शकतात आणि

त्यांना ताकदवान उपायांची जोड दिल्याखेरीज ती समाजसुधारणेला मदत करू शकणार नाहीत याची मला जाणीव आहे.

## दृष्टिकोन

लिखित शब्द हे परिवर्तनाचे अनेकापैकी एक साधन आहे याची मला जाणीव आहे. आपल्यासारख्या समाजात त्यांचा प्रभाव मर्यादित राहणार. त्यामुळे लोकसेवा करायची तर वृत्तपत्रातल्या माझ्या खुर्चीला चिकटून बसणे अगदी अनिवार्य आहे अशी लंगडी सबब मी सांगत नाही. मी खुर्ची टिकविण्यासाठी सत्य सांगण्याचे थांबविणार नाही. शेवटी लेखक हा समाजात सत्याची दवंडी देण्याचे काम फक्त करू शकतो आणि तरीही ते काम मी कार्यक्षमतेने आणि खरेपणाने केले तर मला समाजाची सेवा करण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. या आत्मविश्वासाने मी काम करीन.

## आचारसंहितेचे पालन

मी सविस्तर चर्चा आणि विचार करून या आचारसंहितेला मान्यता देईन. मात्र मान्यता दिल्यानंतर मी अतिशय बारकाईने आणि कोणत्याही परिस्थितीत तिचे पालन करीन

विशेषत: या आचारसंहितेचा माझ्याकडून भंग झाला तर माझे सहकारी आणि वाचक यांना माझी चूक मी मोकळेपणाने निवेदन करीन.

## निव्वळ कल्पना ?

"पण या तर निव्वळ कल्पना. अशा आचारसंहितेची अंमलबजावणी कोण करणार ? एखाद्या पत्रकाराने तिचे उल्लंघन केले तर त्याला कोणती शिक्षा देणार ?"

यावर पहिले उत्तर म्हणजे ही आचारसंहिता दिसते तितकी निरागस नाही. पत्रकारांची सध्याची वागणूक आणि आचारसंहितेतल्या साध्या-साध्या वाटणाऱ्या तरतुदी यांची कोणीही तुलना करावी म्हणजे आचारसंहितेत कसा दिशाबदल अभिप्रेत आहे हे समजून येईल. 'सामान्य नागरिकापेक्षा वेगळा असा कोणताही जादा हक्क मी मागणार नाही' ही तरतूद घ्या. आज पत्रकार सरकारी अधिकारी किंवा सामान्य नागरिकांनी आपले दावे किंवा प्रतिपादन यांचे पुरावे द्यावे असा आग्रह धरतात परंतु त्यांनी काश्मीरबाबत जे लिहिले त्याचे पुरावे कोणी मागितले, तर त्यांची प्रतिक्रिया काय होते ? 'नागरिक या नात्याने जनहितासाठी मी स्वत:ला संपूर्णपणे अखंडपणे वाहून घेईन.' ही तरतूद पाहू. आज सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाच्या अधिकाऱ्यांकडून पत्रकार निष्ठेने कर्तव्य बजावण्याची अपेक्षा करतात तेव्हा स्वत:च्या कर्तव्याबाबत त्यांचा दृष्टिकोन कितपत निष्ठेचा असतो ? व्यक्तिगत नव्हे तर प्रश्नावर लक्ष केंद्रित करा असा सल्ला राजकारण्यांना देणारे पत्रकार स्वत: इतरांबद्दलच्या चविष्ट कुजबुजीत किती वेळ घालवितात ?

'वस्तुस्थिती मांडल्यावर कोणत्या दृष्टिकोनाला मदत किंवा अडचण होते याची पर्वा न करता माझ्या हातात आलेल्या सर्व खऱ्या गोष्टी मी लिहीन.'

या तरतुदीची तुलना विशिष्ट तत्त्वप्रणालीशी बांधील असणाऱ्या पत्रकाराच्या दृष्टिकोनाशी करा. यातील बऱ्याच पत्रकारांची डाव्या विचारांशी एकनिष्ठा असते आणि साम्यवादाच्या महान उद्दिष्टांचा प्रचार करण्यासाठी लिखाणाचा रंग बदलणे हे ते आपले कर्तव्य मानतात. 'एखादा आरोप इतर करतात म्हणून मीं करायचा, असे मी करणार नाही.' आज कोणीतरी महत्त्वाचा पुढारी म्हणतो म्हणून खोट्या गोष्टी छापून टाकण्याचे तंत्र आवडीने वापरले जाते.

'माझी चूक झाली तर मी ती जाहीरपणे आणि तातडीने मान्य करीन.' आपली चूक मोकळेपणाने वाचकांकडे मांडणे अत्यावश्यक असतानाही आणि त्यावर आपली विश्वासार्हता वाढणार असतानाही मोठमोठी वृत्तपत्रे व पत्रकार चुका कबूल करण्याची किती टाळाटाळ करतात हे मी स्वत: अनुभवले आहे. अशी डझनावारी उदाहरणे मी देऊ शकेन. याच्यामागे असतो तो दांभिकपणा आणि जनतेची स्मरणशक्ती क्षीण असते याची खात्री.

'न्यायालये किंवा प्रचलित कायदे यांचा वापर न्यायदान लांबविण्याची युक्ती म्हणून मी करणार नाही', हे कलम पाहा. ज्यांनी ज्यांनी एखाद्या वृत्तपत्रावर खटले दाखल केले आहेत त्यांचे अनुभव असे की, अग्रलेखातून न्यायदानाला विलंब म्हणजे न्यायालयाला नकार असे वृत्तपत्रे कितीही मोठ्याने ओरडून सांगत असली, तरी स्वत:वर आल्यानंतर एखादा अंतुले पुढे असावा अशी युक्ती लढवून ती खटल्याचे कामकाज लांबवितात. 'माझी पहिली जबाबदारी म्हणजे वृत्तपत्रविश्वाला स्वच्छ करण्यासाठी मला जे जे शक्य असेल ते मी करीन.' हे कलम पाहा आणि दुसरीकडे मोठी, मध्यम व लहान अशी अनेक वृत्तपत्रे खपाचे खोटे आकडे देऊन वृत्तपत्राला कागदाचा जादा कोटा कसा मिळवितात आणि नंतर तो कोठल्या बाजारात कसा विकतात हे आठवा.

तेव्हा ही आचारसंहिता म्हणजे कोरी कविकल्पना नव्हेच. एखादे तत्त्व सोपे दिसते. ओळखीचे दिसते एवढ्यानेच ते निरुपयोगी ठरविता येत नाही. प्रश्न आहे तो; ती आचारसंहिता प्रत्यक्ष लागू करण्याचे काम कोण आणि कसे करील ? हे काम वाचक आणि स्वत: पत्रकार यांनी करायचे आहे. ते अनेक प्रकारांनी करता येईल. बेताल वृत्तपत्रांना ताळ्यावर आणण्याची कामगिरी जागरूक वाचक बजावू शकतात.

* आपल्या वृत्तपत्राने स्वत:ची चूक स्वच्छपणे कबूल केली पाहिजे, असा आग्रह वाचक धरू शकतात.

* मुद्दाम पेरलेल्या बातम्यांविषयी सावध राहून संपादकावर पत्रांचा मारा करू शकतात. बातम्या पेरण्याचे काम बहुधा इतक्या भरड पद्धतीने केले जाते की, अशी बातमी शोधणे अवघड जात नाही.

* ज्या ज्या वेळी एखाद्या वृत्तपत्राला किंवा त्यातील पत्रकाराला कोणत्याही सरकारच्या कृपेने (केंद्र/ राज्य/ परकीय) काही भेट किंवा लाभ मिळेल, त्या-त्या वेळी वृत्तपत्रांनी ही माहिती प्रसिद्ध केली पाहिजे, अशी मागणी वाचकांनी करावी.

* न्यायदानातील विलंबाचा फायदा बदनामी करणाऱ्या वृत्तपत्राला घेता येणार

नाही, अशा रितीने न्यायदान कार्यपद्धतीत सुधारणा घडवून आणण्याचा आग्रह वाचकांनी धरावा.

* साक्षेपाने वृत्तपत्रांची निवड करावी, निव्वळ आपले आजोबा हे वृत्तपत्र वाचत होते, म्हणून नव्हे.

* वृत्तपत्रे अर्थात यातून अधिक कामगिरी बजावू शकतात.

* आपल्या हातून चूक झाली असेल तर वाचकांना विश्वासात घ्यावे. शक्यतो संबंधित पत्रकाराला चूक कशी झाली याचा खुलासा करण्याची संधी द्यावी.

* एखाद्या विद्वान, समंजस आणि त्रयस्थ व्यक्तीची नेमणूक लोकाधिकाररक्षक म्हणून करावी. वाचकांनी आपले वृत्तपत्राविषयीचे आक्षेप त्यांच्याकडे पाठवावेत आणि त्यांनी पुराव्याची छाननी करून काढलेला निष्कर्ष त्याच वृत्तपत्रात प्रसिद्ध व्हावा.

* आपल्या संस्थेला किंवा त्यातील पत्रकारांना सरकारकडून काही विशेष लाभ मिळाल्यास त्याची माहिती प्रसिद्ध करावी.

* आपल्याविरुद्ध बदनामीचा खटला कोणी भरला तर तो मुद्दाम लांबविण्याचा प्रयत्न करू नये आणि त्या खटल्याचा वृत्तांत आपल्या वृत्तपत्रात प्रसिद्ध करावा. ही चांगली कामे कोणत्या मुहूर्तावर अथवा नियमाने सुरू करावी, याचे कोडे पडण्याचे कारण नाही. लगेच आणि कोणताही चालू प्रसंग अथवा विषय पुरेसा आहे. 'परंतु जी आचारसंहिता एखाद्या अधिकाऱ्यामार्फत लागू केली जाणार नाही, त्यांचा उपयोग कसा होणार ?'

वैद्यकीय व्यावसायिक जी शपथ घेतात ती हिपोक्रॅटिक ओथ काही कुणा अधिकाऱ्यामार्फत लादली जात नाही. तो वैद्यकीय व्यवसायाचा आदर्श मानदंड मानला गेलेला आहे.

'परंतु एखादा डॉक्टर ही शपथ मोडतो तेव्हा निदान आम्ही वृत्तपत्रात पत्र लिहू शकतो. पण वृत्तपत्र जेव्हा तुमची आचारसंहिता मोडतील तेव्हा आम्ही पत्र पाठविले, तरी ती छापणार नाहीत. भारतातील एका वृत्तपत्राला प्रेस कौन्सिलसारख्या मातबर संस्थेने ताकीद दिली तेव्हा ती प्रसि करण्याचे त्या वृत्तपत्राने नाकारले. प्रेस कौन्सिलची ही अवस्था, तर आम्हा सामान्य वाचकांचे काय ?'

या प्रश्नास उत्तर आहे, ते म्हणजे भारतातल्या वृत्तपत्रांनी परस्परांविषयी अधिक लिहायला हवे. आज अनेक वर्षे 'कुत्रा कुत्र्याला चावत नाही' या तत्त्वानुसार त्यांनी एकमेकांविषयी मौन धारण केले आहे. गेल्या पाच वर्षांत महत्त्वाची मासिके आणि वृत्तपत्रांनी एकमेकांबद्दल बरेच लिहायला सुरुवात केली आहे. पण हे लिखाणही वृत्तपत्रातल्या पत्रकारांबद्दल, त्यांच्या चढ-उताराबद्दल केले जाते. पत्रकार हा पत्रकारांच्या लिखाणाचा आवडता विषय झाला आहे. जुने समर्थन आता लागू राहिलेले नाही. आज सगळ्या वृत्तपत्रांनी इतर वृत्तपत्रांविषयी लगेचच रोजच्या रोज भरपूर लिहिणे सुरू करावे, असा या लिखाणाचा उद्देश नाही. लिखाणाचे स्वरूप बदलायला हवे, ही गरज आहे. इतर वृत्तपत्रांबद्दल लिहिण्याऐवजी सध्याच्या

महत्त्वाच्या विषयांवर इतर वृत्तपत्रे जे लिहितात त्यांचा न्याय्य तपशील पाहिजे. प्रश्न हाताळण्याची त्यांची पद्धत आणि न्याय्य याबद्दल इतरांनी लिहिले पाहिजे.

आचारसंहिता भंग करणारे वृत्तपत्र त्याबद्दल आक्षेप घेणाऱ्या वाचकांची पत्रे छापणार नाही ही जी भीती आहे तिला उत्तर म्हणजे वाचकांनी अशी पत्रे इतर वृत्तपत्रात प्रसिद्धीला द्यावीत. त्याच मूळ मुद्यासोबत त्याबद्दलची पत्रे छापली नाहीत या गोष्टीचा उल्लेख करावा.

## गांधीवादाचा आदर्श

मी दिलेली रूपरेषा बरीचशी गांधीवादावर आधारलेली आहे. तिचा रोख गांधीजींनी सांगितलेल्या दोन महत्त्वाच्या उद्दिष्टांकडे आहे. शुद्ध व्यावसायिकतेवर अधिक व्यापक उद्दिष्टांचा वरचष्मा असतो हे पहिले उद्दिष्ट. हिंदस्वराज्यमध्ये गांधीजींनी वकिलांवर ओढलेले कडक ताशेरे आठवा. नागरिक म्हणून आपली जबाबदारी ओळखणे हे ते व्यापक उद्दिष्ट दिसते. दुसरे उद्दिष्ट म्हणजे आपले पत्रकार आणि त्यांच्या लेखणीच्या पट्ट्यात सापडणाऱ्या व्यक्ती यांना आजच्यापेक्षा काही अधिक प्रमाणात समप्रमाणात आणणे. ज्या देशात लाखो लोक लिहू-वाचू शकत नाहीत, लाखो लोक भुके राहतात अशा देशात प्रसारित होणाऱ्या माध्यमावर जास्त जबाबदारी असते. ते अतिशय तेजस्वी असले पाहिजे. अशा पत्रकारांना आपल्या टीकेच्या परिघात येणाऱ्या व्यक्तीबद्दलची भूमिका अनेकदा ब्लॅक मेलिंगची असणे अशक्य नसते. ही प्रवृत्ती रोखण्यासाठी पत्रकार आणि त्यांची लक्ष्ये यांच्यातील तफावत कमी केली पाहिजे. याखेरीज ज्या चार तत्त्वांचा या आचारसंहितेत भर आहे, तीही गांधीवादी आहेत. गांधीजींचा दृष्टिकोन असा होता की, समाजाच्या हितासाठी काम करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य तर आहेच; पण त्यापलिकडे जाऊन समाजाची सेवा करणे हे त्या त्या व्यक्तीच्या, संस्थेच्या दृष्टीनेही हिताचे असते. त्यातून समाजाच्या रोषापासून त्यांचा बचाव होऊ शकतो. याच तत्त्वानुसार वृत्तपत्रांनी आपले स्वातंत्र्य जपावयाचे असेल तर लोकांच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न त्यांनी हाती घेतले पाहिजेत. म्हणजे उद्या वृत्तपत्रांवर हल्ला होईल तेव्हा आपले चुकीचे साधन डोक्यात आलेले आहे हे लक्षात घेऊन लोकच वृत्तपत्राच्या रक्षणासाठी उभे राहतील.

एखादी चळवळ किंवा संस्था वाढते ती तिने इतरांकडून केलेल्या मागण्यांमुळे नव्हे तर संस्थेने आपल्या सभासदांकडून केलेल्या अपेक्षेमुळे वाढते, असे गांधीजींनी आपल्याला शिकविले. भारतीय वृत्तपत्रांच्या बाबतीत आज ते जास्तच खरे आहे. कारण आज त्यांच्यावर येणारी बंधने अथवा कामातील अडथळे बाहेरून येण्यापेक्षा वृत्तपत्रांतर्गतच जास्त असतात, याची तीन उदाहरणे देतो.

आपण अधिक प्रभावी कार्य का करू शकत नाही, याची सबब सांगताना पत्रकार ऑफिशिअल सिक्रेटस् ॲक्ट यासारख्या कायद्यांची नावे घेतात. परंतु प्रत्यक्ष या कायद्याची शब्दयोजना पत्रकारांना मदत व्हावी अशा तऱ्हेनेच केलेली आहे. उदाहरणार्थ १९२३ चा ऑफितशिएल सिक्रेटस् ॲक्ट हा गुप्त सरकारी माहिती

राज्याच्या शत्रूंना पुरविणाऱ्या व्यक्तींच्या विरोधासाठीच केलेला आहे. आता पत्रकार सरकारची गुपिते फोडतात तेव्हा ते उघडपणे लोकांच्या हितासाठी काम करीत असतात. असे असेल तर या कायद्याखाली उद्या पत्रकारावर खटला भरणे सरकारला जवळजवळ अशक्य होईल आणि काही अतिरेकी निर्णय वगळता न्यायाधीशही या कायद्यानुसार पत्रकारांना शिक्षा ठोठावू शकणार नाही. आजपर्यंत या कायद्याखाली कोणतेही सरकार एकाही पत्रकाराला दोषी ठरवू शकलेले नाही.

आज आपल्या देशात वैध आणि प्रभावी असे सरकारच अस्तित्वात नाही ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. यातील एखाद्या कायद्याखाली वृत्तपत्रावर खटला भरायचा आणि तरीही आपण हे स्वार्थी आणि नृशंस हेतूने करीत नाही हे लोकांना पटवून द्यायचे एवढी क्षमता आज केंद्र सरकार आणि कोणत्याही राज्य सरकारमध्ये नाही. त्यामुळे गेल्या काही वर्षांत वृत्तपत्रांनी सार्वजनिक हितासाठी काही सरकारी गुपिते बेडरपणे प्रसिद्ध केली तेव्हा तेव्हा कायद्याच्या प्रचलित अर्थानुसार या कायद्याखाली त्यांच्यावर कारवाई करणे सरकारला शक्य होते. परंतु प्रत्यक्ष जेव्हा जेव्हा सरकारी अधिकाऱ्यांनी असा काहीतरी वेगळा हल्ला तत्परतेने वृत्तपत्रांवर चढविला, त्या-त्या वेळी ते त्यांच्याच अंगावर उलटले आणि त्यांना सपशेल माघार घ्यावी लागली.

ज्या मोजक्या वेळी सरकारच्या प्रयत्नांना थोडेफार यश आले, त्या-त्या वेळी वृत्तपत्रातील अंतर्गत परिस्थिती सरकारला मदतनीस ठरली. आज बहुतेक मोठ्या वृत्तपत्रांतही व्यवस्थापनामध्ये गोंधळाची परिस्थिती आहे. अनेक वृत्तपत्रे सरकारच्या मदतीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. अशा परावलंबीपणाला सरकार जबाबदार नसून त्या-त्या वृत्तपत्रांच्या व्यवस्थापकीय विभागाची अकार्यक्षमता जबाबदार आहे. त्यामुळे सरकारला काहीसे यश मिळते; चाणाक्षपणामुळे किंवा निश्चयीपणामुळे नव्हे.

या परिस्थितीत असा कायदा अधिक उदार करावा, पत्रकारांच्या स्वातंत्र्याची हमी घटनेत अंतर्भूत करावी. सरकारकडून झालेल्या मागण्या फारशा चुकीच्या नाहीत. अर्थात वृत्तपत्रांना नमविण्याचे प्रयत्न ज्या-ज्या वेळी सरकारी अधिकाऱ्यांकडून होतील, तेव्हा तेव्हा त्याचा उपयोग जनतेचे लक्ष सरकारच्या या कारस्थानाकडे वेधण्यासाठी त्याचा उपयोग जरूर करून घ्यावा. त्यातून सुरू होणारी चर्चा वृत्तपत्रांच्या कामकाजाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरेल. राजीव गांधींच्या बदनामीविषयक विधेयकाविरुद्ध आम्ही लढलो; तेव्हा नेमके हेच केले. परंतु हे बंधन सरकारने मागे घ्यावे किंवा तो कायदा अधिक उदार करावा अशी अपेक्षा करणे चुकीचे होईल. वृत्तपत्रांच्या बाबतीत सुधारण्यासाठी काही उपाय करावे, अशी अपेक्षा करणे चुकीचे ठरेल. पत्रकारांच्या नित्याच्याच कामकाजात येणारे अडथळे अथवा बंधने ही वृत्तपत्रांतर्गत असतात. त्यामुळे मागणी करायची ती इतरांकडून नव्हे, तर स्वतःकडे केली पाहिजे. इतरांनी त्यांची वागणूक सुधारावी अशी मागणी करण्याऐवजी आपण आपली वागणूक सुधारली पाहिजे. हे दुसरे महत्त्वाचे गांधीवादाचे सूत्र माझ्या आचारसंहितेच्या मागे आहे.

माझ्या आचारसंहितेला आधारभूत असे तिसरे गांधीवादी सूत्र म्हणजे व्यवहार्य काय आणि अव्यवहार्य काय याबद्दलची काहीतरी कल्पना करून घेऊन त्याआधारे आपल्या वागणुकीचा निकष सैल करणे नव्हे. अनेकदा कसोट्या सैल केल्यावर लढाई सुरू करण्यापूर्वीच हरल्यासारखे होईल, असे गांधीजी म्हणत. लांबी किंवा रुंदी नसलेला बिंदू हे भूमितीचे महत्त्वाचे तत्त्व व्यवहारात उतरविता आलेले नाही, परंतु तरीही त्या गृहितावर संपूर्ण भूमितिशास्त्र उभे आहे. आज जी गोष्ट कल्पनेच्या साम्राज्यातील वाटते, ती उद्या व्यवहाराच्या हद्दीत येते, असे गांधीजी सांगत असत.

गांधीजींचे चौथे सूत्र म्हणजे काही जनांनी आदर्शाचा पाठपुरावा केला तर इतरही त्यांच्या मागे येतात हा त्यांचा अनुभव आहे. ज्या व्यवहाराचे स्वरूप सार्वजनिक महत्त्वाचे असते, त्यामध्ये हा अनुभव जास्तच खरा ठरतो. गांधीजींनी एक इशारा दिला होता. एखाद्या आदर्शाचा पाठपुरावा करायचा तो त्या व्यवहार्यता आणि यशाची शक्यता अजमावल्यानंतर नव्हे. म्हणजे आदर्श मुळातच मूल्यवान असतात. त्यांचा पाठपुरावा केल्यामुळे आपले काम अर्थपूर्ण होते. त्याच्या मुलभूत मूल्यासाठीच त्याच्या मागे जायचे असते. अशा अवघड वाटणाऱ्या अडचणींमुळे अनेकजण गांधीजींचे प्रतिपादन निव्वळ आदर्शवादी, अव्यवहारी म्हणून त्यावर काट मारत असतात. उलट गांधीजींचे म्हणणे असे होते की, ही तत्त्वे त्यांच्या व्यावहारिक अनुभवानेच आलेली आहेत. व्यावहारिक बाबतीतही आपण काही यश अवश्य मिळविले आहे याची आठवण ते प्रश्नकर्त्यांना आवर्जून करून देतात. शेवटी आणखी एका अर्थाने ही आचारसंहिता आणि बहुसंख्य कलमे निव्वळ भोवतालच्या परिस्थितीचा विचार करून नव्हे तर गांधीजींच्या वृत्तपत्रविषयक लिखाणाचा आधार घेऊन केलेली आहेत. विशेषतः रौलट कायद्याच्या विरोधातील आंदोलनाच्या काळात त्यांनी जे लिखाण केले त्याचा आधार मी घेतलेला आहे. अर्थात अनेक वाचकांना याचे धागे-दोरे गांधीजींच्या लिखाणात आणि जीवनात सापडतील. त्यामुळे आपल्या आवडीचा धागा शोधण्याचे काम मी वाचकांवर सोपवितो.

हा निव्वळ आदर्शवाद आहे. असल्या आचारसंहितेला कोणीही जुमानणार नाही. अशा काल्पनिक कथा रचण्यात काय मतलब ? अशी प्रतिक्रिया ज्या वृत्तपत्रांची होईल ती दुबळी आणि हिताला बळी पडणारी आहेत असे म्हणावे लागेल. पत्रकार मित्रांनो, दोष आचारसंहितेत नाही तर आपल्यात आहे. आपल्या दुर्बलतेत आहे. ही आचारसंहिता आणि आपली वागणूक यात खूप फरक पडत असला तरी त्या फरकामुळे त्या संहितेला अव्यवहार्य ठरविण्याऐवजी पत्रकारांनी अंतर्मुख होऊन आपल्या वागणुकीचा फेरविचार केला पाहिजे. वृत्तपत्राच्या खपाचे खोटे आकडे, सरकारकडून मिळविलेल्या सवलती, बिनदिक्कतपणे वापरलेली बिनभाड्याची सरकारी घरे, या सगळ्याबद्दल ढिलेपणा आहे आणि राज्यकर्त्यांना हे पक्के ठाऊक आहे. त्यामुळे तर आज वृत्तपत्रांवर त्यांचा वरचष्मा राहू शकतो.

## यापुढील कामगिरी

तेव्हा आता गरज आहे ती पत्रकारांनी आपली आणि आपल्या सहकाऱ्यांची वागणूक तपासण्याची, निष्कर्ष प्रसिद्ध करण्याची आणि स्वत:साठी आचारसंहिता राबविण्याची. वाचकांच्या जागरूकतेच्या सहाय्याने अशी आचारसंहिता अंमलात आणावी. तिच्या आधारे वाचकांनी पत्रकारांच्या कामगिरीचे मूल्यमापन करावे.

वाचकांनी पत्रकारांना पारखावे ही सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. आपल्याकडील अनेक दुद्वाचार्य फोफावतात ते वाचकांची स्मरणशक्ती क्षीण असते याचा फायदा घेऊनच. बडी वृत्तपत्रे आणि ती ताब्यात ठेवणारे बडे पत्रकार यांच्या वेळोवेळच्या लिखाणाची कात्रणे काढून ठेवावयाची, एवढे छोटेसे काम जर वाचकांनी केले, तरी बदलत्या राजकारणाच्या वाऱ्याबरोबर ही वृत्तपत्रे कशी कोलांटउडी मारतात ते उघड होईल. अशा वाचकांनी आपले हे अनुभव इतर वाचकांना सांगितले, तरी तो पत्रकारांवरील अतिशय प्रभावी अंकुश ठरेल. खरे म्हणजे कात्रणांचा संग्रह प्रामाणिक पत्रकारांनी स्वत: अधून-मधून करायला हवा. वाचकांना सावध करण्यासाठी अशी माहिती वृत्तपत्रातही छापायला हवी. उद्याच्या पत्रकारांनी अशी एवढी सेवा करावी यासाठी असे संग्रह आपल्याकडील वृत्तपत्रविद्येच्या अभ्यासवर्गात वापरले गेले पाहिजेत.

हे झाले आम्हा पत्रकारांविषयी. तथापि समाज सुधारण्यासाठी खपणाऱ्या निष्ठावंतांना एक इशारा द्यायला हवा. आपल्या कार्याची प्रसिद्धी, एकमेकांशी स्पर्धा आणि जनहित यांबाबत ही मंडळी वृत्तपत्रांवर वाजवीपेक्षा जास्त अवलंबून राहू लागली आहेत. आणीबाणीनंतर अनेक वृत्तपत्रांनी आपल्या धैर्याबद्दल आपलीच पाठ थोपटून घेण्याचा उपक्रम चालू केला. यामुळे या सज्जन मंडळींची दिशाभूल झालेली असते. गेल्या काही वर्षांतील वृत्तपत्रांच्या शूरपणाचे खरे रहस्य म्हणजे आपल्या देशात अलिकडच्या काळात प्रभावी सरकारचे अस्तित्व नाही. अलिकडच्या काळातील सरकारचे अस्तित्व इतके अवैध आहे की, वृत्तपत्रांना चिरडून टाकण्याचा प्रयत्न त्यांनी केला तर त्यांचा शेवट त्यांना माघार घ्यायला लावण्यात होतो. वृत्तपत्रांचे यश म्हणून जे काही दाखविले जाते व त्यांच्या शक्तीचा आणि स्वातंत्र्याचा जो पुरावा म्हणून मिळविला जातो ते प्रत्यक्षात मोजक्या वृत्तपत्रांचे कर्तृत्व आहे. हे आपले कर्तृत्व म्हणून गौरव करून घेणाऱ्या वृत्तपत्रांनी प्रारंभी ते झिडकारले होते आणि ते करणाऱ्या पत्रकारांबाबत हात झटकले होते.

तेव्हा देशात प्रभावी आणि वैध सरकार नाही याचा अर्थ वृत्तपत्रे सशक्त आणि वैध आहेत असा घेतला जाऊ नये. खरे म्हणजे आणीबाणीच्या आधी आतून जितकी पोकळ नी दुबळी होती तितकीच ती आज आहेत. राजीव गांधींच्या कारकीर्दीच्या शेवटच्या तीन वर्षांत वृत्तपत्रांचा दुबळेपणा उघड झाला नाही याचे कारण सरकार स्वत:ही होते आणि त्यापेक्षाही ते अधिक दुबळे आणि अवैध होते. अशा घटकांवर फार काळ अवलंबून राहता येत नाही. कारण आविष्कार स्वातंत्र्यावरचा आपला हल्ला वैध ठरावा अशी परिस्थिती निर्माण करणे राज्यकर्त्यांना

फार कठीण जात नाही. काही वेळा प्रयत्न न करता आपोआपच त्यांना तशी संधी मिळते.

एकीकडे वृत्तपत्रांना सुधारण्याचा आग्रह धरीत असताना आणि पत्रकारांसाठी आचारसंहिता करीत असताना दुसरीकडे जनहितासाठी आणि लोकशाही मूल्यांसाठी झटणाऱ्या सर्वांनी जनसंपर्कासाठी सुसंवादाचे विविध मार्ग शोधून काढणे हे महत्त्वाचे व अगत्याचे आहे. त्यांचा लोकांशी आणि एकमेकांशी असलेला संपर्क वृत्तपत्राचे माध्यम उपयोग न करता व्हावयास हवा. डिसेंबर १९२० मध्ये असहकाराची चळवळ सुरू असताना गांधीजींनी याबाबत दिलेला संदेश अगदी योग्य आहे. मूलभूत प्रवृत्तींच्या कोणत्याही चळवळीला आणि जनहिताला वाहून घेतलेल्या प्रत्येक संपादकासाठी तो अगदी अचूकपणे लागू होते, तो पाहू.

ज्या वृत्तपत्राचा संपादक परिणामांची तमा न बाळगता आपले विचार मुक्तपणाने प्रसिद्ध करू शकत नसेल, ते वृत्तपत्र बंद पडलेलेच पाहायला मला आवडेल. असहकारितेला वृत्तपत्रांकडून जरी काही बातम्या मिळण्यासारख्या असल्या तर ते घ्यायला आनंद होईल. परंतु मूलतः ही चळवळ वृत्तपत्रांपासून स्वतंत्र होती. आज आपण जे विचार छापून प्रसिद्ध करता ते नंतर आक्षेप घेत नाही म्हणूनच चालू शकते. त्यांच्या खपाचा प्रभाव दिसू लागला म्हणजे सरकारला इतरांना टिकविण्यासाठी नव्हे, प्रभावी करणे तो भागच पडतो. हे किंवा दुसरे कोणतेही सरकार आत्महत्या करायला तयार होणार नाही. त्याला स्वतःत सुधारणा तरी घडवून आणावी लागेल किंवा चळवळ दडपून तरी टाकावी लागेल.

आपल्यासारख्या हुकूमशाही सरकारच्या बाबतीत प्रथम दडपशाही होते आणि नंतर सुधारणा घडून येते. जोवर आपली सर्व वृत्तपत्रे निर्भय होऊन परिणामांची पर्वा न करता विचार प्रसिद्ध करू शकत नाहीत, प्रसंगी स्वतःला न पटणाऱ्या विचारांना आपल्या स्वातंत्र्याचा एक भाग म्हणून प्रसिद्धी देऊ शकत नाही, तोपर्यंत आपल्याला वृत्तपत्राव्यतिरिक्त इतर मार्ग शोधून काढले पाहिजे. आपल्या देशाच्या दुःख व अडचणीवर ज्या संपादकांजवळ काही मुलभूत कल्पना अथवा उपाय असतील त्यांनी ते अवश्य लिहून काढावेत, त्याच्या शेकडो प्रती कराव्यात आणि शेकडो कार्यकर्त्यांना ते व इतर हजारो संपादने वाचून दाखवावीत. प्रेस ॲक्टच्या भीतिने असे संपादक आपले विचार दडपून टाकणार नाहीत, अशी मी आशा करतो. तसे दडपणे हे त्यांनी पाप मानले पाहिजे. ते दडपणाऱ्या वृत्तपत्राची नोकरी म्हणजे शक्ती फुकट घालविणे आहे. आपले उत्तम विचार दडपून टाकावे लागणे हे संपादक म्हणवून घेणाऱ्यांना शोभणारी कृती नाही.

अंतर्मुख होऊन विचार करणे हा प्रत्येक पत्रकारासाठी परवलीचा शब्द असला पाहिजे. छापलेल्या लिखाणाबाबत शंका घेणे हा वाचकांचा परवलीचा शब्द झाला पाहिजे. समाजपरिवर्तनासाठी काम करणाऱ्यांनी गांधीजींचा सल्ला लक्षात ठेवला पाहिजे. लेखणी अथवा वाणी यांचा उपयोग न करताही लोकमान्य आपल्या हृदयावर कसे राज्य करत हे सांगणारे गांधीजींचे लिखाणही इतरत्र उद्धृत केले आहे.

आणि म्हणून यंत्रसामग्री आणि लोखंडी ताईत यांची पूजा करणे आपण सोडून देऊ. आपले लिखाण हा आपला कारखाना आणि आपल्या लिखाणाची प्रज्ञा धावली तर सल्ला शेकडो हातांत ही आपली यंत्रसामग्री, आजपर्यंतची यांत्रिक साधने वापरून आपण आपल्या विचारांचा मुक्त आविष्कार करू शकतो, तोपर्यंत आपण ती वापरू. परंतु आपल्या प्रत्येक हालचालींवर बारकाईने करडी नजर ठेवणाऱ्या 'वडीलधाऱ्या' सरकारने या गोष्टी आपल्यापासून हिरावून घेतल्या तरी आपल्याला हताश किंवा असाह्य वाटता कामा नये. छपाईच्या यंत्रसामग्रीसाठी मुदतीची बिलकूल आशा न ठेवता आपण आपले विचार पसरवू शकतो आणि खंबीरही ठेवू शकतो.

# उभे ठाकल्यानंतर

## १२. निव्वळ लेखक काय करू शकेल ? त्यासाठी त्यांने काय करायला हवे ?

शेख सादी आणि इतरांनी सांगितलेली ही हकीकत. भयंकर उन्हाळा होता. तो महान द्रष्टा तत्त्वज्ञ चिंध्या झालेल्या कपड्यांनिशी एका झाडाखाली सातूची पेज पीत बसला होता. त्याच्या खिशात फुटकी कवडीही नव्हती. दूर अंतरावर राजदरबारातील पंडिताला भोई पालखीतून वाहून नेत होते. दरबारी पंडिताच्या अंगावर त्याचे उच्च स्थान दाखवून देणारी भारी वस्त्रे होती. "कोण आहे तो तिकडे बसलेला ?" पंडिताने भोयांना विचारले.

भोई म्हणाले, "तो कोणी महत्त्वाचा माणूस नाही महाराज. गावंढळ लोकांशी चर्चा करण्यात वेळ फुकट घालविणारा फालतू माणूस आहे." दरबारी पंडिताने आपल्याला त्याच्याकडे घेऊन जाण्याचा हुकूम दिला.

पालखी खाली ठेवली गेली तसे राजपंडिताने त्याला ओळखले आणि विचारले, "या भयंकर उन्हाळ्यात तू काय करतो आहेत ?" "पेज पितो आहे." "काय मूर्ख माणूस आहेत तू !" एक सुस्कारा सोडून राजपंडित म्हणाला, "राजाशी जमवून घ्यायला तू शिकला असतास तर उरलेल्या आयुष्यभर ही भिकारडी पेज पिण्याची वेळ तुझ्यावर आली नसती."

ज्या सुधारकाला लोकांमध्ये बदल घडवून आणायचा आहे त्याचे राजाशी जमणार नाही तसेच लोकांशीही सूत जुळणार नाही, त्यामुळे त्याने पहिली गोष्ट शिकायला हवी ती म्हणजे पेज पिणे. फार प्रयत्न न करता जे मिळविता येईल त्यावर समाधान मानण्याची वृत्ती त्याने अंगी बाणवायला हवी. त्याच्या वेगळ्या गरजा हा त्याच्या कामातील अडथळा होता कामा नये. पेज प्यायला शिकणे याचा अर्थ भौतिक गरजा मर्यादित करणे हा तर आहेच; पण व्यक्तिगत गैरव्यवहाराचे विचारही त्याने मनातून काढून टाकले पाहिजेत. पुढचे पथ्य म्हणजे, विशेषत: लिहिणे हे त्याचे मुख्य माध्यम असेल तर, लोकांवर सोन्यासारख्या चोख अस्सल आयुष्याचा प्रभाव जास्त पडतो, निव्वळ लिखाणाचा नव्हे हे सुधारकाने लक्षात घेतले पाहिजे. शब्द हे शस्त्र काही वेळा जरूर असते. उदा. हुकूमशाही राजवटीत शब्द ही कृती ठरू शकते. पण एरवी बहुतेक वेळा शब्द हे निव्वळ शब्दच राहतात. लोकमान्य टिळक, गांधीजी यांची वृत्तपत्रे खूप खपली नसतील, त्यांनी लिहिलेली पुस्तके फार विकली गेली नसतील; पण त्यांचा प्रभाव जबरदस्त होता.

त्यांचे लिखाण हे ज्यांचा कित्ता घ्यावा अशा लिखाणाचे प्रतिबिंबच होते. त्यांच्या निष्कलंक आयुष्याने आणि चारित्र्याने त्यांच्या संदेशाला बळ दिले. या महापुरुषांचे जीवन हे एकात्म आणि सुसंगत होते हे साऱ्या जनतेला माहिती होते. सार्वजनिक आयुष्यात संभावितपणे वावरावे आणि खासगी आयुष्यात हवे ते करावे असला दुटप्पीपणा त्यांनी कधी केला नाही. देवळाच्या चार भिंतीत पवित्र विचार सांगायचे आणि बाहेर जाऊन फसवाफसवी करायची हा प्रकार त्यांनी कधी केला नाही. निव्वळ वाचकांची करमणूक करणारा लेखक किंवा त्यांना केवळ माहिती देणारा लेखक आयुष्यभर काय हवे ते करू शकेल. परंतु ज्याला आपली लेखणी सार्वजनिक हितासाठी उपयोगात आणायची आहे, त्याला दुटप्पीपणे वागणे परवडणार नाही. ज्यांना सुधारण्याचा प्रयत्न असा लेखक करतो, तेसुद्धा अनेकदा त्याचा तिरस्कार करतात. अशा स्थितीत तो लेखकच आपल्या लिखाणानुसार वागणूक ठेवीत नाही असा पुरावा त्यांच्या हातात आला तर सुधारणेचा मार्ग सोडून आपल्या जुन्याच पद्धतीने वागत राहायला ते तावडतोब तयार होतील. शिवाय या लेखकाने सुचविलेला सुधारणेचा मार्ग लोकांनी स्वीकारला, तर काही लोकांचे स्थान आणि हितसंबंध धोक्यात येणार असतात. लेखक दुटप्पीपणे आचरण करू लागला तर तो अशा लोकांच्या हातात आयताच सापडेल. परंतु त्याचे लिखाण आणि आयुष्य एकसंध असेल, सुसंगत असेल तर दुखावलेले लोकही काही करू शकणार नाहीत, याचा पुरावा मिळतो तो एका महापुरुषाने दुसऱ्या महापुरुषाबद्दल काढलेल्या उद्गारात. लोकमान्य टिळकांच्या प्रभावाबद्दल लिहिताना गांधीजी लिहितात, ''ज्या संपादकापाशी सांगण्यासारखे काही आहे, ज्याला स्वतःचा असा वाचकवर्ग लाभला आहे त्याला तुरुंगवासात टाकले तरच, एरवी कोणत्याही मार्गाने त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेणे किंवा त्याला गप्प बसविणे शक्य नाही, असा माझा विश्वास आहे. अशा संपादकाला जेव्हा यातना सोसाव्या लागतात तेव्हा त्या काळात त्याने आपला संदेश लोकांपर्यंत पोचवलेला असतो. लोकमान्यांच्या केसरीमधील छापील लेखांपेक्षा आणि विचारांपेक्षा त्यांचे मंडाले तुरुंगातील वास्तव्य अधिक बोलके होते. खडतर तुरुंगवासामुळे त्यांचा प्रभावीपणा हजारपटींनी वाढला. मंडालेतून सुटल्यानंतर त्यांच्या वाणी व लेखणीचे सामर्थ्य अतिशय प्रखर बनले. आता त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांचे आयुष्यभरचे स्वप्न साकार करण्याचा संकल्प लोकांनी सोडला आहे त्यातून ते कार्यरत आहेत आणि वाणी किंवा लेखणी न वापरताही आपले संपादकीय कर्तव्य बजावीत आहेत. आज ते हयात असते आणि आपल्या स्वातंत्र्याचा मंत्र उच्चारीत असते तरी कदाचित यापेक्षा अधिक प्रभावी कार्य ते करू शकले असते. माझ्यासारखे टीकाकार त्यांच्या या ना त्या उद्गाराची चिरफाड करत बसले असते. आज सगळे टीकाकार शांत झाले आहेत आणि लक्षावधी लोकांच्या हृदयावर टिळकांचा मंत्र अधिराज्य करीत आहे. या मंत्राची पूर्तता करण्यासाठी लोकमान्यांचे कायमस्वरूपी जीवनस्मारक उभे करण्याचा निर्धार लक्षावधी लोकांनी केलेला आहे. आपणही चांगल्या पत्रकारितेसाठी यंत्रसामग्री हवी ही कल्पना सोडून देऊ. आपली लेखणी हाच आपला कारखाना आहे आणि

आपला कित्ता गिरवू इच्छिणाऱ्या शेकडो लोकांचे हात हीच आपली छपाई यंत्रे आहेत."

तेव्हा पत्रकाराला, लेखकाला प्रभावी व्हायचे असेल तर त्यासाठी चोख जीवनक्रम ही महत्त्वाची पूर्वअट आहे. अर्थात तेवढेच पुरेसे आहे असे नाही. सुधारणा घडवू इच्छिणाऱ्या लेखकाने तीन गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे आपल्याला जेथे कार्य करावयाचे तेथील पार्श्वभूमी शोधा. आपण जी कामगिरी बजावू शकतो तिच्या मर्यादाही त्याने ओळखल्या पाहिजेत.

## मर्यादित भूमिका

लोकांची वागणूक सुधारते तेव्हा इतर अनेक गोष्टीही सुधारतात. पण निव्वळ कोणीतरी भाषणातून किंवा लिखाणातून सुधारणेचा संदेश देतो म्हणून लोक आपली चाल बदलतील असे होत नाही. काही कडू अनुभव पदरी पडले म्हणजे रस्ता बदलायला लोक तयार होतात. त्यातही जुन्या सवयी हाडीमासी खिळलेल्या असल्याने एखाद्या संकटाने बदल घडून येत नाही. अनेक दशके अतिशय कठीण परिस्थितीतून जावे लागले आणि तेही संकट फार मोठ्या लोकसंख्येवर गुदरले तरच जुन्या सवयी बदलण्याची शक्यता असते.

पण हाही काही शेवट नव्हे. कोणतीही गोष्ट चिरकाल किंबहूना दीर्घकाळ टिकून राहत नाही. सुधारणा डळमळतात. क्रांतीचे पायही डगमगतात. त्यामुळे हे सारे चक्र पुन्हा पुन्हा फिरवावे लागते. जीवनातील वास्तवता ही अशी असल्यामुळे समाजसुधारक किंवा लेखक यांनी अवास्तव, अवाजवी अपेक्षा सोडून द्यायला शिकले पाहिजे. ते आपणहून शिकले नाहीत तर परिस्थितीच त्यांना ते शिकवेल. तो काही थोडी कामे जरूर करू शकतो पण मर्यादेतच. आपला अनुभव तो लोकांच्या भल्यासाठी स्वच्छ शब्दांत मांडू शकतो. विलक्षण बुद्धिमान असेल तर समाजाने कोणत्या मार्गाने जावे याचे दिग्दर्शनही करू शकतो. काळ आणि परिस्थिती यावरही खूप काही अवलंबून आहे. लोकांच्या मनाचा कल आणि या लेखकाचे प्रतिपादन यांचा ताळमेळ जमला आणि तो लेखक समाजाच्या दोन-चार पावले पुढे असला तरच समाजावर त्याचा प्रभाव व्यापक प्रमाणात पडू शकतो. त्याउलट समाजभावनेच्या विरुद्ध जाऊन मते मांडणाऱ्या लेखकाचा प्रभाव मर्यादित राहणे अपरिहार्य असते.

अमूक एक गोष्ट घडावी अशी अपेक्षा आपण करतो तेव्हा आपण स्वत:ला ती पूर्ण करू इच्छिणाऱ्याच्या हातात सोपवीत असतो. अपेक्षा माफक असली तर गोष्ट वेगळी, पण एखाद्या ध्येयाने तुम्ही पछाडले गेला असाल, तर तुम्ही स्वत:ला लोकसमूहाच्या हाती सर्वस्वी गहाण टाकता आणि जनसागर अमर्याद निराकार असतो. सुधारणा किंवा लेखकाचे त्यावर कोणतेही नियंत्रण असत नाही.

लोकसमूह नुसता निराकार असतो असे नाही, हट्टीही असतो. गेली पंचवीसशे वर्षे त्याने बुद्धाचे म्हणणे मानले नाही आणि दोन हजार वर्षे ख्रिस्ताचा सल्ला जुमानलेला नाही. लोक नुसते हट्टी नसतात, ते धूर्तही असतात. आजपर्यंत कित्येक

महान गुरू आणि मार्गदर्शक यांचे त्यांनी खेळणे करून टाकले. ते सामान्य लेखकाला काय दाद देणार ? एकंदर जनताच नव्हे तर अशा थोर व्यक्तींच्या निकट संपर्कात आलेल्या माणसांनीही आपल्या अनेक सवयी सोडून दिल्या नाहीत. येशूने आपल्या शिष्यांना नम्रपणाची शिकवण दिली. त्यांनी मात्र आपल्यामध्ये श्रेष्ठ कोण याबद्दल हमरस्त्यावरच भांडणे केली. पीटरने आपण येशूला ओळखत नसल्याचा बहाणा केला. ज्युडासने येशूशी दगाबाजी केली. त्याने जागे राहून पहारा द्यावा एवढीच माफक अपेक्षा असताना येशूला तो तीनदा झोपलेला आढळला. प्रेषित महंमद पैगंबर आपल्या अखेरच्या घटका मोजत असताना त्याच्या अनुयायांनी वारसदार कोण यावरून वादंग मांडला आणि आपले मृत्युपत्र लिहून ठेवण्यासाठी कागद-पेन मागणाऱ्या प्रेषिताला या साध्या गोष्टीसुद्धा मिळाल्या नाहीत. निकटचे अनुयायी असे वागत असतील तर सर्वसामान्य जनता काय वेगळे करील ? प्रेषितांना लोक या पद्धतीने वागवीत असतील तर निव्वळ लेखकाला ते काय वागणूक देतील ? तेव्हा माफक अपेक्षा ठेवल्या तरी सुधारणा घडवू इच्छिणारा लेखक मोहाच्या सापळ्यात अडकतो. मग तो आपले सर्वस्व झोकून टाकतो. कारकीर्द पणाला लावतो, वेळ आणि शक्ती यांचा होम करतो. फार काय, आपले सर्व आयुष्यच समाजाच्या उद्धारासाठी झोकून देतो. मग त्याचा शेवट होतो उपेक्षेच्या कडवट अंधारात. हा दुर्दैवी शेवट कसा टाळायचा ?

## दुर्दैवी मोहापासून आत्मरक्षण

याची गुरुकिल्ली आहे ती स्वायत्ततेमध्ये. पहिली पायरी म्हणजे आपल्या गरजा कमी करायच्या. इतक्या कमी की उपलब्ध साधनसामग्री आणि विनासायास हातात येऊ शकणारी रक्कम यांच्या मदतीने त्या सहज भागविता येतील. म्हणजे कोणत्याही परिस्थितीत कार्यात तडजोड करावी लागणार नाही. सुधारक आणि लेखक यांनी हे साध्य करतानाच स्वतःला आपल्या वाचकांपासून काही दूर अंतरावर ठेवले पाहिजे. त्यांच्या पाशात अडकता कामा नये. वाचक आणि श्रोत्यांची दाद, टाळ्यांचा कडकडाट यांमुळे लेखक, सुधारक कठीण काळातून निभावून जाऊ शकतात. पण याच गोष्टी त्यांचे कान बहिरेही करू शकतात. टाळ्या घेण्याच्या सवयीचा तो गुलाम झाला तर भित्रा बनतो. प्रयोग करणे थांबवितो. नवीस साहस करू धजत नाही. असल्या सुधारकांचा शेवट मग कसा होणार ? तेव्हा यश हेसुद्धा एक सापळा ठरू शकते. पण त्यापेक्षा कमी किमतीच्या गोष्टी उदा. एखादी नोकरी हासुद्धा सापळा ठरू शकतो. अनेक लेखक कटू-कडक गोष्टी बोलण्याचे टाळतात आणि मग त्याचे समर्थन देतात. ते बोललो तर माझे व्यासपीठच मला गमवावे लागेल. पण या व्यासपीठाचा उपयोग जे बोलायला हवे त्यासाठी होणार नसेल तर त्याचे प्रयोजन तरी काय ? आपल्या लिखाणाचे स्वातंत्र्य राज्यकर्त्यांकडून, आपल्या मालकांकडून किंवा सहकाऱ्यांकडून हिरावून घेतले जाते तरी आपण लेखणीचे दळण दळत राहतो. निर्जीव-निःसत्त्व असे काहीतरी लिहीत राहतो. त्या वेळी आपण स्वतःची आणि लोकांची कमालीची धोकेबाज

अशी फसवणूक करत असतो. सबकुछ ठीक असा खोटा संकेत आपण लोकांना देत असतो. अशा वेळी आपली नोकरी आपल्या कार्याची वैरीण बनलेली असते. अशा एखाद्या धाग्याला लटकून राहण्याऐवजी लेखकाने दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. पहिली म्हणजे ज्या व्यासपीठाची त्याला मातब्बरी वाटते (उदा. वृत्तपत्र) तेसुद्धा समाजाचा एक भाग आहे आणि ज्या समाजाला सुधारायचे त्याचाच तो एक अंश असल्यामुळे त्या समाजाच्या प्रवाहाविरुद्ध ते फार काळ किंवा फार प्रभावीपणे वापरता येणार नाही. त्याचे सुधारणावादी लिखाण छापले जात असते ते समाज सहनशील असतो म्हणून ! त्याचा प्रभाव दिसू लागताच कधी त्या समाजाचे सरकार तर कधी समाजातील दांडगेश्वर त्याला प्रतिबंध करण्यासाठी पुढे सरसावतात. असे घडणे नैसर्गिक आहे. कारण गांधींनी आपल्याला सांगितल्याप्रमाणे कोणतेही सरकार, कोणतीही व्यवस्था आत्महत्येला तयार नसते. त्यामुळे आपले व्यासपीठ किंवा आपले साधन यांची किंमत आहे त्यापेक्षा फार जास्त करण्याच्या भरीला लेखकाने पडू नये. दुसरी गोष्ट म्हणजे कोणत्याही परिस्थितीत चांगले काम चालू ठेवणे नक्कीच शक्य असते. व्यासपीठ वा साधन असले तर उत्तमच, नसले तरी वाहव्वा. मोठ्या संख्येने सहकारी असले तर छानच. पण नसले तरी त्यांच्याशिवायही काम करता येते. अनेक थोर पुरुषांनीही आपल्या कारकीर्दीत या गोष्टींचा अनुभव घेतला आहे. त्यातून हा विश्वास निर्माण होतो. हाच विश्वास त्याला नोकरीच्या साखळीत अडकण्यापासून परावृत्त करील.

बहुतेक वेळा सत्य परखडपणे सांगावे लागते, तेही आपले वाचक, श्रोते आणि आपल्याला दाद देणारे यांच्यात. सामान्य जनतेलाही ते स्पष्टपणे सांगावे लागते. राज्यकर्त्यांपेक्षा या सगळ्यांना सत्याची ओढ जास्त असते, असे मुळीच नाही. तुम्ही राज्यकर्त्यांबद्दल सत्य सांगताना टाळ्या देणारे लोकच तुम्ही सत्याचा मारा त्यांच्या रोखाने वळवला की तुमच्यावर उलटतील. अशा वेळी तुमचे धैर्य आणि तुमचा प्रामाणिकपणा ही एक प्रकारे समाजावर केलेली टीका ठरते. धैर्य आणि प्रामाणिकपणा यांचा अभाव ज्यांच्याकडे असतो ते तुमचे उदाहरण पाहून अस्वस्थ होतात आणि मग आपल्या उणेपणासाठी सबबी शोधू लागतात. तुमच्यापाशी गमावण्याजोगे काही नाही. आमची परिस्थिती तशी नाही असे म्हटले जाते किंवा तुम्ही काय गब्बर आहात, तुमचे नुकसान ते काय होणार, आमचे मात्र सर्वस्व जाईल, असा युक्तिवाद केला जातो. त्यामुळे लेखकाने स्वतःला समाजाशी एकरूप केले पाहिजे. त्याचबरोबर समाजापासून सुरक्षित राहिले पाहिजे. या गोष्टी कशा साध्य करायच्या ?

## गांधीजींची शिकवण

एका अर्थाने गांधींना त्यांनी ठरविलेल्या सर्व ध्येयांच्या प्राप्तीत अपयश आले. अखंड भारत, अस्पृश्यतेचे संपूर्ण उच्चाटन, हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि सार्वजनिक जीवनात विशुद्ध नैतिकतेची प्रस्थापना ही त्यांची ध्येये होती. त्यांची पूर्तता त्यांना करता आली नाही. हिंदी राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारली जावी या छोट्या उद्दिष्टापासून

ते पाश्चात्य औद्योगिक संस्कृतीला भारताने स्वतंत्र पर्याय द्यावा या व्यापक ध्येयापर्यंत सर्वांनीच त्यांना दगा दिला. असे अपयश येत असूनही ते चिकाटीने प्रयत्न करीत राहिले. आसपास दगाबाजी, लाचारी, माथेफिरूपणा आणि मृत्यू यांची खाई पसरलेली असूनही आपल्या कार्यावरची त्यांची निष्ठा तसूभरही कमी झाली नाही. रक्तरंजित नौखालीमध्ये एकाकी वाटचाल करतानाही अर्धशतकापूर्वी आरंभिलेले कार्यच आपण पुढे चालवीत आहोत असा त्यांचा प्रामाणिक विश्वास होता.

यामध्ये स्वतःवर मोहिनी मंत्र घालण्याचा, स्वतःच स्वतःला भारून टाकण्याचा काही भाग निश्चितच होता. तर्काला न पटणारा आग्रहही होता. अशा प्रयोगात या गोष्टी थोड्या प्रमाणात असतातच. पण त्याचबरोबर एक ठाम मानसिक भूमिका होती. त्यातूनच ते प्रत्येक पराजयाला सुद्धा कामाला लावू शकले. ही लाखमोलाची मनोभूमिका काय असावी ?

गीता लिहिली गेली त्या काळापर्यंत दोन तात्त्विक दृष्टिकोन महत्त्वाचे ठरले होते. एक प्रवृत्तिवादी तर दुसरा निवृत्तिवादी. गीतेने या दोहोंचा संयोग घडवून आणला. गीतेने प्रयत्नाला महत्त्व दिले. तथापि प्रयत्नाच्या फळाबाबत आसक्ती न धरण्याचा मंत्र दिला. तरीही एक मोठा अडथळा राहिला. एक महत्त्वाचे सूत्र आहे ते असे- सगळ्या दुःखाचे मूळ व्यक्तीमध्ये आहे. व्यक्तीची कृती, दृष्टिकोन यातून दुःख जन्म घेते. त्यामुळे त्याच्या पलीकडे जायचे तर व्यक्तीने अंतर्मुख होऊन स्वतःमध्ये परिवर्तन घडवून आणायला हवे. यामुळेच रामकृष्ण परमहंस, रमण महर्षी अशा साधूसंतांना अध्यात्म विद्येत उच्च पदाला पोचणे शक्य झाले. परंतु योगी ठरले तरी त्यांच्या आसपासचे वातावरण आणि त्यांच्या सभोवताली जगणाऱ्यांची दुःखे, दैन्य यांमध्ये कसलीही सुधारणा झाली नाही. स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी आणि इतरांनी ही परिस्थिती बदलली. दुःखाचे मूळ जसे व्यक्तीमध्ये आहे तसेच ते भोवतालच्या विश्वाच्या रचनेमध्येही आहे. त्यामुळे हे जग, हे वातावरण बदलण्याचा प्रयत्न करणे हेसुद्धा पारंपरिक अध्यात्म साधण्याइतकेच महत्त्वाचे आहे, अशी शिकवण त्यांनी दिली. बाबा आमटे एखाद्या महारोग्याच्या भळभळणाऱ्या जखमेवर उपचार करतात तेव्हा त्यांना भीती आणि घृणेचा मुकाबला करावा लागतो आणि त्यातूनच ते त्याच्यावर मात करू शकतात. या नव्या दृष्टिकोनाप्रमाणे पारंपरिक आध्यात्मिक साधनेचे महत्त्व आहे ते ज्यातून व्यक्तीची मानसिक जडणघडण होते त्यामध्ये. त्यातून परिस्थिती, वातावरण बदलण्यासाठी, लक्षावधी लोकांची दुःखे कमी करण्यासाठी व्यक्तीची अधिक तयारी होऊ शकते.

भारतीय तत्त्वज्ञानातील वैश्विक संकलनांना सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या अशा कृतीचा गाभा मिळवून देण्याचे कार्य महात्मा गांधी व इतरांनी केले. ते येथेच थांबले असते तर विशिष्ट प्रकल्प किंवा मोहीम यांच्या यशापयशावर त्यांची मोठी भिस्त राहिली असती. परंतु असे तात्कालिक छोटे-मोठे जय-पराजय महत्त्वाचे न मानता त्यांनी आपल्या मूळ उद्दिष्टांच्या शोधावर सतत नजर ठेवली. मी आज राजकारणात आहे, कारण जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर त्याचा प्रभाव पडतो,

परंतु माझे मुख्य उद्दिष्ट आत्मसाक्षात्काराचे आहे आणि राजकारण हे त्याचे उत्तम साधन असल्याने मी राजकारणात पडलो, असे गांधीजी म्हणत. त्यामुळे एकीकडे चंपारण, खेडा, बार्डोली यातील प्रत्येक लढाई म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या मार्गातील पाऊल होते. लोकांना आपली आणि राज्यकर्त्यांची शक्तिस्थाने आणि दुर्बलता कळावी असा प्रयत्न त्यात होता, तर दुसरीकडे एका वेगळ्या पातळीवर या लढ्याचे खरे उद्दिष्ट स्वत:ला जाणून घेणे, अहंकाराचा खेळ पाहणे, प्रचंड यशाची स्वप्ने आणि अपयशाची भीती यांमध्ये मनाचे हेलकावे निरखणे हे होते. लोक माझे ऐकत नाहीत तेव्हा मी अस्वस्थ होतो. पण ती अस्वस्थता लोकांचे हाल होतात म्हणून येते की त्यांनी माझी अवज्ञा केली म्हणून येते ? अशा प्रश्नांचा शोध हे खरे उद्दिष्ट असल्याने वरवरच्या उद्दिष्टांच्या प्राप्तीत गांधीजी अपयशी ठरलेले दिसत असले, तरी त्या अपयशाचे त्यांना कधी ओझे झाले नाही. प्रत्येक नव्या अपयशाबरोबर काहीतरी कमाई होत होती. स्वत्वाची जाणीव वाढत होती. याबाबतीत गांधीजींचे विचार आणि बुंदेल शहा यांचे शेर यांच्यात किती एकवाक्यता आहे (फकीरबाबा, विजय मिळविण्यासाठी तुम्ही सारे आयुष्य फुकट घालविले. आता तरी हरायला शिका. विजयाची किंमत एखाद्या दाण्याएवढी तर पराभवाची हिऱ्याएवढी असते.)

गांधीजी परंपरेच्या चौकटीत राहून क्रांतिकारक ठरले ते त्यांनी केलेल्या या फेरमांडणीमुळे. सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची कृती ही त्यांनी आत्मसाक्षात्कारासाठी आवश्यक अशी साधना ठरविली. विशिष्ट लढा लढविताना मूळ उद्दिष्टांचा शोध सतत मनाशी ठेवल्याने अपयशाचा त्यांच्यावर परिणाम झाला नाही. अशा एखाद्या युक्तीचे संरक्षककवच स्वत:भोवती उभे करण्याची खबरदारी जनहितासाठी काम करणाऱ्या प्रत्येकाने घेतली पाहिजे. मात्र ही युक्ती, फेरमांडणी, साधना हा त्याच्या अंतरात्म्याचा अंश झाला पाहिजे.

## बुद्धाचा संदेश

अशा तऱ्हेच्या कार्यासाठी स्वायत्तता हवी. गांधीजी व इतरांचे आचरण दाखवून देते की स्वायत्ततेसाठी निष्काम प्रयत्नांची गरज आहे. माऊंट एव्हरेस्ट पर्वत का चढून जायचा तर तो आहे म्हणून. आपल्या भावनिक गुंतवणुकीस मूळ उद्दिष्टसुद्धा असू नये मग फलप्राप्तीची गोष्टच निराळी. यातील भेद सूक्ष्म आहेत आणि ते समजण्यासाठी मनाचा समतोल आवश्यक आहे. श्रोते किंवा प्रेक्षक काही वेळा प्रेरकही ठरू शकतात. त्याउलट मनाचे समाधान, स्वत:वरील अन्यायाबाबत उदासीनता यांचे रूपांतर इतरांच्या दु:खामध्ये होऊ शकते. मारेकरी हाही प्रारंभी आदर्शवादी असू शकतो. उद्दिष्टाचा संपूर्ण अभाव असतानाही त्याला अलिप्ततेचे भरजरी नाव चिकटविता येते. साध्य न झालेले उद्दिष्ट साध्य करण्याजोगे नव्हते असे आपले मन ठरवू शकते. स्वायत्ततेसाठी उद्दिष्टापासून मनाने अलिप्त होण्याची गरज असते. त्यासाठी स्वत्वाची जाणीव, सजगता आणि अंतर्मुखता यांची गरज असते अशी बुद्धाची शिकवण आहे. एवढ्याने संपत नाही. अखंड

पहारा आवश्यक असतो. एरवी निष्क्रियता, भयगंड आणि आत्मिक पक्षाघात यांचा धोका संभवतो. समाजसुधारणा असो किंवा व्यक्तीचे त्यातील काम, यातील प्रश्नांना अंतिम उत्तरे नसतात. शाश्वत टिकणारे, फार काय दीर्घकाळ टिकणारे काहीही नसते. कोणताही विजय चिरंतन नसतो आणि पराभवाचा उपयोग करून घेता येतो. धम्मपदाचा सल्ला असा आहे : सोनार चांदीतून हीण वेगळे करतो त्याप्रमाणे शहाणा माणूस आपले दोष, दुर्गुण स्वत:मधून बाजूला काढत राहतो- एकेक, थोडेथोडे, पुन्हा पुन्हा !

(डिसेंबर १९८६)

# ताठ उभे राहताना

१३ मार्च १९८७. झैलसिंग यांनी राजीव गांधींना उद्देशून लिहिलेले पत्र याच दिवशी आम्ही प्रसिद्ध केले. झैलसिंग यांनी पत्रात राजीव गांधींवर संसदेची दिशाभूल केल्याचा आरोप केला होता. त्या दिवसापासून २७ नोव्हेंबर १९८९ रोजी राजीव गांधी सार्वत्रिक निवडणुकीत पराभूत झाले तेव्हापर्यंत इंडियन एक्स्प्रेस गटाचा संपूर्ण राज्ययंत्रणेशी प्रचंड संघर्ष चालू होता.

लढा राजीव गांधींशी होता किंवा सरकारशी होता एवढेच न म्हणता संपूर्ण राज्ययंत्रणेशी होता असे मी आवर्जून म्हणतो कारण राज्ययंत्रणेचे अनेक हात-पाय एक्स्प्रेस गटावर या काळात तुटून पडले. या अडीच वर्षांच्या काळात एक्स्प्रेस गटावर एकंदर दोनशेतीस खटले भरले गेले. खटले भरणाऱ्यांत केंद्रीय कायदे विभाग, डायरेक्टर ऑफ रेव्हेन्यू इन्टिलिजन्स, प्राप्तिकर विभाग, सीमाशुल्क विभाग, अंमलबजावणी संचालनालय, मुख्य आयात-निर्यात नियंत्रक अशा अनेक महारथींचा समावेश होता. वृत्तपत्राला मिळणाऱ्या जाहिराती कमी झाल्या. बँकांनी कर्जाच्या ज्या मर्यादा स्वतः मंजूर केल्या होत्या तेवढे कर्ज त्या देईनाशा झाल्या. पत्रांना उत्तरे देणे बँकांनी थांबविले, मग व्यक्तिगत चर्चेची तर गोष्टच सोडा. या वृत्तपत्रसमूहाच्या संचालक मंडळावर सरकारी प्रतिनिधी नियुक्त करण्याचा प्रयत्न झाला. बंगलोरमध्ये फॅक्सिमिली सर्कीट बंद करून टाकण्यात आले. एक्स्प्रेसच्या दिल्ली आवृत्तीचे प्रकाशन ४७ दिवस यशस्वीपणे बंद पाडण्यात आले. त्यासाठी एक्स्प्रेसच्या इमारतीभोवती भाडोत्री गुंड आणि सशस्त्र पोलिस यांनी संयुक्तपणे वेढा दिला. वृत्तपत्राच्या देशभरच्या अनेक कार्यालयांवर छापे घालण्यात आले. समूहाचे एक सल्लागार आणि त्यांचे सहकारी यांना तुरुंगात टाकण्यात आले. निष्ठावान कर्मचाऱ्यांना बदडून काढण्यात आले. तोंडावर ॲसिड फेकल्यामुळे सहा जण भाजले. श्री. रामनाथ गोयंका व इतरांचे पासपोर्ट जप्त करण्यात आले. त्यांच्या घरावर छापे घातले गेले. या वृत्तपत्र समूहाची आणि त्याच्या संबंधातील सर्वांची सरकारी मालकीच्या प्रसार माध्यमांनी आणि वृत्तपत्रसृष्टीतील सरकारी भाटांनी अमर्याद निंदा-नालस्ती केली. असा हल्ला श्रीमती गांधींनी आणीबाणीच्या काळात केला होता. परंतु हा हल्ला त्यापेक्षाही जास्त व्यापक होता.

या कालखंडाच्या शेवटी आम्हीसुद्धा कोलमडून पडण्याच्या बेतात होतो. परंतु आणीबाणीत घडले त्याचप्रमाणे येथेही राज्यकर्त्यांच्या चुकीमुळेच आम्ही बचावलो.

जानेवारी १९७७ मध्ये श्रीमती गांधींनी निवडणुका जाहीर केल्या तीच गोष्ट राजीव गांधींनी १९८९ मध्ये केली. ते निवडणूक हरले आणि एक्स्प्रेस वृत्तपत्र जिवंत राहिले. त्या वेळी ते बंद पडण्याला फार अवधी शिल्लक राहिला नव्हता.

या काळातील सगळे ताण-तणाव, डाव-प्रतिडाव विलक्षण आनंदाचे आणि कमालीचे निराशेचे प्रसंग, अनेकांनी बजावलेली विलक्षण कामगिरी व इतरांनी केलेली दगाबाजी, आम्ही इतरांचा व इतरांनी आमचा केलेला वापर या सगळ्यांची कहाणी सांगत बसलो तर तो एक ग्रंथच होईल. त्यातील थरारक नाट्य जो जिवंत करू शकेल त्यानेच ते लिहायला हवे. परंतु या संघर्षातून आम्ही अनेक धडे शिकलो. ते सारांशरूपाने मांडले तर उद्बोधक ठरू शकतील.

एक : राज्यकर्ते चुकत असले पाहिजेत आणि आपली बाजी बरोबर असली पाहिजे. तीही प्रत्येक बाबतीत. शेवटी अशा राजवटीची विश्वासार्हता किती आणि तिच्या टीकाकारांची विश्वासार्हता किती यावरच परिणाम काय ते ठरेल. राज्यकर्ते अखंडपणे लोकांच्या हिताविरुद्ध काम करत असले पाहिजेत आणि तुम्ही जनहितासाठी. सामान्य वाचकांचा सरकारकडे आणि आमच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन नेमका असाच असल्याने आमच्यावर चढवलेले हल्ले सरकारवरच उलटले. हा हल्ला एक सार्वजनिक प्रश्न बनला. राजीव गांधींच्या राजवटीचे चारित्र्य काय होते याचे उदाहरण म्हणून हा हल्ला जनमानसात नोंदला गेला. आम्ही जे सांगतो आहोत त्याचा पुरावा या सर्वंकष हल्ल्याने उभा केला. त्यातून अनेक गोष्टी लक्षात आल्या. उदा. सत्याची कास नेहमीच धरावी पण राज्यकर्त्यांशी लढाई सुरू झाली म्हणजे तर सत्याला चिकटून राहणे शंभरपट आवश्यक बनते. एखादी छोटीशी चूक जरी यात झाली तरी वृत्तपत्राच्या कार्याच्या विश्वासार्हतेवर बोळा फिरवायला राज्यकर्त्यांना ती उपयोगी पडू शकते.

दोन : वृत्तपत्राने विशिष्ट प्रकरणे मांडताना व्यवस्थितपणे, अचूकपणे लिहिले पाहिजे एवढेच नव्हे तर त्याची वागणूक सरळ आणि रास्त असली पाहिजे. एक्स्प्रेसवर सरकारने २३० पेक्षा जास्त खटले भरले याचा अर्थ थोडी तरी फट कोठेतरी दिसते का हे राज्यकर्ते सतत शोधत राहणारच. अर्थात सरकारकडून अशा बारकाईने तपासण्या होणे याची एक्स्प्रेसला पंचवीस वर्षांच्या काँग्रेस राजवटीत सवय झालेली होती, तिचा आम्हाला उपयोग झाला. पूर्वीच्या या अनुभवामुळे आम्ही मुळातच इतर कोणत्याही व्यवसायसंस्थेपेक्षा अधिक काळजीपूर्वक व्यवहार करायला शिकलो आहोत. हा दुहेरी संबंध होता. राज्ययंत्रणेशी लढायचे तर तुमची वागणूक निष्कलंक हवी आणि दुसरीकडे हा संघर्षच तुमची वागणूक अधिकाधिक उजळत राहतो.

तीन : राज्यकर्ते प्रतिहल्ला चढवतील हे निश्चित. त्यांचा हा प्रतिहल्ला व्यापक असेल. त्यासाठी सर्व यंत्रणा वापरली जाईल. त्यामुळे लढ्यात चिकाटीने चिकटून राहण्याचा आपला निश्चय हवा. त्यासाठी सर्वस्व गमावण्याची तयारी हवी. रामनाथ गोएंका यांनी अशी ताकद, चाणाक्षपणा, खंबीरपणा गेली सत्तर वर्षे आपल्या अंगात बाणविला होता. त्यामुळे १९४२ मध्ये, १९७५ ते १९७७

मध्ये आणि पुन्हा १९८७ ते १९८९ दरम्यान ते आपले सर्वस्व पणाला लावू शकले. सरकारचा हल्ला आपण परतवू शकलो पाहिजे. त्यासाठी लोकांची मते आपल्या बाजूने वळवायला हवीत. वस्तुस्थिती शोधून काढायला हवी आणि गुंडगिरीवर मात करायला हवी.

चार : राज्यकर्ते प्रतिहल्ला करणार हे निश्चित असले तरी आपण त्यांना आत्मविश्वासाने तोंड देऊ शकतो. आपल्याला चिरडून टाकण्यासाठी त्यांनी राज्याची सगळी यंत्रणा कामाला लावली तरी अजून आपला समाज स्वतंत्र आणि मुक्त असल्याने एका मर्यादेपलिकडे त्यांना जाता येत नाही. उदा. ते आपणा सर्वांना ठार मारू शकत नाहीत. शिवाय हिंसेच्या सीमेअलिकडे राज्ययंत्रणा इतकी तोकडी पडते की, तिच्याशी आत्मविश्वासाने लढणे फार अवघड जात नाही. त्यांनी आमच्यावर अनेक खटले भरले. आम्हाला त्यात दोषी शाबीत करण्यासाठी त्यांच्या हाती क़ायदेतज्ज्ञ, नोकरशहा, गुंड असा भला मोठा ताफा होता. परंतु त्यांची ही सगळी चढाई निव्वळ दोन हुषार तरुण माणसांनी- एस. गुरूमूर्ती आणि अरुण जेटली यांनी राम जेठमलानी आणि एफ. एस. नरीमन या दोन निष्णात वकिलांच्या मार्गदर्शनाने निष्फळ ठरविली. निव्वळ चार-पाच माणसे एवढा मोठा हल्ला परतवू शकली. यामागे अनेक कारणे आहेत. आमच्यावर तुटून पडायला ज्यांना सांगितले होते त्यातील अनेकांना मनापासून ते काम करण्याची इच्छा नव्हती. त्यांचे म्होरके होते त्यांनी मात्र एक्स्प्रेस समूहाला संपविण्याचा विडा उचलला होता. तथापि ते एकतर बेताच्या वकुबाचे होते किंवा दुबळ्या हाताचे होते. ते इतपत तरी पुढे जाऊ शकले याचे कारण आपल्याकडील यंत्रणांची अवस्था. आमच्या बाजूला वकील असतील, कायदा असेल पण त्यांच्या बाजूला अनेक वेळा न्यायाधीशच होते. अतिशय सामान्य प्रतीचे अधिकारी आमच्या वृत्तपत्राला अशा यातना देत होते आणि कायद्याचे रक्षक म्हणविणारे त्यांच्यासमोर झुकत होते. या दोन्ही गोष्टी चीड आणणाऱ्या होत्या. संतापाने, निराशेने डोक्यावरचे केस उपटण्याची वेळ अनेकदा येत असे. कोर्टात राम जेठमलानी आमच्या वतीने विलक्षण प्रभावी निवेदन करीत. सी. बी. आय. चे वकील किंवा तेव्हाचे सॉलिसिटर जनरल जी. रामस्वामी एकाही मुद्याला नीट उत्तर देऊ शकत नसत. ते फक्त पुन्हा पुन्हा आरोपपत्र वाचून दाखवीत आणि तरी अनेकदा न्यायाधीश सरकारला हवे तसे निकाल देत. या क्षणी कोठल्या नरकात आपण येऊन पडलो असा उद्वेग वाटे. पण लवकरच आम्ही आमचा आत्मविश्वास परत मिळवू शकलो. कारण लक्षात आले ते असे की, रामस्वामी, कात्रे आणि मंडळी यांना हवे ते द्यायला अनेक न्यायाधीश निर्लज्जपणे तयार असले तरी आम्हाला मारण्याच्या दिशेने घेऊन जाण्याची कुवतच या मंडळींमध्ये नव्हती. सरकारी अधिकाऱ्यांची अकार्यक्षमता, महामूर्खपणा येथे इतक्या कळसाला जाऊन पोचले, एवढ्या थराला त्यांचा अध:पात जाईल अशी आम्ही कधी कल्पनाही केली नव्हती. व्ही. पी. सिंग यांना, आम्हाला व इतरांना गुन्हेगारीत मुद्दाम गुंतविण्यासाठी खोटी कागदपत्रे, सह्या करण्याचा जो हास्यास्पद तमाशा त्यांनी करून दाखविला तो आठवा.

आमचा प्रत्येक मुद्दा वेगळ्या तऱ्हेने सिद्ध करून दाखवायचा असे जणू त्यांनी ठरविले होते.

पाच : आमच्या आत्मविश्वासामागे आणखी एक कारण होते. त्या वेळी अनेकजण आम्हाला म्हणाले, "तुम्ही मूर्ख आहात. तुमचे वृत्तपत्र किती लोक वाचतात ? आकाशवाणी आणि दूरदर्शन यांच्या लोकप्रियतेची बरोबरी तुम्ही कशी करणार ? तुमची फिकीर करतो कोण ?" आमचा संदेश संपूर्ण देशात व्यापक प्रमाणात वाचला आणि लोकांनी आमची काळजी केली हे निवडणुकीच्या निकालांमधून प्रसिद्ध झाले. राज्यकर्त्यांनी आम्हाला जे जे धक्के दिले, जे खोटे आरोप आमच्यावर लादलेल्या त्या सगळ्या गोष्टींचे सत्य लोकांनी जाणले आणि असा निष्कर्ष काढला की, हे गुन्हे, ही पापे आमची नसून राजीव राजवटीची आहेत हे जनतेने ओळखले.

सहा : आणखी एक गोष्ट आमच्या लक्षात आली ती म्हणजे राज्ययंत्रणा ही एकसंध आणि अभेद्य कातळासारखी नसते. अनेकदा त्या यंत्रणेतूनच आम्हाला मदत मिळाली. पंधरा वर्षांपूर्वीच्या एका जुन्या परिपत्रकाची माहिती मिळाली. सरकारचे न्यायालयातील प्रतिपादन त्या परिपत्रकाने पार धुळीला मिळविले. त्याशिवाय मंत्र्यांचा खोटारडेपणा सिद्ध करणाऱ्या फाईलची प्रत, दीर्घकाळ दडपून ठेवलेली न्या. ठक्कर यांच्या अहवालाची प्रत, मुंबई उच्च न्यायालयासारख्या न्यायालयाने सरकारला केलेला अटकाव असे पुष्कळ सहकार्य सरकारी अधिकाऱ्यांकडून मिळाले आणि या प्रत्येक बाबतीत ते ते सरकारी अधिकारी आपणहून आमच्या मदतीला आले.

सात : मदत सरकारी यंत्रणेतूनच मिळाली एवढेच नाही. एक निवृत्त भूमिसुधारणा अधिकारी, कित्येक वर्षे निलंबित अवस्थेत असलेले आणखी एक भूमिसुधारणा अधिकारी, निष्णात वकील, अनेक मोठ्या कंपन्यांच्या संचालक मंडळांवर असलेली एक व्यक्ती, १९८७ मध्ये दिल्लीतील एक्स्प्रेसच्या इमारतीत प्रवेश करण्यास आम्हाला मदत करणारे तरुण विद्यार्थी असे अनेक सामान्य नागरिक सहाय्याला धावून आले. त्यातील काहींनी सरकारच्या छळवणुकीचा अनुभव घेतला होता. तथापि बहुतेकांनी आम्हाला मदत केली ती एकंदर व्यवस्था सुधारावी या उद्देशाने. त्यातील अनेकजण आपापल्या क्षेत्रात कार्य करत आहेतच. इतर अनेकांना काही बंधनांमुळे, अडचणींमुळे समाजकार्य करता येत नव्हते. त्यांनी सूचना केल्या. महत्त्वाची माहिती पुरविली. कारण आपण जे करू इच्छितो पण करू शकत नाही ते हे वृत्तपत्र करत असल्याचे त्यांनी पाहिले. पत्रकार अनेकदा गुपिते शोधून काढण्यासाठी वाजवीपेक्षा जास्त श्रेय आपल्याकडे घेतात. खरी गोष्ट म्हणजे एखादे वृत्तपत्र सार्वजनिक हितासाठी काम करत आहे असे दिसले, या वृत्तपत्राला एखादी माहिती मिळाली आणि तपासणीअंती ती खरी ठरली तर ती प्रसिद्ध न करण्याबाबत कोणीही त्यांच्यावर दडपण आणू शकत नाही असे दिसले, की त्या वृत्तपत्राकडे लोक आपणहून धाव घेतात.

आठ : यांच्या जोडीला आणखी एक धडा शिकायला हवा. माहिती भरपूर मिळते खरी; पण त्यातील बरीचशी चुकीची असते. अनेकदा माहिती देणारे

निव्वळ कान-गोष्टींच्या आधारे बोलत असतात. एखाद्या कार्याविषयी वाटणाऱ्या आस्थेमुळे त्यांनी काही अवाजवी निष्कर्ष काढलेले असतात. काही जणांना खासगी सूड उगवून घ्यायचे असतात. त्यातील काहीजण राज्यकर्त्यांचेही हस्तक असतील. त्यांच्यामार्फत राज्यकर्ते खोट्या गोष्टी पेरतील, नंतर त्यातील खोटेपणा उघडकीला आणून वाचकांमधील वृत्तपत्रांची विश्वासार्हता खच्ची करतील. त्यामुळे सरकारशी लढाईला उभ्या ठाकलेल्या वृत्तपत्राला उत्स्फूर्तपणे भरपूर माहिती मिळू लागली तरी त्याची सत्यता आणि विश्वसनीयता यांची चिकित्सा करणे अगदीच आवश्यक बनते. तरीही चूक झाली तर ती त्वरित मोकळेपणे आणि ठळकपणे मान्य करणे अतिशय महत्त्वाचे ठरते.

नऊ : मदत करणारे अनेकजण निघतील तसेच तुमची संगत सोडून जाणारेही पुष्कळ असतील. त्यापेक्षा वाईट म्हणजे काहीजण दगाबाजी करतील. तुमच्या बातम्या बाहेर फोडतील किंवा तुमची दिशाभूल करतील. आम्हाला असे अनुभव हिंदुजा आणि चंद्रास्वामी अशा मंडळींकडून आले. अशी वागणूक मिळाल्यानंतर अनेकदा मनात कडवटपणा भरून राहतो आणि आपण आपली कीव करू लागतो. अशा वेळी एक शहाणपणाची गोष्ट करावी. महंमद अली आणि शौकत अली यांनी पाठ फिरवली तेव्हा संतप्त झालेल्या आपल्या सहकाऱ्यांना गांधींनी दिलेला सल्ला आपण आठवावा व पाळावा. गांधीजी म्हणाले होते, "प्रवाहाच्या मध्यात जे साथीदार साथ सोडून गेले त्याबद्दल रागवू नये. त्याऐवजी इथपर्यंत तरी त्यांनी संघर्षात साथ दिली याबद्दल त्यांचे आभार मानावेत !"

दहा : आपण झगडा करण्याचे निमित्त शोधत बसू नये. पण आपल्यावर संघर्ष लादला गेला तर जरूर लढावे. लढत राहावे. लढाई छेडण्याइतकेच ती चिकाटीने लढवीत राहणे महत्त्वाचे आहे. लढाई छेडणे आणि मग राज्यकर्त्यांच्या प्रतिहल्ल्याने नमून माघार घेणे याने नुकसान फार होते. अशी माघार घेण्यामुळे इतरांचे मनोधैर्य खच्ची होते. यांचे काय झाले ते पाहा, असे ते म्हणू लागतात. उलट तुम्ही चिकाटीने उभे ठाकलात तर राज्यकर्तेच तुमच्या मदतीला धावून येतात आणि तुम्ही सुरू केलेले काम पुरे करतात. येथे तुम्ही एखादी चूक दाखविली आणि ती सुधारण्याचा आग्रह केला तर ती सुधारण्याचा सोपा मार्ग घेण्याऐवजी ते आपली चूक आणखीनच गुंतागुंतीची करून ठेवतात. निव्वळ तुम्ही एखादा चांगला मार्ग सुचविला एवढ्यासाठी ते त्याच्याकडे ढुंकूनही पाहत नाहीत. त्यांच्या दृष्टीने ते तुम्हाला मोजत नाहीत हे दाखवून देणे जास्त महत्त्वाचे ठरते. तुम्ही फालतू आहात आणि त्यांना तुमच्याविषयी तुच्छता वाटते हे सिद्ध करण्यासाठी ते हवे ते करतात. त्यांनी सुटी घेऊन अंदमानला भेट दिली आणि त्यावर तुम्ही टीका केली तर लक्षद्वीपला जाण्याचा हट्टही ते पुरा करतील. त्यांच्या एखाद्या उत्सवातील उधळपट्टीवर तुम्ही बोट ठेवले तर तसले उत्सव ते आपले वैशिष्ट्यच करून सोडतात. अशी उदाहरणे वाढत गेली म्हणजे त्यातूनच एक प्रतिमा बनते. सर्व यंत्रणा हाताशी असल्याने ते त्या सगळ्या बिनदिक्कतपणे वापरतात. त्यातून राज्यकर्ते म्हणून त्यांचे चारित्र्य आणखी उघडे पडते. त्यांच्यावर

सतत दडपण राहिले आणि वाढत गेले म्हणजे आपणच आपली स्वत:ची कोंडी करून घेतात. इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्यासारखे राज्यकर्ते अडचणीच्या प्रश्नावर चांगल्या सल्लागारांची मदत घेण्याऐवजी स्वत:ला कोंडून घेतात. पूर्वीपेक्षा कमी लोकांना आणि तेही अधिक बदमाष लोकांना भेटतात. यातून त्यांच्या चुकांची संख्या वाढते. हळूहळू चुकांचे गांभीर्य वाढू लागते. आपण फार ताकदवान आहोत हा त्यांचा भ्रम हाच मोठा खड्डा ठरतो. बहुसंख्य माणसे आणि यंत्रणा राज्यकर्त्यांपुढे झुकतात. चारशे दहा खासदार त्यांच्या तालावर नाचतात. ठक्कर, नटराजन सारखी मंडळी त्यांची दुष्कृत्ये कायदेशीरपणाने सिद्ध करायला सरसावतात. या गोष्टीमुळे राज्यकर्त्यांचा स्वत:वरचा भ्रम फुगत जातो. अशा घडामोडीतून लढाई लांबत जाते. काही वेळा तिचा जोर ओसरण्याच्या मार्गावर असतानाच राज्यकर्ते आणखी घोडचूक करून ठेवतात. झैलसिंग यांचे पत्र पटलावर ठेवण्याऐवजी राज्यकर्ते गुरुमूर्ती आणि जानकीरामन यांना अटक करण्याचे ठरवितात. गोएंकांच्या घरावर धाड घालण्याचा निर्णय घेतात. वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केलेल्या प्रश्नांना समर्पक युक्तिवादाने उत्तरे देण्याऐवजी बदनामीविषयक नवे विधेयक मांडतात. ठक्कर आयोगाचा अहवाल एकदाच पूर्णपणे प्रसिद्ध करण्याऐवजी तो दाबून ठेवून वर ऑफिशियल सिक्रेटस ॲक्टखाली खटले भरण्याची धमकी देतात. महालेखापरीक्षकांचा बोफोर्सबाबतचा अहवाल संसदेच्या अधिवेशनाच्या शेवटच्या काही दिवसांत मांडला जावा अशी मागणी झाली परंतु त्या वेळी तो मांडला असता तर पुढील अधिवेशनात विचारासाठी येईपर्यंत त्यातील हवा बरीचशी निघून गेली असती. त्याऐवजी राज्यकर्त्यांनी तो प्रथम दाबून ठेवण्याची भूमिका घेतली आणि नंतर पुढील अधिवेशनाच्या सुरुवातीला मांडण्याचा निर्णय घेतला.

अकरा : तुम्ही चिकाटीने लढत राहिलात तर राज्यकर्ते महाभयंकर आत्मघातकी चूक हमखास करणार असे धरून चाला. ऑक्टोबर-नोव्हेंबर १९७६ हा काळ मला अजून आठवतो. इंदिरा गांधींच्या विरोधातली चळवळ जवळजवळ संपली होती. आणीबाणी कधी संपणारच नाही असे वाटू लागले होते. श्री. गोएंकांनी मात्र मला सांगितले, "त्या चूक करणार हा भरवसा बाळगा. आपण तगून राहायचाच काय तो प्रश्न आहे." तसेच झाले. १८ जानेवारी १९७७ ला त्यांनी निवडणुकांची घोषणा केली आणि त्यानंतर दोन महिन्यांत त्या सत्तेवरून दूर फेकल्या गेल्या. अलिकडच्या काळात आणीबाणी नसल्यामुळे आम्हाला निव्वळ तगून राहण्यावर न थांबता खूप काही करता आले. एकामागून एक हल्ले चढविता आले. एक आठवडाही मध्ये विश्रांती घेतली नाही. राजीव गांधींनी आणखीनच गडबड-गोंधळ करायला सुरुवात केली. त्यातून आमचे मुद्दे सिद्ध होऊ लागले. शेवटी त्यांनी अखेरची महान चूक केली. त्यांनी निवडणुका जाहीर केल्या आणि त्यानंतर दीड महिन्यातच खुर्ची गमावली.

बारा : या दोन्ही प्रसंगात निवडणूक घेणे ही निर्णायक चूक ठरली. पण निवडणुका घ्याव्या लागल्या याचे कारण मुळातच आपण मुक्त, स्वतंत्र समाजात आहोत. निवडणुका लांबविण्यासाठी इंदिरा गांधींनी आणीबाणीचा वापर केला.

आणीबाणीमुळे विरोधही पुष्कळसा थंडावला. पण त्यांच्या सरकारची वैधता संपली. ती पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी निवडणुका घेणे त्यांना भागच पडले. स्टॅलिन किंवा पॉल पॉट यांना अशी गरज कधी भासली नाही. श्रीमती गांधी मुळातच मुक्त असणाऱ्या एका समाजात वावरत असल्याने त्यांना गरज भासणे अपरिहार्य होते. एकदा लोकांनी विरोधात कौल दिल्यानंतर इंदिरा गांधी किंवा राजीव गांधी दोघांनाही काही करता आले नाही. फिलिपिन्सचा हुकूमशहा मार्कोस किंवा पनामाचा नुयीपेग यांच्याप्रमाणे निवडणुकांचा निकाल ठोकरून लावून सत्तेवर टिकून राहणे आपल्या देशात त्यांना शक्य झाले नाही आणि म्हणून सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपला समाज असाच स्वतंत्र आणि मुक्त ठेवायला हवा. अशा समाजात राज्यकर्त्यांना एका मर्यादेपलिकडे काही करता येत नाही. विरोधकांना हिंसकपणे नाहीसे करणे त्यांना शक्य होत नाही. लोकांचा कौल घेणे त्यांना टाळता येत नाही. अशा समाजात लोकही आपल्या सभ्यतेची, सुसंस्कृतपणाची जाणीव, बऱ्या-वाइटाबद्दलची सद्विवेकबुद्धी जिवंत ठेवू शकतात.

तेरा : यासाठी सतत दडपण ठेवावे. पण दम धरण्याची तयारी ठेवा. आपला देश फार विस्तीर्ण आहे. त्यामुळे एखादा संदेश सगळ्यांपर्यंत पोचायला खूप वेळ लागतो. लक्षावधी लोक तर निव्वळ रोजच्या जगण्याच्या झगड्यातच गुंतून पडलेले असतात. त्यामुळे त्यांचे लक्ष राज्यकर्त्यांच्या भ्रष्टाचाराकडे वेधून घ्यायचे तर अशी प्रकरणे प्रचंड आणि भयंकर व्हावी लागतात. ज्यांना तरीही उदासीन राहायचे असते त्यांना हव्या तेवढ्या सबबी सापडतात.

चौदा : लढणारी माणसे अनेकदा उतावळी होतात. कोणीच कसे प्रतिसाद देत नाही ? कोणीच कसे काही करत नाही ? असे वाटून ते संतप्त किंवा निराश होतात. पण बहुसंख्य माणसे शांतपणे वाट पाहत राहणे जास्त श्रेयस्कर मानतात आणि मग संधी आल्यानंतर ठोकण्याचे सोडत नाहीत. त्यामुळे आपण धीर धरला पाहिजे आणि असा प्रत्येक लढा पुष्कळ चढ-उतारातून जात असतो हे लक्षात ठेवले पाहिजे. याचे लक्षात ठेवण्याजोगे अचूक वर्णन दिले ते गांधींनी. असहकाराच्या चळवळीचा मार्ग रेखाटताना त्यांनी लिहिले : 'प्रत्येक चांगली चळवळ पाच टप्प्यांतून जाते. उपेक्षा, टवाळी, शिव्यागाळी, दडपशाही आणि शेवटी आदरसत्कार.' काही महिने आपल्याला उपेक्षेचा अनुभव आला. त्यानंतर व्हाईसराय उदारपणे या चळवळीला हसले. निंदानालस्ती आणि गैरसमज यांना तर तोटा नाही. प्रांतांचे गव्हर्नर आणि असहकारितेविरुद्धची वृत्तपत्रे यांनी चळवळीची शक्य झाली तेवढी बदनामी केली. आता दडपशाहीचा काळ सुरू झाला. सध्या ती सौम्य स्वरूपात आहे. यातून तावून-सुलाखून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक चळवळीचा सन्मान होतोच. त्याचेच दुसरे नाव यश. आपण सच्चे असू तर ही दडपशाही हा येणाऱ्या विजयाचा संकेत आहे, असे मानले पाहिजे. आपण सच्चे असू तर दडपशाहीला घाबरून जाणार नाही किंवा हिंसक पद्धतीने प्रत्युत्तरही देणार नाही. हिंसा म्हणजे आत्महत्या. सत्य चटकन मरत नाही हे आपण ओळखले पाहिजे. दडपशाही करून का होईना परंतु आपले अस्तित्व टिकविण्याचा अखेरचा प्रयत्न सरकारने

करणे हेही स्वाभाविक म्हटले पाहिजे. या अडचणीच्या क्षणी संपूर्ण संयम बाळगणे हाच यशाकडे जलद गतीने जाण्याचा मार्ग होय.

(यंग इंडिया, ९ मार्च १९२१)

पंधरा : अशा चढ-उतारात अनेकदा संघर्षाचे मुद्दे बदलतात. कधी आर. के. धवन आणि ठक्कर आयोग हा संघर्षबिंदू असतो; तर कधी ऑफिशियल सिक्रेटस् ॲक्ट आणि वृत्तपत्रे, तर कधी सरकारने संसदेला सांगितलेले असत्य किंवा खोटारड्यांना सभापतींनी दिलेले संरक्षण. या प्रवासात प्रत्येक टप्प्यावर तुम्ही राज्यकर्त्यांना शह देऊ शकला पाहिजेत. ते खरोखर किती मूर्ख आहेत हे सतत उघडकीला आणले पाहिजे. हे करून झाल्यानंतर पुन्हा एकदा मूळ विषयाकडे प्रकाशझोत वळविला पाहिजे. राज्यकर्ते म्हणून त्यांचे चारित्र्य काय, शासनयंत्रणेचे ते कसे वाटोळे करत आहेत आणि त्यांच्या नेहमीच्या गैरव्यवहाराचा एक परिणाम म्हणजे सध्याची समस्या हे तुम्ही पुन्हा पुन्हा दाखवून दिले पाहिजे. यासाठी भेदक दृष्टी हवी. अनेकविध प्रश्न हाताळायचे कौशल्य हवे. प्रत्येक विषय वस्तुस्थितीच्या बाजूने, कायद्याच्या बाजूने हाताळता यायला हवा. प्रत्येक प्रश्नाची बाजू निर्णय ठरेपर्यंत लढविण्याची चिकाटी हवी.

सोळा : या चढ-उतारातून संघर्ष चालू ठेवताना, बदलत्या समस्या हाताळत असताना टप्प्यागणिक आपण डावपेच बदलायला हवेत. आम्ही केलेला एक बदल आठवा. एका प्रसंगी आमच्या असे लक्षात आले की, सरकारकडून होणारा छळ मुकाट सोसण्याऐवजी त्याला थेट झुंज देण्याचे धैर्य दाखविणे आवश्यक आहे. शारीरिक दुखापतीची आणि बदनामीची भीती सोडून पुढे सरसावले पाहिजे. हा निश्चय करावा लागला तो सरकारने एक्स्प्रेसच्या दिल्ली आवृत्तीला कारस्थाने करून ऑक्टोबर - नोव्हेंबर १९८७ मध्ये टाळे लावले तेव्हा. परंतु एरवी इतरांप्रमाणेच मागे राहण्याचे धोरण नि शहाणपण असायला हवे. आमच्या कामामुळे आणि सरकारच्या यंत्रणेमुळे १९८८ च्या लढ्यात आम्ही इतर वृत्तपत्रांपासून वेगळे पडलो होतो. ऑगस्ट १९८८ मध्ये राजीव गांधींनी बदनामीविषयक विधेयक मांडले तेव्हा आमच्या लक्षात आले की, हे विधेयक तर वाईट आहेच आणि म्हणून त्याच्या विरोधात तर लढले पाहिजेच; परंतु सध्याची स्थिती पलटी करायला ही चांगली संधी होती. आता सर्व वृत्तपत्रांना एकत्र आणून सरकारला अलग पाडणे शक्य होते. तथापि यासाठी एक आवश्यक अट होती, ती म्हणजे या हालचाली आम्हांस पडद्यामागे राहूनच करणे शक्य होते. याचप्रमाणे बोफोर्स विषयाची कागदपत्रे आम्हाला न मिळता हिंदू वृत्तपत्राला मिळाली तेव्हा प्रथम आम्ही अस्वस्थ झालो. हे स्वाभाविकच होते. आपल्या वृत्तपत्राबद्दल अतिशय अभिमान बाळगणाऱ्या गोएंकाचे चित्तही विचलीत झाले. परंतु कोणताही पराजय हा साफ पराभव असे ते मानीत नाहीत. हीच गोष्ट विजयाला लागू होते. प्रत्येक पराभवात त्यांना काहीतरी फायदेशीर गोष्ट दिसतेच. त्यावर उभे राहून पुढील लढाई लढता येते. प्रत्येक विजयात त्यांना भविष्यातील अडचणींची बीजेही दिसतात. त्यामुळे यातून सावरून पुढे सरसावले हे छान झाले. तेही सोयीस्कर. हे अडथळे आपल्याला वाईट ठरविण्यासाठी हिंदूची

स्तुती करतील. हे करताना त्या कागदपत्रांची प्रसिद्धी आपोआपच होईल आणि कागदपत्रांचे वेगळेपण त्यांना मान्य करावे लागेल. नेमके हेच घडले. पुढच्या काही महिन्यात आम्हाला खिजविण्यात पुढाकार घेतला टाईम्स ऑफ इंडियाने. आतापर्यंत सरकारने केलेली आमची नालस्ती हरप्रकारे उचलून धरणाऱ्या आणि भ्रष्टाचार हा निव्वळ उच्चभ्रूंचा प्रश्न आहे असा प्रचार करणाऱ्या टाईम्सने अनेक अग्रलेखात बोफोर्सची कागदपत्रे आजपर्यंत किंचाळणाऱ्यांना न मिळता हिंदूला मिळाली, अशी किंवा या अर्थाची वाक्ये पुन्हा पुन्हा लिहिली. यातून आमची टवाळी झाली असो किंवा नसो, या कागदपत्रांना प्रसिद्धी देण्याचे कार्य सरकारी हस्तकांकडूनच उत्तम पार पडले !

सतरा : काळ आणि समुद्राची लाट कोणासाठी थांबत नाही. शासनाशी लढाई आरंभल्यानंतर हे अधिकच खरे ठरते. आजारपण असो किंवा भीषण घटना घडोत, कितीही अडचणी येवोत, लढाई चालूच ठेवावी लागते. पंचाऐंशी वर्षांच्या गोएंकांना हृदयविकाराचा झटका आला. काही काळ ते निष्क्रिय झाले. पुढचे काही दिवस भेटायला येणाऱ्या लोकांपासून त्यांचे संरक्षण करावे लागले. सरकारचे अनेक हस्तक वरकरणी त्यांची विचारपूस करायला आले. आतला उद्देश ते किती काळ टिकाव धरतील हे चाचपण्याचा होता. नंतर त्यांची अवस्था नाजूक बनल्याचा फायदा घेऊन त्यांचे मन वळविण्यासाठी सरकारने हिंदुजा, मुरली देवरा, दलालीचे काम करणारे एक खासदार, फार काय गोएंकांचे नातेवाईक पाठविले. काही वेळा त्यांचे बेत उभे राहण्यापूर्वीच धुळीला मिळाले. श्रीचंद हिंदुजा यांनी तर सरकारला आपली उपयुक्तता पटवून देण्याच्या हेतूने गोएंका आणि सरकार यांच्यात तडजोडीची बोलणी घडवून आणण्याचा घाट घातला. भेटीची वेळही त्यांनी ठरविली होती. तथापि पालम विमानतळावरून त्यांना गोएंकांशी थेट संपर्क साधता आला नाही. तेव्हा त्यांनी मलाच थेट फोन करून हा निरोप देण्याची विनंती केली. गोएंकांनी स्वत: असा प्रयत्न मोडून काढलाच असता; पण या प्रसंगी त्यांना तेवढे कष्ट घ्यावे लागले नाहीत. काही वेळा मूळगावकर तर कधी गुरुमूर्ती असे कोणीतरी गोएंकांच्या खोलीत बसलेले असल्याने सरकारी मध्यस्थांना बोलणे पुढे रेटता आले नाही. गोएंका आजारातून बरेच सावरले. तेव्हा कालचा हल्ला परतविल्यानंतर त्यांच्या दुर्दम्य आत्मबळावर ओरखडाही निघालेला नाही हे सर्वांच्या लक्षात आले. १९८० मध्ये ते असेच खंबीर होते. इंदिरा गांधींनी सत्तेवर परतून येताच एक्स्प्रेस समूहावर पुन्हा हल्ला चढविला होता. दिल्लीतील एक्स्प्रेसची इमारत ताब्यात घेण्याचा प्रयत्न झाला. प्राप्तिकराची जुनी प्रकरणे पुन्हा उकरून काढली गेली. त्या वेळी श्रीचंद हिंदुजा वाटाघाटीला आले. वृत्तपत्र विका, सांगाल ती किंमत देतो असा देकार होता गोएंकांनी प्रश्न विचारला, "मी माझी गाय स्वहस्ते कसायाच्या दारी नेऊन बांधू काय ?" आणि त्यांची बोळवण केली. हे आत्मबल आणि योगायोग यांमुळेच आम्ही वाचलो. जीव तोडून काम करणारे अनेक होते. टंकलेखकांनी रोज वीस तास याप्रमाणे सुटी न घेता सलग पंधरा दिवस कष्ट केले. तेव्हा रीट अर्ज त्यांना

दाखल करता आला आणि संचालक मंडळ ताब्यात घेण्याच्या सरकारच्या प्रयत्नाला खीळ बसली. दर्यागंज पोलिस ठाण्यापुढे शारीरिक दुखापतीची पर्वा न करता निदर्शने करणाऱ्या पत्रकारांमुळेच आम्ही आमच्या इमारतीत प्रवेश करून दिल्ली आवृत्ती प्रसिद्ध करू शकलो.

अठरा : एवढे आत्मबल, चिकाटी एवढ्याच गोष्टी पुरेशा आहेत असे मला सुचवायचे नाही. संस्था म्हणून एक्स्प्रेस समूह लढाईसाठी सदैव सुसज्ज होता असे नाही. उलट संघटना म्हणून खूपच दुर्बल होता. वृत्तपत्र प्रसिद्ध करण्यासाठी शेकडो कर्मचाऱ्यांना छोटी-मोठी कामे पार पाडणे आवश्यक असते हे तर खरेच. परंतु त्याचा गाभा म्हणता येईल अशी कामे काही मूठभर लोकांनाच करावी लागली. वस्तुस्थिती शोधून काढणे, महत्त्वाचे लिखाण करणे, खटले लढविणे, गोएंकांच्या तब्येतीची काळजी घेणे, एखादी मोठी संस्था चालू ठेवण्यासाठी करावी लागणारी नाना तऱ्हेची कामे करणे या जबाबदाऱ्यांमध्ये ही मूठभर माणसे गुंतून पडल्यानंतर वृत्तपत्राची काहीशी आबाळ होणे साहजिकच होते. या परिस्थितीत ही वृत्तपत्रे नवी माहिती देत राहिली, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचा तपशील प्रसिद्ध करत राहिली ही मोठी कमाई होय. परंतु संपादकीयदृष्ट्या काही वेळा उणीवा भासल्या हे खरे आहे.

तेव्हा हे वृत्तपत्र लढाईसाठी सुसज्ज होते म्हणून सरकारला तोंड देऊ शकले अशी स्थिती नाही. उलट संघटनात्मक अडथळे असतानाही लढा देऊ शकले ते विशेष. प्रतिमा आणि निष्ठा यांची जोडी जमलेली थोडीशी माणसे काय साध्य करू शकतात याचे हे उदाहरण. परंतु आपल्या राज्ययंत्रणेची अवस्था काय होते हेही त्यातून दिसते.

एकोणीस : संस्थेतील जबाबदार माणसे लढाईत गुंतल्यानंतर ज्या अनेक अडचणी संस्थेवर ओढवतात त्याखेरीज संपादकीय आशयाच्या अंगाने काही किंमत मोजावी लागली. या वृत्तपत्रांनी सार्वजनिक जीवन स्वच्छ करण्याची, जबाबदारीचे तत्त्व पुन्हा प्रस्थापित करण्याची आणि यंत्रणेमध्ये जान आणण्याची जबाबदारी अंगावर घेतली होती. त्यासाठी प्रचंड उत्साहाने आणि चिकाटीने राजीव गांधींच्या सरकारला लढाईला ललकारले होते. आंध्र प्रदेशात एन. टी. रामाराव आणि हरियानामध्ये देवीलाल हे नेतेही यंत्रणेचा भरपूर गैरवापर करत होते. त्या त्या भागातील आमच्या वृत्तपत्राच्या आवृत्त्या या नेत्यांविरुद्ध उभ्या ठाकण्यासाठी आतूर होत्या. परंतु केंद्र सरकारशी चाललेला लढा अधिक प्रखर आणि तीव्र असल्याने या छोट्या लढाया आम्हाला अंगावर घेता आल्या नाहीत. वृत्तपत्रांनी टीका केल्यानंतर सरकारने वागणुकीचे काही निकष पाळावेत अशी स्थिती आपल्या देशात असती, तर लढाई एवढी अवघड गेली नसती. परंतु वागणुकीचे सारे निकष, मानदंड राजीव गांधी आणि त्यांच्या सरकारने केराच्या टोपलीत टाकले होते. कोणताही प्रश्न त्यांना अटकाव करायला समर्थ नव्हता. एन. टी. रामाराव आणि देवीलाल यांचीही प्रतिक्रिया राजीव गांधींसारखी झाली असती. त्यामुळे हातात प्रथम घेतलेले कार्य पुरे झाल्याखेरीज इतर काही अंगावर घेऊ नये असे आम्ही ठरविले. हे धोरण योग्यच होते.

परंतु त्याची मोठी किंमत मोजावी लागली. एन. टी. रामाराव आणि देवीलाल यांचा लहरीपणा आणि भ्रष्टाचार यांना इतर वृत्तपत्रे प्रसिद्ध देत नव्हती. तथापि त्यांचे एकंदर चारित्र्य लक्षात घेता वाचकांची त्यांच्याकडून तशी अपेक्षाही नव्हती. उलट एक्स्प्रेसकडून मात्र लोक काही अपेक्षा बाळगून होते. ज्या अर्थी भ्रष्टाचार, जबाबदारांकडून यंत्रणेचा गैरवापर या प्रश्नांवर आम्ही केंद्र सरकारशी अखंड संघर्ष करत होतो, त्या अर्थी हेच प्रश्न राज्यपातळीवर उपस्थित झालेले असताना तेथेही आम्ही लढ्यात उतरले पाहिजे अशी वाचकांची अपेक्षा होती. उलट याच कारणासाठी आम्ही या छोट्या लढाईत उतरू शकत नव्हतो. आमचा आवाज बंद पाडण्याच्या निश्चयाने पछाडलेले केंद्र सरकार कोणत्याही कायद्याला जुमानीत नव्हते. त्यामुळे आम्ही अधिक गुंतून पडलो होतो. या शृंगापत्तीतून मार्ग काढता आला नाही. केव्हातरी वाचकांना आमच्या अडचणी समजतील असा विश्वास बाळगून आम्ही शांत राहिलो.

वीस : भारतात निव्वळ चांगली व्यावसायिकता असणे पुरेसे नाही. इतर देशांत एका वृत्तपत्राने दिलेला बातमीचा धागा इतर वृत्तपत्रे पुढे नेतात. विधिमंडळे, न्यायालये, सार्वजनिक संस्था आपल्या परीने तो विषय पुढे नेतात. भारतात नेमके उलट घडते. इतर वृत्तपत्रे डोक्यावरून चादर ओढून झोपी जातात. वाचकांच्या हे लक्षात येणार नाही, असे त्यांना वाटते. काही वृत्तपत्रे तर आणखी खालची पातळी गाठतात. सरकारच्या वतीने अपप्रचार करतात. विधिमंडळे, न्यायालये सरकारच्या मुठीत असतात. यातून तीन गोष्टी निष्पन्न होतात.

इतर लोकशाही राष्ट्रांपेक्षा आपल्या देशात एखाद्या गोष्टीचा पाठपुरावा खूप जास्त प्रमाणात, खूप जास्त काळ आणि खूपच जास्त चिकाटीने करावा लागतो.

बदनामी आणि नालस्तीकडे साफ दुर्लक्ष केले पाहिजे. राज्यकर्त्यांच्या किरकोळ हस्तकांच्या कारवाया वेळ आणि शक्ती वाया घालवितात.

अनेक जबाबदाऱ्या पार पाडायची तयारी पाहिजे. खासदारांसाठी टिपणे काढून देण्यापासून कोर्टात रीट अर्ज दाखल करण्यापर्यंत आणि काँग्रेसच्या उमेदवाराच्या विरोधात विरोधी पक्षाचा एकच उमेदवार उभा करण्यापर्यंत अनेक कामे पार पाडावी लागतात. या सगळ्यातून खूप जास्त त्रास होतो. माणूस थकून जातो. काही वेळा निराश होतो. निव्वळ व्यावसायिक दृष्टिकोनातून एवढे काम होऊच शकत नाही. आपण प्रथम नागरिक आहोत ही जाणीव पक्की असली तरच एवढ्या चिकाटीने काम होऊ शकते. समाजसुधारणेची ईर्षा तुमच्या नसानसात भिनलेली असेल आणि वृत्तपत्रातील आपले काम हा व्यापक राष्ट्रीय कर्तव्याचा एक भाग म्हणून करण्याची तुमची तयारी असेल तरच अशा गोष्टी तुमच्या हातून घडू शकतात.

एकवीस : आता मी एका महत्त्वाच्या मुद्याकडे येतो. काहीजण संघर्षात आपणहून उतरतात, तर काही त्यात अडकले जातात आणि मग अनेक कारणांमुळे त्यात अडकून राहतात. एखादा विशिष्ट सावजाच्या मागावर असतो आणि त्याच्या रक्षणासाठी राज्ययंत्रणा उभी राहील अशी यांची अपेक्षा नसते. दुसऱ्या एखाद्याच्या

प्रतिस्पर्ध्याला काहीतरी अवाजवी लाभ मिळालेला असतो. तिसरा एखाद्या राज्यकर्त्यांच्या विशिष्ट कृतीमुळे संतापलेला असतो तर चौथ्याला अनेक गोष्टीतला परस्पर संबंध दिसत असतो आणि त्याचे मूळ कारण यंत्रणेचा गैरवापर होते, हे दिसत असते. राज्यकर्त्यांच्या कारवाईमुळे एखादा क्षण असा येतो की वरवर कारणप्रेरित झालेले हे सर्व गट एकत्र येतात आणि ठरवितात, आता बस झाले, याहून आणखी सहन करणार नाही.

यातून चळवळी उभ्या राहतात. परंतु त्यातील व्यक्ती व गट यांची दृष्टी आपापल्या गाऱ्हाण्यापलिकडे गेली नाही आणि सर्व गाऱ्हाण्यांचे मूळ एकच आहे, राज्यकर्त्यांच्या स्वभावात आणि कृतीत ते लपलेले आहे, हे त्यांनी ओळखले नाही, तर चळवळी थंडावू शकतात. व्यक्तिगत द्वेषभावनेपोटी आम्ही हे करतो असे भासविण्यात येते. अर्थात अशी नालस्ती पुढे ओसरून जाते. कारण तुम्ही लढाईत दीर्घकाळ टिकाव धरला की, महत्त्वाच्या हेतूंचा सच्चेपणा आपोआपच उघड होतो. परंतु दरम्यानच्या काळात आपले सहकारी आणि जनता यांचा गैरसमज होऊ नये यासाठी त्यांना पहिल्या लढाईचा अन्वयार्थ समजावून सांगणे आवश्यक ठरेल.

दीर्घकाळ चालणाऱ्या लढाईत टिकाव धरावयाचा असेल तर त्यामागे व्यक्तिगत किंवा एखाद्या गटाच्या स्वार्थाची संकुचित प्रेरणा असून चालत नाही. तशीच ती असेल तर त्या व्यक्तीवर किंवा गटावर सवलतीचा पाऊस पाडण्यास राज्यकर्ते धजत नाहीत. उलट आपल्या या मुक्त समाजहित विरोधाने विरोधाची भरपूर किंमत मोजायला ते भाग पाडू शकतात. अगदी नफ्या-तोट्याचा हिशोब न करता चिकाटीने लढा चालू ठेवणे हाच मार्ग योग्य ठरतो. आपले ध्येय जर स्वत:चे किंवा वृत्तपत्राचे उखळ पांढरे करून घेणे असेल किंवा भानगड अधिक वाईट असेल तर आपण लढाईत विरोध सोडून देणे स्वाभाविक आहे. परंतु राज्याचे रूपांतर खासगी जहागिरीत करण्याच्या प्रवृत्तींच्या कॅन्सरशी आम्ही लढत देत होतो. यांपैकी काहींना धावरवून पळवून लावण्याचा अथवा विकत घेण्याचा प्रयत्न राज्यकर्ते करतात. यासाठी राज्यकर्त्याविरुद्ध लढाईला उभे राहिलेल्या सर्वांनी आप-आपल्या गाऱ्हाण्यांच्या पलिकडे पाहिले पाहिजे. त्याचा पाठपुरावा करताना परस्पर संबंध लक्षात घेतला पाहिजे आणि नंतर राज्यकारभार सुधारण्याच्या समान उद्दिष्टांचा पाठपुरावा केला पाहिजे. इतरांनाही उद्दिष्ट साध्य करताना समान मानले पाहिजे. लढाईत पुढाकार घेतलेल्या इतरांना असा समान धागा समजावून सांगून त्यांच्यात समान उद्दिष्टांची जाण निर्माण केली पाहिजे.

उद्दिष्टांचा घोष करणे आणखी एका कारणासाठी महत्त्वाचे ठरते. आपले विरोधक स्वार्थी आणि संकुचित कारणासाठी आपल्या विरुद्ध आहेत असे ठासून सांगणे ही राज्यकर्त्यांची एक आवडती युक्ती असते. या न्यायाने १९८७ ते ८९ या काळात आम्ही जे जे करतो ते सर्व दोन व्यावसायिक गटांमधील स्पर्धेमुळे किंवा राजकारणी हेतूने प्रेरीत होऊन घडते आहे असा प्रचार केला जाई. राजकारणी हेतूने प्रेरीत ठरविले जाताच त्याची अगदी उत्तम बदनामी केली

असे आपल्याकडील राजकारण्यांना वाटते. आम्ही या कर्करोगाला मोकळे सोडले असते तर त्यांनी आपल्या समाजाचा आणि देशाचा सत्यानाश केला असता. मनात असे व्यापक उद्दिष्ट निश्चित असल्यामुळे आम्ही ठिकाणावर राहू शकलो.

बत्तीस : या प्रकरणातून आम्ही बाहेर पडलो असलो तरी दुरिताला प्रतिबंध करणाऱ्या सगळ्याच यशाची यात हमी देता येत नाही. १९८९ च्या मध्याला या संघर्षाचा माझ्या मनावर थोडाही ताण पडत नसे. कदाचित राजीव गांधींच्या हल्ल्याची नांगी मोडली होती हे त्याचे कारण असेल. कदाचित संघर्ष हाच जीवनक्रम म्हणून अंगवळणी पडला असेल; पण मला असे वाटते की, आमच्या उद्दिष्टांसाठी काम करताना आम्ही त्यांच्यापासून थोडेसे अलिप्तही झालो होतो. लढाईचा निकाल आमच्या हातात नाही तर लक्षावधी लोकांवर अवलंबून आहे, हे आमच्या लक्षात होते. त्यामुळे लढाईच्या गदारोळात आमच्या मनाला पुष्कळ स्वास्थ्य आणि शांतता प्राप्त झाली होती.

यातून निघतो अखेरचा निष्कर्ष. आम्ही पूर्वीच्या हजारो लोकांप्रमाणे एक गोष्ट शिकलो; भगवद्‌गीतेचा उपदेश किती विलक्षण असा आहे.

मार्च १९९०

निबंध ३९६३ ३६५४८ ५३१८२
REFBK-0026548